
आठवणीतली गाणी
- अनंत पावसकर
eBook
YouTube
थोर तुझे उपकार !


eBook
आठवणीतली गाणी
- अनंत पावसकर
YouTube
थोर तुझे उपकार !

।। ॐ साई राम ।।

# आठवणीतली गाणी

©

**अनंत पावसकर**
अभिषेक, श्रीपाल बंगला क्र. ७,
पद्मावती हॉलजवळ,
बोळिंज, विरार (पश्चिम) ४०१३०३
भ्रमणध्वनी : ९८२००२२४१७
**email : anantpavaskar@gmail.com**

۞

प्रकाशक : **म्युझिक प्लॅनेट**
डी/१०१, गोल्ड क्रेस्ट ३६९,
ZUDIO / fbb च्या शेजारी,
नवीन विवा कॉलेजसमोर,
वाय. के. नगर, D'Mart जवळ,
विरार (पश्चिम) ४०१३०३
Website : www.musicplanet.net.in

۞

प्रथम आवृत्ती : अक्षय्यतृतीया (रविवार, दि. १६ मे, २०१०)
द्वितीय आवृत्ती : श्री गणेश जयंती (शुक्रवार, दि. ८ फेब्रुवारी, २०१९)

۞

मुखपृष्ठ : लक्ष्मीकांत म्हसकर
(संकेत ग्राफिक्स, मुंबई) संपर्क : ९८३३६४४५७६

शीर्षक सुलेखन : कॅलिग्राफी तज्ज्ञ श्री. अच्युत पालव

۞

## अर्पण पत्रिका

।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू, गुरुर्देवो महेश्वरः ।
। गुरुःसाक्षात परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ।।

।। श्री सदगुरु साईनाथार्पणमस्तु ।।

## मनोगत (पहिली आवृत्ती)

### आठवणीत रमण्यापूर्वी..........

'आठवणीतली गाणी' हे माझं पहिलं-वहिलं पुस्तक तुमच्या हाती देताना समाधान वाटत आहे. पूर्व दिशेच्या क्षितिजावर सूर्याची कोवळी किरणं आसमंत उजळून टाकण्याच्या क्षणापासून ते थेट रात्री निद्रादेवीच्या अधीन होण्याच्या क्षणापर्यंत आपली साथसंगत करतं ते 'संगीत'. संगीत हा आपला श्वास आहे. आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. सूर के बीना जीवन सूना.. हेच खरं. नुसत्या गायकांबद्दलच बोलायचं तर लतादीदी, आशाताई, मो. रफी, किशोरकुमार, मुकेश, मन्नादा, हेमंतदा, तलत... तर आपल्या मराठीतले गायक गजाननराव वाटवे, बाबुजी, हृदयनाथजी, अरूण दाते, सुरेश वाडकर अशी कित्येक नावं आपण आपल्या काळजावर सुवर्णाक्षरांनी कोरलेली आहेत. विस्तारानेच सांगायचं तर सुप्रसिध्द नाटककार शेक्सपियरने 'नावात काय आहे?' असं म्हटलं असलं तरी 'या' नावांचं माहात्म्य चोखंदळ रसिकच जाणू शकतो. या नावांमध्ये अशी जादू आहे की आपण त्यांच्या एकंदर कर्तृत्वाने पूर्णतः भारावून गेलेलो आहोत, आणि त्यांनी गायलेल्या गाण्यांचा कैफ आपल्याला शेवटच्या श्वासापर्यंत साथसंगत करणार आहे, ही जाणीवच किती सुखद आहे, नाही? आपण खरंतर खूपच भाग्यवान. ज्या शतकात असे अव्दितीय स्वरांचे सरताज जन्मले त्याच शतकात आपलाही जन्म झाला आणि या स्वर्गीय स्वरांच्या अमृततुल्य बरसातीने आपलं आजचं धकाधकीचं जीवन सुसह्य झालं आहे ही वस्तुस्थिती कुणीच नाकारणार नाही. यासाठी आपण त्यांचे सदैव कृतज्ञ राहणार आहोत. त्यांचं नाव उच्चारताक्षणी आठवणींचं मोहोळ उठतं ते यामुळेच. ते नाव नुसतं उच्चारलं की त्यांची एकाहून एक सरस गाणी आपोआप आपल्या मनात रूंजी घालू लागतात. नकळत ओठ ती गुणगुणायला लागतात. सध्याच्या आयपॉड, एम्पीथ्री, सीडी, एफ्-एम्च्या आधुनिक युगात आपल्याला सदासर्वकाळ गाणी ऐकायला मिळतात, इच्छा नसली तरी पहावी लागतात. कुठलंही चॅनल पहा, रीमिक्सच्या नावाखाली चाललेला उच्छृंखल गोंधळ, हैदोस अगदी डोळ्यांसमोर उघडपणे सुरू असतो. पण आपण सहजी त्या वाटेला जात नाही. कारण आपण आपल्या आवडी-निवडी विषयी ठाम असतो. त्या आपल्यावर कुणीही लादू शकत नाही. आपल्याला मनःपूर्वक आवडणारी गाणी वेगळीच असतात. ही 'यादी' मोठीही ही असू शकते, पण त्यातली काही मात्र खास आवडीची असतात. त्यांना आपण आठवणीच्या कुपीत बंदिस्त करून ठेवलेलं असतं. त्यातल्या प्रत्येक गाण्याशी आपल्या काही आठवणी निगडीत असतात. आयुष्यातल्या कोणत्यातरी प्रसंगाशी, घटनेशी त्याचा थेट संबंध असतो. या गाण्यातल्या शब्दांशी, वाक्यरचनेशी आपलं भावविभोर विश्व संबधित असतं. त्या गाण्यांशी आपला इतका ऋणानुबंध असतो म्हणूनच की काय, आपण त्यांची यादी करून ती कॅसेट किंवा सीडीवर रेकॉर्ड करून घेण्यासाठी धडपडतो. आपली परिस्थिती पत्रिकेत कडक मंगळ असलेल्या मुलीच्या बापापेक्षाही भयंकर झाली तरी हार न पत्करता, आपण ती गाणी मिळवतोच मिळवतो. फावल्या वेळात आपण ती गाणी कायावाचामनेकरून आवडीने ऐकतो. ती ऐकताच आपल्याला स्वर्ग गवसल्याचा आनंद मिळतो. आपल्या चित्तवृत्ती प्रफुल्लित होतात. ही गाणी ऐकणं हा आपल्यासाठी आनंदसोहळा असतो. व्हेरी पर्सनल! त्याच्यातील सकारात्मक आणि आश्वासक कंपनांमुळे आपलं संवेदनशील मन टवटवीत होतं. शारीरिक क्षीण नाहीसा होतो. जगायची उमेद वाढते. पण.. तुम्ही ती गाणी अभ्यासता? नेमकं तेच गाणं आपल्याला का आवडतं, याचा कधी विचार करता? शास्त्रीय अनवट रागांबाबतीत बोलायचं तर आपलं ज्ञान थीटं पडतं. कबूल! चाल लावण्याची कला आपल्याला अवगत नाही, कोणत्याच वाद्याशी आपला दोस्ताना नाहीय. पण म्हणून काय झालं? एक सच्चा रसिक म्हणून आपल्यापूरतचं का होईना, एखादं गाणं चांगलं की वाईट हे ठरवतोच ना? पदरमोड करून ध्वनिफीत, सीडी विकत घ्यायची झाली तर आपण दहा वेळा विचार करून, मनपसंत गाण्यांचीच विकत घेतो ना? त्यावेळी आपली मनःस्थिती ढीगभर साड्यांमधून नेमकी आपल्या आवडीची साडी घेणाऱ्या बायकांपेक्षाही चौकस असते. मग आपल्या या आवडत्या गाण्याबद्दल थोडसं चिकित्सक, अभ्यासू असण्यास काय हरकत आहे? आता तुम्ही म्हणाल की एखादं गाणं खुप आवडतं, एवढीच गोष्ट माझ्यासाठी पुरेय. चित्रपट कोणता, दिग्दर्शक कोण, कुणी लिहिलंय? वगैरे गोष्टी माझ्यासाठी फिजूल आहेत. पण खरं सांगू? कोणतंही 'गाणं' असं सहजगत्या बनत नसतं. तुमच्या आवडीच्या या प्रत्येक गाण्यामागे त्याच्या जन्माचा रोमांचकारी इतिहास असतोच असतो. एखादा विशिष्ट किस्सा असतो. आठवण असते. ते बनविण्यात किमान शंभरेक माणसांचे परिश्रम असतात. कवी किंवा शायरला सुचलेल्या काव्यापासून तर कधी संगीतकाराला सुचलेल्या चालीपासून त्याचं ध्वनिमुद्रण होईपर्यंत आणि त्यानंतर पुढे ते ध्वनिफीत किंवा सीडीवर प्रकाशित होईपर्यंतचे सोपस्कार ही एक प्रदीर्घ शृंखला असते. एक खडतर प्रवास असतो. 'आठवणीतली गाणी' ही याच प्रवासाची दास्तान. 'यादों' की बारात! मी कसला लेखक? एक तुमच्यासारखाच सर्वसामान्य रसिक आहे. मलाही तुमच्यासारखं आठवणीत रमायला आवडतं, भूतकाळ आणि वर्तमान यातील ती गडद रेषा नकोशी वाटते. सुदैवाने ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत असल्याने वेगवेगळया सर्वच प्रकारची गाणी बनताना त्याचा साक्षीदार होण्याचं भाग्य लाभलंय मला. गाणी बनविण्याचा प्रत्येक टप्पा अनुभवता

आला, डोळसपणे अभ्यासताही आला. या काळात मुलाखतींच्या निमित्ताने त्या स्वरकिन्नरांना प्रत्यक्ष भेटता आलं. परिचय झाला. परिचयाचं रूपांतर पुढे ऋणानुबंधातही झालं. नवे स्नेही जोडता आले. खूप ऐकायला, पहायला मिळालं. जीवनाकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोन काहीसा बदलला. जगण्याची उमेद वाढली. माझ्या जीवनाचा तो काळ सार्थकी लागला असं मी म्हणेन. 'आठवणीतल्या गाण्यांची' ही दास्तान अगदी निरागसपणे, निर्व्याजपणे मांडण्याचा मी प्रयत्न केलाय. सुरवंटाचं फुलपाखरू बनण्याच्या जशा वेगवेगळया अवस्था असतात ना, त्याहीपेक्षा जास्त खडतर अशा प्रक्रियेतून एखादं 'गाणं' आकार घेत असतं. त्यातल्या परिश्रमांमुळेच ते गाणं आपल्या काळजाचा ठाव घेतं. अनुभवाच्या या शिदोरीमुळेच  मी अनेक  लोकप्रिय अल्बम्स बनवलेत. जवळजवळ सर्वच भारतीय भाषांतील अल्बम्सचं संयोजन, व्यवस्थापन करायला मिळालं. त्यामुळेच गुलाम अली, जगजीत सिंह, डॉ. एस्. पी., आशाताई ते थेट अनुराधा पौडवाल, कविता कृष्णमूर्ती, अभिजित, उदित, कुमार सानू, अलका याज्ञिक, साधना सरगम, सोनू निगम, शंकर महादेवन, अदनान सामी, रेमो फर्नांडिस, शान, हरिहरन अशा नामांकित गायकांना जवळून अभ्यासता आलं. काम  करण्याची संधी मिळाली. जानपहेचान झाली. तसेच मराठीत अरूण दाते, अजित कडकडे, रवींद्र साठे, श्रीधर फडके, सुरेश वाडकर अशा सन्माननीय गायकांबरोबर अनेक लोकप्रिय अल्बम्स केले. वैशाली सामंत, स्वप्निल बांदोडकर, सुनिधी चौहान, हेमा सरदेसाई अशा गायकांना घडताना पहायला मिळालं. स्टुडिओ-इनचार्ज असल्याने अनेक दिग्गज निर्मात्यांच्या चित्रपटांची लोकप्रिय गाणी माझ्यासमोर आकाराला आलीयत, ध्वनिमुद्रित झालीत. राजेश रोशन, अन्नू मलिक, भप्पी लाहिरी, जतिन-ललित ते आजच्या हिमेश रेशमिया पर्यंतच्या सर्वच संगीतकारांची स्टाईल अभ्यासायला मिळाली. संगीत संयोजन म्हणजे नेमकं काय ते कळलं. नौशादजी, ओ. पी. नय्यर, एस्.डी बर्मन, सी. रामचंद्र, शंकर-जयकिशन, मदनमोहन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल ते आर.डी. पर्यंतच्या सर्व बुजुर्ग संगीतकारांचे संगीत-संयोजक, त्यांच्या वाद्यवृंदातील वादक यांच्यासह प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली हे विशेष. इथल्या अनुभवाच्या या शिदोरीमुळेच मी लिहायला उद्युक्त झालो. स्वतःला  मिळालेला आनंद आपल्याबरोबर शेअर करावा म्हणून हा 'आठवणीतल्या गाण्यां'चा लेखप्रपंच! माझ्या लेखातला 'मी' हा शब्द अहंकाराने उच्चारलेला, 'मी' पणाने बरबटलेला शब्द असेल असा कृपया गैरसमज करून घेऊ नका.  'मी' जे काही अनुभवलंय ते प्रांजळपणे तुमच्याबरोबर शेअर केलंय, हे कृपया लक्षात असूद्या. ही 'आठवणीतल्या गाण्यां'ची दास्तान मी दैनिक सामनाच्या 'फुलोरा' पुरवणीतून आपल्यापुढे मांडत गेलो आणि पाहता पाहता सलग पाच वर्षे तुमच्यासह आपल्या 'आठवणीतल्या बेमिसाल गाण्यां'मध्ये रममाण होण्याचं भाग्य मला लाभलंय. दिग्गजांशी केलेलं हितगुज, प्रसंगांच्या उल्लेखातून एखादं गाणं सुचायचं, गप्पा रंगायच्या. रम्य आठवणींचे रांजण रीते व्हायचे आणि ते सगळं लेखाच्या स्वरूपात तुमच्यापर्यंत पोहोचायचं. खूप मजा यायची. एकेका गाण्याचा 'हँग-ओव्हर' आजही तस्साच कायम आहे. ताजातरीन आहे. आता पुन्हा आपण आपल्या 'आठवणीतल्या गाण्यां'मध्येच रमायचंय.. या पुस्तकरूपाने. 'आठवणीतली गाणी' हे माझं सदर 'फुलोरा' पुरवणीतून प्रत्येक शनिवारी प्रसिध्द व्हायचं. गाणं तुमच्या आवडीचं असल्याने ते मनात निदान आठवडाभर तरी मनात रेंगाळत रहायचं. पुढच्या आठवड्यात काय लिहायचं या संभ्रमात मी असायचो तर पुढच्या शनिवारी कुठलं गाणं असणारेय ही उत्सुकता तुमच्या मनात असायची. कधी कुणाची फर्माईश यायची. कधी चक्क फॅन-मेलही यायचं. मी लिहायचो! या पुस्तकात पन्नास लेख एकत्रितपणे समाविष्ट झाले आहेत. याबाबत एक विनंती करावी म्हणतो. संपूर्ण पुस्तक एकाच बैठकीत नका वाचू. एकच लेख वाचायचा. त्या गाण्याचे बोल स्वतःशी गुणगुणायचे. गाणं संग्रहात असेल तर ते शांतपणे ऐकायचं. त्याचा कैफ मनावर ताबा मिळवताच मग त्याच धुंदीत आपल्याला हवा तितका काळ मस्त मजेत घालवायचा. आता दुसऱ्या गाण्याकडे वळायचं.. 'मजा लेना है पिनेका तो.. कम कम, धीरे धीरे पीSS!' म्हणतात ना अगदी तस्सं! आपल्यापैकी अनेकांना गाणं गुणगुणायची सवय आहे, खास तुमच्यासाठी म्हणून संपूर्ण गाणं लेखासोबत दिलं आहे.

माझ्या या पहिल्या-वहिल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिलीय सन्माननीय कविवर्य प्रा. प्रवीण दवणेजींनी. अशा प्रगल्भ प्रतिभेच्या लोकप्रिय कविवर्याने आपल्या व्यस्त दिनचर्येतून सवड काढून माझ्या पुस्तकासाठी परिक्षण लिहावे अशा व्यक्तीचं ऋण नुसतंच मान्य करून अथवा उल्लेख करून फिटणारे नाही. अभय परांजपे (सुप्रसिध्द पत्रकार आणि वादळवाट या महामालिकेचा लेखक) या माझ्या मित्राचा उल्लेख स्वतंत्रपणे करायलाच हवा. कारण १९९४ साली 'आठवणीतली गाणी' म्हणून एखादी लेखमाला असावी ही संकल्पना सर्वप्रथम मांडली असेल ती अभयनेच. त्याच्या प्रोत्साहनामुळेच मी लिहायला लागलो.

दै. सामनाच्या 'फुलोरा' पुरवणीत माझी ही लेखमाला सलग पाच वर्षे सुरू होती. (नंतर या संकल्पनेवर अनेक वृत्तपत्रातून अनेकांचे लेख येऊ लागले ही गोष्ट अलाहिदा.) पुस्तकाला आकर्षक मुखपृष्ठ असावं ही इच्छा पूर्ण केलीय ग्राफिक्स डिझायनर श्री. लक्ष्मीकांत म्हसकर यांनी. हा माझा सखा आणि सख्खा मावसभाऊ. संगणकावरचे उपलब्ध 'फॉन्टस्' वापरून मुखपृष्ठावरचं डिझाईन करणं सहज शक्य असतं. पण ते अतुशय सामान्य आणि कृत्रिम वाटतं. सुप्रसिध्द सुलेखनकार आणि कॅलिग्राफी तज्ज्ञ श्री. अच्युत पालवसाहेबांनी माझ्या या पुस्तकाचं सुलेखन अगदी हौसेनं करून दिलंय. हे विशेष. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

स्वतःचं एखादं पुस्तक प्रकाशित व्हावं हे प्रत्येक लेखकाचं ‘ड्रीम-प्रोजेक्ट’! ‘पुस्तक प्रकाशन’ ही आज अत्यंत महागडी हौस समजली जाते. पुस्तक नुसतं प्रकाशित करून भागत नाही. त्याचं नेटवर्क असावं लागतं. आपली कलाकृती सर्वदूरवर पोहोचणं आवश्यक असतं. अल्पावधीत नामांकित झालेल्या ‘मुद्रा प्रकाशन’च्या मालकांकडे, माझे परममित्र श्री. राजू नाईक यांच्याकडे शब्द टाकला. त्यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी पुढाकार घेतला म्हणूनच माझं हे पहिलं पुस्तक आपणा रसिकांपुढे येत आहे. त्याचा मी सदैव ऋणी राहीन. पुस्तक प्रकाशित करावं ही संकल्पना माझ्या पत्नीची, आयुष्यात अनेक बऱ्या-वाईट घटनांनी बोचरं दुःख दिलं परंतु त्या परिस्थितीशी झगडण्याचं सामर्थ्य दिलं ते या संगीतवेडानंच, आणि खंबीरपणे पाठीशी उभी राहिली ती माझी सुविद्य पत्नी आणि सखी. ‘जीवनगाणं’ सुरेल झालं ते यामुळेच. आयुष्यभर या गाण्यांनीच जगायची उमेद दिली. या जगातून ‘एक्झिट’ घेतल्यानंतरही पुस्तकरूपानं का होईना मी तुमच्यासोबत असेन ही कल्पनाच सुखद आहे, नाही का? आपल्या आवडीच्या गाण्यांच्या आठवणीत रमणं यासारखं दुसरं सुख ते काय? हा आनंद-सोहळा, हा ‘आठवणीतल्या बेमिसाल गाण्यां’शी आपला ऋणानुबंध असाच चिरंतन राहो, हीच माफक अपेक्षा..

**- अनंत पावसकर**

♥

## ‘आठवणीतली गाणी’..

### प्रस्तावना - प्रा. कवि प्रवीण दवणे

‘आठवणीतली गाणी’ हा जगण्यातील मनतरंगांचा सुरेल प्रवास आहे. गाण्याच्या सोबतीनं आयुष्याचा पट उलगडत जाणाऱ्या काळातील ह्या गाण्यांचा, गाण्यामागील कथांचा, संगीतकार, गायक व कवींच्या एकमेकांवरील डोळस श्रध्दांचा रेशमी गोफ गुंफण्याचं मोलाचं कार्य लेखक श्री. अनंत पावसकर यांनी ह्या लेखमालेव्दारे केले आहे.

पावसकरांची आणि माझी सुमारे पंचवीस-तीस वर्षांची मैत्री आहे, आणि त्या स्नेहाचे निमित्तही ‘संगीत’ हेच आहे. अनंत पावसकर हे केवळ सूर, शब्द, स्वररचना यांचंच चिंतन करणारं व्यक्तिमत्त्व! काळावर आपली मुद्रा उमटवणाऱ्या गाण्यांचा ते अक्षरशः कस्तुरीमृगाच्या ओढीने पाठलाग करतात. ह्या ध्यासपर्वाला आलेला बहर म्हणजे ‘आठवणीतली गाणी’ हा ग्रंथ आहे. खरंतर.. ह्या गाण्यांच्याही आठवणी आहेत. त्या आठवणीत गुंतलेली कित्येक पिढ्यांची आंदोलने यात आहेत; अर्थात त्यातील मी एक असल्याने हे पुस्तक प्रस्तावनेच्या निमित्ताने जेव्हा मी झपाटून वाचले, तेव्हा एक एक पान पुढे-पुढे जाताना, मन तितकेच मागे-मागे जात असल्याचा सुखद प्रत्यय येत होता. असं का होत होतं नेमकं? कारण अनंत पावसकरांनी केवळ आठवणींच्या गाण्याचं वृत्तांतलेखन केलेलं नाही; तर त्या गाण्यांच्या निर्मितीकथाही ओघाओघात सांगितल्या आहेत. इतक्या सहज, की त्या केव्हा येऊन जातात व पुन्हा गाणे केव्हा समोर उभे ठाकते ते कळतही नाही. म्हणून म्हटलं.. गाणी आणि आठवणी यांचा हा रंगतदार मेळ आहे. स्वतः रसिक म्हणून अनंत पावसकरांनी ह्या गाण्यातील प्रत्येक घटकावर मनमुक्त प्रेम केलं आहे; आणि म्हणूनच त्यांच्या लेखनात लालित्याचं चांदणं सहज उतरल्याचा प्रत्यय वाचकाला येतो.

ज्या गाण्यांवर आपण अहोरात्र प्रेम केलं, किंबहुना ज्या गाण्यांनी आपले अनेक ताणतणाव सुसह्य केले त्या गाण्यांचा हा शब्दवेधी आल्बम चाळताना, आपण अनेकदा चकीत होतो; कधी थांबतो.. गुंततो.. तर कधी त्यातील हिमालयाएवढी थोर माणसं आता कधीच प्रत्यक्ष दिसणार नाहीत, ह्या जाणिवेने हुरहुरतो. अशा कुठकुठल्या आठवणींच्या गाण्यांबद्दल बोलावं.. लिहावं हे खरंच सांगणं अवघड आहे.

दस्तुरखुद्द नौशादजींनी सांगितलेली, शकीलजींनी लिहिलेल्या ‘ताज वो शम्मा है..’ ह्या गाण्याची हकीकत हृदयस्पर्शी आहे, कारण एका ‘ताज’ ह्या लावण्यराजावर कुठल्याकुठल्या दृष्टिकोनांतून कवी लिहू शकतात ते वाचून आपण थक्क होतो. प्रतिभेच्या

मुक्त क्रीडेची जुगलबंदी पाहून ती सर्वच माणसे कशी अफाट होती, हे जाणवतं. त्याच 'ताज'बद्दल साहीरजीही लिहितात.. आणि दोन्ही महान कवींची गाणी सर'ताज' गीतं ठरतात, हे वाचून मन थरारून उठते.

'संधिकाली या अशा..' ह्या अजरामर युगलगीतातही आपण अनेकदा रमलेले असतो. त्या गाण्याची निर्मितीकथाही विलोभनीय आहे. खास अरूभय्या दातेंसाठी पं. हृदयनाथ मंगेशकर, कवी गंगाधर महांबरे यांचं काव्य सुरावटीत बांधतात काय.. न् अरूणजी जेव्हा म्हणतात - 'चांगली गायिका घे रे बाबा..' हृदयनाथ शांतपणे म्हणतात, 'एक गायिका आहे.. लता मंगेशकर नावाची.. चालेल?' अरूणजींचा सगळा हुरूप भितीत बदलतो.. आता ही अजरामर झालेली गीतं; पण त्या गीतनिर्मितीच्या क्षणी केवढ्या उलाढाली घडतात, ते वाचून डोळे भरून येतात. ह्या लेखाचा समारोपही अनंतरावांनी विलोभनीय केला आहे. तो संपूर्ण परिच्छेदच कवितेसारखाच उतरला आहे; तो मूळातुनच वाचणे चांगले.

'मेरे देश की धरती..' ह्या गाण्यानं अक्षरशः 'उपकार'च्या कालखंडात साऱ्या वातावरणावर गारूड केलं होतं. त्या प्रसिध्द गीताची हकीकतही तेवढीच मनोरंजक आहे. बघा.. त्या मंडळींची मानसशास्त्राची जाण काय अफलातून होती. 'इस देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती..' असा आधीचा मुखडा ऐकून मनोजकुमार म्हणाले.. 'हे थर्ड पर्सन मध्ये आहे.. बॅक-ग्राऊन्डला नाही.. शेतकऱ्याच्या तोंडी आहे.' आणि त्यानंतर 'मेरे देश की धरती..' असा बदल करण्यात आला. हे जे 'व्हीजन' त्या मंडळींना होतं; त्यामुळेच तो काळ, ती गाणी 'ग्रेट' झाली. त्यांनी केवळ त्या 'क्षणाचा' विचार न करता; जनसामान्यांना आत्मियता कशात वाटेल याचा विचार केला. गाण्यासाठी आधी रफीसाहेबांचं नाव सुचवलं गेलं, पण मनोजजी म्हणाले.. 'ह्या गाण्यासाठी महेंद्र कपूरजी योग्य वाटतील..' बघा काय अंदाज!.. आणि आजही कळतंय तो केवढा अचूक निघाला. पावसकरांचा गाण्याचे साधक म्हणून वेचक अभ्यास तर यात जाणवतोच; पण तो मांडताना प्रसंग असे काही कौशल्याने त्यांनी मांडले आहेत की वाटावं.. त्यांच्याच समोर घडलंय सारं.

पावसकरांचं हे ललितमाहितीपर लेखन अनेक कारणांनी रूचकर झालं आहे. गीत-निर्मितीच्या कथांमागील कथांचेही रसपूर्ण संदर्भ ते देत राहतात. उदा. 'गाईड' मधल्या गाण्यांच्या निमित्तानं सचिनदा आणि शैलेंद्र यांच्या 'ट्युनिंग'बद्दल उल्लेख येतात. त्यातून आपण न पाहिलेल्या ह्या दिग्गजांच्या व्यक्तिरेखाही स्पष्ट होतात. गाण्यातील काव्याचा आवेगही पावसकर नेमक्या शब्दकळेनं फुलवतात. उदा. 'आज फिर जीनेकी तमन्ना है..' बद्दल ते लिहितात.. 'कलासक्त मनाची कारंजी आता थुईथई नाचू लागतात. बंड केलेलं मन आपलं इप्सित साध्य करण्याच्या ओढीनं झपाटतं. घुसमटलेल्या मनाची कवाडं क्षणात उघडून बांध फुटतो. धाव घेतं आजवर हातातून निसटून जाऊ पाहणाऱ्या आपल्या मंजीलकडे..' असे काव्य-संगीतानं अंतर्यामातून झंकारणारे अनेक उल्लेख वाचकाला राजपथावरील पुष्करणींप्रमाणे वळणावळणावर भेटतात.

याच वाटेवर अनेक हुरहुरीचे क्षण येतात. 'मी ओळखून आहे, सारे तुझे बहाणे..' गाण्याच्या संदर्भात.. खळे रजनीत अचानक आलेले पं. हृदयनाथ, आणि इतक्या थोर गायकाची, इतक्या थोर संगीतकाराने केवळ दोनच गाणी ध्वनिमुद्रित केली हा उल्लेख! त्यातलं मैत्र मोहवून टाकतं; तर ह्या दोघांनी मिळून कविश्रेष्ठ पाडगांवकरांच्या शब्दांच्या सोबतीनं मराठी भावगीताच्या अवकाशात अजून अनेक चंद्र उगवले असते, ही हुरहुर. तर; 'आजा रे परदेसी..' गाण्याच्या संदर्भातील, संगीतकार सलील चौधरी यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्येही अशीच. त्यांच्यावर आसामच्या निसर्गरम्य सौंदर्याचा व शेतमजुरांच्या आंतरिक भावजीवनाचा झालेला परिणाम, हा साराच पट अनंत पावसकरांनी तेवढ्याच तरलतेने व्यक्त केला आहे.

गीतांच्या दुनियेत पंचाऐंशीच्या दशकानंतर वावरण्याची संधी मला मिळाली. त्या काळात आधीचे हे बहरते बहर मला अनुभवता आले नाहीत, पण ह्या मंडळींचं चिंतन, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, कार्यशैली, प्रत्येक क्षणी अद्ययावत रहाण्याची ओढ यांचा मी अनुभव घेतला. सतत इलेक्ट्रॉनिक्स साधनांच्या दुरूस्तीत रमलेले दत्ता डावजेकर, पीठाच्या गिरणीत काम करणारे; आयुष्य सोसूनसोसून सुखाचे दिवस येतायेताच पाखरासारखे उडून जाणारे विश्वनाथजी मोरे, गायकाला गाणं शिकवताना आशयाशी संपूर्ण तादात्म्य झालेले श्रीनिवासजी खळे., श्रीधरजींबरोबर गाणं लिहिताना कौतुकाने ती निर्मिती पहाणारे सुधीर फडकेजी, शब्दामधील कविता - खास कवीला बोलवून अर्थ समजून घेणाऱ्या सुमन कल्याणपूर, आपल्या भावमधूर हसण्यानं समोरच्यावरील दडपण पूर्ण काढून टाकणाऱ्या न् गाताना एखादा बदल सुचवतानाही सर्वदृष्टीनं लहान कवीलाही - 'प्रवीण, हे असं कसं वाटेल बघा..' असं विचारून आपल्याला संकोचून टाकणाऱ्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, चित्रपटासाठी गाताना 'कोणासाठी मी गातेय?..' असं विचारून नवीन अभिनेत्री असेल तर तिला बोलावून तिची संवादाची लकब समजून घेणाऱ्या विश्वविख्यात आशा भोसले, गाण्यातलं समर्पण म्हणजे काय ते ज्यांच्या सहवासात कळलं.. ते पं. जितेंद्र अभिषेकी.. अशी किती नावं मी घेऊ? गाणं लिहिण्याचं निमित्त हे

परमेश्वरानं मला ह्या दिग्गजांच्या दरबारात प्रवेश करण्यासाठी दिलेलं तिकीटच ठरलं. काळाच्या पाषाणावर चिरंतन कैलासलेणी कोरणारे हे कलावंत, निर्मितीच्या निमित्ताने मी जवळून अनुभवले. मला वाटतं त्यांच्या सहवासात राहिल्याच्या भाग्यामुळेच की काय 'आठवणीतल्या गाण्यां'चे परीसक्षण मला या प्रस्तावनेच्या निमित्ताने जगता आले. अनंत पावसकर ह्या गानलुब्ध, अभ्यासू रसिकानं भाववेड्या उत्कटतेनं त्यांना आवडणाऱ्या गाण्यांच्या आठवणी टिपल्या न् तो खजिना मराठी भाषेवर न् गाण्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांसाठी खुला केला. आता ह्या रत्नजडीत सुरेल दालनात माझ्या शब्दांचा तरी कडीकोयंडा कशाला! आता फक्त दीपून जा! रमून जा!..

- प्रवीण दवणे
**प्रा. कवि प्रवीण दवणे**
**ब-३०३, राजहंस, ठाणे ४०० ६०४**
**(९८२०३८९४१४)**

♥

आठवणीतल्या गाण्यांच्या आठवणी..

वर्तमानपत्रात काम करणाऱ्या लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. बातम्या छापाव्या म्हणून अनेक लोकांचे दडपण येत असते. पुरवणीचे संपादन करताना हे दडपण आणखी वाढते, कारण प्रत्येकामध्ये एक लेखक दडलेला असतो. आणि आपण लिहितो ते उत्तम आणि छापणीय आहे अशी (जवळजवळ) प्रत्येकाची समजूत असते. दैनिक 'सामना'ची 'फुलोरा' पुरवणी मी संपादित करत होतो तेव्हाची गोष्ट आहे. त्यातले काय छापण्याच्या लायकीचे आहे हे ठरवण्यापूर्वी ते वाचायचे दिव्य करावे लागते. आताची परिस्थिती काय आहे माहीत नाही. पण मी जेव्हा हे काम करत होतो (१९९३-१९९९) तेव्हा बहुतांशी हाताने लिहिलेले लेख यायचे. गचाळ अक्षर, पसरट लिखाण, संबंध नसलेले विषय.. असे अनेक विषय समोर येऊन पडायचे. वैताग यायचा.

अशाच एका संध्याकाळी माझ्यासमोर पडलेल्या पाकिटामध्ये असलेल्या एका लेखाने माझे लक्ष वेधून घेतले ते केवळ उत्तम हस्ताक्षरामुळे. छापील वाटावं इतकं सुबक हस्ताक्षर पाहून मी तो लेख वाचू लागलो. कुणा संगीतकारावरचा लेख होता तो. अनंत पावसकर यांनी लिहिलेला. लेख अस्ताव्यस्त पसरलेला होता, पण त्याच्यातली माहिती उत्तम होती. मी तो काटछाट करून सुटसुटीत केला, आणि छापून टाकला... आणि अनंत पावसकर मला भेटायला आला. तेव्हा तो 'बेस्ट' उपक्रमाच्या व्यवस्थापन विभागात नोकरी करत असे. लिहिण्याचा छंद होता. संगीत क्षेत्रात कार्यरत होता. संगीताची आवड होती आणि अभ्यासही होता. पण उत्साही लेखक ज्या चुका करतात त्या त्याच्याही लेखनात होत्या. पुन:पुन्हा तेच लिहिणे, तोच मुद्दा घोळवून घोळवून सांगणे वगैरे वगैरे.. आणि लेखाचा विषय निवडताना कोणाची तरी जयंती, पुण्यतिथी अशी पकडून लिहिणे. (हे तर अगदीच कॉमन आहे.)

त्याचा उत्साह मला आवडला. मी त्याला काही विषय देऊन त्याच्याकडून लिहून घेतले. त्या फुटकळ लेखांवरून मला एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे त्याची मेहनत. दिलेला विषय जास्तीत जास्त चांगला व्हावा म्हणून पदरमोड करून, कोणाकोणाला भेटून आणि तरीही 'डेडलाईन' पाळून तो लिहित होता. त्याला त्या लेखांच्या प्रसिध्दीचा आनंद मिळत होता. पैसे मिळवणे हा त्याचा हेतूच नसावा. आपण लिहिलेले प्रसिध्द होते आहे म्हटल्यावर (सगळ्यांचे होते तसेच) त्यालाही सगळीकडे विषयच विषय दिसू लागले. मी हे करु का ? ते केलं तर कसं वाटेल।.. असा त्याचा उत्साह वाढायला लागला. त्याच्या स्फूर्तीला बांध तर घालायचा नव्हता, पण तरीही धबधब्याच्या पाण्याला शिस्त लावण्यासाठी बांध घालणं जसं गरजेचं असतं तसं त्याच्या लेखनाला शिस्त येण्यासाठी त्याला 'फोकस' करणं गरजेचं होतं.. म्हणून मी एक विषय निवडला.. 'आठवणीतली गाणी'! लोकांच्या मनात आणि जिभेवर रुळणारी गाणी घ्यायची आणि त्यावर किस्से, आठवणी अशा स्वरुपात लिहायचे. जागेची मर्यादा घालण्यासाठी मी त्याला दोन कॉलम (पेज थ्री!) देऊ केले आणि मग तो सुटलाच. त्यावेळेपर्यंत तो 'बेस्ट'ची नोकरी सोडून एका म्युझिक कंपनीत पूर्णवेळ

‘रेकॉर्डिंग-इन्चार्ज’,‘स्टुडिओ मॅनेजर’ म्हणून काम करू लागला होता. त्यामुळे ते त्याला सोपंही जाऊ लागलं. एका छान कॉलमचा जन्म झाला. मला वाटतं पाचेक वर्षे दर शनिवारी (सलग) तो लिहित होता. लोकांना ते आवडत होतं.

‘आठवणीतली गाणी’चा जन्म झाला तो असा.. मी ‘पुरवणीचा संपादक’ आणि तो ‘स्तंभलेखक’ एवढीच आता आमची ओळख राहिली नव्हती.. आम्ही चांगले मित्र झालो. नंतर त्याला कल्पना सुचली ती म्हणजे हे सगळं पुस्तकरूपात प्रसिध्द करावे... आता हे पुस्तक छापले जाईल आणि ते लोकांना आवडेल याची खात्री आहे. संग्रही ठेवण्यासारखं हे पुस्तक होईल. त्याचं ‘शेल्फ लाईफ’ वाढेल हे नक्की. या पुस्तकाला उत्तम यश मिळो. त्याने इथेच न थांबता पुढेही लिहित रहावे. नविन-नविन विषय शोधावेत.. आणि त्याची पुस्तकरूपातच मांडणी करावी अशा मी शुभेच्छा देतो. गेल्या पंधरा-सतरा वर्षांची मैत्री या ‘आठवणीतली गाण्यांच्या’ निमित्ताने सफल संपूर्ण झाली आहे....

- अभय परांजपे
(जेष्ठ पत्रकार व लेखक)
(वादळवाट मालिका फेम)

♥

## ‘आठवणीतली गाणी’ - गाण्यांच्या आठवणींचा अनमोल ठेवा

- एकेका गाण्यांच्या आठवणींचा आस्वाद घेत वाचल्यास अधिक मजा येईल.. - गाण्यांच्या आठवणींचा अनमोल ठेवा

काही गाणी मनात कायमचं घर करून राहतात. मग ती मराठी असोत वा हिंदी. कधी, कोणत्या क्षणी त्यापैकी एखादं आठवेल आणि मनात रुंजी घालू लागेल याचा नेम नसतो. त्या गाण्याचा एखादा दर्दी आस्वादक असेल तर तो त्या गाण्याचं सौंदर्य आणि त्याचा इतिहास फुलाच्या पाकळ्या नकळत उमलाव्यात अशा शब्दांत उलगडून दाखवतो. ‘आठवणीतली गाणी’ या बाह्य आणि अंतरंगानेही आकर्षून घेणाऱ्या मोठ्या आकाराच्या पुस्तकात अनंत पावसकर यांनी ही किमया करून दाखवली आहे. रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या सदाबहार निवडक ५१ गाण्यांचा आस्वादक वृत्तीने घेतलेला हा निर्मितीशोध आहे. ते गाणे, त्याची चाल, संगीत, गीतकार, संगीतकार, गायक यांच्या निर्मिती क्षणांचे हे भावविश्व आहे. वैशिष्ट्य म्हणजे दैनिक ‘सामना’च्या दर शनिवारी प्रसिध्द होणाऱ्या ‘फुलोरा’ पुरवणीत ‘आठवणीतली गाणी’ ही अनंत पावसकर यांची लेखमाला सलग पाच वर्षे सुरू होती. त्यातील लेखांचेच हे संस्कारित स्वरूपातील लेखन आहे, आजचं संगणक युग लक्षात घेऊन लेखकाने याच पुस्तकाचं मराठीतलं पहिलं-वहिलं ‘ई-बुक’ही प्रकाशित केलं आहे.

त्यात ‘एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल..’, ‘संधिकाली या अशा..’, ‘जीना इसी का नाम है..’, ‘मेरे देश की धरती..’, ‘आज फिर जीने की तमन्ना है..’, ‘तरूण आहे रात्र अजुनि..’, ‘जीना यहाँ मरना यहाँ..’, ‘बाबूजी धीरे चलना..’, ‘भातुकलीच्या खेळामधली..’, ‘प्यार किया तो डरना क्या..’ , ‘विकत घेतला श्याम..’, ‘मी ओळखून आहे..’, ‘इक घर बनाऊँगा..’, ‘ऐरणीच्या देवा तुला..’, ‘सुबहा न आयी..’ , ‘गंगा जमुना डोळ्यात उभ्या का..’, ‘चल अकेला..’, ‘चढता सूरज धीरे धीरे..’, ‘नाविका रे..’, ‘स्वप्नातल्या कळ्यांनो..’ , ‘आधा है चंद्रमा..’, ‘पल दो पल का साथ..’, ‘आजा रे मैं तो कब से खडी..’, ‘फूल गेंदवा न मारो..’, ‘मेरे महबूब तुझे..’ , ‘शतदा प्रेम करावे..’ आदी गाण्यांच्या निर्मितीप्रक्रियेपासून त्यांच्या रसिकप्रियतेपर्यंत स्वतःच्या त्या गाण्यांशी निगडित असलेल्या स्मृती लेखक आपल्या खेळकर शैलीत या लेखांमधून जागवतो. एकप्रकारे हा त्या गाण्यांच्या अंतरंग आणि बाह्यरंगाशी केलेला संवाद असतो. गाण्याच्या प्रत्येक घटकाचं, त्यामागील पार्श्वभूमीचं, गाण्याशी जडलेल्या अनुबंधाचं एखाद्या कथेसारखं किंवा लघुनिबंधासारखं चित्र यातून साकारतं. सोबत संपूर्ण गाणंही शेवटी दिलेलं असतं. एका गाण्याच्या आठवणी सांगताना त्यातून त्या गायक-गायिकेच्या किंवा गीतकार, संगीतकारांच्या इतर गाण्यांच्या आठवणी त्या ओघात येतात, जातात आणि लेखक कधी समेवर येतो ते कळतही नाही. या सांगीतिक प्रवासात त्या गाण्यांच्या गायक-गायिकाही येतात आणि गाणे चित्रपटातील असेल तर त्याच्या नायक-नायिकाही येतात. मग ‘यारी है ईमान मेरा यार मेरी जिंदगी..’सारख्या गाण्यात शेरखानच्या प्राणात मन्ना डेंनी ओतलेलं सर्वस्व आपल्यालाही जाणवतं. ‘तरूण आहे रात्र अजुनि..’ या गाण्यात आपल्या प्रत्येक शब्दोच्चारासरशी आशाताई दिलेल्या चालीबाहेरचं जास्त काही भरतात, आपल्या डोळ्यांसमोर सुंदर मादक स्त्रीचा आकृतीबंध उभा करतात आणि तोही उम्मीद से बढकर ही लेखकाला जाणवणारी आशाताईंच्या शारीर आवाजाची अनुभूती

मग वाचणाऱ्यालाही अनुभवता येते. 'ये दुनिया ये महेफिल..' गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी ते ऐकताना हळवा होऊन डोळे टिपणारा 'जानी' येथे दिसतो. 'अमर प्रेम'मधल्या 'चिंगारी कोई भडके..' या आरडीनी हळुवारपणे उभारलेल्या संगीतशिल्पाचं सौंदर्य चित्रपटातील त्या प्रसंगाच्या फ्रेमसह तो डोळ्यांसमोर उभं करतो. अशा अनेक गाण्यांच्या आठवणींचे किस्से कधी स्वानुभवातून तर कधी इतर दिग्गज कलावंतांशी मारलेल्या गप्पांमधून लेखामध्ये येतात. त्यात ओढूनताणून आणलेला आखीवरेखीवपणा नसतो. एकाच गाण्यासंबंधी लिहिताना नकळत अनेक गाण्यांच्या रेशीमलड्या उलगडत जातात. हिंदीबरोबरच मराठी संगीतविश्वातील बुजुर्गांना जाणून घेता येतं. लेखकाचं संगीत, चित्रपट, गाणी, कलावंत या विषयीचं भावविश्व समृध्द असल्यामुळेच त्याच्या लेखनातील आत्मविश्वास आणि ठाशीवपणा ठायी ठायी जाणवतो. गाण्याच्या प्रत्येक घटकांकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी आणि सहृदयता नजरेस पडते. गाण्यामागचं गाणं अनुभवता येतं. एका नामांकित रेकॉर्डिंग कंपनीतील प्रदीर्घ अनुभवामुळे गाण्याच्या ध्वनिमुद्रणापासून कॅसेट, सीडी तयार होईपर्यंत गीतकार, संगीतकार, गायक-गायिका यांच्या आविष्काराचे टप्पे लेखकाने जवळून पाहिले आहेत. त्यामुळेच अधिकारवाणीने काही गोष्टी तो बोलू शकतो. हे पुस्तक एका दमात वाचून काढू नये, चवीचवीने त्यातील एकेका गाण्याच्या आठवणीचा आस्वाद घेत वाचल्यास अधिक मजा येईल, हे सांगण्यासही तो विसरत नाही. रसिकांना या पुस्तकरुपाने एक अनमोल ठेवा लाभला आहे हे निश्चित.

परिक्षण : श्री. श्रीकांत आंब्रे, ज्येष्ठ पत्रकार
दैनिक 'सामना', 'उत्सव' पुरवणी - 'साहित्य विश्व' (रविवार, दि. १२ डिसेंबर, २०१०)

♥

## 'पुस्तक परिचय'

भारतीय रसिकांच्या मनावर गीत-संगीतानं मोठं गारुड केलंय. बोलपट भारतात येऊनही आता ८०वर्षांचा काळ लोटला गेलाय. तेव्हापासून सुरु झालेला हा गीत-संगीताचा सिलसिला प्रत्येक पिढीला निहायत खूष करीत आजही तितक्याच जोमात चालू आहे. सुवर्णमयी संगीत कालखंडाने रसिकांवर घातलेली मोहिनी हे सर्व एकत्र वाचायला मिळाले तर? सिनेपत्रकार अनंत पावसकर यांनी लिहिलेल्या 'आठवणीतली गाणी' या पुस्तकाव्दारे! रसिकांच्या मनात सदैव गुंजारव करणाऱ्या या गीतांच्या आठवणींचा खजिना रिता करताना वाचकांना खोलवर पाण्यात घेऊन जात पुन्हा तितक्याच अलवार पध्दतीने तीरावर आणून सोडण्याचे लीलया काम पावसकर यांनी केलंय.

मुळात ते स्वतः एका मान्यवर रेकॉर्डिंग कंपनीत व्यवस्थापक असल्याने त्यांच्यातील संगीतप्रेमी सूर संगीताच्या या महासागरात सचैल न्हाऊन निघाला नसता तरच नवल! या पुस्तकात त्यांनी ५१ लोकप्रिय गीतांचा 'दिल से' आढावा घेतलाय. 'चिंगारी कोई भडके...'. 'लग जा गले के फिर ये हंसी रात हो न हो...', 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया...', 'सुबह न आयी, शाम न आयी...', 'आजा रे परदेसी...', 'दिल का सूना साज तराना ढुंढेगा ...', 'नाविका रे वारा वाहे...', 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का...', 'दिल ने फिर याद किया...' ही आणि अशी रसिकांच्या मनात कायमस्वरुपी मोहिनी घालणाऱ्या गीतांचा निर्मितीशोध मोठ्या चिकित्सक वृत्तीने घेताना संगीताबाबतची त्यांची ओढ, आत्मीयता, जाण पानोपानी दिसून येते.

गाण्याच्या आठवणीचे किस्से सांगताना पावसकर संगीताचा मोठा इतिहास वाचकांपुढे उभा करतात. गुणी पण दुर्लक्षित राहिलेल्या सोनिक ओमी, गणेश, इक्बाल कुरेशी यांनी स्वरबध्द केलेल्या गाण्यांवर लिहिताना ते खूप हळवे होतात. गीतकार, संगीतकार, गायक, गायिका याबरोबरच नायक-नायिका यांचाही उल्लेख करून ते गाण्याचे संपूर्ण वर्तुळ पूर्ण करून थांबत नाहीत, तर 'म्युझिक अरेंजर'च्या कार्याची आपल्याला अनभिज्ञ असणारी माहिती वाचकांना देतात. स्मृतीगंधाचा प्रत्यय मनाला कायम सुखावून जातो. तलतच्या 'ऐ मेरे दिल कहीं और चल...'बाबत लिहिताना तलतची सारी कारकीर्द अत्यंत मोजक्याच, पण समर्पक शब्दात देऊन या मृदू-ऋजुतापूर्ण स्वराची रसिकांवरील ओली जखम आणखी हळवी केलीय. आशा भोसलेंच्या 'तरूण आहे रात्र अजुनि..' या गीतात त्यांच्या शब्दोच्चारासोबत स्त्रीचा जो आकृतीबंध निर्मिलाय त्यामुळे आशाच्या स्वराला शारीर अनुभवाची अनुभूती रसिकांनाही जाणवू लागते. गाण्यातील अशी छोटी छोटी सौंदर्यस्थळे पानोपानी वाचायला मिळतात. पावसकर यांचा मूळ पिंड पत्रकारितेचा असल्याने कधी स्वानुभवाने तर कधी मान्यवरांशी संवाद साधून पुस्तकातील अनुभवविश्व समृध्द झाले आहे. एका

आठवणीतून दुसरी, दुसरीतून तिसरी त्याची आणखी वेगळी आठवण या सर्वांतून साकारणारे स्वरचित्र वाचकांना निहायत खूश करते. ध्वनिमुद्रणाच्या वेळचे कसोटीचे क्षण व त्यावर केलेली मात सांगताना पावसकर 'दिल खोल के' बोलतात. या पुस्तकाच्या निमित्ताने आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली आहे. मराठी चित्रपट संगीत समीक्षेवरचे हे पहिले 'ई-बुक' निर्माण झाले आहे. तेदेखील पुस्तकाएवढेच देखणे झाले आहे.

पुस्तकात काही नाममात्र चुकाही झाल्यात. देव आनंदच्या 'गाईड'चे दिग्दर्शक म्हणून विजय आनंदऐवजी चेतन आनंदचे नाव आले आहे. तर आर.के.च्या 'सत्यम शिवम सुंदरम'चा 'क्रम'ही थोडा मागेपुढे झालाय. कधी कधी त्यांच्या लिखाणातील 'मी' देखील रसभंग करतो. पण एकूणच पुस्तकाच्या वाचनाने रसिकांना जो आनंद मिळतो, तो काडीमात्रही कमी होत नाही. ज्यांना गाण्याची आवड आहे, त्यांना तर हे पुस्तक आवडेलच, पण ज्यांना नाही त्यांनाही गाण्याच्या प्रेमात पाडण्याची ताकद या पुस्तकात आहे हे निश्चित!

श्री. धनंजय कुलकर्णी, ज्येष्ठ लेखक व पत्रकार
प्रिमियर - मासिक ('सकाळ' मिडिया ग्रुप) एप्रिल २०११,

♥

## 'मुगले आझम' (अक्षरवाटा)

ठाणे येथे झालेल्या साहित्य संमेलनच्या ग्रंथ प्रदर्शनात अनंत पावसकर यांनीदेखील मुद्रा प्रकाशनाच्या सहकार्याने आपल्या नव्या, एकमेव पुस्तकासाठी म्हणजे 'आठवणीतली गाणी'साठी स्टॉल घेतला होता. ('सामना'मध्ये त्यांचे याच नावाचे सदर होते. त्यातील निवडक ५१ लेखांचा हा संग्रह आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर (याचेच ई-बुक काढले आहे त्यावर देखील) 'सामना', 'फुलोरा' पुरवणी याचं चित्र आहे! ही गोष्ट दुर्मीळ अशीच म्हणायला हवी.. हे थोडं विषयांतर झालं. पण ते महत्त्वाचं म्हणून त्याची नोंद केली.) तेथे एक गृहस्थ आले आणि पुस्तक चाळून म्हणाले, 'यात फक्त मुगले आझममधील 'प्यार किया तो डरना क्या...' एवढ्याच गाण्याबद्दल लिहिलं आहे. लेखकाने इतर गाण्यांबद्दल का लिहिलं नाही?'

अनंत पावसकर तेव्हा स्टॉलवर नव्हते. ही गोष्ट त्यांना सांगून मी म्हटलं, 'तुम्हाला एवढं का 'मुगले आझम"ने झपाटलं आहे?' यावर त्या गृहस्थांची कळी खुलली. ते म्हणाले, 'अहो, मुगले आझमबाबत जेवढं म्हणून आहे ते सध्या मी गोळा करतो आहे. त्याबाबत एखादं पुस्तकदेखील लिहायचा मी विचार करतो आहे.' तेव्हा मी म्हटलं, 'काय काय जमवलं आहे?'

मी त्यांच्याबाबत कुतुहल दाखवताच त्यांना बरं वाटलं असावं. ते म्हणाले, 'तुम्ही जरा वेळ काढता का? मला सांगायला आवडेल...' अर्थात मग गप्पात शशिकांत किणीकरलिखित 'दास्तान-ए-नौशाद' पासून माधव मोहोळकरकृत 'मोहोळ' यांच्या पुस्तकापर्यंत कुठे कुठे 'मुगले आझम" संदर्भ आहे याची उजळणी झाली. मग यंदाच्या 'नवरंग रूपेरी' दिवाळी अंकातील सुरेश चांदवणकर यांचा 'मुगले आझमचं संगीत' या लेखाचा संदर्भ निघाला. चांदवणकरांचं सर्वच लेखन अभ्यासपूर्ण आणि संदर्भबहुल असतं. त्याप्रमाणे हा लेखदेखील आहे. विशेषतः एन.सी.पी.ए.मधील वाडिया लायब्ररीमध्ये कात्रणांचा मोठा संग्रह आहे हे त्यांनी स्पष्ट केलं आहे. त्या माहितीचा त्यांनी उपयोग केलेला दिसतोच आहे. पण त्यात त्यांनी 'मोहे पनघटपे नंदलाल छेड गयो रे..' गाण्याबाबत जी माहिती दिली आहे त्यात गडबड-गोंधळ झालेला दिसतो. हे गाणं शकील बदायुनी यांनी लिहिलं नसून रघुनाथ ब्रह्मभट्ट यांनी लिहिलं असा वाद झाला असं तपशिलात सांगून चांदवणकर लिहितात, माध्यमांना काही काळ हा विषय चघळायला मिळाला खरा पण त्यातून काही निष्पन्न मात्र झालं नाही...' याबाबत काय घडलं होतं, ऐकू आलं यासंबंधात हा लेख प्रकाशित झाल्यानंतर माझं चांदवणकरांशी बोलणं झालं होतं. त्याचा सारांश असा -

'मुगले आझम" १९६० मध्ये प्रदर्शित झाल्यानंतरच या गाण्याच्या कर्त्याबद्दल वाद सुरू झाला. अर्थात सिनेमावाल्यांच्या परंपरेप्रमाणे याकडे फारसं कुणी लक्षच दिलं नाही. मात्र या गाण्यावर हक्क सांगणारे, गुजरातचे रसकवी म्हणून ओळखले जाणारे रघुनाथ ब्रह्मभट्ट यांनी हे प्रकरण फिल्म रायटर्स असोसिएशनकडे केलं. त्यावेळी साहिर लुधियानवीसारखे गीतकार हे रघुनाथ ब्रह्मभट्ट यांच्या पाठीशी राहिले. ('मुझे देख के चांद शरमाये' हे गाणं कुणाचं हा वाद निर्माण झाला तेव्हादेखील साहिरने इंदिवरला

न्याय मिळवून दिला होता.) अर्थात मग मामला सामोपचारानं मिटवला गेला. ब्रह्मभट्ट यांना मानधन म्हणून एक हजार रूपये देण्यात आले होते. हे प्रकरण नव्याने उद्‌भवले ते 'मुगले आझम" रंगीत करून प्रदर्शित झाला तेव्हा. चित्रपटाच्या श्रेयनामावलीत रघुनाथ ब्रह्मभट्ट यांचा उल्लेख हवा असा आग्रह रघुनाथांचे नातू डॉ. राजशेखर ब्रह्मभट्ट यांनी धरला.

तेव्हा खुलासा केला गेला की, रेकॉर्डस्‌ वितरित झाल्या आहेत तेव्हा दुरूस्ती अशक्य आहे. मात्र टी.व्ही.वर चित्रपट दाखवला जाईल तेव्हा काहीतरी करू वगैरे. त्यानंतर टी.व्ही.वर मुघले आझम दाखवला गेला पण त्यात हा उल्लेख होता की नाही माहीत नाही. डॉ. ब्रह्मभटांनी पण पुढे काय केलं, त्याचं काय झालं कळलं नाही. मात्र एक नक्की 'मोहे पनघटपे..' हे गाणं रघुनाथ ब्रह्मभटांचं हे सिध्द झालं आहे. उद्या 'मुगले आझम"वर या गृहस्थांनी पुस्तक लिहिलं तर ही नोंद असावी म्हणून सर्व सांगितलं. हे गृहस्थ त्यांचं नाव 'अध्यापक' पण त्यांच्या बद्दल विचारायचं राहून गेलं. कारण 'मुगले आझम" विषयात गुंगून गेल्याने ते राहिलंच !

- श्री. रविप्रकाश कुलकर्णी, ज्येष्ठ लेखक व पत्रकार
रविवार, दि. ६, मार्च, २०११
दैनिक 'सामना', 'उत्सव' पुरवणी - 'साहित्य विश्व'
'अक्षरवाटा' लेखमाला

♥

## दुसऱ्या आवृत्तीविषयी थोडंसं..

पहिल्या आवृत्तीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल तुम्हा सर्व वाचकांचे अगदी मनःपूर्वक आभार. माझ्या आयुष्यातलं पहिलं-वहिलं पुस्तक! या माझ्या कलाकृतीचं प्रकाशन सन्माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेबजी ठाकरे यांच्या शुभहस्ते व्हावं ही मनिषा पूर्ण झाली हे माझं अहोभाग्य. शुक्रवार, दि. ३ सप्टेंबर, २०१० रोजी हा प्रकाशन समारंभ अनेक कलावंतांचं श्रध्दास्थान असलेल्या 'मातोश्री' निवासस्थानी संपन्न झाला व तो 'स्टार-माझा' (आता 'एबीपी-माझा') या वृत्तवाहिनीवर दाखविण्यात आला. याप्रसंगी सन्माननीय व पितृतुल्य साहेबांनी ह्या लेखमालेबद्दल व पुस्तकाविषयी आपले मनोगत चॅनलवर व्यक्त केलं. मी कृतकृत्य झालो. बऱ्याच वृत्तपत्राच त्याची दखल तसेच परिक्षणेही आली. तद्‌नंतर ठाण्यात पार पडलेल्या 'साहित्य संमेलनात', आणि रोहा येथे पार पडलेल्या 'कोकण साहित्य संमेलनात' पुस्तकाला व संगणकीय ग्रंथाला अतिशय उत्तम असा प्रतिसाद मिळला.

(एक गंमत सांगाविशी वाटतेय. आपली वाचनाची आवड, आपल्या संगणकावरही जोपासता यावी अशा हेतूने प्रेरीत होऊन मी संगणकीय ग्रंथाची ('ई-बुक'ची) या पुस्तकासोबतच निर्मिती केली होती. (२०१०च्या ऑक्टोबरपर्यंत मराठीत एकही 'ई-बुक' नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.) जानेवारी २०१० पासून अथक परिश्रमानंतर 'ई-बुक'चं काम हातावेगळं केल्यानंतर अक्षय्य तृतीया, रविवार, दि. १६ मे, २०१० रोजी 'संगणकीय-ग्रंथाची' माझी ही आगळीवेगळी संकल्पना प्रत्यक्षात उतरली. (सदर प्रकाशित केलेलं 'ई-बुक' पुस्तकाची पानं स्कॅन करायची, 'फोटोशॉप'च्या मदतीनं त्यांचं 'पीडीएफ्-फॉरमॅट'मध्ये रूपांतर करायचं आणि मग ते 'ई-बुक' म्हणून वाचायचं अशी 'थुकपट्टी' केलेली नाहीय. आम्ही आमच्या 'फिल्म-ऑडिओ-व्हीडिओच्या मार्केटिंग' क्षेत्रात, प्रस्तावांची देवाण-घेवाण करताना जशा 'ई-बुक्स'चा अनेक वर्षांपासून वापर करत आलो आहोत. त्याप्रकारे बनविलेला तो 'संगणकीय-ग्रंथ' आहे.) हा संगणकीय ग्रंथ प्रत्यक्षात, प्रकाशन सोहळ्यानंतर म्हणजे शुक्रवार दि. ३ सप्टेंबर, २०१० नंतर साहित्यविश्वात अवतरला. एखादी कल्पना 'क्लिक' होताच त्याचे श्रेय घ्यायला जसे अनेकजण धडपडतात तसंच 'ई-बुकच्या नावानं ऽऽचांगभलं!!...' करत हाती 'आय-पॅड, टॅब्लेटस्'चे तुणतुणे घेऊन केलेली धडपड संमेलनात याचि डोळा अनुभवायला मिळाली. सॉलिड करमणूकही झाली. असो! मराठीत सर्वप्रथम सादर झालेल्या (ऑगस्ट २०१०) संगणकीय ग्रंथ या संकल्पनेला सुयोग्य प्रतिसाद तर मिळालाच व माझ्या त्या धडपडीला साहित्य विश्वातील महत्त्वपूर्ण अशा 'आशीर्वाद' पुरस्काराने गोरविण्यात आलं, याचं आज खूप समाधान वाटतंय. आज 'ई-बुक्स'ची मराठीतही खूप मागणी आहे, वेगवेगळ्या वेबसाईटस्‌ बनल्या आहेत हे सर्व पाहून बरं वाटतं. याचं सारं श्रेय तुम्हा सर्व रसिकांनाच. नाही का?)

अभय परांजपे (सुप्रसिध्द लेखक, पत्रकार आणि वादळवाट या महामालिकेचा लेखक) या माझ्या मित्राचा (फ्रेंड-फिलॉसॉफर-गाईड) पुन्हा एकदा उल्लेख करतोय. कारण १९९४ साली 'आठवणीतली गाणी' म्हणून एखादी लेखमाला असावी ही संकल्पना सर्वप्रथम मांडली असेल ती अभयनेच. 'आठवणीतली गाणी' हे 'शीर्षक' किंवा त्या सादरीकरणाची संकल्पना याचं सर्व

श्रेय एकट्या अभयचंच आहे. त्याच्या प्रोत्साहनामुळेच ही लेखमाला घडली. (ही लेखमाला सुरू होती त्या काळात ना स्मार्टफोन होते ना सहजासहजी माहिती पुरवणारं गुगल सर्च इंजीन. जे काही दिग्गजाशी गप्पा किंवा संबंधितांच्या मुलाखतीतून हाती येई ते शब्दबद्ध करावं लागे. हेही महत्त्वाचे.) दै. सामनाच्या 'फुलोरा' पुरवणीत सन्माननीय लेखक सर्वश्री शिरीष कणेकरसाहेब, ज्ञानेश्वर नाडकर्णीसाहेब, व्दारकानाथ संझगिरीजी अशा दिग्गजांच्या कॉलमसोबत माझ्यासारख्या नवख्या लेखकाची ही लेखमाला सलग पाच वर्षे सुरू होती. तब्बल २६० आठवडे! (या गोष्टीला आज वीस वर्षे उलटलीयत? खरंच वाटत नाही. दुःखाची गोष्ट एकच की अभय परांजपे हा माझा परममित्र आज आपल्यात नाही. त्याचं नुकतंच अकाली निधन झालं. परमेश्वर त्याच्या आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना.) अभयने दिलेल्या या संकल्पनेवर नंतर अनेक वृत्तपत्रातून वेगळी शीर्षके देत अनेकांचे लेख येऊ लागले, (आजही येत असतात.) आवर्जून सांगायचं तर 'आठवणीतली गाणी' हेच 'शीर्षक' घेऊन त्याच नावाने २००४च्या दरम्यान एक वेबसाईटही आली आहे. ती तिथे सुखाने नांदतेय. सदर वेबसाईटवर भले अभय परांजपे यांचा किंवा या लेखमालेचा नामोल्लेख नसेल पण ती वेबसाईट अशाच संगीतदिवाण्या गोष्टींवर आधारित असल्याचं पाहून मन सुखावतं.

लेखात अंतर्भाव असलेल्या व उल्लेखलेल्या गाण्यांचे हक्क संगीतक्षेत्रातल्या मातब्बर अशा 'एच.एम.व्ही.' कडे आहेत. मला पुस्तकासोबत त्या गाण्यांची 'ऑडिओ किंवा व्हिडिओ सीडी' द्यायची फार फार इच्छा होती. प्रकाशन समारंभाप्रसंगी सन्माननीय साहेबांनीही (श्री. बाळासाहेबांनी) ते अधोरेखित केलं होतं. परंतु 'कॉपीसाईटस्' कायद्यातल्या जाचक अटींमुळे ते जमलंच नाही. आज काळ बदललाय.

छापील पुस्तकांपेक्षा हल्लीची तरुणाई आज चक्क आपल्या 'स्मार्टफोन्स' वर (किंवा 'किंडल'नामक 'ई-बुक रीडरवर') पुस्तके वाचताना दिसते. आज 'पीडीएफ-फॉरमॅट' मधील मराठी 'ई-बुक्स'ना खूप मागणी आहे. त्यासाठी अनेकाविध वेबसाईटस् बनल्या आहेत. 'आठवणीतली गाणी' या माझ्या पुस्तकाची दुसरी आवृती प्रकाशित करताना, ते आपल्या वाचकांना मोबाईलवर वाचता यावे म्हणून त्याचं 'पीडीएफ-फॉरमॅट'मध्ये रूपांतर करून या नव्या प्रचलित 'ई-बुक'च्या माध्यमातून प्रकाशित करतोय. इथे एक फायदा झालाय. लेखाशी संबंधित जेवढ्या म्हणून 'ऑडिओ किंवा व्हिडिओ यू-ट्यूब' लिंक सापडल्या त्या सर्वच्या सर्व इथे दिल्या आहेत. त्या पहा, ऐका आणि डाऊनलोड करा. आपल्याला गाणं गुणगुणण्याची आवड असल्याने 'कराओके क्लब' तसेच 'गाणं शिकण्यासाठी' मार्गदर्शनपर अशा 'यू-ट्यूब लिंक्स' सुद्धा दिल्या आहेत. पहिल्या आवृतीला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे 'आठवणीतली गाणी' या माझ्या पुस्तकाची ही दुसरी आवृती तुमच्या चरणी अर्पण करतोय. सन्माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेबजी ठाकरे यांच्याकडून 'राजमान्यता' मिळालीय आता तुमच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने 'रसिकमान्यता' मिळो.. हीच माझी सदिच्छा..

धन्यवाद,

**- अनंत पावसकर**
(ज्येष्ठ पत्रकार, संगीत संयोजक)
(भ्रमणध्वनी - ९८२००२२४१७ - व्हाटस्-ॲप)

♥

## अनुक्रमणिका


०१. वाह!.. ताज ! (पृष्ठ : ०१७)
०२. संधिकाली या अशा.. (पृष्ठ : ०२१)
०३. जीना इसी का नाम है.. (पृष्ठ : ०२५)
०४. मेरे देश की धरती.. (पृष्ठ : ०२९)
०५. आज फिर जीने की.. (पृष्ठ : ०३३)
०६. यारी है ईमान मेरा.. (पृष्ठ : ०३६)
०७. तरूण आहे रात्र अजुनि.. (पृष्ठ : ०४०)
०८. जिना यहाँ मरना यहाँ.. (पृष्ठ : ०४४)
०९. दिल ने फिर याद किया.. (पृष्ठ : ०४८)
१०. दिल का सूना साज.. (पृष्ठ : ०५२)
११. हमें काले हैं तो क्या.. (पृष्ठ : ०५६)
१२. ये दुनिया ये महफ़िल.. (पृष्ठ : ०६१)
१३. तू गंगा की मौज मैं.. (पृष्ठ : ०६५)
१४. राज़ को राज़ रहने.. (पृष्ठ : ०६९)
१५. बाबुजी धीरे चलना.. (पृष्ठ : ०७३)
१६. डम डम डिगा डिगा.. (पृष्ठ : ०७७)
१७. भातुकलीच्या खेळा.. (पृष्ठ : ०८१)
१८. जानेवालों जरा.. (पृष्ठ : ०८५)
१९. लेके पहला पहला प्यार.. (पृष्ठ : ०८९)
२०. मैं जिंदगी का साथ.. (पृष्ठ : ०९४)
२१. प्यार किया तो डरना.. (पृष्ठ : ०९९)
२२. विकत घेतला श्याम.. (पृष्ठ : १०४)
२३. अपने पे भरोसा है तो.. (पृष्ठ : १०८)
२४. खाई के पान बनारस.. (पृष्ठः ११२)
२५. मी ओळखून आहे.. (पृष्ठः ११६)
२६. ओ दूर के मुसाफिर.. (पृष्ठ : १२०)
२७. इक घर बनाऊँगा.. (पृष्ठ : १२४)
२८. ऐरणीच्या देवा तुला.. (पृष्ठ : १२८)
२९. सुबहा न आयी, शाम.. (पृष्ठ : १३२)
३०. गंगा जमुना डोळ्यात.. (पृष्ठ : १३६)
३१. मेरे पैरों में घुँगरू.. (पृष्ठ : १३९)
३२. लग जा गले के.. (पृष्ठ : १४३)
३३. हरे राम हरे कृष्ण.. (पृष्ठ : १४७)
३४. चल अकेला चल.. (पृष्ठ : १५४)
३५. चढता सूरज धीरे.. (पृष्ठ : १५७)
३६. कभी कभी मेरे दिल.. (पृष्ठ : १६४)
३७. नाविका रे वारा वाहे.. (पृष्ठ : १६८)
३८. चिंगारी कोई भडके.. (पृष्ठ : १७२)
३९. तो ‘राजहंस’ एक.. (पृष्ठ : १७५)
४०. मेरे जीवन साथी.. (पृष्ठ :१७८)
४१. स्वप्नातल्या कळ्यांनो.. (पृष्ठ : १८२)
४२. आधा है चंद्रमा.. (पृष्ठ : १८५)
४३. पल दो पल का साथ.. (पृष्ठ : १८९)
४४. आजा रे मैं तो कब.. (पृष्ठ : १९४)
४५. तेरे चेहरे में वो जादू.. (पृष्ठ : १९७)
४६. माळ्याच्या मळ्यामंदी.. (पृष्ठ : २०१)
४७. ऐ मेरे दिल कहीं.. (पृष्ठ : २०५)
४८. फूल गेंदवा न मारो.. (पृष्ठ : २०९)
४९. मेरे मेहबूब तुझे.. (पृष्ठ : २१४)
५०. महेबूबा महेबूबा बना.. (पृष्ठ : २१८)
५१. शतदा प्रेम करावे.. (पृष्ठ : २२३)
५२. ‘कराओके क्लब’ (पृष्ठ : २२७)


♥

# INDEX

**Contents**

01 : Waah!.. Taj !! ....17

02 : Sandhikali Ya Ashaa....21

03 : Jeena Isi Ka Naam Hai....25

04 : Mere Desh Ki Dharti....29

05 : Aaj Phir Jeene Ki Tamanna Hai.. ....33

06 : Yari Hai Imaan Mera.. ....36

07 : Tarun Aahe Ratra Ajuni....40

08 : Jeena Yaha Marna Yaha.. ....44

09 : Dil Ne Phir Yaad Kiya.. ....48

10 : Dil Ka Soona Saaz.. ....52

11 : Humey Kale Hai To Kya.. ....56

12 : Ye Duniya, Ye Mehfil.. ....61

13 : Tu Ganga Ki Mauj Main… ....65

14 : Raaz Ko Raaz Rehne Do.. ....69

15 : Babuji Dheere Chalna.. ....73

16 : Dum Dum Diga Diga.. ....77

17 : Bhatuklichya Khela Madhali.. ....81

18 : Janewalo Zara.. ....85

19 : Jadunagari Se Aaya Hai.. ....89

20 : Main Zindagi Ka Saath.. ....94

21 : Pyar Kiya To Darna Kya.. ....99

22 : Vikat Ghetla Shyam.. ....104

23 : Apne Pe Bharosa hai to....108

24 : Khai Ke Paan Banaras Wala.. ....112

25 : Mi Olakhun Aahe Saare....116

26 : O Door Ke Musafir.. ....120

27 : Ek Ghar Banaunga.......124
28 : Airanichya Deva Tula.......128
29 : Subaha Na Aayi.......132
30 : Ganga Jamuna Dolyat Ubhya.......136
31 : Mere Pairo Me Ghungroo.......139
32 : Lag Ja Gale.......143
33 : Bolo Subah Shaam.......147
34 : Chal Akela Chal Akela.......154
35 : Chadhta Suraj Dheere Dheere.......157
36 : Kabhi Kabhie Mere Dil Me.......164
37 : Navika Re Vara Vahe.......168
38 : Chingari Koi Bhadke.......172
39 : To ‘Rajhans’ Ek.......175
40 : Mere Jeevan Saathi.......178
41 : Swapnatalya Kalyanno.......182
42 : Aadha Hai Chandrama.......185
43 : Pal Do Pal Ka Saath.......189
44 : Aaj Re..Pardesi.......194
45 : Tere Chehre Me Wo.......197
46 : Malyachya Malyamandi.......201
47 : Ae Mere Dil Kahi Aur Chal.......205
48 : Phool Gendava Na Maro.......209
49 : Mere Mehboob Tujhe.......214
50 : Mehbooba Mehbooba Bana Lo.......218
51 : Shatada Prem Karave.......223
52 : Karaoke Club.......227

## 01 : Waah!.. Taj !!

## ०१ : वाह !.. ताज..!!

*एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल, सारी दुनिया को मुहब्बत की निशानी दी है।..*
*इसके साये में सदा प्यार के चर्चे होंगे, ख़त्म जो हो न सकेगी वो कहानी दी है,*
*एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल..*

मध्यरात्र उलटून गेली होती. ताजमधली आमची प्रेस-पार्टी आटोपताच आम्ही तांबुलसेवनाची तल्लफ भागवायला म्हणून गेट-वेच्या किनाऱ्याकडे क्रॉस केलं. सगळीकडे सामसूम. एकही जोडपं दिसत नव्हतं, म्हणजे आत्ताच पोलिसांचा दंडुका फिरला असणार. पुढे आलो तर काय! अंधारातून चक्क गाण्याचा आवाज येत होता. सुरेल! नीट पाहतो तर त्या कठ्ठ्यावर खाकी गणवेशातलं युगुल खळाळत्या लाटांच्या साक्षीनं मज्जेत युगलगीत गात होतं. बाजुला 'ती' त्याची टोपी, पट्टा आणि स्वतःची पर्स छातीशी घट्ट कवटाळून होती.. आणि 'तो' दंडुक्यानं ताल देत, तहे-दिलसे गाणं पेश करत होता. ऑन-ड्युटी! ताजमहाल हॉटेल समोर होतं म्हणून की काय त्यांचं मन ताजकडे ओढ घेत होतं.

*'ये हसीं रात ये महकी हुआी पुरनूर फजाँ,*
*हो इजाजत तो ये, दिल इष्क का इजहार करे।*
*इष्क इन्सान को इन्सान बना देता है,*
*किसकी हिम्मत है, मुहब्बत से जो इन्कार करे।*
*आज तकदीर ने, ये रात सुहानी दी है।*
*एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल'*

रटाळ अधिवेशनाच्या रोंबाटातून मिळालेल्या दोन फुरसतीच्या क्षणात दोघं संगमरवरी इमले रचत होती खरी पण.. जमलंय का आपल्याला मुंबैत स्वखर्चानं एखादी खोली घेणंही? शहाजहान 'बादशाह' होता हो! आपल्या मुमताजवरील अमर प्रेमाचं चिरंतन प्रतीक म्हणून उभारलं शिल्प आणि नाव दिलं ठोकून 'मुमताज-महल'! असो! ख़याली पुलाव पकवायला पैसे थोडेच लागतात? चार पैशांची जमवाजमव झाली, हाऊसिंग लोनची सोय झाली की गधा भी पहेलवान होत असतो-आमच्यासारखा. यहीं अपना ताजमहल. यहीं मेरी मुमताज. कुतुबमिनारच्या पायऱ्या चढत असताना जसं रफीचं 'दिल का भँवर करे पुकार..' (तेरे घर के सामने) हटकून आठवतं तसं आग्र्याच्या ताजचं नुसतं चित्र जरी समोर धरलं ना तरी 'लीडर'चं हे गाणं पिच्छा पुरवतं एवढं मात्र नक्की.

*'ताज इक ज़िंदा तसव्वूर है किसी शायर का,*
*इसका अफ़साना, हकिकत के सीवा कुछ भी नही।*
*इसके आग़ोश में आकर ये गुमाँ होता है,*
*ज़िंदगी जैसे मुहब्बत के सीवा कुछ भी नही।*
*ताज ने प्यार की मौजों को रवानी दी है..'*

अगणित कवींनी 'ताज'ला आपापल्या बहारदार कल्पनांनी नटवत पेश केलंय. खरं तर ती एक 'कबर'! पण तिचा कबर म्हणून उल्लेख न करता 'अमर प्रेमाचं चिरंतन प्रतीक' एवढ्याच मोजक्या शब्दात 'ताज' जोजवला. 'एक शहनशाहने (इक नव्हे) बनवाके हँसी ताजमहल, सारी दुनिया को मुहब्बत की निशानी दी है।..' हे शशधर मुकर्जींच्या 'लीडर' (१९६४) (दिग्दर्शक राम मुकर्जी) या दिलीपकुमार, वैजयंतीमाला, जयंत, नाझिर हुसैन, मोतीलाल.. अभिनीत चित्रपटातलं लोकप्रिय गीत. बॉम्बे टॉकिजसारख्या नावाजलेल्या संस्थेत अतिशय उत्कृष्ट कामगिरी केलेले शशधर मुकर्जी (एस.मुकर्जी). त्यांचं फिल्मिस्तानमधलं योगदान, आणि फिल्मालयची स्थापना करून केलेलं काम अवघ्या फिल्म-इंडस्ट्रीला सुपरिचित आहे. जेव्हा 'लीडर'या चित्रपटाचं स्क्रीप्ट फायनल केलं तेव्हाच तो रंगीत आणि सिनेमास्कोप असायला हवा हे पक्कं केलं होतं. रतन (१९४४) पासून नावारूपाला आलेल्या व पुढे अनमोल घडी (१९४६), दर्द, दुलारी, अंदाज, दिल्लगी, बाबुल, दीदार, आन, बैजू बावरा, शबाब, अमर, उडन खटोला, मदर इंडिया, कोहिनूर, मुघल-ए-आझम (१९६०) गंगा जमना, मेरे मेहबूब (१९६३) यातील सांगीतिक यशामुळेच नौशादजींना मुकर्जीसाहेबांचा 'लीडर' मिळाला. गीतकार साहिरजी म्हणजे एक मनस्वी शायर. त्यांच्या सर्वच रचना लाजवाब या पंक्तीतल्या. शशधर मुकर्जींच्या तर ते खास मर्जीतले. 'लीडर'ची गाणी तेच लिहिणार हे शशधरजींनी सांगताच नौशादजी खूष झाले.

चित्रपटात रोमँटिक युगल-गीत असणार हे तर ठरलंच होतं पण ते बागेत लपंडाव खेळणारं नको होतं. या कथानकातील दिलीपसाहेब आणि वैजयंतीमाला निभावत असलेल्या कॅरॅक्टर्सच्या मॅच्युअर्ड इमेजसाठी योग्य असं गाणं हवंय असं शशधरबाबूंनी आवर्जून सांगितलं. या गाण्याचं चित्रण साक्षात ताजमहालासमोरच करायची इच्छा आहे हेही नमूद केलं. आता नौशादजी आणि मुकर्जीसाहेब साहीरजींना गाठण्याच्या प्रयत्नाला लागले पण शशधर मुकर्जींनी अनेकदा बोलावणं धाडूनही ते गाण्याच्या सीटींग्जना येतच नव्हते. काय प्रॉब्लेम होता कुणास ठाऊक. इकडे गाणी तयार व्हायला विलंब होत असल्याने लावलेल्या सेटस्‌चं करायचं काय या प्रश्नानं प्रोड्युसर हैराण! शेवटी साहिरजी येणार नाहीत याची खात्री झाल्यावर मुकर्जींनी त्यांच्या चॉईसच्या गीतकाराकडून गाणी घेण्याविषयी सांगितलं. नौशादजींनी मग आपल्याशी ट्युनिंग असलेल्या शायर-गीतकार शकीलसाहेबांकडून गाणी लिहून घेतली. फुलोरातील (दै. सामना) माझ्या कव्हरस्टोरीनिमित्तानं घेतलेल्या मुलाखतीत दस्तुरखुद्द नौशादजींनी हे सगळं सांगितलेलं. नौशादजींच्या आत्मचरित्रपर पुस्तकातही हा उल्लेख सापडतो. (संगीतकार नौशादजींच्या कलाविष्कारात गीतकार म्हणून, शायर ‘साहिर’साहेब कुठेच नाहीत ही वस्तुस्थिती आहे.) ताजमहलच्या सिच्युएशनसाठी शकीलने शायरीचा कीस पाडला.

*‘ताज वो शम्मा है, उल्फत के सनमख़ानेकी.*
*जिसके परवानो में, मुफ़लिस भी है, ज़र-दार भी है।*
*संगेमरमर में समाये हुए, ख़्वाबों की कसम,*
*मरहले प्यार के, आसान भी दुश्वार भी है।*
*दिल को इक जोश, इरादों को जवानी दी है।*
*एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल’*

नौशादजींनी आव्हान स्वीकारलं होतं. शकीलच्या शायरीवर ‘ललत’ रागाचं शर्करावगुंठण करत रफी-लतादीदीच्या आवाजात ते ध्वनिमुद्रित झालं. मला आश्चर्य वाटतं ते साहीरसाहेबांचं. काही महिन्यांआधीच प्रदर्शित झालेल्या ‘ताजमहल’ (१९६३) शीर्षक असलेल्या फिल्मसाठी त्यांनी रोशनदांच्या संगीतात बेमिसाल गाणी लिहिली होती. ती चिक्कार गाजली होती. नुकतंच ‘जो वादा किया वो निभाना पडेगा’ या गाण्यासाठी त्यांना फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालं होतं. शशधर मुकर्जींच्या तर ते कॅम्पमधलेच. इथे तर साक्षात ‘ताज’समोर सादर होणाऱ्या सिच्युएशनसाठी पुरेपूर रोमँटिक गाणं देण्याचा मौका मिळूनही त्यांनी इन्कार करावा? कुणाशी बिनसलेलं? राडा होता? खुन्नस? दिलीपकुमारशी? ‘तुमच्याशी?..’ नौशादजींनी या प्रश्नावर मौन पाळलं. चकार शब्दही बोलले नाहीत ते. असो! ‘लीडर’ला संगीत देण्यात नौशादजी मात्र कुठेच कमी पडले नाहीत. अपनी आजादीको हम हरगिज मिटा सकते नही (मो.रफी), तेरे हुस्नकी क्या तारीफ करूं (मो.रफी), हमींसे मुहब्बत हमींसे लडाई (मो.रफी), आज है प्यारका फैसला ऐ सनम (लतादीदी), दैया रे दैया लाज मोहे लागे (मो.रफी-आशाजी), मुझे दुनियावालो शराबी न समझो (मो.रफी) आणि एक शहनशाहने बनवाके हसी ताजमहल (मो.रफी-लतादीदी) अशी एकाहून एक सरस गाणी.. ‘लीडर’ प्रदर्शित झाला पण ‘दोस्ती’, ‘संगम’च्या स्पर्धेत बॉक्स-ऑफिसवर त्याचा पार पालापाचोळा झाला. तुम्हाला आठवत असेल, चीनने त्या आसपासच्या काळात आपल्यावर आक्रमण केल्यानं लोकांना रेडिओ अगदी जिवाचा कान करून ऐकायची सवय लागली होती. लढाईच्या बातम्या-घडामोडी ऐकता ऐकता नकळत ते रेडिओच्या भजनी लागले होते. गाणी रेडिओवर वाजायची, गाजायची असे ते दिवस. एके दिवशी मात्र आक्रीत घडलं. सहज रेडिओ लावला तर एका मुस्लिम शायरचा स्वर, लोकांच्या संगमरवरी मनाच्या ठिकऱ्या करणारा ठरला होता ! तो कुठलासा मुशायरा होता. शायर एकेक शब्दावर जोर देत आपली ‘ताजमहल’ ही कविता वाचून दाखवत होता...

*‘यह चमनज़ार, यह जमना का किनारा, यह महल, यह मुनक़्क़श दरो-दीवार, यह महराब, यह ताक।*
*इक शहनशाह ने दौलत का सहारा लेकर, हम गरीबोंकी मुहब्बत का उड़ाया है मज़ाक़।*
*मेरी महबूब! कहीं और मिला कर मुझसे!..’*

सगळेच उर्दू शब्द कळत नव्हते, पण शब्दा-शब्दातला आवेश, जज़्बात काळीज चिरून जात होता. लाडके! तू दुसरीकडे कुठेतरी भेटत जा गं! ही बाग, हा यमुनेचा किनारा, नक्षीकाम केलेल्या संगमरवरी भिंती, कमानी...छेऽऽ! नाही वाटत असल्या शापीत जागी प्रेमालाप करावेसे! एका बादशहाने आपल्या संपत्तीच्या माजावर असली इमारत उभारून आपल्या गरीबांच्या प्रेमाची टर उडवलीय. क्रूर थट्टा केलीय.. किती रोमँटिक कल्पना होत्या ताजमहलच्या! पण साहीरचा हा कलाम वाचून ध्वस्त व्हायला होतं. साहिरसाहेबांनी या कवितेतून ताजमहालाबाबतच्या सगळ्याच रोमॅंटिक कल्पनांनाच सुरुंग लावलाय. त्यांनी नौशाद, शकीलवर सूड उगवलाय की संगमरवरी दगडाचं पांढरेपण, विधवेच्या कपाळासारखं पांढरं फटफटीत आहे असं सांगून बगावतभरा इल्जाम केलाय शहाजहानवर?

*‘मेरी महबूब. उन्हे भी तो मुहब्बत होगी, जिनकी सन्नाई ने बख्शी है इसे शक्ल-ए-ज़मील।*
*उनके प्यारों के मकाबिर रहे बे-नाम-ओ-नमूद, आजतक उनपे जलाई न किसी ने कंदील।..’*

ज्या हातांनी तो बांधला गेला त्या व्यक्ती शेवटपर्यंत अज्ञातच राहिल्या नाही का? त्यांनीही प्रेम केलं असेल, मग त्यांनी जर आपल्या प्रेयसीच्या नावानं स्मारकं उभारली असतील तर ती कुठायत? त्या कबरींवर नाही पणती, नाही दिवा...’ बाप रेऽऽ! ‘बादशहाच्या अमर प्रीतीचे, मंदिर एक विशाल, यमुनाकाठी ताजमहाल..’ असे गुणगान करणाऱ्या आपणा गरीब प्रेमींना साहीरने कसला टोला हाणलाय पहा..

*‘अनगिनत लोगों ने दुनिया में मुहब्बत की है, कौन कहता है के सादिक न थे जज़्बे उनके?*
*लेकिन उनके लिए तशहिर का सामान नही, क्यौंकी वे लोग भी अपनी तरह मुफलिस थे।...’*

ये रात ये चाँदनी फिर कहाँ.., जाए तो जाए कहाँ.., जीवन के सफर में राही.., ये दुनिया अगर मिल भी जाए तो क्या है.., वो सुबह कभी तो आएगी.., औरत ने जनम दिया.., दुःखी मन मेरे.., रंग और नूर की बारात.., मैं जिंदगी का साथ निभाता चला गया.., चलो एक बार फिर से.., मन रे तू काहे ना धीर.., दुनिया करे सवाल तो हम.., छू लेने दो नाजुक.., नीले गगन के तले.., कभी कभी मेरे दिल में.., अशा असंख्य आशयसंपन्न गीतांचे शायर साहिरजी द ग्रेटच! ‘ताजमहल’ ही साहिरजींची वेगळीच कविता आहे, आणि ती ‘लीडर’ (१९६४) या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या आसपास रेडिओवर सादर केली गेली. नंतर निर्माता-दिग्दर्शक वेद मदनसाहेबांच्या ‘गजल’ (१९६४) या सुनील दत्त, मीनाकुमारी अभिनित चित्रपटात त्याचा खास सिच्युएशन निर्माण करून अंतर्भाव करण्यात आला. मदनमोहनजींच्या संगीतात महंमद रफीने ती ‘गजल’ अतिशय उत्कृष्ठरित्या पेश केलीय. साहिरजींनी त्यांची ‘ताजमहल’ ही कविता मुद्दाम कुठल्याश्या आकसापोटी, रागापोटी लिहिली गेली असेल का? हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरीत आहे, हे विशेष. पण या काव्याने त्याकाळी भल्याभल्यांची झोप कशी उडवली असेल, विचार करा. (दि. २६ फेब्रुवारी २०१०च्या लोकसत्तेतल्या आपल्या ‘गझलियत’ या सदरात, गजलनवाज श्री. भीमराव पांचाळेजींनी जावईशोध लावलाय की या दोन्ही गीतांचे शायर साहीरच आहेत. वाचून सखेद आश्चर्य वाटलं.) हास्यसम्राट जॉनी रावत या माझ्या नकलाकार दोस्ताने ‘ताजमहल’ या विषयावर एक धमाल सादरीकरण केलेलं आठवतं!.. ताजमहालाचं बांधकाम पूर्ण होताच त्याचा हिशेब आणि पझेशन वगैरे घ्यायला म्हणून बादशाह गेला असेल तर त्याने उत्स्फूर्तपणे पहिलं वाक्य काय उच्चारलं असेल बरं?.. सांगा पाहू!?.. ‘माँ की...लाहौलवलाकुव्वत.. देखते देखते बहोत खर्चा हो गया यार!!..’

♥

(एक सांगू? आता ही संगीत निर्मितीमागची कथा वाचून ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? ही घ्या त्या गाण्याची ‘ऑडिओ आणि व्हिडिओ’ तसेच संपूर्ण चित्रपटाची ‘यू-ट्युब’ लिंक :

| | |
|---|---|
| १. एक शहनशाह ने बनवाके.. (व्हिडिओ) : | https://youtu.be/1GRrNnEy1WE |
| २. मेरी महबूब! कहीं और.. (व्हिडिओ) : | https://youtu.be/Hts4cb2zzso |
| ३. एक शहनशाह ने बनवाके.. (ऑडिओ) : | https://youtu.be/7pdoScP2FrU |
| ४. मेरी महबूब! कहीं और..(ऑडिओ) : | https://youtu.be/e9pc2b2FbCQ |
| ५. एक शहनशाह ने बनवाके.. (कराओके) : | https://youtu.be/Vesp3_lULdY |
| ६. संपूर्ण चित्रपट : लीडर (१९६४) | https://youtu.be/cAUHnULslnw |

♥

## ०१ : वाह !.. ताज..!!

चित्रपट : लीडर (१९६४)
निर्माता : शशधर मुकर्जी
दिग्दर्शक : राम मुकर्जी
गीतकार : शकील बदायुनी
संगीत : नौशाद
गायक : महंमद रफी-लता मंगेशकर

रफी - एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल,
सारी दुनिया को मुहब्बत की निशानी दी है।..
लता - इसके साये में सदा प्यार के चर्चे होंगे,
ख़त्म जो हो न सकेगी वो कहानी दी है,
दोघे - एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहलSS

रफी - ताज वो शम्मा है, उल्फत के सनमखानेकी,
जिसके परवानो में, मुफलिस भी है, जरदार भी है।
लता - संगेमरमर में समाये हुए, ख़्वाबों की कसम,
मरहले प्यार के, आसान भी दुश्वार भी है।
रफी - दिल को इक जोश, इरादों को जवानी दी है।
दोघे - एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल।..

लता - ताज इक जिंदा तसव्वूर है किसी शायर का,
इसका अफ़साना, हकिकत के सीवा कुछ भी नही।
रफी - इसके आग़ोश में आकर ये गुमाँ होता है,
जिंदगी जैसे मुहब्बत के सीवा कुछ भी नही।
लता - ताज ने प्यार की मौजों को रवानी दी है..
दोघे - एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल।..

रफी - ये हसीं रात ये महकी हुअी पुरनूर फजाँ,
हो इजाजत तो ये,दिल इष्क का इजहार करे।
लता - इष्क इन्सान को इन्सान बना देता है,
किसकी हिम्मत है, मुहब्बत से जो इन्कार करे।
रफी - आज तकदीर ने, ये रात सुहानी दी है।
दोघे - एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहल,
सारी दुनिया को मुहब्बत की निशानी दी है।..
एक शहनशाह ने बनवाके हँसी ताजमहलss

♥

०१. संगीतकार नौशाद व गीतकार शकील बदायुनी (सुपरहिटस् )
https://youtu.be/ZGXY_Jzrsso

०२. गीतकार शकील बदायुनी (सुपरहिट गाणी) (प्ले-लिस्ट- व्हिडिओज) :
https://www.youtube.com/playlist?list=PLIYKbgcYVljiMYVf8vQaWx68-OTHnLwS_

## 02 : Sandhikali Ya Ashaa..

## ०२ : संधिकाली या अशा...

शुक्रताराच्या यशानंतर 'अरुण दाते' हे नाव वलयांकित झालं. लोकप्रियतेच्या शिखरावर तेजाने तळपू लागलं. कार्यक्रम हवा.. कार्यक्रम हवा असे लोकांचे फोन येऊ लागले. कार्यक्रम घेतला खरा पण गायचं काय? अरुणजी हिन्दी-उर्दू गजला गात कार्यक्रमाची सुरुवात करीत असत. समोर तर सगळे मराठी चेहरे! हिन्दी गाण्यांवरून गाडी मराठी गाण्यांवर कधी येतेय याची उत्कंठा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्ट दिसत असे. मजबुरी होती. अरुण दातेंना मराठी मायबोलीतलं केवळ एकूलतं एक गाणं (खरं तर अर्धच.. युगलगीत होतं ना?) येतं हे बापड्यांना कसं पटावं.. पटवावं! मध्यंतरापर्यंत उत्कंठेचा कडेलोट होई. कार्यक्रमाचा संयोजक कावराबावरा होत चहा-बिस्किटांचा समाचार घेणाऱ्या अरुण दातेंना पृच्छा करीत असे..

' पब्लिक मराठी आहे होऽऽ..मराठी गाणी घ्या ना!'

'मी काय आणि किती गाऊ शकतो याची जराही विचारपूस न करता कार्यक्रम ठेवलात! आता एका मराठी गाण्यावर कार्यक्रम करू का?'

'वाटवे-फडक्यांची गाणी घ्या ना! त्यात काय आहे अवघड?' ग्रीनरूममधली गर्दी वाढत होती. कोणी दर्दी तर कुणी दर्द द्यायला आलेलं.

'जमणार नाही! मी दुसऱ्यांची गाणी गात नसतो.. ज्या वाटवे-फडक्यांनी इतिहास घडवला त्यांची गाणी घेऊ...?'

'शुक्रतारा म्हणाच..' बाप दाखव नाहीतर श्राध्द कर असं गळेपडू विधान.

'एकटा?!' अरुणजींच्या हातातलं पाण्याचं ग्लास आता पडण्याच्या बेतात.

'आम्ही आहोत ना! आम्ही म्हणतो तुमच्याबरोबर.. चाल, शब्द, ताना-हरकती सगळं-सगळं तोंडपाठ आहे..' गर्दीतल्या दहा बायका पुढे होऊन आग्रह करत होत्या. आता या बायका 'चारो तरफ गोपियाँ' टाईप भोवती उभ्या राहून एकेक ओळ म्हणणार आहेत की काय? धास्तावले दातेसाहेब! असं नेहमीच व्हायचं. संयोजकाच्या शिफारसीनुसार एखादी मारून मुटकून का होईना बोहल्यावर चढवावी तशी सहगायिका मिळायचीच मिळायची. गाणं सुरू! तिचा सूर, गाण्यांची चाल, ताल आणि पब्लिक या सर्वांना सांभाळत शेवटी गाणं उरकावं लागे..

रेडिओवर सादर होणाऱ्या ज्या 'भावसरगम' या मराठी सुगम संगीताच्या कार्यक्रमासाठी 'शुक्रतारा मंदवारा..' (पाडगांवकर-खळे या जोडगोळीचं) रेकॉर्ड झालं होतं त्याच कार्यक्रमासाठी दुसरं गीत केलं ते यशवंत देवसाहेबांनी. 'अखेरचे येतील माझ्या, हेच शब्द ओठी..' गाणं तुफान लोकप्रिय झालं आणि मग सुपरहिट गाण्यांचा सिलसिलाच सुरू झाला. सखी शेजारीणी, भेट तुझी माझी स्मरते.. एकापेक्षा एक सरस गाणे. उत्तमोत्तम चाली. अरुण दाते लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाले. एच.एम.व्ही.ने एकामागोमाग एक गाणं ध्वनिमुद्रित करण्याचा सपाटा लावला. बऱ्याच रसिकप्रिय गाण्यांचं भलंमोठं गाठोडं पाठीवर येताच मग मात्र दाते अभिमानानं मराठी भावगीतांचे कार्यक्रम करू लागले..

*संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा, चाँद येई अंबरीऽऽ*
*चांदराती रम्य या, संगती सखी-प्रिया, प्रीत होई बावरी..*
*संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाऽऽ*

शब्द नुसते वाचूनही अंगावर रोमांच फुलले ना? अचानक आणखी तरूण झाल्याचा साक्षात्कार झाला की नाही? मखमली आवाजाचे अरुण दाते आणि अलौकिक आवाजाची स्वामिनी लतादीदी हा मणिकांचन योग घडवून आणलाय पं. हृदयनाथजींनी. 'शुक्रतारा'चं वादातीत यश ते ऐकून होते आणि दातेंच्या आवाजातील परिमळ समस्त मंगेशकर कुटुंबियांपर्यंत पोहोचलाही होता, पण त्यांची रूबरू भेट नव्हती कित्येक वर्षात. अचानक ब्राह्मण सहायक संघातल्या 'श्रीनिवास खळे रजनी'च्या निमित्तानं दोघांची भेट झाली. परिचय झाला. स्नेह जडला. पुढे निकटचे स्नेही झाले ते. काही महिन्यांनंतर पार्ल्यातल्या एका भावगीत कार्यक्रमात सहभाग देण्यास बाबुजी आणि कृष्णा कल्ले यांनी नकार कळविल्यानंतर अरुणजींनी हृदयनाथजींना गाठलं. त्यांनी आणि उषाताईंनी आपल्या या कार्यक्रमात गावं असा विनंतीवजा प्रस्ताव ठेवला. आपल्या दोस्ताच्या प्रस्तावाला लगेच होकार देत उषाताई आणि हृदयनाथजी कार्यक्रमाला आले. पाडगांवकरांचं निवेदन लाभलेलं अरुण दाते, कुंदा बोकिल, उषाताई आणि हृदयनाथजी यांचं 'भावसरगम' हे संयुक्त सादरीकरण लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. शेकडो प्रयोग झाले. पं. हृदयनाथजींनी आपल्या या दोस्तासाठी काही गाणी

केली. कवि शंकर वैद्य यांनी लिहिलेली दोन गाणी 'स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला..' आणि 'आज हृदय मम विशाल झाले..' तसेच सुरेश भटांचं 'सूर मागू तुला मी कसा..' खूपच लोकप्रिय झाली. अचानक एक दिवस हृदयनाथजींचा फोन आला..

'अरु! लगेच ये.. एक व्दंव्दगीत केलंय तुझ्यासाठी..' अरूणजींनी पेडर रोड गाठला. उत्साह अपूर्व होता. आपल्या दोस्तानं काय नमकीन चीज बनवलीय या उत्कंठेनं अरूणजींनी हार्मोनियमशी झटापट करणाऱ्या हृदयनाथसमोरच बसकण मारली. सीझनचा पहिला हापूस आंबा व्यवस्थित कापून मायेनं फोडी करून देणाऱ्या आईसमोर जशी मुलं बसतात, तसेच भाव होते अरूणजींच्या चेहऱ्यावर. कवि गंगाधर महांबरे यांच्या कवितेचा कागद समोरच होता. हृदयनाथजी त्यातल्या सरळसाध्या शब्दांना आपल्या सुरावटींची ट्रीटमेंट देत गाऊन दाखवत होते...

*मुग्ध तू नी मुग्ध मी, अबोल गोड संभ्रमी, एकरूप संगमी..*
*रातराणीच्यामुळे, श्वास धुंद परिमळे, फुलत प्रीतिची फुले,*
*प्रणयगीत हे असे, कानी ऐकू येतसे, गीती शब्द ना जरी,*
*संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाऽऽ*

'मस्तच जमून आलंय रे!.. कुठनं मिळवलंस हे अस्सल प्रणयगीत?.. चांगली गायिका घे रे बाबा..'
'एक गायिका आहे..लता मंगेशकर नावाची..चालेल?' बसल्या जागेवरून तिन-ताड उडावं तसं वाटलं अरूणजींना. क्षणात सगळा हुरूप भीतीत बदलला. खूप सराव केला पण विलक्षण दडपण होतं मनावर. दीदींबरोबर गायचं होतं ना! कसून मेहनत केली. एच.एम.व्ही. स्टुडिओतलं रेकॉर्डिंग! लतादीदी आल्या. मानवंदना द्यावी तसं उपस्थितांनी स्वागत केलं. आपल्या लाडक्या भावाचं गाणं रेकॉर्ड होतंय म्हणून विशेष खुशीत होत्या त्या. अरूणजींनी नम्रपणे दीदींच्या पायाला हात लावला, त्या लागलीच म्हणाल्या..
'हात इतका का थंड आहे?!'
'थंड? तुमच्याबरोबर गाताना भल्याभल्यांना गार पडलेलं पाहिलंय मी. माझा सध्या, हातच थंड आहे..'
सहगायकाला अधिक टेन्शन येऊन गाण्याचा विचका होऊ नये म्हणून लतादीदी दातेंशी सहजपणे गप्पा मारू लागल्या. आत तिकडे म्युझिक-हॉलमध्ये वादक मंडळी साँग-व्हायोलिनच्या साथीनं रिहर्सल्स करण्यात मग्न होती. तोपावेतो दातेंची अनेक गाणी रेकॉर्ड झाली होती खरी, पण आज श्वास घुसमटत होता एका अनामिक भीतीनं. गायकांसाठी एकच माईक असायचा तेव्हा. माईकच्या अलीकडे दीदी आणि पलीकडे थोडंसं अंतर राखून अरुणजी! वादक-मंडळींच्या आता गायकांसह रिहर्सल्स सुरु झाल्या. दोन्ही कडव्यांच्या सुरुवातीच्या ओळी आपल्याला गायच्यात हे टेन्शन होतंच. मध्येच कंपनीचा फोटोग्राफर येऊन कव्हरसाठी की काय, फोटो काढून गेला. लतादीदींच्या गळ्यातून स्वरकारंजी बरसू लागली. दोन ओळींमध्ये श्वास कुठे घेतला-कुठे सोडला हे अजिबात उमगत नव्हतं. प्रसन्न चेहऱ्यानं त्या सहजतेनं प्रयासरहीत गात होत्या. अरूणजींना त्याक्षणी पांढऱ्या शुभ्र कपड्यातल्या लतादीदी कुणी देवत्व लाभलेल्या संतश्रेष्ठांप्रमाणे वाटल्या. देवदेवतांच्या मागे असतं तसं तेजोवलय आहे की काय असंही भासत होतं. लताजी समरसून गात होत्या. गाण्याचं दुसरं आणि अर्थात शेवटचं कडवं येताच मन खंतावलं. तो सिलसिला असाच अखंड सुरू रहावा असं वाटत होतं. पहिल्या कडव्यानंतर सुरावटींच्या हिंदोळ्यावर झुलता झुलता तो झुला उंच उंच आभाळाकडे जातोय की काय अशी अनुभूती सुखावतेय तोच तो पुन्हा खाली कोसळणारेय याची बोचरी जाणीव मन अस्वस्थ करण्यास, खंतावण्यास पुरेशी होती. खट्टू झालं मन. ईपी रेकॉर्डसाठी निर्धारीत असलेली ती तीन मिनिटांची वेळ संपूच नये असं वाटत होतं.

*सांज रंगी रंगुनी, नकळताच दंगुनी, हृदय तार छेडुनी..*
*युगुलगीत गाऊनी, एकरूप होऊनी, देऊ प्रीत दाऊनी,*
*प्रणयचित्र हे दिसे, रंगसंगती ठसे, कुंचला नसे जरीऽऽ*
*संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाऽऽ*

'बरसात'पासून ज्या मंजूळ आवाजानं दातेंनाच नव्हे तर अवघ्या रसिकजनांना मोहिनी घातली होती त्या अलौकिक आवाजाबरोबर आपलं नाव गुंफलं जाणारेय. रेकॉर्डच्या कव्हरावर त्या स्वरसम्राज्ञीबरोबर आपला फोटोही झळकणारेय या आनंदाने अरुण दाते पुढचे अनेक दिवस मोरपिसावर तरंगत होते. ध्वनिमुद्रिका बाहेर पडली. नुकताच फुटलेला अंकुर एखाद्या विकृत उपटसुंभानं उखडून टाकावा असे आश्चर्यचकित झाले ते. कव्हरवर दाते एकटेच होते. माईक तोच दिसत होता पण ज्या जागी दीदी उभ्या होत्या तिथे पांढरा रंग नको तसा सांडलेला होता. तिथलं रेकॉर्डचं शीर्षक बळींच्या बकऱ्याकडे खाटकानं पहावं इतक्या कुत्सित नजरेनं दातेंना हिणवत होतं. फोटो का छापला नाही? कुणी ते कुकर्म केलं? या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचं धाडस तेव्हा दातेंमध्ये

नव्हतं. कुणालाही दोष देण्यात अर्थ नव्हता. जग आपलं नाव, कर्तृत्व याची दखल घेईपर्यंत उगी राहण्यातच शहाणपण होतं, होय ना?

♥

| | |
|---|---|
| १. संधिकाली या अशा.. (मूळ ऑडिओ - एच.एम.व्ही.) | https://www.youtube.com/watch?v=MYDNTW4BCyU |
| २. संधिकाली या अशा.. (व्हर्शन - टी.सीरिज) | https://www.youtube.com/watch?v=-FEXjivniCs |
| ३. संधिकाली या अशा.. (कराओके ट्रॅक) | https://www.youtube.com/watch?v=76gpE0SFhOs |
| ४. अरुण दातेसाहेब (सुपरहिटस्) | https://youtu.be/S3Vee6DjK-8 |
| ५. आकाशगंगा (व्हीनसचा अल्बम) | https://youtu.be/uB8jKp6Ixkg |
| ६. अरुण दातेसाहेब (रेडिओ क्लासिक शो) | https://youtu.be/kQwAZBKPIM4 |
| ७. अरुण दातेसाहेब (भावगीते) | https://youtu.be/NsC9_Gwakm8 |

♥

## ०२ : संधिकाली या अशा..

गायक : अरूण दाते - लता मंगेशकर
कवि : गंगाधर महांबरे
संगीत : पं. हृदयनाथ मंगेशकर

लता : संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाss
संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा,
चाँद येई अंबरीss
अरूण : चांदराती रम्य या, संगती सखी-प्रिया - २
प्रीत होई बावरी..
दोघे : संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाss

अरूण : मुग्ध तू नी मुग्ध मी,
अबोल गोड संभ्रमी - २,
एकरूप संगमी..
लता : रातराणीच्यामुळे - २,
श्वास धुंद परिमळे,
फुलत प्रीतिची फुले -२
अरूण : प्रणयगीत हे असे
कानी ऐकू येतसे,
गीती शब्द ना जरीss
दोघे : संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाss

अरूण : सांज रंगी रंगुनी.
नकळताच दंगुनी - २
हृदय तार छेडुनी..
लता : युगुलगीत गाऊनी - २
एकरुप होऊनी
देऊ प्रीत दाऊनी- २
अरूण : प्रणयचित्र हे दिसे,
रंगसंगती ठसे,
कुंचला नसे जरीss
दोघे : संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशाss
धुंदल्या दिशा दिशाss

♥

## 03 : Jeena Isi Ka Naam Hai..

## ०३ : जीना इसीका नाम है..

'संपलं प्रॅक्टिकल? चलाऽऽ चला लगेच हॉलमध्ये!.. अरे! चक्क मुकेश आलेयत आपल्या शाळेत!!..' तास संपल्याची घंटा होताच टारझनसारखी एन्ट्री घेत किशोर घाडीने पुकारा केला लॅबमध्ये.. 'मुकेश? आपल्या शाळेत? काय संबंध!..' भराभर जिने उतरत मग आम्ही धावतच निघालो हॉलकडे. प्रॅक्टिकलच्या वह्या, पुस्तकं, कंपासपेटी, त्यातले खाऊचे पैसे.. कशाकशाचं भान नव्हतं. मुकेश आपल्या शाळेत आलेयत एवढंच महत्त्वाचं होतं त्याक्षणी. आमचं 'रॉबर्ट मनी टेक्निकल हायस्कुल'! शाळेच्याच हॉलमध्ये कोणत्यातरी ब्लाईंड असोसिएशनचा कसलासा कार्यक्रम होता. १९७२ साल असेल ते.. आम्ही आठव्या इयत्तेत होतो, म्हणजे केवळ बारा-तेरा वर्षे वयाचे! आमची प्रॅक्टिकल्स असल्याने फक्त आमची इयत्ता वगळता संपूर्ण हॉल विद्यार्थ्यांनी तुडुंब भरलेला. पंडितसर हातवारे करत कसलंसं भाषण ठोकत होते. प्रभुणेसरांकडे बहुदा यजमानपद असावं, कारण ते वधुपित्यासारखे सॉलिड टेन्शनमध्ये दिसत होते. चुळबुळ करणाऱ्या मुलांच्या पाठीत धपाटे घालत शांतता प्रस्थापित करण्यात ते मश्गुल असल्याचं दिसताच, आम्ही भिंतीच्या कडेकडेनं स्टेजच्या जवळपास पोहोचलो..

'ते बघ.. ते मधल्या खुर्चीत पांढरा शर्ट घातलेले दिसतायत ना.. तेच मुकेश!' मधली इतर गर्दी टाळत पायाच्या टाचा उंच करून पांडुरंगाचं मुखदर्शन घ्यावं तितक्या भक्तिभावाने मी मुकेशजींना पाहिलं. न्याहाळलं. आता ते बोलायला उभे राहिले होते. चेहऱ्यावर विलक्षण तेज दिसत होतं. एकेक वाक्य शांतपणे उच्चारत निरागस भाव आणि ओठांवर निर्व्याज हास्य वागवत ते भाषण करत होते. अचानक प्राचार्य गायकवाडसरांनी मुकेशजींच्या कानात काहीतरी सांगितलं. सवयीप्रमाणे त्यांनी 'टाईम-अप' असं सांगितलं असेल की काय असा विचार करतोय तोच, मुकेशजींनी हसून संपूर्ण हॉलमधल्या तमाम विद्यार्थ्यांकडे पाहिलं. हॉलमध्ये कुजबुज! सरांनी फर्माईश केली होती तर! (इतकी कठोर शिस्त पाळणारे गायकवाडसर! आणि फर्माईश?) मुकेशजींच्या चेहऱ्यावर गोंधळ उडालेला दिसला.. पुढच्या सगळ्या रांगांमधुन प्रायमरीचीच पोरं दिसत होती. मॅट्रिकची मोजकी मुलं वगळता, आम्ही सगळेच चिंटू-पिंटू! (च्यायला) या पोरांसमोर गायचं तरी काय हा प्रश्न त्यांना नक्कीच पडला असावा.. काहीतरी गायचं म्हणून उजवा हात वर करून चुटकी वाजवत मुकेशजींनी गाणं म्हणायला सुरुवात केली.. 'झूम झूम के नाचो आज, गाओ ख़ुशी के गीत..' जेमतेम मुखडाच गायले असतील.. आणि ते खाली बसायची तयारी करू लागले.. प्रभुणेसरांना राहवेना.. ते तडक स्टेजवर चढले आणि कसलीशी चिठ्ठी मुकेशजींच्या हातात सरकवली. मुकेशजींनी त्या चिठ्ठीकडे क्षणभर पाहिलं नंतर ते प्रभुणेसरांकडे स्माईल देत उभे राहिले.. आता हॉलमध्ये सन्नाटा होता.. मुकेशजी गाणं गाऊ लागले.. पुढच्याच क्षणी हॉलमधलं वातावरण मुकेशजींच्या धीरगंभीर आवाजानं भारलं होतं. आम्ही जिवाचा कान करून ऐकत होतो. जिंदादिल गायक मुकेश जीवनाचं भाष्य असलेलं गाणं आम्हा विद्यार्थ्यांना प्रेमानं ऐकवत होते. तिथे ना साज होता, ना साजिंदे! हिन्दी-उर्दू शायरी, आणि त्यातला नेमका अर्थ-आशय न कळणारा श्रोतुवर्ग समोर होता. पण सगळेजण श्रवणभक्तीत रंगले होते. मुशायरा-मैफिलीचा नशिला-धुंद माहोल नसुनही त्यांनी आम्हा सर्वांना 'त्या' गाण्याच्या आनंदात भिजवून टाकलं.. आयुष्यभर पुरेल इतका दरवळ आमच्या कानामनावर शिंपडून.. निर्व्याज प्रेमाने..

*किसी की मुस्कुराहटों पे हो निसार, किसी का दर्द मिल सके तो ले उधार,*
*किसीके वास्ते हो तेरे दिल में प्यारऽऽ जीना इसीका नाम हैऽऽ*

कार्यक्रम संपला पण मुकेशजींच्या आवाजाचा कैफ मनावर ताजा असतानाच आम्ही आपापल्या वर्गांकडे वळलो. शाळा सुटेपर्यंत त्याच नशेत होतो आम्ही. घरी आलो तर आमच्या चाळीत दुसऱ्या मजल्यावर नेमका लाऊड-स्पीकर लागलेला. बारसं होतं! अशा प्रसंगी हे लाऊड-स्पीकरवाले काय करायचे ठाऊकेय? कर्तव्य म्हणून एकच एक उपलब्ध असलेलं 'हळुहळू हलवा गं.. सोनियाचा पाळणा..' दोनेकदा वाजवून झालं की त्या दिवसात जी सुपरहिट गाणी असायची ती ते इमानेइतबारे वाजवायचेच.. 'सुंदरी हाय हाय सुंदरी.., अब चाहे माँ रूठे या बाबा.., मुत्तुकुल्ली कवारी गल्ला.. (काय शब्द आहेत कुणास ठाऊक!), ए बाई तू कहाँ से आयी.., झूठ बोले कौआ काटे.., चक्कू-छुरिया तेज चलाओ.., जैसे को तैसा मिला (चाबकाचा एक फटका.. फटाक) कैसा मजा आया (आणखी एक.. फटाक)..' अशी नवी गाणी वाजत होती.. मी त्याच्याकडे धावतच गेलो.. त्याच्याकडे जुन्या गाण्यांचा हमखास स्टॉक असायचा. माझ्या सुदैवाने 'अनाडी'ची ईपी रेकॉर्ड होती. गायक मुकेश, गीतकार शैलेंद्र आणि संगीत शंकर-जयकिशन! आता हे गाणं लावायला सांगितलं तर आपल्याला हा आपल्या तोंडावर 'अनाडी..' अशी संभावना करत, नाहीऽऽ म्हणून सांगणार!

पण मी आपला हट्ट सोडला नाही. कारण आपुन के पास एक ‘लाईफ-लाईन’ होती! त्याला आपलेपणानं ‘पाणी’ विचारलं आणि ‘चहा’ वगैरे पाजला की स्वारी खुश व्हायची! मग आपण सांगू ती गाणी तो लावायचा.. चहाच्या एका कपाच्या प्रलोभनात माझी फर्माईश पुरी झाली. त्याने ‘किसी की मुस्कुराहटों पे हो निसार..’ गाणं लावलं मात्र.. ज्यांच्याकडे बारसं होतं ते काका, हातातलं काम टाकून त्या लाउड-स्पीकरवाल्या मधूकडे आले.. त्याला चिडून काही बोलतात की काय म्हणून मी कल्टी घ्यायच्या तयारीत.. पण नाही! ते आले. मधूच्या पाठीवर हलकेच हात फिरवला.. ‘बेटा, हे बघ.. आज दोन-पाच रूपये जास्त घे माझ्याकडून.. पण अशीच जुनी गाणी लाव! समजलं?’ माझं काम झालं होतं.. आमचे पुढचे काही तास ‘बेला के फूल’सारख्या सुरेख गाण्यांनी साजरे झाले. दिवस असेच जात होते. नंतर कधीतरी नाना चौकाजवळच्या पुलाखाली फोटो-फ्रेमवाल्याकडे एक सूर्योदयाचा देखावा असलेली फ्रेम नजरेस पडली. छान देखावा होता. खाली इंग्रजीत लिहिलं होतं.. ‘इन युवर लाईफ, इफ यू फाइन्ड एनिवन.. विदाऊट स्माईल.. गिव्ह हिम युवर ओन..’ क्या बात है! किती अर्थ सामावलाय नाही या वाक्यात? अरेच्चा! मुकेशजींनी म्हटलेल्या ‘त्या’ गाण्यात हीच तर थॉट होती..

*माना अपनी जेब से फकीर है, फिर भी यारो दिल के हम अमीर है,*
*मिटे जो प्यार के लिए, वो जिंदगी, जले बहार के लिए वो जिंदगी,*
*किसी को हो ना हो हमें तो ऐतबारऽऽ जीना इसीका नाम हैऽऽ*

या गाण्यात जीवनाचं भाष्य आहे, हे मात्र उमगलं बऱ्याच वर्षांनी. आयुष्यात सुख आणि दुःख याच्या लपंडावात एकदा होरपळल्यावर. आमची रेडिओशी मैत्री झाली होती. बिनाका गीतमालाने वेडं केलं होतं. गिल्डर लेन गल्लीत एका इराण्याच्या हॉटेलात ‘ज्युक-बॉक्स’ नावाचं यंत्र आहे.. आणि चवन्नी टाकताच ते हवं ते गाणं ऐकवतं हा सुगावा लागला होता. खाऊच्या पैशातून गाणी ऐकायला जायचो. तोपावेतो ‘टीव्ही’ आलेले, मात्र आमच्या चाळीत एखाद-दुसराच असल्याने तो तोंडी लावण्याइतकाच परिचयाचा. रेडिओच्या श्रवणभक्तीमुळे गीतकार शैलेंद्र तेव्हा नुकताच कानातून हृदयात उतरू लागला होता. मुकेशचा आर्त स्वर काळीज कसं छिन्नविछिन्न करू शकतो याची प्रचिती येत होती. कॅसेटचा जमाना आला. गल्लोगल्ली त्यावर हवी ती गाणी आपण देऊ त्या क्रमाने रेकॉर्ड करून मिळू लागली. जुनी गाणी आणि त्याची नशा ही आमच्या पिढीला याच काळात लागली. कारण एकच होतं.. ‘शोले’ (१९७५) लागला आणि त्याच्या आगमनासरशी सिनेमातलं संगीत चक्क हद्दपार झाल्यात जमा होतं. नव्या सिनेमाच्या गाण्यात काही दम नसल्याने मग जुन्या गाण्यांमुळे आम्हाला जणू संजीवनी मिळू लागली, जीवन सुसह्य करण्यासाठी..

‘अनाडी’ (१९५९)चा हीरो राज कपूर, मात्र हा सिनेमा आर. के. कॅम्पचा नाहीय. एल. बी. लछमननामक निर्मात्यांचा. संकलक-दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी. राज, नूतन, ललिता पवार, शुभा खोटे, मोतीलाल असे कलाकार. कथा-पटकथा-संवाद इंदर राज आनंदचे. राजसाहेबांच्या तारखा विनासायास मिळाव्यात म्हणून की काय निर्मिती आर.के. स्टुडिओतच केली गेली असावी. गाण्यांचं ध्वनिमुद्रण फेमसला मिनू कात्रकजींनी आर.सी.ए. नामक यंत्रावर केलेलं. संगीतकार शंकर-जयकिशनजींना सहाय्यक होते दत्ताराम (जे सुप्रसिध्द संगीतकारही होते) आणि संगीत संयोजन होतं सॅबेस्टियनचं.. हे गाणं सिच्युएशन-साँग नाहीय. ते सहजच येतं. भोळाभाबडा नायक त्या कथानकात एस्टॅब्लीश करण्यासाठी. त्याच्या स्वभावाचे कंगोरे दाखवणारं हे भावगीत. नायक अनाडी-बावळट किंवा सीधा-साधा सदा असल्याचं चित्रपटाच्या शीर्षकावरून वाटतं ना! पण त्याच्या तोंडी दिलेले थॉट ऐकलेत? जीवनाचं भाष्य, दास्तान सांगणारे शैलेंद्रचे शब्द खूपच प्रभावी. जे थेट तुमच्या काळजाला हात घालतात. ‘राज’ या गाण्यातून प्रेक्षकांना सामोरा येतो तो शीळ वाजवत, उछलकूद करत चालताना. स्वच्छंदी आहे तो. त्याने वाजवलेली शीळ ही बेफिकिरी दाखवते तर चालणं ‘हर फिक्र को धुएं में उडाता चला गया..’ टाईप वाटतं, पण याच वेळी राजचे डोळे निरखा. या गाण्याच्या वेळेस त्याची अदाकारी ही ‘चार्ली चॅप्लीन’ टाईप अनाड्याची वाटली तरी त्याच्या डोळ्यांतून तो लाखमोलाचं बोलून गेलाय. गाण्याचा बाज आनंदी आहे. एस्.जे.चं संगीत, ऑर्केस्ट्रेशन, मुकेशचा आवाज आणि शैलेंद्रचा कलाम थिएटरात एक माहोल पैदा करतो. वाटतं की आपण आर.के.बॅनरचाच चित्रपट पाहतोय. एल. बी. फिल्मस् ही अक्षरं पुसट वाटतात. संकलक-दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी आहेत खरे पण त्यांनी दिग्दर्शन निदान या सिनेमात तरी राजकपूरच्या प्रकृतीला-प्रतिमेला शोभेलसं केलं आहे. (याच हृषिदांचे पुढे ‘असली नकली’, ‘अनुपमा’, ‘आनंद’, ‘आशीर्वाद’, ‘चुपके चुपके’, ‘गुड्डी’, ‘मिली’, ‘बावर्ची’,‘खुबसूरत’, ‘बेमिसाल’, ‘गोलमाल’ असे थक्क करणारे अनेक टप्पे आपण पाहिलेत.) ‘अनाडी’ मधली एस्.जे., शैलेंद्र, हसरत, लता, मुकेश इत्यादींची मौजुदगी तर ‘राज’ घराण्याच्या संगीताची याद देते. ‘राज’मधला छुपा संगीतकार आणखी एकदा अधिरेखित होतो. त्याच्या आर.के. बाहेरच्या सिनेमात तर हे प्रकर्षाने जाणवतं. ‘कन्हैया’, ‘छलिया’, ‘दीवाना’, ‘दिल ही तो है’.. यादी बरीच मोठी आहे. त्यातल्या प्रत्येक गाण्यावर छाप दिसते ती ‘राज’चीच. ‘अंदाज’मध्ये नौशादमियाँनी मुकेशची सगळी गाणी दिलीपसाहेबांना दिलेली. ‘यूँ तो आपस में बिगडते..’ या

एका युगलगीतापुरता 'राज'च्या तोंडी आवाज होता तो चक्क रफीचा. 'राज'साठी 'रफी'? छेऽऽ! राजकडे थोडासा गाता गळा होता पण तो स्वतः गाऊ शकला असता तर थेट मुकेशसारखंच गायला असता. 'झूम झूम के नाचो आज, गाओ ख़ुशी के गीत..' हे गाणं दिलीपकुमारवर आहे. दिलीपकुमार आणि मुकेश असं कॉंबिनेशन तितकंसं आवडत नाही आपल्याला. मुकेशच्या तोंडची गाणी ऐकायची तर ती फक्त आणि फक्त राजचीच असावी.. असं नाही वाटत? शाळेतले प्रभुणेसर म्हणजे आमचे पी.टी. मास्तर! खेल-कूद, कसरत हा त्यांचा इलाका. संगीत त्यांना किती कळायचं कुणास ठाऊक पण त्यांनी प्रसंगावधान राखून जे गाणं गायचं आर्जव मुकेशजींकडे केलेलं त्याबद्दल मान गये उस्ताद! वर्षातल्या प्रत्येक २७ ऑगस्टला मुकेशजींची पुण्यतिथी असते. त्यानिमित्ताने मुकेशजी त्या दिवशी तरी सगळ्यांनाच आठवतात. त्यांची गाणी पुनःपुन्हा आठवतात. त्यांचं भारदस्त पण प्रेमळ व्यक्तिमत्त्व, त्यांचं निर्व्याज हसणं आठवतं. त्यांच्या आवाजातली ऋजुता, दर्द, कारुण्य आठवतं. रफीसारखी रेंज नव्हतीच, किशोरची विविधता नव्हती, पण आवाज मनाला भिडणारा होता. पारिजातकाच्या सुगंधासारखा.. शाळेतल्या स्टेजवर गाणारे मुकेश याक्षणी नजरेसमोर येतायत.. जणू म्हणतायत की..

*रिश्ता दिल से, दिल के ऐतबार का, जिंदा है हमीं से नाम प्यार का,*
*के मर के भी, किसी को याद आएंगे, किसी के आँसूओं में मुस्कुराएंगे,*
*कहेगा फूल, हर कली से बार बारऽऽ  जीना इसीका नाम हैऽऽ*
*किसी की मुस्कुराहटों पे हो निसार, किसी का दर्द मिल सके तो ले उधार,*
*किसीके वास्ते हो तेरे दिल में प्यारऽऽ जीना इसीका नाम हैऽऽ*

♥

तुमच्यासाठी गाण्यांच्या या 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा, डाऊनलोड करा.

| | |
|---|---|
| १. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (मूळ गाणे) | https://www.youtube.com/watch?v=LN2yMXEXQcE |
| २. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=69pPYkGiEAQ |
| ३. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (कराओके ट्रॅक) | https://www.youtube.com/watch?v=V6VcxhqFxrI |
| ४. संपूर्ण चित्रपट : अनाडी (१९५९) | https://www.youtube.com/watch?v=HujdhyUcfrw |
| ५. मुकेश (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/Ks0k3YQRu90 |
| ६. गीतकार शैलेंद्र (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/LVZIHLAd9h0 |
| ७. मुकेश व शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/fhpH_dnnTjs |
| ८. शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/nit17BZINHo |
| ९. शंकर-जयकिशन (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/ZIfujSgsmBo |
| १०. आठवणीतली गाणी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/qsRt3JPhsPk |
| ११. राजकपूर व नर्गिस (टॉप २०) | https://youtu.be/bmE-2iKo2qc |

♥

## ०३ : जीना इसीका नाम है..

चित्रपट : अनाडी (१९५९)
निर्मिती : एल. बी. फिल्मस्
संकलक/दिग्दर्शक : हृषिकेश मुखर्जी.
गायक : मुकेश
गीतकार : शैलेंद्र
संगीत : शंकर-जयकिशन

किसी की मुस्कुराहटों पे हो निसार,
किसी का दर्द मिल सके तो ले उधार,
किसीके वास्ते हो तेरे दिल में प्यारss
जीना इसीका नाम हैss

माना अपनी जेब से फकीर है,
फिर भी यारो दिल के हम अमीर है - २
मिटे जो प्यार के लिए, वो जिंदगी,
जले बहार के लिए वो जिंदगी,
किसी को हो ना हो हमें तो ऐतबारss
जीना इसीका नाम हैss

रिश्ता दिल से, दिल के ऐतबार का,
जिंदा है हमीं से नाम प्यार का - २
के मर के भी, किसी को याद आएंगे,
किसी के आँसूओं में मुस्कुराएंगे,
कहेगा फूल, हर कली से बार बारss
जीना इसीका नाम हैss

किसी की मुस्कुराहटों पे हो निसार,
किसी का दर्द मिल सके तो ले उधार,
किसीके वास्ते हो तेरे दिल में प्यारss
जीना इसीका नाम हैss

♥

## 04 : Mere Desh Ki Dharti..

## ०४ : मेरे देश की धरती..

'आनंदजीभाई, रोमँटिक गाण्याचं तूर्त राहूद्यात.. पाहू नंतर त्याचं. तुम्हाला माहीत आहे ना? ही स्क्रीप्ट मी बेतलीय ती केवळ आपल्या लालबहाद्दूर शास्त्रीजींच्या सांगण्यावरून. शहीद (१९६५) त्यांनी बघितला काय आणि भारावूनच गेलेत ते. 'जय जवान जय किसान' या त्यांच्या घोषवाक्याचा उदो-उदो होईल असं काहीतरी भरीव कर, असं म्हणालेत ते. हा चित्रपट बनवतोय तो केवळ त्यांच्या शब्दाला कुर्निसात करण्यासाठी. इथला नायकच मुळी किसान आहे. सीधा-साधा. वतनशी इमान राखणारा आणि इथल्या मातीवर प्रेम करणारा. त्याच्या भावाचं पात्र रंगवणारा प्रेम चोप्रा बंडखोर दाखवलाय. शेत-जमिनीचा सौदा करून शहराकडे वळणारा.. कौटुंबिक नाट्याने भरलेलं कथानक आहे हे..' इति मनोजकुमार.
'घोषवाक्याचा उदो-उदो करायचाय ना! मग करू की! त्याचा अर्थ विस्तारून सांगणारं गाणं हवंय ना! करतो. फोक-ट्यूनवर!!'
'गल्लत करताहात आपण. घोषवाक्याची घोकंपट्टी नकोय मला. गाणं असं व्हायला हवं की ते केवळ ऐकतानाही डोळ्यांपुढे त्याचं चित्रिकरण कसं असेल याची फ्रेम न फ्रेम दृग्गोचर व्हावी, व्यक्त व्हावी. पहाटेपासून ते अंधाऱ्या रात्रीपर्यंतचं.. पेरणीपासून डोलणाऱ्या पिकापर्यंतची स्थित्यंतरं दाखविणारं.. देशप्रेम ओतप्रोत भरलेलं. किसान.. आपला किसान दिसायला हवा त्यात. या कथेतला! शब्दाशब्दात हवं इथल्या मातीबद्दलचं प्रेम! वतन-परस्ती! पिक्चराईज कसं करायचं हा नंतरचा प्रश्न आहे. पण इथे शक्ल किसानचीच हवीय मला..' मनोजकुमार आनंदजींचा निरोप घेऊन गेले.

'मनोजकुमार नंतर दोनच दिवसांनी आमच्या म्युझिक-हॉलमध्ये आले..' आनंदजी आठवणी सांगू लागले.. कल्याणजी हार्मोनियम पुढे ओढून दुमडलेल्या डाव्या पायावर उजवा पाय टाकून मांडीवर ठेका देत होते. ही त्यांची नेहमीचीच सवय. ठेका देता देता जमलेल्या मंडळींच्या चेहऱ्यावरचे भाव टिपायला मिळायचे. बाजापेटीवर होते चार कागद. गाण्यांच्या मुखड्याचे..
'मनोजजी, ये मुखडा सुनो तो! इस देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती..'
'अहंऽऽ हे वाटतं थर्ड-पर्सनमध्ये. मला हे गाणं बॅक-ग्राऊन्डला नाही वाजवायचंय. त्या शेतकऱ्याच्या तोंडी आहे ते. मीच तो किरदार करतोय..'
काही वेळाने मुखड्यावर शिक्कामोर्तब झालं..
'मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती ..'
'हाँ.. अब ठीक है.. किस से गवाओगे?..'
'रफीसाब! कैसा रहेगा?..'
'नही! एक काम करते है.. महेंद्र कपूर से गवाते है.. माझ्या उमेदवारीच्या काळापासून मी ओळखतो त्याला.. अपना बंदा है.. अच्छा गाता है.. गाना किसानपर है तो आवाज भी तो बुलंद होनी चाहीए ना?..'
गाण्यावर मेहनत सुरू झाली. मनोजकुमारच्या उपस्थितीत कल्याणजी-आनंदजी गाण्याच्या एकेक अंगावर विचार करू लागले. शेवटी गाण्याचा एक साचेबंद असा आराखडा तयार झाला.

'उपकार' (१९६७)च्या या गाण्याची दास्तान सांगता-सांगता आनंदजी आठवणीत रमले होते. फेमस सिने लॅबमधले क्षण अगदी कालपरवाच घडले असावेत असे डोळ्यासमोर येत आहेत. एकेक म्युझिशियन हॉलमध्ये दाखल होतोय. बऱ्याच दिवसांनंतर वादकांची एवढी मोठी फौज रेकॉर्डिंगसाठी जमत होती. ढोलक, तबला असा वेगवेगळा ग्रुप. ढोल वाजवणारे डझनभर वादक, तर पलीकडे ड्रम-सेट लागलेला. क्लॅरोनेट, सुप्रॅनो, सॅक्सोफोन, ॲकॉर्डियन आणि बासरीवाले आपापलं प्लेसिंग घेताहेत. साईड-रिदम, पर्क्यूशन अशी तालवाद्ये वाजवणारे आठ-दहा वादक रमीचा डाव खेळायला बसतात तसे गोल बसलेले. व्हायोलिनचा पूर्ण ताफा शाळेतल्या मुलांना बसवतात तशा खुर्च्यांच्या रांगांमध्ये व्यवस्थित बसला आहे.. म्युझिक अरेंजर जयकुमार पार्टे हेडमास्तरांच्या शिस्तीत वावरताहेत. किरकोळ देहयष्टीचा पण रिदममधला 'बाप' माणूस बाबला आपल्या सेक्शनला सूचना देतोय.. सगळी तयारी होतेय तरी म्युझिक कंडक्ट करणारे फ्रँक फर्नांड यजमानासारख्या टेन्शनमध्ये दिसताहेत. पायाला भिंगरी लावून हॉलभर फिरताहेत. सगळे स्थिरस्थावर होताच, बाबलाने ऑल-इज-ओकेचा इशारा दिला. आनंदजींनी मनोजकुमारसोबत गप्पा मारणाऱ्या कल्याणजींना खुणावलं. रिहर्सल्सना सुरुवात झाली. बार-टू-बार, बीट-टू-बीट कुणी कुठे काय वाजवायचं याचे नोटेशन-पेपर्स सर्वांच्या पुढ्यात असल्याने आता सगळेच जण कामात एकाग्र झाले. पुढच्याच मिनिटाला रेकॉर्डिस्ट मिनू कात्रकजींचा धीरगंभीर आवाज प्रत्येक वादकाचा साऊन्ड-मिक्सरवर बॅलन्स मागू लागला. मोजून एकशे-पंचवीस वादक एका जबरदस्त मेलोडियस आणि

रिदम ओरिएन्टेड गाण्यासाठी सज्ज झाले. कोरस 'सावधान' पोझिशनमध्ये. महेंद्र कपूर (पापाजी) साँग व्हायोलिनच्या शेजारी गाण्याचा कागद घेऊन उभे. सायलेन्स! रनींग! टेक!! बासरीतून सोलो सूर उमटताहेत. ढोल वाजू लागले. कोरस गाऊ लागला. रेकॉर्डिस्टने तो आवाज मिक्सरवर फेड-इन करत रेकॉर्ड केला. पापाजींनी मुखडा गायला सुरुवात केली. आवाजात जोश आणत.. पुढे किसानचा आवेश प्रत्येक अंतऱ्यातून आणखी तळपत होता. गुलशन बावराचं काव्य अंगावर देशप्रेमाचं रोमांच फुलवत होतं.

*मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती..*
*बैलों के गले में जब घुंगरू, जीवन का राग सुनाते है,*
*ग़म कोसों दूर हो जाता है, ख़ुशियों के कंवल मुस्काते है,*
*ओऽऽ सुनके रहट की आवाजे, यूँ लगे कहीं शहनाई बजे,*
*आतेही मस्त बहारों के, दुल्हन की तरहा हर खेत सजे,*
*मेरे देश की धरती, मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती..*

'ऱ्हिदम' आता बदललाय. टोटल वेस्टर्नाईज्ड! व्हायोलिन्सचं थिरकणं झालं. आता पाळी ॲकॉर्डियनची. पुन्हा ढोल. क्लॅरोनेट, सुप्रॅनो, सॅक्सोफोन.. बापऽऽरे! केवढी ही विविधता! रिहर्सल्स सुरू होत्या. संगीतकार कल्याणजी-आनंदजी आणि सहयोगी बाबलाने गाण्यात एवढी व्हेरिएशन्स दिलेली की बस्स रे बस्स! एकाच गाण्यात एवढ्या वाद्याचे इतके रंग-ढंग म्हणता कोणतरी चुकायचंच चुकायचं. त्याकाळी मल्टी-ट्रॅक्स नसल्याने गाणं पुन्हा रेकॉर्ड करण्यासाठी पुन्हा पहिल्यापासून वाजवून घ्यावं लागे. दमछाक! पण.. या गाण्यात एवढा स्कोप म्हणता वादकही त्याच्या प्रेमात पडले होते. अनेक रीटेक्सनंतरही त्याच्यातला जोश कायम होता. पापाजीही न थकता गात होते.. असलं गाणं करणं म्हणजे संगीतकारांसाठी एक चॅलेंज असतं. उत्सवी गाणं म्हणजे भरपूर वादक. बजेटही अव्वाच्या सव्वा वाढतं. 'कितीही खर्च होऊदेत, गाणं माझ्या मनासारखंच व्हायला हवंय.. ' असा जणू आग्रह होता मनोजजींचा. एखाद्या गाण्यासाठी एवढे तास व्यस्त होतायत म्हणता प्रोड्यूसर मंडळी कुरबूर करतात, हे मी माझ्या स्टुडिओत स्वतः अनुभवलंय. इथे सर्वांसाठी चहा-पान तर होतंच, पण मनोजजींनी सगळ्यांसाठी नाश्ता-भोजनाचीही व्यवस्था स्वतः लक्ष घालून केली होती. स्पॉट-बॉय पासून स्टुडिओ-स्टाफ ते अगदी संगीतकारांपर्यंत ते जे मागतील ते आणून दिलं जात होतं. मग ते पान असो की सिगारेट..! सलग अठ्ठावीस तासांच्या त्या शेड्यूलमध्ये अनेक रीटेक्सनंतरही सर्व वादकांनी आणि पापाजींनीही 'ओके' टेक दिला. गाणं रेकॉर्ड तर झालं. पण तीन अंकी नाटकानंतर आवराआवरीचा चौथा अंक असतो ना, तसा प्रकार झाला. मनोजजींच्या सूचनेनुसार आनंदजींनी गाण्यात नंतर बऱ्याच गोष्टी ॲड केल्या. साऊन्ड-इफेक्टस्चा वापर करण्यात आला. गाणं 'ओके' झालं. स्टुडिओची कवाडं बाहेर जाण्यासाठी उघडली तर काय! चित्रपट संगीताच्या इतिहासात जे गाणं पुढे सुवर्णाक्षरात कोरलं जाणार होतं त्याचा आनंदोत्सव निसर्गानेही तुडुंब साजरा केला होता. रात्री इतका पाऊस पडलेला की ताडदेव परिसर मानेइतक्या उंच पाण्याने भरला होता. इतर ठिकाणीही जोरदार बरसलेल्या पावसाने मुंबईतले सर्व व्यवहार ठप्प केले होते. मनोजकुमार, संगीतकार आणि सर्व वादक नुकत्याच निरभ्र झालेल्या आभाळाकडे पाहत होते. अचानक लक्ष गेलं. 'उषा किरण' या त्या काळातल्या एकमेव गगनचुंबी इमारतीजवळच्या आकाशात एक मोठ्ठं इंद्रधनुष्य दिसत होतं. गाण्याच्या उत्तुंग यशाची जणू आगाऊ पावती मिळाली होती तर.

'उपकार' (१९६७) रिलीज झाला. दिलीपकुमारची भ्रष्ट नक्कल म्हणून हिणवला गेलेला मनोजकुमार निर्माता-दिग्दर्शक म्हणून केलेल्या या पहिल्याच कलाकृतीने कामयाब झाला. पिक्चर सुपर-हिट! मनोजजी तुस्सी ग्रेट हो! तुम्हाला आठवत असेल, हे गाणं तर सर्वतोमुखी झालं होतं. त्याच्या चालींनं, काव्यानं आणि 'ऱ्हिदम'नं वेड लावलं होतं. वस्त्या-वस्त्यांमधून चाळी-चाळीत बारसं असो की साखरपुडा, गणपती उत्सव असो की सत्यनारायणाची महापूजा, देशभक्तीपर गीत असुनही लाऊड-स्पीकरवाले हे गाणं लावायचेच. त्या वर्षी फिल्मफेअरचं यश पुरेपूर पदरात पडणार याची खात्री होती, पण 'उपकार' समोर 'मिलन', 'राम और श्याम', 'शागीर्द', 'दस लाख', 'ज्वेल थीफ', 'हमराज', 'आखरी खत' असलेल्या संगीतमय चित्रपटाशी मुकाबला! गीतलेखनासाठी गुलशन बावरा गौरवला गेला. पापाजी स्टेजवर ट्रॉफी घ्यायला चढले खरे पण विजेतं गाणं ठरलं होतं 'नीले गगन के तले..'! संगीताचं पारितोषिक कल्याणजी-आनंदजींचे शागीर्द लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांना 'मिलन'साठी मिळालं. 'उपकार'ला उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, सहनायक (प्राण) अशा बक्षिसांनी गौरविण्यात आलं. मनोजकुमारबद्दल, त्यांच्या अभिनयाबद्दल (!) बरंच काही बऱ्याचदा छापून येतं. फराह खानच्या 'ओम शांती ओम' मधल्या उडवलेल्या रेवडीबद्दल ते बरेच नाराज झाले होते हे तुम्हाला ठाऊकच आहे. मनोजकुमार ही व्यक्ती कशीही असो! त्यांचं नाव सूर्य आणि चंद्र गगनात असेपर्यंत लक्षात राहणारेय. कसं?.. त्यांच्या सिनेमातलं 'मेरे देश की धरती...' काळाच्या कसोटीवर उतरलेलं अप्रतिम देशभक्तीगीत म्हणून युगे न युगे ऐकलं जाईल.

ते किती नशिबवान आहेत पहा? 'शिरडी के साईबाबा' हा त्यांनी निर्मिलेला सिनेमा हे त्यांच्या आयुष्यातलं आणखी एक उत्तुंग कार्य. शिरडी साईबाबांची महती देशाच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यात त्यांचं योगदान आहे असं साईभक्त मानतात. साईमंदिराला समांतर असलेल्या बाजुच्याच रस्त्याला त्यांच्या हयातीतच त्यांचं नाव दिलं गेलंय. त्यांच्या 'पुरब और पश्चिम' सिनेमात सिच्युएशन साँग म्हणून येणारं 'ओम जय जगदीश हरे..' हे गाणं तर साईमंदिरात सकाळी काकड आरतीआधी सन्मानानं वाजवलं जातं. खरंच ग्रेट! असो! 'मेरे देश की धरती...' हे गाणं रेकॉर्ड होऊन आज चाळीस वर्षांहूनही जास्त काळ लोटला आहे पण महेंद्र कपूरजींनी गायलेलं हे गाणं देशभक्तिगीतांच्या यादीत अव्वल स्थान राखून आहे.

पापाजींच्या मुलाखतीत त्यांनी मला अभिमानानं सांगितलं होतं... 'मी माझ्या परदेशातल्या कार्यक्रमांमध्ये हे गाणं आवर्जून घेत असतो.. प्रेक्षकांचा महासागर 'है प्रीत जहाँ की रीत सदा..', 'दुल्हन चली..', 'ओम जय जगदीश हरे..', या गाण्यानंतर सादर होणाऱ्या 'मेरे देश की धरती..'ला उठून मानवंदना देतो. हातात बीअर, रमचे ग्लास असतात खरे, पण आपल्या वतनच्या आठवणीनं त्यांच्या डोळ्यात गोळा झालेली आसवं दुरूनही चमकताना दिसतात.. त्यांच्या या राष्ट्रप्रेमाचा तिरंगा दुसऱ्या कोणत्याही रंगानं बरबटलेला नसतो. उंचावलेल्या त्यांच्या हातात जणू अखंड हिन्दुस्थान सामावलाय अशी अनुभूती मिळते मला..'

*जब चलते है इस धरती पे हल, ममता अंगडाईया लेती है,*
*क्यों ना पूजे इस माटी को, जो जीवन का सुख देती है,*
*इस धरती पे जिसने जनम लिया, उसनेही पाया प्यार तेरा,*
*यहाँ अपना पराया कोई नही, है सब पे माँ उपकार तेराऽऽ*
*मेरे देश की धरती, मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती..*

♥

आता या सर्वांगसुंदर गाण्याच्या निर्मितीची कथा वाचून ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना?
ही घ्या त्या गाण्याची 'ऑडिओ आणि व्हिडिओ, कराओके' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

| | | |
|---|---|---|
| १. | मेरे देश की धरती.. (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=jwlyMhykshM |
| २. | मेरे देश की धरती.. (व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=DyrJrCx1HcU |
| ३. | मेरे देश की धरती.. (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=m7R8Xsg5MlI |
| ४. | संपूर्ण चित्रपटः उपकार (१९६७) | https://www.youtube.com/watch?v=7bCjMk38IA |

♥

तुमच्यासाठी आणखी काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका आणि डाऊनलोड करा.

| | |
|---|---|
| १. महेंद्र कपूर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/-_eVjUb4dUI |
| २. कल्याणजी-आनंदजी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/BATjXGCXYHs |

♥

## ०४ : मेरे देश की धरती..

चित्रपट : उपकार (१९६७)
निर्माता/दिग्दर्शक : मनोज कुमार
गायक : महेंद्र कपूर
गीतकार : गुलशन बावरा
संगीत : कल्याणजी-आनंदजी

मेरे देश की धरतीss मेरे देश की धरती,
सोना उगले, उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती..
मेरे देश की धरती.. मेरे देश की धरती.. ।। धृ ।।

बैलों के गले में जब घुंगरू, जीवन का राग सुनाते है,
ग़म कोसों दूर हो जाता है, ख़ुशियों के कंवल मुस्काते है,
ओss सुनके रहट की आवाजे, यूँ लगे कहीं शहनाई बजे,
आतेही मस्त बहारों के, दुल्हन की तरहा हर खेत सजे,
मेरे देश की धरती, मेरे देश की धरती सोना उगले,
उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती.. ।। १ ।।

जब चलते है इस धरती पे हल, ममता अंगडाईया लेती है,
क्यों ना पूजे इस माटी को, जो जीवन का सुख देती है,
इस धरती पे जिसने जनम लियाss- २
उसनेही पाया प्यार तेरा - २
यहाँ अपना पराया कोई नहाss ,
यहाँ अपना पराया कोई नही, है सब पे माँ उपकार तेराSS
मेरे देश की धरती, मेरे देश की धरती सोना उगले,
उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती.. ।। २ ।।

ये बाग है गौतम-नानक का, खिलते है अमन के फूल यहाँ,
गांधी, सुभाषss गांधी, सुभाष, टैगोर, तिलक,
ऐसे है चमन के फूल यहाँ – २,
रंग हरा, हरिसिंग नलवे से, रंग लाल है लालबहादूर से,
रंग बना बसंती भगतसिंग – २, रंग अमन का वीर जवाहर से - २
मेरे देश की धरती, मेरे देश की धरती सोना उगले,
उगले हिरे-मोती, मेरे देश की धरती.. ।। ३ ।।

♥

## 05 : Aaj Phir Jeene Ki Tamanna Hai..

## ०५ : आज फिर जीने की तमन्ना है..

स्वर्ग गवसल्याचा आनंद झालाय तिला. मनाचा दुबळेपणा पार झटकलाय तिने. आयुष्याला यकायक नवे पंख फुटल्यागत वागतेय ती. ध्येय गाठण्याची ऊर्मी तिच्या नसानसात सळसळतेय. एखादी तरी स्मितरेषा तिच्या चेहऱ्यावर दिसावी म्हणून धडपडणारा तो, आज तिला धोऽधो हसताना पाहून सुखावलाय, आश्चर्यमुग्धही झालाय. तिच्या चेहऱ्यावरचे अल्लड, बालिश भाव पाहून बस्स! तो नुसता न्याहाळतोय.. अनिमिष नेत्रांनी.. भारावल्यागत..

'कुछ बोलोगे भी! कैसे गाईड हो?'

'मेरी समझ में नही आया! कल तक आप लगती थी.. चालीस साल की औरत, जो जिंदगी की हर ख़ुशी, हर उमंग, हर उम्मीद, बीच कहीं रास्ते में ख़ो आयी है.. और आज लगती है सोलह साल की बच्ची. भोली, नादान, बचपन की शरारत से भरपूर..' ..

'जानते हो क्यों?'

*ओऽऽ काँटों से ख़िंच के ये आँचल, तोड के बंधन बाँधी पायल,*
*कोई ना रोको दिक की उडान को, दिल वो चलाऽ आऽऽ*
*आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ*

वहिदा रहमानला पहिल्यांदा पाहिलं गुरुदत्तच्या 'सीआईडी'मध्ये, खलप्रवृत्तीच्या भूमिकेत. पदार्पण होतं खरं, पण शकिलापेक्षा लक्षात राहिली ती वहिदाच. चित्रपटात गाण्यांचा सुकाळ होता. सगळी गाणी चांगलीच आठवताहेत पण का कोण जाणे चित्रपट पाहताना वहिदाचं 'कहीं पे निगाहें कहीं पे निशाना'वरचं थिरकणं जास्त भावलं. वहिदाचे 'प्यासा', 'कागज के फूल', 'साहब, बिवी और गुलाम', 'बीस साल बाद', 'कोहरा' कैक चित्रपट आमच्याही आवडीचे. पण 'गाईड' पाहिला तो लाडक्या देव आनंदसाठी आणि वहिदासाठी. तिच्या कारकीर्दीतला सर्वोत्कृष्ट म्हणून..

नायिका रोझी! देवदासी आणि पेशानं नायकीण असलेली आई, आपली ही जवान पोर वाममार्गाला लागू नये म्हणून वयाने मोठ्या परंतु श्रीमंत अशा शेठच्या दावणीला बांधते. कुठून ही बला गळ्यात पडलीय अशा वागण्यानं तो तिला अक्षरशः कःपदार्थ समजतो. नाच-गाणं या कला फक्त कोठ्यावरची चीज असते अशी निंदानालस्ती करतो. तिच्यातल्या कलाकाराच्या मुसक्या बांधतो. लग्नानंतर बाहेर कुठेतरी हनिमूनला जाण्याऐवजी कुठल्याश्या लेण्यांचं संशोधन कराव म्हणून 'ते' गाव गाठतो. सोबतचं हे लोढणं वळचणीत टाकावं तसं लॉजच्या खोलीत कोंबून आपल्या कामात मग्न होतो. बिच्चारी रोझी! आपला नाकर्तेपणाचा कळस असलेला पती आणि आपल्या कलासक्त मनाशी व्दंव्द करीत ती कसेबसे दिवस कंठत असते. तिचं व्हेंचर कामयाब व्हावं आणि संदर्भांचे टेकू मिळावेत म्हणून की काय राजू गाईड (देव आनंद) तिच्या दिमतीला येतो. राजूशी परिचय होतो. एकदा ती आपल्या निरर्थक आयुष्याला कंटाळून विषाचा प्याला ओठाला लावते. राजू तिचं हे आत्मघातकी कृत्य आपुलकीनं निस्तरतो. बाई, बाटलीची नशा आणि तथाकथित संशोधनाच्याच कैफातच आकंठ बुडालेल्या आपल्या पतीमुळे आपण पूर्णतः दुर्लक्षिलो जातोय याची बोचरी जाणीव आणि शल्य एक दिवस उफाळून येतं. बगावत करतं. षंढ पती आपल्याकडे पाठ फिरवून आपल्याच संशोधनाला कुरवाळतोय हे लक्षात येताच ती आपला मार्ग स्वीकारते. राजूमधला हळवेपणा, प्रामाणिकपणा तिला भावतो. ती त्याच्याकडे आकर्षित होते. राजूला आपलंसं करते. आता तिची कायनातच बदलून जाते. कलासक्त मनाची कारंजी आता थुईथई नाचू लागतात. बंड केलेलं मन आपलं इप्सित साध्य करण्याच्या ओढीनं झपाटतं. घुसमटलेल्या मनाची कवाडं क्षणात उघडून बांध फुटतो. धाव घेतं आजवर हातातून निसटून जाऊ पाहणाऱ्या आपल्या मंजीलकडे...

*अपनेही बस में नहीं मैं, दिल है कहीं, तो हूँ कहीं मैं,*
*जाने क्या पा के मेरी ज़िंदगी ने. हँसकर कहाँ,*
*आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ*

किती नेमके शब्द! उगीच फाफटपसारा नाही. 'शायर' शैलेंद्रने मुक्त छंदात अनेक काव्यं केली असतील पण इथला 'गीतकार' शैलेंद्र मात्र काहीसा वेगळा वाटतोय खरा! आर. के. कॅम्प मध्ये शंकर-जयकिशनजींसाठी गाणी लिहिणारा शैलेंद्र जसा

वेगळा, तसा तो इतरांकडेही नेहमी वेगळाच भासला. चित्रपटातली गाणी ही निव्वळ गॅप भरणारी असतात का? नाही! ती चक्क संवादांचं काम करतात, म्हणूनच की काय शैलेंद्रचं प्रत्येक गाणं चित्रपटात मुद्दाम घुसडल्यासारखं वाटत नाही. ठिगळ जोडलंय असं वाटत नाही. रेखीव, सहज, साधी-सरळ अशी भाषा आणि ते कसं पिक्चराईज होणार याचं भान या गाण्यातही पूर्णपणे जाणवतं. एक सळसळता प्रवाह तिच्या मनात दुथडी भरून वाहतोय. ती आज आजाद झाली आहे, ही उमंग, उम्मीद शब्दा-शब्दागणिक जाणवतेय. काव्य वाचतानाही काल्पनिक दृष्य डोळयांसमोर तरळतंय पहा..

*मै हूँ गुबार, या तुफाँ हूँ, कोई बताये मैं कहाँ हूँ, डर है सफर में कहीं खो न जाऊँ, रस्ता नया,*
*आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ*

सचिनदांबद्दल काय सांगावं? तोळामासा तब्येतीच्या या बंगाली संगीतकाराने हिंदी चित्रपटसृष्टीवर काय ताकदीची छाप सोडलीय हे सांगायला कोणत्याही संगीत-समीक्षकाची गरज नाहीय. १९४६ साली 'आठ दिन' या चित्रपटाने कारकीर्द सुरू करणाऱ्या सचिनदांनी 'दो भाई','प्यासा','कागज के फूल','सुजाता','बंदिनी' ते 'मुनिमजी', 'नौ दो ग्यारह','पेईंग गेस्ट' अशा चढत्या क्रमाने एकाहून एक सरस गाणी देत १९६६ साली 'गाईड'च्या निमित्ताने सुरेल गाण्यांचा नजराणा आपल्या हाती सोपविला. नौशादजींनी संगीतबध्द केलेल्या 'रतन' (१९४४)पासून हिंदी चित्रपट संगीतात सुवर्णयुग आलं असं आपण मानतो ना! आता एक काम करूया. 'रतन' ते 'गाईड'पर्यंतची सर्व हिट गाणी एकेक करीत आठवूया. या काळातल्या सर्वच संगीतकारांनी उभारलेली एकेक उत्तुंग संगीत-शिल्पे पाहता थक्क व्हायला होतं. गाण्यांच्या चाली, म्युझिकपीसेस, संगीत-संयोजन अभ्यासलं तर पटकन लक्षात येते ती त्यांची स्टाईल. आता या गाण्याची स्वरलिपी पहा. अरेच्चा! अंतरा कुठाय? गाणं बनण्याच्या प्रक्रियेत मुखड्यानंतर म्युझिक-पीस वाजतो आणि त्यानंतर मुखड्यातला गर्भीत आशय अधिक सविस्तरपणे सांगणारा वेगळ्या चालीतला अंतरा असतो, होय की नाही? इथे सचिनदांनी या परंपरेला छेद दिलाय. शैलेंद्रला मुखड्याच्याच मीटरवर अंतरे लिहायला सांगितले, आणि सचिनदांनी ते मुखड्याच्याच चालीत चपखलपणे बसवले. दुसरी गंमत म्हणजे 'काँटों से खिंच के ये आँचल..' ही गाण्याची सुरुवातीची ओळ (साईन-लाईन) अंतऱ्यानंतर वगैरे कुठेच रिपीट केलेली नाही. 'आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ' ही क्रॉस-लाईन मात्र प्रत्येक कडव्याशेवटी मौजूद आहे, गाण्याचा प्रवाह अबाधित रहायला. संगीतातला हा प्रकार कुठला? अशा आविष्काराला काय म्हणतात कुणास ठाऊक! पण सचिनदांनी या गाण्यात जे केलंय ते लाजवाब आहे. (पुढे देव आनंद अभिनीत 'प्रेम पुजारी'साठी केलेल्या 'फूलो के रंग से दिल की कलम से..' (गायक : किशोरकुमार) या गाण्यातही अशीच ट्रीटमेंट आढळते.)

'गाईड'ची गाणी ऐकताना एक गोष्ट चट्कन लक्षात येते ती ही की वहिदा रहमान या नायिकेसाठी दिलेल्या सर्व गाण्यांमध्ये लतादीदीचाच आवाज आग्रहपूर्वक वापरला आहे. देव आनंदच्या सर्व सोलोजसाठी महंमद रफी वापरलाय. गाता रहे मेरा दिल.. या लताबरोबरच्या युगलगीतासाठी मात्र त्यांनी किशोरला पाचारण केलंय. मस्ती, जोश आणि चैतन्यमूर्ती देवसाठी 'हॅपी-साँग' गायला किशोरच हवा की नाही? गाईडच्या यशात सचिनदांच्या लाजवाब संगीताचा वाटा होता हे जितकं खरं. तितकाच दिग्दर्शक विजय आनंद, नायक देव आनंद, नायिका वहिदा आणि सहकलाकारांचं योगदान, टीमवर्क कौतुकास्पद होतं. रविवार, दि. ४ जून १९६७ रोजी झालेल्या फिल्मफेअर सोहळ्यात 'गाईड'ला उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, नायक, नायिका, कथानक अशा पाच ट्रॉफीज मिळाल्या, पण उत्कृष्ट संगीताच्या पुरस्कारात मात्र 'सूरज'ने (संगीतकार शंकर-जयकिशन) बाजी मारली. लतादीदींचं 'काँटों से खिंच के ये आँचल..' उत्कृष्ट गायनासाठी नामांकन यादीत येऊनही रफीसाहेबांच्या 'बहारो फूल बरसाओ..' गौरविलं गेलं.. होता है! होता है!

सचिनदांनी गाईडच्या या गाण्यात केलेली करामत फिल्मफेअरने गौरवली नसली तरी आपण रसिकांनी गौरविली यातही सन्मान आहेच की! 'काँटों से खिंच के ये आँचल..' या मुखड्याच्या चालीतच शेवटचं कडवंही कसं बेतलंय पहा..

*कल के अंधेरों से निकल के, देखा है आँखे मलते मलते,*
*फूल ही फूल जिंदगी बहार है, तय कर लिया..*
*आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ*
*आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैऽऽ*

♥

## ०५ : आज फिर जीने की तमन्ना है..

चित्रपट : गाईड (१९६५)
दिग्दर्शक : विजय आनंद
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : शैलेंद्र
संगीतकार : सचिनदेव बर्मन

ओssकाँटों से खिंच के ये आँचल,
तोड के बंधन बाँधी पायल,
ओss कोई ना रोको दिक की उडान को,
दिल वो चलाऽ आहा आsss
आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैss - २

अपनेही बसमें नहीं मै, दिल है कहीं, तो हूँ कहीं मैं - २
जाने क्या पा के मेरी जिंदगी ने. हँसकर कहाँ,
आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैss - २

मै हूँ गुबार, या तुफाँ हूँ, कोई बताये मैं कहाँ हूँ - २
डर है सफर में कहीं खो न जाऊँ, रस्ता नया,
आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैss - २

कल के अंधेरों से निकल के, देखा है आँखे मलते मलते - २
फूल ही फूल जिंदगी बहार है, तय कर लिया..
आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैss
आज फिर जीने की तमन्ना है, आज फिर मरनेका इरादा हैss

♥

गाण्याशी संबंधित आणि तुमच्यासाठी काही खास'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

| | |
|---|---|
| १. आज फिर जीने की.. (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=Q2xXclJyfoc |
| २. आज फिर जीने की.. (व्हिडिओ) | https://youtu.be/_cWPiclr5eo |
| ३. आज फिर जीने की.. (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=JVnlaxPhxcU |
| ४. संपूर्ण चित्रपटः गाईड (१९६५) | https://youtu.be/kfA9jjljJu0 |
| ५. लतादीदी व एस. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्) | https://youtu.be/vllmp7tY4BM |
| ६. गीतकार शैलेंद्र (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/LVZIHLAd9h0 |
| ७. एस. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/q21zbX-NHy0 |
| ८. एस. डी. बर्मन (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/Uw7NXIzYCn0 |

♥

## 06 : Yari Hai Imaan Mera..

## ०६ : यारी है ईमान मेरा..

शेरखान! त्या इलाक्यातला अनभिषिक्त शहेनशाह. एकसूत्री अंमल. केवळ नव्यानेच आलेल्या कुणा इन्स्पेक्टरने बोलावलंय म्हणून तो त्या पोलिस-स्टेशनच्या पायऱ्या चढतोय. नसानसात हुकूमतीची रग. चेहऱ्यावर बेफिकिरी तर चालणं एखाद्या वनराजालाही लाजवणारं..

'अस्सलाम वालेकूम, इनिस्पेक्टर शाब..' तो तहज़ीब से पेश होतो. इन्स्पेक्टर मात्र शांतपणे टेबलाला रेलून चार्ज-शीटमधल्या त्याच्या कारनाम्यावर नजर फिरवतायत. शेरखान आपलं 'मी'पण सिध्द करता-करता सहज खुर्चीवर बसायला जाणार, इतक्यात इन्स्पेक्टर धाडकन् त्या खुर्चीवर लाथ मारून ती उडवून देत फुत्कारतो..
'जब तक बैठने को ना कहा जाए..शराफत से खडे रहो. ये पुलीस-स्टेशन है.. तुम्हारे बाप का घर नही!..'

त्याच्या अदाकारीने सर्वच थक्क होतात. प्राणसकट संपूर्ण युनिट थरारून जातं. प्रकाश मेहरांना थोडंसं बाजुला नेत प्राण पुटपुटतो.. 'कमाल है मेहरासाब, अलग चीज है ये!.. खूप दिवस काढलेत इंडस्ट्रीत मी...देखना, एक दिन ये बहोत बडा स्टार बनेगा.. ग्रेटेस्ट स्टार!

*ग़र ख़ुदा मुझ से कहे, कुछ माँग ऐ बंदे मेरे..*
*मैं ये माँगूऽऽ, मैं ये माँगूऽऽ, महफ़िलों के दौर यूँ चलते रहेऽऽ*
*हम-प्याला हो, हम-नवाला हो, हम-सफ़र, हम-राज़ हो,*
*ता-क़यामत, जो चिरागों की तरहा जलते रहे..*
*यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..*
*प्यार हो बंदो से ये, तब से बढी है बंदगीऽऽ*
*यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..*

प्रकाश मेहरांच्या 'जंजीर' (१९७३) मधली ही तुफान लोकप्रिय कव्वाली. प्राणवर चित्रित झालेली. आपल्या इलाक्यात दहशत पसरवून वर गैरकानुनी धंदे करण्यात धन्यता मानणारा शेरखान. हळुहळू इन्स्पेक्टर विजयची कर्तव्यकठोर निष्ठा पाहून तो निवळतो. सामान्य जीवन जगू लागतो. त्याच्यातलं हे परिवर्तन पाहून विजयचा त्याच्याशी दोस्ताना होतो..

*साज-ए-दिल छेडो जहाँ में -२, प्यार की गुँजे सदा,*
*जिन दिलों में प्यार है, उनसे बहारे हो फिदा,*
*प्यार लेके नूर आया -२, प्यार लेके सादगीऽऽ*
*यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..*

कविवर्य डॉ. हरिवंशरायजी बच्चनजींना मुलाखतीत कुणीतरी विचारलेलं.. तुमची आजवरची सर्वोत्कृष्ट कविता कोणती?.. 'अमिताभ'! कविवर्यांनी ताबडतोब उत्तर दिलं होतं. आज सुपरस्टारपद यथेच्छ उपभोगणाऱ्या अमिताभचं जेव्हा 'सात हिन्दुस्तानी' मधून पदार्पण झालं होतं तेव्हा कुणीच दखल घेतली नव्हती त्याची. 'रेशमा और शेरा'त अमिताभ होता तो केवळ सुनील दत्तने झळकवला होता म्हणून. 'आनंद'मधल्या बाबूमोशायची लोकांशी फक्त पहचान झाली. पण 'आनंद'चं यश राजेश खन्नापुरतंच मर्यादित होतं. तोच त्यांचं आकर्षण होतं आणि तो अशा रोलमध्ये होता की, सहानुभूतीही त्यालाच मिळाली होती. अमिताभचं अस्तित्व हे असं केवळ चित्रपट समीक्षक, चोखंदळ निर्मातिमंडळी आणि काही मोजक्या प्रेक्षकांच्या कक्षेबाहेर विस्तारलेलंच नव्हतं. पाप्याचं पितर म्हणावं अशी शरीरयष्टी, डावखुरा, चेहरा तसा निस्तेजच. हाडाची काडं आणि... उंची ताडमाड. जानीच्या भाषेत सांगायचं तर '..वोही ना जिसकी टांगे गर्दन से शुरू होती है..' कुणी लंबू, काटकुळा असा एक ॲक्टर आलाय बुवा! एवढीच दखल घेतली होती संबंधितांनी. १९७१ ते १९७२च्या मे महिन्यापर्यंतचा काळ अमितने तसा टेन्शनमध्येच काढलेला. 'पॅक-अप' करायच्या विचारात होता तो. परवाना, बन्सी बिरजू, एक नजर, संजोग, रास्ते का पत्थर, गहरी चाल, बंधे हाथ अशा चित्रपटांचं अपयश त्याला

तीळ-तीळ पोखरत होतं. भाईजान म्हणून लाडकं नाव धारण करणाऱ्या महेमूदने त्याला आपल्या 'बॉम्बे टू गोवा'मध्ये घेतलं. सबकुछ मेहमूद असलेल्या या पिक्चरमधली वलयांकित नावं कोणती? तर व्हीलन शत्रुघ्न सिन्हा, खास किरदारमधला किशोरकुमार वगैरे वगैरे! 'बॉम्बे टू गोवा' बॉक्स ऑफिसवर धो धो चालला असंही नाही. पण अमिताभची लोकांशी जानपहेचान झाली हेही नसे थोडके! पुढे राजश्री पिक्चर्सचा 'सौदागर' मिळाल्याने आशा पल्लवीत झाल्या होत्या. सहनायिका म्हणून अभिनेत्री नूतन असणार होती. ताराचंद बडजात्या निर्मित 'सौदागर'! दिग्दर्शक सुधेंदू रॉय. गीत-संगीत रवीन्द्र जैन! काम आस्ते कदम सुरु होतं. गाणी मस्तच होती. अमिताभ सुखावला.. पण थोड्या काळानंतर पडदा पाहू शकलेला 'सौदागर' आपटला.. 'जंजीर'ची कथा मेहराजींनी ऐकली ती जावेदजींकडून, पण ती त्याने धर्मेंद्रला आधीच विकली होती. मेहराजी धर्मेंद्रकडे गेले. 'कथा मला आवडलीय.. आपण यावरचा पिक्चर भागीत काढुया का?' पण खास इन्टरेस्ट नव्हता त्याला. प्रकाश मेहराजींनी रक्कम मोजून आधी 'जंजीर'चं ते कथानक मिळवलं. सी.आय.डी.मध्ये इन्स्पेक्टरच्या भूमिकेतला देव आनंद लोकांना खूपच आवडला होता, म्हणून मेहरा प्रथम त्याच्याशी बोलले. पण त्याला हे कथानक 'सो सो', मिळमिळीत वाटलं. हीरोला गाणीही नाहीत? छ्याऽ! पूर्वी पेशानं इन्स्पेक्टर असलेल्या राजकुमारला विचारुन पहावं म्हणून ते त्याच्याकडे गेले. त्याकाळी जानीचा खूपच दबदबा होता. बुजुर्ग सांगतात की जानीने प्रकाश मेहरा या नवख्या उमेदवाराला नाउमेदच करुन टाकलं. 'जानीऽऽपाच फूटसे छोटे कद के आदमी के साथ हम काम नहीं करते.. और ये बालों में लगाए हुए तेल की जो बदबू आ रही है.. उस से हमारा दम घूटा जा रहा है।' मेहराजी तो अपमान निमुटपणे गिळत तिथून चालते झाले. सुनील दत्त, धर्मेंद्र, जितेंद्र, शत्रुघ्न.. लोक काय काय सुचवत होते. प्राणच्या मुलानं (रॉनी) नव्यानेच आलेल्या अमिताभचं नाव सुचवलं. पाहिजे तर आत्ता लागलेला 'बॉम्बे टू गोवा' बघा म्हणाला. जावेदजींनी त्याला दुजोरा दिला. खरंच आणखी किती परवड होणार आहे आपली? दोघं 'बॉम्बे टू गोवा' बघायला गेले. त्याचं रुपडं पाहून मनातल्या मनात कपाळावर हात मारुन घेतला मेहराजींनी. या काटकुळ्या माणसात इन्स्पेक्टरची जरब, आवेश औषधालाही सापडणार नाही याची खात्रीच पटली. इतक्यात तो सीन आला. त्या सीनमध्ये अमिताभ च्युईंगम चघळता चघळता शत्रुघ्नशी मारामारी करतो. त्याच्या चेहऱ्यावरच्या त्याक्षणी असलेला भाव, आवेश तसेच डाव्या हाताचा टिपिकल ठोसा! त्याक्षणी बाजुला बसलेल्या जावेदनं मेहराजींना कोपरानं ढोसलं. मेहराजींना त्याच्या डोळ्यात त्यांना हवा असलेला अंगार आणि फाईटस् करतानाचा जोश-जुनून दिसला. झालं! मेहरांना आपला हीरो सापडला. त्या एका सीनने या नव्या नटाचं आयुष्यच बदलून जाणार आहे, हे फक्त नियतीलाच ठाऊक होतं... सलीम-जावेद या जोडगोळीनं पटकथा आकाराला आणली. 'अँग्री यंग मॅन' असं कॅरॅक्टर! 'त्या' चित्रपटापर्यंतचा हीरो, हा एकतर डॉक्टर, वकील, कवि, इंजिनीयर किंवा इन्स्पेक्टरही असायचा, पण त्याच्या तोंडी सोलो गाणी असायची. तो झाडांमधुन पळत-पळत युगलगीतही गायचा. इथला हीरो पूर्णतः वेगळा होता. संताप, खुद्दारी आणि ध्येय- ध्येय-उद्दिष्ट साधण्यासाठी ईरेला पेटलेला धगधगता अंगार - इन्स्पेक्टर विजय! 'जंजीर'चं शूट सुरु झालं ते या पोलिस ठाण्याच्या सीननेच. चित्रपटाची प्रत्येक फ्रेम इन्स्पेक्टर विजय हे पात्र केंद्रबिंदूवर ठेऊनच आकाराला आली..

*जान भी जाए अगर, यारी में यारो ग़म नही,*
*अपने होते यार हो, ग़मगीन मतलब हम नही,*
*हम जहाँ है उस जगहा, झूमेगी नाचेगी ख़ुशीऽऽ*
*यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..*

नकली दवा बनवण्याच्या प्रकरणानं सिनेमा सुरु होतो. त्या टोळीचा हस्तक असलेला एकजण, स्वतःची मुलगी नकली औषधामुळे बळी पडताच चांगला मार्ग स्वीकारायचं ठरवतो.. पण टोळीचा म्होरक्या अजित, त्याची त्याच्या पत्नीसह हत्या करतो. लपालपी खेळणारं त्याचं पोरगं कपाटाच्या किलकिल्या दारातून ती भीषण हत्या पाहतो. इन्स्पेक्टर सत्येन कप्पू त्या मुलाचं पालन करतो पण तो मोठा होतो तो धगधगता अंगार मनात जोपासूनच. शिकून सवरुन तो इन्स्पेक्टर होतो. शेरखानशी त्याची टक्कर होते. शेरखानला त्याचा वजूद उमगताच मग मात्र त्यांचा दोस्ताना होतो. इथे त्याला हिरॉईन आहे चक्कू-छुरीया तेज करानेवाली - जया भादुरी. तेजा झालेल्या अजितने चित्रपटात रंग भरलेयत. त्याच्या व्हीलनी कारवायांनी विजय पुरता बेजार झाला आहे. शाळकरी मुलांना बसखाली चिरडण्याचं अमानुष कृत्य जेव्हा त्याचे हस्तक करतात तेव्हा तो पेटून उठतो. शेरखान त्याला सबुरीने घ्यायला सांगतो. आपल्या या दोस्ताला वाढदिवसाची दावत देतो आणि गाण्यातून सांगतो...

*गुल-ए-गुलजार,क्यूँ बेजार नजर आता है,*
*चश्म-ए-बदका शिकार यार नजर आता है,*
*छुपा ना हमसे, जरा हाल-ए-दिल सुना दे तू,*

*तेरी हँसी की कीमत क्या है ये बता दे तू -२*
*कहे तो आसमाँ के चाँद तारे ले आऊँ,*
*हँसी जवान और दिलकश नजारें ले आऊँ,*
*कुर्बानSS तेरा ममनून हूँ,*
*तेरा ममनून हूँ, तूने निभाया याराना,*
*तेरी हँसी है आज सब से बडा नजराना -२*
*यार के हँसते हीSS यार के हँसते ही,*
*महफिल पे जवानी आ गयी, आ गयी*
*यारी हैSS यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..*

गाणं प्राणवर चित्रित झालंय. उपकार (१९६७) त्याचा लंगडा मलंगचाचा गाजल्यानंतर इथला दिलेर पठाण लोकांच्या काळजावर कोरला गेला. मन्नाडेंचा आवाज गुलशन बावराच्या काव्याला न्याय देतो. संगीत-संयोजनात पठाणी रंग यावेत म्हणून अफगाणी 'रबाब' नावाचं तंतूवाद्य वाजवलंय. (गाण्यामध्ये जे वादक अवतीभोवती दिसतात त्यात रबाब हे वाद्य वाजवणाऱ्या आमच्या फारुकलाच बसवलंय.) मेंडोलीन, स्ट्रोक्स आणि आठेक ढोलकच्या ठेक्याच्या साथीनं गाणं अलंकृत केलंय संगीतकार कल्याणजी-आनंदजींनी. अमीन सयानींच्या बिनाका गीत मालामध्ये हे गाणं वर्षभर गाजलं होतंच. बिनाकाच्या सालाना जलसामध्ये १९७३ सालातलं ते सर्वोत्कृष्ट गाणं ठरलं, हे विशेष. गाणं पडद्यावर प्राणने सजवलंय खरं, पण या सिनेमाने एक महानायक जन्माला घातला जो पुढे अनेक वर्षे आमच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला आहे. ती जागा दुसरा कुणीच घेऊ शकणार नाही, हेही तितकंच खरं. हा सिनेमा ट्रेन्ड-सेटर ठरला आहे तो सलीम-जावेदच्या लेखणीने, अमिताभच्या अदाकारीने आणि प्रकाश मेहरांच्या कुशल दिग्दर्शनाने. अमिताभची कारकीर्द घडवली ती या 'जंजीर'ने. अमिताभ महानायक झाला! लांब-लांब टांगांनी त्याने अवघी फिल्म इंडस्ट्रीच पादाक्रांत केली. त्याचं मंदिर बांधलं गेलं. तो आपल्या फॅन्सचा चक्क देव झाला. त्याचा हा प्रचंड आवाका पाहून थक्क व्हायला होतं. दादा कोंडकेंच्या 'तुमचं आमचं जमलं'मधल्या 'अंजनीच्या सूता..' या गाण्यात थोडासा बदल करून म्हणावंसं वाटतं..

*'आले किती गेले किती, संपले भरारा,*
*तुझ्या परि नावाचा रे, अजुनि दरारा,*
*घाबरली इंडस्ट्री, थरथरला शाहरुख खान,*
*एकमुखाने बोला, जय अमिताभ बच्चन,*
*बच्चनजींच्या सूता, तुला ॲक्टींगचं वरदान,*
*एकमुखाने बोला, जय अमिताभ बच्चन...'*

♥

या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके' तसेच, जंजीर (१९७२) या संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. यारी है ईमान मेरा.. (ऑडिओ) https://youtu.be/b2ACRzcKXWQ

२. यारी है ईमान मेरा.. (व्हिडिओ) https://youtu.be/7KIcWTV3MME

३. यारी है ईमान मेरा.. (कराओके) https://youtu.be/uF2B0rPwJzM

४. संपूर्ण चित्रपटः जंजीर (१९७२) https://youtu.be/ETGDA2f4roo

♥

## ०६ : यारी है ईमान मेरा..

चित्रपट : जंजीर (१९७३)
निर्माता- दिग्दर्शक : प्रकाश मेहरा
गायक : मन्ना डे
गीतकार : गुलशन बावरा
संगीत : कल्याणजी-आनंदजी

ग़र ख़ुदा मुझ से कहे, कुछ माँग ऐ बंदे मेरे..
मैं ये माँगूss, मैं ये माँगू, महफ़िलों के दौर यूँ चलते रहेss
हम-प्याला हो, हम-निवाला हो, हम-सफ़र, हम-राज़ हो,
ता-क़यामत, जो चिराग़ों की तरहा जलते रहे..
यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी.. प्यार हो बंदो से ये, तब से बढी है बंदगीSS
यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी.. अरेssयारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..

साज-ए-दिल छेडो जहाँ में -२, प्यार की गुँजे सदा,
जिन दिलों में प्यार है, उनसे बहारे हो फिदा,
प्यार लेके नूर आया -२, प्यार लेके सादगीss
यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..

जान भी जाए अगर, यारी में यारो ग़म नही,
अपने होते यार हो, ग़मगीन मतलब हम नही,
हम जहाँ है उस जगहा -२, झूमेगी नाचेगी ख़ुशीss
यारी है, यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..

गुल-ए-गुलजार, क्यूँ बेजार नजर आता है - २
चश्म-ए-बदका शिकार यार नजर आता है,
छुपा ना हमसे, जरा हाल-ए-दिल सुना दे तू,
तेरी हँसी की कीमत क्या है ये बता दे तू -२
कहे तो आसमाँ के चाँद तारे ले आऊँ,
हँसी जवान और दिलकश नजारें ले आऊँ,
कुर्बानss तेरा ममनून हूँss, तेरा ममनून हूँ,
तूने निभाया याराना,
तेरी हँसी है आज सब से बडा नजराना -२
यार के हँसते हीss-२, महफिल पे जवानी आ गयी, आ गयी
यारी हैss यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..
अरेss यारी है ईमान मेरा.. यार मेरी जिंदगी..

♥

## 07 : Tarun Aahe Ratra Ajuni..

## ०७ : तरुण आहे रात्र अजुनी..

जगातला अंधःकार कायमचा नष्ट होईल तेव्हा होवो, पण आपण जगतोय त्याच काळात आपणं जगणं सुसह्य करण्यासाठी देवाने दोन स्वर्गीय स्वर आपल्या झोळीत टाकलेयत. कानावर स्वरकारंज्यांची अखंड बरसात करण्यासाठी! सख्ख्या बहिणी ना त्या? पण निसर्गाचा चमत्कार किती विलक्षण पहा! दोन्ही आवाजात सौंदर्य ठासून भरलंय.. पण आवाजाची जातकुळी मात्र भिन्न! एकीचा मंजुळ तरीही धारदार आणि कमालीचा गोड गळा, तर दुसरी? गोडव्याबरोबरच एक मुक्त, आत्मनिर्भर आणि स्वच्छंद अष्टपैलूत्व लाभलेल्या आवाजाची स्वामिनी! लतादीदींचा आवाज मनातल्या भाव-भावना, हृदयाची स्पंदनं पराकोटीच्या माधुर्याने व्यक्त करणारा, तर आशाताई? हृदयाचे कप्पे-कप्पे मोकळे करतानाच वाहत्या वाऱ्यावर स्वच्छंद विहार करीत थेट काळजाला हात घालणारा. प्रत्येक शब्द जणू मधात घोळलेला. मस्ती, प्रणय, लज्जा, शृंगार, अल्लडपणा, दर्द, विरह, प्रीती, बेडरपणा अशा कित्येक हिंदोळ्यावर सहजपणे, समर्थपणे झुलत-झुलवत राहणारा असा जिंदादिल आवाज असेल तर तो आशाताईंचाच. व.पु.काळे एकदा म्हणाले होते.. मंदिराच्या गाभाऱ्यात जिथे सामान्य माणसाचे हात पोहोचू शकत नाहीत, अशा पवित्र स्थानी मंदपणे तेवत, तो इवलासा आसमंत उजळून टाकणारी समई म्हणजे लतादीदी! आणि आपल्या जीवनात प्रत्येक क्षणी साथसंगत करणारी, बऱ्यावाईटाची साक्ष असणारी, आपल्या घरातल्या छोट्याश्या देव्हाऱ्यात तेवणारी इवलीशी पणती म्हणजे आशा!

वेगवेगळ्या वाद्यांच्या आवाजातून भावना व्यक्त होऊ शकतात ना? येस! काही प्रमाणात! हृदयाची तार छेडली जाऊ शकते, बुजलेल्या जखमा भळाभळा वाहू लागण्याचं सामर्थ्य असतं, अमुक एका वाद्यामुळे अश्रुंचा बांध अनावर होऊ शकतो. कधी पत्थरदिलही पाझर फोडतं.. पण उत्तानपणा व्यक्त होईल एखाद्या वाद्यातून? अगदी तुतारीपासून सिंथेसायझरपर्यंतच्या सर्व वाद्यांवर प्रयोग करून पहा. रसरशीत शृंगाररस काकोडकरांच्या कादंबऱ्यातून व्यक्त झाला असेल, पण इथे तशी शक्यता कमीच. रात अकेली है.. (ज्वेल थीफ), ये है रेशमी.. (मेरे सनम), हुस्न के लाखो रंग (जॉनी मेरा नाम) अशी गाणी वाद्यांवर वाजवून पहा. मादक किंवा उत्तान वाटतं ते? नाही.. का? शब्द वजा झाले म्हणून? शब्दात आत्मा असतो. कबूल! वाद्यसंगीतालाही स्वतःचं व्यक्तिमत्त्व असेल हो पण शरीर नसतं.. सळसळतं यौवन, मादकता, आव्हानात्मक उत्तानपणा तंतोतंत व्यक्त करणारं! त्या गाण्यांना शरीर बहाल केलंय ते आशाच्या आवाजानं. निमित्त आहे ते तिथे पद्मा खन्ना, तनुजा आहे म्हणून. उदाहरणच द्यायचं झालं तर हे गजलसदृश भावगीत, जर त्या काळी बिंदूवर (विनोद खन्ना अभिनीत इम्तिहान मध्ये ती दिसलेली तशी), पद्मा खन्नावर (जॉनी मेरा नाम) किंवा मग तेव्हा रसरशीत वाटणाऱ्या सायरावर (शागीर्द!) चित्रीत झालं असतं ना, तर आशाताईंचं गाण्याला जिवंत शरीर बहाल करणं म्हणजे नेमकं काय असतं ते झटकन उमगलं असतं आपल्याला!!..

*तरुण आहे रात्र अजुनि, राजसा निजलास का रे!*
*एवढ्यातच त्या कुशीवर, तू असा वळलास का रे? तरुण आहे.. रात्र अजुनि..*

मुखड्यातच सुरावटीतल्या चालीची विशिष्ट चौकट ओलांडून त्या पलिकडचा आशय व्यक्त केलाय आशानं. शब्दांच्या धुंदीची नशा तिला स्वतःला चढली नाहीय. सहजपणे म्हणून गेलीय तो मुखडा. पण खरं सांगायचं तर या साधेपणातून तिच्या नकळत एक अनामिक काहूर आपल्या नसानसात माजलंय. रक्तप्रवाहाने आपली विशिष्ट दिशा बदलून मेंदूकडेच वाहण्याचा इरादा पक्का केलाय. कानशिलं उगीचंच तापतायत. पुढच्या कडव्यातले शब्द तर सगळे बांध तोडून अंगावर येतायत..

*अजुनही विझल्या न गगनी, तारकांच्या दीपमाला,*
*अजून मी विझले कुठे रे? हायऽऽ तू विझलास का रे!*
*राजसा निजलास का रे! तरुण आहे.. रात्र अजुनि..*

सुरेश भट हे नाव तसं तुमच्या परिचयाचंच. मेंदीच्या पानावर, आज गोकुळात रंग खेळतो हरी, उषःकाल होता होता, पहाटे पहाटे मला जाग आली, केव्हा तरी पहाटे, चल उठ रे मुकुंदा, सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या, गगन सदन तेजोमय अशी कैक गाणी आपल्या हृदयावर कोरणारा हा विदर्भातला कवि. या गजलेतून शृंगारातले जे क्षण ते बयाँ करताहेत त्याला रोमॅन्टीक चालीत गुफलंय आपल्या लाडक्या पं. हृदयनाथजींनी, आणि त्या गाण्याला रसरशीत तारुण्य बहाल केलंय ते आशाजींच्या आवाजानं.

आपल्या कवितेतल्या नायिकेच्या रूपाची तुलना ते कोजागिरीच्या चांदण्याशी करताहेत. गोरीपान, सुंदर, मादक! तिच्या उमलत्या-उसळत्या भावनांतला उत्कट-प्रणयोत्सुक भाव यथार्थपणे वर्णितोय खरा, पण आशानं त्या शब्दांना निरातिशय धुंद आणि मादकपणाची डूब देऊन उत्फुल्ल-आक्रमक शृंगार कसा असेल याचं जे काल्पनिक चित्र डोळ्यांपुढे उभं केलंय, त्याला तोड नाही.

*सांग ह्या कोजागिरीच्या, चांदण्याला काय सांगू ?*
*उमलते अंगांग माझे.. आणि तू ss मिटलास का रे ?*
*राजसा निजलास का रे! तरूण आहे.. रात्र अजुनि..*

माझ्या सुदैवाने आशाताईंना, आमच्या कंपनीच्या रेकॉर्डिंग स्टुडिओत त्या कशा गातात ते पहायचं भाग्य लाभलं. साक्षात स्वरदेवता इथे गायला आलीय म्हणता स्टुडिओतला प्रत्येकजण आनंदात होता. संगीतकार आनंदराज तर हरखून गेलेला. (तो नवखा असल्याने ते स्वाभाविक होतं.) संगीतकाराकडून गाणं समजावून घेतल्यानंतर त्यानी संपूर्ण स्टुडिओ नजरेखालून घातला. सचिन बॅटिंगला येताच पूर्ण स्टेडियमचा कोपरा न कोपरा जसा न्याहाळतो ना, अगदी तस्सा! स्टुडिओ 'डिजिटल'!! सामान्यपणे सर्व रेकॉर्डिंग स्टुडिओत मॉनिटर रूम आणि म्युझिक हॉलच्या मध्ये काचेची मोठ्ठी खिडकी असते. संवाद साधण्यासाठी! आमच्याकडे 'सीसीटीव्ही' कॅमेरे लावलेले. माईकसमोरच दिसणाऱ्या कॅमेऱ्याकडे अंगुलीनिर्देश करत विचारलं.. 'ये क्या है ?' संगीतकारानं 'ते' विषद करताच म्हणाल्या.. 'कॅमेरा ?..बंद करो वो! गा रही हूँ ना ?...वो सुनो...!' आणि त्या गायला उभ्या राहिल्या. आता आमची वरात मॉनिटर रूमकडे! घसा खाकरत.. एक तान छेडून संगीतकाराला 'तुला हवं तसं गाऊन घे.. काहीही मनात असेल तर बेधडकपणे सांग...' एक ओळ गाऊन झाली. स्कॅनिंग ठीक आहे का विचारत रेकॉर्डिस्टला सूचना दिली.. 'जो, जो जैसे जैसे, जितनी बार गा रही हूँ.. सब अलग अलग ट्रॅक में डब करते जाना.. ठीक है ?' आणि स्वरदेवता गाऊ लागली. पाऊणतास! स्वराची बरसात, उत्फुल्ल कारंजी.. एकीकडे (नवख्या) संगीतकाराच्या चालीला दाद देत, वातावरण सौम्य आणि हसतंखेळतं ठेवत एकेक ओळ जीव ओतून गात होत्या आशाताई. गायलेली एकेक ओळ म्हणजे मोगऱ्याचं टपोरं फूल!.. प्रत्येक ओळीत विभिन्न आविष्कार, नजाकत, हरकती! बाप रेऽऽ! किती घेशील दोन्ही कराने! ते गाणं डब करून झालं. गाणं मिक्सिंग करताना आशाताई म्हणजे काय चीज आहेत.. ते लक्षात आलं.

गुलजारच्या गाण्यांना आर्डी जसे वेगवेगळ्या ट्रीटमेंटने सजवायचे तसेच पं. हृदयनाथजींनी सुरेश भटांच्या सगळ्याच रचनांना अगदी मनःपूर्वक नटवलंय. शृंगार कुणी, कसा आणि कशा पध्दतीनं करायचा ही ज्याची-त्याची गणितं असतील, पण इथली सुरेश भटांनी वर्णिलेली नायिका एकदा तृप्त होऊनही त्याचा कैफ नसानसात वागवत आपल्या प्रियकराला पुनःपुन्हा चेतवतेय...'पुसतोच आहे' आणि 'गार वारा' या जागा आशाजींनी अशा काही करामतीनं सजवल्यात की बस्स रे बस्स! काव्याचा आशय या समर्थ गायिकेनं एका फटकाऱ्यात असा प्रतिबिंबित केलाय की आपण या महान गायिकेला कुर्निसात करतोच करतो. ('यू-ट्युब'वर या गाण्याच्या खूप लिंक्स सापडतात. एका महाभागाने या गाण्यातील काव्याबद्दल अशी संकल्पना मांडलीय की, यात एक स्त्री आपल्या पतीच्या निष्प्राण कलेवराशेजारी बसून विलाप करत आहे. आता निष्प्राण कलेवराला 'कुशीवर वळायला' का कुणी सांगेल ? हे त्याचं त्याला ठावे.)

मध्यंतरी लतादीदी, आशाताई यांची जेवढी म्हणून गाणी आहेत त्यांची व्हर्शन्स करायचा बऱ्याच जणींनी सपाटाच लावलेला. व्हर्शन्स, रीमिक्स किंवा तत्सम चिरफाड करत गाणी सादर करायची जणू अहमहमिकाच लागलेली. नाव घ्यायची हिम्मत नाही माझी, पण मी त्यातल्या एकीच्या सेक्रेटरीला खवचटपणे विचारलेलं.. 'काय रे ? आमच्या ऋतु हिरवा वगैरेंचं पण व्हर्शन्स करणार आहात की नाही ?' त्याने चट्कन कानाच्या पाळीला हात लावून तौबा केलं.. 'ती गाणी ? आशाताईंची गाणी ? नाही रे बाबा.. कोण म्हणतो असं ?' त्याच्या हातात पेमेंटच्या नोटा कोंबत शांतपणे सांगितलं.. 'कुणी म्हणत नाहीय.. पण त्या वाटेला जाऊ नका म्हणावं.. फाटेल..' आता इशारा त्याच्या हातातल्या नोटांकडे होता.

*बघ तुला पुसतोच आहे, पश्चिमेचा गार वारा,*
*रातराणीच्या फुलांचा गंध तू लुटलास का रे ?..  तरूण आहे.. रात्र अजुनि..*

शेवटच्या अंतऱ्याची चाल पहिल्या अंतऱ्यासारखीच आहे खरी पण मूड थोडासा बदललाय असं वाटतं. इतकी अस्त्र वापरूनही त्याला ढिम्म असलेलं पाहून ती नायिका आता त्याला निर्वाणीचं चेतवू पाहतेय.. जणू त्याच्यातल्या पुरुषार्थालाच बेधडक आव्हान देतेय, असं नाही वाटत ?

*उसळती हृदयात माझ्या, अमृताच्या धुंद लाटा,*
*तू किनाऱ्यासारखा.. पण कोरडा उरलास का रे!.. तरूण आहे.. रात्र अजुनि..*

महान ऑपेरा गायक करूसेचं एक वाक्य आठवतं? ‘देवानं गळ्याची रचना केलीय ती नेमकी मेंदू आणि हृदयापासून.. समान अंतरावर’.. पण कुणी दिल से गातं तर कुणी दिमागसे. इथे मेंदूचा उपयोग करून गाणारे चिक्कार पाहिलेत मी आमच्या स्टुडिओत. आमची आशाताई मात्र दिलोदिमागसे गाते. हो, पण मनाच्या गाभाऱ्यातून गाणारी ही ‘आशा’ आपल्या एकेक गाण्यातून भावना कशा-कशा व्यक्त करते हे ऐकायला मात्र रसिकाचा अस्सल कानच असायला हवा. लतादीदी आणि आशाताई या दोघींमध्ये तुलना करायची किंवा कुणा एकीचं अवमुल्यन करायचं असा अजिबात हेतू नाहीय माझा. पण लक्षात घ्या! सुरेश भटांचं ‘मालवून टाक दीप, चेतवून अंग अंग..’ हे असंच एक शृंगार-रसानं ओतप्रोत भरलेलं गाणं पं. हृदयनाथजींनी पेश केलं होतं. आवाज होता लतादीदींचा. मादकता? आहे की! शृंगार-रसाचं आकंठपान आहेच. प्रणयोत्सुक नायिका या गाण्यातही मौजूद आहे, अगदी आपल्या लाडीकपणासकट! पण इथल्या नायिकेचं व्यक्तिमत्त्व.. का कोण जाणे.. असं वाटतं की एक सुंदर सालस, सलज्ज, लाजरी-बुजरी, दोन वेण्या घातलेली, पदराशी चाळा करत आपल्या भावना हळूच सांगणारी चारचौघींसारखी सामान्य तरूणी! आशाताई मात्र आपल्या ‘तरूण आहे.. रात्र अजुनि..’ या गाण्यातून आपल्या प्रत्येक शब्दोच्चारासरशी दिलेल्या चालीबाहेरचं जास्त काही भरतेय. उम्मीद से भी बढकर! आणि तिचा हा आविष्कार आपल्या डोळ्यांसमोर एका सुंदर मादक स्त्रीचा आकृतीबंध उभा करतो. तारूण्यानं मुसमुसलेला! मादक, घट्ट वळसेदार असं उफाड्याचं शरीर! आशाताईंच्या अलौकिक, सामर्थ्यपूर्ण, मुक्त शारीर आवाजानं निर्मिलेलं... कानाला सुखावणारं..

*तरूण आहे रात्र अजुनि..*
*राजसाऽऽ निजलास का रेऽऽ!!*

♥

आशाताईंच्या या सर्वांगसुंदर गाण्याची ‘ऑडिओ, कराओके’ तसेच गाण्याशी संबंधित इतर ‘यू-ट्युब’ लिंक्स :

| | | |
|---|---|---|
| १. | तरूण आहे रात्र अजुनि.. (ऑडिओ) | https://youtu.be/1a4wGMOAgn0 |
| २. | तरूण आहे रात्र अजुनि.. (नक्षत्रांचे देणे) | https://youtu.be/7YaMnvWnYBI |
| ३. | तरूण आहे रात्र अजुनि.. (लाईव्ह व्हिडिओ) | https://youtu.be/c3umoZhf2Mw |
| ४. | तरूण आहे रात्र अजुनि.. (सन्मा. आरती अंकलीकर) | https://youtu.be/y1j3nP1E6cc |
| ५. | तरूण आहे रात्र अजुनि.. (शंकर महादेवन) | https://youtu.be/49r4SbuEoUw |
| ६. | तरूण आहे रात्र अजुनि.. (कराओके) | https://youtu.be/2aPrDkewFXs |

♥

## ०७ : तरूण आहे रात्र अजुनी..

गायिका : आशा भोसले
रचना : कवि सुरेश भट
संगीत : पं. हृदयनाथ मंगेशकर

तरूण आहे रात्र अजुनि -२, राजसा निजलास का रे! ऽऽ- २
एवढ्यातच त्या कुशीवर, तू असा वळलास का रे?
तरूण आहे.. रात्र अजुनि..

अजुनही विझल्या न गगनी, तारकांच्या दीपमाला - २
अजून मी विझले कुठे रे? हाय ऽऽ तू विझलास का रे!
राजसा निजलास का रे! तरूण आहे.. रात्र अजुनि..

सांग ह्या कोजागिरीच्या, चांदण्याला काय सांगू? - २
उमलते अंगांग माझे.. आणि तू ऽऽ मिटलास का रे?
तरूण आहे.. रात्र अजुनि..

बघ तुला पुसतोच आहे- २, पश्चिमेचा गार वाराऽऽ
बघ तुला पुसतोच आहे, पश्चिमेचा गार वारा,
रातराणीच्या फुलांचा, गंध तू लुटलास का रे?
तरूण आहे.. रात्र अजुनि..

उसळती हृदयात माझ्या, अमृताच्या धुंद लाटा - २
तू किनाऱ्यासारखा पण.. कोरडा उरलास का रे!
राजसा निजलास का रे! तरूण आहे.. रात्र अजुनि..
राजसा निजलास का रेऽऽ

♥

तुमच्यासाठी काहीखास'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका आणि डाऊनलोड करा.

१. कविराज सुरेश भट (प्ले-लिस्ट) http://www.youtube.com/watch?v=1Oczz2Mpz2M&list=RDQMDxiYraZ6fKI

२. रंग मैफिलीचा (सुरेश भट-सुरेश वाडकर) https://youtu.be/VsEyBLNauBc

३. पहाटे पहाटे मला.. (सुरेश भट-सी. रामचंद्र) https://youtu.be/MulyUx_QhY0

♥

## 08 : Jeena Yaha Marna Yaha..

## ०८ : जीना यहाँ मरना यहाँ..

'कागज के फूल' (१९५९) हा भारतीय चित्रपटांच्या इतिहासातला पहिला सिनेमास्कोप सिनेमा. मग भारताचा पहिला ७०एम.एम. सिनेमा कोणता? असा सवाल येणं साहजिकच आहे. तो 'शोले' होता असं पटकन ओठावर येईल. पण ते चुकीचं आहे. गलत जवाब! पहिला ७०एम.एम. सिनेमा होता 'पाछी' नामक कलंदराचा. 'अराऊंड द वर्ल्ड' (१९६७)! खूप गाजावाजा झालेला या दोन्ही सिनेमांचा. पण दोन्ही चित्रपट साफ कोसळले. गुरुदत्तला अवदसा आठवून ज्या दिवशी त्याने 'कागज के फूल'(१९५९) नावाचा चित्रपट बनवायला घेतला, बरोब्बर दहा वर्षांनी त्याच दिवशी राजने 'मेरा नाम जोकर' बनविण्यासाठी नारळ फोडला. सिनेमा प्रदर्शित झालेला तेव्हा आम्ही खूप लहान होतो. 'मेरा नाम जोकर'(१९७०) ची गाणी चांगलीच गाजलेली. मग हा पिक्चर पडला कसा? हा प्रश्न अनुत्तरीत राहिलेला, मनाच्या एका कोपऱ्यात. तो पूर्ण चार तासांचा चित्रपट आहे. दोन इन्टरव्हल्स होत्या वगैरे ऐकून होतो. व्ही.सी.आर.चा जमाना आलेला, पण आर.के.चे कोणतेच चित्रपट ऑफिशियली व्हीडिओ-कॅसेटवर उपलब्ध नव्हते. अल-मन्सूर वगैरे पायरेटेड कॅसेटस् सहज उपलब्ध होत्या पण हा सिनेमा अर्धवट का म्हणून बघायचा? दिवस जात होते.. राज कपूरचा कोणताही सिनेमा मॅटिनीला आल्याच कळता आम्ही कॉलेज सुटताच जायचो. 'बरसात' ते 'संगम' असेच पाहिलेले. दूरदर्शनच्या कृपेनेही बरेचसे सिनेमे पहायला मिळाले. का कोण जाणे.. नेमका 'मेरा नाम जोकर' पहायला मिळणं दुरापास्त झालेलं. हा सिनेमा थिएटरातच बघायचा असा चंग बांधलेला असल्यामुळे आम्हाला तब्बल दहा वर्षे वाट पहायला लागली.. एकदा मित्रानं बातमी आणली. 'मेरा नाम जोकर' मराठा मंदिरला.. मॅटिनीला लागलाय. जायचं का? या चित्रपटाला त्या काळात का बरं लोकाश्रय मिळाला नसावा?.. केवळ या उत्सुकतेपोटी राजचा हा तमाशा पहायला आम्ही कॉलेजकुमार आवर्जून गेलो होतो. मागच्याच आठवड्यात टी.व्ही.वर 'जागते रहो' बघायला मिळाला होता. आर.के.लक्ष्मणच्या कार्टूनमधल्या 'कॉमन-मॅन' टाईप किरदारमध्ये तो नर्गीसच्या हंड्यातून ओंजळीने पाणी पिताना दिसला होता. इथे तो कसा असेल असा विचार करतोय तोच पडद्यावर सेन्सॉर-सर्टिफिकेट झळकलं. या पिक्चरला दोन इन्टरव्हल असणार आहेत अशी आगाऊ सूचना मिळाल्यामुळे पिक्चरचं नाव, लांबी वगैरे गोष्टी न वाचताच जयघोष झाला तो रिळांच्या संख्येचा. पियानो छेडण्याच्या सुरावटीसह पहिली फ्रेम साकारली. सिमी गरेवाल आलेलं पार्सल उघडताना दिसली.. 'डिअर मॅडम, सोमवारकी रात को आख़री तमाशा पेश कर रहा हूँ.. आप जरूर आईयेगा!..' रशियन सर्कससुंदरी आणि पद्मिनी या दोघींनाही अशाच आशयाचं पत्र! त्यासोबत छोटी बाहुली- जोकरची! श्रेयनामावली सुरू होते.. 'राज'दरबारातल्या नवरत्नांची नावे झळकत राहतात. समथिंग इज मिसिंग.. लता मंगेशकर हे नाव कसं नाही बुवा! असं म्हणत मी ओठांचा चंबू केला..अरेच्चा! नावांची परेड संपली की! मी बाजुला बसलेल्या आपल्या मित्राला कोपरानं ढोसून विचारलंही. त्याने 'शूऽऽ' असा आवाज करत माझ्या शंकेला परस्पर दाबून टाकलं. आता आपण सर्कसच्या प्रांगणात पोहोचलो बरं का! राजेंद्रकुमार, मनोजकुमार, पद्मिनी, सिमी गरेवाल, दारासिंग, धर्मेंद्र असे 'स्टार्स' दिसतात. धर्मेंद्र निवेदकाच्या रूपात सामोरा येतो.. 'लेडीज ॲण्ड जंटलमेन..सर्कस की तारीख़ (इतिहास) में आज की रात, एक यादगार रात होगी!' राजू जोकर वीस वर्षांनंतर प्रेक्षकांपुढे पेश होणार असतो-एका शेवटच्या अदाकारीसाठी. धर्मेंद्रचं निवेदन संपताच आठेक फूट उंच असं 'दिल' सर्कसच्या मधल्या भागात (अरेना) उतरतं. ते 'दिल' कापताच 'राज' जोकरच्या पेहरावात आलेला दिसतो. ओमप्रकाश, आगा, सुंदर वगैरे डॉक्टर मंडळी त्याच्या हृदयाचं ऑपरेशन करतात. 'दिल' बाहेर काढलं जातं. मोठं होत जाणारं दिल दाखवून ('राज बडे दिलवाला है'.. शो-मन आहे.. असंव जणू सांगायचंय की काय?.. आणि) राज आपला तमाशा सादर करायला लागतो.. 'दिल' नाचवत म्हणतो..

*जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा, जाना कहाँ,*
*जी चाहे जब हमको आवाज दो, हम है वहीं, हम थे जहाँ, अपने यहीं दोनो जहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ*

फक्त तीन ओळीत गीतकार शैलेंद्रने जीवनाचं जे सत्य सांगितलं ते राज आणि ख़्वाजा अहमद अब्बासने चार तासांच्या रंगीत रिळांतून उगीच पाल्हाळ लावत सांगितलंय हे थिएटरातून बाहेर पडताना लक्षात आलं. शैलेंद्रने जेव्हा हा मुखडा राजकडे सोपवला होता तेव्हा असं म्हणतात की तो लॉटरी लागल्यागत नाच नाच नाचला होता. अंतऱ्यांसाठी तो त्याच्या खनपटीला बसणार होता, तोच शैलेंद्र मैफल सोडून गेल्याची बातमी थडकली. आता राजचे धाबे दणाणले. चेंबूरच्या आपल्या स्टुडिओच्या कट्ट्यावर बसून तो मजरूह ते आनंद बक्षींपर्यंतच्या अनेक शायरकडून आलेले अंतरे वाचताना दिसायचा. शंकर-जयकिशन परेशान झालेले. शैलेंद्रचा मुलगा शैली शैलेंद्रने एक दिवस धीर एकवटून राजजींना 'अंकल, मी प्रयत्न करू का?' असं चाचरतच विचारलं. राजजींनी

नाखुषीनेच होकार भरला. आश्चर्य असं की, या शैलीचेच अंतरे राजजींना पसंत पडले. जोकरच्या जीवनाचं संगीत त्याच्या शब्दात तंतोतंत उमटलं होतं...

*कल खेल में, हम हो न हो, गर्दिश में तारे रहेंगे सदा, भूलोगे तुम, भूलेंगे वो, पर हम तुम्हारे रहेंगे सदा,*
*रहेंगे यहीं अपने निशां, इसके सिवा, जाना कहाँऽऽ*

कडवं संपता संपताच राज सिमीकडे पाहतोय. डोळे एकमेकांत गुंतलेत. हातात नाचवत असलेलं 'दिल' तो मागच्या मागे उंच फेकून देतो. वरून खाली पडत त्याच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या होतात. तुकड्या-तुकड्यातून मग तरुण सिमी दिसायला लागते. कडवं संपतानाच व्हायोलिनची सुरावट आपल्याला राजूची दास्तान सांगायला लागते.. फ्लॅश-बॅकने..

इथल्या राजची दास्तान दिल को छू लेनेवाली खरी, पण ती उगाचच भरकटली आहे. तीन-तीन कथानकं, त्याला मोठ्ठाले पदर. हा फाफटपसारा दोन-दोन इन्टरव्हलने सादर झाला आहे. पहिल्या भागात तो बचपन-जवानीच्या उंबरठ्यावरचा. ऋषी कपूरने तो 'राज' साकारला आहे. टीचर-सिमी गरेवाल!.. दोघांत एक अजीब रिश्ता. तिचा तो लाडका विद्यार्थी, त्याची ती लाडकी मॅडम! पिकनिकच्या निमित्तानं त्यानं तिचं 'तारूण्य' पाहिलेलं असतं. ऋषी कपूरबद्दल सांगायचं तर या प्रसंगात तो इतका गोड, सेंट-परसेंट इन्नोसेंट छोकरा दिसतो की, या विद्यार्थ्याला (असला) आंबटशौक असेल हे पटतच नाही. (लहानपणीच हा इतका लाळघोट्या दाखवला आहे तर मोठा होऊन हा मनगटावर गजरे बांधून छमिया बारमध्ये छमछम बघायला जातो, असं दाखवणार आहेत की काय, असं उगीचच वाटतं. काळाच्या ओघात आपल्या या लाडक्या अभिनेत्याला ('ऋषी'ला) बापानं असल्या रोलमध्ये का बरं पेश केलं असावं..? अशी खंत वाटते) इथं बरचसं पब्लिक सिमीच्या मांड्या दिसताच, पुढची पाच मिनिटं दिसलं ते चवीनं पाहिल्यावर जे उठून गेलं ते इन्टरव्हलनंतर बड्या राजच्या सर्कसच्या एन्ट्रीपर्यंत. सिमी राजच्या आयुष्यात एक कल्लोळ उडवून गेलेली असते. तू नही तो और सही.. रिकाम्या झालेल्या आपल्या हृदयात तो आता इम्पोर्टेड माल भरतो. तिथे रशियन सुंदरीला स्थान देतो. तिची भाषा काय, संस्कार काय! तब्येत काय? आईलाही हीच तुझी सून होणार आहे म्हणून दाखवतो.. वो तो ठहरी परदेशी.. साथ क्या निभायेगी?.. तिसऱ्या भागात पद्मिनी भेटते. वो नही तो तू सही! चला.. ही बया आता याला खरंखुरं प्रेम देणार.. पण तिला चांगली अदाकारा बनायचं असतं.. स्टार असलेला राजेंद्रकुमार तिला भेटतो.. मग काय! कुमारकडे ती एका झटक्यात आकृष्ट होते... राजला ठेंगा दाखवून! राजने केलेले उपकार क्षणात विसरून!.. मतलबी लेकाची..!!

राजने हे आत्मचरित्र लिहिलंय की काय असा उदोउदो केला गेला पण तसल्या पाणचट गॉसिपकडे लोकांनी दुर्लक्ष केलं. मी तुम्हाला त्या वर्षात 'मेरा नाम जोकर'च्या अलीकडे-पलीकडे प्रदर्शित झालेल्या सिनेमांची नावं सांगतो. नावांची जंत्री नाहीय ही. एकेक नाव वाचा.. काही सेकंद विचार करा. तो सिनेमा किंवा एखादं गाणं हमखास आठवेल. अशी जबरदस्त स्पर्धा होती राजच्या 'मेरा नाम जोकर'ला! 'आन मिलो सजना', 'आँसू और मुस्कान', 'अभिनेत्री', 'आनंद', 'बचपन', राजा नवाथेंचा 'भाई-भाई', 'चेतना', 'दर्पण', 'दस्तक', 'दीदार', 'देवी', 'धरती', 'गँवार', 'गीत', 'घर घर की कहानी', 'गोपी', 'हीर रांझा', 'हिम्मत', 'हमजोली', 'जीवन मृत्यू', 'जॉनी मेरा नाम', 'कब क्यूँ और कहाँ', 'कटी पतंग', 'खिलौना', 'मन की आँखे', जितेंद्र-शर्मिला अभिनीत 'मेरे हमसफर', 'पगला कही का', 'पवित्र पापी', 'प्रेमपुजारी', 'पूरब और पश्चिम', 'सच्चा झूठा', 'सफर', 'सावन भादो', 'दी ट्रेन', 'कारवाँ', 'मेरा गाँव मेरा देश'.. असले तीस-चाळीस चांगले म्हणावेत असे पिक्चर लागलेले असताना कोण कशाला तिकिटं काढून रडायला जाईल? ये जो पब्लिक है, ये सब जानती है.. पब्लिक है.. पिटातलं पब्लिक आंबटशौकासाठी जाईल म्हणावं तर त्या सिमीच्या त्या दोन मिनिटांच्या छोट्याश्या शॉटसाठी कशाला जातंय?.. त्यापेक्षा देव आनंदच्या 'जॉनी मेरा नाम'मध्ये मांसल पद्मा खन्ना 'हुस्न के लाखो रंग.. कौन सा अंग देखोगे?'.. म्हणत अधिक चेतवणारी वाटणं, यात गैर ते काय? एवढी व्हरायटी उपलब्ध आहे म्हणता लोकांनी त्यातल्या आवडेल त्या सिनेमाला आश्रय दिला. यातले काही बऱ्यापैकी चालले, तर काहींनी ज्युबिलीचं यशही पदरात पाडून घेतलं तर 'मेरा नाम जोकर'कडे चक्क पाठ फिरवली. आपला 'चॉईस', आपली 'कन्सेप्ट' आपण लोकांवर जबरदस्तीने लादू शकत नाही. ते फेकून देतात. केराची टोपली दाखवतात. 'मेरा नाम जोकर' फ्लॉप! राज डिवचला गेला. सिनेमा आपटला म्हणून गुरुदत्तसारखं हळवं होत नेस्तनाबूत नाही झाला. दुसऱ्यासारखा रडत बसला असता. दारूचा पेला हातात धरला असता. रण सोडून देत रण-छोड-दास झाला असता. तो कोसळला नाही.. तो हाडाचा कलावंत होता. कसलेला दिग्दर्शक होता. लाईन कशाला सोडायची? 'जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा, जाना कहाँ..!' थोडंसं रिलॅक्स होत शांतपणे मोर्चेबांधणी करू लागला. नव्या कामाची आखणी करू लागला. तो न कोसळण्याचं आणखी एक कारण होतं. फिल्मफेअरने त्याला दिलासा दिला होता. पुढच्याच वर्षी म्हणजे १९७२ साली झालेल्या सोहळ्यात त्याचा 'मेरा नाम जोकर' पाच बक्षिसांसाठी नॉमिनेटेड होता. 'मेरा नाम जोकर'ला उत्कृष्ट दिग्दर्शन, संगीतकार आणि गायकाच्या ट्रॉफीने गौरविण्यात आलं. नंतर नॅशनल ॲवॉर्ड्सही मिळाली. उत्कृष्ट बालकलाकार (ऋषी कपूर), छायांकन (राधू कर्मकार) आणि गायक (मन्ना डे). वाईट एवढंच वाटतं की या

सिनेमातली मुकेशची 'जीना यहाँ मरना यहाँ..', 'जाने कहाँ गये वो दिन' ही दोन्ही गाणी सुपर्ब असूनही मन्नादांनी गायलेलं 'ए भाय जरा देख के चलो..' गौरवलं गेलं. कालाय तस्मै नमः!.. आर.के. कॅम्प खूप मोठा! नाही पैशाला तोटा! भाऊ शम्मी आणि शशी फिल्मलायनीत मस्त स्थिरावले होते. नाव काढत होते. या लोकांमध्ये भाऊबंदकी वगैरे असते पण आपल्याइतक्या वाईट थराची नसते. त्यांच्यात अडल्या-नडल्याला हमखास सपोर्ट मिळतो. राज तर त्यांचा सख्खा भाऊ. त्याला भावांचा 'मॉरल सपोर्ट' नक्की मिळाला असणार. मेरा नाम जोकरच्या निर्मिती दरम्यानच 'आर.के.' बॅनरचा 'कल आज और कल' फ्लोअरवर गेला असेल असं वाटतं. दिग्दर्शनाची सूत्रे रणधीर कपूरकडे होती तर राजचं नाव तिथे निर्माता म्हणून झळकत होतं. 'कल आज और कल' (१९७१)! कलाकारांत पापाजी पृथ्वीराजजी, स्वतः राज, रणधीर, बबिता अशी घरचीच टीम होती. संगीताची जबाबदारी शंकर-जयकिशनजींकडे होती. गाण्यांवर आर.के.कॅम्पची छाप दिसते पण त्यात राजजींचं योगदान किती हे त्यांचं त्यांना ठाऊक! माझ्या मते तरी त्या काळात राजजी वेगळ्याच विचारात गढले असावेत. एखादी व्यक्ती अडी-अडचणी, अपयशाने घेरली गेली तर त्याची काय हालत होते हे आपण जाणतोच. 'मेरा नाम जोकर' नंतर 'राज'चं नक्की काय झालं ते पाहूया! मुलाला मिसरूड फुटलीय म्हणता त्याला हीरो म्हणून चांगला ब्रेक कसा द्यायचा याचे मनसुबे नक्कीच रचत असावेत. 'मेरा नाम जोकर' ने आपटी खाल्ली. ठीक आहे! चला! आता नवा खेळ मांडूया. 'बॉबी' (१९७३)! ऋषी कपूर हा नवा हीरो म्हणजे नवा 'राज' नाही का? आता त्याला शोभेलशी नवी हिरॉईन (नर्गीस?) गुणी अभिनेत्री हवीच की! असं म्हणतात की, नीतू सिंह हे नाव पुढे आलेलं पण ती 'दो कलियाँ' मध्ये बालकलाकार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिकेत (ते सुध्दा डबल रोल!) रजतपटावर झळकली असल्याने त्या नावावर चोकडी मारण्यात आली. बऱ्याच विचारांती डिंपल कापडिया सिलेक्ट झाली वगैरे.. वगैरे. नायक-नायिकांची फ्रेश जोडी आहे म्हणून संगीताची जबाबदारीही नव्या जोडीकडे सोपवूया असं राजींचं मत असावं किंवा कुणीतरी सुचवलं असावं. त्यामुळेच की काय 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' यांचा आर.के. कॅम्पमध्ये प्रवेश झाला असेल. जर नायिकेला पार्श्वगायिका म्हणून लतादीदीच हवी असा हट्ट असेल तर नायकाला पार्श्वगायक म्हणून कोण? महंमद रफी, किशोरकुमार, मुकेश.. होते की! अच्छा! तरूण गायक हवाय तर किशोरचा छोकरा अमितकुमार होता, किंवा नवा मुकेश म्हणून नितीन मुकेश होता की नाही? शैलेंद्र सिंहच का? (आय डोन्ट नो सरजी!) फ्रेश आवाजाचा शोध सुरू झाला होता म्हणतात. फिल्म इंडस्ट्रीत हीरो-गायक म्हणून करिअर करायच्या इराद्याने डेरेदाखल झालेला चांगल्या चेहेरेपट्टीचा, वेगळ्या आवाजाची देणगी लाभलेल्या शैलेंद्र सिंहची निवड केली गेली. असं वाचनात आलंय की 'मेरा नाम जोकर'च्या आधी लतादीदींशी त्यांचं बिनसलं होतं! नंतर कुणीतरी म्हणालं.. 'मेरा नाम जोकर'मध्ये लतादीदी नव्हत्या म्हणून अपयश आलं आहे! राजने ईगो कुरवाळला नाही.. थेट दीदींकडे गेला. दीदींना अतिशय सन्मानानं पाचारण करून गाणी रेकॉर्ड केली. मुहूर्त केला. शूटिंग सुरू झालं. ('बॉबी'च्या बाबतीत हे असे बरेच लोकापवाद आहेत म्हणतात! पण आपलं त्याच्याशी घेणंदेणं नाही) 'बॉबी' (१९७३) चालला. गाजला! बॅक-लॉग दामदुपटीनं भरून निघालाच वर राज 'शो-मन' म्हणून इंडस्ट्रीत राज करू लागला. आपला फंडा लोक स्वीकारतायत म्हणता राजजी हरखून गेले. खरं सांगू! 'राज'जी अतिशय आग्रही मानसिकता असणारे कलावंत होते. आपली संकल्पना लोकांच्या गळी कशी उतरवायची हे त्यांना अनुभवाने आता चांगलंच अवगत झालं होतं. 'बॉबी' नंतर त्यांनी 'सत्यम शिवम सुंदरम'ची विचारपूर्वक जुळवाजुळव सुरू केली. भावालाच हीरो म्हणून घेतलं. इथेही संगीतकार म्हणून लक्ष्मीकांत-प्यारेलालची वर्णी लावली. काय छाती असेल.. या माणसाची? तो आणखी एक नवा खेळ खेळला. त्याने मोकळी-ढाकळी झीनत अमान पकडली आपल्या 'सत्यम शिवम सुंदरम' (१९७८) साठी! पद्मा खन्ना चिपाड वाटेल अशी पेशकश केली. किती मोठ्ठे हवेत बोला!.. हवे तितके मोठे ॲक्टर्स आणतो.. पहा म्हणावं! मनाची पकड घेणाऱ्या गाण्यांनी, लोकांना पसंत पडेल अशा मसाल्याने, झीनतच्या मुक्त अदाकारीने (!) पडदा व्यापला. तिकिटबारीवर गर्दी झाली. त्याच्या यशाची कमान चढतीच राहिली ती अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. 'मेरा नाम जोकर'च्या काळात गीतकार शैलेंद्र गेला म्हणून त्याचा मुलगा शैली शैलेंद्र गवसला. पण नशिबाचा खेळ पहा. हा शैली शैलेंद्र पुढे चार-पाच सिनेमांत गाण्याचा रतीब घालून अचानक कुठे गेला कुणास ठाऊक? पण या शैलीचाच एक अंतरा राजजींना नवी उमेद देणारा ठरला असेल असं मला वाटतं. तोच राजला संजीवनी देणारा ठरला असेल. राज 'जोकर' थोडाच होता? राखेतूनही झेप घेणारा फिनिक्स पक्षी होता.. त्याच्या जीवनातलं हे सत्य शैलीच्या शब्दातून कसं उमटलंय पहा..

*ये मेरा गीत, जीवन संगीत, कल भी कोई दोहरायेगा, जग को हँसाने बहेरूपिया, रूप बदल फिर आयेगा,*
*स्वर्ग यहीं, नर्क यहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ, जी चाहे जब हमको आवाज दो, हम है वहीं, हम थे जहाँ,*
*अपने यहीं दोनो जहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ*

♥

## ०८ : जीना यहाँ मरना यहाँ..

चित्रपट : मेरा नाम जोकर (१९७०)
निर्माता/दिग्दर्शक : राज कपूर
गायक : मुकेश
गीतकार : शैलेंद्र आणि शैली शैलेंद्र
संगीत : शंकर-जयकिशन

जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा, जाना कहाँ,
जी चाहे जब हमको आवाज दो, हम है वहीं, हम थे जहाँ,
अपने यहीं दोनो जहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ

ये मेरा गीत, जीवन संगीत, कल भी कोई दोहरायेगा,
जग को हँसाने बहेरूपिया, रूप बदल फिर आयेगा,
स्वर्ग यहीं, नर्क यहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ
जी चाहे जब हमको आवाज दो, हम है वहीं, हम थे जहाँ,
अपने यहीं दोनो जहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ

कल खेल में, हम हो न हो, गर्दिश में तारे रहेंगे सदा,
भूलोगे तुम, भूलेंगे वो, पर हम तुम्हारे रहेंगे सदा,
रहेंगे यहीं अपने निशां, इसके सिवा, जाना कहाँऽऽ
जी चाहे जब हमको आवाज दो, हम है वहीं, हम थे जहाँ,
अपने यहीं दोनो जहाँ, इसके सिवा, जाना कहाँऽऽ
जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा, जाना कहाँ,

♥

आपल्या आवडीचं सर्वांगसुंदर गाणं म्हणता ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. राज कपूर हिट्स्.. (ऑडिओ ज्युकबॉक्स) https://www.youtube.com/watch?v=XHMd2nAlhjo

२. जीना यहाँ, मरना यहाँ.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=5XOi1GzOgfc

३. जीना यहाँ, मरना यहाँ.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=9PdueQIstQw

४. जीना यहाँ, मरना यहाँ.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=pql1qD50A3o

५. चित्रपट : मेरा नाम जोकर (१९७०) - (संपूर्ण) https://youtu.be/9BDOzVIlttY

६. चित्रपट : मेरा नाम जोकर (१९७०) - (संकलीत) https://youtu.be/mYDtcft4Um8

♥

## 09 : Dil Ne Phir Yaad Kiya..

## ०९ : दिल ने फिर याद किया..

दूरदर्शनच्या सुरुवातीच्या काळात 'छायागीत' म्हणजे आमच्यासाठी पर्वणीच असायची. रेडिओमुळे गाणी ऐकायचा छंद लागलाच होता. टीव्हीमुळे अनेक गाण्यांचा दृक-श्राव्य आनंद घेता येऊ लागला. प्रत्येक छायागीत आम्ही न चुकता पहायचो.. महाबळेश्वरचा हसीन माहौल. बासरीची सुरावट आपली जादुगरी दाखवतेय. किनाऱ्यावरून नावेनं प्रस्थान केलंय. नावाड्याकडे चटकन लक्ष जात नाहीय पण कॅमेरा धर्मेंद्रवर स्थिरावतोय म्हणता आता हा नक्कीच नाकपुड्या फुलवत गाणार. बावरलेली नूतन नावेच्या दुसऱ्या टोकाशी बसून उगीचच पायाच्या अंगठ्याने उकरतेय तर दुसऱ्या टोकाशी रहेमान नाकाच्या शेंड्यावर दुःख-असूया-चरफड-तडफड अशा अनेक मानवी भावभावनांचं बेमालूम मिश्रण वागवत उभा आहे. कुठलं गाणं असेल बुवा? असा प्रश्न मनात डोकावतो न डोकावतो तोच मो. रफीचा आवाज आपल्याला घायाळ करतो.. मजरूह, हसरत, साहीर, शैलेंद्र, शकील यांच्यापैकी कुणाचीच सिध्दहस्त लेखणी नसते.. बर्मनदा, एस्. जे., मदनमोहन, रोशनदा, सी. रामचंद्र किंवा नौशादजी अशा ओळखीच्या संगीतकारांपैकी कुणाचीच जादुई सुरावट नसते.. पण गाणं सुरू होताच नावेशी थडकणाऱ्या प्रत्येक लाटेसरशी आपण नखशिखांत थरथरतो. कुठल्यातरी बुजलेल्या जखमांची खपली पडून जखम पुन्हा भळाभळा वाहू लागते. एक उमंग तळपायातून मेंदूत जाते. क्षणभर झिणझिण्या येतात.. आणि ते गाणं आपल्या मेंदूवर विलेपन करता करता नकळत हृदयात उतरतं.

*दिल ने फिर याद किया बर्कसी लहरायी है -२*
*फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है*
*दिल ने फिर याद कियाऽऽ*

'मास्टरजी वाहऽऽ! क्या बात है.. तुमचं नाव या श्रेयनामावलीत बघून खूप बरं वाटलं.. नाव असं मस्त झळकलंय की, ही कुठल्याश्या फेमस संगीतकारांची जोडगोळी असावी!..'
'क्यूँ मजाक कर रहे हो रावलजी! हमे कहाँ ऐसी शोहरत मिलेगी!'

'दिल ही तो है' (१९६३)च्या प्रिव्ह्यू शोमध्ये राज कपूर, नूतन, प्राण, आगा, रावल फिल्मचे मालक बंधू, संगीतकार रोशनदांसह उपस्थित होते. चित्रपटाच्या श्रेयनामावलीत संगीतकार रोशनदांच्या नावानंतर सहायक म्हणून सोनिक-ओमी असं नाव झळकताच शेजारी बसलेल्या 'मनोहरलाल सोनिक' नावाच्या अंध वादक आणि प्रतिभावान संगीत-संयोजकाला निर्माते रावलसाहेब अगदी आपुलकीनं म्हणाले..
'मास्टरजी, मै मजाक कर रहा हूँ? देखना यह मजाक एक दिन सच हो जाएगा..'

उत्कृष्ट हार्मोनियम-वादक म्हणून ख्यातकीर्त असणाऱ्या मास्टरजींनी (मनोहरलाल सोनिक) हेमंतदा, मदनमोहन आणि उषा खन्ना यांच्याकडे सहाय्यकाचं काम केलं होतं पण त्यांना वाद्यवृंद-संयोजनाचं काम करायला प्रोत्साहन दिलं ते रोशनदांनी. 'निगाहें मिलाने को जी चाहता है..' आणि 'लागा चुनरी में दाग..' या गाण्याचं ध्वनिमुद्रण होताना रावलजींनी मास्टरजींमधला स्पार्क केव्हाच हेरला होता. संगीत-संयोजक म्हणून त्यांचं योगदान ते जाणून होते. त्यांनी शब्द पाळला. पुढच्याच सहा-एक महिन्यात सोनिकला त्यांनी म्युझिक सीटिंगसाठी सांगावा धाडला. बैठकीची सुरुवातच मुळी जी. एस्. रावलसाहेबांनी आपल्या एका गेय-कवितेचा कागद ओमप्रकाशकडे (ओमी) सोपवून केली. आपल्या प्रस्तावित चित्रपटाच्या कथेचं हे थीम-साँग आहे आणि त्याची कथाकल्पना थोडक्यात सांगत, गाण्याची सिच्युएशन ही ढोबळमानाने अशी असेल असं सांगितलं. ओमीने त्या कवितेतली गेयता मास्टरजींना वाचून दाखवताच बसल्या बैठकीत सोनिकने आठेक धुनांचा रतीब घातला. दोन नायक आणि एक नायिका असा प्रेमाचा त्रिकोण! गाण्यात तिघांचाही सामावेश आहे. तीन अंतऱ्यांचं गाणं. एकेक अंतऱ्यातून ते आपापल्या मनीचे भाव व्यक्त करणार आहेत. बराच खल झाला. तिघांना सहजपणे एकत्र कसं दाखवता येईल बरं! शेवटी ते एकाच नावेतून प्रवास करताहेत असं दाखवण्याची कल्पना सर्वांनुमते ठरली. गाण्याची सिच्युएशन तर ठरली. नुसतंच विराण्या छेडणारं गाणं नको होतं. नावेतला प्रवास आहे म्हणून त्याला थोडीशी वेगळी फोडणी देऊया असं सोनिकजींनी सुचंवलं. कश्तीच्या हिंदोळ्यावर झुलत राहिल अशी मस्त चाल नक्की करण्यात आली.

*दिल ने फिर याद किया बर्कसी लहरायी है -२*

*फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है*
*दिल ने फिर याद कियाऽऽ*

जी. एल. रावलजी! एक पुख्ता शायर, कथाकार (रावल बंधूंचं 'रावल फिल्म्स' हे होम-प्रॉडक्शन हाऊस.) आपल्याच 'दिल ने फिर याद किया' या कथेसाठी रावलजींनी हे 'थीम-साँग' अगदी आत्मियतेनं लिहिलेलं. भाऊ सी. एल. रावल दिग्दर्शन करणार होता. कथेतल्या सगळ्याच गाण्यांसाठी हवा असा आराखडा तयार होता. काव्यही लिहिलेलं. नौशादजी, रोशनदा, सचिनदा अशा बऱ्याच संगीतकारांची नावं ओठावर होती पण त्यांच्याकडे त्यांचे आपापले गीतकार असतात. त्यांच्याशीच त्यांचं ट्यूनिंग असतं, हाच प्रॉब्लेम होता. आपली गाणी घेऊन गेलो तर आपलंच घोडं पुढे नाचवणं म्हणा किंवा त्या संगीतकारांच्या कामात लुडबूड करतोय असं वाटलं असतं. बरं.. या मोठ्या संगीतकारांकडे कदाचित आपल्याला नेमकं काय हवंय ते प्रांजळपणे सांगण्याचंही स्वातंत्र्य मिळणार नाही.. कदाचित.. म्हणूनच आपलं हे काव्य त्यांनी या नवख्या संगीतकारांकडे सोपवलं असावं. निदान त्यात त्यांना हवा तस्साच आविष्कार करून घेण्यात अडचण येण्याची सुतराम शक्यता नव्हती. नायकाच्या भूमिकेसाठी त्यांना आधी हवे होते राज कपूर. पण ते आपल्या 'संगम'च्या निर्मितीत मसरुफ होते, म्हणूनच त्यांनी धर्मेंद्रकडे नायकाचं काम सोपवलं. नूतन नायिका आणि सहनायकासाठी रहेमानची निवड करण्यात आली. जीवन, रणधीर, श्यामा, सुंदर, टुनटुन, मधुमती, लक्ष्मीछाया, जीवनकला आणि आय.एस.जोहर! कथानक तसं सरळसोपं होतं. धर्मेंद्रची प्रेयसी (नूतन) अपघातात मरण पावलेली असते. कर्मधर्मसंयोगानं रहेमानची पत्नी तिची हमशकल (पुन्हा नूतन) असल्यामुळे केवळ दोस्ताचं मानसिक स्थैर्य शाबूत राहावं म्हणून त्याचीच प्रेयसी म्हणून तो तिला पुढे करतो. (बापऽऽरे! काय हा त्याग?) मित्राची कुर्बानी वगैरे मसाला ठासून भरलेलं हे कथानक रावलजींचंच होतं.

'थीम-साँग'चं रेकॉर्डिंग ठरलं. फेमस!.. ताडदेव! मो. रफी, लता आणि मुकेश अशी निवड पक्की होती. पण नेमक्या त्याच सुमारास मो. रफी-लताचं कशावरूनतरी वाजल्यानं तिनं रफीसोबत गाणं बंद केलं होतं. सोनिकजी डगमगले नाहीत. गाण्याचा बाज पाहता आशा भोसले असा पर्याय स्वीकारण्याऐवजी त्यांनी सुमन कल्याणपूर या तरुण गायिकेला पाचारण केलं. या तरुण गायिकेबद्दल रावल बंधू साशंक होते. आपल्या गाण्याचं काय होणार याचा टेन्स चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. सोनिक-ओमींनी समजावताच जबाबदारी त्यांच्यावरच टाकून गाण्याच्या रिहर्सल्सना सुरुवात केली. त्याकाळी साऊंड-फिल्मवर गाण्यांचा 'टेक' घेतला जाई. मोनो! सोनिक-ओमीजी सुरक्षिततेच्या कारणास्तव एक गेम खेळले. एका ट्रॅकवर गायकांचे आवाज तर दुसऱ्या ट्रॅकवर संपूर्ण रिदम-म्युझिक करायचं ठरवलं. रेकॉर्डिंगला सुरुवात झाली. धर्मेंद्रसाठी रफीसाहेबांनी त्याचं कडवं गायला सुरुवात केली..

*वो भी क्या दिन थे हमें दिल में बिठाया था कभी,*
*और हँस-हँस के गले तुमने लगाया था कभीऽऽ*
*खेल ही खेल में क्यूँ जान पे बन आयी हैऽऽ*
*फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,*
*दिल ने फिर याद कियाऽऽ*

सुमनताईंनी नूतनच्या वाट्याच्या ओळी मनापासून गायल्या..

*क्या बताए तुम्हे हम शम्मा की किस्मत क्या हैऽऽ*
*ग़म में जलने के सिवा और मुहब्बत क्या है,*
*ये वो गुलशन है, के जिसमें न बहार आयी हैऽऽ*
*फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,*
*दिल ने फिर याद कियाऽऽ*

आता पाळी होती मुकेशजींची. एरवी निगेटिव्ह रोल्स करणाऱ्या रहेमानसाठी ते आपल्या भारदस्त आवाजात गाऊ लागले..

*हम वो परवाने है जो, शम्मा का दम भरते हैऽऽ*
*हुस्न की आग में खामोश जला करते है,*
*आह भी निकले तो ये प्यार की रुसवाई हैऽऽ*

*फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,*
*दिल ने फिर याद कियाSS*

'टेक' ओके होताच रावलसाहेब कसले खुष झालेत म्हणून सांगू. मॉनिटर-रूममधून धाव घेत त्यांनी सोनिकजींना कडकडून आलिंगन दिलं. त्यांनी त्यांचा विश्वास सार्थ ठरविला होता. त्यांच्या 'थीम-सॉंग'चे सोनं झालं होतं. मुहूर्ताचे शॉटस् महाबळेश्वरला या गाण्यावरच उरकून घेतले. शीर्षकगीताने जरी हृदयावर कोरीवकाम केलं असलं तरी चित्रपटातली इतर सर्वच गाणी मस्त होती. 'दिलने फिर याद किया' (१९६६)! चित्रपट प्रदर्शित झाला. या साली बरेच उत्तमोत्तम सिनेमे लागलेले. एकट्या धर्मेंद्रचेच अनुपमा, आये दिन बहार के, फूल और पत्थर, बहारें फिर भी आएगी, देवर, दिलने फिर याद किया, दुल्हन एक रात की, ममता, मुहोब्बत जिंदगी है.. असे चित्रपट लागलेले! फूल और पत्थर चांगलाच चाललेला. त्यातला धर्मेंद्र आवडल्यामुळे याच पुण्याईवर मग त्याचे इतर सिनेमे चांगले किंवा काही थोडेबहुत चालले. 'दिलने फिर याद किया'ची गाणी चांगलीच जमून आलेली. 'कलियोंने घुँघट खोले, हर फूल पे भँवरा डोले..' तसेच 'लो चेहरा सुर्ख-शराब हुआ..' ही रफीची दोन सोलो. 'आजा रे प्यार पुकारे..' हे लतादीदींचं सोलो. 'हमने जलवा दिखाया तो जल जाओगे..' (आशा-मन्नादांची कव्वाली), मुकेशचं 'ये दिल है मुहोब्बत का प्यासा..' आणि मो. रफी-आशाचं युगलगीत 'मै सूरज हूँ तू मेरी किरन, संग तेरा रहेSS' झकासच झालीत. 'यूँ चाल चलो ना मतवाली..' हे रफीच्या आवाजातलं गाणं चक्क सहनायक जीवन आणि स्त्री वेषातल्या आय.एस.जोहरवर पिक्चराईज झालंय. हे शीर्षकगीत आणि इतर सर्व गाणी चित्रपटात जशी पूर्ण स्वरूपात ऐकायला मिळतात तशी ती एल.पी. रेकॉर्डवर उपलब्ध होती. पूर्ण गाण्यांची खुमारीच वेगळी आहे. पण आता उपलब्ध असलेल्या कोणत्याच सी.डी. वगैरेवर ती पूर्ण स्वरूपात उपलब्ध नाहीत. हा एच.एम.व्हीचा कपाळकरंटेपणा म्हणावा की आणखी काही? गाणी साडेतीन मिनिटात बसविण्यासाठी या महाभागांनी चक्क कत्तलच केलीय. असो! सोनिक-ओमी लंबी रेस के घोडे ठरले नसतील पण त्यांनी जी गाणी दिलीयत ती रसिकांच्या कायम स्मरणात राहणार आहेत. बिनाका गीत मालामधून गाजणं आलं असलं तरी 'फिल्म-फेअर'सारख्या ग्लॅमरस पुरस्कारांपासून ते सदैव वंचित राहिले हा दैवदुर्विलास. ओमी माझ्या चांगल्याच परिचयाचे आहेत. पण सोनिकजींच्या निधनानंतर (९ जुलै १९९३) ते खूपच एकटे झाले. टॅलेन्टेड व्यक्तीला सक्तीच्या विश्रांतीवर धाडण्यात आलं तर काय होतं याचं ओमीजी हे एक उदाहरण. त्यांचं ते आठवणींना कुरवाळणं.. अचानक हळवं होणं.. मनाला फारच क्लेशकारक असायचं.. म्हणायचे..

*'हयात एक मुस्तक़िल ग़म के सिवा कुछ भी नही शायद..*
*मुझे ख़ुशी भी याद आती है तो आँसू बनकर आती है..'*

♥

या चित्रपटात आपल्या आवडीची सर्वांगसुंदर गाणी आहेत. ती संपूर्ण गाणी पाहता यावीत म्हणून आपणासाठी सर्व गाण्यांच्या व्हिडिओजची 'यू-ट्युब' लिंक देत आहे. संपूर्ण चित्रपटाची सुद्धा 'यू-ट्युब' लिंक दिलेली असल्याने आपण हा चित्रपट थेट पाहू शकाल :

| | |
|---|---|
| १. दिल ने फिर याद किया.. (उपलब्ध ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=a9jHJLt4p70 |
| २. दिल ने फिर याद किया.. (चित्रपटातील संपूर्ण गाणे) | https://www.youtube.com/watch?v=2YohEL8ZkFg |
| ३. दिल ने फिर याद किया (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=pTMeqWCiLaE |
| ४. दिल ने फिर याद किया (सर्व गाण्यांचे व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=zggOhE8b8KQ |
| ५. संपूर्ण चित्रपट : दिल ने फिर याद किया (१९६६) | https://www.youtube.com/watch?v=x-JfbgvpNAU |

♥

## ०९ : दिल ने फिर याद किया..

चित्रपट : दिल ने फिर याद किया (१९६६)
गायक : मो. रफी-सुमन कल्याणपूर-मुकेश
गीतकार : जी. एस्. रावेल
संगीत : सोनिक-ओमी

दिल ने फिर याद किया बर्कसी लहरायी है -२
फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है
दिल ने फिर याद कियाss

वो भी क्या दिन थे हमें दिल में बिठाया था कभी,
और हँस-हँस के गले तुमने लगाया था कभीss
खेल ही खेल में क्यूँ जान पे बन आयी हैss
फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,
दिल ने फिर याद कियाss

क्या बताए तुम्हे हम शम्मा की किस्मत क्या हैss
ग़म में जलने के सिवा और मुहब्बत क्या है,
ये वो गुलशन है, के जिसमें न बहार आयी हैss
फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,
दिल ने फिर याद कियाss

हम वो परवाने है जो, शम्मा का दम भरते हैss
हुस्न की आग में खामोश जला करते है,
आह भी निकले, तो ये प्यार की रुसवाई हैss
फिर कोई चोट मुहोब्बत की उभर आई है,
दिल ने फिर याद कियाss

♥

संगीतकार सोनिक-ओमी अशा एका 'प्ले-लिस्ट'ची 'यू-ट्युब' लिंक सापडली.
पण यात गाणी शोधताना थोडासा गृहपाठ मात्र करावा लागणार एवढं नक्की.

१. संगीतकार सोनिक-ओमी (१२० सुपरहिटस्)

https://www.youtube.com/playlist?list=PLNQiZGbUnWvRwieCk6xpQsED0tYyPnyWY

श्रद्धांजली-ओमीजी अशा आणखी दोन 'यू-ट्युब' लिंक्स सापडल्या.

१. आज के फनकार - १ (श्रद्धांजली-ओमीजी) https://youtu.be/qCyYBXyWL2M
२. आज के फनकार - २ (श्रद्धांजली-ओमीजी) https://youtu.be/kvm2wr6e5ug

♥

## 10 : Dil Ka Soona Saaz..

## १० : दिल का सूना साज..

‘राजसाहब. कुछ सुना आपने? शत्रुघ्न नामका कोई बिहारीबाबू ॲक्टर आयेला है! क्या ॲक्टींग करताय साब! डायलॉग-डायलॉग पे ताली पडता है ताली..’
‘तालियाँ तो हमारे जुतो के एन्ट्री से शुरू होती है बरखुरदार!.. जानी, यहाँ बिहारी आये या इलाहाबादी.. हम राजकुमार है और राजकुमार रहेंगे! समझे?’

राजकुमार बेताज बादशाह होता यात वादच नाही. पण शत्रुघ्न सिन्हाभोवतालचं वलय काही कमी नव्हतं. ‘दरेक माणस नो दायको आवेज छे..’ प्रत्येक माणसाच्या आयुष्यात असा काळ येतोच येतो. त्या काळात तो ज्या वस्तूला स्पर्श करेल त्याचं सोनं होतं. मात्र मिळालेल्या संधीचं सोनं कसं करायचं हे त्याला माहीत असायला हवं. ही फिलॉसॉफी शत्रूने बरोब्बर आचरणात आणली. नाव शत्रू असुनही तो सर्वांचा मित्र झाला. शत्रुघ्न सिन्हा कुछ हद तक प्रत्येकाला आवडायचा. आजही आवडतो. दारात पाऊल ठेवताक्षणी त्याचं पिक्चर डीडीवर आहे म्हणता सुखावलोच होतो. त्याकाळात जाहिरातींचा एवढा भडिमार नसायचा. फक्त निरमा, विको वज्रदंती वगैरे वगैरे.. चला! आज की शाम शत्रुघ्न के नाम! फ्रेश होऊन सिनेमा पहायला बसलो. ढँSSटॅ-डॅण! को-ऑपरेटिव्ह पिक्चर्स प्रस्तुत ‘एक नारी दो रूप’! शत्रुघ्न सिन्हा, रश्मी, आशा सचदेव, रूपेशकुमार, मदनपुरी, सप्रू, ज्यु. मेहमूद.. और खास किरदार में इफ्तेखार! गीतकार असद भोपाली, संगीतकार गणेश, निर्माता श्रीवास्तव, निर्देशक मधुसुदन.. ढँSSटॅ-डॅण! खल्लास! अपनी सुहानी शाम का सत्यानाश! आज काही खरं नव्हतं. चिक्कार नवस-सायासानंतर एक मुल व्हावं आणि ते व्दाड-दिवटं निघावं त्या तुच्छ नजरेनं मी टीव्ही आणि त्यात दिसणाऱ्या शत्रूकडे पाहिलं. एवढा बोलबाला असलेल्या शत्रूचा हा असला आविष्कार? शीः! डीडीचं एकुलतं एक चॅनल! आणि त्यावर असले भिक्कार सिनेमे? चवीनं पिक्चर बघायला जमलेल्या घरच्या-शेजारच्या मंडळींच्या अकलेची कीव करत मी आतल्या खोलीत जाऊन, दार शक्यतो घट्ट लावून निमुटपणे लवंडलो. शत्रुघ्नचा आवाज येत होता, पण त्यात कालीचरण-विश्वनाथसारखा जोश-जुनून नव्हता. सरळसाध्या भाषेत तो बोलतोय एवढंच कळत होतं. तासभरच उलटला असेल. आता ब्रेक होणार. थोड्या जाहिराती आणि साडेसातच्या बातम्या! चला, निदान थोडासा रीलीफ! पण मोजून पाचव्या मिनिटाला इंगळी डसावी तसा ताड्कन उठून बसलो मी. अंगावरची चादर दूर भिरकावून दिली आणि बाहेर येत वाटेतल्यांना अक्षरशः तुडवतच खुर्चीवर विसावलो. कॉटवर अचेतन पडलेल्या इफ्तेखारकडे प्रेमभरल्या आपुलकीनं पाहत शत्रुघ्न सिन्हा रफीच्या आवाजात गात होता.

*दिलकाSS सूSSना साज, तराना ढुंढेगाSS*
*दिल का सूना साज तराना ढुंढेगा,*
*तीर-ए-निगाहें नाज निशाना ढुंढेगा,*
*अरेSSमुझको मेरे बाद, जमाना ढुंढेगा,*
*दिल का सूना साज तराना ढुंढेगाSS*

दहावी-बारावीतली आम्ही पोरं. रफीचे चाहते असल्यामुळे, हे गाणं माहीत होतं. पण ते या टुकार चित्रपटात असेल असं तेव्हा स्वप्नात देखील वाटलं नव्हतं. संगीतकार गणेश (गणेश रामप्रसाद शर्मा) हे नाव ऐकलं होतंत कधी? हुस्नलाल भगतराम, गुलाम हैदर, खेमचंद्र प्रकाश ही नावं जर माझ्या पिढीतल्या बऱ्याच जणांना माहीत नाहीत, तर या अप्रसिध्द संगीतकाराचं नाव ठाऊक असणं तसं कठीणच, नाही का? लक्ष्मीकांत-प्यारेलाल या सुप्रसिध्द संगीतकारांच्या जोडगोळीतल्या प्यारेभाईंचा हा धाकटा भाऊ. राजकारणाच्या बळीचा बकरा! सक्तीनं गेट-आऊट होऊन घरी बसवला गेलेला गुणी संगीतकार! व्हायोलिन ही ख्रिश्चन लोकांची मक्तेदारी होऊ पाहत होती त्या काळात ती कोंडी शर्माजींनीच फोडली असं बुजुर्ग व्हायोलिन-वादक सांगतात. अशा या बाप माणसाची प्यारेभाई, गोरखदा आणि गणेश ही मुलं. या भावंडांना त्यांच्या पिताजीकडून संगीताचा वारसा मिळाला होता. प्यारेभाई आणि गणेश हे शंकर-जयकिशन, कल्याणजी-आनंदजी या कॅम्पमधले. हे तिथे व्हायोलिन वाजवत. गोरखदा मेंडोलिन, गिटार वाजवण्यात पटाईत. गणेशना चाली बांधायची खाज होती. खाज अशासाठी की, आपल्या भावाला ‘पारसमणि’ नावाचं पिक्चर मिळताच त्याने असद भोपालींच्या कवितांवर दिवस-रात्र मेहनत करून केलेल्या कसरती (हसता हुआ नुरानी चेहरा.., मेरे दिल में हल्कीसी.. ही गाणी) बिल्कुल मुफ्त देऊन टाकल्या. आमच्या स्टुडिओत माझ्यासमोर ही प्रतिभासंपन्न व्यक्ती बसली होती आणि एकेक गोष्ट सांगत होती. मी आSS वासून ऐकत होतो.. गणेशभाई बोलत होते आणि एकेक किस्से ऐकून हादरण्यापलीकडची

भावना काय असते ते मी अनुभवत होतो. 'पारसमणि'ची गाणी चिक्कार गाजली. गणेश हात चोळत बसला. भावाने बोलावताच मिळणाऱ्या पेमेंटवर गपगुमान व्हायोलिन घासत बसला. तो उत्तम व्हायोलिन वादक होता पण त्याला संगीतकारांच्या प्रमुख प्रवाहात यायची विलक्षण ओढ होती. त्याचं तकदीर अचानक कसं फळफळलं कुणास ठाऊक! १९६६ साली त्याला डिम्पल फिल्मस्चा 'हुस्न और इष्क' स्वतंत्रपणे संगीत-दिग्दर्शनासाठी मिळाला. संजीवकुमार असूनही आपटी खाल्लेल्या या चित्रपटानंतर १९६८साली त्याला शेख मुख्तार, दारासिंग, आणि हेलन अभिनीत(?) ठाकूर जर्नेलसिंग मिळाला. (आठवा.. आशाताईंनी गायलेलं 'हम तेरे बीन जी ना सकेंगे सनम..') रामसेंच्या विश्राम बेडेकरजी दिग्दर्शित 'एक नन्ही मुन्नी लडकी थी' (१९७०) नंतर शरारत (१९७२).. या एवढ्या प्रवासानंतर मिळालेला हा 'एक नारी दो रूप' (१९७३)!

स्टोरी-सीटिंग्ज संपताच गणेशने श्रीवास्तवजींना असद भोपालींच्या काही नव्या रचना ऐकवल्या. नायक शत्रुघ्नसह सर्वांनीच गणेशची तारीफ केली. (हम तुमसे जुदा होके.., सौ बार जनम लेंगे.., वो जब याद आये.., तसेच हल्लीच्या मैने प्यार कियाची सुपरहिट गाणी देणारे हे गीतकार असद भोपाली.) असद भोपालींच्या अर्थपूर्ण काव्यावर तोडीस तोड संगीत देऊन गणेशने 'दिल का सूना साज..' बनवलं होतं. गणेश आज खूपच आनंदात होते. ताडदेवच्या फेमस या संगीतकारांसाठी नेहमीच लकी ठरणाऱ्या रेकॉर्डिंग थिएटरात एरवी सामान्य व्हायोलिन वादक म्हणून येणाऱ्या गणेशचं आणखी एक गाणं रेकॉर्ड होणार होतं. गोरखदा, किशोर शर्मा, सरदार, ज्ञानजी या अनुभवी सहाय्यकांनी गाण्याचं संयोजन करण्यात योगदान दिलं होतं. लालाभाऊ आणि सत्तारमियाँ अशी तबला-ढोलकची फिल्डींग, माईक नावाचे बुजुर्ग पियानोवादक तसेच पस्तीसेक व्हायोलिन, चेलो, व्हीओलाचा ताफा गाण्यात गहिरे रंग भरायला मौजूद होते. गायक रफी! गाणं कमाल झालं, पण चित्रपट त्या तुलनेत अगदीच भिकार होता. स्टोरीबोर्ड बरा होता पण दिग्दर्शन थोडंसं कन्फ्युझिंग! जन्मताच काळ्या-काण्या असलेल्या मुलीला दागिने घालून का हेमा-शर्मिला बनवता येणार? चित्रपट दणक्यात आपटला. डायलॉगबाजीसाठी गर्दी खेचणारा शत्रू हीरो. रश्मी नावाची पाणचट हिरॉईन! सादरीकरण इतकं फुसकं की बस्स रे बस्स! निर्मात्याचं नशिब फुटलं, गणेश अडगळीत गेला. १४ सप्टेंबर १९७३च्या शुक्रवारी हा सिनेमा लागला खरा पण बॉबी, जंजीर, अभिमान, यादों की बारात, अनुराग, दाग, नमक हराम तसेच आ गले लग जा अशांच्या क्लाऽऽस भाऊगर्दीत लोकांनी त्याची दखलच घेतली नाही, ते सरळ पिलाहाऊसला फेकलं गेलं. कथानक काय तर रश्मीचं शत्रूशी लफडं असतं. इफ्तेखारचं पात्र म्हणजे एक श्रीमंत आणि नामचीन संगीतकाराला उतारवयातही दुसऱ्या शादीत इन्टरेस्ट असतो. रश्मी दौलत कमवायच्या लालसेपायी शत्रूच्या साथीनं प्लॅन बनवून त्याच्याशी शादी करते. अचानक एके दिवशी अपघात होतो. इफ्तेखार वाचतो खरा पण त्याचं शरीर कोमात असल्यागत अचेतन होतं. तो फक्त ऐकू शकतो, पाहू शकतो पण बोलू शकत नाही आणि त्याचं ते जगणं संपूर्णपणे परावलंबी होतं. शत्रू नोकरीच्या निमित्तानं घरात प्रवेश मिळवतो. पैशांची लालसा असते पण त्याच्यातली इन्सानीयत जागृत असते. तो त्याच्या टक्क उघड्या अचेतन डोळ्यातली सुक्ष्म असहाय्यता, लाचारी अनुभवतो. शत्रूच्या मनात त्याच्या नकळत, इफ्तेखारबद्दल आपुलकी निर्माण होते. इकडे रश्मी तर खुनाचाच प्लॅन रचते. शत्रूला मजबूरन सहभागी व्हावं लागतं. व्हीलचेअरवरून खाटेवर ठेवताना त्याला धाड्कन फरशीवर पाडायचं. बस्स! मेंदूकडची एखादी जरी नस निकामी झाली की खेळ खल्लास! झंझट खत्म! शत्रूला अचानक काय वाटतं कोणास ठाऊक तो त्याला पडता-पडता (की पाडता-पाडता) वाचवतो. इफ्तेखारचे डोळे त्याक्षणी (क्षणभर) कृतज्ञतेने ओलावतात. जगण्याची आस त्याच्या डोळ्यांतून ओसंडत असते. शत्रू त्याला थोपटून दिलासा देतो. शत्रू आता त्याची आपलेपणाने काळजी घेऊ लागतो. इफ्तेखारच्या प्रकृतीत उत्तरोत्तर सुधारणा होत जाते. शत्रुघ्न एके दिवशी पियानोजवळची फाईल चाळतो आणि त्यात लिहिलेली कविता गाणं होऊन त्याच्या ओठावर येते.

*आँस का सूरज साथ रहेगा, जब साँसों की राहों में,*
*ग़म के अंधेरे, थक जाएंगे, मंजील होगी बाहो में,*
*प्यार धडकते दिल का, ठिकाना ढुंढेगाऽऽ*
*दिल का सूना साज तराना ढुंढेगाऽऽ*

गाणं रफी की अपनी ख़ुद की आवाज में आहे, असं मला तरी वाटतं. आता तुम्ही म्हणाल रफीचा स्वतःचा आवाज म्हणजे हो काय? रफीसाहेब गाताना हमेशा ते कोणावर चित्रित होणार आहे याचा आवर्जून विचार करायचे. रफीसाहेबांच्या गाण्यांचा चाहता असणारा कुणीही रसिक त्यांचं अमुक गाणं ऐकताना, ते कुणावर पिक्चराईज झालंय हे झटकन ओळखू शकतो, यातच सर्व काही आलं. हीरोच्या सादरीकरणाची स्टाईल त्यांच्या गाण्यातून हूबहू व्यक्त व्हायची. शम्मी, जीतू, देवसाहेब.. एवढंच नव्हे तर महेमूद, जॉनी वॉकर यांच्या गाण्यात ते प्रकर्षानं जाणवतं. काही गाणी मात्र मला अपवादात्मक वाटलीत. माझ्यापुरतं सांगायचं तर.. 'अपनी आँखो मे बसाकर...' (ठोकर), 'दोनो ने किया था प्यार मगर...' (महुआ), 'दूर रहकर ना करो बात...' (अमानत), 'इक तेरा

सुंदर मुखडा...' (भाई-भाई), 'हर चेहरा यहाँ चाँद...' (आबरू), 'जब भी ये दिल उदास होता है...' (सीमा), 'मैं इक राजा हूँ...' (उपहार), 'कहीं बेख़याल होकर...' (तीन देवियाँ), 'तुम्हारी जुल्फ के साये में शाम...' (नौनिहाल), 'मुझे इष्क है तुझीसे...' (उम्मीद), 'फिर वो भूलीसी याद आयी है...' (बेगाना), 'तू इस तरहा से मेरी जिंदगी में...' (आप तो ऐसे न थे).. यादी तशी खूप मोठी आहे. गाणी बेमिसाल! ती कुणावर पिक्चराईज झालीत हा ऊहापोह व्यर्थ. रफीनं अशी गाणी गाताना स्वत्व ओतून गायल्याचं लक्षात येतं म्हणून वाटतं.. हे गाणंही रफी की अपनी ख़ुद की आवाज में आहे. (आज ही गाणी 'यू-ट्युब'वर उपलब्ध आहेत. वेळ मिळाला तर नक्की पहा) 'दिलकाऽऽ सूना साज, तराना ढुंढेगाऽऽ' या तानेवरच फिदा होतो आपण. रफीचा आवाज दिलोदिमागवर मोरपिस फिरवतो. पुढचे शब्द मात्र आक्रंदन असल्याने काळजाला घरे पाडतात. संगीतकार गणेशनं दिलेल्या धुनेबदल आपण त्याला मनोमन कुर्निसात करतो. संगीत देण्याची कुवत असलेल्या गणेशला मारून मुटकून बाजुला बसवण्यात आलं. घर चालवायचंय ना?.. गुमान रेकॉर्डिंगला ये. व्हायोलिन घास आणि चार पैसे कमव. संगीतकार बनण्याची गुस्ताखी केलीस तर रेकॉर्डिंगला कोणीच बोलावणार नाही. तू घरी आणि तुझं ते व्हायोलीन घरातल्या पोटमाळ्यावर धूळ खात पडलंच म्हणून समज.. अशी परिस्थिती निर्माण झाल्याची त्याने स्वतःहून सांगितलं. एकेकाळी भप्पी लाहिरी नामक शर्विलकाने साक्षात आर्डीला आव्हान उभं करायची हिम्मत दाखवली होती, असं म्हणतात तर तिथे हा सरळसाधा गणेश म्हणजे काय?.. तुम्हीच विचार करा. पंचमदांचे संगीत संयोजक आणि सुप्रसिध्द सॅक्सोफोनवादक मनोहारीदादा नेहमी म्हणायचे.. आपली फिल्म इंडस्ट्री म्हणजे जंगल आहे जंगल. (इथे अस्तित्वासाठी, जगण्यासाठी सतत लढा द्यावा लागतो, म्हणून जंगल!) इथे कोण, कधी, कुठून येईल आणि वार करेल, सांगता येत नाही. संभाषण-कौशल्य, व्यवहार-ज्ञान, असावं लागतं. इथे आपलंच घोडं पुढे दामटता येत नाही. प्रसंगी 'मस्काफिकेशन' करावं लागतं. आपापले कळप वागवावे लागतात. राजकारण होतच असतं. पण त्याला समर्थपणे तोंड देण्याचं सामर्थ्य तुमच्यात असावं लागतं. डोक्यावर थंड बर्फ आणि तोंडात साखर घोळवत सगळे व्यवहार करावे लागतात. तुमच्यात कसब, कौशल्य, ज्ञान कितीही असलं तरी 'न्यूसन्स व्हॅल्यू' असणाऱ्या एखाद्यापुढे झुकावं लागतंच लागतं. प्रसंगी नमतं घ्यावं लागतं. दोन पावलं मागे सरकून ('समर्थां घरचा श्वान, म्हणून सारे देती मान' म्हणत) आपला कार्यभाग साधावा लागतो. आपलं 'किचन' चालायलाच हवं, रोज चूल पेटलीच पाहिजे म्हणून झक मारत इंडस्ट्रीत कामं शोधावी लागतात. सतत प्रवाहाबरोबर पोहावं लागतं. आपलं मार्केटिंग आपल्यालाच करावं लागतं. संगीतकार 'गणेश' वर नेमकी काय परिस्थिती ओढवली असेल बरं? ते सांगत नाहीत... परंतु हे गाणं ऐकताना का कुणास ठाऊक.. त्यांच्यावर झालेल्या राजकारणाचं नागवं सत्य यकायक समोर उभं ठाकतं.. ते असद भोपालींच्या या काव्यातून..

*लोग मेरे ख़्वाबों को चुराके, ढा लेंगे अफ़सानो में,*
*मेरे दिल की आग बटेगी, दुनिया के परवानों में,*
*वक्त मेरे गीतों का, खजाना ढुंढेगा..*
*दिल का सूना साज तराना ढुंढेगा,*
*..मुझको मेरे बाद, जमाना ढुंढेगा,*

♥

आपल्या आवडत्या गाण्यांच्या यादीत हे गाणं आहे म्हणता ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि सोबत कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक सुद्धा देतोय :

| | |
|---|---|
| १. दिल का सूना साज.. (चित्रपटातील गाणे) | https://www.youtube.com/watch?v=v62_-JTtVlU |
| २. दिल का सूना साज.. (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=PWs6MitP-gU |
| ३. संपूर्ण चित्रपट : एक नारी दो रूप (१९७३) | https://www.youtube.com/watch?v=JlITqlriQHw |
| ४. महंमद रफी यांची एक मुलाखत | https://youtu.be/CC7qnwOe1qw |
| ५. महंमद रफी – (आवाज एक अंदाज अनेक) | https://youtu.be/9FtdW5Zs4oc |

♥

## १० : दिल का सूना साज..

चित्रपट - एक नारी दो रूप (१९७३)
निर्माता - श्रीवास्तव
दिग्दर्शक - मधुसुदन
गायक - महंमद रफी
गीतकार - असद भोपाली
संगीत - गणेश

दिलकाऽऽ सूऽऽना साज, तराना ढुंढेगाऽऽ
दिल का सूना साज तराना ढुंढेगा,
तीर-ए-निगाहें नाज निशाना ढुंढेगा,
मुझको मेरे बाद, जमाना ढुंढेगा,
दिल का सूना साज तराना ढुंढेगाऽऽ

लोग मेरे ख़्वाबों को चुराके, ढा लेंगे अफ़सानो में,
मेरे दिल की आग बटेगी, दुनिया के परवानों में,
वक्त मेरे गीतों का, खजाना ढुंढेगा..
दिल का सूना साज तराना ढुंढेगा,
तीर-ए-निगाहें नाज निशाना ढुंढेगाऽऽ

आँस का सूरज साथ रहेगा, जब साँसों की राहों में,
ग़म के अंधेरे, थक जाएंगे, मंजील होगी बाहो में,
प्यार धडकते दिल का, ठिकाना ढुंढेगाऽऽ
दिल का सूना साज तराना ढुंढेगा,
तीर-ए-निगाहें नाज निशाना ढुंढेगा,
अरेऽऽ मुझको मेरे बाद, जमाना ढुंढेगा,
दिल का सूना साज तराना ढुंढेगाऽऽ

♥

संगीतकार गणेश यांची आणखी काही श्रवणीय गाणी :

| | |
|---|---|
| १. चाँद क्या है, रूप का दर्पन.. (धमकी-१९७३) | https://youtu.be/JnNbf-njjig |
| २. दिल का नजराना ले.. (चालाक-१९७३) | https://youtu.be/4w2uy7_NIZs |
| ३. हम तेरे बीन जी ना.. (ठाकूर जर्नेल सिंग-१९६८) | https://youtu.be/EZrLXyEAg7A |
| ४. एक नन्ही मुन्नी.. (एक नन्ही मुन्नी लडकी थी' (१९७०) | https://youtu.be/Ancst3eTx04 |
| ५. जिनकी तस्वीर निगाहों.. (हुस्न और इष्क-१९६६) | https://youtu.be/UmOx99wR2zQ |
| ६. दिल ने प्यार किया है इस.. (शरारत-१९७२) | https://youtu.be/ezWAHkxQEAY |
| ७. कल रात सपनें में आए.. (शरारत-१९७२) | https://youtu.be/1UeJI1elEGs |

♥

## 11 : Humey Kale Hai To Kya..

## ११ : हमें काले है तो क्या हुआ..

आज फ्लॅट-संस्कृतीत जगणाऱ्या लोकांना चाळ-संस्कृती तशी अभावानंच माहीत आहे. आमच्या पिढीतल्या कुणालाही विचारा.. चाळीतले दिवस आणि तिथल्या आठवर्णींना ते कुरवाळणारच. इथे आमचे सगळे सणवार धुम-धडाक्यात साजरे व्हायचे. कुणाच्या घरी बारसं असो की साखरपुडा, लग्न असो की सत्यनारायणाची महापूजा. इलेक्ट्रीक दिव्याच्या माळा आणि लाऊड-स्पीकर हा ठरलेलाच. महापूजा होती आमच्या मजल्यावर! मराठीच गाणी लाव अशी धमकीवजा सूचना दिल्याने लाऊड-स्पीकरवर 'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा..' 'तुझ्या उसाला लागंल कोल्हा..', 'बाई माझी करंगळी मोडली..' अशी गाणी एकामागोमाग एक सुरुच होती. अचानक काय झालं कुणास ठाऊक! तिळपापड व्हावा तसे नाना लाऊड-स्पीकरवाल्याकडे धावतच गेले.. 'शिंच्या, बंद कर हा बकवास! मराठी गाणी लाव म्हणून सांगितलं तर तुला हीच गाणी सापडली? हा काय तमाशा लावलाय?..' नाना त्याला करवादत होते. तो बिचारा भिजलेल्या उंदरासारखा थरथरत होता. पताके बांधणारे आमचे हात जागच्या जागी थबकले.. 'हरामखोरा.. गदिमा, बाबुजींची गाणी नाहीत का तुझ्याकडे? अरे, सत्यनारायणाची महापूजा आहे.. देवाधर्माची गाणी लाव की!..' नानांना 'सोबर' गाणी आवडत असली तरी त्यात या लाऊड-स्पीकरवाल्याचा काहीच दोष नव्हता. या लावण्या गदिमांच्याच सिध्दहस्त लेखणीतून अवतरल्या होत्या.. हे मी नानांना सांगितलंही पण ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ते तरी काय करणार म्हणा! गदिमांकडून अशा गाण्यांची अपेक्षा नसल्याने नानांचा गैरसमज झाला होता, एवढंच! मनोरंजनाची मोजकीच साधनं असल्याने की काय 'रेकॉर्ड-डान्स'चं खूप फॅड होतं आमच्या लहानपणी. कुठलाही समारंभ असला, कार्यक्रम असला की हा 'रेकॉर्ड-डान्स' नावाचा प्रकार व्हायचाच. नृत्यकौशल्य असणारा मुलगा मग त्यात बाजी मारून जायचा. रंगभूषा-वेशभूषेचं बजेट नसायचं म्हणून डान्ससाठी शक्यतो एकच एक गाणं निवडलं जायचं.. 'हमें काले है तो क्या हुआ दिलवाले है..' साधीशी बनियान घातली आणि खाली लुंगी गुंडाळली की बाब्या नाचायला तैय्यार! 'आजा रेऽऽपरदेसी..', 'जीना यहाँ मरना यहाँ..', 'सब कुछ सीखा हमने..' अशी गाणी लिहिणाऱ्या शैलेंद्रच्याच लेखणीतून 'हमें काले है तो क्या हुआ दिलवाले है..' अवतरलंय असं कुणी म्हटलं तर चटकन विश्वास ठेऊ आपण? पण त्याच रात्री या 'रेकॉर्ड-डान्स'च्या निमित्तानं जेव्हा 'गुमनाम' (१९६५)ची एल.पी रेकॉर्ड नजरेस पडली तेव्हाच यावर शिक्कामोर्तब झालं.. मी नानांना मुद्दाम 'गुमनाम' आणि त्या लावण्यांच्या रेकॉर्डस् नेऊन दाखवल्या.. आनंदून गेले ते. म्हणाले.. 'व्वा! क्या बात है!.. टी.व्ही.वरच्या छायागीतातून मेहमूद ज्या गाण्यावर तुफान नाचताना दिसला होता.. ते हेच की रे गाणं!.. शैलेंद्रने लिहिलंय? कमाल आहे नाही?..'

'गुमनाम' (रंगीत) एक सस्पेन्स थ्रिलर आहे असं ऐकून होतो. मर्डर मिस्ट्री! म्हणूनच तो प्रौढांसाठी होता. हा चित्रपट वयस्कांसाठी असल्याने आम्हाला आता आणखी काही पावसाळे वाट पाहणं भाग होतं. शेजारच्या मोठ्या वयाच्या मंडळीना स्टोरी विचारावी तर ते म्हणायचे.. 'पिक्चरमध्ये बिल्कुल चावटपणा नाहीय. हेलन खूप तोकड्या कपड्यात वावरते पण ते एवढं खटकत नाही.. वाईट सीन्सही नाहीत.. सस्पेन्स आहे तो! खून-खराबा आहे! त्यातलं रहस्य आणि थरार मुलांच्या बालमनावर आघात करेल म्हणून तो प्रौढांसाठी आहे, एवढंच! प्लीज.. स्टोरी वगैरे कुणालाच विचारू नका. बघायचा असेल ना? तर पूरा पिक्चर बघा.. स्टोरी माहीत झाली तर मजाच निघून जाईल..'. तसं पाहता १९६८ साली शम्मी कपूर-राजश्रीच्या 'ब्रह्मचारी' नामक चित्रपटात बच्चे कंपनीत 'ज्यु. मेहमूद' होता. तो या चित्रपटात 'हमें काले है तो..' या गाण्यावर मस्तच थिरकलेला. त्या सादरीकरणामुळे गाण्यावर नेमकं थिरकायचं कसं याचा अंदाज आला परंतु 'गुमनाम'मध्ये इतकं सस्पेन्स काय आहे की तो चित्रपट 'फक्त प्रौढासाठी' करावा लागला? या गोष्टीमुळे उत्सुकता आणखी ताणली जात होती.. दहावीची परीक्षा दिल्यानंतर काही दिवसांनी तो 'डायना' सिनेमाला लागल्याचं कळलं होतं.. इथे गेलाबाजार सिनेमे लागतात असा या थिएटरचा लौकिक.. 'तसल्या' थिएटरला जाणं म्हणजे घराने की इज्जत, इभ्रत, अब्रू! हे रामऽऽ! परंतु आपल्याला फारा दिवसांनी पहायचाय तो 'गुमनाम' तिथे लागलाय म्हणता काळीज तीळ तीळ तुटत होतं.. आमचं वय अवघं सोळा! आमची तब्येत तोळामासा होती पण उंची चांगली वाढलेली होती. ओठावर छोटीशी कोवळी मिसरूड फुटलेली. ती डार्क असती तर? मिशी असती तर नक्कीच थोराड दिसलो असतो. काय करावं बरं?! त्याकाळी हेअर डाय, आय-ब्रो पेन्सिल की काय म्हणतात तसले प्रकार सहज उपलब्ध नव्हते. नाहीतरी आजच्या इतकी कॉस्मेटिक्स होतीच कुठे तेव्हा? प्रत्येकाच्या घरात आमच्या आई-ताई-माई-अक्कांकडे काय? तर 'मीना खाकी फेस पावडर', 'अफगाण स्नो' आणि 'जाई काजळ'.. ही एवढीच सौदर्य-प्रसाधनं! घरातलं 'जाई काजळ' मिशांवर हलकेच लावून 'लास्ट शो'ला जाऊया, त्या सुरक्षारक्षकाला काय (घंटा) समजणारेय? असं आम्ही मित्रांनी एकमतानं ठरवलं. घरी सगळ्यांनीच 'चितचोर', 'दीवार' किंवा 'जय संतोषी माँ' बघायला जातो म्हणून सांगितलं होतं. लगेच परवानगी मिळाली होती. रात्रीचं जेवण लवकर उरकून आम्ही एकदाचे निघालो

'डायना' थिएटरला. चाळीत किंवा जवळच्या इलाक्यात मिशांवर काजळ वगैरे फासून जाण्यात धोका होता, कारण कुणी घरी-शेजारी चमचेगिरी करण्याचे जास्त चान्सेस होते. 'ॲडल्ट पिक्चर' बघायची खाज आहे होय? असं म्हणत मार पडला असता तो वेगळाच.. आम्ही पाचजण तसेच निघालो. थिएटरच्या अलिकडे रेल्वेपुलावर फुटपाथवरच्या गर्दुल्ल्यांना टाळून एक आडोसा पकडला. चित्रकला चांगली असलेल्या आमच्यातल्या एकानं, खिशातून लपवून आणलेल्या काजळाची डबी थरथरतच उघडली. आमच्या मिश्यांच्या जागी त्या काजळाचा जाड काळा थर दिला. चलो.. अब हम जवान हो गये भिडू! विजयी मुद्रेने आम्ही आता थिएटरकडे! तिकिटं कशीबशी काढली एकानं. बाल्कनीवाल्यांना सर्वात आधी सन्मानानं आत घेतलं जाई. बाकी सीटस्ना नंबर्स नसायचे. पासष्ट पैसे स्टॉल आणि एक रुपया पाच पैसे अप्पर-स्टॉल! (घरनं फायनान्स मिळाला नसला की बाल्कनीची तिकीट म्हणजे आम्हा मुलांच्या बजेटबाहेरचा मामला.) सीट पकडायची असेल तर इथे लोखंडी स्लायडिंग-गेटबाहेर रांग लावावी लागायची. 'शो'च्या आधी अमुक मिनिटं ते गेट उघडलं जायचं. डोअरकिपरने आत सोडलं की फलंदाज जसे जिवाचं रान करून चोरटी धाव घेतात तशी धावत सीट पकडायची. जो जीता.. वोही सिकंदर! आम्ही रांगेत उभे! आंब्यांचा सीझन असल्याने त्या धंद्यातले बरेच भय्ये रांगेत आमच्या पुढे तळ ठोकून होते. समोर गेटवर एक आडदांड तब्येतीचा उंच-धिप्पाड गेट-किपर उभा! अतिशय चाणाक्ष आणि सतर्क! उंची असल्याने चहुकडे तो चांगलीच नजर ठेवत होता. (हा जर त्या चोप्रांना वेळीच भेटला असता तर त्यांच्या 'महाभारत' सिरियलमध्ये पहिल्या दहा-पंधरा 'कौरवांपैकी' कुणाची तरी भूमिका सहज मिळाली असती असा विचार मनाला चाटून गेला.) टेन्शन आलं यार! एक तर आपण खोट्या मिशा लावून प्रौढांसाठी असलेला पिक्चर बघायला जात आहोत हा गुन्हा होताच, त्यावर कळस म्हणून की काय तो मे महिन्यातला उकाडा. मिशीवरचा काजळाचा काळा रंग आपली जागा सोडून त्याचं ओघळात रूपांतर होतंय याची हळुहळू जाणीव व्हायला लागली. रुमाल काढून चेहरा पुसायचेही वांधे! आता आपली खैर नाही. मार तर पडणारच पडणार.. पण नाही! नशीब जोरावर होतं. ख़ुदा मेहेरबान तो गधा पहेलवान.. शेवटी ते गेट उघडलं.. रांग पुढे सरकू लागली. तोंड लपवत आम्ही पुढे पुढे सरकत होतो. पुढच्या एका भय्याची कुणी कळ काढली की काय.. तो केवढ्यांदा तरी ओरडला. गेटवर अफरातफरी झाली. चिल्लमचिल्ली झाली. आता तो सुरक्षारक्षक त्यांच्याच खनपटीला बसला. त्याचं लक्ष नाहीय असं पाहून आम्ही सोलकरच्या चपळाईनं थिएटरात दाखल झालो. हुश्श! सुटलो बुवा एकदाचे!

'गुमनाम'! सेन्सॉर सर्टिफिकेट दाखवून होताच पहिल्या वीस सेकंदातच एका शेटजींचा मर्डर! मुद्दाम घडवून आणलेला एक अपघात! आम्ही सावरून बसलो. पुढच्या दोनेक मिनिटात तो अपघात ज्याने घडवून आणला त्याचाच शूट आऊट! आता आमच्या भुवया उंचावलेल्या. ढॅणऽटॅडॅणऽऽ!! 'टाईटल्स' सुरू झाल्या. पृथ्वी पिक्चर्स.. 'प्रिन्सेस क्लब'चा रौप्यमहोत्सव! 'जान पहचान हो, जीना आसान हो..' टिपिकल क्लब-साँग पेश होतं. क्लबच्या लकी-वीनर्सची नावं आता घोषित होतात.. बॅ. राकेश (प्राण), धर्मदास (धुमाळ), किशन (मनमोहन), डॉ. आचार्य (मदनपुरी), मधुसूदन शर्मा (तरूण बोस), आशा (नायिका नंदा) आणि किटी (हेलन) अशा ख़ुशकिस्मत सभासदांना क्लबतर्फे खास चार्टर्ड विमानातून दोन आठवड्यांकरता मुफ्त परदेशवारीसाठी धाडलं जाणार असतं. विमानात ही मंडळी आणि विमान कंपनीचा अधिकारी आनंद (मनोजकुमार). प्राण हा सतत हातातल्या धातूच्या क्वार्टरएवढ्या बाटलीतून दारू पिताना दाखवलाय. ते अक्षय-पात्र आहे की काय कुणास ठाऊक पण त्यातली दारू हा बॅ. राकेश (प्राण) आपला प्राण सोडेपर्यंत संपत नाही, हे विशेष. तो लाळघोटेपणाही करतो.. विमानात अचानक बिघाड निर्माण होतो. ते नाइलाजाने एका निर्जन बेटावर उतरवावं लागतं. विमान दुरुस्तीसाठी दोनेक तास लागतील असं सांगण्यात येतं. विमान कंपनीचा तो अधिकारी खरंतर आपल्या विमानातच थांबायला हवा की नाही? पण तो नायिका नंदाभोवती गोंडा घोळत तिच्या अवतीभवती राहतो. ते सर्वजण पाय मोकळे करायला निघतात. मनोजकुमार नंदाला मस्काफिकेशन करतो.. इतक्यात विमान सुरू झाल्याचा आवाज येतो..सगळे त्या दिशेने बघतात तो काय! विमान त्यांचं सामान खाली फेकून देत चक्क पसार होतं. भुर्रर्रऽऽ! कुणाची बर्र ही साजीश? 'गुमनाम है कोई, बदनाम है कोई.. अन्जान है कोईऽऽ' आवाज येतोय खरा. ते भूत? भटकती आत्मा? की आणखी काही? प्रेक्षकांत चुळबुळ सुरू.. आम्हाला अनुभव होता, सिनेमा बघताना हे पिटातले भय्ये कधीच गप्प बसायचे नाहीत. पिक्चरमध्ये बाई नाचली की शिट्ट्या काय मारतील. फाईट-सीन आला की चिअर-अप काय करतील.. पण आजचा मामला वेगळा होता. पिनड्रॉप सायलेन्स होता थिएटरात. 'ग़म छोड के मनाओ रंग-रैली..' म्हणत तोकड्या कपड्यात वावरणारी हेलन बघून किंवा 'जान-ए-चमन शोला बदन..' या गाण्यात ओलेती नंदा बघूनही ते चेकाळले नाहीत. ख़ौफ, भीती, दुसरं काय! सगळे शांतपणे पडद्यावर चाललेल्या थराराचा आस्वाद घेत होते.. सिनेमाचा स्टोरी-बोर्ड इतका जबरदस्त की बसलेल्या प्रेक्षकाचं बूड उत्कंठेनं जणू खुर्चीच्या टोकाकडे आलेलं..

पायपीट करत हा ग्रूप एका जुनाट वाड्याकडे येतो. वाड्याचे दरवाजे कर्रर्रSS करत उघडतात. चुळबुळ वाढतेय. मधल्या मोठ्या टेबलावर एक 'लाश' दिसतेय. पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेली. प्राणपासून हेलनपर्यंत सर्वचजण धास्तावलेले. पिटापासून थेट

बाल्कनीपर्यंतचा कोपरा न कोपरा शहारलेला. एक थंड शिरशिरी! प्रेत उठतं. चक्क काटकोनात उभं राहतं. कफन हळुवारपणे खाली घसरतंय.. चेहरा दिसतो. हिटलर की ढेकूणकट मिशीवाला मेहमूद दर्शन देतो. त्याच्या चेहऱ्यावरचे विनोदी भाव पाहून वातावरण क्षणात हलकंफुलकं होतं.. आता थिएटरात हास्याची मंद लकेर उमटते.. स्टोरी पुढे सरकते. जणू ठरलेल्या क्रमाने एकेक मुडदा पडत जातो. या धक्कातंत्रानं प्रेक्षकात एक भीती निर्माण होत जाते. मेहमूदचं अस्तित्व मात्र एक दिलासा देत राहतं. काही वेळाने 'एक लडकी है जिसने जीना मुश्किल कर दिया..' अशा एका पाणचट गाण्याच्या वेळी बरंच पब्लिक बाथरूम किंवा पान-तंबाखूसाठी बाहेर जाऊ लागलं. आम्हीही चान्स घेतला! नाहीतरी इन्टरव्हलला त्या धटिंगणाशी पुन्हा मुकाबला करण्यापेक्षा आताच जाणं सोयिस्कर होतं, नाही का? पुढे कथानकानं आणखी वेग घेतला. मेहमूद हा त्या वाड्यातला खानसामा. हेलन एकदा त्याच्या स्वयंपाकघरात लुडबूड करताना दिसताच तो तिला छेडतो.. आणि हेलन वर्णद्वेषानं त्याला 'काळ्या' म्हणते. गप्प बसला तर तो मेहमूद कसला? 'अरे व्वा रे मेरी जिलेबी!, तू है हरजाई तो अपना भी यहीं तौर सहीं, तू नहीं और सही, और नही और सही.. हम ख़यालोंमें काम चला लेंगे..

*ख़यालो में.. ख़यालो में.. ख़यालो में.. ऽऽ*
*जय हंगामाऽऽ कहाँ भाग रही तूमेंऽऽ काले से डर गये क्या?*
*हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं, हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैं,*
*हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं ऽऽ*

शैलेंद्र, हसरत, शंकर-जयकिशन ही आर.के. कॅम्पची मंडळी. एक वर्षापूर्वी हृषिकेश मुखर्जींच्या 'सांझ और सवेरा' (१९६४) मध्ये यांनी हाच मेहमूद 'अजहू न आए बालमाSS..' असं क्लासिकल आळवताना पेश केला होता. 'गुमनाम'मध्ये मात्र बातच और होती. संपूर्ण चित्रपट हा सस्पेन्स थ्रिलर! महेमूद त्यातला विनोदी अदाकार. इथे तो हैदराबादी लुंगीतला खानसामा होता. त्याच्या तोंडचे संवाद त्याच स्टाईलचे होते, मग त्याला गाणंही तशाच प्रकारचं असायला हवं हे तारतम्य दिग्दर्शकानं पाळलंय. चाकोरीबध्द कथानकात गाण्यासाठी योग्य असा प्रसंग मिळतच नव्हता.. शेवटी दिग्दर्शकीय कौशल्य पहा. दुसऱ्या उपकथानकाचा मोठा फाफटपसारा न लावता त्या चाकोरीतूनच एक विशिष्ट जागा शोधून काढली. सिनेमात सस्पेन्सचा अती डोस देऊनही चालत नाही.. एक नॉशिया येतो. प्रेक्षकांना मध्यंतरापर्यंत गुंगवून ठेवत सस्पेन्सने एक अमुक पातळी गाठताच केवळ उतारा, रिलीफ म्हणून हे गाणं टाकलंय.. (आपल्याला माहीतच आहे की महंमद रफी साहेबांनी मराठी, गुजराती, बंगाली अशा काही भारतीय भाषांमधून चिक्कार गाणी गायली आहेत. महंमद रफींनी चक्क इंग्रजी भाषेतही गाणी गायली आहेत हे ऐकून मात्र आश्चर्य वाटलं. (डच, पर्शियन, क्रिओले भाषेतही ते गायलेत.) 'बहारों फूल बरसाओ..' आणि 'हमें काले है तो..' या चालीतली इंग्लिश गाणी 'यू-ट्युबवर' सापडली. असो!)

आर.के.बॅनरच्या 'आह' (१९५३) मध्ये आपल्या दिग्दर्शनाची चमक दाखवलेल्या राजा नवाथे यांनीच 'गुमनाम' हा चित्रपट आपल्या दिग्दर्शन-कौशल्याने फुलवला होता. श्रेयनामावलीपासून थेट 'दी एन्ड'च्या फलकापर्यंत प्रत्येक फ्रेम उत्कंठावर्धक आणि अनाकलनीय रहस्याने ओतप्रोत भरलेली.. आणि यामुळेच चित्रपट प्रेक्षणीय झाला आहे. 'गुमनाम' मुळेच आम्हाला सस्पेन्स पिक्चर कसा सहन करायचा याचं बेसिक ट्रेनिंग मिळालं.. आणि या उंचावलेल्या मनोबलावर इंग्रजीतले 'दी ओमेन', 'एक्झॉरसिस्ट', 'ईटी', 'एन्टीटी', 'ड्रॅकुला' आणि हिचकॉकचे सिनेमे आमच्या पिढीने पचवले. आता पंचेचाळीस-पन्नास वर्षांनंतर 'गुमनाम' आजच्या पिढीला पुचाट वाटेलही.. पण त्याकाळात याच 'गुमनाम'ने पब्लिकच्या मनात एक 'ख़ौफ' नक्कीच पैदा केलेला. 'गुमनाम' मध्ये मनोजकुमार, नंदा, प्राण, हेलन असे नामवंत कलाकार असले तरी बाजी मारलीय ती मेहमूदने. एस्. एस्. समेळ या तेव्हाच्या सुप्रसिध्द कला-दिग्दर्शकाने उभारलेल्या सेटवर मेहमूद या गाण्याचा ड्रीम-सिक्वेन्स साकारताना अक्षरशः सुटलाय. त्याची नाचतानाची प्रत्येक स्टेप थिएटरात एक चैतन्य निर्माण करते. लुंगी उडवत त्याचं ते नाचणं खरं तर रोंबा-सोंबा वाटावं इतकं सिंपल, पण लोक भान विसरून ठेका देतात. चित्रपटात पुढे बरेच मुडदे पडायचेत हे माहीत असूनही पब्लिक शिट्ट्या मारतं. जिओ भाईजान जिओ..

*ये गोरे गाला तंदाना, ये रेशमी बाला तंदाना,*
*ये सोला साला तंदाना, हाय तेरे ख़याला तंदाना,*
*हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैंऽऽ*
*हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैंऽऽ*

मेहमूद त्याच्या प्रत्येक सिनेमात असाच हातपाय पसरायचा. कानामागून यायचा पण समोर कोणताही हीरो असला तरी त्याच्याहूनही दुप्पट तिखट व्हायचा. जणू त्याला कच्चा खाऊन टाकायचा. थिएटरमधून बाहेर पडणारं पब्लिक आठवायचं ते त्या सिनेमातल्या मेहमूदलाच. बरेच हीरो त्याला जाम टरकून असायचे. नायक ठोकळा असला की निर्माते खास मेहमूदसाठी उपकथानकाचं ठिगळ जोडायचे. त्याच्यासाठी खास गाण्यांची योजना असे. 'परवरीश' (१९५८) मध्ये तर तो राजकपूरसोबत होता, पण नंतर ते कधीच एकत्र दिसले नाहीत. का? कुणास ठाऊक? 'पांडू हवालदार' नंतर अशोक सराफ जसा दादा कोंडकेंच्या पुढच्या कोणत्याच सिनेमात दिसला नाही, तसंच असावं बहुतेक!.. स्साला, चित्रपट खाऊन टाकतो म्हंजे काय!?

'हकीकत', 'हिमालय की गोद में', 'आरजू', 'वक्त', 'काजल', 'खानदान' असे सरस सिनेमा स्पर्धेत होते तरी 'ए' सर्टिफिकेट मिळालेला 'गुमनाम' चांगलाच चालला म्हणायचा. पुढे हा मेहमूद वाढता वाढता वाढत इतका मोठा झाला की यश त्याचे तळवे चाटू लागलं. बॉम्बे टू गोवा, पडोसन, साधू और शैतान, शबनम, मैं सुंदर हूँ, दो फूल, आँखे, पत्थर के सनम, जोहर मेहमूद इन गोवा-सिमला-हाँगकाँग, हमजोली, कुँवारा बाप, सबसे बडा रुपय्यापर्यंत त्याने कमाल करत लोकांची झोप उडवली होती.. परंतु ग्लॅमर आणि पर्यायानं आलेल्या यशाच्या धुंदीमुळे त्याची स्वतःची झोप मात्र उडाली होती. त्याने झोपेच्या गोळ्या खाण्याचं व्यसन लावून घेतलं होतं. पुढचे दोनेक चित्रपट फ्लॉप होताच त्याने इंडस्ट्रीला सरळ रामराम ठोकत आपलं बंगलोरचं स्टड-फार्म गाठलं. मेक-अपच्या डबीचा वास कलावंताला स्वस्थ बसू देत नाही हेच खरं. नव्या सिनेमासाठी त्याने कंबर कसलेली. भाईजान परत करिष्मा दाखवायला येतायत अशी हवा होती. पण हायऽऽ! त्याच्या तेरा-चौदा वर्षांच्या गॅपनंतर आलेला 'दुष्मन दुनिया का' आला कधी आणि गेला कधी हेच कळलं नाही... मेहमूदने हल्लीच या जगातूनही कल्टी मारली.. आपल्याला आठवणींचा खजिना देऊन. त्याचे सिनेमे कधीकाळी कुठल्याही चॅनलवर लागले की आपल्या ओठावर हसू फुटतं आणि आपण सहज गुणगुणायला लागतो..

*हमें माना गरीबा तंदाना, सूरत से अजीबा तंदाना,*
*पर फिर भी नसीबा तंदाना, ये तेरे करीबा तंदाना,*
*हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैंऽऽ*
*हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैंऽऽ*

♥

आपल्या आवडत्या गाण्यांच्या यादीत हे गाणं आहे म्हणूनच या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओज आणि सोबत कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक सुद्धा देत आहे :

१. हमें काले हैं तो क्या हुआ.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=lLgrhR9rjyM

२. हमें काले हैं तो क्या हुआ..(ब्रह्मचारी)(व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=wBABkzlbcT4

३. हमें काले हैं तो क्या हुआ.. (कराओके) https://www.youtube.com/watch?v=NHeqqlyubng

४. संपूर्ण चित्रपट : गुमनाम (१९६५) https://www.youtube.com/watch?v=G5sTlDelaKs

५. 'हमें काले है तो..' (इंग्रजी काव्य-ऑडिओ) https://youtu.be/0NAbnClam7U

♥

## ११ : हमें काले है तो क्या हुआ..

चित्रपट : गुमनाम (१९६५)
निर्मिती : पृथ्वी पिक्चर्स
दिग्दर्शक : राजा नवाथे
गायक : महंमद रफी आणि मेहमूद
गीतकार : शैलेंद्र
संगीत : शंकर-जयकिशन

ख़यालो में.. ख़यालो में.. ख़यालो में..
जय हंगामाss कहाँ भाग रही तूमें..
काले से डर गये क्या?

हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं,
हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैं,
हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं - २ ।। धृ ।।

ये गोरे गाला तंदाना, ये रेशमी बाला तंदाना,
ये सोला साला तंदाना, हाय तेरे ख़याला तंदाना,
हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैंss
हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैंss ।। १ ।।

तुमे किधर को जातै तंदाना, क्यूँ पास न आतै तंदाना,
क्या मार ये बाता तंदाना, दिल तोड ये धाता तंदाना,
हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैं..
हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं.. ।। २ ।।

हमें माना गरीबा तंदाना, सूरत से अजीबा तंदाना,
पर फिर भी नसीबा तंदाना, ये तेरे करीबा तंदाना,
हम तेरे तेरे तेरे, चाहनेवाले हैं..
हमें काले हैं तो क्या हुआ, दिलवाले हैं.. ।। ३ ।।

♥

## 12 : Ye Duniya, Ye Mehfil..

## १२ : ये दुनिया ये महफ़िल..

राजकुमारला पाहताच अमिताभच्या चेहऱ्यावर चांदणं फुललं. झटकन उभा राहिला तो.. 'बैठीए.. राजसाहब..' 'अरे! नही.. नही.. आप बैठीए.. बीमार तो आप है जनाब..!' 'कुली'च्या सेटवर पुनीत इस्सारकडून सणकून मार खाल्ल्यानंतर पुढे बरेच दिवस आजारी असलेल्या अमिताभने त्यानंतरच्या पहिल्याच पार्टीत 'राज'ला पाहताच आदराने सीट ऑफर केलेली. 'जानी'च तो! सरळ बोलला असेल तर शपथ! इंडस्ट्रीत त्याची प्रतिमा सनकी अशीच होती. झीनत अमान प्रसिध्द अभिनेत्री झाल्यानंतरही एका पार्टीत तिला पाहताच.. 'तू बऱ्यापैकी सुंदर दिसतेस.. फिल्मलायनीत का नाही प्रयत्न करत?..' असा सडेतोड सल्ला दिल्याचं तुम्ही वाचलं असेलंच ना? तळलेल्या सुक्या बांगड्याच्या वासाने कर्मठ बामणाचं तोंड जितकं वेडंवाकडं होईल, तसा चेहरा करत झीनत तिथून सटकली होती म्हणे. आता यातलं खरं खोटं राम जाने, पण आपल्याला बुवा जानी मनापासून आवडायचा. खरंच तो सनकी होता का? सरदारजींचे जोक्स जसे या कानाचं त्या कानाला करत वाढता वाढता वाढत गेले तसे जानीचे अनेक किस्से! कोंबडीशिवाय उरूस नाही, भानगडीशिवाय पुरुष नाही असं म्हणतात पण राजच्या 'तसल्या' भानगडी मात्र कधीच ऐकू नाही आल्या. बऱ्याच सिनेमात त्याची एन्ट्रीच मुळी धाँसू असायची. बुटापासून कॅमेरा सुरू व्हायचा. बूट शक्यतो पांढरेच असायचे. पावलागणिक उत्कंठा वाढायची. एकदाचा कॅमेरा चेहऱ्यावर स्थिरावला की प्रेक्षकांमध्ये एक चैतन्यमय लाट यायची. संवादफेकीतलं त्याचं स्वतःचं असं अजब कौशल्य पिटापासून बाल्कनीच्या कोपऱ्यापर्यंतच्या पब्लिकला गारद करायचं.

माझी आणि जानीची रुबरू भेट कधी झाली होती ठाऊकेय? 'मै खिलाडी तू अनाडी' (१९९४) या आमच्या कंपनीच्या चित्रपटाच्या प्रिमिअर-शोच्या निमित्तानं. नॉव्हेल्टी सिनेमा! राजकुमारजी आपल्या लेकाला-'पुरुरवा'ला (काय नाव आहे!) घेऊन पिक्चर बघायला आलेले. रॉ-सिल्कचा जांभळट रंगाचा त्यांचा शर्ट आत्ता याक्षणी आठवतोय. मी आयोजकांपैकी असल्याने बॅज वगैरे लावून थिएटरच्या मुख्य प्रवेशव्दाराशी आपल्या पत्रकार मंडळींची वाट पाहत होतो. बाहेर आणि फुटपाथवर बरंच पब्लिक होतं. स्टार्सना पहायला. हीऽऽगर्दी! नॉव्हेल्टी सिनेमा आणि 'शीतल' शो-रूमसमोर ट्रॅफिकचा किती प्रॉब्लेम आहे ठाऊक आहे ना! तेव्हाही होता आणि पिक्चरचा प्रिमिअर-शो म्हणता आज जरा जास्तच होता. पार्किंग प्रॉब्लेममुळे राजकुमारजींची गाडी प्रवेशव्दारासमोरच थांबली. जानी उतरले मात्र.. ऑटोग्राफ प्लीऽऽज करत पब्लिकने त्यांना क्षणात घेरलं. ते दबा धरून बसले होते की काय कुणास ठाऊक? जानी त्या आकस्मिक हल्ल्याने पुरते बावरले. घाबरले. संरक्षणार्थ मागवलेले पोलिस कुठे उलथले होते कुणास ठाऊक! लोक अंगचटीला येतायत ते पाहून, न पोहता येणारा माणूस जसा वाचवा..वाचवा करतो तसा काहीसा तो सीन होता. माझ्या बाजूला नेमका जॉनी लिव्हर उभा. ओळख नसतानाही मी त्याच्या हाताला धरून गर्दीत झेपावलो. आम्ही दोघांनी कडं करून राजकुमारजींना कसं-बसं मुख्य प्रवेशव्दारातून आत आणलं. शर्टचा चोळामोळा झालेला. आता हा माणूस वेगळ्या अर्थानं 'ये दुनिया ये महफ़िल मेरे काम की नही..' म्हणत आमच्या कानफाटात मारून वॉक-आऊट करतोय की काय म्हणून टेन्शन आलं. पण नाही! अनू मलिकनं पुढाकार घेत राजजींना शांत केलं. (जंगलातला शेर मानवी वस्तीत आल्यावर मामुली लोक त्याला दगड मारणारच नाही का? असो!) खरंच तो सनकी होता का? असा प्रश्न मला पडला. कारण त्यांचं वागणं निदान त्याक्षणी तरी अतिशय नॉर्मल वाटलं.

थोड्याच वेळात समोर स्टेजवर संगीताची तडाखेबंद विक्री झाल्याबद्दल संबंधित असलेल्या सर्वांना राजकुमारजींच्या हस्ते (काय संबंध?) ट्रॉफीज देऊन गौरविण्यात आलं. निवेदकाने गीतकार हसरतजींचं नाव सर्व नावांनंतर शेवटी घेतलं म्हणून हसरतजी अपमान झाल्यागत वैतागले. तिथे मानापमानाचा एक छोटासा एपिसोडही रंगला. आश्चर्य म्हणजे राजकुमारजींनी हात जोडून हसरतजींना शांत केलं. ट्रॉफी दिली. राजजींचं ते वागणं पाहून मनात एकच विचार आला.. हा माणूस आणि सनकी? तो एपिसोड संपला एकदाचा. चला सुटलो एकदाचे! आता पिक्चर बघुया! मी राजकुमारजींच्या बचावकार्यात पुढे होतो, त्यामुळे माझ्या बॉसने मला राजजींच्या अवतीभवतीच्याच सीटवर बसायला सांगितलेलं. मन क्षणभर मोहरलं. चित्रपटसृष्टीतल्या एका बादशहाच्या बाजुला बसून पिक्चर बघायचं? वॉव! पण क्षणात ती जागा अनामिक भीतीने घेतली.. शेवटच्या 'रो'मध्ये मधल्या भागात पहिल्या सीटवर मी, पुढच्यात राजकुमारजी, नंतर पुरु आणि त्याच्या बाजुला जॉनी लिव्हर असे आम्ही बसलो! पुढच्या रांगेत अनू मलिक सपत्निक वगैरे वगैरे.. चित्रपटाच्या पार्श्वसंगीताचं ध्वनिमुद्रण माझ्यादेखत झाल्याने पिक्चरचा प्रत्येक सीन मला ठाऊक होता. राजजी माझ्याशी अजिबात बोलत वगैरे नव्हते (कशाला बोलतील? कहाँ राजा भोज..) पण त्यांचं माझ्या शेजारी बसणं मलाच सॉलिड अन्कम्फर्टेबल झालेलं. भिजलेलं मांजर बसतं ना तसा अंग चोरून बसलेलो मी खुर्चीत! अमुक जागी हसू यायचं.. पण हसायचे वांधे होते यार! पिक्चर सुरू झाला. बाजुलाच जॉनी लिव्हर आणि पुरु हलक्या आवाजात कुजबुजत होते. राजजी शांतपणे

स्क्रीनवरचा तमाशा पाहत होते. मी अवघडल्यागत बसलेलो. गाणं आलं की कसं झालंय अशी दाद मागायला अनू मलिक मागे वळून पहायचा. राजजी दिलखुलासपणे दाद द्यायचे. मजा आ रहा था! मध्येच जॉनी लिव्हर उठून काही कामामुळे निघून गेला. पिक्चरमध्ये पुढे एक सीन आहे.. (आता मी टेन्शनमध्ये.. पळावं तरी कसं?) इन्स्पेक्टर असलेला अक्षयकुमार, फिल्मस्टार सैफच्या घरी जातो. त्याला उचलायला! सैफचा सेक्रेटरी जॉनी लिव्हर त्याचं व्यक्तिमत्त्व पाहून चित्रपटात काम कर असा सल्ला देतो. तो पोलिस इन्स्पेक्टर आहे हे कळताच जॉनी लिव्हर चेकाळतो. पूर्वायुष्यात इन्स्पेक्टर असलेल्या राजकुमारजींचं उदाहरण देत त्यांची ॲक्टींग करत, त्यांच्या आवाजात नक्कलही करतो. बापऽऽरे! झाले की वांधे! हा सीन इतरांसाठी विनोदी खरा पण ज्याची नक्कल करून टर उडवलीय ती सन्माननीय व्यक्ती आपल्या बाजुलाच बसलीय. आणि मुख्य म्हणजे ते जबरदस्त सनकी आहेत, पट्‌कन भडकतात वगैरे ऐकून होतो. माझे धाबे दणाणले. घाम फुटला. इतका वेळ शांत बसलेल्या राजजींनी जॉनी लिव्हर बसलेला त्या दिशेने हात करत माझ्याकडे वळून विचारलं.. 'कहाँ गया ये?..' मला काय बोलावं ते कळेना. 'मैं.. मै ..देखता हूँ..' असं म्हणत मी तिथून असला सुंबाल्या केलाय म्हणता! ते चिडून जॉनी लिव्हरला सगळ्यांदेखत चमाट मारतील, काहीतरी 'राडा' होईल की काय या भीतीने मी पुढचा पूर्ण चित्रपट राजजींपासून लांब बसून बघितला. त्या अवधीत, संभाव्य धोका ओळखून बहुदा जॉनी लिव्हर पळून गेला असावा...

नाव - कुलभूषण पंडित. जन्म शुक्रवार दि. ८ ऑक्टोबर, १९२६. बलुचिस्थान (पाकिस्तान). काश्मिरी हिंदू. 'राजकुमार' हे टोपणनाव. सिनेमासाठी. १९५२मध्ये रेहाना सुलतान या अभिनेत्री (?)बरोबर 'रंगीली'व्दारा कारकीर्द सुरू करणारा आणि पुढे रसिकांचा लाडका झालेला 'जानी' मोजून बासष्ट चित्रपटात चमकला. पण त्याचा दबदबा इथे चाळीसेक वर्षे अबाधित होता. टॉक-टॉक करणारे बूट, टाईट पतलून ही प्रतिमा आवडत असली तरी हळवा जानी काळजावर कोरीव काम करता झाला तो चेतन आनंदच्या 'हीर-रांझा' (१९७०) मध्ये. प्रिया राजवंशसारखी दगड हिरॉइन. (काय पाहिलं तिच्यात?) पत्थराला पाझर फोडू शकेल असं 'ये दुनिया ये महफ़िल मेरे काम की नही..' हे गाणं मला आत्ता या क्षणी आठवतंय. ते ज्याच्यावर चित्रीत झालं तो राजकुमार, गायक महंमद रफी, संगीतकार मदन मोहन, गीतकार कैफी आजमी यापैकी कुणीच आज आपल्यात नाहीत ही खंत काळीज पोखरतेय. स्टोरी तशी तुमच्या-आमच्या माहितीतली. पंजाब मुलखात घडलेली. प्राण, जयंत, अजित, जीवन ही व्हीलन मंडळी आणि हिरो आपला 'जानी'! मदर-इंडिया, नौशरवान-ए-आदिल, पैग़ाम, उजाला, दिल अपना और प्रीत पराई, दिल एक मंदिर, काजल, वक्त, हमराज, नीलकमलपेक्षा राज इथे वेगळा वाटला होता. हळवा प्रेमवीर! प्रिया राजवंश शून्य तर हा शंभर नंबरी सोन्यासारखा पडद्यावर राज करत होता. झळाळत होता. आपल्या महंमद रफीच्या आवडीच्या गाण्यातलं अतिशय सुंदर चालीतलं गीत. विरहगीत असूनही मस्त पेशकश! गाण्यातलं हळवेपण पहा..

*किसको सुनाऊँ हाल दिल-ए-बेक़रार का,*
*बुझता हुआ चराग हूँ अपने मजार का,*
*ऐ काश भूल जाऊँ, मगर भूलता नही,*
*किस धूम से उठा था जनाज़ा बहार का,*
*ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही...*

तसा तो गाण्यांच्या रेकॉर्डिंगला कधीच जात नसे. तो फक्त संवादांवर बाजी मारायचा त्यामुळे त्याचा सुरांशी दोस्ताना असणं तसं कठिणच. सूर संवादी असतात याचा त्याला गंधच नव्हता. अचानक फेमस ताडदेवला मदनभैया 'टेक' करणार आहेत म्हणता गोल्डीबरोबर तो तिथे टपकला होता. रफीसाहेब पांढऱ्या शुभ्र कपड्यात मौजूद होते तर हँसी-मजाक करत दहाच्या ठोक्याला टी-शर्ट, हाफ-पॅण्ट या पेहरावात मदनमोहन रेकॉर्डिंगरूममध्ये दाखल झाले. सोनिकने नोटेशन पेपर्स सर्वांना वाटले. रिहर्सल सुरू. उस्ताद रईस खाँ-सितार, पं. रामनारायणजी-सारंगी आणि करीम खाँसाहेब तबल्यावर आपली हुकुमत गाजवायला सरसावले. इक्बालमियाँनी ढोलकवर थाप देऊन वन-टू देताच व्हायोलिनच्या ताफ्याने जोरकस 'सा' लावला... 'ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नहीऽऽ' रफीसाहेब आर्तस्वरात गात होते. 'किसको सुनाऊँ हाल दिल-ए-बेक़रार काऽऽ' हे कडवं संपतंय तोच मंदिरातल्या मृदुंगाच्या ठेक्यावर जीव जडला.. मस्जीदसमोर गायली जाणारी 'नात' सोनिकच्या हार्मोनियममधून पाझरताच छातीत एक आपसुकच कळ येते.. 'उनको ख़ुदा मिले, है ख़ुदा की जिन्हे तलाश...' हे वाक्य हृदयावर खंजीर फिरवू लागतं. शेवटच्या कडव्याआधीचा आलाप रफीसाहेबांनी असा म्हटलाय की जीव ओवाळून टाकावा. चार अंतऱ्यांचं गाणं पण ती सात मिनिटं आपण त्या 'हीर-रांझा'च्या कहाणीत आपल्या नकळत बेमालूमपणे ओढले जातो. गाणं संपलं! त्या गाण्याचा इम्पॅक्ट वादकांवरही इतका झाला की काही क्षण तिथे सन्नाटा पसरला. एकेका गाण्याचं काय नशीब असतं पहा! सनकी म्हणून प्रसिध्द असलेला राजकुमार गाणं टेक होताच म्युझिक-हॉलमध्ये बराच वेळ निःशब्द शांततेत कावराबावरा होत इकडे-तिकडे पाहत हळूच

डोळे पुसत होता. आज कैफी आजमींच्या शब्दांनी आणि मदनमोहनजींच्या संगीताने त्याची संवादी (?) सुरांशी जानपहचान करून दिली होती. हे मास्टरजींनी (सोनिकदा) त्यांच्या मुलाखतीत सांगितलं. गाण्यातला एकेक शब्द मनाला छिन्नविच्छिन्न करत होता.

*अपना पता मिले, न खबर यार की मिले,*
*दुष्मन को भी न ऐसी सजा प्यार की मिले,*
*उनको ख़ुदा मिले, है ख़ुदा की जिन्हे तलाश,*
*मुझको बस इक झलक मेरे, दिलदार की मिले,*
*ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही..*

जानीच्या वाट्याला अशी हळवी प्रेमगीतं कमीच आली. लव्ह-सीन्समध्ये तर जनाब अक्षरशः पाट्या टाकायचे. व्यक्तिमत्त्वात रांगडेपण, पोलिसी खाक्या असल्यानेच की काय त्यांना जीतूसारखा धसमुसळेपणा अजिबात शोभला नसता. शम्मीसारखं याऽऽहूँ! तर जमलंच नसतं. त्यांचं ऐटबाज चालणं, स्टायलीश बोलणंच सबकुछ होतं. मला 'नौशरवान-ए-आदिल'(१९५७) आठवतोय. सी. रामचंद्रजींच्या संगीतात न्हालेलं 'तारों की जुबाँपर है मुहब्बत की कहानी..' बेमिसाल सुरावटींनी नटलंय खरं पण राजजींचं त्यावर नाचणं खूपच हास्यास्पद वाटतं की नाही? नुसती कवायत! जानीची डायलॉगबाजीच ग्रेट! आणि.. हळवेपण 'हीर-रांझा' मधलं!!

*सहरा में आके भी, मुझको ठिकाना ना मिला,*
*ग़म को भुलाने का, कोई बहाना ना मिला,*
*दिल तरसे जिसमें प्यार को, क्या समझू उस संसार को.*
*इक जीती बाजी हार के, मैं ढुंढू बिछडे यार को,*
*ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही..*

१९५० साली माहीम पोलिस ठाण्यात सब-इन्स्पेक्टर म्हणून पोस्टींग झालेले कुलभूषण पंडित अचानक 'रंगीली'व्दारे स्टार काय झाले आणि अल्पावधीत रसिकांच्या हृदयसिंहासनावर विराजमानही झाले. 'पैग़ाम' मध्ये बडे-मियाँशी टक्कर! पुढे राजेंद्रकुमार, सुपरस्टार हे बिरूद मिरवणारा राजेश खन्ना तसेच जितेंद्र, मनोजकुमार यांच्याबरोबरही सिनेमे केले. फिल्मफेअरच्या चाळीस वर्षांत उत्कृष्ठ अभिनेत्याचा एकही पुरस्कार मिळाला नाही, पण १९६३ साली 'दिल एक मंदिर' आणि १९६५ साली 'वक्त'साठी सहनायकांचे पुरस्कार मिळाले त्यातच ते समाधानी राहिले. १९९०साली घशाच्या आजाराने त्यांच्यावर बंधन आलं तरी सुभाष घईंच्या 'सौदागर' आणि मेहुलकुमारांच्या 'तिरंगा' मधून आपल्या चाहत्यांना रिझवलंच ना? ते सनकी नव्हते. लहरी असतील. आग्रही म्हणता येईल. आपल्या गोष्टी आपल्या मनासारख्याच व्हाव्यात म्हणून आग्रही! पण त्यांच्यावर शिक्का मारला गेला तो विक्षिप्तपणाचा. उर्मट नव्हते पण उध्दटपणाची कवचकुंडलं सतत देहावर वागवायचे, म्हणूनच की काय कित्येकजण त्यांना पैदाईशी पागल समजून चार हात दूर रहायचे. ते स्पष्टवक्ते होते, अतिशय मूडी होते यात वाद नाही. पण वक्तशीर होते. आपल्या चित्रपटाच्या कथानकाबद्दल, संवादांबद्दल सदैव जागरूक असायचे. त्यांच्या स्वभावाचे असे अनेक पैलू माहीत असूनही त्यांच्यावर पब्लिक प्रेम करायचं. फिल्मइंडस्ट्रीतले काहीजण मात्र त्यांना टाळायचे. पण दुनियेची पर्वा होती कुठे त्यांना?

मंगळवार, २ जुलै, १९९६ची मध्यरात्र! आपल्या वरळीच्या बंगल्यात त्या रात्री दोन वाजता त्यांना अस्वस्थ वाटू लागलं होतं. छातीतून कळा येत होत्या. त्यांनी पुरूला जवळ बोलावलं.. 'माझ्या मृत्यूची बातमी अंत्यसंस्काराचे सोपस्कार पूर्ण होईपर्यंत कुणालाही देऊ नकोस..' कदाचित अलोट गर्दी होईल.. आणि आपल्या देहाला अग्नी मिळायला विलंब होईल म्हणून याही बाबतीत ते आग्रही राहिले होते... कदाचित.. कदाचित त्यांचं मन त्या क्षणी आक्रंदन करत फक्त एवढंच म्हणालं असेल..

*'दूर निगाहों से, आँसू बहाता है कोई.. कैसे न जाऊँ मैं, मुझको बुलाता है कोई,*
*या टूटे दिल को जोड दो, या सारे बंधन तोड दो..*
*ऐ परबत रस्ता दे मुझे, ऐ काँटो दामन छोड दो..*
*ये दुनिया ये महफ़िल , मेरे काम की नही...मेरे काम की नही...'*

♥

## १२ : ये दुनिया ये महफ़िल..

चित्रपट : हीर रांझा (१९७०)
दिग्दर्शक : चेतन आनंद
गायक : महंमद रफी
गीतकार : कैफी आजमी
संगीत : मदनमोहन

ये दुनिया ये महफ़िल , मेरे काम की नही, मेरे काम की नही - ३
किसको सुनाऊँ हाल दिल-ए-बेक़रार का,
बुझता हुआ चराग हूँ अपने मजार का,
ऐ काश भूल जाऊँ, मगर भूलता नही,
किस धूम से उठा था जनाज़ा बहार का,
ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही

अपना पता मिले, न खबर यार की मिले,
दुष्मन को भी न ऐसी सजा प्यार की मिले,
उनको ख़ुदा मिले, है ख़ुदा की जिन्हे तलाश,
मुझको बस इक झलक मेरे, दिलदार की मिले,
ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही

सहरा में आके भी, मुझको ठिकाना ना मिला,
ग़म को भुलाने का, कोई बहाना ना मिला,
दिल तरसे जिसमें प्यार को, क्या समझू उस संसार को.
इक जीती बाजी हार के, मैं ढुंढू बिछडे यार को,
ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही, मेरे काम की नही

दूर निगाहों से, आँसू बहाता है कोई,
कैसे न जाऊँ मैं, मुझको बुलाता है कोई,
या टूटे दिल को जोड दो, या सारे बंधन तोड दो,
ऐ परबत रस्ता दे मुझे, ऐ काँटो दामन छोड दो..
ये दुनिया ये महफ़िल, मेरे काम की नही...मेरे काम की नही...३

♥

रसिकांचं अतिशय आवडतं असं हे गाणं. ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याचा 'ऑडिओ, व्हिडिओ आणि सोबत कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. ये दुनिया ये महफिल.. (उपलब्ध ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=q5i-qZIUR_Y

२. ये दुनिया ये महफिल.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=7_JAMBmnY54

३. ये दुनिया ये महफिल.. (चित्रपटातील गाणे) https://www.youtube.com/watch?v=6L8OPIWVyrM

४. संपूर्ण चित्रपट : हीर-रांझा (१९७०) https://www.youtube.com/watch?v=97wp7w1k6-Q

♥

## 13 : Tu Ganga Ki Mauj Main…

## १३ : तू गंगा की मौज मैं..

'क्या हुआ नौशादमियाँ?' गच्चीत उभं राहून खालच्या रहदारीकडे पाहता पाहता मी सदऱ्याच्या बाहीने डोळे पुसल्याचं भट्टसाहेबांनी अचूक हेरलं होतं.. 'सामने देख रहे है आप? तो फुटपाथ!.. मी माझ्या स्ट्रगल पिरियडमध्ये तिथं झोपायचो.. हा फुटपाथ पार करायला मला चौदा वर्षे लागली..' ती इमारत! आता तिथे बाबुभाई जगजीवनदासचं भव्य शो-रूम आहे. ब्रॉडवे थिएटर होतं तिथे. समोरच्या फुटपाथवर आजच्यासारखा माहौल नव्हता. स्टॉल्स नव्हते. फेरीवाले नव्हते.. '१९३७ साली महंतजींच्या कंपनीत चाळीस रूपये मासिक तनख्यावर मी संगीतकाराची नोकरी करायचो. ब्रॉडवे सिनेमासमोरचं शिवाजी भवन. अंधाऱ्या जिन्याखाली पथारी पसरून स्टुडिओंच्या चकरा मारून थकलेला माझा जीव पाठ टेकायचा. अंधारामुळे जिना शोधणाऱ्यांची, चढणाऱ्या-उतरणाऱ्यांची हमखास लाथ बसायची.. ब्रॉडवेचा लास्ट शो संपताच लख्ख उजेड व्हायचा. सोड्याची बाटली उघडावी तशी भसाभसा गर्दी बाहेर पडायची. पथारीवर तळमळत त्या गर्दीकडे आणि ती गर्दी ज्यांच्यासाठी लोटलीय त्या पोस्टर्सकडे पहायचो. तसल्या पोस्टर्सवर आपलं नाव कधी झळकेल का या विवंचनेत उशी अश्रूंनी चिंब भिजवत निद्राधीन व्हायचो मी..' मुलाखत देता देता नौशादजी क्षणभर सुन्न झाले.. नौशादजी म्हणजे संवेदनशील माणूस हे तुम्ही जाणताच. जुन्या आठवणींनी त्यांचा आवाज अधिकच कापरा झालेला. त्यांनी ब्रेक घेतला व ते आत वळले. माझ्या शेजारी त्यांचा मुलगा राजू नौशाद बसलेला. त्याने स्पष्टपणे सांगितलं की.. 'मी बघतोय मघापासून.. त्यांनी ज्या गोष्टी आपलं आत्मचरित्रात लिहून घेताना सांगितल्या होत्या ना ते त्या तशाच सांगताहेत. तुझ्या कॉलमसाठी 'बैजू बावरा'ची कथा तुला हवीय ना! तर त्यांनी आपल्या आत्मचरित्रात ती जशी लिहून घेतलीय ना तीच उधृत कर. त्या अनुषंगाने हवं तर जुजबी प्रश्न विचार. पण त्यांच्या बालपणीच्या वगैरे बोचऱ्या आठवणी काढत राहिलास तर ते मिनिटा-मिनिटाने हळवे होत जातील. तू लिही पण कोणत्याही परिस्थितीत लोकापवादात अडकू नकोस म्हणजे झालं...' असं म्हणाला. माझी नजर आता बाजुच्या दोन्ही भिंतीलगत ठेवलेल्या दोन मोठ्या काचेच्या शो-केसकडे वळली. पेंढा भरलेले दोन भले वाघ 'खाऊ का?' अशा नजरेने पाहत होते. ते दोन्ही वाघ नौशादजींच्या शिकारीच्या शौकाची निशाणी होती.. इतका संवेदनशील माणूस आणि शिकारी?.. असो!

काळ उलटला. प्रेमनगर (१९४०) ते रतन (१९४४), अनमोल घडी (१९४६), अंदाज (१९४९), दिल्लगी, बाबुलपर्यंतच्या यशाचा सिलसिला सुरू झाला. दादरला नव्याने घेतलेल्या फ्लॅटमध्ये यशाचे खजूर खात असताना अचानक दारावर दस्तक ऐकली. प्रकाश पिक्चर्सचे भट्टबंधू आलेले.. नौशादजींनी त्यांचं स्वागत केलं.. विचारलं.. 'आज अचानक?.. कुछ खास?' विजयभाई आणि शंकरभाई परेशान दिसत होते. 'मियाँ आप यहाँ इफ्तार के खजूर खा रहे है! हम तो आसमानसे टपके और खजूर पे लटके है. हमेशा तुम्हाला मुहूर्तासाठी बोलवायला यायचो ना! ऑफिसला टाळं मारायची पाळी आलीय आमच्यावर!..' बोलता बोलता चक्क कोटाच्या खिशातून कुलुप आणि किल्ली काढून टीपॉयवर ठेवली शंकरजींनी. नौशादजी शहारले. करिअरच्या सुरुवातीला ज्यांनी मदतीचा हात दिला अशांची ही परिस्थिती?

'विजयजी, फिल्म सुरू करा.. मी आहे तुमच्याबरोबर!'
'ये हुआी ना बात!'

मुहूर्त झाला. बैजूबावराचा! गुर्जरी कथानक होतं. सेल्युलाईडवरची आणखी एक प्रेमकथा. एक संगीतिका! 'नायिकेच्या भूमिकेसाठी नर्गीसला घेऊया. बैजूसाठी बडे मियाँ (दिलीपकुमार) कसे वाटतील?'
'तुम्हाला प्रकाश पिक्चर्सच्या ढासळणाऱ्या भिंती सावरायच्याहेत की सगळं फुंकून भुकेकंगाल व्हायचंय? ॲक्टर नको कॅरॅक्टर घ्या. कशाला हवेत स्टार?.. फक्त बजेट वाढवायला?..' नौशादजींचा रुद्रावतार पाहून उड्या मारणारे भट्टबंधू चिडीचूप. विचार करून ऐन तारूण्यातली मीनाकुमारी पंधरा हजारात तर बैजूच्या रोलसाठी भारतभूषणला पाचेक हजारात पटवलं. 'घसीट खाँ' च्या भूमिकेसाठी राधाकिशन आणि 'मियाँ तानसेन'साठी सुरेंद्रची निवड झाली.

'बैजूबावरा' (१९५२) चित्रणाला सुरुवात झाली. एकेक प्रसंग शूट होत होता. एकीकडे नौशादजी गाणी करण्यात मग्न होते. बैजूसाठी रफीचा आवाज. मस्त सिच्युएशन होती. धारेत नाव सापडली आहे. लगाम सुटल्यावर घोड्यानं उधळावं तशी बेफाम नाही पण वाऱ्याच्या झोताबरोबर किनारा सोडून पैलतीरी चाललीय. हलके हलके हेलकावे घेत. त्यात बसलेली गौरी! एकटी! बावरलेली! बैजूच्या चेष्टेने गौरी परेशान झालीय. वल्हं मारत ती आपली नाव सावरायचा प्रयत्न करतेय. किनाऱ्यावर उभा असलेला

बैजू आणि गावकरी! एखाद्या संगीतकारानं इथं 'प्रॉन्झी' - नावाड्याचं गीत योजलं असतं. प्रतीकात्मक! एका ठरलेल्या स्टाईलमध्ये गाणं बांधलं असतं. पण शकील बदायुनींनी त्यात सौम्यशी छेडछाड असणारा रोमान्स शोधला. बैजूच्या ओठातून आर्त तान उमटताना दाखवली. नौशादजींनी त्या काव्याला संगीताचे भरजरी अलंकार चढवले..

*अकेलीऽऽमन जईयो, राधेऽऽजमुना के तीरऽऽ*
*हो जी होऽऽ तू गंगा की मौज मैं जमुना का धारा, हो रहेगा मिलन,*
*ये हमारा, तुम्हारा रहेगा मिलन, ये हमारा-तुम्हारा...*

रोमान्स! छेडछाडीतलं थ्रील! दोघांच्या मान हुरहुर आहे. आपलं प्रेम आज या बैजूच्या गाण्यामुळे जगजाहीर होतंय याची लज्जा गौरीच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतेय. त्याच्या शब्दांच्या भडिमारानं जीव नकोसा झाल्याची फीलिंगही आहे तिच्या डोळ्यांमध्ये. नौशादजींनी या गाण्यासाठी 'राग' कोणता निवडलाय? प्रथम प्रहरकी रानी भैरवी! तुम्ही या रागात बऱ्याच रचना ऐकल्या असतील. मै पिया तेरी तू माने या न माने.., दो हंसो का जोडा.., दिल का खिलौना हाये.., सुनो छोटीसी गुडिया की.., मनभावन के घर.., तेरा जाना दिल के अरमानों का.., अजहून आये बालमा.., दुनिया न भाए मोहे.., लागा चुनरी में दाग.. किती गाणी सांगावीत? पण नौशादजींनी या प्रसंगासाठी तो 'राग' पायाभूत म्हणून वापरताना काय करिष्मा केला आहे पहा. सुगंधी मोगऱ्यासारख्या टपोऱ्या, आशयसंपन्न शब्दांमध्ये रोमान्स पेरताना शकीलने जसा हात आखडता घेतलेला नाही तसाच नौशादजींनी त्या काव्याला रसपरिपोषक चालीने नटवताना आपलं सारं कौशल्य पणाला लावलंय. रफी तर सुभानल्ला! भारतभूषण हा खरंतर ठोकळा. काय नशीब असेल या माणसाचं? त्याच्या कारकीर्दीत त्याला अशी सरस गाणी मिळालीत की कुणालाही हेवा वाटावा. पण त्याला कुठल्याही गाण्यात बघा. रफी बेंबीच्या देठापासून उंच पट्टीत गायला असेल. त्याचा आवाज तार सप्तकापर्यंत जात असेल, पण आपला हा 'भाभू'? हा नुसता पुटपुटतो. स्वगत म्हटल्यासारखा! चेहऱ्यावरची माशीही उडत नाही. गाण्यातले आरोह-अवरोह, सूर.. काही म्हणून काही कळत नाही. दगड लेकाचा! तानसेन झालेला सुरेंद्र तर तौबा तौबा! पण नौशादजींच्या संगीताच्या कशिदाकारीने हे जुनेरही पैठणीहून अधिक किंमती वाटतंय. ऐकणाऱ्याच्या डोळ्यांपुढे प्रसंग जसाच्या तसा उभा करण्याचं सामर्थ्य एखाद्या गाण्यात कसं असू शकतं, त्याचं हे एक उत्तम उदाहरण..

*अगर तू है सागर, तो मंझधार मैं हूँ, मंझधार मैं हूँ,*
*तेरे दिल की कश्ती का पतवार मैं हूँ, पतवार मैं हूँ...*
*चलेगी अकेली ना तुमसे ये नैया, ना तुमसे ये नैया,*
*मिलेगी ना मंजील, तुम्हें बीन खेवैया, तुम्हें बीन खेवैया,*
*चले आओजी, चले आओजी, चले आओ, मौजोंका लेकर सहारा,*
*हो रहेगा मिलन, ये हमारा-तुम्हारा...*

गावात बैजू आणि गौरीबद्दलचीच चर्चा होत असते. गौरीचे पिताजी मोहनजी अस्वस्थ झालेत. ते पंडितजींकडे येतात. हे पंडितजी म्हणजे त्या बैजू आणि गौरीचे संगीत शिक्षक. फिलॉसॉफर-गाईडही.
'गौरीका ब्याह.. जल्दी करायला हवंय. त्या नरपतबरोबर!'
'गौरीका? उसका तो ब्याह हो चुका है.. बैजू से!'
'क्या!' वयस्क मोहनजींचं त्या झटक्याने काही बरं वाईट होऊ नये म्हणून लागलीच..'हां! बैजू गवैया है तो गौरी गीत है. बैजू सूर है तो गौरी बीना है. दोनो को एक-दुसरे से कोई अलग नही कर सकता. अगर दीपक से ज्योती को अलग करोगे तो दीपक बुझ जाएगा.. अंधेरा छा जाएगा.' आत्ताच्या पिढीला हे नाट्यमय प्रसंग कितपत आवडतील कुणास ठाऊक, पण त्याकाळी या चित्रपटानं सर्वांच्याच मनावर भूल पाडलेली.

बैजूबावरातल्या गाण्यांनी तर इतिहास घडवलेला. तू गंगा की मौज मैं जमुना का धारा.., दूर कोई गाये.., झूले में पवनकी.., बचपन की मुहब्बत को.., मोहे भूल गये सांवरीया.., ओ दुनिया के रखवाले.., मन तडपत हरिदर्शन को आज.. अशी एकाहून एक सरस गाणी आपण अत्तराच्या फायाप्रमाणे कानात जडवून ठेवली आहेत. ही गाणी आज साठ वर्षे उलटली तरी ताजातरीन वाटतात आणि ती आपल्या आवडीची आहेत यातच सर्वकाही आलं. सदर गाण्यात शकीलचं एकेक कडवं गौरी आणि बैजूतल्या प्रेमाच्या महतीचं वर्णन करून सांगतंय.. 'बनाएंगे तुफाँ को एक दिन किनारा, हो रहेगा मिलन..' या वाक्यातच किती अर्थ सामावलाय पहा.

*भला कैसे टूटेंगे, बंधन ये दिल के, बंधन ये दिल के,*
*बिछड़ती नही मौज से मौज मिलके, वो मौज मिलके,*
*छुपोगे भँवर में तो छुपने न देंगे, तो छुपने न देंगे,*
*डुबो दोगे नैया, तुम्हें ढुंढ लेंगे, तुम्हें ढुंढ लेंगे,*
*बनाएंगे हम, बनाएंगे हम, बनाएंगे तुफाँ को एक दिन किनारा,*
*हो रहेगा मिलन.. ये हमारा-तुम्हारा...*

नौशादजींनी 'बैजूबावरा'चं भरघोस यश पदरी पाडून तर घेतलंच वर फिल्मफेअरचं पहिलं-वहिलं ॲवॉर्डही पटकावलं. याच बैजूबावराचा ब्रॉडवे थिएटरला सिल्व्हर ज्युबिली सोहळा होता. याच गच्चीत उभं राहून समोरच्या फुटपाथकडे पाहताना नौशादजींनी '.. हा फुटपाथ पार करायला मला चौदा वर्षे लागली..' असं भट्टसाहेबांना साश्रुनयनांनी सांगितलं होतं. आज एखाद्या गाण्यानं नाव गाजू लागताच आसमान ठेंगणं वाटणाऱ्या काही संगीतकारांचं वागणं पाहिलं की थक्क व्हायला होतं. आज चांगलं संगीत देणारे काही संगीतकार एक तर या जगाच्या मैफलीतून उठून गेलेत किंवा कुणाला सक्तीच्या विश्रांतीवर धाडलं गेलंय. काही महाभाग जुन्या संगीतकारांविषयी काही वावगं बोलताना, लिहितानाही आढळतात. त्या वल्गना ऐकून किंवा वाचून बुजुर्ग संगीतकारांना किती यातना होत असतील याची कल्पनाच न केलेली बरी.. बैजूबावराचा एक सीन आठवतोय याक्षणी.. बैजू नंगी तलवार घेऊन तानसेनच्या महालात आलाय. तानसेन नव्या रागिण्या बनविण्यात मश्गुल आहे. सप्तसूर जणू त्याच्यासमोर नतमस्तक झाले आहेत. प्रसन्न वातावरण आहे तिथलं. तानसेनचा चेहरा शांत! धीरगंभीर! सुरात हरवल्यासारखा. बैजू तिथला माहौल बघून जागच्याजागी थबकतो. त्याला वाटतं किती कफल्लक आहोत आपण! इतकी भक्तिपूर्ण संगीत आराधना? पण नाही!.. तो पुन्हा स्वतःला सावरतो. तलवारीचा वार थेट तानपुऱ्यावर! सर्व राग, सूर, आलाप, ताना पक्ष्यांचा थवा उडून दूर जावा तशा विरल्या आहेत. तानसेन हळूच डोळे उघडतो. चेहऱ्यावर निर्विकार भाव. बैजूकडे तितक्याच थंडपणे पाहत एकेका शब्दावर वजन देत म्हणतो.. 'तानसेन को अगर मारने की ठान ली है.. तो आत्मा से ऐसा कोई दर्दभरा संगीत ले आओ.. तानसेन ख़ुद ब ख़ुद मर जाएगा..'

♥

महंमद रफी यांचं गाणं म्हणता ते तुमच्या आवडीचं असणारच. ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल तर देत आहे या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. तू गंगा की मौज मैं.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=V8Fhn61CuL0

२. तू गंगा की मौज मैं.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=1F8o3P_vvyY

३. तू गंगा की मौज मैं.. (चित्रपटातील गाणे) https://www.youtube.com/watch?v=TpRVP9qmpmE

४. संपूर्ण चित्रपट : **बैजू बावरा** (१९५२) https://www.youtube.com/watch?v=CF35-vCIKfY

♥

**१३ : तू गंगा की मौज मैं..**

चित्रपट - बैजू बावरा (१९५२)
दिग्दर्शक - विजय भट्ट
गायक - महंमद रफी
गीतकार - शकील बदायुनी
संगीत - नौशाद

अकेलीऽऽमन जईयो, राधेऽऽ जमुना के तीरऽऽ

हो जी होऽऽ तू गंगा की मौज मैं जमुना का धारा,
तू गंगा की मौज मैं जमुना का धारा, हो रहेगा मिलन,
ये हमारा, हो हमारा-तुम्हारा रहेगा मिलन,
ये हमारा-तुम्हारा...

अगर तू है सागर, तो मंझधार मैं हूँ, मंझधार मैं हूँ,
तेरे दिल की कश्ती का पतवार मैं हूँ, पतवार मैं हूँ...
चलेगी अकेली ना तुमसे ये नैया, ना तुमसे ये नैया,
मिलेगी ना मंजील, तुम्हें बीन खेवैया, तुम्हें बीन खेवैया,
चले आओजी, चले आओजी,
चले आओ, मौजोंका लेकर सहारा,
हो रहेगा मिलन, ये हमारा-तुम्हारा...

भला कैसे टूटेंगे, बंधन ये दिल के, बंधन ये दिल के,
बिछडती नही मौज से मौज मिलके, वो मौज मिलके,
छुपोगे भँवर में तो छुपने न देंगे, तो छुपने न देंगे,
डुबो दोगे नैया, तुम्हें ढुंढ लेंगे, तुम्हें ढुंढ लेंगे,
बनाएंगे हम, बनाएंगे हम,
बनाएंगे तुफाँ को एक दिन किनारा, हो रहेगा मिलन..
ये हमारा-तुम्हारा...

तू गंगा की मौज मैं जमुना का धारा,
तू गंगा की मौज मैं जमुना का धारा, हो रहेगा मिलन,
ये हमारा, हो हमारा-तुम्हारा रहेगा मिलन,
ये हमारा-तुम्हारा...

♥

## 14 : Raaz Ko Raaz Rehne Do..

## १४ : राज़ को राज़ रहेने दो..

*'ये सूरज चाँद और तारे, चले मेरे इशारों पर*
*हुकुमत है मेरी दर्या-समुंदर और किनारोंपर*
*मैं अपने हाथों से इस दुनिया की तकदीर लिखता हूँ..*
*इशारों को अगर समझो.. राज़ को राज़ रहेने दो'*

'बॉबी', 'दाग़', 'अभिमान', 'यादों की बारात', 'नमक हराम', 'जंजीर' सारखे सुपरहिट चित्रपट धुमाकूळ घालत असुनही आम्ही 'धर्मा' कित्येकदा पाहिला होता तो केवळ या कव्वालीसाठी. रेखाची 'तब्येत' पहायला किंवा नवीन निश्चलचा 'अभिनय'(?) अनुभवण्यात इन्टरेस्ट नव्हता. कुतुहल होतं ते प्राण आणि बिंदूवर चित्रीत झालेल्या कव्वालीचं. आशाच्या जीव ओवाळून टाकाव्या अशा आवाजाचं.. रफीने दिलेल्या सुरेल आणि चोख प्रत्युत्तराचं.

एस्. के. कपूर निर्मित 'धर्मा' (१९७३)! दिग्दर्शक चाँद! नवीन निश्चल, रेखा, अजित, प्राण, मदनपूरी आणि बिंदू अशी स्टारकास्ट! आता बसल्या जागी पूर्ण स्टोरी नीटशी आठवत नाहीय.. (लिंक दिलीय, चित्रपट पहा.) थोडक्यात सांगायचं तर, अजित आपल्या लापता पोरीसाठी परेशान असतो बरंच रक्त आटवल्यावर ती त्याला सापडते ती चक्क एका कोठ्यावर. पुतनामावशीच्या नजरकैदेतली आपली पोरगी सोडवायला म्हणून त्याचा दोस्त चंदन (प्राण) दगड्या हिरोला घेऊन त्या कोठ्यावर टपकतो. सौदेबाजी करतो. पोरगी कशीबशी स्वगृही आणतो. त्या खुशीत पार्टी देतो अजित. ठरविल्याप्रमाणे मुजरा वगैरे करणारी मंडळी येतात. प्राण नखशिखांत थरथरतो. अरेऽ! ही तर रसरशीत बिंदू! 'त्याच' कोठ्यावरची! झाली की पंचाईत! प्राण चपापतो. समाजात बडं प्रस्थ म्हणून वावरणाऱ्या आपल्या सन्माननीय बॉसची 'रेखा' ही लेक. आता या बिंदूने जर तोंड उघडलं तर? रेखाची पूर्वपीठिका चारचौघांदेखत उघडी तर होणारच, वर आपली त्या अनुषंगाने तेल लगाईके खटीया खडी होणार. प्राण खास पार्टीसाठी म्हणून लावलेली दाढी कुरवाळत विचारमग्न होतो. बिंदू तर खुलेआम नागिणीसारखा फणा काढून फुत्कारत रहस्यभेदाचा मनसुबा व्यक्त करते..

*ये ख़ुशी ये महफिले, और जो नयाऽऽ अंदाज हैऽऽ*
*समझनेवालों-समझ लो! इसमें भी इक राज़ है..*
*राज़ की बात कहदूँ तो, जान महफिल में फिर क्या हो..*

प्राण टेन्शनमध्ये आहे पण ते चेहऱ्यावरून दाखवत नाहीय. जरा सबुरीनं घ्यायचं ठरवतो.. त्याच्यातही किती गुरूर आहे पहा! प्रतिस्पर्ध्याची चाल जोखत तो म्हणतो..

*राज़ खुलनेका तुम पहेलेऽऽ जरा अंजाम सोच लो,*
*इशारों को अगर समझो..राज़ को राज़ रहेने दो!*

बिंदू ऐकायच्या मनःस्थितीत नाहीय! ती सरळ सांगते..

*जुबाँ पे बात जो आयी, कभी रूकती नही है,*
*उठ गयी आँख जो इक बार वो, झुकती नही है, कभी झुकती नही है..*

टशन! प्राणची आता मात्र धडकन वाढलीय.. आस्ते आस्ते तो पेटून उठतोय..

*जो नावाक़िफ़ है मुझसे, आज उनसे, जा के ये कह दो,*
*जुबाँ पे राज़ आया तो जुबाँ को मोड के रख दूँ,*
*ख़ुशी से कोई जीता है, ख़ुशी से उसको जीने दो*

*इशारों को अगर समझो..राज़ को राज़ रहेने दो!*

जणू नागीण-मुंगुसाची झुंज! थिएटरात पब्लिकने ठेका धरलाय. पडद्याच्या दिशेने चक्क दौलतजादा होतेय. संगीतकार सोनिक-ओमींचा हा आविष्कार प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी होतो. खरं तर दिग्दर्शक चाँदभाईंनी सिच्युएशन समजावताच सोनिकदांनी नुसता मुजराच करायचं ठरवलं होतं. पाचेक मुखडेही तयार होते. उपकार (१९६७) चित्रपटापासून प्राणने खलनायकी लिबाज झुगारून दिला होता की काय! जणू कात टाकली होती. 'कस्मे वादे प्यार वफ़ा सब..' मायबाप प्रेक्षकांना आवडलं होतं. पुढे 'जंजीर'मध्ये मित्रप्रेमाची महती सांगणारी कव्वाली प्राणवर चित्रित होऊन सुपरहिट ठरताच गीतकार वर्मा मलिकने इथे कव्वाली करूया असा प्रस्ताव ठेवला. चर्चेअंती ते 'ड्युएट' असेल तर जास्त उठावदार होईल, अशा निर्णयाप्रत ते आले. 'कैसे बेशर्म आशिक है ये आज के..' टाईप! द्वंद्वगीत! म्युझिक अरेंजमेंट कशी असेल वगैरे सीटिंग्ज झाल्या. आता परवा सोमवारी फेमस-ताडदेवला रेकॉर्डिंग! सर्व तयारी झाली होती. गायक-वादक सगळ्यांनाच मॅसेज गेले होते. त्या संध्याकाळी कव्वाल जानी बाबूंनी सोनिक-ओमींना दक्षिण मुंबईतल्या डोंगरी चार नळ विभागात होणाऱ्या मुशायऱ्यासाठी निमंत्रण पाठवलं. मुशायऱ्यानंतर 'जंगी कव्वाली मुकाबला' होणार होता. जानी बाबू आणि कुणीतरी दिग्गज! गाणं फायनल झालेलं त्यामुळे सोनिकदा आणि ओमीजी निश्चिंत होते. फावला वेळ होता म्हणून मुशायऱ्याला जाण्याचा योग आला.. मुशायऱ्यात दिग्गज शायरांच्या शेरोशायरीला उत्स्फूर्त दाद देत चारेक तास कसे संपले कुणास ठाऊक. मध्ये भरपेट नाश्ता झाला. आता कव्वाली मुकाबला सुरू! दोघं कव्वाल मस्तच गात होते. इष्के-हकीकी ते इष्के-मिजाजी कव्वाल्यांची बरसात होत होती. सामना रंगत होता. सवाल-जवाब सुरू झाले. दोघेही इरेला पेटले होते. हार मानायला कुणीच तयार नव्हतं. गाण्यातून ख़ुद्दारी, ईगो, फलाण्या घराण्याचा अभिमान भातासारखा रटरट शिजत होता. सुननेवाले दाद देत होते. प्रेक्षकांत त्यांची आपापली टीम असावी, कारण ते आपल्या कव्वालला चेतवण्याचं काम बिनबोभाट पार पाडत होते. शेवटच्या कव्वालीत तर ते शड्डू ठोकून उतरले. आमने-सामने आले. सवाल-जवाब! तू है मच्छर के जैसा..तेरा मुँह कौओे जैसा..गिधड का तू शहजादा.. आज तू पिया है ज्यादा..करता-करता हैसियत-औकात-माँ-बाप-खानदानवरून प्रकरण चक्क हातघाईवर आलं की हो! दोघंही आपापल्या जागा सोडून समोरासमोर आले. कुत्री-मांजरं गुरकावतात-फिस्कारतात तसं सुरू झालं.. तेरी माँ की.. वगैरे शिव्या सुरू होताच पब्लिकमध्ये चुळबुळ सुरू झाली. आपण कुठे आहोत काय करतो आहोत याचा सारासार विचार न करता दोघांनी चाकूच काढले. साजिंदे भाग गये. संयोजक-स्वयंसेवक वगैरे मंडळी पाठीला पाय लाऊन पळाली. एकच धुमश्चक्री! आपल्या अंध सोनिक मास्टरजींना सांभाळत ओमी बिचारे जीव वाचवून कसेबसे घरी परतले. हुश्श! जिवावर बेतलेलं खरं पण त्या मुकाबल्याने दोघांच्या मनात एक स्पार्क मात्र चमकून गेला. सकाळ कधी होतेय याचाच इंतजार होता. सकाळी नवाच्या ठोक्याला फेमसमध्ये दिग्दर्शक चाँदभाई, गीतकार वर्मा मलिक आणि संगीतकार सोनिक-ओमी खलबतं करण्यात गुंतले होते. मुजऱ्याच्या मुखड्यामधलं गाणं पुढे कव्वालीचा बाज घेऊन अवतरेल आणि शेवटी ते सवाल-जवाबवर संपेल अशी सिच्युएशन पक्की केली. अरेंजर्सनी लागलीच नोटेशन्स काढून वादकांमध्ये वाटले. रिहर्सल्स सुरू झाल्या. रिदम-म्युझिकचं चलन ऑन-द-स्पॉट फायनल करत गाणं आकाराला आणलं. आशाताईंनी हातचं न राखता गायलं. गाणं चाबकासारखं सणसणीत हवं असेल तर पट्टी थोडीशी वरचीच असली तर मजा येते. गाण्याची सुरुवातच सोनिकजींनी हार्मोनियमवर साज छेडून केलीय. गाण्याचा स्केल थोडा वरचाच आहे. स्त्री-गायिकांसाठी तर ते आव्हानच! पण आशाताईंनी हे लीलया कसं पेललंय पहा. मो. रफीसाहेबांबद्दल बोलायचं तर नाहीतरी ते डोंगरी इलाक्यातले. कव्वाल लोगोंके तेवर आणि मिजाजशी पूर्णपणे वाकिफ़ असल्यानेच की काय त्यांनी गाण्यात अधिकच रंग भरलेत. पडद्यावर प्रत्येक सेकंदागणिक नाट्य रंगत जातं ते याचमुळे. बिंदू डसत राहते. प्राण चिवटपणे प्रतिकाराची झुंज देतो. अंतरे संपताच रहस्यभेद करायचाच या वेडाने झपाटलेली बिंदू अस्तन्या सावरत उठते..

*तुम्हारी जात क्या है? जवाब : तेरी औकात क्या है?*
*तुम्हारे क्या इरादे.. ये पहले तू बता दे!*

उत्कंठा वाढत जाते.. 'अगर घुँघट उठा दूँ, तुम्हे आँखे लढा तू..' असं करता करता गाडी 'बदन मेरा है कुंदन, मेरा दिल भी है चंदन, मै चंदन की खुशबू हूँ..' पर्यंत शिखर गाठते. अजितसकट पडद्यावरच्या सर्वांमध्ये सेकंदभर सन्नाटा.. थिएटरातही! 'मै चंदन..मै चंदन..मै चंदन हूँबऽऽ हूँहूँ ऽऽ!' असा धक्कादायक रहस्यभेद करत प्राण या निकराच्या लढाईचा शेवट करतो- गुप्ती काढतो... व्वा! सोनिकदा! तेरा जवाब नही!

थिएटरातून बाहेर पडणाऱ्या लोकांच्या ओठावर याच गाण्याची दास्तान असते. प्राण आणि बिंदूच्या अभिनयाची चर्चा होते. पण संगीतकार म्हणून सोनिक-ओमींचं नाव तसं चट्कन लक्षात येत नाही. दिल ने फिर याद किया (१९६६), महुआ (१९६९), सावनभादो (१९७०) अशा चित्रपटातून सुपरहिट गाणी देऊनही ते उपेक्षितच राहावेत? खूप कमी संधी दिली नाही इंडस्ट्रीने या जोडगोळीला? आपली ख़ुद्दारी ते कुरवाळत राहिले की राजकारण होत राहिलं त्यांचं त्यांना ठाऊक. पण स्वतः अंध असूनही आपले

डोळे खाड्कन उघडतील अशा सुरावटी देऊन त्यांनी आपली छोटीशी कारकीर्द सजवलीय हे मात्र नक्की! सक्तीच्या विश्रांतीवर असताना एकदा सहज मी त्यांना छेडलं होतं. नाकामयाबीचं दु:ख त्यांच्या चेहऱ्यावर ओतप्रोत दिसत होतं.. पण ओंजळ आभाळाकडे करून ते एवढंच म्हणाले होते - 'अब मत पुछो हाल, मेरे कारोबार का.. आईने बेचने आया था (एक अंधा) अंधों के शहर में!...'

♥

## १४ : राज़ को राज़ रहेने दो..

चित्रपट : धर्मा (१९७३)
निर्माता : एस्. के. कपूर
दिग्दर्शक : चाँद
गायक : आशा भोसले - महंमद रफी
गीतकार : वर्मा मलिक
संगीत : सोनिक-ओमी

आशा : ये ख़ुशी ये महफिल, और जो नयाss अंदाज हैss
राज़ की बात कहदूँ तो, जान महफिल में फिर क्या हो..
समझनेवालों-हंs समझ लो! इसमें भी इक राज़ हैs
राज़ की बात कहदूँ तो, जान महफिल में फिर क्या हो..

रफी : राज़ खुलनेका तुम पहेलेSS जरा अंजाम सोच लो,
इशारों को अगर समझो.. राज़ को राज़ रहेने दो!
इशारों को अगर समझो..राज़ को राज़ रहेने दो!
आशा : राज़ की बात कहदूँ तो, जान महफिल में फिर क्या हो..

आशा : जबाँ पे बात जो आयी, कभी रुकती नही है-२
उम्मीदों का कहीं ना, सामने मै खून होने दूँ,
उठ गयी आँख जो इक बार वो, झुकती नही है, अरे झुकती नही है
हकिकत को छुपाऊँगी, तो वो छुपती नही है,
जो बरसोंसे छुपे दिल में, उसे होठों पे आने दो - २
राज़ की बात कहदूँ तो, जान महफिल-महफिल-महफिल-जान महफिल में फिर क्या हो..

रफी : उठे आँखे जो महफिल में, वो आँखे फोड के रख दूँ – २ बढे जो हाथ तो उस हाथ को मैं तोड के रख दूँ,
मेरी जाँ, तोड के रख दूँ,
जो नावाकिफ़ है मुझसे, आज उनसे, जा के ये कह दो,
जुबाँ पे राज़ आया तो जुबाँ को मोड के रखदूँ, ख़ुशी से कोई जीता है, ख़ुशी से उसको जीने दो-२
इशारों को अगर समझो..राज़ को राज़ रहेने दो!

आशा : उसी को छीनकर तेरी नजर से दूर कर दूँ, अरे हाँssदूर कर दूँ,
तुझे मैं आहें भरने के लिए मजबूर कर दूँ, हाँ मैं मजबूर कर दूँ..
यहाँ बदनाम कर दूँ, वहाँ मशहूर कर दूँ, जबाँ खुल जाए गर मेरी, तो चकनाचूर कर दूँ,
जरा अफसानेका पहले, पता लगने दो दुनिया को -२
राज़ की बात कह दूँ तो, जान महफिल में, जान महफिल में, जान महफिल में फिर क्या हो..

रफी : ये सूरज, चाँद और तारे, चले मेरे इशारों पर -२
हुकुमत है मेरी दर्या, समंदर और किनारोंपर - २
मैं अपने हाथों से, इस दुनिया की, तकदीर लिखता हूँ..
मगर फिर तरस आता है, तेरे जैसे बिचारोंपर,
नहीं पैदा हुआ कोई जो रोके मेरी राहों को - २
इशारों को अगर समझो.. राज़ को राज़ रहेने दो

आशा : तुम्हारी जात क्या है?
रफी : तेरी औकात क्या है?
आशा : तुम्हारे क्या इरादे..
रफी : ये पहले तू बता दे!
आशा : हुस्न की मार बुरी है,
रफी : इष्क की खार बुरी है
आशा : नजर का तीर जो छोडूँ
रफी : तीर को ऐसे तोडूँ
आशा : अगर घुँघट उठा दूँ,
रफी : तो मैं आँखे लढा दूँ,
आशा : कमर के देख झटके,
रफी : इधर भी देख पलट के,
आशा : तू मुझको ना पहचाने,
रफी : मुझे तू भी न जाने,
आशा : बदन मेरा है कुंदन,
रफी : मेरा दिल भी है चंदन,
आशा : मै चंदन की खुशबू हूँ..
रफी : मै चंदन..मै चंदन..मै चंदन हूँबऽऽहूँहूँऽऽ! इशारों को अगर समझो..राज़ को राज़ रहेने दो!

♥

सुपरहिट कव्वालींच्या यादीत अव्वल स्थान असलेली ही कव्वाली ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर हा घ्या त्या गाण्याचा 'ऑडिओ, व्हिडिओ, तसेच त्या संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. राज की बात कह दूं तो.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=a4DINZe7Gdo

२. राज की बात कह दूं तो.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=UHpIkRhwzgk

३. संपूर्ण चित्रपट : धर्मा (१९७३) https://www.youtube.com/watch?v=7JxpxZywhrg

♥

सुपरहिट (कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

१. झूम बराबर झूम शराबी..
२. छोड दे पिना छोड शराबी..
३. कैसे बेशर्म आशिक है ये..
४. बडा लुत्फ था जब..
५. देख तमाशा लकडी का..
६. उड जाएगा इक दिन पंछी..
७. हमें तो लूट लिया मिल के..
८. ये माना मेरी जाँ मुहोब्बत..
९. माटी के पुतले तुझे..
१०. वो इक भोली सी लडकी..
११. दमा दम मस्त कलंदर..

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97DIH6sk-Xmi_NyWGUCcaww

सुपरहिट (फिल्मी कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLgbkVdghvEyxwapSfbG9w37RdWdhGC6bH

♥

## 15 : Babuji Dheere Chalna..

## १५ : बाबुजी धीरे चलना..

'अरोराजी बहोत तकलीफ में हूँ. आज पैसे मिलेंगे तो मेहेरबानी होगी. पाच 'टेक' झालेत वाजवून. दोनशे रूपयांसाठी आणखी किती वेळा येऊ?. प्लीज करा काहीतरी..' सेटवर पडलेल्या वायर्स, प्रॉपर्टी आणि चमचमते कपडे घातलेल्या डान्सर्सच्या घोळक्यात मसरूफ असलेल्या अरोरांच्या मागे मागे, परेशान बाबू दाभोळकर नुसता भिंगरी लावल्यागत फिरत होता. पैशांसाठी अजीजी करत होता. अरोराला फिकीरच नव्हती त्याची. डान्सरपैकी अमुक एकीची शिफ्ट संपताच 'कुठे' जायचं हे महत्त्वाचं होतं त्याला.

'अरे बाबू?.. तू यहाँ? शूटिंग के सेटपर क्यूँ रखड रहे हो भाई?' तडक् मागे वळून पाहिलं त्यानं. ओपीसाहेब आपलं नेहमीचं मिश्किल हास्य चेहऱ्यावर वागवत विचारत होते त्याला. मेहबूबचं रेकॉर्डिंग थिएटर सोडून हा तिथल्या शूटिंगच्या सेटवर कशाला झक मारतोय असं प्रश्नचिन्ह होतं, ओपी नय्यरजींच्या विचारण्यात. टच्कन आसवं आली बाबूच्या डोळ्यात. आवंढा गिळत आपल्या जवळच्या माणसाला कैफियत सांगावी तसं अडखळत आप-बीती सांगू लागला..

'ओपीसाहेब.. हात टेकले आम्ही या प्रोड्युसरपुढे.. अहो आम्ही चोवीस व्हायोलिनवादकांनी त्यांच्या पाच गाण्याचे 'टेक' वाजवलेत, पण छदाम द्यायचं नाव नाही त्याचं! इथे शूटिंगसाठी पैसा उडताना डोळ्यांसमोर दिसतोय, पण आज, उद्या, परवा करता करता महिना उलटून गेलाय आमच्या पेमेंटसाठी.. पोरगी नायरला अॅडमीट आहे हो माझी! खूप निकड आहे.. म्हणून खेटा घालतोय..' बाबू रडायचाच काय तो बाकी होता. ओपीजी क्षणभर गंभीर झाले. कोटाच्या खिशात हात घालून पाचशे रूपये काढत बाबूच्या हातावर ठेवले आणि अरोरांकडे मोर्चा वळवला..

'अरोराजीऽऽ!!' ओपींचा आवाज तिथल्या सेटवर घुमताच हुजऱ्याने खांद्यात वाकत शहेनशाहपुढे पेश व्हावं तसा लोचट अरोरा ओपींपुढे उभा राहिला. पुढची पाचेक मिनिटे सेटवरची प्रत्येक व्यक्ती ओपींच्या चेहऱ्यावरचे बदलते रंग आणि अंगार ओकणारा आवाज ऐकत होते. तिथे स्क्रीप्ट नव्हतं की कुणाचं डायरेक्शन. पण नाट्य बरंच रंगलं की हो! अरोरा जागच्याजागी थिजला होता..

काय पण पध्दत? चित्रपटातली गाणी रेकॉर्ड करायला वादकांना बोलवायचं, पण त्या कामाचे पैसे-मानधन घ्यायला त्यांनी प्रोड्युसरच्या ऑफिसचे उंबरठे झिजवायचे? भिकाऱ्यांसारखे? फंड, फायनान्स नाही तर कशाला करायची गाणी? वर्षानुवर्षे रियाज करून आपल्या वादनकलेत प्रावीण्य मिळवलेल्या वादकांनी पैश्यांसाठी निर्मात्यांकडे झुकायचं? चुकीची पध्दत होती ती. पूर्वापार चालत आलेली. असंतोष होता, पण कुणाची हिम्मत नव्हती निर्मात्यांपुढे बोलायची. ओपींनी सेटवरच त्या निर्मात्याला खडसावलं. सज्जड दम भरला. माझ्या गाण्यांपैकी प्रत्येकाचं पेमेंट दोन दिवसात क्लियर करा.. आणि त्या निर्मात्याचं पुढचं काम करायला साफ नकार देत 'वॉक-आऊट' केला ओपीजींनी. ओपीजींच्या सिंहगर्जनेमुळे भल्या-भल्या निर्मात्यांची पिवळी झाली. सर्व संगीतकारांनी मग त्यांचीच री ओढली. प्रकरणाला बराच गडद रंग चढला, पण दोन आठवड्यातच सर्वच्या-सर्व रेकॉर्डिंगला 'ऑन -द-स्पॉट' पेमेंट मिळू लागलं वादकांना. नव्या वादकांना हे तितकंसं माहीत नाहीय पण बुजुर्ग वादक, आजही हा सीन रंगवून-रंगवून सांगतात. आमच्या ओपीजींमुळे हे झालं असं अभिमानाने सांगतात.

माझ्या भाग्याची गोष्ट अशी की, ओपी नय्यरजी, विरारला आमच्या शेजारच्याच इमारतीत दोन वर्षे रहायला आले होते. त्यांना मॉर्निंग वॉकला जाता-येताना पहायचो. ते हमखास एनर्जीटीकच दिसायचे. टॉमेटोसारखा लालबूंद चेहरा, ताडमाड उंची, फिल्मी ऐट आणि बेफिकीर वृत्ती. खूप कडक शिस्तीचे वाटायचे. हळुहळू परिचय केला त्यांच्याशी. आपण नमस्कार केला तर एक हात उंचावून प्रतिसाद द्यायचे. जणू काही 'कसा आहेस?', 'मी मजेत आहे बरं का!' किंवा 'हॅव अ नाईस डे' असे सगळे भाव असायचे त्यांच्या त्या हात उंचावण्यात. दोन-चारदा थोड्याश्या गप्पा मारायचाही चान्स मिळाला. आपल्या गाण्यांबद्दल ते भरभरून बोलायचे पण या गप्पांमध्ये कुणाबद्दल चकार शब्द वाईट उच्चारायचे नाहीत. आत्ताचं जीवन काहीसं बोचरं झालंय याची अजिबात खंत नसायची. पतियाळात जन्मलेले ओंकारप्रसाद नय्यर! घराण्यात कोणतीही सांगीतिक पार्श्वभूमी नाही. फक्त वेड होतं ते सैगलचं. सदतीस साली लाहोरच्या आकाशवाणीत लहान मुलांच्या कार्यक्रमात चमकणारे ओपी, शिकायचं म्हणून मॅट्रिक शिकले. इंटरपर्यंत मजल मारली. लग्न लवकरच झालेलं. सौ. मोहिनी नय्यर कविता करायच्या. 'प्रीतम आन मिलो' या कवितेला चाल लावून सी.एच. आत्मांकडून गाऊन घेताच ओपींचं संगीत घरोघरी पोहोचलं. एकावन्न साली त्यांनी मुंबई गाठली आणि सुदैवाने दलसुखभाई

पंचोलींनी आपला 'आसमान' त्यांच्या हवाली केला. साफ आपटला तो, पण त्यातलं एक गाणं बिनाका गीत मालेत चक्क अनेक वर्षे सिग्नेचर-ट्यून म्हणून वाजत होतं.

'अफसर'व्दारे देव आनंदने नवकेतन बॅनर सुरू केलं, पण तो आपटताच आपली आठेक चित्रपटात अभिनय करून जमविलेली पुंजी बलराज सहानींच्या 'बाजी'च्या स्क्रीप्टवर लावली. निर्माता चेतन आनंद. आपल्या दोस्ताला गुरूदत्तला डायरेक्शन दिलं. देव हिरो.. संगीत सचिनदेव बर्मन! 'बाजी' गाजला. इकडे गुरुदत्तने 'बाज' (१९५३) मध्ये आपली प्रतिभा पणाला लावली. स्वतःच हिरो आणि स्वतःच दिग्दर्शक! संगीत ओपी नय्यर! पण गुरुदत्तचं गणित साफ चुकलं. हिरो म्हणून स्वतःच्याच डोक्यावर मुंडावळ्या बांधणारा गुरुदत्त ढेपाळला. इकडे ओपीही 'बाज' आपटल्याने हलाखीच्या परिस्थितीत होते. आसमान, छम छमा छम आणि बाजच्या अपयशाने ओपी त्रेपन्नसाली अतिशय नर्व्हस होऊन गावी परतण्याच्या विचारात होते. हॉटेलात पत्नीसह राहताना तिथलं बील थकताच आता सामानसुमान बाहेर फेकलं जाणार की काय अशी हालत. 'कारदार' फिल्मच्या कपूरसाहेबांकडे गेले ओपी. तीन हजार गुरुदत्तकडे थकलेत ते तरी मिळवून द्या अशी विनवणी करायला. कपूरसाहेबांनी काहीतरी करतो असं सागत त्यांची बोळवण केली. गुरुदत्त भेटताच कपूरसाहेबांनी त्याला वेगळाच प्रश्न केला..'हा ओपी नय्यर, म्युझिक-डायरेक्टर म्हणून कसा आहे रे?' गुरुदत्त वैतागतच म्हणाला.. 'तो चांगला आहे यार..पण इथे बाजनं माझी हाडं खिळखिळी केलीत..' कपूरसाहेब त्याला मध्येच थांबवत म्हणाले..'पुढच्या पिक्चरसाठी साईन कर त्याला. आज अडचणीत आहे तो. दे काहीतरी ॲडव्हान्स..' गुरुदत्त हादरलेच. 'पुढचं पिक्चर? अरे वाट लागलीय माझी..' कपूरसाहेब समजावत म्हणाले.. 'चल.. मी करतो त्याचं डिस्ट्रीब्युशन.. ओपीला संगीत द्यायला लावूया..' ओ. पी. नय्यरजींना बोलविण्यात आलं. ओपी येताच गप्पांमध्ये वेळ न दवडता गुरुदत्त सरळ आतल्या खोलीत गेले आणि नकद हजार रुपयांची चळत घेऊन बाहेर आले. तिथल्या तिथे करार झाला, नव्या चित्रपटाचा.. 'आरपार'.. निर्माता-दिग्दर्शक गुरुदत्त! गुरुदत्त, शकिला, श्यामा अभिनीत 'आरपार'(१९५४)!

*बाबुजी धीरे चलना, प्यार में जरा संभलना*
*ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में,*
*बाबुजी धीरे चलना..*

'आरपार'ने ओपींना तारलं. सगळीच्या सगळीच गाणी सुपरहिट झाली या आरपारची. कभी आर कभी पार लागा तीर-ए-नजर.. या शीर्षकगीतात शमशाद बेगम! हूँ अभी मैं जवाँ ऐ दिल, ये लो मैं हारी पिया, जा जा बेवफा, सून सून जालिमा.. या गाण्यातली गीता दत्त! व्वा! पण 'बाबुजी धीरे चलना..'ची ऐटच न्यारी. ओपी स्पष्ट सांगतात. गुरुदत्तने ही गाणी करण्याआधी 'बिंग क्रॉस्बी'च्या रेकॉर्डस् माझ्या पुढ्यात आणून टाकलेल्या. या रेकॉर्डसमधल्या उडत्या गाण्यांच्या चाली ऐक आणि तसलंच झिंग येणारं संगीत मला दे, असं निक्षून सांगितलेलं. शायर-गीतकार मजरूह सुल्तानपुरीजी होतेच मदतीला. सरळ-साध्या शब्दात मांडलेलं त्यांचं काव्य इथे कोणतं सत्य सांगू पहातंय?

*क्यूँ हो खोये हुए सर झुकाये,*
*जैसे जाते हो सब कुछ लुटाये,*
*ये तो बाबुजी पहला कदम है,*
*नजर आते है अपने परायेऽ*
*हाँ.. बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में,*
*बाबुजी धीरे चलना..*

*ये मुहब्बत है ओ भोले-भाले,*
*करना दिल को ग़मों के हवाले,*
*काम उल्फत का नाजुक बहोत है,*
*आके होठों पे टूटेंगे प्याले,*
*ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में,*
*बाबुजी धीरे चलना..*

*हो गयी है किसी से जो अनबन,*
*थाम ले दुसरा कोई दामन*
*जिंदगानी की राहें अजब है,*
*हो अकेला तो लाखों है दुष्मन*
*ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में,*
*बाबुजी धीरे चलना..*

सॅबी अंकलच्या साथीनं गाण्यांचं संगीत-संयोजन ते स्वतः लक्ष घालून करायचे. सगळ्या अंतऱ्यांमधलं म्युझिक बहुतेकदा सारखंच ठेवायचे. या गाण्यातही बरंचसं तसंच! इथे गाण्यातला अंतरा संपताच पूर्ण मुखडा येऊन मग अंतऱ्यांमधलं म्युझिक सुरु होतं. भारतीय वाद्यांनी ओपींना नेहमीच भुरळ घातलेली दिसते. साधा ढोलकचा ठेका आणि हार्मोनियम बस्स! व्हायोलिनच्या ताफा हवा कशाला? कसरत हवी कशाला? या गाण्याच्या ठेक्यातही जास्त विविधता नाहीय. ओ. पी. नय्यरजींचा 'आरपार' मला आठवतो तो या गाण्यासाठी. आमच्या स्टुडिओत फिल्म रेकॉर्डींग असताना 'ऑन -द-स्पॉट' पेमेंट घेणारे वादक पाहिले की ओपी आठवतात. एखादा बुजुर्ग वादक मग त्यांच्याबद्दल भरभरुन बोलतो. त्यांचा प्रांजळ पण शिस्तप्रिय स्वभाव, नेमकेपणाचा हव्यास, प्रयोगशिलता.. सतार, संतूर आणि बासरीवर कोण असायचे ती नावं ऐकताच आपण थक्क होतो. त्यांचा जमाना आठवतो. सगळा माहौल आपल्या वेगळ्या ठेक्यांनी समृध्द केलेला दौर आठवतो. बाबुजी धीरे चलना.. या गाण्यानं सुनहरा समा सुरु झाल्याची नांदी देत चैन से हमको कभी.. पर्यंतचा प्रवास अनुभवला आहे आपण. स्वरसम्राज्ञी 'लता' आपल्या संगीतात न वापरुनही आपली कलाकीर्द रत्नमंडित करणाऱ्या ओपींना हात उंचावून सलाम!

♥

'आरपार' या चित्रपटात आपल्या आवडीची सर्वांगसुंदर गाणी आहेत म्हणून आपणासाठी सर्व गाण्यांच्या ऑडिओजची 'यू-ट्युब' लिंक देत आहे. गाण्याचा 'ऑडिओ, कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची, तसेच इतर काही 'यू-ट्युब' लिंक देत आहे.

| | |
|---|---|
| १. बाबुजी धीरे चलना... (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=Wn5T5scOa_w |
| २. बाबुजी धीरे चलना... (व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=rIX_UGuINK8 |
| ३. बाबुजी धीरे चलना... (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=4DQIE_Xqgk8 |
| ४. 'आरपार' सिनेमातील गाणी (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=iBSvoj-aLNo&t=30s |
| ५. संपूर्ण चित्रपट : 'आरपार' (१९५४) | https://www.youtube.com/watch?v=EWdldzwfjC4 |
| ६. ओ. पी. नय्यर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/42xMVE3ApDM |
| ७. ओ.पी.नय्यर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/naI3YxwScwc |

♥

## १५ : बाबुजी धीरे चलना..

चित्रपट : आरपार (१९५४)
दिग्दर्शक : गुरूदत्त
गायिका : गीता दत्त
गीतकार : मजरूह सुल्तानपुरी
संगीतकार : ओ. पी. नय्यर

बाबुजी धीरे चलना, प्यार में जरा संभलना
ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में, बाबुजी धीरे चलना..

क्यूँ हो खोये हुए सर झुकाये,
जैसे जाते हो सब कुछ लुटाये,
ये तो बाबुजी पहला कदम है,
नजर आते है अपने परायेऽ
हाँ.. बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में, बाबुजी धीरे चलना..

ये मुहब्बत है ओ भोले-भाले,
करना दिल को ग़मों के हवाले,
काम उल्फत का नाजुक बहोत है,
आके होठों पे टूटेंगे प्याले,
ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में, बाबुजी धीरे चलना..

हो गयी है किसी से जो अनबन,
थाम ले दुसरा कोई दामन
जिंदगानी की राहें अजब है,
हो अकेला तो लाखों है दुष्मन
ओ बडे धोके है, बडे धोके हैं इस राह में, बाबुजी धीरे चलना..

♥

गीता दत्त यांनी काही मराठी गाणीही गायलीत. कौतुक म्हणून त्या सर्व गाण्यांच्या 'ऑडिओ'च्या 'यू-ट्युब' लिंक देतोय.

| | | |
|---|---|---|
| १. गणपती बाप्पा मोरया.. | (ऑडिओ) | https://youtu.be/lkM8_1hQDxo |
| २. जा सांग लक्ष्मणा सांग.. | (ऑडिओ) | https://youtu.be/bUWAKoz6Ly0 |
| ३. मुक्या मनाचे बोल.. | (ऑडिओ) | https://youtu.be/1n5Kesno_ys |
| ४. जय मार्तण्ड जय मल्हार.. | (ऑडिओ) | https://youtu.be/kCxVrife8i0 |

♥

## 16 : Dum Dum Diga Diga..

## १६ : डम डम डिगा डिगा..

बाहेर पाऊस कोसळत होता. वेड्यासारखा. व्हरांड्यात गरमागरम कांदा-भजी आणि वाफाळलेल्या चहाचा आस्वाद घेत वादक मंडळी आता आपापली वाद्ये ट्यून करण्यात मश्गूल होती. वेगवेगळ्या वाद्यांच्या आवाजाची सरमिसळ! या विचित्र कोलाहलाने परिसीमा गाठली आहे. अचानक संगीत-संयोजक रवींचा आवाज माईकवरून गुंजतो. सायलेन्स! कडक शिस्तीचे मास्तर वर्गात शिरून छडी आपटताच चिडिचूप शांतता व्हावी तस्सं घडलं क्षणात. हातात मळलेल्या तंबाखूचा फक्ककन बार भरत स्पॉट-बॉयने स्टुडिओचा जाडजूड दरवाजा लोटून बंद करायला घेतला. इतक्यात पांढऱ्या शुभ्र कपड्यातले सुभाषजी म्युझिक-हॉलमध्ये प्रविष्ट झाले. सगळ्या वादकांच्या माना आता दरवाजाकडे वळलेल्या. पिन-ड्रॉप सायलेन्स! जानी राजकुमारच्या स्टाईलला लाजवील असा बुटांचा टॉक-टॉक आवाज हॉलमध्ये घुमत होता. संगीतकार हेमंतदांनी सामोरं येत हस्तांदोलन केलं. सुभाषजींनी औपचारिकरीत्या त्याला प्रतिसाद देत मोर्चा वळवला थेट कोपऱ्यातल्या तरूण वादकाकडे. तो आपल्या ॲम्प्ली-स्पीकरच्या बटनांशी झटापट करण्यात मग्न होता. बुटांचा आवाज त्याच्यापाशी थांबला.

'क्या तुम ही कल्याणजी हो?'

'जीऽऽजी सर!...' तो धडपडत उठत कसंबसं चाचरला.

'ये मेरा कार्ड.. कल ठीक दस बजे मुझे मेरे ऑफिस में आ के मिलना!...'

क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी अबाऊट टर्न करून दरवाजाकडे कूच केलं. एकदा कार्डाकडे आणि एकदा बुटाच्या आवाजासह दूर दूर जाणाऱ्या सुभाषजींकडे कल्याणजी नुसते पाहत राहिले. हॉलमध्ये कुजबूज वाढताच पुन्हा सायलेन्सचा पुकारा झाला. वादक रिहर्सल करायला लागले.

दुसऱ्या दिवशी कल्याणजीभाई दिलेल्या पत्त्यावर पोहोचले.

'माझे अकरा पिक्चर्स करतोयस तू...' हाताने खुणावत बसायचा इशारा करत त्यांनी कल्याणजीभाईंना आल्या आल्या आपला मनसुबा सांगितला.

'हो..करेन ना! कोई बात नही! सांगाल त्या गाण्यात माझं क्ले-व्हायोलिन वाजविन मी..'

'क्ले-व्हायोलिन? गाणी वाजवायला नाही सांगत.. माझ्या अकरा फिल्मस्चं संगीत करणार आहेस तू!'

फेंदारलेले कल्याणजीभाई समोरचा पाण्याचा ग्लास एका घोटात संपवत म्हणाले..

'स..संगीत? म..मला जमेल ते?'

'मी तुझी कुवत जाणतो..पाहिलंय मी तुझं काम. खूप मोठा होणार आहेस तू. तू हातचा जाऊ नयेस म्हणून ओळीने अकरा सिनेमे सोपवतो आहे तुझ्याकडे! पहिल्याला पाच हजार मानधन देईन. दुसऱ्याला दहा. नंतर पंधरा, वीस अशी चढती कमान असेल. अकराव्या पिक्चरच्या वेळी पंचावन्न हजार देईन. फेमस झालास म्हणून लाखो रुपये नाही मागायचे, कळलं?'

'अकराच का? बारा का नाही?'

'लकी नंबर आहे माझा तो.. कामाला लाग.. आत्तापासूनच'

उजव्या हाताच्या ड्रॉवरमधून वर्तमानपत्राच्या कागदात बांधलेलं दोन हजार रूपयांचं बंडल काढून त्यांच्या हातावर ठेवलं.. 'बेस्ट लक!..' म्हणत उठून शेक-हँड केला... आणि ती मुलाकात संपली. कल्याणजीभाई हर्षोन्मादाच्या लहरींवर स्वार होऊन घरी परतले.

बाहेर तस्साच पाऊस कोसळत होता. बॉम्बे-लॅबच्या कट्ट्यावर संगीतकार कल्याणजी-आनंदजी, गीतकार कमर जलालाबादींशी चर्चा करण्यात गुंतले होते. दिग्दर्शक म्हणून पदार्पणाची चव चाखायला आतुरलेले मनमोहन देसाई राज कपूरशी गप्पा मारण्यात मसरूफ होते. पावसाळ्याच्या धुंद वातावरणात एका नव्या गाण्याची संकल्पना मूळ धरत होती. सुभाष पिक्चर्सचा 'छलिया' (१९६०)! राज कपूर, नूतन, प्राण, रहेमान आणि शोभना समर्थ (नूतनची आई) असे कलाकार. 'छलिया' या खुशालचेंडू, खुशमिजाज कॅरेक्टरसाठी उडत्या चालींची गाणी हवीत असा आग्रह होता. राज कपूर आपल्यातला संगीतकार जागृत करीत कल्याणजीभाईंना मोलाच्या टीप्स देत होता. नायकाचं व्यक्तिमत्त्व, कथेचा बाज आणि विषयाची चौकट न बिघडवता गाण्याच्या जागा कशा शोधायच्या याच्या सजेशन्सचे डोस देत होता.

*डम डम डिगा डिगा, मौसम भीगा भीगा,*
*बिन पिये मैं तो गिरा, मैं तो गिरा, मैं तो गिरा, हाय अल्लाऽऽ*
*सूरत आप की सुभानल्ला..*

सी. रामचंद्रजींचं रॉक ॲन्ड रोल, नौशादजींची क्लासिकल ट्रीटमेंट, सचिनदांचा आपला असा वेगळा बाज, आर.के. कॅम्पमधले एस.जे. अशा सगळ्याच धुरंदरांच्या कारनाम्यांशी वाकीफ़ होतो आपण. या गाण्यात मात्र वेगळी झिंग होती. मुकेश या गाण्यातून चक्क टपोरी स्टाईलच्या उडत्या गाण्यातून भेटीस आला. साठ साल तसं चित्रपटसंगीताच्या ऐन सुवर्णयुगातलं. तुम्हाला आठवतच असेल. रतन (१९४४) पासून रूपेरी पड्द्यावरचं संगीत साठ सालापर्यंत अगदी मस्त बहरात आलं होतं. रेडिओ जिवाचा कान करून ऐकायचे लोक. १९६० साली बिनाका गीतमालासारख्या लोकप्रिय कार्यक्रमात 'तुम्हें याद होगा कभी हम मिले थे..', 'खोया खोया चाँद..', 'आधा है चंद्रमा..', 'अजीब दास्तां है ये..', 'प्यार किया तो डरना क्या..', 'दीवाना मस्ताना हुआ दिल..', 'मुझको इस रात की तन्हाई में..', 'चौदहवी का चाँद हो..' अशा एकाहून एक सरस गाण्यांबरोबरच गाणी गाजली होती ती या 'छलिया'ची. छलिया मेरा नाम..(मुकेश), बाजे पायल छम छम..(लता), मेरे टूटे हुए दिल से.. (मुकेश), मेरी जान कुछ भी कीजिए.. (मुकेश-लता), तेरी राहों में खडे है दिल थाम के (लता).. अशी सर्वांगसुंदर गाणी होतीच तर 'डम डम डिगा डिगा..' या गाण्याला लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं होतं. हल्लीच विजू शाहने (कल्याणजींचा मुलगा) संगीत दिलेलं 'तू चीज बडी है मस्त मस्त..'(मोहरा) असंच सुपर-हिट झालेलं. या गाण्यावरून एका मुलीला छेडणाऱ्या रोड-रोमियोला किती मार खावा लागला हे तुम्ही पेपरात वाचलंच असेल. अगदी अस्साच धुमाकूळ तत्कालीन रोड-रोमियोंनीही घातलेला. ग्रॅण्ट रोड स्टेशनजवळ एकाला खरपूस मार खावा लागला होता. ही आठवण कल्याणजीभाईंनी मुलाखतीत अगदी चवीनं सांगितली. या गाण्याची प्रकृती पाहता इथे जास्त शोभला असता तो रफी असं उगीचच वाटतं पण अनुनासिक आवाज असूनही छेडछाड करण्यात राजसाठी वापरलेला मुकेश इथे कुठेच कमी पडलेला नाही. राजला शोभेल अशी शब्दांची फेक त्यानं बेमालूम अदा केली आहे..

*तेरी अदा वाह्-वाह् क्या बात है, हाय तेरी अदा,*
*तेरी अदा वाह्-वाह् क्या बात है,*
*अखियाँ झुकी झुकी, बाते रूकी रूकी - २*
*देखो 'लुटेरा' आज लूट गया, हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला..*
(पिक्चरमध्ये 'लुटेरा' या शब्दावर सेन्सॉरचा आक्षेप असल्याने त्या जागी 'कोई रे' असे शब्द आहेत! आपल्यासाठी 'यू-ट्युब' लिंक देत आहे.)

कल्याणजीभाई आपल्या गिरगावातले. ठाकुरद्वार नाक्यावरच्या आपल्या दुकानात बसून वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे, लोकांची आवड-निवड याच्याशी रोजचा ताल्लुक असल्यानेच की काय सर्वसामान्यांच्या मनाचे कंगोरे त्यांनी आपल्या गाण्यांतून अचूक पकडलेत. संगीत संयोजनात ॲकॉर्डियन, व्हायोलिन्स, टूटी आणि साथीला ढोलक अशा रसायनाच्या मदतीनं या पब्लिक-साँगचा इमला त्यांनी उभारलाय. गाणं आठवणीतल्या कुपीत जपून ठेवावं असं नाहीय. कबूल! पण आपल्याला कल्याणजी-आनंदजी या जोडगोळीचं कौतुक वाटतं. सी.रामचंद्र, नौशाद, एस.डी.बर्मन, मदनमोहन, शंकर-जयकिशन, रोशन, रवी अशा अनेक धुरंदर संगीतकारांच्या मोठमोठ्या गलबतांच्या प्रभावळीत कल्याणजी-आनंदजी म्हणजे एक छोटीशी नाव घेऊन सुकाणू सांभाळत वाटचाल करणारे छोटे खलाशी. पण त्यांनीही काही गाण्यांमध्ये अशी छाप सोडलीय की, भारतीय चित्रपट संगीताचा इतिहास लिहिताना त्यांचा नामोल्लेख हा करावाच लागेल. सतत मेजवानी झोडणाऱ्याला कधी-कधी वेगळ्या टेस्टचं मिळालं तर बरं वाटतं की नाही? रसिकांच्या जिभेचे चोचले पुरवायला म्हणून इतरांनी चविष्ट पदार्थांची मेजवानी दिली तर कल्याणजी-आनंदजी घेऊन आले छान चवदार भेळपुरी. 'छलिया'ची गाणी लोकांना आवडली होती पण फिल्मफेअरमध्ये मात्र त्यांना मानाचं स्थान मिळालंच नाही. यादीत त्यापेक्षा अव्वल आणि अवीट गोडीच्या गाण्यांचा भराणा असल्याने असं घडलं होतं. मुघल-ए-आझम, दिल अपना और प्रीत पराई, कोहिनूर, चौदहवी का चाँद, परख अशा दमदार सिनेमांसमोर छलियाचा काय टिकाव लागणार होता म्हणा. त्याकाळी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला म्हणजे जणू आपलं मानपान राजदरबारी झाल्यासारखा आनंद व्हायचा सर्वांना. 'छलिया'ला राजमान्यता मिळाली नाही पण लोकमान्यता मिळाली. ती गाणी आजही सुपर-हिट आहेत. आपल्या ओठावर आहेत. टवटवीत आहेत.. 'छलिया'चं हे गाणं आपल्याला आवडतं कारण त्यातली थॉट. प्रत्येक माणसात जसं छोटं नटखट बाळ दडलेलं असतं तसंच प्रत्येक माणसाच्या रोमॅन्टीक कल्पनांमध्येही एक खट्याळ, मस्तीखोर प्रेमी दडलेला असतो. कोणी 'सीधी बात नो बकवास' टाईपचा असतो.. तर कोणी आपल्या मनातल्या भावना कधीच ओठावर येऊ देत नाही. गीतकार कमर जलालाबादींनी प्रेमिकांच्या मनातले हे भाव, या

गाण्यातून छानच व्यक्त केले आहेत.. ‘ती’ श्रीमंत आहे म्हणून आपल्या इशाऱ्याला खेटरावर मारतेय असे गरीब तरुणाच्या मनातले विचार इथे कसे अचूक व्यक्त केलेत पहा...

*सनम हम माना गरीब है, सनम हमऽऽ सनम हम माना गरीब हैऽऽ*
*नसिबा खोटा सही, बंदा छोटा सही, दिल ये ख़जाना है प्यार का,*
*हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला..*

‘आग’, ‘बरसात’, ‘आवारा’, ‘श्री ४२०’ पेक्षा राज इथे वेगळा होता. साथीला नर्गीस नव्हती पण नूतन पब्लिकचा कलिजा खलास करण्याइतपत सुंदर दिसायची. ‘छलिया’चं कथानक राजभोवतीच फिरणारं असल्याने पूर्ण सिनेमात राजसाहब बस्स छा गये थे! ‘छलिया मेरा नाम..’ अशा गाण्यानं स्वतःचं अस्तित्व ठळकपणे विषद करून सांगताना कथानक थोडंसंच पुढे सरकतं, पण आपण त्या कथानकात आपसूकच गुंतत जातो. राजच्या तोंडी जेव्हा ‘डम डम डिगा डिगा..’ येतं तोपर्यंत त्याने अख्खा पडदा पूर्णपणे गिळंकृत केला आहे याची खात्री पटते. त्याचं स्वतःचं आर.के.बॅनर नसूनही राज कपूरचा इथला वावर थक्क करतो. आपल्या कॅम्पमध्ये तो जसा शंकर-जयकिशनजींकडून आपल्याला हवे तसे मनपसंद आविष्कार करून घ्यायचा, तोच राज कपूर इथे ‘छलिया’ची गाणी ऐकतानाही आढळतो. कल्याणजी-आनंदजींकडून त्याने हवी तशी गाणी मिळवली आहेत. त्यांच्यावरही आपली छाप सोडलीय. त्याच्यात एक छुपा संगीतकार लपला आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झालं.

आता याक्षणी बाहेर तस्साच पाऊस कोसळतोय. वाफाळत्या चहाचा कप बाल्कनीच्या कठड्यावर ठेवलाय मी. खाली पाहतो तर रोज त्याचवेळी निघणारी ‘ती’ झपझप पावलं टाकत जिन्नस घ्यायला निघालीय, बाजाराकडे! सुस्नात! एका हातात पिशवी आणि दुसऱ्या हातात छत्री. एकीकडे धुँवाधार पावसामुळे साचलेलं पाणी चुकवत तर दुसरीकडे कोसळणाऱ्या पावसाशी मुकाबला करत. माझ्या ओठावर आजही येतंय ते ताजातरीन गाणं..

*तेरी कसम, तू मेरी जान हैऽऽतेरी कसम, तेरी कसम, तू मेरी जान है,*
*मुखडा भोला-भाला, छुप के डाका डाला, जाने तू कैसी महेमान है,*
*हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला.. डम डम डिगा डिगा, मौसम भीगा भीगा,*
*बिन पिये मैं तो गिरा, मैं तो गिरा, मैं तो गिरा, हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला..*

♥

‘छलिया’ या चित्रपटातील गाण्यांच्या व्हिडिओजसह इतर काही ‘यू-ट्युब’ लिंक्स देत आहे. गाण्याचा ‘ऑडिओ, कराओके ट्रॅक’ तसेच, संपूर्ण चित्रपटाची सुद्धा ‘यू-ट्युब’ लिंक देत आहे :

| | |
|---|---|
| १. डम डम डिगा डिगा... (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=I2Oi7inSVoc |
| २. डम डम डिगा डिगा... (व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=pZsmUHNwsas |
| ३. डम डम डिगा डिगा... (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=VAPn2RZXfRE |
| ४. संपूर्ण चित्रपट : ‘छलिया’ (१९६०) | https://www.youtube.com/watch?v=mMND0b9UMLM |
| ५. ‘छलिया’ चित्रपटातील गाणी (व्हिडिओ) : | https://youtu.be/z7dILkTutI0 |
| ६. साठच्या दशकातील (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) : | https://youtu.be/R0OvMThBD64 |
| ७. साठच्या दशकातील प्रणयगीते (ऑडिओ) : | https://youtu.be/6rhF0JoBwh8 |
| ८. राजकपूर (१०० सुपरहिटस् ऑडिओ) : | https://youtu.be/V5UsKBBXMn4 |

♥

## १६ : डम डम डिगा डिगा

चित्रपट : छलिया (१९६०)
निर्माता : सुभाष देसाई
दिग्दर्शक : मनमोहन देसाई
गायक : मुकेश
गीतकार : कमर जलालाबादी
संगीत : कल्याणजी-आनंदजी

डम डम डिगा डिगा, मौसम भीगा भीगा,
बिन पिये मैं तो गिरा, मैं तो गिरा, मैं तो गिरा,
हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला - २

तेरी अदा वाह्-वाह् क्या बात है, हाय तेरी अदा,
तेरी अदा वाह्-वाह् क्या बात है,
अँखियाँ झुकी झुकी, बाते रुकी रुकी - २
देखो 'लुटेरा' आज लूट गया,
हाय अल्लाऽऽसूरत आप की सुभानल्ला..

सनम हम माना गरीब है, सनम हमऽऽ
सनम हम माना गरीब हैऽऽ
नसिबा खोटा सही, बंदा छोटा सही - २
दिल ये ख़ज़ाना है प्यार का,
हाय अल्लाऽऽसूरत आप की सुभानल्ला..

तेरी कसम, तू मेरी जान हैऽऽतेरी कसम,
तेरी कसम, तू मेरी जान है,
मुखडा भोला-भाला, छुप के डाका डाला - २
जाने तू कैसी महेमान है, हाय अल्लाऽऽ सूरत आप की सुभानल्ला..
डम डम डिगा डिगा, मौसम भीगा भीगा,
बिन पिये मैं तो गिरा, मैं तो गिरा, मैं तो गिरा, हाय अल्लाऽऽ
सूरत आप की सुभानल्ला..

♥

तुमच्या संग्रही असायलाच हव्यात अशा काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

१. मुकेश (विक- एण्ड क्लासिक रेडिओ शो) (ऑडिओ) https://youtu.be/NbPmQyWsWyU

२. कल्याणजी-आनंदजी (५१ सुपरहिटस्)(व्हिडिओ) https://youtu.be/b3BehOefIms

३. मुकेश व कल्याणजी-आनंदजी (व्हिडिओ प्ले-लिस्ट)

https://www.youtube.com/playlist?list=PLBfuJwnweBgv6a7Se2_xEUOdSW88eLcQD

♥

## 17 : Bhatuklichya Khela Madhali..

## १७ : भातुकलीच्या खेळामधली..

संगीत महोत्सव होता एका गावात. बरेच नामांकित गायक-गायिका यायचे होते त्या निमित्तानं. तिथलाच एक हौशी गायक. बेताचा वकूब, पण बुलंद हौसला. संयोजकांशी वशिला, माझं गाणं ठेवाच म्हणून हटून बसला. आता आली की पंचाईत! लाख परीनं समजावलं, विनवलं. बाबा रे! बाहेरनं मोठ-मोठे कलाकार येतायत. वेळ नाही देता यायची. पण हायऽऽ! ऐकेचना. बिदागी नसली तरी चालेल, पण गायला द्याच. स्थानिक कलावंत आहे वगैरे धमकीवजा सांगत हट्टच धरून बसला तो. झालं! कंटाळून शेवटी त्याला पंधरा-वीस मिनिटं गायची संधी दिली. पुढच्या गायकाच्या आगमनाची वाट पाहत पब्लिकनं त्याला कसाबसा सहन केला खरा, पण गाणं संपताच पडलेल्या टाळ्यांनी त्याला कुठला चेव चढला कुणास ठाऊक, चक्क बिदागीसाठी हटून बसला तो. आता मात्र आयोजकांचे धाबे दणाणले. 'अहो, मुश्किलीनं वेळ दिला तुम्हाला आणि वर बिदागी कसली मागता?' 'मगऽऽ? फुक्कट गायचं का? वाईट गायलोय का मी? कशा कडाडून टाळ्या पडल्या ऐकल्या नाहीत? ते काही नाही..काढा पैसे!..' 'अहो...गायलात ठीक. त्याबद्दल मंडळ आपलं आभारी आहे.. बस्स! पण ते पैशांचं नाही जमायचं बघा!..' 'चांगलं गायलो म्हणता ना! मग काढा बिदागी!..' त्याने हट्ट सोडला नव्हता. संयोजक आता मात्र अगदीच वैतागला. सहनशीलता संपली बिचाऱ्याची.. 'तुम्ही गायलात, पण खरं सांगू?.. तुमचा 'गंधार' अगदीच बेसुरा होता हो..तेव्हा..' 'मग असं करा.. त्या 'गंधार'चे पैसे काय ते कापून घ्या आणि बाकीचे द्या.. आत्ताच्या आत्ता..' सर्वजण त्याच्याकडे 'आऽऽ' वासून पहातच राहिले.. काय गणित आहे.. व्वा!

महाराष्ट्राचे लाडके भावगीत गायक 'अरुण दातेजींनी' त्यांच्या मुलाखतीत त्यांनी हा किस्सा ऐकवला खरा पण भेटलेयत तुम्हाला असे 'कलाकार'? नाही ना? ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत असल्याने माझ्यापुढे मात्र असे प्रसंग अगदी वरचेवर घडत असतात. वशिल्याचे तट्टू गायला धाडले जातात. आमची अक्षरशः गोची होते कैकदा. पण संगीतकारांचा पवित्रा असा असतो की कुणा एका बुजुर्ग शायरने म्हटलेला शेर आठवतोय याक्षणी.. 'बाज़ीचा-ए-अतफ़ाल (म्हणजे बच्चों का खेल) है दुनिया मेरे आगे.. होता है शब-ओ-रोज़ (हर वक्त, हर समय) तमाशा मेरे आगे। गाण्यातला आलाप नीट घेता आला नाही तर.. 'हल्लीच मूळव्याधीचं ऑपरेशन झाल्यामुळे थोडा त्रास होतोय..' असं सांगणारा महाभागही भेटलाय मला. आता मूळव्याधीचा गळ्याशी संबंध काय त्याचं त्यालाच ठाऊक. पण अशी व्यक्ती जेव्हा आपली दैवतं असणाऱ्या बुजुर्ग गायकांच्या गाण्यांवर टीका करू लागली की टाळकंच सणकतं. म्हणे अरुण दाते तलतला कॉपी करतात. मी हळूच तो प्रश्न विचारताच दातेसाहेब दिलखुलास हसले. म्हणाले.. 'होय!..फॅन आहे मी त्यांचा. निस्सीम चाहता. एकलव्यासारखी भक्ती केलीय त्यांची. त्यांच्या आवाजातला तो हळुवार कंप, भावनाप्रधान गायकी आणि मखमली खर!.. मला मराठीतला 'तलत महमूद' म्हणतात ना? काय वाईट आहे? बहुमानच आहे माझा तो. मी जे गातो, गायलंय ते सारं तुम्हा रसिकांपुढे आहे. गणितं मांडायची तर त्यांची मांडा. उगीच तुलना कशाला?' अतुल दाते या माझ्या मित्राचे बाबा या नात्याने त्यांच्याशी थोडी जवळीक असल्याने मी पुढचा प्रश्न केला...

'अरुणजी, मराठीत गजल प्रकार गाताना तुम्हाला नेमकं कसं वाटतं? काय अनुभव असतो तुमचा?'

'गजलशी माझी ओळख पहिल्यांदा कशी झाली.. सांगू? एका फुग्यावरून झालेल्या भांडणातून.. दहा-एक वर्षांचा असेन, आत्याकडे अमरावतीला तिच्या पुतण्याच्या मुंजीला गेलो होतो आम्ही. आत्याच्या दिरांची फुग्याची फॅक्टरी. आत्याचा एक पुतण्या होता तिथं. माझ्याहून दोनेक वर्षांनी मोठा. दणकट! चिक्कार दादागिरी करणारा, ओरडणारा, मारणारा असा त्याचा खाक्या. फुग्यावरून की काय भांडण झालं. मी तिथं नवखा असल्याने, त्याच्याबद्दलचा तितकासा अंदाज नव्हता. मी ताठर भूमिका घेताच त्याने चक्क बदडायलाच सुरुवात केली. बराच मार खाल्ला तेव्हा कुणीतरी दूर केलं. भांडण मिटलं, पण त्या माराच्या निमित्तानं का होईना, त्या मुलाचा स्पर्श मला झाला होता. अभिजात काव्य म्हणजे काय, गजल कशी असते याचे अंकुर बहुदा त्या क्षणापासूनच मनात रुजू लागले. तो मुलगा कोण माहीत आहे? तो मुलगा म्हणजे म्हणजे आजचा महान कवि सुरेश.. सुरेश भट. अरे, जीव ओवाळून टाकावं असं एकेक काव्य लिहिलंय त्यानं. त्याने आजही 'तसं' मारायचं ठरवलं ना तरी मार सोसायची तयारी आहे माझी...'

'रंग माझा तुला.., सूर मागू तुला मी कसा?.. अशी त्यांची अनेक गाणी गायलात ना? तुमचं एखादं गजलचा स्पर्श असलेलं भावगीत सांगा..' अरुणजी सरसावून बसले.. 'त्याने आपल्या साहित्यविश्वात इतके आविष्कार केलेत की सुरेशच्या गाण्यांच्या आठवणींचा भलामोठा ग्रंथच होईल. आज जरा हटके असं गाणं घेऊया.. पाडगांवकरांच्या 'भातुकलीच्या खेळामधली..'वर लिही. सुरेश भटांसारखाच या कवीच्या एकेक काव्याने घडलाय हा अरुण दाते.. अरे, अस्सल विराणी आहे ती.

यशवंत देवांसारख्या गुणी संगीतकारानं त्या काव्याला संगीताची जोड दिलीय. शब्दांना कवितेत इतकं महत्त्व देणारा दुसरा संगीतकार माझ्यातरी पाहण्यात नाही. मी चाल ऐकली. देवांना म्हटलं.. 'हे गाणं म्हणजे कविता पाठ केल्यासारखं किंवा गोष्ट सांगितल्यासारखं वाटतंय.. थोडं बदलणार आहात का?' ते नुसतं हसले होते. 'अरू.. तुझ्या आयुष्यातलं हे फार मोठं गाणं होणार आहे.. मी सांगतो तसं म्हण.. देवांचं म्हणणं खरं ठरलं...'भातुकलीच्या खेळामधली..' हे गाणं माझ्या कारकीर्दीतल्या सर्वांगसुंदर गाण्याच्या यादीत अव्वल ठरलं..'

इथे मी एक गोष्ट नमूद करू म्हणतोय. अरूण दातेसाहेबांची सर्वच्या सर्व भावगीतं सर्व रसिकांच्या खूप आवडीची आहेत यात वादच नाही. परंतु त्यातलं 'भातुकलीच्या खेळानधली' हे भावगीत मात्र सर्वांनाच आवडतं असं नाही हे जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा मी अक्षरशः आश्चर्यचकित झालो. माझा हा लेख 'आठवणीतली गाणी' या 'कॉलम'मधून प्रसिध्द झाल्यानंतर एका वाचकाने मला खरमरीत पत्र लिहून तसं कळवलं होतं. पत्राचा आशय काहीसा असा होता.. 'भातुकलीच्या खेळानधली' हे भावगीत तुमच्या मते आठवणीत ठेवण्याजोगं असेल याला माझी काहीही हरकत नाही.. अरुणजी दातेसाहेबांनी ते सुंदरच गायलंय. त्याची चाल आणि त्यातलं संगीत संयोजन चांगलं असलं तरी ते ऐकताना माझ्यासारख्यांच्या मनाला फार त्रास होतो हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. मी हे गाणं लागलं की अस्वस्थ होतो. ते कानावर पडलं की तो संपूर्ण दिवस मानसिकरित्या क्लेशकारक ठरतो. माझ्या मते वैफल्यग्रस्त लोकांसाठी तर ते अतिशय धोकादायक ठरू शकतं. 'शहनाई'! कोणत्याही मंगलकार्यात तिची साथ असल्याशिवाय समारंभ फिका वाटतो की नाही? 'शहनाई' हे वाद्य मंगलमय धूनच निर्माण करते आणि ते शंभर टक्के सत्यही आहे. परंतु इथली शहनाई निदान माझ्यासारख्यांच्या हळव्या मनाला अस्वस्थ करणारी आहे. 'तकदीर का फसाना, जाकर किसे सुनाए..' (सेहरा) हे गाणं तुम्हाला माहीतच असेल. ते गाणंही एक विराणीच आहे पण त्या गाण्यात ती तितकीशी काळजाला घरे पाडत नाही, पण देवसाहेबांचं संगीत संयोजन इतकं प्रभावी आहे की मंगलवाद्य शहनाई इथे ऐकताना फार त्रास होतो हो! संगीतकारांबद्दल काही बोलावं इतका मी मोठा नाही. पं. यशवंत देवसाहेबांबद्दल तर मला विलक्षण आदर आहे. ते स्वतः एक कवीसुध्दा आहेत. माननीय मंगेश पाडगावकरजींच्या सगळ्याच रचना मला आवडतात. अगदी 'लिज्जत' पापडसाठी त्यांनी लिहिलेली कविताही मी 'लॅमिनेट' करून ठेवली आहे. पण खरं सांगू का? हे गाणं माझ्या मुळीच आवडीचं नाही. अरूण दातेसाहेब तुमच्या परिचयाचे आहेत. तुम्ही त्यांच्या गाण्यांवर फिदा आहात किंवा तुम्ही त्यांचे 'फॅन' आहात. तुमच्यामते ते सुंदर गाणं असेल पण प्रत्येक वाचकाला, श्रोत्याला ते आवडतंच असं नाही....म्हणून लेख लिहिताना ते गाणं लोकांना नक्की आवडतं की नाही हे कृपया पहाच..धन्यवाद!..'

*'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..'*

गाण्याची पहिली ओळ वाचताना काय वाटतं? भातुकलीचा खेळ खेळणाऱ्या दोन लहान मुलांची गोष्ट वाटते ना? बालगीत असावं की काय इतपत. पण पुढच्या ओळीतच कवीची कल्पना अगदी थेट मनाला भिडते.. अंतर्मुख करते. मुखडा संपताच येणारं संगीत शहनाईच्या सुरांचं आहे. राग मदमाद सारंग, ठेका जलद केरवा! वाटतं की आता या गाण्याचा मूड प्रेमगीताकडे वळणार.. ठेकाही तसाच. राजा-राणीचं प्रेम, मग रोमान्स, त्यातलं थ्रील सगळं सगळं.. पण पहिला अंतरा ऐकताच आपल्या मनात एक अनामिक काहूर माजतं. अर्थ शोधण्याचा आटापिटा करतो आपण..

*'राजा वदला, मला समजली, शब्दावाचून भाषा, माझ्या नशिबासवे बोलती, तुझ्या हातच्या रेषा..,*
*का राणिच्या डोळा तेव्हा, दाटुन आले पाणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..'*

'आजही जेव्हा मी हे गाणं सादर करतो तेव्हा स्त्रीवर्गातले बरेच सदस्य डोळ्यांना रुमाल लावताना दिसतात. हे गाणं सर्व पिढ्यांना इतकं आपलंसं वाटतं की, त्यातला अर्थ खरोखरच अनुभवलेल्यांना जास्त बोचत असतो..' चार अंतऱ्यांचं भावगीत. पण प्रत्येक कडव्यात कवीने या कथाकल्पनेचा विस्तार करता करता एक विराणी छेडलीय. विरहाची. 'ती आणि तो' हे त्यातले नायक-नायिका, राजा-राणी! ती दोघं आपल्या अवती-भवतीच आहेत की काय असा भास होण्याइतपत गहिरं आहे हे काव्य...

*'राणी वदली बघत एकटक, दूर दूरचा तारा, उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा,*
*पण राजाला उशिरा कळली, गूढ अटळ ही वाणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..'*

किंवा
*'तिला विचारी राजा, का हे जीव असे जोडावे, का दैवाने फुलण्याआधी फूल असे तोडावे,*
*या प्रश्नाला उत्तर नव्हते, राणी केविलवाणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..'*
किंवा

*‘का राणीने मिटले डोळे, दूर दूर जाताना.. का राजाचा श्वास कोंडला, गीत तिचे गाताना..*
*वाऱ्यावरती विरून गेली, एक उदास विराणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..’*

ही कडवी अभ्यासताच लक्षात येते काव्यातली आशयसंपन्नता. मंगेश पाडगांवकरजींचं हे काव्य, यशवंत देवसाहेबांच्या संगीतातून सादर होताना अरूण दातेजींनी आपला आविष्कार हृदयाची तार छेडणारा कसा होईल यावर मेहनत घेतलेली जाणवते. देवसाहेबांनी या गीताचं संगीतसंयोजन करताना केलेली क्लुप्ती पहा. गाण्याची थॉट विरहिणीची पण त्याला अलंकृत केलंय आनंददायी शहनाईने. हे धक्कातंत्र गाण्याला वेगळंच परिमाण देतं. गजलेचा स्पर्श असलेलं हे काव्य त्याचा खराखूरा अर्थ ध्यानात येताच मनावर आघात करतं. वाटतं.. की अशा गाण्यांबद्दल गणितं मांडायची की त्यातल्या काव्याबरोबर आपल्या आयुष्यातल्या घटना ताडून पहायच्या? म्हणूनच कुणी व्यक्ती जेव्हा आपली दैवतं असणाऱ्या बुजुर्ग गायकांच्या गाण्यांवर टीका करू लागतात तेव्हा आपलं तर टाळकंच सणकतं. आमच्या स्टुडियोत जेव्हा एखादा गायक-गायिका तान चांगली न घेता येण्याचं कारण ‘डायाबेटीस’ आहे असं सांगू लागताच प्रश्न पडतो की, मिठ्ठास गळ्यात येण्याऐवजी दुसरीकडे का बरं आली असावी?..

♥

‘अरूण दाते’ यांची भावगीतं हा आपल्या जिव्हाळ्याचा विषय. या गाण्याचा ‘ऑडिओ, व्हिडिओ, कराओके ट्रॅक’ देत आहे. ‘विक-एण्ड क्लासिक रेडिओ शो - अरूण दाते स्पेशल’ या कार्यक्रमाची ‘यू-ट्युब’ लिंक सुद्धा देत आहेः

| | |
|---|---|
| १. भातुकलीच्या खेळामधली… (ऑडिओ) | https://www.youtube.com/watch?v=GG0rfmCrMDk |
| २. भातुकलीच्या खेळामधली… (व्हिडिओ) | https://www.youtube.com/watch?v=RjG-Us8IRJA |
| ३. भातुकलीच्या खेळामधली… (कराओके) | https://www.youtube.com/watch?v=lhvOjqT46h8 |
| ४. ‘विक-एण्ड क्लासिक रेडिओ शो’ (कार्यक्रम) | https://www.youtube.com/watch?v=kQwAZBKPIM4 |
| ५. अरूण दातेसाहेब (रेडिओ क्लासिक शो) | https://youtu.be/kQwAZBKPIM4 |
| ६. अरूण दातेसाहेब (भावगीते) | https://youtu.be/NsC9_Gwakm8 |
| ७. कविराज मंगेश पाडगांवकर (शतदा प्रेम करावे-कविता) | https://youtu.be/Ewxv8PwbYSQ |
| ८. श्रीराम जय राम.. (अरूण दाते-भक्तिगीत) | https://youtu.be/Ms8lSRO_NdU |
| ९. श्रीरंग सावळा तू.. (ऑडिओ) | https://youtu.be/Q5OpYTAtawI |

♥

## १७ : भातुकलीच्या खेळामधली..

गायक : अरूण दाते
रचना : कवि मंगेश पाडगांवकर
संगीत : पं. यशवंत देव

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी,
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..

राजा वदला, मला समजली, शब्दावाचून भाषा,
माझ्या नशिबासवे बोलती, तुझ्या हातच्या रेषा..,
का राणिच्या डोळा तेव्हा, दाटुन आले पाणी,
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..

राणी वदली बघत एकटक, दूर दूरचा तारा,
उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा,
पण राजाला उशिरा कळली, गूढ अटळ ही वाणी,
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..

तिला विचारी राजा, का हे जीव असे जोडावे,
का दैवाने फुलण्याआधी फूल असे तोडावे,
या प्रश्नाला उत्तर नव्हते, राणी केविलवाणी,
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..

का राणीने मिटले डोळे, दूर दूर जाताना..
का राजाचा श्वास कोंडला, गीत तिचे गाताना..
वाऱ्यावरती विरून गेली, एक उदास विराणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..
भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी,
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी..

♥

## 18 : Janewalo Zara..

## १८ : जानेवालों जराऽऽ मुडके देखो मुझे..

धर्मेंद्रच्या मालकीचा जुहूचा 'सनी सुपर साऊन्ड' रेकॉर्डिंग स्टुडिओ! तिसऱ्या मजल्यावर आमच्या 'येस बॉस' या शाहरुख खान अभिनीत चित्रपटातल्या गाण्याचं रेकॉर्डिंग! स्टुडिओत पाऊल टाकताक्षणी केवढ्यांदा तरी दचकलो मी. 'येस बॉस'चंच काम होतं ना आज? मग हा मिलिंद (संगीतकार आनंद-मिलिंद फेम) कशाला कडमडलाय? भांबावून जात मी सेटवर आपली माणसं दिसतायत का हे पहायला, पायाला भिंगरी लावून भटकलो. म्युझिक-हॉलमध्ये आमचे संगीतकार जतिन आणि ललित, आपल्या वाद्यवृंदाच्या गराड्यात कार्यमग्न होते. मग?.. हा मिलिंद मॉनिटर-रूममध्ये काय करतोय?.. माझ्या चेहऱ्यावरची चलबिचल, कपाळावरच्या पन्नास आठ्या पाहून म्युझिक-अरेंजर बबलूदा काय ते समजले असावेत..
'क्या हुआ?.. अरे, शिटी मारनेकू आया है वो!..' इति बबलूदा!
'दुसरा कोई मिला नही क्या?..' मी या सिनेमाचा रेकॉर्डिंग-इन्चार्ज, म्हणून माझी रास्त पृच्छा!
'नागेश सुर्वे आयेला है, पण आणखी एक शिटी मारनेवाला हवा होता रे या गाण्यात. (हे नागेश सुर्वे म्हणजे उत्कृष्ट व्हायोलिन वादक, संगीतकार 'ऋषीराज'! - 'ले लो भाई चिवडा ले लो' फेम.. हे साहेब म्युझिक-इंडस्ट्रीत सुरेल 'शीळ' वाजवणारे म्हणून सुविख्यात आहेत.) पहले मालेपर आनंद-मिलिंदका टेक हो रहेला है! कॅन्टीनजवळ मॅसेंजरला फैलावर घेणाऱ्या जतिनजींना पाहून त्यांची परेशानी समजताच आपणहून आलाय तो… दोस्ती के खातीर! टेन्शन मत ले. अच्छा आदमी है वो!..' हुश्श! मी रिलॅक्स झालो. मिलिंदच्या या चांगुलपणावर फिदा होत गोल झालेल्या माझ्या ओठातून हलकेच शीळ बाहेर पडली. तसं आकाश वगैरे कोसळणार नव्हतं. आनंद-मिलिंद म्हणजे बुजुर्ग संगीतकार चित्रगुप्तसाहेबांची गुणी मुलं. पण चित्रपट-संगीताच्या क्षितिजावर भप्पी लाहिरी नामक शर्विलकाचा.. आपलं.. भुरट्या चोराचा उदय झाल्यापासून दुसऱ्या संगीतकाराचं किंवा त्यांच्या चमच्यांचं स्टुडिओत नुसतं डोकावणं देखील महागात पडतं. गरम दुधानं तोंड पोळलं की ताकही आपण फुंकून पितो की नाही?.. अक्षरशः चाली चोरतात. 'जुम्मा चुम्मा..' आणि 'तम्मा तम्मा..' ठाऊक असेलच. काय दिवस होते पूर्वीचे! निकोप स्पर्धा असायची संगीतकारांमध्ये. एकाच्या चांगल्या धुनांची दुसरा तारीफ करायचा. एखाद्या गाण्याची चांगली भट्टी जमलीय हे कळताच नौशादजी, सी. रामचंद्रजींचं हमखास कौतुक करायचे. तिरसटराव म्हणून समजला जाणारा ओपी, शंकर-जयकिशनजींचं कौतुक करताना दिसायचा. इकडचे वादक तिकडे जाऊन वाजवायचे पण त्यांचं ईमान असायचं समोर ठेवलेल्या कागदावरच्या नोटेशनशी. संगीतकारांमध्येही दोस्ताना असायचा. आर्डीसाहेब चक्क कल्याणजी-आनंदजी नाईटला आलेले दिसायचे…

आर.डी.बर्मनसाहेबांचं त्यादिवशीचं 'बॉम्बे लॅब स्टुडिओ'त येणं म्हणूनच खटकलं नव्हतं कुणाला. तिथे लक्ष्मीकांत-प्यारेलालजींचा 'टेक' होता. 'पारसमणी' नंतरची त्यांची ही दुसरी फिल्म. आर्डी (पंचमदा) सकाळपासूनच स्टुडिओत मौजूद होते.. आले असतील बापडे प्यारेभाईंशी गुफ्तगू करायला, असंच सगळ्यांना वाटलं! चहाचा आस्वाद घेता-घेता व्हायोलिन आणि रिदम-सेक्शनचे वादक त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारत होते. दहाच्या ठोक्याला लक्ष्मीजी आणि प्यारेभाई येताच कामाला सुरुवात झाली. नोटेशन पेपर्स वाटले गेले. इतक्यात रफीसाहेबही आले. वादक मंडळी गाण्याच्या स्केलप्रमाणे आपापली वाद्ये ट्यून करण्यात गुंतली. प्यारेभाईंनी आर्डीशी दोन मिनिटे बातचित करून त्यांच्या हातात नोटेशनचा कागद दिला. आर्डी निमुटपणे आपल्या जागेवर स्थानापन्न झाले, नोटेशन चार्टवर भिरभिरती नजर फिरवत. काही वादकांच्या भुवया उंचावल्या होत्या पण पंचमदांनी शांतपणे आपली छोटीशी बॅग उघडली. माऊथ-ऑर्गन काढून वाजवताच त्या वादकांसह सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधान फुललं. पंचमदांनी सिग्नेचर ट्यून वाजवली आणि त्यात बेमालूमपणे मिसळून जात व्हायोलिन ताफ्याने एकदिलाने 'सा' देताच रफीसाहेबांचा मधाळ आलाप अवघं वातावरण भारून गेला. पंचमदांचा माऊथ-ऑर्गन स्वरमाधुर्याची उधळण करत राहिला..

*जानेवालों जराऽऽ मुडके देखो मुझे,*
*एक इन्सान हूँ, मैं तुम्हारी तरहाऽऽ*
*जिसने सबको रचा, अपनेही रूप से,*
*उसकी पहचान हूँ, मैं तुम्हारी तरहाऽऽ*
*जानेवालों जराऽऽ*

'कथा' नावाची चीज असतेच कुठे हल्लीच्या चित्रपटात? काही मोजके सन्माननीय अपवाद वगळता आनंदी आनंद! तद्दन कमर्शियल म्हणजेच चविष्ट पक्वान्न बनवणारे खानसामा अर्थात दिग्दर्शक मुद्दाम घेतले जातात. एक तरूण आणि एक तरुणी. त्यांचं प्रेमप्रकरण. त्यांचे हॉट प्रणयप्रसंग घुसडायचे. जोडीला ॲक्शन, इमोशन, बलात्कार, खून आणि भाईगिरीची फोडणी द्यायची, की झाला अठरा रिळांचा चित्रपट तयार! तुम्ही पाहताच की सिनेमाच्या पहिल्या आणि शेवटच्या रिळात 'टाईटल्स' म्हणजे नावांची जंत्री असते. सिनेमात आठ गाणी! म्हणजे ती आठ रिळं उरकण्याचं काम करतो तो नृत्य-दिग्दर्शक. फाईट-सीन्स चिक्कार म्हणजे आणखी चार. गाड्यांचा पाठलाग तर हमखास असतो. ती एक रीळ! म्हणजे अशी पंधरा रिळं करून झाली की आता उरलेल्या भागात 'मोकळ्या जागा भरा..' स्टाईलने कथाभाग व्यवस्थित वाटणी करत उरकला की फिल्लम तैयार! हेच तर खरं दिग्दर्शकीय कौशल्य! राजश्रीचा 'दोस्ती' (१९६४) मात्र या पंक्तीत सर्वथा वेगळ्या धाटणीचा. इमोशनसे भरपूर, पण दिल को छू लेनेवाला. बाणभट्टजींच्या कथेवर गोविंद मुनिसजींचे संवाद आणि ख्यातकीर्त सत्येन बोस यांच्या दिग्दर्शनाने साकारलेला एक भावविभोर आविष्कार. गोष्ट साधी-सरळ पण मनाचा ठाव घेणारी. लक्ष्मी-प्यारेंच्या संगीताच्या कशिदाकारीने अधिकच गहिरी झालेली. एक आंधळा तर दुसरा लंगडा असलेल्या अपंग मित्रांची ही दास्तान. मोहन जन्मांध नाहीय. अचानक दृष्टीला पारखा झालाय तो. गाव महापुरात वाहून जाताच नर्स म्हणून नोकरी करणाऱ्या आपल्या बहिणीच्या शोधात तो शहराची वाट धरतो. दुसरा रामू हा होतकरू असा तरुण विद्यार्थी, शालेय आणि क्रीडाप्रकारात प्रवीण असूनही घरच्या गरिबीमुळे गांजलेला. अठरा विश्वे दारिद्र्य त्याला शाळेतून डच्चू देण्यात आणि राहतं घर खाली करण्यास भाग पाडतं. या धक्क्याने आजारी आई आणखी गलितगात्र होते. येणारी पेन्शनही बंद होताच सर्व मार्ग खुंटल्यामुळे ती हताश होते. एक दिवस अचानक जिन्यावरून तोल जाऊन पडते. औषधोपचारासाठी धाव घेणारा रामू नेमका धावत्या गाडीखाली येतो आणि त्याच्या एका पायाचा पार चेंदामेंदा होतो.. मजबुरी त्याला रस्त्यावर आणते. समदुःखी मोहन भेटतो. उदरनिर्वाहासाठी नोकरी करावी तर अपंगत्व आड येतं. लोकांची नकारघंटा ऐकून त्रस्त होतात बिचारे. अशा परिस्थितीत भीक मागण्याशिवाय पर्याय नाही हे विदारक सत्य, मोहन रामूला सांगतो.. पण संस्कार आणि खुद्दारीमुळे ती वाट चोखाळायला रामूचं मन धजावत नाही. एकदा रामू विरंगुळा म्हणून सहजच आपल्या पोतडीतला माऊथ-ऑर्गन काढून वाजवतो. येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची पावलं थबकतात. त्या जादुई सुरावटीवर फिदा होत ते दौलतजादा करतात. 'लोकांनी दिलेले हे पैसे म्हणजे भीक आहे..' असं रामूचं म्हणणं तर 'तू छंद म्हणून जोपासलेली ही जी कला आहे त्याला लोकांनी दाद देत दौलतजादा केलीय..' असं मोहन त्याला समजावतो. पोटाची भूक भागवायला शेवटी लाचारीने ते हाच मार्ग स्वीकारतात. आता येणारा प्रत्येक दिवस आनंदाने साजरा होतो. एक दिवस त्याच्या बाजा वाजवण्याची कुणीच दखल घेत नाही. महंमद अली रोडवर हिंदू देवदेवतांचे फोटो किंवा गणपती बाप्पाच्या कॅसेटस् विकायला बसल्यावर जो अनुभव येईल तसे गांगारतात ते. कुणी त्यांच्याकडे वळूनही पाहत नाही. रामूच्या माऊथ-ऑर्गनच्या आलापीतून नेमका सूर गवसताच त्या क्षणापर्यंत फक्त उपदेशाचे डोस देणारा मोहन मनाच्या गाभाऱ्यातून घुमणाऱ्या आवाजात गाऊ लागतो...

*इस अनोखे जगत की मैं तकदीर हूँ,*
*मैं विधाता के हाथों की तसवीर हूँ.. एक तसवीर हूँ,*
*इस जहाँ के लिए, धरती माँ के लिए,*
*शिव का वरदान हूँ, मैं तुम्हारी तरहा..*
*जानेवालों जराऽऽ*

'दोस्ती'च्या सगळ्या गाण्यांचं मूल्यमापन करताना एक गोष्ट चटकन अधोरेखित होते. गीतकार मजरूहजी इथे अगदी वेगळेच भासतात. कथेच्या प्रवाहाला सुसंगत, प्रत्येक प्रसंगानुरूप आणि त्यात चपखलपणे बसणारी आशयघन गाणी, मजरूहजी काय ताकदीचे शायर आहेत त्यांचं प्रत्यंतर देतात. आणखी एक वैशिष्ट्य सांगायचं तर गाण्यांचा मूळ गाभा. दोस्तीच्या संकल्पनेवर आधारित गाण्यांचा डोलारा उभा आहे ना? पण 'जानेवालो जरा..', 'मेरा तो जो भी कदम है..' किंवा 'चाहुंगा मैं तुझे..', 'कोई जब राह ना पाये मेरे संग आए..' ही गाणी ऐकताना जाणवतं की त्यातलं संबोधन खूपच आपलेपणाचं आहे. आपल्या 'माशूक'शी असावं तसं! त्यांच्या दोस्तीची वीण इतकी घट्ट झालीय की त्यांनी दोस्ती, यारी, अपनापन अशा सर्व शिड्या पार करून आता थेट समर्पण, कुर्बानीपर्यंतची मजल मारलीय. जणू त्यातला एकजण दुसऱ्याशिवाय जगूच शकत नाही. 'राही मनवा दुःख की चिंता क्यूँ सताती है, दुःख तो अपना साथी है..' या गाण्याचा ढाँचा मात्र फिलॉसॉफीकडे झुकणारा. गेय काव्य असावं ते असं. मजरूहजींनी यमक साधण्यासाठी उर्दू बोजड शब्दांच्या कुबड्या घेतलेल्या नाहीत. अनाकलनीय, कल्पनारम्य शायरीचे पूल बांधलेले नाहीत. 'मेरा तो जो भी कदम है..' या गाण्यात 'जुदा तो होते है वो, खोट जिनकी चाह में है..' असा त्यांनी जो नसीहतभरा पैगाम दिलाय त्याला तोड नाही. खरोखर काळीज पिळवटून टाकणारं हे कथानक. चित्रपट पाहताना अशी वेळ आपल्या दुष्मनावरही येऊ नये अशी आपण

देवाकडे मनोमन प्रार्थना करतो. मजरूहजी पुढच्या कडव्यात किती सोप्या पण परिणामकारक शब्दात मोहनची व्यथा व्यक्त करताहेत पहा..

*मन के अंदर छिपाये, मिलन की लगन,*
*अपने सूरज से हूँ एक बिछडी किरन, एक बिछडी किरन,*
*फिर रहा हूँ भटकता, मैं यहाँ से वहाँ,*
*और परेशान हूँ, मैं तुम्हारी तरहा..*
*जानेवालों जराऽऽ*

या राजश्री निर्मित 'दोस्ती'ने तर कमालच केली होती. 'लो-बजेट'चं कुंकू कपाळी मिरवत दाखल झालेल्या या सिनेमाची सर्व गाणी गाजली होती. कौटुंबिक जिव्हाळ्याचा आणि सुमधुर संगीताने नटलेला हा सिनेमा फिल्मफेअर सोहळ्यात भाव खाऊन गेला. 'संगम', 'लीडर', 'आई मिलन की बेला', 'कोहरा', 'वह कौन थी', 'जहाँ आरा', 'शहनाई' अशा एकाहून एक सरस संगीतमय चित्रपटांच्या प्रभावळीतून उत्कृष्ट चित्रपट, संगीत, कथानक, गीतकार, गायक अशा पुरस्कारांसाठी निवडला गेला तो 'दोस्ती'! या 'दोस्ती' विषयी सांगायचं तर त्यांच्या ताफ्यातील जुने वादक तसेच संयोजक मंडळींकडून संगीतकार लक्ष्मीजींच्या चतुराईचा एक किस्सा सांगितला जातो. (त्या गप्पा 'गजाली' या प्रकारातल्या असल्याने आपण 'खरं खोटं परमेश्वर जाणे' असं म्हणायचं बरं का!) इतर सर्व 'जायंट' संगीतकारांच्या नाकावर टिच्चून 'दोस्ती'लाच इतके महत्त्वाचे 'पुरस्कार' कसे काय मिळाले असतील बुवा ? हा प्रश्न बऱ्याच जणांना पडला होता. लक्ष्मीजींच्या कुणा एका धनाढ्य मित्राने 'दोस्ती' सिनेमाच्या गाण्याच्या रेकॉर्डस् प्रचंड प्रमाणात विकत घेतल्या होत्या, त्या फुकट ही वाटल्या, म्हणूनच त्या गाण्यांचा गाजावाजा झाला अशीही दबक्या आवाजात चर्चा होती. गाणी चांगलीच होती. रेडिओवर सुद्धा चिक्कार गाजली. परंतु इंडस्ट्रीत उगीचच कुसपटं काढणारे कमी नाहीत. (ही 'बोहारणीची मुलं'!! .. इति पु.ल.!) संगीतकार सी. रामचंद्रजींना लक्ष्मी-प्यारे या मुलांबद्दल विशेष आस्था होती. 'फिल्मफेअर' मध्ये 'दोस्ती'ला उत्कृष्ट संगीतकाराचं नामांकन मिळालंय ही बातमी द्यायला अण्णा (सी.रामचंद्र) स्वतः त्यांच्या घरी गेले होते. पोशाखांबद्दल अत्यंत आवड असणाऱ्या अण्णांनी या समारंभासाठी आपल्या आवडत्या टेलरकडून या दोघांसाठी खास सूट शिवून घेतले होते असंही सांगतात. असो! लक्ष्मी-प्यारेजींची कलाकीर्द 'पारसमणी' (१९६३) मुळे पदार्पणातच गाजली असली तरी 'दोस्ती' मुळे त्यांच्या शिरपेचात आणखी एक सन्मानाचा तुरा खोवला गेला.. अशा मधुर संगीताचा जमाना पुन्हा येईल की नाही कुणास ठाऊक! पण हा संगीतमय भूतकाळ हताश चेहऱ्याने आपल्याकडे पाहत जणू म्हणत असतो..

*मेरे पास आओ, तोडो ये सारा भरम,*
*जो मेरा दुःख वही, है तुम्हारा भी ग़म, है तुम्हारा भी ग़म,*
*देखता हूँ तुम्हें, जानता हूँ तुम्हें,*
*लाख अंजान हूँ, मैं तुम्हारी तरहा.. जानेवालों जराऽऽ*

♥

महंमद रफी यांचं गाणं म्हणता ते तुमच्या आवडीचं असणारच. ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल तर देत आहे या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. जानेवालों जरा, मुडके देखो मुझे… (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=H8vnR89ml_Y

२. जानेवालों जरा, मुडके देखो मुझे… (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=tjB61sfhojo

३. जानेवालों जरा, मुडके देखो… (कराओके) https://www.youtube.com/watch?v=34NQ6P8Qsps

४. 'दोस्ती' (चित्रपटातील गाणी) https://www.youtube.com/watch?v=BI4VJ3ZJ4jY

५. 'दोस्ती' (संपूर्ण चित्रपट) https://www.youtube.com/watch?v=FUcnEx-jjOs

## १८ : जानेवालों जराss मुडके देखो मुझे..

चित्रपट : दोस्ती (१९६४)
निर्माता : राजश्री प्रॉडक्शन्स
दिग्दर्शक : सत्येन बोस
गायक : महंमद रफी
गीतकार : मजरूह सुल्तानपुरी
संगीत : लक्ष्मीकांत-प्यारेलाल

जानेवालों जराSS मुडके देखो मुझे,
एक इन्सान हूँ, मैं तुम्हारी तरहाSS
जिसने सबको रचा, अपनेही रूप से,
उसकी पहचान हूँ, मैं तुम्हारी तरहाSS
जानेवालों जराss

इस अनोखे जगत की मैं तकदीर हूँ,
मैं विधाता के हाथों की तसवीर हूँ.. एक तसवीर हूँ,
इस जहाँ के लिए, धरती माँ के लिए,
शिव का वरदान हूँ, मैं तुम्हारी तरहा..
जानेवालों जराss

मन के अंदर छिपाये, मिलन की लगन,
अपने सूरज से हूँ एक बिछडी किरन, एक बिछडी किरन,
फिर रहा हूँ भटकता, मैं यहाँ से वहाँ,
और परेशान हूँ, मैं तुम्हारी तरहा..
जानेवालों जराss

मेरे पास आओ, तोडो ये सारा भरम,
जो मेरा दु:ख वही, है तुम्हारा भी ग़म, है तुम्हारा भी ग़म,
देखता हूँ तुम्हें, जानता हूँ तुम्हें,
लाख अंजान हूँ, मैं तुम्हारी तरहा..
जानेवालों जराss

♥

तुमच्यासाठी आणखी काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका आणि डाऊनलोड करा.

१. महंमद रफी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/MFnLpuYz_T0

२. लतादीदी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/BQIiGOFZSf4

३. लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/WssoEe5XvMQ

४. गीतकार मजरूह सुल्तानपुरी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/HXd4floYyjY

♥

## 19 : Jadunagari Se Aaya Hai..

## १९ : जादूनगरी से आया है कोई जादूगर..

संगीतकार ओ.पी. नय्यरजी विरारला रहायला असताना बऱ्याचदा त्यांच्याशी गप्पा मारायचा मोका मिळायचा. एकदा मी त्यांना एकदा सहज छेडलेलं की तुमच्या गाण्यातलं 'म्युझिक-अरेंजमेंट' वगैरे सॅबी अंकलच (सॅबेस्टीयन) सांभाळायचे ना? होकारार्थी मान हलते.. शंकर-जयकिशनजींकडेही तेच संगीत-संयोजक होते ना त्या काळी? मग एकाच दिवशी किंवा एक दिवसाआड तुमच्या होणाऱ्या रेकॉर्डिंग्ज सांभाळताना कसरत (गोची!) नाही व्हायची त्यांची? स्टाईल वेगळी, टेस्ट वेगळी इतकंच काय, हाताळणी आणि ट्रीटमेंटही वेगवेगळी असून कसं जमायचं हो त्यांना? ओ.पी. फक्त हसले होते. आपल्या अरेंजमेंटबद्दल सांगावं तर ती त्यांची खाजगी बाब. दुसऱ्या संगीतकारांबद्दल बोलावं हे त्यांच्या स्वभावात नसल्याने त्यांनी सरळ विषयच बदलला.. सॅबीच्या आठवणींनी मात्र ते क्षणभर गंभीर झाले.. काही वेळानंतर, सॅबीअंकलचा मुलगा व्हायोलिन वाजवण्यासाठी येत असतो आणि त्याने सांगितल्याप्रमाणे आपला सॅबी सध्या गोव्यात आपलं निवृत्त जीवन सुखासमाधानाने उपभोगतोय.. हे सांगताच कळी खुलली. या 'सॅबी' अंकलबद्दल सांगायचं तर.. संगीतकारांकडून त्याच्याकडे धून सोपवली जायची. त्यावर तो बराच विचार करायचा. अष्टावधानी होता तो. तहानभूक हरपून काम करायचा. ज्या संगीतकाराकडे काम करायचं त्याच्याच शैलीत त्याची पेशकश असायची. भारतीय संगीतातला गोडवा त्याला पुरेपूर ठाऊक होता तर पाश्चात्य सुरावटीत रमायलाही त्याला आवडायचं. गाण्याला विविध अलंकारांनी कसं नटवायचं, कुठे काय सयुक्तिक ठरेल याची त्याला जाण होती. अरबी असो की अफगाणी.. कुठल्याच संगीतातली धुंदी त्याला वर्ज्य नव्हती. संगीतकाराच्या अपेक्षेहून अधिक किती आणि काय देता येईल हे तो जरूर पहायचा. गाण्याचं चलन ओळखून मनमुक्त संगीत संयोजन करायचा. तो माणूस म्हणूनही खूप सज्जन होता. डफरावगिरी नाही की तडजोड नाही..'

बऱ्याचदा असं होतं की काही संगीतकार आपल्या संयोजकांना इतकं महत्त्व देत नाहीत. हे मी स्टुडिओत माझ्या डोळ्यांनी पाहिलंय. आपण कंपोजर आहोत असा ईगो म्हणा किंवा माज असतो काहींना. साधे म्युझिक कण्डक्ट करणारे ते, त्यात काय मोठंसं, अशी वागणूकही दिली जाते. पण त्या काळातले दिग्गज संगीतकार आपल्या संयोजकांना अतिशय सन्मानानं वागवत. इतक्या अफाट बुध्दिमत्तेचे संगीतकार असूनही ओ.पी.नय्यरजी आपल्या संगीत संयोजकाबद्दल इतक्या आदराने बोलताना पाहून मला खूपच बरं वाटलं. घरी परतलो खरा पण ओपीबद्दलची आपल्या मनातली प्रतिमा तेजोमय होतेय असा भास व्हायला लागला आणि मन झेप घेऊ लागलं थेट चाळीसेक वर्षांपूर्वीच्या त्यांच्या कारकीर्दीकडे. सॅबीने सर्जकतेनं सजवलेल्या एकेक आविष्काराकडे...

*ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,*
*जादूनगरी से आया है कोई जादूगर..*
*ओ लेके पहला पहला प्यारऽऽ*

नुसता मुखडा गुणगुणताच रेशमाची लडी हातातून निसटून घरंगळत जावी आणि ती पुन्हा गुंडाळायचा आपण निष्फळ प्रयत्न करावा असं वाटलं की नाही क्षणभर? गाणं गुरुदत्तच्या सी.आई.डी.(१९५६) मधलं आहे, आणि ते देव आनंद-शकीलावर चित्रित झालंय ही चर्चा तूर्त नकोय. आत्ता याक्षणी आठवतेय ती मुखड्यातच बाजी मारणारी शमशाद बेगम. तिचा वेगळ्या पठडीतला भरदार आवाज. त्याला लाभलेली रफीची दमदार साथ तसेच पहिल्या तीन कडव्यांतून व्यथेची किनार लाभलेला आशाताईंचा सुरेल आवाज. पुढच्या तीन कडव्यात शमशाद बेगम गातेय. सहा कडव्यांचं हे लांबलचक गाणं खरं, पण ते काटछाट न होता आजही सहज उपलब्ध आहे हे आपलं नशीब. चित्रपटात मात्र ते असं सलगपणे नाही येत. निर्माता म्हणून गुरुदत्तचं नाव दिसतं. त्याने डायरेक्शन सोपवलंय राज खोसलांकडे. (सहाय्यक आहेत प्रमोद चक्रवर्ती) पण मला तरी पूर्ण सिनेमाभर गुरुदत्तचं अस्तित्व ठळकपणे जाणवलं. त्याचं आणि ओपीचं झकास ट्यूनिंग होतं. त्याचा प्रभाव प्रत्येक गाण्यात जाणवतो. ती हार्मोनियमची तान, क्लॅरोनेट-बासरीच्या साथीने फुलविलेले अंतऱ्यांमधल्या संगीताचे तुकडे. सर्व अंतऱ्यातले म्युझिक-पीसेस एकसारखे! नो चेंज! तरीही कंटाळा येत नाही हे विशेष. अरेंजर सॅबीने गाण्याचा प्रवाह असा खळाळता ठेवला आहे. गाण्यात पंचेस नाहीत. ताना-हरकती-मुरक्या तर नाहीतच नाहीत. इथला सरळ साधेपणाच खरं तर मनाला भिडतो. लक्षात घ्या 'सी.आई.डी.' च्या गाण्यांचं ध्वनिमुद्रण होणाऱ्या शेड्यूलच्या आसपास राज कपूर कॅम्पतर्फे 'चोरी चोरी'ची गाणी रेकॉर्ड होत होती. संगीतकार शंकर-जयकिशनजींचे अरेंजर कोण? तर हेच सॅबी! कमाल आहे यार! दोन्ही पिक्चर्स भिन्न प्रकृतीचे. स्टार्स, दिग्दर्शक, संगीतकार, गीतकार, गायक-गायिकाही वेगळ्या

मुशीतल्या असूनही अरेंजर एकच? आणि सॅबी अंकल दोन्हीकडच्या संगीताला औचित्यपूर्ण स्वरलालित्याने समर्थपणे कसे नटवू शकले, या आश्चर्यातून मी आजतागायत सावरलेलो नाही. त्यांचं हे कसब वाखाणण्याजोगच नाही का? सिंपली ग्रेट! सुमारे हजारेक गाणी माझ्यासमोर ध्वनिमुद्रित झालीत. शंभरेक सिनेमांचं बॅक-ग्राऊन्ड होताना पाहिलंय. मी सुमारे चारेकशे जुन्या गाण्यांचं 'व्हर्शन्स' करताना संयोजन आणि पर्यवेक्षण केलं आहे. त्यामुळे 'संगीत संयोजक' (म्युझिक अरेंजर) ही काय चीज असते ते 'याचि देही याचि डोळा' अनुभवलंय मी. (इथे शब्दागणिक उच्चारलेला 'मी', हा अहंकाराने उच्चारलेला, 'मी' पणाने बरबटलेला शब्द आहे असा कृपया गैरसमज करून घेऊ नका. 'मी' जे काही अनुभवलंय ते प्रांजळपणे तुमच्याबरोबर शेअर केरतोय, हे कृपया लक्षात असूद्या. कारण 'संगीत संयोजक' या व्यक्तीला फाट्यावर मारणाऱ्या संगीतकारांचा मला विलक्षण तिटकारा आहे. एखादा थोड्याशा टॅलेन्टच्या बळावर (कुबड्यांवर?), वशिल्यावर साधा तबलजी वगैरे असणारा स्वतःला 'संगीतकार किंवा संगीत संयोजक' म्हणवतो त्याच्याबद्दलही खुन्नस आहे. असो!) तसं पहायला गेलं तर चांगल्या गाण्याबद्दल गीतकार, संगीतकार, गायक या पलिकडे कुणा चौथ्या व्यक्तीला आपण श्रेय द्यायला तयार नसतो. पण असं नसतं महाराजा. गाणं बनणं हे शेवटी टीमवर्क असतं. वाद्यवृंद किंवा संगीत संयोजक तितकाच महत्त्वाचा घटक असतो. गाण्यात जे जे काही वाजतं, ते कंपोज करणं. त्या प्रत्येक वाद्यासाठी नोटेशन काढणं, म्युझिक कंडक्ट करून हवा तो इफेक्ट आणणं हे येरागबाळ्याचं काम नाहीय. संगीतकाराच्या यशामध्ये या अरेंजर लोकांना किती वाटा द्यायचा ही बाब तूर्त अलाहिदा मानली तर एक सत्य मात्र निखळपणे उरतं, ते म्हणजे एखाद्या चांगल्या चालीचं सोनं करणं हे अक्षरशः या संगीत संयोजकांच्याच हातात असतं. एकेक चाल म्हणजे खाणीत सापडलेला हीरा. संगीत व वाद्यमेळ रचना करून त्याला वादकांच्या साथीनं पैलू पाडतो तो अरेंजर. पुढे त्याला आपल्या आवाजाचं कोंदण देतो तो गायक, आणि ही कशिदाकारी आपणां श्रोत्यापर्यंत यथायोग्यपणे पोहोचवतो तो ध्वनिमुद्रक. शेवटी टीमवर्क महत्त्वाचं! सॅबी अंकल हा भारतीय चित्रपट संगीतातल्या 'संगीत संयोजकांच्या' प्रभावळीतील सर्वात वरच्या वर्तुळातला एक महत्त्वाचा घटक. त्याच्याकडे कसब होतं, बुध्दिकौशल्य होतं. माणसाकडे गुणवत्तेचं गाठोडं असलं ना की तो आपल्या क्षेत्रात बिनधास्त दादागिरी करू शकतो. त्यांचं त्या संगीतकारांशी ट्यूनिंग होतं. गाणी कशी सजवायची हे मूलभूत तंत्रज्ञान पक्कं होतं म्हणूनच त्याच्यावर देवी शारदा प्रसन्न होती. सगळे सूर त्याच्या कारागिरीवर लुब्ध होते. म्हणूनच ओपीचं गाणं ऐकलं की सॅबी अंकलही हमखास आठवतात...

*<u>आशा</u> : उसकी दीवानी हाये, कहूँ कैसे हो गयी,*
*जादूगर चला गया, मैं तो यहाँ खो गयी,*
*नैना जैसे हुए चार, गया दिल का करार,*
*जादुनगरी से आया है कोई जादूगर..*
*<u>शमशाद</u> : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,*
*जादूनगरी से आया है कोई जादूगर..*
*<u>रफी</u> : ओ लेके पहला पहला प्यारऽऽ*

सी.आई.डी.तले कितीसे इन्स्पेक्टर्स देव आनंदइतक्या शिडशिडीत बांध्याचे, सळसळत्या रक्ताचे, चॉकलेट हिरोसारखे दिसणारे आणि मुख्य म्हणजे कामातून वेळ काढून प्रेमालाप करण्यात पटाईत असतील हा मुद्दा विचारार्थ न घेता चला पिक्चर पाहूया.. सुरुवातीलाच कुणाचीतरी सुपारी दिली-घेतली जाते. कुठल्याश्या संपादकाचा खून होतो. मेहमूद खुन्याच्या भूमिकेत, तर जॉनी वॉकर पॉकेटमाराच्या किरदारमध्ये. (रफीने गायलेलं..'ये है बॉम्बे मेरी जान..' हे गाणं जॉनी वॉकरसाठी खास टाकलं आहे.) मेहमूदला पकडल्यानंतरही त्या कटाचा खरा सूत्रधार कोण? हे शोधणाऱ्या इन्स्पेक्टरभोवती गुंफलेलं कथानक. जोडीला एकापेक्षा एक सरस अशी गाणी. तीन-चार ओळीत सांगता येईल अशी ही कथा. पण सर्वच कलाकारांनी आपापल्या परीने त्यात रंग भरलेत. शकीलाने साकारली आहे बॉसची लेक., तर रुपेरी पडद्यावर पदार्पण करणारी वहिदा रेहमान इथे चक्क व्हॅम्पच्या भूमिकेत! ओपीने सर्वच गाण्यात जान ओतली आहे. 'आँखो ही आँखो में इशारा हो गया..', 'बूझ मेरा क्या नाम रे..', 'जाता कहाँ है दीवाने..', 'कहीं पे निगाहें..', अशी इतर गाणीही झक्कास! 'ओ लेके पहला पहला प्यार..' या गाण्यात ताकास तूर लागू न देणारी नायिका शकीला. ती आपलीशी व्हावी म्हणून पाठशिवणीचा खेळ खेळत तिच्यामागे गोंडा घोळणारा देव!.. ती शेवटी दिसते. बेस्ट बसमध्ये चढते. (जॉनी वॉकर तेव्हा आमच्या बेस्टमध्ये नोकरीत होते. बहुदा ही बस त्यांनीच लो-बजेटमध्ये मिळवून दिली असणार, नाही का?.. आमीर खानच्या 'अकेले हम..'च्या वेळी मी सुध्दा हेच सत्कार्य केलंय बरं का!) तो तिचा रोड-रोमियोसारखा पिच्छा पुरवतो. छेडतो. ती वैतागते. बसमधून उतरून जाते. वरळीचा सी-फेस असावा. ती झपझप चालू लागते. तो सुरक्षित अंतर ठेऊन पाठलाग करतो. रस्त्यात नेमके गाणं-बजावणं करणारे मौजूद आहेत. तो त्यांना बक्षिसी देतो आणि सुरू होतं हे ख़ुमासदार गाणं... हार्मोनियमची तान आणि मग ओपी स्टाईल ठेका. शमशादचा पंजाबी हेल काढणारा दाणेदार आवाज

थिएटरभर घुमतो. दरवेळी क्रॉसलाईन आधीचं शमशादचं ‘हायऽऽ’ असं उसासणं जानलेवा आहे. आपण आपल्या नकळत पायानं ताल देत एकामागोमाग येणारी कडवी एन्जॉय करतो. मजरूहजींच्या सरळसोप्या काव्याला दाद देतो...

*शमशाद : मुखडे पे डाले हुए जुल्फों की बदली,*
*चली बलखाती कहाँ रुक जा ओ पगली,*
*रफी : ओऽऽ, मुखडे पे डाले हुए जुल्फों की बदली,*
*चली बलखाती कहाँ रुक जा ओ पगली,*
*शमशाद : हाय, नैनोवाली तेरे व्दार, लेके सपने हजार,*
*जादुनगरी से आया है कोई जादूगर..*
*रफी : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,*
*जादूनगरी से आया है कोई जादूगर.. ओ लेके पहला पहला प्यारऽऽ*

शमशाद बेगमच्या आवाजात एक वेगळीच ख़ुमारी आहे. नैसर्गिक आक्रमकता आहे. तिच्या प्रत्येक सोलो गाण्यात ती बिनधास्त संचार करताना दिसते तर युगलगीतात ती समोरच्यावर कुरघोडी करण्याचा बेधडकपणा दाखवते. या गाण्यात तिच्यासोबत असलेला रफी थोडासा मवाळ भूमिकेत आहे. तिने गायलेलं प्रत्येक वाक्य फक्त आळवून म्हणायचं एवढंच गंमतीदार काम रफीला मिळालंय. इथे संबंध नाही, पण शमशादची काही दुसरी युगलगीतं आत्ता याक्षणी आठवतायत. आपल्या आवडत्या पुरुष गायकांतील तलत महमूद, महंमद रफी, मुकेश आणि किशोरकुमार हे वेगवेगळ्या जातकुळीचे आवाज, होय ना? त्यांच्याबरोबर गायिका शमशाद आहे म्हणता त्या गाण्याची टेस्टच वेगळी होऊन जाते. ‘मिलतेही आँखे दिल हुआ दीवाना किसी का..’ (तलतसह - बाबुल १९५० - संगीत : नौशाद), ‘मैं भंवरा तू है फूल..’ (मुकेशसह - मेला १९४८ - संगीत : नौशाद) तसेच ‘मेरी निंदो में तुम, मेरे ख़्वाबों में तुम..’ (किशोरसह- नया अंदाज -१९५६- संगीत : ओपी) आठवतायत का? (सोबत ‘यू-ट्युब’ लिंक्स दिल्या आहेत) ही गाणी पाहताना/ऐकताना असं वाटतं की यातला नायक रोमँटिक आहे खरा पण तो आपल्या भावना हळव्या पध्दतीनं व्यक्त करतोय. आपल्या आसपास अशी बरीच जोडपी असतात. त्यातला ‘तो’ सीधासाधा असतो पण ‘ती’ थोडी जास्त आक्रमक, पझेसीव्ह, आग्रही असते ना, तसं! रफी शमशादबरोबर बरीच ड्युएट गायला आहे. ‘भीगा भीगा प्यार का समा बता दे तुझे जाना है कहाँ..’ (सावन १९५९ - संगीत : हंसराज बहल) हे त्यातलंच एक. या गाण्यात एक गंमत आहे. मुखड्याची चाल अशी आहे की रफी त्यात थोडा आब राखून गातोय, पण अंतऱ्यात त्याचा पवित्रा बदललाय. शस्त्र उपसावं तसा त्याचा आवाज आरामात वरच्या टीपेला जातो. आता शमशाद काय करतेय बघुया असं वाटतंय तो ती सुध्दा बिनधास्त ती पट्टी विनासायास गाठते. (अर्थात इथे ठोकळ्या भारतभूषणच्या चेहऱ्यावरची माशीही उडत नाही. गायकाचा आवाज खर्जातला असो की टीपेचा, स्वरांच्या चढउताराशी आपला दुरान्वयेही संबंध नाही अशा थाटात तो फक्त पुटपटतो. त्यापेक्षा सोबतची अमिता परवडली.) गाण्यातली ही कारागिरी संगीतकाराची आहे पण आपण गाणं आपल्यापरीने फुटपट्टी लावून ऐकतो एवढंच. त्याकाळच्या युगलगीतात हीच मजा व्हायची. एकच माईक आणि आमनेसामने मामला असल्याने गायक एकमेकावर कुरघोडी करताना दिसायचे, म्हणून ‘व्दंव्दगीत’ असं नामाभिधान प्राप्त झालं असावं की काय? ‘लेके पहला पहला प्यारSS’या गाण्यात मात्र असलं व्दंव्द नाही. गाण्याची नशा मात्र आपल्यावर उत्तरोत्तर चढत जाते आणि याच गाण्याच्या नशेत पिक्चर पुढे सरकू लागतो. आता देव आनंदवर बाजी उलटली आहे. खलनायकाने फणा काढलाय. शकीला विरहाच्या आगीत होरपळते आहे. आयुष्य एकाकी आणि गढूळ होताच तिला आठवतो तो तिचा जादुनगरीचा जादूगर. आशाजींनी गायलेले विरहाची झालर असलेले तीन अंतरे ऑडिओमध्ये उपलब्ध असलेल्या गाण्यात सुरुवातीलाच येतात, पण हे आशाजींनी गायलेले अंतरे, चित्रपटाने एक विशिष्ट उंची गाठल्यानंतरच येतात. त्यामुळेच तिथे ते जास्त परिणामकारक ठरले आहेत.

*आशा : तुमने तो देखा होगा उसको सितारो,*
*आओ जरा मेरे संग मिल के पुकारो,*
*दोनों होके बेकरार, ढुंढे तुझको मेरा प्यार,*
*जादुनगरी से आया है कोई जादूगर..*
*शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,*
*जादूनगरी से आया है कोई जादूगर..*
*रफी : ओ लेके पहला पहला प्यारऽऽ*

♥

## १९ : जादूनगरी से आया है कोई जादूगर..

चित्रपट : सी.आई.डी. (१९५६)
निर्माता : गुरुदत्त
दिग्दर्शक : राज खोसला
गायिका : शमशाद बेगम- आशा भोसले- महंमद रफी
गीतकार : मजरूह सुल्तानपुरी
संगीतकार : ओ. पी. नय्यर

शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर.. ओ लेके पहला पहला प्यारss

आशा : उसकी दीवानी हाये, कहूँ कैसे हो गयी, जादूगर चला गया, मैं तो यहाँ खो गयी,
नैना जैसे हुए चार, गया दिल का करार, जादुनगरी से आया है कोई जादूगर..
शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यारss

आशा : तुमने तो देखा होगा उसको सितारो, आओ जरा मेरे संग मिल के पुकारो,
दोनों होके बेकरार, ढुंढे तुझको मेरा प्यार, जादुनगरी से आया है कोई जादूगर..
शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यारss

आशा : जब से लगाया तेरे प्यार का काजल, काली काली बिरहा की रतियाँ है बेकल,
आजा मन के सिंगार, करे बिंदिया पुकार, जादुनगरी से आया है कोई जादूगर..
शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यारss

शमशाद : मुखडे पे डाले हुए जुल्फों की बदली,
चली बलखाती कहाँ रूक जा ओ पगली,
रफी : ओss, मुखडे पे डाले हुए जुल्फों की बदली,
चली बलखाती कहाँ रूक जा ओ पगली,
शमशाद : हाssय, नैनोवाली तेरे व्दार, लेके सपने हजार,
जादुनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
ओ लेके पहला पहला प्यारss

शमशाद : चाहे कोई चमके जी, चाहे कोई बरसे, बचना है मुश्किल, पिया जादुगर से,
रफी : ओss, चाहे कोई चमके जी, चाहे कोई बरसे, बचना है मुश्किल, पिया जादुगर से,

शमशाद : हाय, देगा ऐसा मंतर मार, आखीर होगी तेरी हार, जादुनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार, जादूनगरी से आया है कोई जादूगर..
ओ लेके पहला पहला प्यारss

शमशाद : सुन सुन बाते तेरी, गोरी मुस्कायी रे, आयी आयी, देखो देखो, आयी हँसी आयी रे,
रफी : ओss, सुन सुन बाते तेरी, गोरी मुस्कायी रे, आयी आयी, देखो देखो, आयी हँसी आयी रे,
शमशाद : हाsssय, खेली होठों पे बहार, निकला गुस्से से भी प्यार
जादुनगरी से आया है कोई जादूगर..
रफी : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार, जादूनगरी से आया है कोई जादूगर..
शमशाद : ओ लेके पहला पहला प्यार, भर के आँखों में ख़ुमार,
जादूनगरी से आया है कोई जादूगर..
शमशाद -रफी : ओ लेके पहला पहला प्यारss

♥

हे गाणे ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी, देत आहे या गाण्याचा 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. ओ लेके पहला पहला प्यार... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=6jSE-Zilkfc
२. ओ लेके पहला पहला प्यार... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=X1B3dW7gCt8
३. ओ लेके पहला पहला प्यार... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=Lj0rDRU_C9g
४. 'सी.आई.डी' (१९५६) (संपूर्ण चित्रपट) https://www.youtube.com/watch?v=enkstu6n-E8

शमशाद बेगम (१९१९-२०१३)! एक वैशिष्ट्यपूर्ण आवाज लाभलेली गायिका.
आपल्यासाठी त्यांच्या सुपरहिट गाण्यांच्या काही 'यू-ट्युब' लिंक्स. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

१. शमशाद बेगम (५० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/WPklTciei-c
२. शमशाद बेगम (१० सुपरहिटस्) (व्हिडिओ) https://youtu.be/243j36qFDyo
३. शमशाद बेगम-रफी (युगल गीते) (ऑडिओ) https://youtu.be/61hTEtITAXU
४. मेरी निंदों में तुम.. (किशोरकुमारसह) https://youtu.be/aNgOqEhP-8g
५. मिलतेही आँखे दिल.. (तलत महमूदसह) https://youtu.be/89Mz6gUFvcg
६. भीगा भीगा प्यार का.. (महंमद रफीसह) https://youtu.be/QuoX9FhJMX0
७. मैं भंवरा तू है फूल.. (मुकेशसह) https://youtu.be/g6rkE_Y31-g

♥

## 20 : Main Zindagi Ka Saath..

## २० : मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..

‘हॅल्लो, मैं देव आनंद बोल रहा हूँ! यहाँ बिल्डिंग में आग लगी है.. आप यहाँ जल्दी से..’
‘कोण? देवानंद? आयला.. देवानंद बोलतोय.. देवानंद? वोही ना जिसने लूटमार फिल्म बनवली होती तो..’
‘हाँ.. हाँ.. मैं वोही देव आनंद बोल रहा हूँ.. यहाँ बिल्डिंग में आग लगी है.. आप..’
‘ऐसी फिल्म बनायेगा तो, आग नही तो और क्या लगेगा!..’
‘देखिए मजाक मत.. ये फायर-ब्रिगेड है ना?..यहाँ बिल्डिंग में..’
‘ये फायर-ब्रिगेड नही है, मैं फायर-स्टोन का वॉचमन बोल रहा हूँ..’

कुठल्याही चित्रपटातला संवाद नाहीय हा. जॉनी लिव्हरच्या कॅसेटमधली ही टवाळकी.. उपहासगर्भित! ट्रेनमध्ये एकजण त्याच्या मित्रांना हा विनोद रंगवून सांगत होता.. देव आनंदची डिट्टो नक्कल करत. त्या विनोदावर आजुबाजुचा सगळा घोळका हसला. मीही हसलो पण माझ्या ओठावर हसू उमटायचं कारण जरा वेगळं होतं... माझी नेहमीची ट्रेन नव्हती ती. आज झक मारत दोन तास आधी निघावं लागलं होतं. काल रात्रीच संगीतकार जतिन-ललितने देवसाहेबांच्या गाण्यांचं मिक्सिंग पूर्ण केलं होतं. देव आनंदसाहेब ‘सेन्सॉर’ या त्यांच्या चित्रपटाच्या गाण्यांच्या मास्टर-टेप्स डॉल्बी डिजिटलच्या कामासाठी घ्यायला आमच्या स्टुडिओत यायचे होते. (शूटिंग असो किंवा) रेकॉर्डिंग असो की मिक्सिंग, कडक शिस्तीचे देवसाहेब नवाच्या ठोक्याला यायचेच यायचे. इतर वेळी रेकॉर्डिस्ट असतो पण तो स्टाफ मध्यरात्री उशिरा गेल्यामुळे व्यवस्थापक म्हणून मला स्टुडिओत लवकर पोहोचणं भाग होतं. मी उशिरा पोहोचलो तर या देवाचा कोप होऊन तो ‘वॉक-आऊट’ करेल तसेच ‘देव देव्हाऱ्यात नाही.. देव नाही देवालयी..’ असं म्हणायची पाळी माझ्यावर येऊ नये म्हणून मी वेळेआधी अर्धा तास पोहोचलो. घड्याळात बरोब्बर आठ-पंचावन्न होताच देवसाहेब हजर झाले. मी मिठाईचा पुडका असतो तशा बॉक्समध्ये सगळ्या टेप्स व्यवस्थित तयार ठेवल्या होत्या. त्यांचं स्वागत करत ते पुडकं त्यांच्या स्वाधीन केलं.
‘व्हॉट इज गोईंग ऑन? क्या चल रहा है आज स्टुडिओ में!..’ समोरच्या खुर्चीत बसण्याआधी त्यांचा प्रश्न.. देवसाहेब थोडंसं हिन्दी आणि बाकी अस्खलीत ब्रिटिश स्टाईलचं इंग्रजीच बोलतात बरं! (आम्ही ‘एस.एस.सी’ पर्यंत मराठी माध्यमात शिकलेले, कोकाटे असो की तर्खडकर ‘फाड फाड इंग्रजी’ हा आपला प्रांत नाही हेच खरं.)

‘बॅक-ग्राऊंड चल रहा है.. ‘जोश’ का!..’ मी तत्परतेनं उत्तर दिलं.
‘कौन कर रहा है? अन्नू (मलिक)?..’ त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावर प्रचंड उत्सुकता होती.
‘नही, अन्जनदा.. ‘हम दिल दे चुके सनम’ के लिए फिल्मफेअर ॲवॉर्ड मिला ना वो.. अन्जन विश्वास!’
स्वारी नाखुष दिसली. दीर्घ श्वास घेतला.. उठले! सरळ आत म्युझिक-हॉलमध्ये गेले.. तिथे होतं काय, तर की-बोर्ड वादकांच्या मशीन्सचा पसारा. ऱ्हिदम-सॅम्पलर, सिक्वेन्सर, प्रोसेसर्स, फिल्मच्या बीटा-टेप्स वाजविण्याचा प्लेअर आणि मोठ्ठाला टी.व्ही.! बुरख्यात बंद! देवसाहेब त्या सगळ्या पसाऱ्यावर धावती नजर टाकत म्हणाले..

‘लाईव्ह म्युझिशियन्स नही है क्या?.. और ‘जोश’का म्युझिक तो अनू मलिक का है ना?!
‘हाँ.. लेकीन बॅक-ग्राऊंड अन्जनदा कर रहे है..’
‘अच्छा!..’ असं म्हणत दीर्घ श्वास घेतला, ठेवणीतलं हसले.. ‘मुझे कहीं सिग्नेचर वगैरा करनी है?..’
‘नही सर.. आप के ही टेप्स है, मैने सिर्फ ट्रान्सफर्स दिये है..’
इतक्यात अंजनदा आले. देवसाहेब थांबले. आपलं दैवत समोर दिसताच व्हावं तसा अन्जनदा भारावून गेला. जुजबी गप्पा झाल्यावर देवसाहेबांनी त्याला डायरेक्ट विचारलं..
‘पिक्चर पूरी तैयार है?..’ अंजनदा सावरून बसले..
‘वैसे तो तैयार है.. बस्स थोडासा पॅच-वर्क बाकी है.. खूप ट्रायल बघून डायरेक्टर मन्सूरजींशी चर्चा करून काही थीम बनवल्यात मी.. बहोत होमवर्क किया है..’ अन्जनदा आपलीच लाल करतायत हे माझ्या लक्षात आलं होतं पण देवसाहेब यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता ते त्याला नुसते जोखत होते.. ‘लेकीन.. म्युझिक किसी और का.. बॅक-ग्राऊंड कोई और...चलो ठीक है.. बेस्ट ऑफ लक!’ एवढं बोलून मोठ्ठा उसासा टाकत.. वरकरणी हसत-हसत आमचा निरोप घेत निघूनही गेले... मी त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे एकटक पाहतच राहिलो.. त्यांच्या ‘त्या’ वाक्यावर विचार करत.. एकच वाक्य! पण त्यांनी त्या वाक्यातून आताच्या

म्युझिक-ट्रेन्डला जणू शालजोडीतून हाणलं होतं.. दोनच दिवसानंतर म्हणजे २६ सप्टेंबरला त्यांचा वाढदिवस होता. सगळ्याच वृत्तपत्रांनी त्यांचा तो पंचाहत्तरावा वाढदिवस मोठ्ठाले लेख लिहून साजरा केला होता.. पेपरात चेहऱ्यावर मस्त खट्याळ बालीश हास्य असणारा देव आनंदचा फोटो पाहताच डोळ्यांपुढून त्याच्या १९४६ च्या 'हम एक है' पासून हल्लीच्या 'मै सोलह बरसकी' पर्यंतचा प्रवास झर्रकन सरकला. गेल्या पन्नास-पंचावन्न वर्षातली हिन्दी चित्रपटसंगीताची वाटचाल, त्यातली सौंदर्यस्थळं, तिनं घेतलेली अंगडाई आणि एकेका संगीतकारानं आपल्या सुरावटींवर आपल्या काळजाचा ठोका चुकवणारा केलेला आविष्कार आठवला.. 'हम दोनो' या चित्रपटातलं देवच्या तोंडचं ते गाणं आठवू लागलं.. साहीरच्या लेखणीतून अवतरलेलं.. जयदेवच्या संगीताचं लेणं लेवून रफीच्या आवाजात सादर झालेलं.

*मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..*
*हर फिक्र को धुएं में उडाता चला गया..*

त्यांचं मूळनाव धर्मदेव पिशोरीमल आनंद. (संदर्भ - देव आनंद यांचं आत्मचरित्र 'रोमान्सिंग विथ लाईफ') जन्म बुधवार, दि. २६ सप्टेंबर, १९२३ गुरदासपूर (पंजाब) या छोट्याश्या शहरवजा गावातला. लाहोरच्या सरकारी कॉलेजात इंग्रजी लिटरेचर घेऊन बीए झालेला विशीतला हा तरूण केवळ चित्रपट या विषयाने झपाटून फ्रण्टीयर मेलने मुंबईला आला. तीन वर्षांच्या स्ट्रगलनंतर अनेक कामं करत असताना प्रभात स्टुडिओत (पुणे) 'हम एक है' मध्ये काम करण्याची संधी मिळाली. लक्षात घ्या त्यानं चित्रपटसृष्टीत पाऊल टाकलं तो जमाना होता सैगलचा. करण दिवाण, अशोककुमार, मोतीलाल वगैरे मंडळींचीही चलती होती. प्रभात कंपनी 'रामशास्त्री' बनवण्यात गर्क होती तर शांतारामबापू प्रभातशी फारकत घेऊन 'राजकमल'ची उभारणी करण्यात गुंतले होते. प्रभातने 'हम एक है'ची घोषणा केली. देव आनंद, वितरक बाबूराव पैसाहेबांना भेटला. आपादमस्तक न्याहाळत त्यांनी देवला दिग्दर्शक प्यारेलाल संतोषीकडे सोपवलं. देव आनंदचा या चित्रपटामुळे इथल्या इंडस्ट्रीतला प्रवेश सुकर झाला.

देव रूपेरी पडद्यावर अवतीर्ण झाला खरा पण त्याच्या या पहिल्याच सिनेमातलं शामळू रूपडं आणि मवाळ अभिनय (!) पाहून या नटाला पुढे काही भवितव्य असेल असं कुणालाच वाटलं नव्हतं. पण नंतर आलेले मोहना, विद्या, बिरहा की रात, अफसर असे सिनेमे बऱ्यापैकी चालले. इथेच तो चॉकलेट हीरोच्या पठडीतला नायक होणार की काय असा मात्र सर्वत्र बोलबाला झाला. फक्त खटकायचं ते एकच. सॅड-सीन्स करतानाचा त्याचा अभिनय. निराश नजरेनं ते शून्यात बघत राहणं.. त्याची ती गाणी! पार्श्वगायन तंत्र हळुहळू विकसित होत होतं खरं पण सैगलचा इंडस्ट्रीवर जबरदस्त पगडा होता. त्याची गायकी, अभिनय इतकंच नव्हे तर सैगलची धोती-कुर्ताछाप इमेजही देव आनंदमध्ये आढळायची. मुकेश-मन्ना डेंचा प्लेबॅक असायचा देव आनंदना.. त्या काळातली देवसाहेबांच्या मनाची अवस्था कशी असेल हे साहीरच्या या कडव्यातून किती बोलकी होतेय पहा..

*जो मिल गया उसी को मुकद्दर समझ लिया,*
*जो खो गया, मै उसको भुलाता चला गया..*
*हर फिक्र को धुएं में उडाऽऽ*

देव आनंदचं नशीब फळफळण्याच्या बेतात होतं म्हणा किंवा सिनेमासृष्टी एक मस्त अंगडाई घेताना पहायचं आपल्या नशिबात होतं म्हणा, डेहराडूनला काम मिळत नाही म्हणून पळून गेलेल्या चेतनला इथं आणण्याची देव आनंदला बुध्दी सुचली. वाडिया, मेहबूब, कारदार अशा बड्या बॅनर्सकडे कार्यरत असणारा दिलीपकुमार. नर्गिस, हसरत, शैलेंद्र, शंकर-जयकिशन असा स्वतःचा कॅम्प उभारणारा राज कपूर पाहून देवने आपलीही संस्था असावी या विचाराप्रत आला. उधार-ऊसनवारी करून त्याने 'नवकेतन'ची स्थापना केली. सुरैयाला कराररबध्द केलं. सर्व सूत्रे चेतनकडे सोपवली. 'अफसर' बनवला. पण तो मोजून चार-पाच दिवसात गपगार झाला.. नाउमेद झाला तर तो देव कसला?..

*बरबादीओंका सोग मनाना फिजूल था,*
*बरबादीओंका जश्न मनाता चला गया,*
*हर फिक्र को धुएं में उडाऽऽ*

त्याने कंबर कसली. बिरहा की रात, दिलरुबा, हिंदोस्तां हमारा, खेल, मधुबाला, नीली, आराम, निराला अशा बाहेरच्या चित्रपटात कामं करून बक्कळ पैसा कमवला. चेतन आनंदला निर्माता म्हणून सूत्रे सांभाळायला दिली. गुरुदत्त त्याचा प्रभातमधला दोस्त. दिग्दर्शनाची जबाबदारी आपल्या दोस्तावर-गुरुदत्तवर टाकली. देव हिरो.. संगीत सचिनदेव बर्मन! 'बाजी' (१९५१)! मेहनतीला फळ मिळालं. गुरुदत्त-देवने 'बाजी' मारली. राज कपूरकडे नवरत्ने होती. देवनेही आपल्या कॅम्पमध्ये सचिनदा, रफी,

किशोर, आशा, लता, नीरज, साहीर इत्यादींच्या साथीने 'नवकेतन'ची ध्वजा फडकत ठेवली. या टप्प्यापर्यंत किशोरच त्याचा खरा आवाज होता. पण अचानक १९५८साली त्याला अभिनयाने झपाटलं. किशोर ॲक्टींगकडे वळला म्हणून आपल्या आवाजासाठी त्याने रफीला झुकतं माप दिलं. बऱ्याच चित्रपटात त्याचा आवाज रफीचा आहे तो यामुळेच. 'गाईड'पासून त्याचा पुन्हा किशोरकडे ओढा दिसतो. तीन देवीयाँ, ज्वेल-थीफ, महल, जॉनी मेरा नाम, गॅम्बलर, तेरे मेरे सपने.. व्वा! क्या बात है! त्याच्या 'हरे राम हरे कृष्ण'पासून चित्रपटात नवा ट्रेन्ड आला. नंतर 'शोले' (१९७५) मुळे चित्रपट व्यवसायातली गणितं बदलली म्हणतात ना, पण एका बाजूने त्याचे बनारसी बाबू, छुपा रूस्तम, शरीफ बदमाश, जोशिला, हिरा पन्ना, अमीर गरीब, वॉरन्ट गर्दी गोळा करत होते. चेहऱ्यावर तेच बालिश हास्य कायम होतं. त्याचे जे सिनेमे गाजले ते त्याच्या अदाकारीमुळे, पटकथेमुळे किंवा विविध विषयांच्या हाताळणीमुळे. त्याच्या सिनेमातली गाणी हा तर संशोधनाचा विषय. त्याचा म्युझिक-सेन्स आणि संगीतकारांची मिळालेली साथ. आपलं गाणं कसं चित्रित होणार आहे याची पुरेपूर जाणीव असलेला देव हाच त्याच्या चित्रपटाचा कणा होता. संगीत हा त्याच्या चित्रपटाचा श्वास होता. त्याने 'जंजीर' का नाकारला, तर त्यात त्याच्यावर चित्रित होणारं एकही गाणं नव्हतं म्हणून. 'शोले'नंतर चित्रपटसंगीताला घरघर लागताच देव ढेपाळलेला दिसला. आधी राजेश खन्नाने सुपरस्टारपदाचं सिंहासन काबिज केलं होतं तदनंतर अमिताभ महानायक बनू लागला..

बाय द वे, 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..' हे गाणं 'नवकेतन' निर्मित 'हम दोनो' (१९६१) या चित्रपटातलं. निर्माता स्वतः देव आनंद होता मात्र त्याने दिग्दर्शनाची धुरा सोपवली होती अमरजीत या आपल्या दोस्ताकडे. साहीरजींच्या भावविभोर गाण्यांना संगीतबध्द केलेलं जयदेवजींनी. देव आनंद (या सिनेमात साहेबांनी डबल-रोल निभावलाय) आणि सोबतीला नंदा, साधना, ललिता पवार, जागीरदार अशी भक्कम फळी. स्टोरीत दम होता. गाणी झकास होती. 'अभी ना जाओ छोडकर..' (रफी-आशा), 'कभी ख़ुद पे, कभी हालात पे..' (रफी), 'अल्लाह तेरो नाम..' (लता), 'जहाँ में ऐसा कौन है..' (आशा), 'प्रभू तरो नाम जो ध्याये फल पाए..' (लता) आणि रफीसाहेबांनी गायलेलं 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..' अशा सर्वच गाण्यांची भट्टी मस्तच जमून आलेली. 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..' या गाण्यात 'इन्ट्रो' म्हणून वाजलेला संगीताचा तुकडा लाजवाब आहे. फकाफक सिगार फुकणाऱ्या देव आनंदच्या हातातल्या म्युझिकल-लायटरमधली ही धून आहे अशी इथे संकल्पना मांडलीय. (मात्र ही धून 'ग्लॉक्स' (Glockenspiel) या 'झायलोफोन' प्रभावळीतील वाद्यावर वाजवली आहे.) सगळीच गाणी झकास. सिनेमा लोकांना आवडलेला. देव आनंद त्या वर्षासाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्कारासाठी नामांकन यादीत होता हे विशेष.. संगीत गौरवलं गेलं नाही पण त्यातली सर्वच गाणी आजही तुमच्या-आमच्या ओठावर आहेत.. (हल्लीच देवसाहेबांच्या हयातीतच 'हम दोनो' सप्तरंगात सादर केला गेला.) असो!

आज आमच्या स्टुडिओत देवसाहेब पार्श्वसंगीताबद्दल जे तत्त्वज्ञान सांगत होते त्यात तथ्य होतं. त्यांच्या संकल्पनेप्रमाणे चित्रपटाच्या संगीतकारानेच त्या सिनेमाचं पार्श्वसंगीत करायला हवं हा आग्रह योग्य आणि औचित्यपूर्ण आहे, यात वाद नाही. पण हल्लीच्या संगीतकारांचं स्वतःचं आपलं असं एक गणित असतं. पार्श्वसंगीतासाठी निर्मात्याचा स्वतःचा असा एक बजेट असतो. चित्रपट पूर्ण करता करता चित्रपटाचाच बजेट इतका फुगलेला असतो की पार्श्वसंगीत करण्याच्या क्षणापर्यंत त्याच्या तोंडाला फेस आलेला असतो. (हे मी पाहिलंय, अनुभवलंय) मजबुरीने का होईना आता लो-बजेटमध्येच सगळं करायचं असं ते ठरवतात. त्यासाठी ते एखादा 'बॅक-ग्राउंड स्कोअर स्पेशालिस्ट' गाठतात. ऱ्हिदम आणि म्युझिकचे लूप्स आता नेटवरून सहजगत्या डाऊनलोड करता येतात. हातात कला असेल तर दिमतीला की-बोर्डस, सॅम्पलर्स, सिक्वेन्सर्स, प्रोसेसर्स आहेतच की! आजतागायत ज्या ज्या हिन्दी सिनेमांनी पडदा पाहिला आहे त्यातल्या पार्श्वसंगीताचा अभ्यास करायचा, की झालं काम! किती स्टाईल्स! किती विविधता! प्रत्येक संगीतकाराचा आपापला असा एक फंडा! ह्या जुन्या-जाणत्या लोकांनी इतकं अफाट आणि हिमालयाएवढं उत्तुंग काम करून ठेवलंय की तुम्ही आणखी नवं काय कप्पाळ करणार आहात? सिनेमाच्या पार्श्वसंगीतासाठी निव्वळ गरज म्हणून चार-पाच थीम-म्युझिक बनवल्या की झालं काम. गंमत म्हणजे इंग्रजी सिनेमातून बरंच काही उचलता येतं. त्यामुळेच हल्ली सहसा कुणी चित्रपटाच्या पार्श्वसंगीताकडे इतकं आत्मियतेनं लक्षच देत नाही. मी स्वतः माझ्या व्यवस्थापनाच्या कारकीर्दीत आमच्या स्टुडिओत शंभराहून जास्त चित्रपटांचं पार्श्वसंगीत रेकॉर्ड होताना पाहिलंय. कोण काय करत असतं. कोण पाट्या टाकतं. कोण कुठल्या इंग्लिश सिनेमांच्या डीव्हीडी आणून त्यातला पोर्शन उचलून 'सँपल' करून चिकटवतं हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिलंय.. माझा दोस्ताना असलेल्या संगीतकार जतिन-ललितला आमच्या स्टुडिओत देवसाहेबांची गाणी करताना मला जवळून निरखायला मिळालं. देवसाहेबांनी गाणी फायनल करताच त्यातलं ऑर्केस्ट्रेशन ते सांगतील तसंच करावं लागलं होतं. अगदी जुन्या वळणाचं! विविधता देण्याचं स्वातंत्र्य असं नव्हतंच. 'यारा-दिलदारा', 'खिलाडी'.. 'दिलवाले दुल्हनिया..' ते परवाच्या 'फना'पर्यंतची आपली कलाकीर्द फुलवणाऱ्या या जतिन-ललितची देवसाहेबांसमोर काय हालत झालेली ती मी पाहिलीय.. जुन्या जमान्यातल्या संगीताच्या स्टाईलला

तुम्ही चिकटून नाही राहू शकत. काळानुरूप बदल स्वीकारायलाच हवेत.. सध्याच्या परिस्थितीत पार्श्वसंगीताबद्दल इतकं आग्रही राहणं खरंतर फिजूल आहे. सध्या ५.१ 'डॉल्बी डिजिटल स्टिरिओ-फोनिक साऊन्ड' वगैरे अद्ययावत तंत्राचा विचार करता, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक वाद्यमेळ वापरूनच पडदा व्यापणारं (की कानठळ्या बसवणारं) पार्श्वसंगीत देता येऊ शकतं. या बाबतीत लाईव्ह-म्युझिकचा हट्ट केला तर हवा तसा इफेक्ट येण्यासाठी शंभरेक वादकांना दावणीला बांधावं लागेल. खर्च अव्वाच्या सव्वा होऊन बजेट इतकं फुगेल की बस्स रे बस्स! ही काळाची गरज आहे.. म्हणूनच देवसाहेबांचा हा निव्वळ आक्रोश आहे, असं म्हणता येईल. काय करणार? हट्टी स्वभावावर औषध नाही. मला तरी असं वाटतं की, लक्ष्मीकांत-प्यारेलालजींनी त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी-शेवटी केलेले बॅक-ग्राऊंडस्च देवसाहेबांच्या 'त्या' संकल्पनेला धरून होते. त्यानंतर सगळा आनंदी आनंद! चित्रपट-सृष्टीत येणारा नवा ट्रेण्ड पाहून देव आनंद भांबावले होते. नक्की काय करायचं अशाने कन्फ्युजले होते. खरं सांगायचं तर सध्याच्या प्रवाहाबरोबर त्यांना पोहताच आलं नाही, असं म्हटलं तरी चालेल.. त्याच्या कॅम्पमधला एकेक तारा निखळत होता. बर्मनदा १३ ऑक्टोबर १९७५ला सोडून गेले. एक आधारस्तंभ निखळला. नंतर साहीर गेले. ३१ जुलै, १९८०ला महंमद रफी तर पुढे १३ ऑक्टोबर १९८७ला किशोरकुमार मैफल सोडून गेला. आर्डीने नवकेतनला तारण्याचे प्रयत्न केले, पण त्यांच्या नात्यातली वीण घट्ट होताहोताच तुटली. ते राजेश रोशनच्या नादाला लागले तेव्हा एवढं दुःख झालं नव्हतं पण ते जेव्हा भप्पी लाहिरीच्या गळ्यात गळे घालू लागले तेव्हाच कुठेतरी त्याच्या फॅन्सच्या मनात शंकेची पाल चुकचुकायला लागली होती. याच टप्प्यावर पडझडीला सुरुवात झाली होती. आपला हा 'देव' चरित्र भूमिकांकडे वळलाच नाही. तो स्वतःला तरुणच समजत राहिला.. पुढे त्याचं हे वागणं चक्क हास्यास्पद ठरू लागलं. ज्या चेहऱ्यावर आम्ही निस्सिम प्रेम केलं तो चेहरा आता वृध्दत्वाकडे झुकलाय हे लोकांना दिसत असूनही तो मात्र आपलं तारूण्य कुरवाळत राहिला. देव आनंद त्याच्या फॅन्सच्या हृदयात तळ ठोकून आहे म्हणतात.. पण कुणाच्या? आम्ही 'देव'भक्त आहोत यात वाद नाही! त्याचा तो फ्रेश चेहरा पाहून बऱ्याच पिढ्या नादावल्या, त्याच्या सिनेमातल्या गाण्यांनी आम्हाला खुळावून सोडलं होतं. त्याच्या 'बाजी' (१९५१) पासून ते थेट 'वॉरन्ट'पर्यंतचे सगळेच सिनेमे आम्ही आवडीने पाहिले, आजही पाहत आहोत. पण.. आता आमच्या पन्नाशीत असलेल्या आणि आमच्यापेक्षा काही मोठ्या पिढ्या वगळता त्याचं अस्तित्व उरलंय ते केवळ स्वतःपुरतंच असं म्हणायला हरकत नाही. (दादासाहेब फाळके पुरस्काराच्या निमित्ताने तो पुन्हा चर्चेत आला इतकंच.) 'हरे राम हरे कृष्ण'पासून देव आनंदला डोक्यावर टोपी घालायला फार आवडतं. ती त्याच्या डोक्यावर दिसतेही छान, पण ती पब्लिकला घालायची? त्याचे 'देस परदेस', 'बुलेट', 'कलाबाज', 'लूटमार', 'स्वामीदादा', 'अव्वल नंबर', 'सौ करोड','गँगस्टर' ते 'सेन्सॉर' आणि नंतर 'लव्ह इन टाइमस्क्वेअर', 'प्राइम-मिनिस्टर'.. अनेक रसायनं वापरूनही कुचकामी ठरलेत. निष्काम, हताश, योगीरूपातला 'गाईड'मधला त्याचा 'राजू-गाईड' आत्ता याक्षणी आठवतोय.. 'ना दुःख है, ना सुख है..ना दिन है, ना रात है, ना दुनिया, ना इन्सान ना भगवान! सिर्फ मैं.. मैं..' गेल्या सहा दशकात त्याने अनुभवलेले अनेक चढउतार त्याच्या गहिऱ्या डोळ्यात छलकताना दिसतात.. पण तरीही तो म्हणतोय..

*ग़म और ख़ुशी में फर्क ना महसूस हो जहाँ,*
*मैं दिल को उस मकाम पे लाता चला गया..*
*मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..*
*हर फिक्र को धुएं में उडाता चला गया..*

पण.. 'दिल है के मानता नही'.. कुणी काहीही म्हणा, आम्ही आजही 'देव'भक्त आहोत.. तो आमच्या मनात तस्साच चिरतरूण राहणार आहे.. (हल्लीच देवसाहेब देवाघरी गेले.) पण देवाला वय असतं? नाही ना! अरे 'देव' आहे तो! 'देव' तर अजरामर असतो..

♥

संगीतकार जयदेव यांच्या काही सुपरहिट गाण्यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स :

०१. संगीतकार जयदेव (सुपरहिटस् ०१) https://youtu.be/c3fuT8dOuUo

०२. संगीतकार जयदेव (सुपरहिटस् ०२) https://youtu.be/9GEZZrK-V2Y

♥

## २० : मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..

चित्रपट : हम दोनो (१९६१)
निर्माता : देव आनंद (नवकेतन)
दिग्दर्शक : अमरजीत
गीतकार : साहीर लुधियानवी
संगीत : जयदेव

मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..
हर फिक्र को धुएं में उडाता चला गया..
हर फिक्र को धुएं में उडाss

बरबादीओंका सोग मनाना फिजूल था - २
मनाना फिजूल था, मनाना फिजूल था,
बरबादीओंका जश्न मनाता चला गया - २
हर फिक्र को धुएं में उडाss

जो मिल गया उसी को मुकद्दर समझ लिया - २
मुकद्दर समझ लिया, मुकद्दर समझ लिया,
जो ख़ो गया, मै उसको भुलाता चला गया - २
हर फिक्र को धुएं में उडाss

ग़म और ख़ुशी में फर्क ना महसूस हो जहाँ - २
ना महसूस हो जहाँ, ना महसूस हो जहाँ..
मैं दिल को उस मकाम पे लाता चला गया - २
मैं जिंदगी का साथ निभाता चला गया..
हर फिक्र को धुएं में उडाता चला गया..

♥

देवसाहेबांचं, तुमच्या आवडीचं हे गाणे ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी देत आहे या गाण्याचा ‘ऑडिओ, व्हिडिओ, सप्तरंगातील व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक’ तसेच, या संपूर्ण मूळ चित्रपटाची ‘यू-ट्युब’ लिंक :

१. मैं जिंदगी का साथ… (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=8xLGdl9_jak

२. मैं जिंदगी का साथ… (मूळ व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=Vmo2LTC3iC0

३. मैं जिंदगी का साथ… (नवा व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=QCGh8s3mShQ

४. मैं जिंदगी का साथ… (कराओके) https://www.youtube.com/watch?v=3GKOsPwRD-8

५. ‘हम दोनो’ (१९६१) (संपूर्ण चित्रपट) https://www.youtube.com/watch?v=ruLdKqijp8Q

♥

## 21 : Pyar Kiya To Darna Kya..

## २१ : प्यार किया तो डरना क्या?

'काय भिक्कार पिक्चर्स बनवतात हे लोक?.. देख! एक दिन मैं ऐसी फिल्म बनाऊंगा के सबकी छुट्टी हो जाएगी..' करंगळीत पकडलेल्या विडीचा जोरदार झुरका घेत तो बोलताच नौशादजींचा घास घशातच अडकला. घोटभर पाणी पिऊन ते म्हणाले.. 'अबे आसिफ, तू ठीकसे पतलून नही सिला सकता, फिल्म क्या खाक बनायेगा?' गणपत वाणी विडी पिताना चावायचा नुसती काडी...स्टाईलचं त्याचं बोलणं कुणीही मनावर घेत नसे. हा के. आसिफ म्हणजे अजब वल्ली. बाता मारण्यात पटाईत. 'लैला-मजनूं' फेम नझिरसाहेबांचा हा व्दाड भाचा. तो उगीच नको ती मगजमारी करू नये म्हणून त्याला शिंप्याचं दुकान काढून दिलेलं. खोदादाद सर्कलजवळच्या त्या हॉटेलात राईसप्लेट खाता-खाता तो असले संगमरवरी इमले रचायचा. नौशादजींसह सगळेच त्याची टर उडवायचे. हा फिल्म-दीवाणा भाचा नझिरमामूंच्या सेटवर नुसता रेंगाळताना जरी दिसला तरी ते त्याला तिथून हाकलून काढायचे. तो वशीकरण विद्या शिकला की काय कोण जाणे पण इंडस्ट्रीत मस्काफिकेशन आणि बोलबचन करून त्याने पृथ्वीराज कपूर, दुर्गा खोटे, सुरैया अशी दणदणीत स्टार्सची फौज घेऊन 'फूल'(१९४५) आणि दिलीपकुमार, नर्गिस, जीवन वगैरेंना घेऊन 'हलचल'(१९५०) नावाचे पिक्चर्स मिळवले. दिग्दर्शित केले. एक पिक्चर सपाटून आपटला दुसरा थोडासा चालला पण त्यामुळे इंडस्ट्रीत जानपहचान तर झाली. आता त्याचा हौसला आणखी बुलंद झाला. कपड्याची मापं घेणारा आसिफ मग सलीम-अनारकलीच्या कथेवर सिराज अली हकीमसाठी फिल्मची आखणी करण्यात गुंतला. 'मुघल-ए-आझम' म्हणजे काही खायचं काम नाही महाराजा! के. आसिफ नावाच्या अवलियाचं स्वप्न होतं ते. सलीम-अनारकलीच्या प्रेमाची दास्तान होती ती. खरं तर चावून-चावून चोथा झालेला विषय तो. पण के. आसिफने अपने रंग में ढालकर माऊन्ट एव्हरेस्टपेक्षाही त्याला उत्तुंग केला होता. १९५२साली या विषयावर काम सुरु केलं आसिफने. चंद्रमोहन-नर्गिस, पृथ्वीराज, दुर्गा खोटे असे कलावंत असणार होते. संगीत अनिल विश्वास! पुढे थोड्याच दिवसात दिलीपकुमार-नर्गिस अशी योजना आखली गेली. काही दिवसांनी नर्गिसची जागा मधुबाला घेणार अशी कुणकुण लागली. अनु मलिकने नुसरत फतेह अली खाँसाहेबांचं गाणं ज्या शिताफीने ढापून 'मेरा पिया घर आया..' करत 'ती माझीच ट्यून होती, बर्रका!' अशी शेखी मिरवली, तशीच चलाखी करत फिल्मीस्तानने याच विषयावर आपला 'अनारकली' सुरू केला आणि १९५३ मध्ये झटपट रिलीजही केला. शहेनशाह अकबर - मुबारक मर्चंट, सलीम -प्रदीपकुमार आणि अनारकली - बीना रॉय. संगीतकार होते सी. रामचंद्र. इकडे आसिफमियाँची धडपड सुरूच होती. चर्चगेट-मरिन लाईन्स विभागाचा विकास करणाऱ्या शापूरजी-पालनजी (स्टर्लिंग इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन) नावाच्या बिल्डर्सचा वरदहस्त लाभताच तो जोमानं कामाला लागला. आता तो 'मुघल-ए-आझम' या एकाच ध्येयाने झपाटला होता. अंधेरीच्या मोहन स्टुडिओत बैठक झाली. संवादलेखक अमान (झीनतचे अब्बाजान), वझाहत मिर्झा, एहसान रिझवी, कमाल अमरोही आणि संगीतकार नौशादजी यांच्या साक्षीनं विडीचा जोरदार झुरका मारून चुटकी वाजवत के. आसिफ आपल्या या फिल्मची रूपरेषा मांडू लागला. के. आसिफचं नौशादजींशी चांगलं ट्युनिंग होतं. गाण्यांच्या सिच्युएशन्स फायनल होताच नौशादजींनी 'ख़ुदा निगेहबाँ हो तुम्हारा..' आणि 'मोहे पनघट पे नंदलाल..' रेकॉर्ड केलं..

मला 'प्यार किया तो डरना क्याSS..' या गाण्याबद्दल प्रचंड उत्सुकता होती. पूर्ण चित्रपट 'ब्लॅक अॅण्ड व्हाईट' पण फक्त हे गाणं असलेली रीळ सप्तरंगात होती. या गाण्याचा कानामनावर इतका इम्पॅक्ट होता की विचारता सोय नाही. ही एकच रीळ इस्टमनकलरमध्ये का केली? खात्रीपूर्वक सांगायचं तर आपल्या इथे रिव्हर्ब-मशिन्स सर्रास वापरात आल्या त्या १९७८च्या आसपास. लाला कॉलेजमध्ये बारावी शिकत असताना माझ्या ऑर्केस्ट्रासाठी, मी ज्युनो-६० किंवा ज्युनो-१ असले की-बोर्डस् भाड्याने आणायला नेहमीच जायचो. रवींद्र नाट्य मंदिरासमोरच्या 'स्वामी म्युझिकल्स' मध्ये ते उपलब्ध असायचे. रिव्हर्ब-मशीन मी इथेच पाहिली होती. त्याचा वापरही केलेला. १९५५ च्या काळात आपल्या इथलं 'साँग-रेकॉर्डिंग' इतकं प्रगत नव्हतं मग गाण्यात तो एको-रिव्हर्बचा इफेक्ट यांनी आणला कुठून? असे अनेक प्रश्न घेऊन मी सरळ नौशादजींच्या घरी गेलो.. के. आसिफ या अवलियाविषयी सांगता सांगता नौशादजी आता 'प्यार किया तो डरना क्याSS..'ची दास्तान सांगण्यात गुंग झाले.. (एखाद्या वयस्क सेलेब्रिटीशी गप्पा मारणं हा एक अतिशय चांगला अनुभव असतो खरा परंतु त्यात एक प्रॉब्लेम मात्र होतो. आपण आपल्या प्रश्नाला चिकटून राहणं नहमीच प्रशस्त दिसत नाही. बोलता बोलता सहज विषयांतर होतं. आपला विषय भरकटू शकतो. शेवटी नौशादजींच्या मुलाने (राजू नौशाद) सुचविल्याप्रमाणे, त्यांच्याशी गप्पा आणि आत्मचरित्रातील उल्लेखांचा माग काढत त्या उल्लेखांच्या आधारावर 'मुघल-ए-आझम' हा सिनेमा म्हणजे काय चीज होती हे दृग्गोचर झालं...)

आत्तासारखे रेकॉर्डींग स्टुडिओ नव्हतेच तेव्हा. गाण्यातल्या शेवटच्या कडव्यात एको-रिव्हर्ब किंवा घुमणाऱ्या आवाजाचं ध्वनिमुद्रण असायला हवं अशी अटकळ घातली होती के. आसिफने. नौशादजींनी ते चॅलेन्ज स्वीकारलं. गायिकेचा आवाज आसमंतात घुमतो असा इफेक्ट यायला हवाय ना? करतो मी तसं.. बऱ्याच विचारांती नौशादजींनी रेकॉर्डिस्टशी सल्लामसलत करून दादरचा रंगमहल शूटिंग स्टुडिओ निवडला. त्यातल्या शूटिंग फ्लोअरचा एक भाग भाड्यानं घेतला. क्रॉफर्ड-मार्केटवरून जाड्याभरड्या ब्लँकेटचे गट्ठे आणले गेले. शामियाना उभारण्यात आला. भिंतींना ती ब्लँकेटस् लावून साऊन्ड-प्रुफिंग झालं. पायांच्या आवाजाचा त्रास नको म्हणून भायखळ्याहून घाऊक भावात काथ्या आणून जमिनीवर पसरला. आजच्या रेकॉर्डींगला अद्ययावत स्टुडिओमध्ये प्रत्येक वाद्यासाठी चक्क सव्वा लाख रूपये किंमतीचे न्यू-मॅन वगैरे मायक्रोफोन्स असतात. इथे केवळ ओटीतल्या बाळाच्या डोक्याएवढ्या आकाराचे दोन माईक होते. एक वादकांसाठी तर दुसरा गायकांसाठी. टेलिफोन बूथ किंवा अक्षरशः बाथरूम म्हणावा अशा केबिनवजा जागेत लतादीदी आणि कोरस. बाहेर साठेक वादक. रॉबिन चटर्जी नावाचे रेकॉडिस्ट ध्वनिमुद्रण करू लागले. लतादीदींचा आवाज त्या शामियानात घुमू लागला.. चैतन्य जागवू लागला..

*आज कहेंगे दिल का फ़साना, जान भी लेले चाहे ज़माना - २*
*मौत वोही जो दुनिया देखें, मौत वोही जो दुनिया देखें,*
*घुट घुटकर यूँ मरना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?*
*प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याऽऽ*

के. आसिफ गाण्याचा एकंदर रागरंग पाहून पागलच झाला. त्याला हवं होतं ते गवसलं होतं. अक्षरशः झपाटलाच तो. गाणं एवढं छान झालंय तर शूटही झकास व्हायला हवं. एवढ्या मोठ्या राजाचा दरबार! नुसत्या फळ्या लावून रंगरंगोटी करायची? छ्याऽऽ!! शीशमहलचा सेट बनवूया म्हणाला. बऱ्याच जणांना कामाला जुंपलं. फिरोजाबादहून कारागीर आणले. इंजिनीयरिंगच्या अनेक 'स्ट्रीम्स' असतात. यातलं के. आसिफला काय येत होतं ते अल्ला जाने. इंटिरियर डिझाईनिंग, सिव्हिल इंजिनीयरिंग कशाकशाचा गंध नव्हता पण त्याच्या डोक्यात एक कन्सेप्ट होती. फंडा क्लियर होता. त्याने कागदावर त्याचा मोडका-तोडका का होईना आराखडा बनवला होता. त्याने कारागिरांना कामाला लावून स्वतःच्या देखरेखीखाली हजारो काचा आणि आरसे लावून आपल्याला हवा तसा महल बनवला. हा सेट बघून भल्या-भल्यांनी कपाळावर हात मारून घेतला. इथे शूटिंग होऊच शकत नाही अशा पैजा लागल्या. के. आसिफची पागलों में गिनती झाली. कॅमेऱ्याची लेन्स आरशांतून परावर्तित होणाऱ्या प्रतिबिंबांच्या भडिमारांवर काय खाक रिझल्ट देणारेय? इष्क ही जशी नशिली चीज असते तशीच जहाल महत्त्वाकांक्षा बाळगून आसिफ मियाँ मात्र इरेला पेटला होता...

*उनकी तमन्ना दिल में रहेगी, शम्मा इसी महेफ़िल में रहेगी - २*
*इष्क में जीना इष्क में मरना ऽऽ, इष्क में जीना इष्क में मरना*
*और हमें अब करना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?*
*प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याऽऽ*

शापूरजी तो सेट बघून आले मात्र, कुठून या भानगडीत पडलो असं झालं. त्यांच्या पायाखालची जमिनच सरकली. कपाळ बडवत ते नौशादजींच्या दारात मट्कन खाली बसले. चार लाख रूपयांचे आरसे लावलेयत या मुर्खाने! पागल झालाय तो! आरशांवर लाईटस् टाकून शूटिंग त्याच्या बापानं तरी केलं होतं का? माझे लाखो रूपये या मुर्खाने बरबाद केले. लूट गया.. बरबाद हो गया मैं!.. नौशादजींनी समजावण्याचा लाख प्रयत्न केला पण निर्मात्यांची मनःस्थिती इतकी विचित्र झालेली की ते काहीही समजून घेण्याच्या परिस्थितीत नव्हते. लाखो रूपये पाण्यात गेल्याचं एकच एक बोचरं दुःख घेऊन ते ज्याला-त्याला आपला दुखडा सांगत फिरू लागले. शेवटी या निर्मात्याच्या दुःखावर फुंकर घालायला सोहराब मोदी आले. 'तुम्ही बजेट द्या. हा सिनेमा मी दोन महिन्यात पुरा करून देतो..', असं आश्वासन दिलं. चमच्यांमार्फत ही बातमी के. आसिफच्या कानावर गेली. झालं! आसिफ खवळला. शिव्यांची लाखोली वाहत त्यानं एवढंच सांगितलं.. फिल्म नाही करत मी, ओके! पण या सेटवरचं शूट मीच करणार, डायरेक्टर म्हणून कुणी लुडबुडायला आला ना तर तंगडी मोडेन एकेकाची!... खूप टेन्स होता तो. त्याचं शूटचं प्लॅनिंग अगदी अंतिम टप्प्यात आलेलं. शूटिंगचं शेड्यूल सुरु झालं. कॅमेऱ्यांचं प्लेसिंग त्याने आपल्याला हवं तसं लावलं होतं. या मूर्ख माणसाला सांगून काही उपयोग नाही हे लक्षात येताच 'तुका म्हणे उगी रहावे..' या चालीत सर्वजण त्याच्या हुकुमाची तामील करत होते. कॅमेरामन तो सांगेल ते ते ऐकत होते. साऊन्ड! लाईटस्! ॲक्शन!! प्रखर दिव्यांचे प्रकाश झोत या शीशमहलच्या सेटवर फेकले गेले. लाईटसच्या

त्या प्रकाशझोतामुळे आणि आरशातून पुन्हा परावर्तित होणाऱ्या प्रतिबिंबांमुळे पूर्ण सेट अग्निकुंडासारखा धगधगता वाटत होता. के. आसिफ शांतपणे आपलं काम करत होते, तर या उष्णतेने आपण होरपळून जाऊ की काय अशा विवंचनेत प्रत्येकजण होता.. 'आलिया भोगासी असावे सादर..' या चालीत आसिफच्या सांगण्याबरहुकुम सर्व कलाकार निमुटपणे काम करत होते. आर.डी. माथूरजींनी त्या शीशमहलचे, आसिफसाहेब सांगतील तसतसे टेक्निकलरमध्ये शॉटस् घेतले. सगळे टेन्स होते पण नौशादजी सगळं कौतुकाने निरखत होते. सर्वजण त्याला नुसतं ओळखत असतील, नौशादजी त्याला ओळखून होते. इतरांना त्याची ती दीवानगी वाटत होती परंतु नौशादजींना त्याचा जोश-ए-जुनुन ठाऊक होता. नौशादजींना आठवलं.. अकबराच्या दरबारात सादर होणाऱ्या या गाण्याच्या शेवटच्या कडव्यावर विचार करताना घोडं अडलं होतं. के. आसिफने काही सूचना दिल्या होत्या. विनंती केली होती की बादशहासमोर राजनर्तकी अनारकली जेव्हा या गाण्याचं सादरीकरण करेल तेव्हा आपण थोडं तारतम्य बाळगूया. तो शहनशाह आहे. 'अनारकली'त त्या प्रसंगाला गाणं होतं.. 'ज़माना ये समझा के हम पिके आए..' अनारकली अशी बदतमीज असूच शकत नाही. अवघ्या सल्तनतचा शहेनशाह असलेल्या अकबर बादशहासमोर एक मामुली नर्तकी, मदिरापान करून अशी गुस्ताखी करूच शकत नाही. तमीज़ आणि तहज़ीब (शिष्टाचार, सभ्यता) ती पाळणारच. शेवटच्या कडव्यात आपली कैफियत मांडताना ती राजाच्या जिव्हारी लागेल असं बोलेल, पण त्यातून बादशहाचा अपमान होईल असे शब्द त्या कडव्यात नकोत. नौशादजींनी शकीलसह या गाण्याच्या शेवटच्या कडव्यावर बरीच मेहनत घेतली. शेवटी शकीलने बऱ्याच प्रयत्नांती कलाम लिहिला होता...

*छुप ना सकेगा इष्क हमारा, चारों तरफ़ है उनका नजारा..- २*
*पर्दा नही जब कोई ख़ुदा से, पर्दा नही जब कोई ख़ुदा से,*
*बंदों से पर्दा करना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?*
*प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्या,*
*प्यार किया कोई चोरी नही की, छुप-छुप आहे भरना क्या*
*जब प्यार किया तो डरना क्या,*
*प्यार किया तो डरना क्या, जब प्यार किया तो डरना क्याऽऽ*

गाणं मनासारखं रेकॉर्ड झालं होतं आणि के. आसिफने ते आपल्याला हवं तसं शूट केलं होतं. सगळे शॉटस् पूर्ण होताच ती रीळ (फिल्म) डेव्हलप करण्यासाठी लंडनला पाठविण्यात आली. मिक्सिंग करून ती रीळ जेव्हा हातात पडली तेव्हा सगळेच अवाक् झाले. शूट व्यवस्थित होतंच. आश्चर्य म्हणजे आसिफने जे छातीठोकपणे सांगितलं होतं तेच तंतोतंत अवतरलं होतं. खरंतर उम्मीदसे बढकर! शीशमहलच्या छताकडच्या प्रत्येक आरशात नर्तकी अनारकलीचं प्रतिबिंब दिसत होतं. अनारकलीचा आवाज प्रत्येक प्रतिबिंबातून गुंजत होता. 'छुप ना सकेगा इष्क हमारा, चारों तरफ है उनका नजारा..' या ओळी लतादीदी गाताच त्याचा आवाज कोरसमध्ये मिसळून वेगळाच इफेक्ट साधला होता. पडद्यावर दिसणाऱ्या शेकडो प्रतिबिंबांतून येणारा आवाज प्रेक्षकांना आश्चर्यमुग्ध करणारा ठरला. ध्वनिमुद्रणात संगीतकार नौशादजी आणि रेकॉर्डिस्ट रॉबिनदांनी ही कमाल केली होती, तर चित्रणातून त्याचा जो इम्पॅक्ट आसिफने आणला होता त्याला तोड नाही. 'तुमचा हा सिनेमा रखडलाय ना! मी दोन महिन्यात तो पुरा करून देतो..' असं आश्वासन देऊन शापूरजींचे कान भरणारे सोहराब मोदींसारखे लोक पाठीला पाय लावून पळाले.. तर आपल्या पैशांचं मोल अमृताच्या लेण्याएवढं अनमोल केल्याबद्दल शापूरजी आसिफची माफी मागत आनंदाश्रू ढाळत होते. खरंतर आसिफच्या वाढत्या बजेटने त्यांना परेशान केलं होतं. जीणं हराम केलं होतं. उठल्या सुटल्या तो पैसे मागायचा. फेफरं यायचं अक्षरशः! युध्दाचं शूट आहे.. द्या दोन लाख! गाणं शूट करतोय.. द्या चार लाख! दोघांत नेहमी खटके उडायचे. त्यांच्यातले कलह मिटवता मिटवता कलाकार, तंत्रज्ञ आणि नौशादजींच्या नाकी नऊ यायचे. एवढी वर्षे एकाच चित्रपटात गुंतलेला हा के. आसिफ वेडा आहेच, त्याच्या नादाला लागून शापूरजी पालनजी ठार वेडे कसे झाले नाहीत, हे आश्चर्य वाटायचं इंडस्ट्रीतल्या लोकांना. जवानीतली बहुमूल्य नऊ वर्षे आणि पाण्यासारखा पैसा ओतून हे काय साधणार आहेत हे त्या भगवंतालाच माहीत. म्हातारे झाले बिचारे या परेशानीने. पण के. आसिफ उधळ्या नव्हता. शाही फकीर होता तो. लाखो रूपये खर्चून मनाजोगता सेट लावायचा पण स्वतः स्पॉट-बॉयच्या चटईवरही बिनदिक्कतपणे झोपायचा. दोन जोडी कपडे, विड्या, मोजकं जेवणखाण आणि आपली ही फिल्म हा एकच ध्यास. 'मुघल-ए-आझम' तब्बल नऊ वर्षांनी शुक्रवार दि. ५ ऑगस्ट १९६० रोजी देशभर १५० ठिकाणी शापूरजी पालनजींच्या 'स्टर्लिंग इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन'तर्फे प्रकाशित झाला. एखाद्या सिनेमासाठी आठ-नऊ वर्षे रखडपट्टी म्हणजे टूऽऽ मच! असा एखादा महत्त्वाकांक्षी चित्रपट एकदा रखडला की सगळ्याच अपेक्षांचा पार पालापाचोळा होतो. बालकलाकार चक्क तरूण होऊन जातात. इतर कलाकारांचं वय वाढतं ते वेगळंच. 'कन्टिन्यूटी' राखता राखता हालत खराब होऊन जाते. बजेट फुगत जातं. इतका वैताग येतो की त्या विषयातला

इन्टरेस्टच निघून जातो. काळानुरूप तो शिळाही वाटू शकतो. १९६०मध्ये परिस्थिती वेगळी होती. पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं होतं. 'रतन' (१९४४) पासून बाळसं धरलेलं चित्रपटसंगीत आता ऐन जवानीत होतं. कलाकारांचा अभिनय, चित्रपटातलं सादरीकरण इत्यादी गोष्टी काळानुरूप बदलल्या होत्या. बदलत होत्या. तोपावेतो अनेक सिनेमातून अनेक विषय वेगवेगळ्या दिग्दर्शकांच्या पोतडीतून बाहेर पडलेले म्हणता आणखी एक ऐतिहासिक विषयावरचा सिनेमा? मन साशंक असणारच. पण के. आसिफ निश्चिंत होता. त्याच्या मते 'मुघल-ए-आझम' हा विषय 'ऑल टाईम ग्रेट' असल्याने धास्ती नव्हती. हिन्दुस्थानी चित्रपट परंपरेत 'मुघल-ए-आझम'चं नाव सुवर्णाक्षरात कोरलं गेलं. फिल्मफेअर पुरस्कार सुरु झाले ते १९५४ सालापासून. 'अनारकली' (१९५३) त्या यादीत होतं, पण बक्षिसं घेऊन गेलं होतं.. दो बिघा जमीन, दाग आणि बैजू बावरा! १९६१चा फिल्मफेअर पुरस्काराचा दिवस! स्पर्धेत 'दिल अपना और प्रीत पराई', 'कोहिनूर', बिमलदांचा 'परख', रामानंद सागरचा 'घुंघट', गुरुदत्तचा 'चौदहवी का चाँद' असे ग्रेट सिनेमे. उत्कृष्ट चित्रपट आणि संवाद अशा दोनच ट्रॉफीज 'मुघल-ए-आझम'च्या वाट्याला आल्या. पण या सिनेमाचं मानाचं स्थान तद्नंतरच्या 'शोले' किंवा 'हम आपके है कौन' पेक्षाही खचितच वरचढ आहे. आज सचिन धावांचा पाऊस पाडतोय, किंवा सेहवाग त्रिशतकं वगैरे करतोय ते ग्रेटच, पण डॉन ब्रॅडमन, सुनील गावस्कर आणि कपिलदेवने त्यांच्या काळात जी उत्तुंग शिल्पे साकारलीत त्याला आपण कुर्निसात करतोच ना? या के. आसिफला लोकांनी खुळ्यात काढलं होतं. पण याच खुळ्याने तत्कालीन चित्रपटकर्त्यांचा पार खुळखुळा करून टाकला होता हे कुणी विसरेल? चित्रपटाची एकच रीळ रंगीत होती. पण काही वर्षांपूर्वी भरमसाठ खर्च करून त्याची पूर्ण रंगीत पेशकश झाली तेव्हा कोण आनंद झाला होता म्हणून सांगू? मधुबालाला सप्तरंगात पाहून खूप बरं वाटलं. तो सप्तरंगात दाखवायचा तर एकेक फ्रेम रंगीत करणं क्रमप्राप्त होतं! एका सेकंदाच्या २४ फ्रेमस्! साडेतीन तासांचा हा चित्रपट! पूर्ण चित्रपट रंगीत करायचा म्हणजे किती मेहनत झाली असेल, विचार करा. नौशादजींच्या परवानगीने त्याचा पूर्ण ऑडिओ, साऊन्ड इफेक्टस् आणि त्यातली सगळी गाणी ॲडिशनल ह्दिम आणि म्युझिक टाकून स्टिरीओ स्वरूपात केली. असे सर्व सोपस्कार झाल्यानंतर 'मुघल-ए-आझम' आपल्या पुनर्भेटीला आला. लोकांनी त्याचं स्वागतच केलं. के. आसिफ म्हणाला होता.. 'काय भिक्कार पिक्चर्स बनवतात हे लोक?..देख! एक दिन मैं ऐसी फिल्म बनाऊंगा के सबकी छुट्टी हो जाएगी..'. खरंच 'मुघल-ए-आझम' सारखा चित्रपट बनवणं म्हणजे काही खायचं काम नाही महाराजा!..

♥

रसिकांचं अतिशय आवडतं असं हे गाणं. ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि सोबत कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

| | |
|---|---|
| १. प्यार किया तो डरना क्या.. (ऑडिओ) | https://youtu.be/yBuz0eWC598 |
| २. प्यार किया तो डरना क्या.. (व्हिडिओ) | https://youtu.be/6Au_J6jHKE0 |
| ३. प्यार किया तो डरना क्या.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/biSsnR6I3gk |
| ४. 'मुघल-ए-आझम' (संपूर्ण चित्रपट) | https://youtu.be/rq8MktR_Ctc |

♥

## २१ : प्यार किया तो डरना क्या?

चित्रपट : मुघल-ए-आझम (१९६०)
निर्माता : शापूरजी-पालनजी
(स्टर्लिंग इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन)
दिग्दर्शक : के. आसिफ
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : शकील बदायुनी
संगीत : नौशाद

इन्सान किसी से दुनिया में, इक बार मुहोब्बत करता है।
इस दर्द को लेकर जीता है, इस दर्द को लेकर मरता है।

प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याss
प्यार किया कोई चोरी नही की, प्यार कियाss
प्यार किया कोई चोरी नही की, छुप-छुप आहे भरना क्या
जब प्यार किया तो डरना क्याSS
प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याSS

आज कहेंगे दिल का फ़साना, जान भी लेले चाहे ज़माना - २
मौत वोही जो दुनिया देखें, मौत वोही जो दुनिया देखें,
घुट घुटकर यूँ मरना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?ss
प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याss

उनकी तमन्ना दिल में रहेगी, शम्मा इसी महेफ़िल में रहेगी - २
इष्क में जीना इष्क में मरना, इष्क में जीना इष्क में मरना
और हमें अब करना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?ss
प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याss

छुप ना सकेगा इष्क हमारा, चारों तरफ़ है उनका नजारा..- २
पर्दा नही जब कोई ख़ुदा से, पर्दा नही जब कोई ख़ुदा से,
बंदों से पर्दा करना क्या.. जब प्यार किया तो डरना क्या?
प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याss
प्यार किया कोई चोरी नही की, छुप-छुप आहे भरना क्या
जब प्यार किया तो डरना क्याss
प्यार किया तो डरना क्या जब प्यार किया तो डरना क्याss

♥

## 22 : Vikat Ghetla Shyam..

## २२ : विकत घेतला श्याम..

*नाही खर्चली कवडी दमडी*
*नाही वेचला दामss आss*
*विकत घेतला श्याम, बाई मी विकत घेतला श्याम..*

'अरे ए थेरड्या! आता बसतोस गप की दाखवू धोबीपछाड? आयला कवापास्नं बघतोय! एवढुश्या पोरीला रस्त्यात नाचवून पैसे कमवतोस?..' असं म्हणून कचकचीत शिवी हासडली.. 'अरे लाजलज्जा कशी न्हाई तुला.. अक्कल बी इकून खाल्लीस होय? तेच्या मारीss' मागचा-पुढचा विचार न करता त्याने अस्तन्या सरसावत सरळ त्या भिकाऱ्याची गच्चीच धरली. मांजराचं पिल्लू उचलावं तशी. आता रागाच्या भरात हा बाजापेटीसुध्दा फोडून टाकणार या धास्तीनं ती कोवळी पोर तिथल्यातिथं थिजली. एकच गोंधळ! मदत करण्याऐवजी गर्दी आस्तेकदम मागे हटायला लागली. ते अभिनय करत असतील वगैरे त्यांच्या गावीच नव्हतं. शूटिंग कशाशी खातात याचा काय संबंध! अख्खं युनिट बिथरलं. काय खरं न्हाई बुवा! तो त्या इलाक्यातला भाई असल्याचं समजल्याने पंचाईतच झालेली एकंदरीत. सहाय्यक दिग्दर्शक राजदत्त तशातही त्या 'भाई'ची समजूत काढायच्या प्रयत्नात होते. राजा परांजपेंचा चेहरा अतिशय केविलवाणा झाला होता.

आमच्या जुहूच्या स्टुडिओपासून अगदी हाकेच्या अंतरावर राहातं 'देव' कुटुंब, पण डायरेक्ट घरी जाणं प्रशस्त वाटेना. घरचा फोन नंबर मिळवता मिळवता मात्र नाकी नऊ आले. शेवटी एकदाचा नंबर मिळाला. रींग वाजत होती. माझ्या मनात धाकधूक. सौ. सीमाताई बोलतील की नाही? पण नाही! त्या फोनवर आल्या. मी अमुक अमुक असं सांगितलं. 'विकत घेतला श्याम..' या गाण्याबद्दल थोडी माहिती हवीय अशी विनंती केली.. ब्लँक! '..संध्याकाळी बोलू आपण.' असं म्हणत त्यांनी फोन ठेऊन दिला. कल्याण! ताई काही आपल्याशी बोलत नाहीत.. लेख रात्रीपर्यंत फॅक्स करणं गरजेचं होतं. थोडासा निराश झालो मी. संध्याकाळ झाली. एक प्रयत्न करून तर पाहूया म्हणून पुन्हा लावला फोन. फोनवर ताईच होत्या. मी प्रश्न विचारायला सुरूवात केली. मी विचारेन त्या प्रश्नाचं त्या अतिशय शांतपणे 'एका वाक्यात उत्तरे द्या' टाईप उत्तर देत होत्या. मोजकंच बोलत होत्या. कठीण परिस्थिती! ज्यांची आपण मुलाखत घेतोय ती व्यक्ती जर खुल्या दिलाने बोलत नसली तर फारच कुचंबणा होते हो! आता आपला हा लेख टिपिकल प्रश्नोत्तरांसारखा होणार म्हणून खंतावलो. 'ताई..खरं सांगू? मला हवंय ना तसं तुमच्या उत्तरातून मिळत नाहीय..प्लीज जरा मोकळेपणाने बोला ना!..' परत ब्लँक! मी 'हॅल्लो' म्हटलं. पलिकडून आवाज आला.. 'तुम्ही कोण बोलताय हे मला नक्की कळत नाहीय, म्हणून जरा प्रॉब्लेम होतोय..' मी पुन्हा कोण बोलतोय ते सांगितलं आणि म्हणालो.. 'सीमाताई.. मला 'तुम्ही-आपण' वगैरे म्हणू नका.. मी आपल्या अजिंक्यच्या वयाचा आहे.. सामना दैनिकाच्या 'फुलोरा' पुरवणीसाठी लेख लिहायचाय. मी तुमच्या घरासमोरच्या स्टुडिओतून बोलतोय.. पण घरी येणं प्रशस्त वाटेना.. म्हणून फोन केलाय..' क्षणात ताईंचा बोलण्याचा टोनच बदलून गेला. आपल्या अजिंक्यच्या वयाच्या मुलाशी आपलेपणानं बोलावं, तशा त्या बोलत राहिल्या.. मी झरझर लिहून घेत होतो.

मुक्काम लोणावळा! राजमाची बागेजवळच्या वळणावरचा स्पॉट. राजाभाऊंचं युनिट गाण्याचं चित्रिकरण करण्याच्या जय्यत तयारीत. राजाभाऊ भिकाऱ्याच्या गेट-अपमध्ये तर सीमाताई फाटका परकर-पोलका घालून शॉटसाठी बिल्कुल तैय्यार! थंडीचे दिवस! पण टळटळीत दुपारचं ऊन मात्र फाटक्या कपड्यांमुळे चांगलंच जाणवत होतं. डांबरी रस्ता चांगलाच तापलेला. अगदी पापड शेकण्यासारखा. अंडं पडून फुटलं तर हाफ-फ्राय, ऑन-द-स्पॉट! छोटूनं 'नागरा' सुरू केला. (गाण्याचं चित्रण करताना गाणं वाजवण्यासाठी वापरलं जाणारं यंत्र, टेप-स्पूल्स प्लेअर! यातून वाजणाऱ्या गाण्यावरच शूटिंग करतात जेणेकरून ते पुढे फिल्मबरोबर स्पीड वगैरे बाबतीत तंतोतत जुळतं) गाणं वाजू लागलं. हार्मोनियमवर बोटांची धावपळ करत आलाप घेतल्याच्या राजाभाऊंच्या कृतीला प्रतिसाद देत सीमा गिरकी घेत गाऊ लागली...

*कुणी म्हणे ही, असेल चोरी, कुणा वाटते असे उधारी - २*
*जन्मभरीच्या श्वासाइतुके,*
*जोजियले हरिनाम, जोजियले हरिनाम,*
*विकत घेतला श्याम, बाई मी विकत घेतला श्याम*

कट! कट! राजाभाऊ स्वतःच्या भूमिकेत पूर्णपणे विरघळलेले असूनही सीमाच्या एखाद्या चुकलेल्या स्टेपसाठी री-टेक्स होत होते. सीमा आता चांगलीच वैतागलेली. पायांना खूपच चटके बसत होते. तळव्यांना आता फोड आलेत याची जाणीव चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागली होती. शूटिंगसाठी म्हणा किंवा हा काय तमाशा चाललाय म्हणा, भोवती गर्दी वाढू लागली होती. सीनसाठी आयता 'मॉब' मिळाला हे चांगलंच झालं होतं, पण तो सीमाच्या अडचणीत आणखी भर घालत होता. सीमाच्या डोळ्यातली वेदना, असहायपणा नेमका त्या पावशेर रिचवून आलेल्या त्या भाईला झोंबला. तो चवताळला. कोवळ्या पोरीला हा म्हातारा भर उन्हात भीक मागायला लावतो म्हणजे काय? शूटिंग चाललंय हे त्याला माहीत नव्हतं. गर्दी असल्याने कॅमेरा नजरेच्या टप्प्यात नव्हता. तो सरळ भिडला. राजाभाऊंची कॉलर धरली. रोखठोक सवाल केला. सरतेशेवटी हे फिल्मचं शूटिंग आहे, आम्ही अभिनय करतो आहोत असं पटवून सांगितल्यावर बऱ्याच वेळानं त्याची समजूत पटली. तो निवळला. नंतर 'जगाच्या पाठीवर' (१९६१)च्या या गाण्याचं शूटिंग साग्रसंगीत पार पडलं..

गदिमांचं स्क्रीप्ट होतं ते. चार्ली चॅप्लीनकृत 'सिटीलाईट'च्या कथेच्या वळणाचं. गदिमा आणि माई भिडे यांनी साकारलेल्या श्रीमंत जोडप्याची ही मुलगी. मुलं पळवणाऱ्या टोळीचा म्होरक्या धुमाळ सीमाला किडनॅप करतो. पोरं पळवायची. त्याचे हात तोड, पाय तोड असली विकृती करायची, आणि त्यांना भीक मागायला लावून त्यावर गुजराण करायची हा त्याचा 'व्यवसाय'! सीमाच्या डोळ्यात तो कसलंसं औषध घालतो. ती आंधळी होते. रस्त्यावर इतरांसह तो तिला नाचायला लावतो. भीक मागायला लावतो.. 'धक्का लागलाय गं..' सारखी सडकछाप गाणी गात ती बक्कळ पैका कमावून देते धुमाळला. तिच्या या रटाळ आणि असहाय आयुष्यात एक पेटी वाजवणारा येतो. आता तिचं आयुष्य बदलून जातं. ती आता रस्त्यावर का होईना पण 'विकत घेतला श्याम..', 'थकले रे नंदलाला..' अशी गाणी गाऊन-नाचून पैसे कमावते. त्याच्यावर मनोमन प्रेम करत राहते. तो तिची गेलेली दृष्टी परत मिळावी म्हणून झटत राहतो. कथानक वेग घेतं. गदिमांच्या गाण्यांवर आणि सुधीर फडकेजींच्या सुरावटींच्या हिंदोळ्यावर झुलत राहतं. तिला दृष्टी मिळते एकदाची पण नशिबाचा फेरा पहा.. नेमका त्याच वेळी तो तुरुंगात असतो. सीमाला लहानपणी पळवून नेलं या आरोपासाठी! ती शोध घेते.. आधी आंधळी असल्याने तिला त्याचा चेहरा तिला ठाऊक नसतो. 'तुला पाहते रे तुला पाहते, जरी आंधळी मी..' म्हणणारी त्याची सखी त्याला ओळख देते. तो आपण भणंग-भिकारी असल्याचं सागतो आणि त्यानंतर?.. राजाभाऊकृत क्लायमॅक्स! वेगळ्याच पठडीतला..

तुम्ही हा चित्रपट पाहिला असेल तर एक गोष्ट तुम्हाला नक्कीच जाणवली असणार. इन्टरव्हलपर्यंत इथे हिरॉईन नाहीच. लव्ह-सीनही नाही. पहिला इन्टरव्हलपर्यंतचा भाग सबकुछ राजाभाऊ तारून नेतात. त्यांच्या दिग्दर्शनातले बारकावे अभिनयापेक्षाही वरचढ वाटतात. तो देव आनंदच्या 'गाईड'सारखा प्रसंग! राजा भुकेनं व्याकुळ झालाय. खायला हवंय पण कुणी चतकोर भाकरही देत नाहीय उलट हा देवत्व लाभलेला संत-सज्जन असेल असं समजून लोक त्याच्या पाया पडताहेत. त्याला हार घालताहेत. भुकेनं कासावीस झालेला तो शेवटी अगतिक होऊन गुलाबाच्या पाकळ्या कुस्करून कॉर्न-फ्लेक्सच्या चवीनं खात राहतो. सीमाचं कॅरेक्टरही व्यवस्थित डेव्हलप केलेलं दिसतं. ती आंधळी दाखवलीय परंतु जन्मांध नाहीय ती. डोळसपणा अनुभवलेली असल्याने ती आवाजाच्या दिशेने बघत डोळ्यांची विशिष्ट उघडझाप करेल हे बारकावे सीमाताईंना राजाभाऊंनी स्वतः करून दाखवलेले. हे पात्र सेंट-परसेंट वठवता आलं ते राजाभाऊंच्या शिकवणीमुळे, हे सीमाताई प्रांजळपणे कबूल करतात.

राजाभाऊ आणि सीमाताईंच्या या व्यक्तिरेखा संपूर्ण चित्रपटात, त्याकाळच्या स्वार्थी-सुखलोलूप समाजामुळे आयुष्याची परवड झालेल्या घटकाचं प्रतिनिधित्व करतात. आपलं पोट भरण्यासाठी निष्पाप मुलं पळवून आणून, त्यांचं आयुष्य उद्ध्वस्त करायचं. त्यांना भीक मागायला लावून, स्वतःची खळगी भरायची. अशा स्वार्थी जगाची ही प्रातिनिधिक कथा पाहायलाच हवी अशी मस्त जमून आली आहे. आज पन्नासेक वर्षांचा दीर्घ काळ उलटला आहे खरा पण अशा किंवा त्यापेक्षा जास्त विकृत मनोवृत्तीची माणसं आजही अवती-भवती सापडतात.. या चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद आणि गीतलेखन अतिशय प्रभावी झालंय. दिग्दर्शन आणि संकलन नेमकं आणि नेटकं आहे. कलावंत निवडीतील अचूकपणा हे या चित्रपटाचं बलस्थान आहे.. गदिमांचं रसाळ काव्य त्यातल्या गाण्यांना गौरीशंकराची उंची देत राहतं, तर सीमाताईंचा अभिनय हृदयाची तार छेडतो...

*बाळ गुराखी यमुनेवरचा, गुलाम काळा संता घरचा -२*
*हाच की त्याचा विठ्ठल आणि,*
*दासाचा श्रीराम, दासाचा श्रीराम*
*विकत घेतला श्याम, बाई मी विकत घेतला श्याम..*

गाण्याची चाल मुळात बैठकीच्या लावणीसदृश असली तरी गदिमांच्या आशयघन काव्याला बाबुजींनी इथे जी ट्रीटमेंट दिलीय त्यामुळे ती चक्क भक्तिरसाने ओथंबणारी वाटत राहते. तिच्यासोबत 'तो' आहे. त्याचा सहभाग दाखवण्यासाठी त्याच्या तोंडी आलाप दिले आहेत. आशाताईंच्या आवाजाला बाबुजींच्या आलापाची साथ असल्यानेच की काय काव्यातला अर्थ आणखीनच गहिरा होतो. दोन कडव्यातली सरळ-साधी चाल शेवटच्या कडव्यात मात्र वेगळं वळण घेते...

*जितके मालक तितकी नावे - २*
*हृदये तितकी, याची गावे*
*कुणी न ओळखी, तरीही याला*
*दीन अनाथ अनाम दीनानाथ अनाम*
*विकत घेतला श्याम, बाई मी विकत घेतला श्याम*

♥

आपल्या आवडीचं सर्वांगसुंदर गाणं म्हणता ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटातील गाण्यांची 'यू-ट्युब' लिंक :

०१. विकत घेतला श्याम.. (ऑडिओ) https://youtu.be/jeKYYTQ8L28

०२. विकत घेतला श्याम.. (व्हिडिओ) https://youtu.be/cI7_7ntHgu8

०३. विकत घेतला श्याम.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/jeKYYTQ8L28

०४. विकत घेतला श्याम.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/OOSmGrPNV1I

०५. 'जगाच्या पाठीवर' (१९६०) (चित्रपट गीते) https://youtu.be/xxT0PaeKAfk

♥

०६. आशा भोसले (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/tAxfLcrtOP0

०७. आशा भोसले (मराठी)(विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/J5CFFXgRwX0

०८. सुधीर फडके (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/3KOwiWDLZos

०९. सुधीर फडके (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/uYAz-safsbI

१०. मराठी (क्लासिक सुपरहिटस् - १) : https://youtu.be/-ceyEAuKIbg

११. मराठी (क्लासिक सुपरहिटस् - २) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLD_7Loqe1ChfgjJtotq7kwEDnh1nimzpx

१२. सुधीर फडके (टॉप मराठी साँगस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLQ-s1vIRDL691QoXYX22tetvtPY7KYdDI

♥

## २२ : विकत घेतला श्याम..

चित्रपट : जगाच्या पाठीवर (१९६१)
दिग्दर्शक : राजा परांजपे
गायिका : आशा भोसले-सुधीर फडके
गीतकार : ग. दि. माडगुळकर
संगीतकार : सुधीर फडके

नाही खर्चली कवडी दमडी
नाही वेचला दाम आऽऽ
विकत घेतला श्याम, बाई मी
विकत घेतला श्याम

कुणी म्हणे ही, असेल चोरी, कुणा वाटते असे उधारी - २
जन्मभरीच्या श्वासाइतुके,
जोजियले हरिनाम, जोजियले हरिनाम,
विकत घेतला श्याम, बाई मी
विकत घेतला श्याम

बाळ गुराखी यमुनेवरचा, गुलाम काळा संताघरचा -२
हाच की त्याचा विठ्ठल आणि,
दासाचा श्रीराम, दासाचा श्रीराम
विकत घेतला श्याम, बाई मी
विकत घेतला श्याम

जितके मालक तितकी नावे - २
हृदये तितकी, याची गावे
कुणी न ओळखी, तरीही याला
दीन अनाथ अनाम, दीनानाथ अनाम
विकत घेतला श्याम, बाई मी
विकत घेतला श्याम

♥

आपल्यासाठी काही श्रवणीय आणि संग्राह्य गाण्यांच्या व अल्बम्सच्या 'यू-ट्युब' लिंक्स. ऐका व डाऊनलोड करा :

०१. गदिमा व सुधीर फडके (संपूर्ण गीत रामायण)(ऑडिओ):

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97VroSHsdZ5scoyMsOx-ICa

०२. महाकवी गदिमा हिटस् (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLB159aHq3qujKWROH7SgARxEyKmuWg1A2

०३. महाकवी गदिमा (डॉक्युमेंटरी) : https://youtu.be/jJLl1QPvsWs

♥

## 23 : Apne Pe Bharosa hai to..

## २३ : अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..

आपल्या मोटारीवर लाल दिवा लागावा म्हणून बरीच मंडळी कित्ती कित्ती त्याग करतात. धडपड धडपड धडपडतात. बऱ्याच खटाटोपानंतर लाल दिवा मिळताच मग मात्र खजिना गवसल्याचं बाळसं त्यांच्या चेहऱ्यावरच्या प्रत्येक रेषेत दिसू लागतं. रेकॉर्डिंग स्टुडिओतल्या लाल दिव्याचं मात्र वेगळं गणित असतं राजा. आज ध्वनिमुद्रण तंत्रानं एवढी प्रगती केलीय खरी, पण इथला हा लाल दिवा लागल्यानंतर माईकवर गायला उभं राहताच भल्याभल्यांना घाम फुटताना मी प्रत्यक्ष पाहिलंय. आता जमाना आहे तो इलेक्ट्रॉनिक म्युझिकचा. हल्ली संगणकावर की-बोर्डच्या मदतीनं संपूर्ण गाण्याचं प्रोग्रॅमिंग केलं जातं. हे प्रोग्रॅमिंग नंतर स्टुडिओतल्या संगणकीय रेकॉर्डरवर बाऊन्स केलं जातं. त्या तयार फ्रेमवर लावलेल्या कॅनव्हासवर ठिपक्यांचा माग काढत जसे रंग भरावेत तसं त्यावर ऱ्हिदम आणि म्युझिक भरलं जातं.. नंतर आपल्या आणि इतरांच्या प्रोफेशनल सवडीनुसार गायक महाशय येतात. ते गाणं आपल्या आवाजात त्या ट्रॅकवर तुकड्या-तुकड्यांनी गात, कट-पेस्ट करत, कमी कष्टात डब करतात. तयारीच्या गायकांसाठी हे सोपं काम पण नवागत किंवा कुणी वशिल्याचा तट्टू आला की दोनेक रीटेक्स नंतर त्याची पिवळी झालेली आम्ही पाहिलीय.

१९५०साली तर रेकॉर्डिंगचं तंत्र एवढं विकसित झालं नव्हतं. ऱ्हिदम-म्युझिक-गायक एकसाथ असा मामला. मोजकेच माईक्स! संगीतकाराचे सहाय्यक एकेक आघाडी सांभाळायचे. ऱ्हिदम-सेक्शन, स्ट्रोक्स, व्हायोलिनचा ताफा इ. इ. तगडी रिहर्सल झाल्यानंतरच गाणं टेक केलं जाई. चुकलं की पुन्हा पहिल्यापासून. रिहर्सल्समध्येच गायक थकून जाऊ नये म्हणून त्याला फ्लोअरवर बोलावण्याआधी त्याचा भाग सॉंग-व्हायोलिनवर वाजवला जाई. अपेक्षित असलेल्या किंवा तो घेणार असलेल्या ताना हरकतींसकट गाणं वाजवून त्यावर रिहर्सल्स सुरु होत. संगीताचा मेळ बसवणं हे खायचं काम नाही. कधी हा वादक चुकायचा तर कधी तो. चला.. रीटेक! संगीतकार खूपच चिडचिडे व्हायचे या प्रकारांमुळे. हा राग ते हमखास आपल्या सहाय्यकांवर काढायचे. आलेला गायक आधी आपलं गाणं कसं होणार या टेन्शनमध्ये असायचेच, वर हा गुस्सा! वड्याचं तेल वांग्यावर तर नाही ना काढणार? रेकॉर्डिंगचा लाल दिवा लागला की सगळेच जण प्रचंड तणावाखाली. स्टुडिओत गुरुदत्त त्या दिवशी एका नव्या मुलीचं भांबावणं असंच एन्जॉय करत होता. कसलं भयंकर वातावरण! गंभीर चेहऱ्याचे संगीतकार (सचिनदा). आपल्या शायरीला न्याय मिळतोय की नाही अशा चिंतेत कविराज. वादकांचा एवढा मोठा ताफा असल्याने फुक्कट बजेट वाढणार म्हणून प्रोड्युसर परेशान. वादकांमध्ये आपापली वाद्ये ट्यून करण्याची अहमहमिका लागलेली. त्यांची लटपट-खटपट बघत 'ती' बिचारी भांबावल्यासारखी पदराच्या टोकाशी चाळा करत कोपऱ्यातल्या खुर्चीत विसावलेली. ती अगदीच नवखी गायिका नव्हती. रियाजी गळा होता तिचा. तिच्या आवाजातला गोडवा सर्वप्रथम जाणवला होता तो गुणी संगीतकार हनुमान प्रसादजींना. त्यांनीच तिला पहिल्यांदा संधी दिलेली. त्यानंतर तिची जानपहचान झाली ती सचिन देव बर्मनसाहेबांबरोबर. सचिनदांनी त्या मुलीला गाणं व्यवस्थित शिकवलं होतं, पण नवी गायिका आहे. काय होणार कुणास ठाऊक?.. ती काव्याबावऱ्या नजरेने इकडे तिकडे पाहत होती. स्वरलिपीची घोकंपट्टी करीत हिंडणारा अरेंजर आणि 'चाय मंगाऊँ क्या मॅडम?' असं उगीचच वारंवार विचारणारा प्रोड्युसरचा चमचा, तिच्या भांबावण्यात अधिकच भर घालत होता. गुरुदत्त बसल्या जागेवरून 'तिला' न्याहाळत होता. का कोण जाणे.. तिच्याकडे पुनःपुन्हा पहावंसं वाटत होतं त्याला. जणू चुंबकीय आकर्षण! 'मॅग्नेटिक अट्रॅक्शन' किंवा 'फॅटल अट्रॅक्शन'! लाल दिवा लागला. 'टेक' रेडी! ती म्युझिक-हॉलमध्ये गेली. सगळे वादक तयारीतच होते. गिटारचे पीसेस वाजले. दोनेक रिहर्सल्सनंतर अरेंजरने वन-टू देताच गीता रॉय आपल्या मधाळ आवाजात अगदी आत्मविश्वासाने गाऊ लागली...

*तदबीर से बिगडी हुई तकदीर बना ले.. तकदीर बना ले..*
*अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले.. लगा ले.. दाव लगा ले*

गुरुदत्त तिच्यासाठी पागल झाला. एखाद्या नुकतीच मिसरूड फुटलेल्या कॉलेजकुमारासारखा. थोड्याच दिवसात गीता रॉय - गीता दत्त झाली. गायिका गीता दत्तचं नाव उच्चारताक्षणी आठवणींचं मोहोळ उठावं तशी अनेक गाण्यांची याद ताजा होते. जीव कासाविस करते. जुगारात बाजी हरलेल्या देव आनंदला पुन्हा नव्या दमानं डाव खेळण्याची प्रेरणा मिळावी म्हणून त्या अड्ड्यावर नर्तकी असलेली नायिका गीता बाली म्हणते..

*डरता है जमाने की, निगाहोंसे भला क्यों?- २*

*इन्साफ तेरे साथ है, इल्जाम उठा ले, इल्जाम उठा ले,*
*अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..*

काय होते ते दिवस! छोट्या ट्रान्झिस्टरवर 'बेला के फूल'वर मस्त गाणी ऐकत डोळा कधी लागायचा समजायचंच नाही. गीता रॉयचं हे गाणं पहिल्यांदा ऐकलं ते रेडिओवरच. त्याकाळी तदबीर, तकदीर या दोन शब्दांचे अर्थ थोडेच आम्हा मुलांच्या बथ्थड डोक्याने शोधले होते? आम्हाला फुरसद, फुरकत एकच वाटायचं. 'एक अकेला इस शहर में..' या गाण्यात तर तो गायक 'आब-दाना ढुंढता है' म्हणतोय की 'साबुदाणा' इतकं कन्फ्युजन असायचं उर्दूविषयी. या गाण्याबाबतीत बोलायचं तर, लक्षात होता तो केवळ गीताचा नशिला आवाज आणि बर्मनदांचं संगीत.

काही वर्षांपूर्वी 'सेन्सॉर' चित्रपटाची सगळी गाणी आमच्या स्टुडिओत झाली होती तेव्हा आपला हा लाडका देव आनंद अस्मादिकांना जवळून पहायला मिळाला. संगीतकार जतिन-ललितच्या टीममध्ये जुन्या दिग्गज वादकांची मांदियाळी असल्याने स्वारी खुश असायची. संगीताचा सुवर्णकाळ पाहिलेले बुजुर्ग वादक त्यांना एखादं गाणं किंवा अमुक प्रसंगाची आठवण करून देत. ते बोलू लागत. मलाही त्यांच्याशी गप्पा मारायला मिळाल्या, हे नशीब! गुरूदत्तचं नाव घेताच देवसाहेब त्यांच्या प्रभातमधल्या पहिल्या भेटीच्या आठवणीत रमले होते. धोब्याने कपडे बदलून टाकलेले. कपड्यांवरून त्याचा मालक शोधता-शोधता दोघे रूबरू भेटले होते. गुरूदत्त या त्याच्या नावावरून लोक त्याला बंगालीबाबूच समजायचे. देवसाहेबांना बंगालीच वाटला होता तो. गुरूदत्त शिवशंकर पडुकोण असं पूर्ण नाव सांगून आपण मंगलोरचे सारस्वत ब्राह्मण आहोत असं सांगताच देव ठेवणीतलं हसला होता. गुरू तेव्हा प्रभातमध्ये डान्समास्टर आणि सहाय्यक दिग्दर्शकाचं काम पहायचा. देवशी त्याचा लगेच दोस्ताना झाला. फुरसदीच्या क्षणी कट्ट्यावर गप्पा रंगू लागल्या. महत्त्वाकांक्षेचे इमले रचले जायचे. दोघांपैकी जो कोणी फिल्म बनवेल त्याने दुसऱ्याला ब्रेक द्यायचा अशा आणाभाकाही याच कट्ट्यावर घेतल्या. देव आनंदने 'हम एक है'द्वारे पदार्पण केलं.. आठेक पिक्चरमध्ये अभिनय करून हातात पैसे खुळखुळू लागताच त्या दिवसात देव आनंदने आपलं स्वतःचं 'नवकेतन' बॅनर सुरु केलं होतं. पहिला सिनेमा आपटला. नंतर बलराज सहानींची एक चांगली स्क्रीप्ट हातात पडताच चेतन आनंदला निर्माता म्हणून सूत्रे सांभाळायला दिली. दिग्दर्शनाची जबाबदारी आपल्या दोस्तावर-गुरूदत्तवर टाकली. देव हीरो.. संगीत सचिनदेव बर्मन! 'बाजी' (१९५१)! गुरूदत्तचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट. सिनेमा गाजला. देव आनंद, गीता बाली, कल्पना कार्तिक, जॉनी वॉकर, संगीतकार सचिनदा, दिग्दर्शक गुरूदत्त सगळेच चमकले...

*ऐ.. टूटे हुए पतवार है, कश्ती के तो हम क्या, कश्ती के तो हम क्या,*
*हाँ, दी हुई बाहों को ही, पतवार बना ले, पतवार बना ले..*
*अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..*

गीताचा आवाज टिपिकल बंगाली होता. रसगुल्ल्यासारखी मिट्ठास! या गाण्याचा जो बाज आहे अगदी तसा. गहिरी नशा. क्लब-डान्सरची उत्तेजक गाणी सचिनदांनी तिच्याकडूनच गाऊन घेतली याचं हेच कारण असावं. पुढे ओपींकडे हा आवाज आणखीनच बहरला. नखरेल चंचलता, आव्हान देणारी अदा, यौवन आणि शराबी रसायन ठासून भरलेला मदभरा आवाज. लतापेक्षा पूर्ण टोकाचा. दोघीही खरंतर एकाच वेळी या क्षितिजावर उगवलेल्या, पण गीता मॅच्युअर्ड वाटत राहते तर लताच्या आवाजाचं वय आजतागायत वाढलेलंच नाही. गीता पूर्ण उमललेलं फूल तर लता रेशमाच्या लडीत गुंडाळलेली बकुळीची कळी. शमशाद बेगम. नूरजहाँ, सुरैया, राजकुमारी अशांचे आवाज पहा कसे पोक्त बायकांचे, तर लताच्या आगमनानंतर उगवलेल्या आवाजांपैकी सुमन कल्याणपूर, सुधा मल्होत्रा, अनुराधा पौडवाल अक्षरशः लताच्याच पठडीतले. सौम्य! या प्रभावळीत गीताचा आवाज म्हणजे अजब रसायन होतं. खणखणीत! आशाकडे अष्टपैलूत्व होतं तर शमशादला ढाल्या आवाजाची देणगी मिळालेली. गीताकडे या दोघांकडचं थोडं-थोडं लक्षण दिसत होतं. संगीतकारांनी तिच्या या गुणालाच अधोरेखित करत मस्ती और नशेसे भरपूर अशी गाणी पेश केली. गीता दत्तची मेरा नाम चिंचिंचू (हावडा-ब्रिज), हूँ अभी मैं जवाँ..(आरपार), ऐ दिल मुझे बता दे..(भाई भाई), जाने क्या तूने कही.. (प्यासा), बाबुजी धीरे चलना.. (आरपार) अशी कित्येक गाणी आजही आपल्या ओठावर आहेत.

'अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..' असं आव्हानात्मक भाष्य करणारी गीता आयुष्याचा डाव मात्र पूर्णपणे हरली. यशापयशाच्या हिंदोळ्यांवर गोते खाणाऱ्या गुरूदत्तच्या कारकीर्दीमुळे तिचं गाणं पूर्ण झाकोळून गेलं. याच काळात संगीत आणि गायन क्षेत्रात राजकारणाची ठिणगी पडली होती असं म्हणतात. कदाचित यामुळे गीता दत्त नेहमी परेशान असायची. बरं घरचा सपोर्ट तरी मिळावा? आपण शूटिंग आटोपून परतल्यावर बाईसाहेब रेकॉर्डिंगला फलाण्या स्टुडिओत गेल्यात हा निरोप पचवायची ताकद गुरूदत्तमध्ये नव्हती. राज कपूरला तोडीस तोड, समांतर असं त्याचं वेगळं कलासक्त व्यक्तिमत्त्व 'प्यासा' (१९५७) तसेच 'कागज

के फूल'(१९५९) मध्ये जाणवलं. 'बाजी', 'जाल', 'आरपार', 'सी.आय.डी', 'मिस्टर ॲन्ड मिसेस ५५' वेगवेगळ्या पठडीतले होते पण ज्यावर जिवापाड मेहनत घेऊन आपलं ड्रीम-प्रोजेक्ट म्हणून सादर केला तो 'कागज के फूल' दणक्यात आपटला. या अपयशानं तो पूर्णपणे खचला. तत्कालीन राष्ट्रपती राधाकृष्णनजींच्या उपस्थितीत साजऱ्या झालेल्या दिल्लीतल्या प्रिमियरला, लोकांनी पडद्यावर चक्क चपला फेकून मारल्या. राष्ट्रपतींनी वॉक-आऊटही केला. भारतीय चित्रपट इतिहासातल्या आपल्या या पहिल्या-वहिल्या सिनेमास्कोप चित्रपटाचं लोकांनी हे असं स्वागत केलं हा धक्का गुरूदत्तसाठी असह्य होता. तो अपमान सहन करण्याइतकं सामर्थ्य हळव्या गुरूदत्तकडे नव्हतं. आपली ही मानहानी त्याने मद्याच्या पेल्यात बुडवली. कुठलाही कलावंत हा अतिशय हळवा असतो. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक संकटं प्रत्येकालाच येत असतात. ती पचवायची ताकद मात्र प्रत्येकामध्ये असतेच असं नाही. अशा वेळी निदान कुटुंबातल्या माणसांनी तरी त्याच्यामागे खंबीरपणे उभं रहावं लागतं. इथे प्रकार वेगळाच होता. गीता दत्त आपल्या प्राप्त परिस्थितीने परेशान तर गुरूदत्त दारूच्या पेल्यात आकंठ बुडालेला. एव्हाना गीता दत्तही दारूला कवटाळून बसली होती. 'चौदहवी का चाँद'चं यश त्याला सावरू शकलं नाही किंवा 'साहब बिवी और गुलाम'ची यशोपताका तो डोलारा सांभाळू शकली नाही. हौसला बुलंद करतील असे हातच जवळपास नव्हते. तंटे-बखेडे होऊ लागले. गीताने त्या विमनस्क अवस्थेत पाली हिलचा बंगला विकायला लावून स्वतः सांताक्रुझच्या एका फ्लॅटमध्ये मुलांसह रहायला गेली. 'ते तसे तर मी अशी..'! गुरू पूर्णपणे एकटा झाला. दारू होतीच, आता तर तो निद्रानाशावर जालीम उपाय म्हणून झोपेच्या गोळ्यांच्या व्यसनात गुरफटला. बुरा वक्त था! कधीकधी गीता आणि मुलांची खूप आठवण यायची. मन त्यांच्याकडे ओढ घ्यायचं पण गीता सर्वच पाश तोडले असावेत अशी वागत होती. बिचारा गुरूदत्त कामात आपलं मन गुंतावं म्हणून हातपाय मारत होता. पेडर रोडच्या आपल्या फ्लॅटमध्ये कथालेखक अब्रार अल्वींसोबत 'बहारे फिर भी आयेंगी'च्या जुळवाजुळवीत तो गुंतला होता. माला सिन्हा, धर्मेंद्र, तनुजा, रेहमान, जॉनी वॉकर असे स्टार्स. दिग्दर्शनाची माळ त्याने शहीद लतीफ या आपल्या दोस्ताच्या गळ्यात घातली होती. ओपीजींकडे संगीताची जबाबदारी सोपवली. 'बहारे फिर भी आयेंगी' या चित्रपटामुळे आपल्या जीवनात पुन्हा एकदा बहार येणार अशी आशा त्याने बाळगली होती.. पण हे पहायला गीता आणि मुलं कुठायत? त्यांच्याशिवाय आपण अधुरे आहोत. मनात काहूर माजलं. मन त्यांच्याकडे ओढ घेऊ लागलं. शेजारच्या नायडूंकडे जाऊन थेट गीतालाच फोन लावला.. 'गीता.. तू ये.. मुलांना पाठव..' म्हणून विनवलं. चिडून नन्नाचा पाढा वाचत गीताने फोन आदळला. गुरूदत्त फ्लॅटमध्ये परतला तो खांदे पाडूनच. अब्रार अल्वी 'ख़ुदा हाफ़िज़' करत निरोप घेऊन निघताच गुरूने फ्लॅटचा दरवाजा बंद केला तो कायमसाठीच. दुसऱ्या दिवशी तो तोडूनच उघडावा लागला. भिरभिरत्या पंख्याखाली गुरूदत्तचा मृतदेह. स्क्रीप्टची पानं इतस्ततः विखुरलेली. ग्लासमध्ये दारू तशीच तर झोपेच्या गोळ्यांच्या अतिसेवनाने पहाटे त्याची प्राणज्योत मालवलेली. गीता गुरूदत्तच्या मृत्यूने आणखी खचली. पुढे आठेक वर्षे जगली खरी पण ते जगणं उमेदीचं नव्हतं. १९७१च्या 'अनुभव' या चित्रपटात दोनेक गाणी मिळाली. हा तिचा नवा डाव मांडण्याचा प्रयत्न मात्र वांझोटा ठरला. आवाजातली नशा केव्हाच संपली होती. आपण एका नशिल्या आवाजाला आणि गुरूदत्तसारख्या कलासक्त दिग्दर्शकाला मुकला होतो. 'अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..' अशी प्रेरणा देणाऱ्यानेच पाठ फिरवली तर.. आयुष्य हे असं उद्ध्वस्त होतं...

*क्या ख़ाक वो जीना है जो अपनेही लिए हो, अपनेही लिए हो,*
*ख़ुद मिट्टी किसी और को मिटनेसे बचा ले, मिटनेसे बचा ले..*
*अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..*

♥

या सर्वांगसुंदर गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

| | |
|---|---|
| १. अपने पे भरोसा है तो.. (ऑडिओ) | https://youtu.be/6kuSZQI6sIk |
| २. अपने पे भरोसा है तो.. (व्हिडिओ) | https://youtu.be/J6cfWroNcNY |
| ३. अपने पे भरोसा है तो.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/rbjEYNOdPzg |
| ४. **'बाजी'** (१९५१)(संपूर्ण चित्रपट) | https://youtu.be/x-kBoQjEDik |
| ५. गीता दत्त (५० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/KsMrpO0YuxY |

♥

## २३ : अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..

चित्रपट - बाजी (१९५१)
निर्माता - नवकेतन (चेतन आनंद)
दिग्दर्शक - गुरुदत्त
गायक - गीता रॉय
गीतकार - साहीर लुधियानवी
संगीत - सचिन देव बर्मन

तदबीर से बिगडी हुई तकदीर बना ले.. तकदीर बना ले..
अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले.. लगा ले, दाव लगा ले

डरता है जमाने की निगाहोंसे भला क्यों ? निगाहोंसे भला क्यों ?- २
इन्साफ तेरे साथ है, इल्जाम उठा ले, इल्जाम उठा लेऽऽ
अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..

ऐ.. टूटे हुए पतवार है, कश्ती के तो हम क्या, कश्ती के तो हम क्या-२
हाँ, दी हुआी बाहों को ही, पतवार बना ले, पतवार बना ले..
अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..

क्या ख़ाक वो जीना है जो अपनेही लिए हो, अपनेही लिए हो-२
ख़ुद मिट्टी किसी और को मिटनेसे बचा ले, मिटनेसे बचा ले..
अपने पे भरोसा है तो ये दाव लगा ले..लगा ले दाव लगा ले..

♥

गीता दत्त यांनी काही मराठी गाणीही गायलीत. कौतुक म्हणून त्या सर्व गाण्यांच्या 'ऑडिओ'च्या 'यू-ट्युब' लिंक देतोय.

१. गणपती बाप्पा मोरया.. (ऑडिओ) https://youtu.be/lkM8_1hQDxo

२. जा सांग लक्ष्मणा सांग.. (ऑडिओ) https://youtu.be/bUWAKoz6Ly0

३. मुक्या मनाचे बोल.. (ऑडिओ) https://youtu.be/1n5Kesno_ys

४. जय मार्तण्ड जय मल्हार.. (ऑडिओ) https://youtu.be/kCxVrife8i0

♥

## 24 : Khai Ke Paan Banaras Wala..

## २४ : खाई के पान बनारस वाला...

*अरे भंग का रंग जमा हो चकाचक*
*फिरे लो पान चबाएऽऽ*
*अरे ऐसा झटका, लगे जियापे*
*पूनर-जनम होई जाए!*
*ओ खाई के पान बनारस वाला ऽऽ*

'साहब, अस्सलाम वालेकुम..नमस्ते.. मेरे को थोडे ख्रिश्चन लोगों के नाम बताएंगे क्या?' एक मुस्लिम माणूस. बहुदा कारीगर असावा. पण हा ख्रिश्चन नावं का विचारतोय बुवा? रामानंद चक्रावला. ख्रिश्चन 'पोर्क' खातात म्हणून मुस्लिम त्यांची नफरत करतात, त्यांच्याकडे जाणंच काय, त्यांच्या हातचं पाणीही पीत नाहीत म्हणतात. 'अरे रमेश.. देख ये क्या बोल रहा है..' म्हणत रामानंदने मुसीबत टाल दी. 'साब मेरेकू अर्जंट है.. तीस-चालीस ख्रिश्चन नाम चाहिए, मैं पेंटर हूँ.. उधर शूटिंग चल रहेला है ना, उधरीच पेंट करने है.. मुस्लिम, मराठी नाम होते तो प्रॉब्लेम नही था.. मेरेकू जॉन, पीटर ऐसे दो-तीन नामही मालूम है साब.. प्लीज..' रमेशने त्याचा प्रॉब्लेम झटक्यात सॉल्व्ह केला. टेबलाचा ड्रॉवर उघडला, लिस्ट काढली आणि एकेक नाव स्पेलिंगसकट सांगू लागला. जॉन डिसोझा, मायकेल फर्नांडिस इ. इ.. कारीगर बहोत खुश हुआ. मेहबूबला रेकॉर्डींग असलं की मजा यायची. एकतर तिथला निसर्गरम्य माहौल. वांद्रे! पण गजबजाटापासून दूर. शांत, निवांत वातावरण. तिथं फिल्म शूटिंगही व्हायची हा बोनसच. मोठमोठे कलाकार यायचे. स्टुडिओच्या प्रांगणात शूटिंग आणि तिथल्याच एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावर रेकॉर्डींग थिएटर. रेकॉर्डींगच्या जुन्या मशिन्स पण रीझल्ट अमेझिंग. मोठा म्युझिक हॉल असल्याने खूप वादक असले ना तरी नो-प्रॉब्लेम! चाळीस व्हायोलिन, चेलो, व्हीओलाचा ताफा, ट्रम्पेटवाला ब्रास ग्रुप, शहनाई-क्लॅरोनेटचं टूटी सेक्शन, मेंडोलिन-गिटारचं स्ट्रोक्स सेक्शन, कोरस, मोठ्ठा रिदम ग्रूप.. सबकुछ एकत्र. वादकांमध्ये अखंड भारताचं प्रतिबिंब. गोव्याच्या ख्रिश्चनांची व्हायोलिन-ब्रास सेक्शनवरची मक्तेदारी, ऱ्हिदम-मेलडी हा मराठ्यांचा गड, टूटी-स्ट्रोक्स हा मुस्लिम बांधवाचा इलाका, तर इतर वाद्यांवर प्रत्येक प्रांतातला एकेक प्रतिनिधी असायचाच. मेरा भारत महान!! रेकॉर्डींग सर्वच एन्जॉय करायचे. नेहमीप्रमाणे रेकॉर्डींग सुरू होतं. खाली 'जंजीर-दीवार'मुळे नावारूपाला आलेल्या अमिताभच्या पिक्चरचं शूटिंग आहे, झीनत-प्राणसाहेबही आहेत अशी कुणकुण लागताच ब्रेक कधी होणार म्हणून सर्वजण चुळबुळ करत घड्याळ पहायला लागले.

'डॉन'(१९७८) पाहिलाच असेल. चंद्रा बारोटचा अमिताभ-झीनत अभिनित 'डॉन'! आता तुम्ही म्हणाल 'खई के पान बनारस वाला..' या गाण्याचा इथे काय संबंध? त्या गाण्यात अमिताभ-झीनत आहे. त्यात प्राण कुठाय? आणि हे गाणं तर महालक्ष्मी पुलाखालच्या धोबीघाटावर शूट झालेलं, हे सर्वांनाच माहीत आहे. पण त्याचा हा वेगळा असा किस्सा नाहीय. खरी धम्माल घडली होती ती इथे मेहबूबमध्ये!.. इथे याच चित्रपटाचा क्लायमॅक्स शूट होत होता त्याची ही स्टोरी.. काही चमचमीत खाल्ल्यावर आपण तांबुलसेवन करतोच ना म्हणून या स्टोरीबरोबर तोंडी लावायला हे बनारसी पान आहे इतकंच! इथले लोक भांग न पिताही भलत्याच चक्करमध्ये कसे पडले म्हणून इ गानेका भी थोडा मजा लेते है भय्या!.. थोडक्यात सांगायचं तर तिकडे रेकॉर्डींग सुरूच आहे ना म्हणून (नॉन-)कमर्शियल ब्रेक! 'क्षणभर विश्रांती'!!

*अरे रामदुहाई, कैसे चक्कर में पड गया, हायऽऽ हायऽऽ हायऽऽ!*
*कहाँ जान फंसाईऽऽ मैं तो सूली पे चढ गया, हायऽऽ हायऽऽ!*
*कैसा सीधा-साधा, मैं कैसा भोला-भालाऽऽ - २ (हां हां)*
*जाने कौन घडी में पड गया, पढे-लिखो से पाला,*
*मीठी छुरी से-२, हुआ हलालऽऽ !*
*छोरा गंगा किनारेवाला ऽऽ २*
*ओ खाई के पान बनारसवालाऽऽ*

क्लायमॅक्सचं हे शूटिंग सुरू असतानाच इकडे रेकॉर्डींगचा ब्रेक झाला. झालं! मग काय विचारता? शाळा सुटल्यावर पोरं धावतात, तशी वादक मंडळी खाली धावतच आली. प्राण, झीनत आणि अमिताभ चार-पाच गुंडांसह फाईट-सीन देत होते. टेक-

रीटेक्स!.. अमिताभला बघण्यात एवढा इंटरेस्ट नव्हता, लोक झीनतच्या उड्या चवीनं पाहत होते. थोड्या वेळाने त्यांचा लंच-ब्रेक झाला. आता चान्स आहे म्हणता सर्व म्युझिशियन्स तिथल्या प्रॉडक्शन मॅनेजरची परवानगी घेऊन सेट बघायला आत शिरले. स्मशानाचा सेट लावलेला. ख्रिश्चनांची स्मशानभूमी! क्रॉस, थडगी, फुलं.. सगळं कसं खरंखुरं वाटावं इतकं झकास! रंगावली प्रदर्शन पहावं इतक्या उत्सुकतेनं मंडळी फिरत होती. कौतुक करत होती, इतक्यात मार्टिन किंचाळला.. 'अरे ये देख, इधर मेरा नाम लिखा है.. देख..' 'दुनिया में तू ही एक मार्टिन है क्या?.. सठीया गया रे तू..' अब्दुलचाचा म्हणाला.. 'अरे नही यार..इधर बाजूमें लेविन, केनेथ डिकोस्टाका भी नाम है.. उधर रॉबर्ट फर्नांडिस.. क्या यार? ये कैसा हुआ रहेगा? जीते जी मार डाला इन लोगोने, इनकी तो मा...' सर्वच चक्रावले. चौकसपणे तपासून पाहिलं तर खरंच. नेविल, रॉबर्ट, रॉकी, जॅकी सगळ्याच व्हायोलिनवादकांची नावं आडनावांसकट जशीच्या तशी एकेका थडग्यावर लिहिलेली होती. ताजी फुलं वाहिलेली होती. बुजुर्ग रॉक गोन्सालविस वैतागलेच.. 'व्हॉट इज धीस नॉन्सेन्स? कौन मजाक किया रहेंगा? हमेरा नाम किसने इनकू दिया ये पैले देखो..' सगळी वरात आता रेकॉर्डिंगचे मॅसेंजर रामानंदकडे. बोंबाबोंब! त्याच्या चमच्यांनी त्याला खबर दिलेलीच. तो पळण्याच्याच बेतात होता. पण वादकांनी त्याला कोंडीत पकडला. चिडलेल्या म्युझिशियन्सना पाहून तो फेंदारलाच. हे झालंच कसं? रेकॉर्डिंगसाठी येणारे वादक हे त्यांच्या असोसिएशनचे सभासद असतात. कोणता वादक नेमकं काय वाजवतो याचं 'नॉलेज' असतं ते या मॅसेंजरनाच. तेच संगीतकारांना याबाबतीत सहाय्य करतात. संगीतकारांच्या आवश्यकतेनुसार वादक बोलावतात. त्याच्याकडेच सर्वांच्या नावाची लिस्ट असते. त्यानेच प्रत्येकाला सांगावा धाडून रेकॉर्डिंगला बोलावलेलं असल्याने ते त्याचीच कॉलर पकडणार. तोच प्रत्येकाला त्यांच्या ग्रेड प्रमाणे मानधन मिळवून देतो. नुसता गोंधळ चालला होता. एरवी त्याच्याशी सॉफ्ट बोलून त्याच्या पैशाने हार्ड ड्रिंक्स पिणारेही आज त्याला चक्क फैलावर घेत होते. हमारी बिल्ली हमी से म्याव?! झाल्या प्रकाराबद्दल तो खरंच अनभिज्ञ होता. पण कुणीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्याने ड्रॉवर उघडला, लिस्ट लंपास झालीय की काय याची खातरजमा केली. व्हायोलिनवाल्यांच्या नावांपुढे पेन्सील मार्क पाहताच त्याची ट्यूब पेटली. येस! हे त्याच कारागिराचंच काम असणार. त्याने नावं मागितली आणि आम्ही ती सहज म्हणून दिली. एवढंच! त्याने त्या नावांचा असा उपयोग केला? बाप ऽऽरे !! 'शोधा रे त्याला.. किधर गया वो चु...' पेंटर आपलं काम आटोपून केव्हाच निघून गेला होता. सर्वजण चिडले होते. त्यांच्या भावना दुखावल्या होत्या. जिवंत असूनही त्यांची नावं आता चक्क थडग्यावर दिसणार? नहीऽऽ! शेवटी रॉकने पाचजणांचं शिष्टमंडळ बनवलं आणि ते शूटिंग स्पॉटवर गेले. झालेला प्रकार त्यांनी चीफ असिस्टंट डायरेक्टरच्या निदर्शनास आणून दिला. तेही त्या पेंटरच्या अश्लाघ्य वर्तनावर वैतागले. पाच मिनिटं तिथे सन्नाटा पसरला. शेवटी म्हणाले.. 'हे बघा.. झालं ते अतिशय वाईट झालं..पण अर्धं शूटिंग झाल्याने.. आय एम हेल्पलेस!.. व्हायोलिन हे वाद्य आणि त्यावर हुकुमत असणारा वादक याच्यावर मीच नाही, जगातला प्रत्येकजण विलक्षण प्रेम करतो.. वी रिस्पेक्ट यू अ लॉट.. चूक झालीय पण अनवधानाने.. मी एक नक्की करेन. हे जे शूट झालंय त्या पोर्शनच्या एडिटींगवर मी स्वतः लक्ष देईन. ही नावं पडद्यावर दिसणार नाहीत याची काळजी घेईन.. बस्स!' शेवटी काय होणार म्हणा? अमिताभ, प्राण आणि झीनत अशा स्टार्सची उपस्थिती, निर्मात्यांनी शूटींगसाठी केलेला खर्च, मेहनत पाहता ताणून धरण्यात काहीच अर्थ नव्हता. काही कायदेशीर करावं म्हणता तेही तितकंसं सोपं नव्हतं. चूक झाली होती. त्यांनी ती मान्यही केली होती. त्यांची ही चूक खिलाडू वृत्तीने स्वीकारत, दिलेल्या शब्दावर विश्वास ठेवून सर्वजण जड पावलांनी परतले. वादक मंडळी रेकॉर्डिंग थिएटरकडे वळली. तिकडे शूटिंगही सुरू झालं. 'डॉन' (१९७८)! अमिताभचा 'डॉन'! आठवला ना 'तो' सीन! क्लायमॅक्सचा फाईट सीन! खलनायक मंडळींचे पत्ते असलेली ती लाल डायरी! ती मिळवण्यासाठी झटापट. मारामारी. ख्रिश्चनांच्या स्मशानभूमीतला हा फाईट-सीन चांगलाच रंगलेला. *(या क्लायमॅक्स सीनची 'यू-ट्युब' लिंक अवश्य पहा.)*

सिनेमा कधी प्रदर्शित होणार आहे याची जास्त चिंता कुणाला असेल तर आमच्या वादकांना. मेहबूबला खूप रेकॉर्डिंग होत असतात. प्रत्येक रेकॉर्डिंगच्या वेळी याच प्रसंगाची चर्चा. शेवटी हा 'डॉन' रिलीज झाला. त्या दिवशी निर्माता टेन्शनमध्ये नसेल एवढे आमचे 'व्हायोलिन'वादक टेन्समध्ये होते. रेकॉर्डिंग्ज सोडून 'डॉन'चा पहिला-दुसरा-तिसरा मिळेल तो 'शो' बघण्यासाठी सगळे म्युझिशियन्स आवर्जून गेले होते. पिक्चरची भट्टी मस्तच जमून आलेली पण सर्वांना इंतजार होता तो क्लायमॅक्सचा. त्यांनी आपला शब्द खरंच पाळला होता. पिक्चर बघून सर्वजण खुश झाले. थडगी दिसताहेत पण त्यावरची नावं ठळकपणे स्क्रीनवर येणार नाहीत हे कटाक्षानं पाळलंय. निर्माता खुश! व्हायोलिनवालेही खुश!

'व्हायोलिन' हे वाद्य खरंच काळजाचा ठाव घेणारं. ते सोलो ऐकण्यात जितका आनंद त्याहीपेक्षा ते ग्रुपच्या आविष्कारातून काळजाचा जास्त ठाव घेतं. आपल्या संगीतकारांनी या वाद्यातली ही खुमारी आपल्या विविध गाण्यांमधुन पेश केलीय. ('गिटार' किंवा 'की-बोर्ड- पियानो' ही दोन्ही पाश्चिमात्य वाद्ये शिकायची म्हटलं तर त्याचं 'बेसिक ट्रेनिंग' घ्यायला सहा महिने पुरेत. अर्थात 'गिटार' ही 'डिफिकल्ट टू लर्न- इझी टू प्ले' या पठडीतली तर 'की-बोर्ड- पियानो' हा 'इझी टू लर्न- डिफिकल्ट टू प्ले' या

पठडीतला आहे, हे लक्षात घ्या. मी माझ्या संगीत अकादमीत ही वाद्ये शिकवतो म्हणून छातीठोकपणे सांगतोय. पण ‘व्हायोलिन’ हे वाद्य शिकणं भयंकर कठीण काम. त्याच्या वादनाचा फंडा (सर्वसामान्यपणे) लक्षात यायलाच काही वर्षे उलटतात. ‘गिटार’मध्ये जशी स्पॅनिश, बेस, इलेक्ट्रीक, हवाईन इ. प्रकार तसेच व्हायोलिनमध्येही आहेत. ‘व्हायोलिन’, ‘व्हीओला’ आणि ‘चेलो’! पुन्हा ‘व्हायोलिन-सोलो’ आणि ‘ग्रुप व्हायोलिन’ हा वेगळ्या अभ्यासाचा विषय! माझ्याकडे काही पालक, मुलाला ‘व्हायोलिन’ शिकायला किती काळ लागेल विचारतात.. ‘सुमारे बारा वर्षे लागतील..’ असं बेधडकपणे सांगतो, आणि ते शंभर टक्के सत्य आहे.) ‘व्हायोलिन’, ‘व्हीओला’ आणि ‘चेलो’चा औचित्यपूर्ण वापर करत भारतीय चित्रपटसंगीतातली गाणी अलंकृत केलेली शेकडो गाणी आहेत. बसल्या बैठकीत आठवायला गेलं तर शे-दोनशे गाण्यांची यादी सहज काढता येण्यासारखी आहे. चटकन आठवतायत आणि ती सहज उपलब्ध आहेत म्हणून सांगतो. राजकुमार (१९६४) पाहिलात? शम्मी कपूर-पृथ्वीराज-प्राण-ओमप्रकाश.. शंकर-जयकिशनच्या बेमिसाल संगीतात लतादीदींचं साधनावर चित्रित झालेलं ‘आजा, आई बहार, दिल है, बेकरार ओ मेरे, राजकुमार..’ ऐकलंच असेल. पुन्हा ऐका! ‘आप तो ऐसे न थे’ (१९८०) मधलं निदां फाजलीने लिहिलेलं उषा खन्ना (अरेंजर : किशोरजी शर्मा) यांच्या संगीतात रफीनं गायलेलं ‘तू इस तरहा से मेरी जिंदगी में शामिल है..’ तुमच्या आवडीचं आहेच. या आणि अशा गाण्यांमधला व्हायोलिन ग्रुपचा आविष्कार ऐका. पुनःपुन्हा ऐका. त्यांना म्हणावसं वाटतं.. ‘त्या मूर्ख पेंटरने तुमची नावं त्या थडग्यांवर लिहून गुस्ताखी केली असेल.. पण आम्ही तर तुमच्यासारख्या दिग्गजांची नावं आमच्या हृदयावर कोरून ठेवलीयत.. कायमची!..

♥

या सुपरहिट गाण्याची ‘ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके’ तसेच, संपूर्ण चित्रपटाची ‘यू-ट्युब’ लिंक :

१. खाई के पान बनारसवाला.. (ऑडिओ) https://youtu.be/Dp731wPQiNk

२. खाई के पान बनारसवाला.. (अमिताभ) https://youtu.be/I08ex7M5WTw

३. खाई के पान बनारसवाला.. (शाहरुख) https://youtu.be/4F4peofF5kc

४. खाई के पान बनारसवाला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/Wk0KbUWMkhA

५. ‘डॉन’ (१९७८)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/_9rOTAT6RAM

६. ‘डॉन’ (२००६)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/_UXT8e7tMI8

७. ‘डॉन’ (१९७८) (क्लायमॅक्स सीन) (व्हिडिओ) : https://youtu.be/TNlDiIb0c58

८. युगलगीते (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/e5ff83TbWR4

♥

## २४ : खाई के पान बनारस वाला...

चित्रपट - डॉन (१९७८)
दिग्दर्शक - चंद्रा बारोट
गायक - किशोरकुमार
गीतकार - अन्जान
संगीत - कल्याणजी-आनंदजी

अरे भंग का रंग जमा हो चकाचक फिरे लो पान चबाए
अरे ऐसा झटका, लगे जियापे, पूनर-जनम होई जाए!

ओ खाई के पान बनारस वाला ss - २
खुली जाए बंद अकल का ताला
फिर तो अईसा करे धमाल,
सीधी कर दे सब की चाल,
ओऽछोरा, गंगा किनारेवाला ss २
ओ खाई के पान बनारस वाला ss
खुली जाए बंद अकल का ताला

अरे रामदुहाई, कैसे चक्कर में पड गया, हायssहायssहायss!
कहाँ जान फंसाईssमैं तो सूली पे चढ गया, हायssहायss!
कैसा सीधा-साधा, मैं कैसा भोला-भालाss - २ (हां हां)
जाने कौन घडी में पड गया, पढे-लिखो से पाला,
मीठी छुरी से-२, हुआ हलालss !
छोरा गंगा किनारेवाला ss २
ओ खाई के पान बनारसवालाss

एक कन्या कुँवारी, हमरी सूरत पे मर गई, हायssहायssहायss!
एक मीठी कटारी, हमरे दिल में उतर गई, हायssहायss!
कैसी गोरी-गोरी, वो तीखी-तीखी छोरी - वाह-वाहss
कैसी गोरी-गोरी, वो तीखी-तीखी छोरी,
करके जोरा-जोरी, कर गई हमरे दिल की चोरी,
मिली छोरी तो -२, हुआ निहालs
छोरा गंगा किनारेवाला ss २
ओ खाई के पान बनारसवालाss
खुली जाए बंद अकल का ताला...

♥

## 25 : Mi Olakhun Aahe Saare..

## २५ : मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..

'बाळासाहेब आलेत!..' कानात हलकेच कुणीतरी कुजबुजलं.
'काय?!..' श्रीनिवासजी क्षणभर भिरभिरलेच..
'बाळासाहेब.. आपले बाळासाहेब-हृदयनाथजी!..' तो शक्यतो हलक्या आवाजात कुजबुजला..
'कुठायत?..'
'तिकडे.. तिकडे.. व्हीआयपी रूममध्ये बसलेत'..
'अरे, मग आत आणून बसव नं पुढच्या चांगल्या सीटवर..'

आत्ता सादर होणारं गाणं संपलं की मध्यंतर होणार म्हणून पुढची पाच मिनिटं तरी खळेसाहेब निश्चिंत होते. दीनानाथमधली ती 'श्रीनिवास खळे रजनी'! पहिल्या गाण्यापासूनच प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद आणि टाळ्यांच्या कडकडाटाने निनादणारं दीनानाथ पुढच्या दहा-पंधरा मिनिटाकरता का होईना.. शांत झालं.

मध्यंतर होताच खळेसाहेबांनी व्हीआयपी रूम गाठली. पं. हृदयनाथजी रागावलेले असावेत. निदान त्यांच्या तिथल्या फेऱ्या घालण्यावरून तरी तसं वाटत होतं. खळेसाहेब रूममध्ये प्रवेशले.
'अरे बाळऽऽ! तू आणि इकडे?..'
'का? कार्यक्रमालाही येऊ नये वाटतं?'
'अरे बाबा.. बस ना.. अगदी पहिल्या रांगेत हव्या त्या सीटवर बस!'
'कार्यक्रम बघायला नाही आलोय मी.. आर्टीस्ट आहे ना मी तुमचा? सुरेशला बोलंवलंत, देवकी आलीय, अनुराधा मराठे आणि शंकर महादेवनही आलेत, मला बोलावण्यात काही प्रॉब्लेम होता का?'
'तुला? छोटा कार्यक्रम आहे रे हा.. संकोच वाटतो तुझ्यासारख्या मोठ्या आर्टीस्टला बोलवायला..'
'ते काही नाही.. मी गाणारेय!.. इथे या कार्यक्रमात! ही पहा हार्मोनियमही आणलीय मी. शिवाजीत कार्यक्रम संपताना कळलं 'खळे रजनी' होतेय म्हणून आलोय आता.. मग? कोणती वेळ देताय?..'
'तुला कोण अडवणार बाबा! मध्यंतरानंतरचा पडदा, आता उघडेल तो तुझ्याच गाण्यानं...'

तिसरी घंटा वाजली. पडदा कर्कश आवाज करत उघडत होता. पुढच्या सीटवरच्या प्रेक्षकांमध्ये क्षणात चुळबुळ सुरू झाली. जो तो आश्चर्याने रंगमंचाकडे डोळे विस्फारून पाहत होता. आईस्क्रीम-पॉप कॉर्न-वेफर्सचे पुडे सांभाळत सीटस्कडे जाणारे रसिक जागच्या जागी थबकत होते. 'खळे रजनीत' भावसरगम? मंगलाताईंनी (खाडिलकर) हसून सर्वांचं स्वागत केलं. या कार्यक्रमात पं. हृदयनाथजी, खळेसाहेबांनी त्यांच्यासाठी संगीतबध्द केलेली गाणी पेश करणार आहेत, ही गोड बातमी लगोलग सांगितली. नाट्यगृह टाळ्यांनी दणाणून गेलं... पं. हृदयनाथजीनी, खळेसाहेबांकडे पाहत विनम्र अभिवादन केलं आणि 'सा ऽऽ..' लावला.

*लाजून हासणे अन् हासून ते पहाणे,*
*मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२*

जादूची कांडी फिरवावी तसा प्रत्येक रसिक प्रेक्षक कविश्रेष्ठ मंगेश पाडगांवकरजींच्या रोमँटिक शब्दांना दाद देत पं. हृदयनाथजींचा अलौकिक स्वर आपल्या कानात साठवत होता. पं. हृदयनाथजींना गाताना किंवा दोन गाण्यांच्यामध्ये प्रेक्षकांशी सुसंवाद साधायला आवडतं हे सर्वश्रुतच आहे. गाणं संपताच टाळ्यांची जी दाद मिळाली त्यात आपला आवाज मिसळत 'बाळासाहेब' म्हणाले.. 'आवडलं का गाणं?' प्रेक्षकातून 'होऽऽ' आणि 'वन्स-मोअर' असा चित्कार.. 'यांना (खळेसाहेबांना), माझा आवाज आवडत नाही की काय कुणास ठाऊक..' पॉज! 'दोनच गाणी केलीयत त्यांनी माझ्या आवाजात आजपर्यंत..! ईपी रेकॉर्डच्या जमान्यात!.. रेकॉर्डच्या दुसऱ्या साईडला टाकायला..' आता पं. हृदयनाथजींनी 'गेले ते दिन गेले..' गायला सुरुवात केली...

एच.एम.व्ही.त असताना खळेसाहेब वेगवेगळे गायक आणि संगीतकारांना संधी देत असत. पं. हृदयनाथजीनी लतादीदींची काही गाणी केली होती. एकदा पाडगांवकरजी आणि या दोघांच्या सहज गप्पा सुरू असताना खळेसाहेबांनी 'बाळ'ना गाणी करा म्हणून सुचवलं.. त्यांच्याच आवाजात!

'करतो ना! बोला कधी करताय?'
'मी करू म्हणतोयस?..' खळेसाहेबांच्या डोळ्यांपुढे आता पाडगांवकरांच्या एकेका कवितेचा मुखडा भिंगरीसारखा फिरत होता.
'ठीक आहे.. सोमवारी ये तू.. बसूया आपण..'
खळेंना आता एकच ध्यास लागला होता. बाळच्या आवाजात काहीतरी क्रिएटिव्ह करायचं. पाडगांवकरांनी दिलेल्या कवितांमध्ये गजलच्या मीटरमध्ये बसेल असं गीत होतं. शब्दाशब्दात रोमान्स होता. त्या काव्यातून साक्षात प्रेयसी पुढ्यात आहे अशी अनुभूती मिळत होती. खळेसाहेबांनी उत्स्फूर्तपणे ते चालीत गुंफलं. पहाडी रागाच्या अंगानं जाणारं ते भावगीत कलिजा खलास करण्यास पुरेसं होतं.

*डोळ्यास पापण्यांचा, का सांग भार व्हावा*
*मिटताच पापण्या अन् का चंद्रही दिसावा,*
*हे प्रश्न जीवघेणे, हरती जिथे शहाणे*
*मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२*

स्वतः एक प्रगल्भ प्रतिभेचा संगीतकार असूनही इगो नसलेले पं. हृदयनाथजी, सन्माननीय असलेल्या आपल्या खळेसाहेबांचं हे गाणं अगदी जीव ओतून गायलेत. आपलं गाणं, 'बाळ' गाणार म्हणून खळेंनी गाण्याला दिलेली ट्रीटमेंट प्रथमदर्शनीच भुरळ पाडणारी. मुखड्यातलीच करामत पाहिलीत? 'ला, जून हासणे अन्, हासून ते पहाणे, मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे'. 'ला' नंतर तो पॉझ कशासाठी? 'जून' या शब्दावर 'सम' येतेय म्हणून? नाही! तो छोटासा 'पॉझ' मुद्दाम दिलेला आहे. तो क्षणभराचा 'पॉझ' बरंच काही सांगून जाणारा आहे. सलज्ज नजरेतल्या भावना सांगणारा आहे..

(या गाण्याचे कविश्रेष्ठ, गायक आणि संगीतकार आपल्यासाठी अतिशय सन्माननीय. हिमालयापेक्षाही उत्तुंग असं त्यांचं कर्तृत्व. काही वर्षांपूर्वी श्री. अशोक हांडे यांनी त्याच्या 'मंगलगाणी-दंगलगाणी' या कार्यक्रमात, ध्वनिफितीत 'लाजून हासणे..' या गाण्याला 'कव्वाली सदृश' चालीत पेश केले होते. पण ते केवळ करमणूक म्हणून सादरीकरण असल्याने कुणीच मनावर घेतलं नाही. पण हे गाणं आणि पर्यायानं या दिग्गजांवर केलेली 'टीका' नुकतीच वाचनात आली. अतिशय वाईट वाटलं. मराठीतले ग़ज़लनवाज म्हणून सुप्रसिध्द असलेल्या श्री. भीमराव पांचाळेजींनी त्यांच्या 'गझलियत' या सदरात (लोकसत्ता, २ जुलै, २०१०) 'शर्म', 'लाज', 'हया' वर लिहिताना या गाण्याचं कमालीचं रसग्रहण केलं होतं. (दुसऱ्या दिवशीचा लेख 'बेशरमी'वर होता) एक कविमनाचा गायक-संगीतकार विविध गाणी तसेच शायरीवर भाष्य करतोय म्हणता त्यांचं हे सदर आपण नेहमीच आवडीनं वाचतो. या गाण्याबद्दल त्यांच्याच शब्दात सांगायचं तर '..ही लाज, शर्म, हया म्हणजे स्त्रीला निसर्गाने बहाल केलेला अनमोल दागिना. मन वेडावून टाकणारा एक विलोभनीय आविष्कार.. नजरेला नजर भिडते, नजरानजर होते न होते तोच पापण्यांची हळुहळू झुकायला सुरुवात होते आणि ती लज्जा अंगभर पसरत जाते, असे सगळे जादुई! जणू 'लाजून' या शब्दावर स्वरांची मिंड येऊन लाजेने खाली बघण्याची क्रिया स्पष्ट दिसावी.. नजरेला नजर भिडवण्याचा संकोच म्हणून नजर झुकवणे, म्हणजेच लाजणे. नजर खाली झुकलेली असेल तर मग ती काळजाच्या आरपार जाते कशी..? कसं असेल ते बघणं..?' नंतर या 'शर्म' संदर्भातला मिर्जा ग़ालिबचा शेर दिलाय.. 'शर्म से आँख मिलाते नही देख उनको, पार होती है कलेजे से निगाहें क्योंकर!' व्वा! सन्माननीय गायक, संगीतकार श्री. भीमराव पांचाळेंनी असं कौतुकानं म्हटल्याबद्दल क्षणभर आनंद वाटला. वरकरणी साखरेच्या पाकात घोळलेलं हे परिक्षण खरं परंतु मध्येच कंसात काय लिहिलंय तर.. (गाण्यात 'ला' आणि 'जून' ची ताटातूट टळली असती तर?) का लिहिलं असेल असं? का? हे कंसातलं त्यांचं विधान मला खूपच खटकलं. जिव्हारी लागलं. कवि मंगेश पाडगांवकरजी, बुजुर्ग संगीतकार खळेसाहेब आणि गायक पं. हृदयनाथजी काय खुळावलेले? तो दिलेला 'पॉझ'च या गाण्याच्या मुखड्यातलं एक अप्रतिम सौंदर्यस्थळ आहे. केवळ निमिषार्धासाठीच येणारा 'पॉझ' तो काय! पण तोच बरंच काही सांगून जातो. त्या सलज्ज युवतीचं लाजणं सांगून जातो. 'शब्दांवाचुनि कळले सारे शब्दांच्या पलिकडले..' म्हणतात ना तस्सं! या प्रतिभासंपन्न बुजुर्गांनी शब्दांची ही ताटातूट मुद्दाम केली असेल एवढं सुध्दा कळू नये? विचारांचं बुरसटलेपण म्हणतात ते हेच की काय?.. तसं पहायला गेलं तर कविकल्पना काहीही असू शकतात. अशा विचारवंत टीकाकार मंडळींना सांगावसं वाटतंय.. आमच्याकडे स्टुडिओत रेकॉर्डिंगला येणाऱ्या कव्वाल मंडळींमध्ये एखाद-दुसरा 'नग' केवळ टाईमपास करायचा म्हणून मस्ती-मजाकच्या मूडमध्ये, शायर माईल लखनवी इत्यादींच्या 'नॉन-व्हेज' शायरी म्हणायचा (वरग़लानेसे चची के, ग़र रुकी शादी मेरी... इत्यादी).. नंतर जर गायची हुक्की आलीच तर कुठल्याश्या जुन्या हिन्दी सिनेमात की काय म्हणे (की हे कव्वाल लोकांचं 'ब्रेन चाईल्ड'?) पण हमखास गायचा..'तेरी मस्त जवानी..' (पॉझ) आऽऽथूँ! (इथे चेहरा दुसरीकडे वळवत थुंकल्याचा अभिनय!) किंवा मग 'तेरी माँ का भोलासा चेहरा..'! इथे 'भोऽऽ' आणि 'लासा' मध्ये

हेतपुरस्सर ‘पॉझ’ दिला आहे!.. असे ‘पॉझ’ असलेली गाणी हिन्दी-उर्दूत चिक्कार आहेत! वाचकांनाही ती माहीत आहेत. ती गाणी मिळवा म्हणावं, तसं का केलंय ते शोधा.. आणि लिहा की त्यावर! आपल्या मराठीतल्या दिग्गजांना कशाला टारगेट करताय?.. असो!)

‘लाजून हासणे अन्, हासून ते पहाणे..’ हा मुखडा अंतऱ्यानंतर मात्र पुनःपुन्हा आळवलेला नाहीय, त्यातला छुपा गोडवा कायम रहावा म्हणून. गजलेच्या अंगानं जाणारं भावगीत म्हणून इथे पहिला आणि तिसरा अंतरा एकाच चालीत आहे. दुसऱ्या कडवं जरा खास असं आहे. खळेकाकांनी आणि हृदयनाथजींनी इथे मस्तच करामत केल्याचं जाणवतं. पाडगांवकरांचे शब्द इथे वेगळीच उंची गाठतात आणि रसिक त्यात सहज गुंतून जातो..

*हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे*
*हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे*
*तिरपा कटाक्ष भोळा २, आम्ही इथे दीवाणे*
*मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२*

पं. हृदयनाथजींच्या आवाजात पुरेपूर गोडवा आहे. प्रख्यात गायक जी.एन. जोशी, गजानन वाटवेजींपासून भावगीत-गायनाला जास्त लोकप्रियता मिळू लागली आणि उप-शास्त्रीय अशा या भावगीत-गायनाला अधिष्ठान प्राप्त झालं असं आमच्या आधीच्या पिढीतले बुजुर्ग सांगतात. पण सहज उपलब्ध व्हावेत किंवा ज्यांच्यात ‘भावगीत’ गायनाची नेमकी जातकुळी मिळावी, त्याला अनुरूप आवाज मिळावे असे मराठी पुरुष गायक साठच्या दशकात नव्हतेच की काय, असा मला स्वतःला प्रश्न पडलाय. गजानन वाटवे ते लाडके बाबूजी, अरुण दाते आणि हृदयनाथजी बस्स! एवढेच? काय कारण असेल बुवा? पं. जितेंद्र अभिषेकींनी काही अपवाद वगळता (माझे जीवनगाणे.., रंध्रात पेरली..,शब्दांवाचून कळले सारे.., इ.) तसे शास्त्रीय संगीतातच जास्त रमले. डॉ. वसंतरावजी देशपांडेजींनी बगळ्यांची माळ फुले.., वाटेवर काटे.., कुणी जाल का.. अशी काही मोजकीच गाणी गायली. सी. रामचंद्रजींची मजेदार झोपडी.., मज दुःख कशाचे नव्हते.., पहाटे पहाटे मला जाग आली.. अशी अनेक आठवतात. तत्कालीन संगीतकारांनी महेंद्र कपूर (अबोल झालीस का?, सूर तेच छेडिता..), तलत महमूद (हसले आधि कुणी तू का मी?), हेमंतकुमार (प्रीतीच्या चांदराती, ), किंवा मन्ना डे (घन घन माला..) अशा दिग्गजांकडून सादर केलेली श्रवणीय मराठी गाणी आपण मनःपूर्वक आपलीशी केली. परंतु एक प्रश्न पडलाय! आपल्या हृदयनाथजींचा आवाज का बरं मोठ्या प्रमाणात ऐकू नाही आला? खळेसाहेबांनी ‘पुढे योगच नाही आला’ असं उत्तर दिलंय. पण ही खंत बऱ्याच रसिकांच्या मनात घर करून आहे, एवढं मात्र नक्की.

*जाता समोरुनि तू, उगवे टपोर तारा,*
*दिशांतुनि फुलांच्या आणि सुगंध वारा*
*रात्रीस चांदण्यांचे, सुचते सुरेल गाणे*
*मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२*

पं. हृदयनाथजी खळेसाहेबांना आपला ‘फॅमिली म्युझिक डायरेक्टर’ म्हणतात. ‘फॅमिली डॉक्टर’ असतो ना तसा! लता, आशा, उषा आणि हृदयनाथ अशा आम्हा चारही भावंडांना खळ्यांनी अनेक गाण्यांत पेश केलंय. मग? आता काही नव्यानं करण्यात प्रॉब्लेम आहे का? नसावाच. सध्या भावगीत विश्वात आलेली मरगळ झटकण्यासाठी हा नवा फंडा नक्कीच संजीवनी देणारा ठरेल. ‘बोला खळेसाहेब, कधी बसूया आपण?...’

♥

## २५ : मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..

गायक : पं. हृदयनाथ मंगेशकर
कवि : मंगेश पाडगांवकर
संगीत : श्रीनिवास खळे

लाजून हासणे अन् हासून ते पहाणे, २
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२

डोळ्यास पापण्यांचा, का सांग भार व्हावा
मिटताच पापण्या अन् का चंद्र ही दिसावा २
हे प्रश्न जीवघेणे, हरती जिथे शहाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२

हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे
हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे
तिरपा कटाक्ष भोळा २, आम्ही इथेऽऽदीवाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२

जाता समोरूनि तू, उगवे टपोर तारा,
दिशांतुनि फुलांच्या आणि सुगंध वारा २
रात्रीस चांदण्यांचे, सुचते सुरेल गाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे..२

♥

रसिकांचं अतिशय आवडतं असं हे गाणं. ते गाणे ऐकण्याची तीव्र इच्छा झाली असेल ना? तर ही घ्या त्या गाण्याचा 'ऑडिओ, आणि कराओके ट्रॅक' तसेच श्रीनिवास खळे, पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या काही सुप्रसिद्ध गाण्यांच्या 'यू-ट्युब' लिंक :

१. मी ओळखून आहे.. (ऑडिओ) : https://youtu.be/qPagzGnhwgk

२. मी ओळखून आहे.. (कराओके): https://youtu.be/c2cUnblPIWk

३. श्रीनिवास खळे यांची १०० सुप्रसिद्ध गाणी : https://youtu.be/ylCJF3z418c

४. पं. हृदयनाथ मंगेशकर यांची काही सुप्रसिद्ध गाणी :

https://www.youtube.com/playlist?list=PLu7XRhdK0XiGwtDNM3iPmQJNhlyengH2T

♥

## 26 : O Door Ke Musafir..

## २६ : ओ दूर के मुसाफ़िर.. - महंमद रफी

*‘चले आज तुम जहाँ से, हुअी जिंदगी परायी..*
*तुम्हें मिल गया ठिकानाSS, हमें मौत भी न आयी....’*

चर्चच्या घंटानादात बेमालूमपणे मिसळणारा कोरल-व्हाईस सदृश (चर्चमधलं समुहगान) कोरसचा इफेक्ट, महंमद रफीचा आर्त स्वर इथे काळजाचं पाणी पाणी करणारा असतो. गाणं ‘उडन खटोला’ (१९५५) या फॅन्टॅसी-कथानकाच्या चित्रपटातलं असलं तरी गुरुवार, दि. ३१ जुलै १९८०च्या रात्री त्याच्या असंख्य चाहत्यांनी रफीच्या निधनाची बातमी ऐकताच नेमके हेच शब्द गुणगुणले असतील. संध्याकाळी चारच्या सुमारास रफीने लक्ष्मीकांत-प्यारेलालसाठी ‘तू कहीं आसपास है दोस्त..’ (आसपास) हे गाणं गायलं. अचानक त्याच संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास छातीत जबरदस्त कळ येण्याचं निमित्त झालं, आणि सर्वच आटोपलं. लाखो लोकांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवणारा शहेनशाह अचानक ‘एक्झीट’ घेता झाला.

*ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,*
*हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...*

‘बाबुल’च्या यशानंतर निर्माते सनीसाहेब ‘उडन खटोला’या अज्म बाजीदपुरींच्या कथानकावर चित्रपट बनविण्याचा प्रस्ताव घेऊन नौशादजींकडे आले. संगीत तर कराच पण निर्मितीमध्येही तुमचा सहभाग असूद्यात अशी गळ घातली. नौशादजींना आनंद झाला. सनीसाहेबांनी आपल्या सनी आर्ट प्रॉडक्शन्समध्ये त्यांना भागीदार केलं. दिलीपकुमार, निम्मी, सूर्यकुमारी, जीवन, टुनटुन, आगा अशी स्टारकास्ट. या चित्रपटासाठी नौशादजींनी खूपच मेहनत घेतली. ‘हमारे दिल से न जाना..’, ‘मेरा सलाम ले जा..’, ‘मोरे सैयाजी उतरेंगे पार..’, तसेच ‘ना तुफाँ से खेलो ना..’, ‘मुहब्बत की राह में चलना संभल के..’, अशा एकाहून एक सर्वांगसुंदर गाण्यांनी नटलेला..‘उडन खटोला’! थोडक्यात कथानक सांगायचं तर आपल्या विमानाच्या अपघातानंतर एक परदेशी तरूण (दिलीपकुमार) या गावात येतो. निम्मीचे वडील त्याच्यावर इलाज करतात-निम्मीशी त्याचं सूत जुळतं, इकडे तिथल्या राणीचा गावावर जुलुम. प्रेमींचं बिछडणं. राणीच्या जुल्मामुळे पाप होऊन गावावर अनिष्ट सावट येतं-पूर येतो. प्रतीकात्मक असे धर्मगुरू यासाठी उपाय सांगतात की, मुक्तीसाठी कोणाला तरी बळी जावं लागेल. कुणीच तयार होत नाही. राणीच्या जुल्मामुळे आणि नायकापासून दुरावल्यामुळे निम्मीपुढे ‘मौत’ हा एकच पर्याय असतो म्हणून ती स्वतः बळी जाण्याचं ठरवून गुरुजींकडून पुष्पहार स्वीकारते. उंच डोगर चढून जात शिखरावरून आत्म-बलिदान करण्यासाठी निम्मी निघते. चित्रपटाचा हा क्लायमॅक्स! बॅकग्राऊंडला आक्रंदन करणारा जमाव.. आणि काळीज पिळवटून टाकेल अशा आवाजात रफीनं गायलेलं हे गाणं ऐकू येतं..

*सूनी है दिल की राहें, ख़ामोश है निगाहें,*
*ना-काम हसरतों का, उठने को है जनाज़ा, उठने को है जनाज़ा,*
*चारों तरफ लगे है, बरबादीयों के मेले..*
*हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...*
*ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,*
*हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...*

नौशादजींनी या गाण्याला अगदी वेगळ्या स्टाईलचं संगीत-संयोजन केलं आहे. वेगळीच ट्रीटमेंट दिली आहे. फ्लॅश-बॅकने उलगडत जाणाऱ्या या कथानकाचा, हे गाणं म्हणजे कळसाध्याय. हा प्रसंग अतिशय हळवा, इमोशनल आणि घशात दाटून येण्याइतका परिणामकारक व्हावा म्हणून संगीतकार नौशादजींनी पारंपरिक व्हायोलिन-चेलोजचा इफेक्ट वापरला नाही. कोरसच्या मोठ्या ग्रूपला पाचारण करून हा कल्लोळ संगीतातल्या पार्टस् पध्दतीने, चर्चमधल्या कोरल व्हाईससारखा रेकॉर्ड केला. ही चाल नौशादजींना त्यांच्या लहानपणी लखनौ स्टेशनवर मास्टर रहमत खान गात असलेल्या एका गाण्यावरून सुचली. ‘क्यों जा रहे है ज़ालिम, मिट्टी को ख़्वार कर के! पा-माल ठोकरों से, मेरा मज़ार कर के..’ शायर-गीतकार शकिल बदायुनींना त्यांनी हा मुखडा अगदी तर्जसकट जसाच्या तसा ऐकवला. शकीलजींना तर्ज आवडली खरी पण नौशादजींनी गाऊन दाखवलेल्या गाण्याचं चलन एखाद्या गजलच्या अंगानं जाणारं होतं. चित्रपटातला यावेळचा प्रसंग पाहता गजल? शकीलजींनी आपली अडचण नौशादजींना

सांगितली. 'हे बघ.. मला गाणं अस्सल गजलच्याच फॉर्ममध्ये दे.. त्याचं पुढे काय करायचं ते मी बघतो..' नौशादजी हटूनच बसले. शकीलने गाणं करून दिलं. गीताला परिणामकारक फ्लो देत, गजल फॉर्ममधलं हे काव्य त्यांनी पाश्चिमात्य सुरावटींशी खेळत सादर केलं. या गाण्यातलं संगीत-संयोजन नौशादजींनी आपली प्रतिभा पणाला लावून अतिशय खुबीनं केल्याचं जाणवतं. समाजाच्या कल्याणासाठी स्वतः बळी जाणाऱ्या नायिकेसाठी तिच्या प्रियकराने फोडलेला टाहो रफीने किती ताकदीने फुलवलाय पहा. हे गाणं रसिकांच्या मनात एक सुगंधी जखम कोरून गेलं आहे. ३१ जुलै आला की ही जखम पुन्हा भळाभळा वाहू लागते. महंमद रफींचा स्मृतीदिन!

'कोटला' येथील सुल्तानपूर नावाच्या गावातल्या (जि. अमृतसर, पाकिस्तान) चौधरी खानदानात जन्मलेल्या महंमद रफीने कारकीर्द सुरू केली १९४४ साली 'पहले आप'व्दारे. पंजाबी चित्रपटातून गाण्याचा श्रीगणेशा करत नौशादजींचं बोट धरून हिन्दी चित्रपटसृष्टीत आला तेच मुळी खाड् खाड् बुटांचा आवाज करीत. 'हिन्दोस्ताँ के है हम, हिन्दोस्ताँ हमारा..' हे समरगीत म्हणत. चित्रपटांचा सुवर्णकाळ अनुभवत त्याने शहेनशाहपद यथेच्छ उपभोगलं. चित्रपट-संगीत क्षेत्रावर जणू हुकुमत होती त्यांची. गायकात तलत महमूद, हेमंतदा, मन्ना डे आणि किशोरकुमारचीही चलती होती पण बादशाहत होती ती रफीसाहेबांचीच.या काळात किशोरकुमार जास्त महत्त्व द्यायचा ते आपल्यातल्या अभिनेत्याला. किशोरकुमार अभिनेता म्हणून गाजत असताना त्याला गायला कठीण होतील अशी 'मन मोरा बावरा..' (रागिनी - १९५८, संगीत : ओ.पी.नय्यर) आणि 'अजब है दास्तां तेरी ये जिंदगी..' (शरारत - १९५९, संगीत : शंकर-जयकिशन) ही दोन गाणी संगीतकारांनी चक्क रफीसाहेबांकडून गाऊन घेतलीत. पडद्यावर अभिनय करणारा किशोर आणि त्याचा आवाज रफीचा असं अजब घडलंय खरं. पुढे किशोरला अभिनयक्षेत्रात पडता काळ आला. तो आता आपल्यातल्या गायकाला पुढे आणू इच्छित होता. १९६९-७०च्या 'आराधना'च्या आगमनासरशी राजेश खन्नाचं युग अवतरताच किशोरभोवती जबरदस्त वलय निर्माण झालं. राजेश खन्नाचा आग्रह असायचाच पण इतरही किशोरला झुकतं माप देऊ लागले. झालं! रफी डावलला जाऊ लागला. फक्त असलीच तर कव्वाली, गजल, शास्त्रीय संगीताचा बेस असलेली गाणी, भक्तिगीत किंवा भिकाऱ्यावर चित्रीत होणारं एखादं गाणं असलं की रफीला पाचारण करण्यात येई. आलापी-ताना असल्या की किशोरच त्यांचं नाव सुचवायचा. कधी एखादं सोलो, कधी युगलगीत रफीच्या वाट्याला येत असे. रफी या काळात वैतागलेले असायचे असं त्यांचे निकटवर्तीय सांगायचे. १९७३ पासून म्हणजे जंजीरच्या आसपास सिनेमात डायलॉगबाजीला ऊत आला. चित्रपटात संगीत त्यातच झाकोळलं गेलं. शोलेने तर सिनेमांचा प्रवाहच बदलून टाकला. रफीची उताराला लागलेली कारकीर्द 'हम किसीसे कम नही', तसेच 'अमर अकबर अँथनी', या चित्रपटांनंतर पुन्हा उभारी घेतेय असं वाटत होतं. 'सरगम'मध्ये त्याचा आवाज ऐकून सुखावलो होतो आपण. 'आप तो ऐसे न थे' मधलं 'तू इस तरहा से मेरी जिंदगी में शामिल है..' आणि 'ख्वाब' मधलं 'तूही वो हँसीं है, जिसकी तस्वीर..' अशी निहायतही खूबसूरत गाणी आणि त्याचा तोच दमदार आवाज ऐकून बरं वाटलं होतं. पण तो आनंद फार काळ टिकला नाही. पुन्हा ये रे माझ्या मागल्या! भरीस भर म्हणून आता डिस्कोची चाहूल लागली होती. लक्ष्मी-प्यारेनी संगीतबध्द केलेल्या 'कर्ज'साठी 'दर्द-ए-दिल, दर्द-ए-जिगर'म्हणत त्या नव्या प्रवाहात झोकून द्यायचा प्रयत्नही केला. कामं मिळत होती पण मनातून ते नाखुश असायचे. आपण एकटे झालोत अशी त्यांच्या चेहऱ्यावरची बोचरी जाणीव जवळच्यांना लक्षात येत असे. फिल्ममध्ये डायलॉगबाजी-ॲक्शन या भस्मासूराने डोकं वर काढलं. सिनेमातून संगीत हद्दपार होण्याची चिन्हे दिसू लागली. सुवर्णकाळ पाहिलेले हा हैदोस पाहून हळहळत, पण उपाय सापडत नव्हता. हे अरिष्ट टळायलाच हवं होतं. 'उडन खटोला' मधल्या प्रतीकात्मक धर्मगुरूंनी उपाय सांगितला होता की, मुक्तीसाठी कोणाला तरी बळी जावं लागेल.. म्हणजे इथेही कुणीतरी बळी जायलाच हवं होतं की काय? ३१ जुलैच्या संध्याकाळी रफीनं रसिकांना 'तू कहीं आसपास है दोस्त..' (आसपास) असं चुचकारून सांगत सरळ उभा चढ चढायला घेतला.. चाहत्यांची मनं आक्रंदत होती.. 'ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे, हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...' पण तो थांबायला तयार नव्हता. चित्रपटसृष्टीला तर आता त्यांची गरजच उरली नव्हती तर त्याने का म्हणून आणि कुणासाठी थांबावं? ३१ जुलै १९८०च्या गुरूवारी रात्री आठपर्यंत सगळंच संपलं होतं. 1 ऑगस्टसारखा मनहुस दिवस मी कधीच अनुभवला नव्हता. तुम्हालाही आठवत असेल. ग्रहण असल्यागत मरगळ होती वातावरणात. सूर्य संपावर गेला असावा. पहाटेपासूनच पावसाची रिपरिप सुरू होती. हाजी-अलीच्या लाला लजपतराय कॉलेजला होतो मी तेव्हा.. तीन पिरियडस् अटेंड केले खरे पण मधली सुट्टी होताच आम्ही निघालो तडक रफीसाहेबांच्या घराच्या दिशेने. पाऊस कोसळत होता पण त्याची पर्वा होती कुणाला? मन ओढ घेत होतं रफीसाहेबांकडेच. वांद्र्याच्या अड्डाविसाव्या रस्त्यावरच्या रफी मॅन्शनजवळ हजारोंची गर्दी होती. उदास माहौल! दुपारी बाराच्या ठोक्याला जनाज़ा उचलला गेला. वॉटरफिल्ड रोडमार्गे न्यू-टॉकिजवरून ती शेवटची यात्रा निघाली. दोन किलोमीटर्स दूरवर पसरलेली गर्दी मुंग्यांच्या गतीनं गतीनं सांताक्रुझच्या बडी मस्जीदच्या दिशेने सरकत होती. अजीब सन्नाटा होता तिथं. जुम्माची नमाज अदा होताच, जनाज़े नमाज पढला जात असताना अचानक पावसाचा जोर वाढला. जणू निसर्गही आक्रंदत होता. गर्दीतला प्रत्येकजण रडत होता. अश्रू पुसायची गरज नव्हती. कोसळणारा पाऊसच त्या अश्रूंना संगे घेऊन त्या मार्गावर

भावनातिरेकाचा गालिचा अंथरत होता. कबरीवर माती लोटताना गर्दीने जो हंबरडा फोडला होता त्याचा प्रतिध्वनी आजही आमच्या काळजाचा थरकाप उडवतो. आजही आभाळ भरून आलं की त्या ढगाळ आकाशाकडे लक्ष जातं. रफीसाहेबांचा हसरा चेहरा धुसरपणे दिसतो.. 'उडन खटोला'तल्या या गाण्याआधी संवाद आहेत. नायक म्हणतो.. 'दिल टूट गया..आवाज खो गयी...' ती आपलं दुःख लपवत म्हणते.. 'गाओ परदेसी गाओ.. मै चाहती हूँ, जिंदगी के आख़री वक्त तक तुम्हारी आवाज मेरे कानों में गुँजती रहे.. सिर्फ तुम्हारी आवाज मेरे कानों में गुँजती रहे.. मेरी आख़री आरजू सुनो.. कभी मरनेकी कोशीश मत करना.. उम्रभर इसी देश में रहना.. मै वादा करती हूँ के.. टूटे हुए दिल के संगीत से जब भी पुकारोगे, मैं आऊँगी.. जरूर आऊँगी..' नियतीचे शब्द असतील का हे ? पण तो तर म्हणतोय..

*तूने जो दे दिया ग़म, बे-मौत मर गये हम,*
*दिल उठ गया जहाँ से,*
*ले चल हमें यहाँ सेऽऽ, ले चल हमें यहाँ से,*
*किस काम की ये दुनिया, जो जिंदगी से खेले रे,*
*हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...*
*ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,*
*हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...*

♥

महंमद रफी यांची गाणी म्हणता तो रसिकांचा अगदी जिव्हाळ्याचा विषय. देत आहे काही 'यू-ट्युब' लिंक्स :

| | |
|---|---|
| १. महंमद रफी (माझी मराठी गाणी)(ऑडिओ) | https://youtu.be/3uPAspK_7T8 |
| २. महंमद रफी (१०० सुपरहिटस्-१)(ऑडिओ) | https://youtu.be/v9GqSMg1tj0 |
| ३. महंमद रफी (१०० सुपरहिटस्-२)(ऑडिओ) | https://youtu.be/4zpd7CHihiE |
| ४. महंमद रफी (टॉप २०)(व्हिडिओ) | https://youtu.be/C-ZsXUUwrQs |
| ५. महंमद रफी (युगलगीते)(व्हिडिओ) | https://youtu.be/iI1rEuXZIS8 |
| ६. महंमद रफी (सुपरहिटस्) | https://youtu.be/UBydW3L-yI8 |

♥

## २६ : ओ दूर के मुसाफ़िर..

चित्रपट : उडन खटोला (१९५५)
निर्माते : नौशाद (सनी आर्ट प्रॉडक्शन्स)
दिग्दर्शक : एस. यू. सनी
गायक ; महंमद रफी
गीतकार : शकील बदायुनी
संगीत : नौशाद

चले आज तुम जहाँ से, हुआी जिंदगी परायीss
तुम्हें मिल गया ठिकानाss, हमें मौत भी न आयी..

ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,
हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...

तूने जो दे दिया ग़म, बे-मौत मर गये हमss
दिल उठ गया जहाँ से,
ले चल हमें यहाँ सेss, ले चल हमें यहाँ से,
किस काम की ये दुनिया, जो जिंदगी से खेले रे,
हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...
ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,
हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...

सूनी है दिल की राहें, ख़ामोश है निगाहें,
ना-काम हसरतों का,
उठने को है जनाज़ा ss, उठने को है जनाज़ा,
चारों तरफ लगे है, बरबादीयों के मेले..
हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...
ओ दूर के मुसाफ़िर, हमको भी साथ ले ले रे,
हमको भी साथ ले ले, हम रह गये अकेले...

♥

महंमद रफी यांनी गायलेलं गाणं आणि त्याबरोबर त्यांच्या आठवणी या मनाला हळवं करतात. ते गाणे ऐकण्याची, पाहण्याची तीव्र इच्छा झाली असेल तर देत आहे या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, त्या संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. ओ दूर के मुसाफिर... (ऑडिओ) https://youtu.be/Jfjgx9RbJrI

२. ओ दूर के मुसाफिर... (व्हिडिओ) https://youtu.be/pD7HziV7204

३. ओ दूर के मुसाफिर... (कराओके ट्रॅक) https://youtu.be/KRRSOOR0HUo

४. 'उडन खटोला' (१९५५)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/Im9rYcmzRAI

♥

## २७. इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..

सिच्युएशन तशी सिंपल. क्लबच्या त्या हॉलमध्ये दोन श्रीमंत सांड एकमेकांवर गुरकावतायत. त्यांच्यातली दुष्मनी उगीचच टोक गाठतेय. ही परिस्थिती पाहून तो हताश झालाय. सॅन्डविच झालंय त्याचं. तो बारच्या काउंटरवर डोकं टेकून विमनस्क अवस्थेत बसला आहे. त्याचा सहायक कम दोस्त पेग बनवतो आणि त्या ग्लासात फसफसता सोडा ओततो. आत ग्लासात सोड्याच्या बुडबुड्यातून दिसते त्याची प्रियतमा! ती साक्षात समोर आलीय म्हणता तो गाऊ लागतो..

*इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने*
*दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने*
*इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..*

पिक्चरची सुरुवातच मुळी कुठल्याश्या दोन सरकारी प्लॉटस्च्या लिलावाने होते. जानकीदास पुकारा करतोय. शेठ लालाजी (ओमप्रकाश) गर्दीतल्यांची कुवत पारखत योग्य संधीची वाट पाहत आहेत. सर्वांनी नांगी टाकल्यावर मग आपली बोली लावतात. छाती समाधानानं फुलते. आपल्यापुढे इथे जमलेले सर्वजण कःपदार्थ आहेत. है कोई माई का लाल? है किसी की हैसियत? अशी नजर ते सर्व उपस्थितांवर फिरवतात. पचासी हजार एक! पचासी हजार दो! पचासी हजार.. एक लाख! कुठुनतरी पुकारा होतो. ओमप्रकाश आपल्या नेहमीच्या स्टाईलमध्ये.. 'दूध में मख्खी!?' सर्वांच्या नजरा झर्रकन मागे वळतात. शेठ करमचंद (हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय) धीम्या पावलांनी कोपऱ्यातली खुर्ची गाठताहेत. बोली वाढत जाते. आता दोघातला तुल्यबळ सामना सुरू होतो. ओमप्रकाश दोन लाखांच्या सर्वात सरस अशा बोलीवर तो प्लॉट मिळवतो. शेठ लालाजींच्या गळ्यात पुष्पहार आणि शेठ करमचंदची हार! करमचंद शेठ खांदे पाडून बाहेर चालू लागतात. इतक्यात त्या प्लॉटमागच्याच दुसऱ्या प्लॉटची बोली सुरू होते. करमचंद शेठ हताश मनःस्थितीत मागे फिरतात. बोली अडतीस हजारावर असतानाच अचानक करमचंद शेठ पुन्हा आखाड्यात उतरतात. 'सौ सोनारकी एक लोहार की..' स्टाईलने 'दोन लाख एक हजार' अशी अंतिम बोली देऊन तो प्लॉट मिळवतात. शेवटी हा स्पर्धात्मक 'तू तू मैं मैं' चा खुन्नस कुरवाळत, आपणच कुरघोडी केली (मैं कहाँ गिरा, ये देख मेरी टांग तो उप्पर है..) अशा आनंदात ते आपापल्या घरी परततात. घरी बायको करमचंदजींना वेड्यात काढते पण इज्जतका सवाल था वगैरे सांगून ते वेळ मारुन नेतात. आपल्या मुलीबरोबर (नूतन) चर्चा करून शहरातल्या सर्वोत्तम आर्किटेक्टच्या कार्यालयात ते संपर्क करतात. तिथला मालक आपल्या एका तरुण आर्किटेक्टवर ती जबाबदारी सोपवतो. नायक-नायिकेची ही पहिली भेट फारच रंगतदार झालीय. ओळख तर होते. राकेश (देव आनंद) हा नेमका 'त्या' लालाजींचा मुलगा असतो. (अगं बाई!) 'अब आयेगा असली मजा..' म्हणत आपण सावरून बसतो.. सतत होणाऱ्या भेटीतून दोघांमध्ये आपुलकी निर्माण होते. पुढे नूतनच्या फॅमिलीसोबत तो कुतुबमिनारजवळ पिकनिकला म्हणून जातो. कुतुबमिनार चढताना दोघांमध्ये प्रेमांकुर फुटतो. जसजसे ते वरच्या पायऱ्या चढतात तसतसे ते मनाने एकमेकांकडे अधिकच आकर्षित होतात. मिनार उतरताना राकेश आपल्या प्रेमाची प्रांजळ कबुली देतो.. 'दिल का भँवर करे पुकार..' अशा छानश्या गाण्याने ती दोघं आपसुकच एकमेकांची होऊन जातात. लालाजी एकदा त्याच्या ऑफिसमध्ये जाऊन करमचंदने जे डिझाईन निवडलेलं असतं नेमकं तेच डिझाईन पसंत करतात. (अरेच्चा!) एकीकडे राकेश-सुलेखाचं प्रेम फुलत जातं तर दुसरीकडे त्यांचे पिताजी लिलावातल्या चढाओढीतून निर्माण झालेल्या दुष्मनीला प्रेमानं लावलेल्या रोपट्याप्रमाणे वाढवतात. खतपाणी घालतात.. कथानक हलकं-फुलकं आहे. व्हीलन, फायटिंग, ॲक्शन, राडा, खुनखराबा औषधालाही नाहीय.. पण या साध्याश्या वाटणाऱ्या कथानकात एकपेक्षा एक सरस असणाऱ्या गाण्यांची पेरणी अशा खुबीनं केलीय की कथानक पुढे सरकता-सरकता आपली बेमालुमपणे पकड घेतं.. क्लबच्या इलेक्शनच्या निमित्तानं लालाजी आणि करमचंद हे श्रीमंत सांड आता हमरीतुमरीवर आलेत. त्यांच्यातलं भांडण मिटवायचं कसं या एकाच विवंचनेनं पछाडलेला राकेश आत बारमध्ये जातो. बाजुला मदिरेची नशा चाखणारा त्याचा सहायक कम दोस्त त्याच्यासमोर पेग भरलेला ग्लास ठेवतो. परेशान राकेश पेल्याकडे बघत म्हणतो...'मैं जानता हूँ.. एक न एक दिन मेरी पोल खुल जाएगी.. लेकीन'.. राकेशने ही मगजमारी, काही काळासाठी का होईना, विसरून शांतपणे शराबचा लुत्फ घ्यावा म्हणून दोस्त त्या ग्लासात सोडा ओततो. अचानक सोड्याच्या फसफसणाऱ्या बुडबुड्यातून त्याला आत त्याची सुलेखा दिसू लागते.. तो गाऊ लागतो.. ती सांगते..

*घर का बनाना कोई, आसान काम नही,*
*दुनिया बसाना कोई, आसान काम नही,*

त्याचं यावरचं उत्तर तयार असतं. तो लागलीच म्हणतो.

*दिल में वफ़ाए हो तो, तुफ़ाँ किनारा है,*
*बिजली हमारे लिए, प्यार का इशारा है,*
*तन मन लुटाऊँगा, तेरे घर के सामने,*
*दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने*
*इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..*

मद्रासच्या ‘देवता’ (१९५६) वगैरे पोषाखी चित्रपटातून काही ‘ट्रीक-सीन्स’ पाहिल्याचं स्मरणात आहे. ‘तेरे घर के सामने’ (१९६३) ही एक सिंपल लव्ह-स्टोरी! या सिनेमात ‘ट्रीक-सीन्स’? येस! पण इथला ट्रीक-सीन मात्र वेगळ्या प्रकारे हाताळला आहे. सचिनदांनी फेमसमध्ये हे युगलगीत रेकॉर्ड केल्यानंतर ते कुठल्या प्रसंगी टाकायचं यावर लेखक-दिग्दर्शक विजय आनंद आणि देव आनंद यांच्यात बराच खल झाला. दुसऱ्यासारख्याने हे युगलगीत दोन बंगल्यांच्या समोरासमोरच्या खिडक्यांमध्ये नायक-नायिका आमने-सामने बसून, ते एकमेकांकडे पाहत गाणं म्हणत आहेत अशावर भागवलं असतं.. किंवा मग सिमला-कुलू-मनाली अथवा परदेशात जाऊन ते आऊट-डोअरला उरकलं असतं. काहीतरी रोमॅन्टीक मुव्हमेंटस् देत गाणं केलं की झालं! खर्च कमी.. टेन्शनही नाही! गोल्डीच्या (विजय आनंद) मनात मात्र एक धाँसू आईडिया होती. गाणं करायचंय पण ते खासच व्हायला हवं. दोन्ही घरात दुष्मनी असल्याने नायक-नायिका, घरातल्यांचा डोळा चुकवून चोरी चोरी चुपके चुपके भेट घेतात हे ठीक पण समोरासमोर येऊन गाणं म्हणतात हे लॉजिक न पटणारं. क्लबच्या इलेक्शनच्या निमित्तानं लालाजी आणि करमचंद हमरीतुमरीवर येतात तेव्हाच हे गाणं टाकलं तर? पण त्या प्रसंगी फक्त तो आहे.. ती नाही. क्लब आहे म्हणजे बार आहेच. मग ती दारूच्या ग्लासात दाखवता येईल का? काय हरकत आहे? पण हीरो बेवडा नाहीय. आर्किटेक्टच्या सोबर प्रोफेशनमधला हा माणूस क्लबमध्ये सहज पितोय असं दाखवूया.. आणि पिक्चर-इन-पिक्चर या फोटाग्राफीतल्या टेक्निकप्रमाणे नायिका त्याला ग्लासमध्ये दिसते असा ट्रीक-सीन करूया अशी संकल्पना मांडली. गोल्डीने आपले कॅमेरामन व्ही. रात्राजींना कल्पना समजावून सांगितली. गोल्डीने या गाण्याचं पूर्ण शूट आपल्या देखरेखीखाली केलं. स्पेशल इफेक्टस्वाल्या डाह्याभाईंच्या गरजेनुसार सुलेखचे शॉटस् वेगळे शूट केले. एडीट करताना बाबू शेखला सूचना देत हवा तसा इफेक्ट मिळाला. व्वावऽऽ! जमलं हो जमलं! हे युगलगीत देव आनंद ग्लासात दिसणाऱ्या नूतनकडे पाहत गातो. मुखड्यातच त्या ग्लासात नूतन दिसणं हे एस्टॅबलिश होतं. इथे थांबता आलं असतं. कट्-टू सिमला-कुलू-मनाली अथवा परदेशात जाऊन आऊट-डोअर!.. पण नाही! तो गोल्डी आहे यार!.. राकेश उगीचच खुळावल्यासारखा ग्लास घेऊन फिरत गाणं गातोय हे पाहून त्याचा हा दोस्त त्याचं पेय थंड करायच्या नेक इरादाने ग्लासात एक बर्फाचा खडा टाकतो. इथे गोल्डीची संकल्पना किती जिनियस आहे पहा. बर्फाचा खडा पडताना ग्लासात ती घाबरलेली दाखवलीय. बाऊन्सर चुकवताना फलंदाज जसा पटकन खाली वाकतो तशाचप्रकारे तो खडा आता आपल्या अंगावर पडणार म्हणून ती चक्क खाली वाकते. आता ग्लासात अनाहूतपणे पडलेल्या या थंड खड्यामुळे ती शहारणार हे सुचविण्यासाठी मग ती थंडीनं क्षणभर चक्क कुडकुडताना दाखवलीय. ती ‘तो’ खडा बाहेर काढून टाकायला देवला हात जोडून विनवते. तिची ती अवस्था पाहून देव तातडीनं तो खडा बाहेर काढून दोस्ताच्या तोंडात कोंबतो.. हुश्श! तसं पहायला गेलं तर ही किती नगण्य बाब! पण यालाच म्हणतात डायरेक्टर सेन्स! पिक्चरमधल्या अनेक प्रसंगांच्या सादरीकरणामध्ये आपण वाहव्वा करू असे क्षण आहेत. कधी कॅमेऱ्याचे लावलेले अँगल्स, तर कुठे मोठा आवाका असलेला कॅनव्हास! कुछ खास बात है असं पटताचक्षणी गोल्डीमधल्या प्रतिभासंपन्न दिग्दर्शकाला आपण मनोमन सलाम ठोकतो. बर्फ काढल्यामुळे समाधान पावलेली ती आता म्हणतेय...

*काँटो भरे है लेकीन, चाहत के रास्ते,*
*तुम क्या करोगे, देखें, उल्फ़त के वास्ते,*

आपला नायक निराशेचे सूर आळवत नाही.. स्वकर्तृत्वावर विश्वास असल्यामुळे तो तिला म्हणतो..

*उल्फ़त में ताज छुटे, ये भी तुम्हे याद होगा,*
*उल्फ़त में ताज बने, ये भी तुम्हे याद होगा,*
*मैं भी कुछ बनाऊँगा, तेरे घर के सामने,*
*दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने*
*इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..*

या गाण्यात नायकाच्या हातात शराब आहे पण नायक इथे झिंगलेला वगैरे दाखवला नाहीय. उलट त्याच्या चेहऱ्यावर स्वप्नाळू भाव आहेत. अपने दिल की बात ऐकायला ती रुबरू आपल्यासमोर या.. या ग्लासात मौजूद आहे म्हणून तो अतिशय आनंदात आहे. तो दारू पितोय असंही दाखवलेलं नाही, उलट एका क्षणी तो एक 'सीप' मारावी म्हणून ग्लास ओठाला लावणार इतक्यात ग्लासातून ती त्याला 'नको पिऊस' असं दटावते. गाण्यातल्या या अशा जागा आपल्याला आवडून जातात. ग्लासात ती दिसणं ही फॅन्टॅसी आपल्याला हल्कासा नशा जरूर आणते. सचिनदांचं संगीत, हसरत जयपुरींचे शब्द आणि लतादीदी-रफीचा आवाज! या गाण्याचा कैफ आपल्या मनावर बराच काळ रेंगाळतो. या चित्रपटातली दिल का भँवर करे पुकार.., देखो रुठा न करो.., तू कहाँ ये बता.., सुनले तू दिल की सदा.., ये तन्हाई हाय रे हाय.. सगळीच गाणी आपल्या आवडीची आहेत. चित्रपटातल्या गाण्यांचं आणि पार्श्वसंगीताचं संगीत-संयोजन आहे आर्डीचं. बंदिनी, दिल एक मंदिर, गुमराह, मुझे जीने दो, मेरे मेहबूब, ताजमहल असे एकाहून एक चित्रपट गर्दी खेचत असूनही लोकांनी 'तेरे घर के सामने' पाहिला खास देव आणि नूतनसाठी, त्यातल्या गाण्यांसाठी!.. आज हातात दारूचा मरो.. साधा ज्यूसचा जरी ग्लास आला ना की आठवतं हे गाणं.. देव आनंद, नूतन आणि दिग्दर्शक विजय आनंद!

*दिल में जो प्यार हो तो, आग भी फूल है,*
*सच्ची लगन जो हो तो, परबत भी धूल है,*
*तारे सजाऊँगा, तेरे घर के सामने,*
*दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने*
*इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..*

♥

आपल्या आवडत्या गाण्यांच्या यादीत हे गाणं आहे. त्या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ व कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक देत आहे.

| | |
|---|---|
| १. इक घर बनाऊंगा... (ऑडिओ) | https://youtu.be/-Kjsei9VKrk |
| २. इक घर बनाऊंगा... (व्हिडिओ) | https://youtu.be/BYj7bgtnNM4 |
| ३. इक घर बनाऊंगा... (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/_VxBTp_fnvw |
| ४. 'तेरे घर के सामने' (१९६३)(संपूर्ण चित्रपट) | https://youtu.be/8jGq3DyDeho |

एव्हरग्रीन देवआनंद यांच्याशी संबंधित अनमोल खजिना. काही 'यू-ट्युब' लिंक्स :

| | |
|---|---|
| १. देव आनंद (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/tnNwKCU8Uj0 |
| २. देव आनंद (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/6aTTtDgoDUo |
| ३. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - १) | https://youtu.be/fO3lO4AUU5A |
| ४. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - २) | https://youtu.be/wj_n8AvesWE |
| ५. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - ३) | https://youtu.be/gdOerc0SF9s |
| ६. देव आनंद व किशोर (गंमतीदार गाणे) | https://youtu.be/luZ_ks7ZRLY |

♥

## २७ : इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..

चित्रपट : तेरे घर के सामने (१९६३)
निर्माता : देव आनंद (नवकेतन)
दिग्दर्शक : विजय आनंद
गायक : महंमद रफी- लता मंगेशकर
गीतकार : हसरत जयपुरी
संगीतकार : सचिन देव बर्मन

रफी : इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..
दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने
इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने.. ।। धृ. ।।

लता : घर का बनाना कोई, आसान काम नही,
दुनिया बसाना कोई, आसान काम नही,
रफी : दिल में वफ़ाए हो तो, तुफ़ाँ किनारा है,
बिजली हमारे लिए, प्यार का इशारा है,
तन मन लुटाऊँगा, तेरे घर के सामने,
दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने
इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने.. ।। १ ।।

लता : कहते है प्यार जिसे, दर्या है आग का,
या फ़िर नशा है कोई, जीवन के राग का,
रफी : दिल में जो प्यार हो तो, आग भी फ़ूल है,
सच्ची लगन जो हो तो, परबत भी धूल है,
तारे सजाऊँगा, तेरे घर के सामने,
दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने
इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने.. ।। २ ।।

लता : काँटो भरे है लेकीन, चाहत के रास्ते,
तुम क्या करोगे, देखें, उल्फ़त के वास्ते,
रफी : उल्फ़त में ताज छुटे, ये भी तुम्हे याद होगा,
उल्फ़त में ताज बने, ये भी तुम्हे याद होगा,
मैं भी कुछ बनाऊँगा, तेरे घर के सामने,
दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने
इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने..
दुनिया बसाऊँगा, तेरे घर के सामने
इक घर बनाऊँगा, तेरे घर के सामने.. ।। ३ ।।

♥

## 28 : Airanichya Deva Tula..

## २८ : ऐरणीच्या देवा तुला..

'आनंदघन ही काय भानगड आहे बुवा? स्टुडिओत तर कुठे दिसत नाही. रेकॉर्डिंग्जला यायला आवडत नाही की काय साहेबांना?'.. 'कोल्हापूरला राहतात ते. मुंबईला येऊ शकत नाहीत म्हणून मी आणि डावजेकर पार पाडतो त्यांचं काम..'

बुजुर्ग संगीतकार दत्ता डावजेकर वगळता 'आनंदघन' कोण याची सुरूवातीला कुणालाच कल्पना नव्हती. अगदी वादकही अनभिज्ञ होते. भालजी पेंढारकर (बाबा) एकदा लतादीदींना म्हणाले होते.. 'नवा सिनेमा करतोय. त्यासाठी तू मला एक संगीत-दिग्दर्शक दे.. कुणाला काम द्यायचं ते तूच पहा..' दीदी म्हणाली.. 'तुम्ही म्हणत असाल.. तर मीच संगीत दिग्दर्शन करते..'.. भालजी म्हणाले, 'नाही.. नको. तुला हे लहान पिक्चर नको. नंतर लोकांनी अशा दृष्टीने याकडे पाहू नये, की लताने एक लहान पिक्चर केलं..'

थोडी चर्चा झाली..'मी संगीत देईन.. पण संगीतकार म्हणून माझं नाव टाकण्याऐवजी दुसरं नाव घेऊ.. नाव बदलू.. टोपणनाव टाकू..' सर्वात प्रथम 'जयशंकर' असं नाव विचारार्थ आलं, पण समर्थ रामदासांचं 'आनंद वन भुवनी' सतत वाचनात असल्यामुळेच की काय, 'आनंदघन' हे नाव पुढे आलं. तेच निश्चित झालं. लतादीदींनी 'आनंदघन' या नावानं संगीत-दिग्दर्शकाचं काम करण्यास सुरूवात केली. प्रथितयश संगीतकार दत्ता डावजेकरजी यांनी संगीत-संयोजनाची जबाबदारी स्वीकारली तर आणि पं. हृदयनाथजींनी सुध्दा सहकार्य करायचं अभिवचन दिलं. मग काय विचारता! दीदीने सगळ्यात आधी रेकॉर्ड केलं 'निळ्या आभाळी कातरवेळी..' ते सगळ्यात आधी भालजींना ऐकवलं. भालजींना अभिजात संगीतात विशेष रूची होती शिवाय गाण्याचं अंग होतंच. यानंतर रेकॉर्ड झालं ते 'बाई बाई मनमोराचा..'. दोन्ही गाण्यांचे गीतकार होते जगदीश खेबुडकर. गाणी ऐकताच भालजींनी समाधान व्यक्त केलं. 'साधी माणसं'(१९६५) या चित्रपटाचा आराखडा तयार झाल्यावर गीतकार कोण घेऊया, या विषयावर बराच खल झाला. कुणी गदिमांना विचारूया म्हटलं तर आणखी कुणाचं नाव सुचवलं. खेबुडकर याविषयी म्हणतात की, भालजी पेंढारकर साहेब हे उत्तम गाणी आणि संवाद लिहिणारे. त्यांनी या सिनेमासाठी स्वतः तसेच कवि योगेश यांची गीते घेतल्याची बातमी त्यांनी वर्तमानपत्रात वाचली होती. म्हणजे जगदीशजींची गाणी नसणार तर! या दरम्यान खेबुडकरांचा कोल्हापुरात शिक्षकी पेशा असल्याने ते वर्गात शिकवण्याचं कामही उत्तम पद्धतीने पार पाडत होते. मराठी चित्रपटांची त्या काळी कोल्हापुरातच मोठ्या प्रमाणात निर्मिती होत असे. असाच एकदा तास रंगात आला होता, पण अचानक शिपाई आला आणि म्हणाला, 'तुम्हाला हेडमास्तर बोलवत्यात..'. जगदीशजी मुख्याध्यापकांकडे गेले. त्यांनी सांगितलं की, 'उपाध्यक्षांचा फोन आहे.. बोला..' फोनवर प्रत्यक्षात भालजी बोलत होते.ते म्हणाले.. 'जगदीश..असशील तसा निघून ये..' खेबुडकर म्हणाले.. 'मी तासवर आहे..पुढचा तास ऑफ आहे, तेव्हा येतो..'. पण त्यानंतर ते मुख्याध्यापकांबरोबर काय बोलले, कुणास ठाऊक. खेबुडकरांना हेडमास्तर म्हणाले.. 'तुम्ही आत्ताच निघा, मी पुढचा शिक्षक तासाला पाठवतो..' खेबुडकरांनी सायकलवर टांग टाकली आणि ते स्टुडिओत हजर झाले. खेबुडकर भालजींना म्हणाले.. 'बाबा.. काय बोलावणं ?' भालजी म्हणाले..'अरे जगदीश.. मी साधी माणसं नावाचा सिनेमा करतोय.'. तेव्हा खेबुडकर म्हणाले.. 'हो, मला माहीत आहे.. गीतंही तुमचीच आहेत.'. भालजी म्हणाले.. 'हो, मी काही गीतं लिहिलीत.. पण एका गाण्यासाठी अडलंय..' खेबुडकर म्हणाले.. 'कोणत्या संकल्पनेवर?..' खेबुडकरांनी होकार देताच भालजी सुखावले. चित्रपटातल्या त्या नेमक्या सिच्युएशनवर चर्चा सुरू झाली. लोहाराच्या भूमिकेतला नायक. गरीब घरचा. सोशीक पत्नी-प्रेयसी. नवऱ्याच्या धडपडीतच समाधान मानणारी. त्याच्यावर जिवापाड प्रेम करणारी.. जगदीश खेबुडकरांनी काव्य दिलं..

*'ऐरणीच्या देवा तुला ठिणग्यांची फुले वाहू देऽऽ आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे.. '*

'बाबा (भालजी), शब्द असे आलेत की.. या गाण्याला चालच बसत नाहीय..'
आधीची गाणी मस्त जमून आलेली. लताच्या संगीत-दिग्दर्शनातले बारकावे त्यात स्पष्ट झालेले. अभिजात संगीत, नृत्य, गायन उत्तम कळणाऱ्या भालजींना लक्षात येईना की लता अचानक असं काय बोलू लागली आहे?.. आत्ताच काय बिनसलं?.. 'काय गडबड आहे? कसली अडचण येतेय?'
'काही शब्द खटकतायत.. बरे वाटत नाहीत..'
'ठीक आहे.. वेगळे शब्द देतो..'

भालजी लतादीदींना शांतपणे त्या गाण्याची पार्श्वभूमी विस्तारानं सांगू लागले. या काव्यातून त्यातल्या नायिकेच्या भावना, नवऱ्याबद्दलचा जिव्हाळा. त्यांची गरीबी तसेच प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेत संसार सुखाचा व्हावा अशी तळमळ.. सगळं सगळं आलं आहे असं सांगितलं.. 'पहिल्या कडव्यातली.. ही कवीची थॉट बघ..

*लेवू लेणं गरीबीचं, चणं खाऊ लोखंडाचं... धनी मातूर माझा देवा, वाघावानी असू देऽऽ*
*आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..*

या गाण्याची चाल आणि संगीत त्या वातावरणाचाच एक भाग बनूदेत. तो लोहार आहे. ती त्याच्या शेजारी बसून भाता फुलवतेय. श्वास घ्यावा तसा हलणारा तो भाता संगीतातून आकाराला येऊ दे. ती ऐरणही त्यातल्या ठेक्यासकट हवीय. स्पंदनासारखी! आपल्यासाठी ते घणाचे घाव खरे पण ते त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहेत. संगीत कर त्याचं..' लतादीदी भारावली. मोठ्या उमेदीने तिनं गाणं करायला घेतलं. संगीत-संयोजक म्हणून डीडी (दत्ता डावजेकरजी) आणि बाळ (पं. हृदयनाथजी) मदतीला होतेच. बासरी, डफ, मादल, दिमडी तर ऐरणीवर घणाचे घाव पडावेत त्या ठेक्यासदृश साऊन्ड-इफेक्ट वापरत गाणं सजवलं. वातावरणनिर्मितीही साधली. मुंबईतल्या मेहबूब स्टुडिओत कौशिकजींनी ते रेकॉर्ड केलं. भालजींनी लतादीदींना दिलेली शिकवण त्यांनी तंतोतंत पाळल्याचं गाणं ऐकताक्षणी जाणवतं.

'साधी माणसं'ची सुरुवात होते ती श्रेयनामावलीने. सर्व कलाकारांची तंत्रज्ञांची नावं येतात पण रंगभूषा अशी पाटी येते त्याखाली कुणाच्या नावाऐवजी लिहिलंय.. 'नाही.' (मेक-अप नाही?!) कथानुरूप वेशभूषा करणं अनिवार्य असतं पण मेक-अप न करता भालजींनी आपल्या कलाकारांना त्यांना परमेश्वरानं दिलेल्या रूपातच सादर केलंय. तो त्यांचा आग्रहच असायचा म्हणा ना! जास्त लोकेशन्सही नाहीत. कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओत शूटिंग केलं आहे.. 'साधी माणसं'चं एकंदरीत कथानक हे असं होतं. कोल्हापूर जवळच्या हनबरवाडी नावाच्या गावातील नानामामाच्या हॉटेलाशेजारी शंकर (सूर्यकांत) नावाचा लोहार आपली पत्नी पार्वतीसोबत (जयश्री गडकर) रहात असतो. एकमेकांवर निरातिशय प्रेम करणारं हे जोडपं. आपल्या गाडीच्या काही कामासाठी शंकर लोहाराकडे आलेल्या छक्कडरावाच्या नजरेला पडते सुस्वरूप पार्वती. तिचं ते रूप, लावण्य पाहताच छक्कडराव पागलच होतो. तिला आपलंसं करायला सोपं जावं म्हणून तो काही हिकमती करून त्यांना कोल्हापुरात नेऊन बस्तान बसवण्यास भाग पाडतो. वस्तीतल्या एका शेजाऱ्याचा सोन्याचा दागिना चोरी केल्याच्या आरोपात शंकर गोवला जातो. त्याला अटक होते. तो तुरुंगात गेल्याने आता पार्वती एकटी पडते. संधीचा फायदा घेण्याच्या इराद्याने तो पार्वतीकडे येतो. त्याचा वाईट हेतू लक्षात येताच पार्वती बिथरते.. आणि तिच्या हातून छक्कडरावाचा खून होतो... नाट्यमय घटना, लोभसवाणी व्यक्तिचित्रे. जयश्री गडकर, सूर्यकांत, मास्टर विठ्ठलराव, राजशेखर, चंद्रकांत गोखले आणि सुलोचनादीदी अशा सर्वच कलाकारांचा तितकाच उत्कृष्ट अभिनय, गीतकार जगदीश खेबुडकर, योगेश यांच्या मार्मिक शब्दकळा, 'आनंदघन' या टोपणनावाने लतादीदींनी लोकसंगीताचा मोहक वापर करून अजरामर केलेली काही गाणी.. ही होती 'साधी माणसं'ची ठळक वैशिष्ट्ये.

चित्रपटातली पात्रांच्या तोंडची भाषा ही गावरान आहे म्हणून दोन्ही गीतकारांनी ही गाणी लिहिताना त्याचं अचूक भान ठेवलेलं आढळतं. जयश्री गडकर या नायिकेवर चित्रण झालेल्या गाण्यांची भाषा ही अशी गावरान आहे.. गीतकार योगेशने लिहिलेली 'माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं..', 'वाट पाहुनि जीव शिणला..', आणि 'राजाच्या रंगमहाली..' छानच जमलीत. 'ऐरणीच्या देवा तुला..' हे गाणं मात्र गीतकार जगदीशजींचं. मंदिरातल्या 'नको देवराया अंत आता पाहू..' ही संत कान्होपात्राची रचना मात्र वेगळ्याच पध्दतीने केलेली आढळते.

चित्रपटाच्या सुरुवातीच्या पाचेक मिनिटात येणारं 'ऐरणीच्या देवा तुला..' ऐकताना काही शब्दांची गंमत वाटते. लोखंडाचं, वाघावानी, किरपा तुझी भात्यातल्या.. असे अनेक गेय नसलेले शब्दही त्या ऐरणीच्या ठेक्यात बेमालूमपणे मिसळत कानाला गोड वाटतील अशा तऱ्हेने सादर झालेत. आपल्याला गीतकार जगदीश खेबुडकर 'मला हो म्हनत्यात लवंगी मिरची..' अशा ठसकेबाज लावण्यांतून मनाला भावले तसेच ते अशा आशयसंपन्न गाण्यांतूनही सतत भेटत राहिले. विपूल शब्दभांडार, कल्पनेच्या भराऱ्या मारण्याचं सामर्थ्य, विविधतेची श्रीमंती असल्यानेच की काय त्यांची गाणी आपल्या मनावर लागलीच ठसतात. ज्या नगरीत मराठी चित्रपटसृष्टीला धुमारे फुटले, जी खऱ्या अर्थानं तिथं प्रसवली, रूजली आणि बहरालाही आली, त्या करवीरनगरीत - म्हणजेच कोल्हापुरात जगदीश खेबुडकरांचा जन्म झाला. सामान्य घर आणि हिरवा निसर्ग यांच्या छायेत वाढलेल्या जगदीशजींना कवि बनवलं ते तिथल्या वातावरणानेच. १९४८पासून लिहिताहेत ते. जगदीश खेबुडकरांनी आज २०१० पर्यंतच्या बासष्ट वर्षाच्या काळात आजतागायतच्या जवळजवळ सर्वच संगीतकारांकडे सुमारे साडेतीन-चार हजाराहून अधिक गाणी लिहिली आहेत. एकापेक्षा एक

सरस! वेगवेगळ्या विषयांवर! ‘लवंगी मिरची’नंतर ‘लावणीकार’ असा शिक्का बसल्यामुळे पाचेकशे लावण्यांची बरसात केलीय त्यांनी. ‘तमाशा’ या विषयात जास्त रमत असतील असं सहज वाटून गेलं आणि तुम्ही त्यांना याविषयी छेडलंत तर ते शांतपणे म्हणतात.. ‘अजिबात नाही! निव्वळ भाषेचा, संकल्पनेचा आणि भावनांचा फुलोरा असतो प्रत्येक गाण्यामध्ये. कोणतंही गाणं लिहायचं तर फक्त तल्लीनता आणि परकायाप्रवेशाइतकी कुवत तुमच्यात असली की जमतंय सगळं..’

आपल्या आवाजानं आपलं धकाधकीचं जीवन बऱ्याच प्रमाणात सुसह्य करणाऱ्या लाडक्या लतादीदी, संगीतकार म्हणून आपणा रसिकांपुढे सादर व्हाव्यात ही खरोखरच भाग्याची गोष्ट आहे. मोजकीच गाणी पण सगळीच आज आपल्या ओठावर आहेत. ‘मागते मन एक काही..’, ‘शूर आम्ही सरदार..’, ‘भस्म विलेपित..’, ‘रेशमाच्या रेघांनी..’, ‘निळ्या आभाळी कातरवेळी..’, ‘अखेरचा हा तुला दंडवत..’, ‘बाई बाई मनमोराचा..’, ‘सोनसकाळी सर्जा..’, ‘माझ्या कपाळीचं कुकु..’, ‘मराठी पाऊल पडते पुढे..’ ही गाणी म्हणजे आपल्यासाठी कुबेरधन आहे.

मास्टर दीनानाथ! अष्टपैलू नट, मैफलीतले शास्त्रशुध्द गवई, रंगभूमीवरील तानसेन! अशा या प्रतिभासंपन्न थोर कलावंताची ही कन्या. ‘लता दीनानाथ मंगेशकर’ हे व्यक्तिमत्त्व हिमालयाच्या शिखरापेक्षाही उत्तुंग असूनही त्या म्हणतात की.. ‘बाबांच्या गळ्यातलं गाणं मला पूर्णपणे आत्मसात करता आलेलं नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातले सारे पदर निरखता आलेले नाहीत. कर्तृत्वाचा ठाव घेता आलेला नाहीय. आजही त्यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकताना वाटतं की त्यांच्यातला काही अंश तरी आपल्यात आलेला आहे का?..’ शुक्रवार, दि. २४ एप्रिल, १९४२ची वैशाख वद्य अष्टमीची दुपार मंगेशकर कुटुंबात एक वणवा पेटवून गेली. मा. दीनानाथजी गेले. लतादीदींच्याच शब्दात सांगायचं तर.. ‘खूप गुदमरल्यासारखं वाटत होतं. पाणीदार टपोऱ्या डोळ्यांचे, सिंहासारख्या रूपाचे, देखणे बाबा धरणीवर होते. अंगावर घरातलीच शाल होती.. निरोपही धड घेता आला नाही. चिमणी भावंडं, माझं अजाणतेपण, माईचं तारूण्य मागे टाकून झपाझप पावले टाकत बाबा एका अनामिक ओढीनं अज्ञातात गेले. नित्य ज्याचं नाव जपायचे.. त्या मंगेशाकडे!.. मा. दीनानाथजी पट्टीचे गाणारे खरे पण म्हणायचे माझ्या गळ्यात हुकमी ‘गंधार’ नाहीय. हा ‘गंधार’ ज्याच्या गळ्यात, हुकमी उपजतो त्यांच्या पायावर साक्षात लक्ष्मी लोळण घेते. बालगंधर्वांना ती देणगी आहे.. मला नाही. पोरी!..तुझ्या गळ्यात ‘गंधार’ आहे.. ईश्वराने कृपा केलीय.. गळ्यातला ‘गंधार’ सांभाळ!!’

लतादीदीने आपल्या स्वकर्तृत्वानं गायनक्षेत्रातली सर्वच शिखरं लीलया काबीज केली आहेत. अनेक अडचणी, लोकापवाद, कौटुंबिक घाव सहन करीत आजपर्यंतची सफर तय केलीय. कविराज जगदीश खेबुडकरांनी ‘साधी माणसं’ मधल्या या गाण्यात त्या कथानकाला अनुरूप अशी काव्यरचना संगीतकार ‘आनंदघन’ अर्थात आपल्या लतादीदींना सोपवली खरी, पण त्या गाण्यातलं शेवटचं कडवं किती वास्तवपूर्ण, हृदयस्पर्शी आहे पहा.. त्यातला भावार्थ आपल्या प्रत्येकाच्या जीवनाशी इतका निगडीत आहे की ते गाणं जणू आपल्या प्रत्येकाचं ‘जीवनगाणं’ व्हावं..

*सुख थोडं, दुःख भारी, दुनिया ही भलीबुरी,*
*घाव बसल घावावरी, सोसायाला, झुंजायाला,*

*अंगी बळ येऊ दे..*
*आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..*

♥

लतादीदी (अर्थात संगीतकार ‘आनंदघन’) यांचा आविष्कार असलेल्या काही ‘यू-ट्युब’ लिंक्स :

१. लता मंगेशकर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/dF71gtz15Xo

२. लता मंगेशकर (१०० मराठी सुपरहिटस्) https://youtu.be/RzfvE1Cj8Bg

३. ‘आनंदघन’ (लता मंगेशकर) (ऑडिओ)

https://www.youtube.com/playlist?list=PLzszD5D0XpM-AeLZxptPwNIY-GdPdutis

## २८ : ऐरणीच्या देवा तुला..

चित्रपट : साधी माणसं (१९६५)
निर्माता/दिग्दर्शक : भालजी पेंढारकर
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : जगदीश खेबुडकर
संगीत : आनंदघन

ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू देऽऽ
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..

लेवू लेणं गरीबीचं, चणं खाऊ लोखंडाचं - २
जिनं व्हावं आबरूचं,
धनी मातूर माझा देवा, वाघावानी असू देऽऽ
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..

लक्ष्मीच्या हातातली चवरी व्हावी वरखाली,
इडा-पिडा जाईल, आली
किरपा तुझी भात्यातल्या, सुरासंग, गाऊ दे..
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..

सुख थोडं, दुःख भारी, दुनिया ही भलीबुरी,
घाव बसंल घावावरी, सोसायाला, झुंजायाला,
अंगी बळ येऊ दे..
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे....
ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू देऽऽ
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे..
(राग : भूप, नट)

♥

अतिशय सर्वांगसुंदर असा हा चित्रपट. या गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक देत आहे :

१. ऐरणीच्या देवा तुला.. (ऑडिओ) https://youtu.be/vHZnbf6CeYE

२. ऐरणीच्या देवा तुला.. (ऑडिओ - एच.एम.व्ही ) https://youtu.be/F1Pne2TjGCk

३. ऐरणीच्या देवा तुला.. (व्हिडिओ) https://youtu.be/8aTGUrolfBE

४. ऐरणीच्या देवा तुला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/5F2OY_78Ki4

५. साधी माणसं (१९६५) (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/zVmS4VehXYI

♥

## २९. सुबहा न आयी.. शाम न आयी..

त्यांचं नाव तितकंसं सुप्रसिध्द नाहीय. नावाभोवती वलय असण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. हेच पहा ना! ते गेल्याची बातमी कोणत्याच वर्तमानपत्रात आल्याचं ऐकिवात नाही. खंत वाटतेय. तसा 'इक्बाल कुरेशी' नावाचा कुणी संगीतकार होता याचाच अचंबा मी कित्येकांच्या चेहऱ्यावर पाहिला. स्मरणशक्तीला ताण देत आठवण्याचा वायफळ प्रयत्न करू नये म्हणून मी त्यांची अमुक अमुक गाणी होती असं सांगितलं. गाणी लक्षात येताच मग मात्र ओळखीची खूण प्रत्येकाच्या डोळ्यात दिसली. दूरदर्शनवरच्या छायागीत किंवा गीत-अतीतमध्ये ही गाणी पाहिलीत खरी, असं सांगू लागले. १९६०साली साधना आणि जॉय मुकर्जीचं सिमला प्रकरण ज्यांनी पाहिलं आहे त्यांना 'गाल गुलाबी किसके है..', 'ऐ बेबी इधर आ..', 'दिल थाम चले..' वगैरे गाणी आठवत असतील. 'बिंदिया' (१९६०) फटफटीत कपाळानंच तिकिटबारीला सामोरा गेला, पण त्यातलं 'मैं अपने आप से, घबरा गया हूँ, मुझे ऐ जिंदगी..' हे रफीचं गाणं चांगलंच होतं. शशी कपूर-रागिणीवर फिल्मांकन झालेलं 'फिर आने लगा याद वोही प्यार का आलम..' आणि त्यातलंच 'कितनी हसीन हो तुम..' (ये दिल किसको दूँ -१९६३) आपल्या अत्यंत आवडीची आहेत. शेख़ मुख़्तारचा 'उमर कैद' (१९६१) पुढे कुणी फुकट दाखवला असता तरी बघायची इच्छा नसती झाली. पण त्यात 'मुझे रात दिन ये ख़याल है..' हे मुकेशने गायलेलं गाणं बेहेतरीन होतं. संगीतकार 'इक्बाल कुरेशी' आज आपल्यात नाहीत. शनिवार, दि. २१ मार्च, १९९८ रोजी त्यांचं निधन झालं. बातमी कुठेच आली नाही पण त्यांची गाणी मात्र आपल्या मनात नक्कीच खळबळ माजवतील...

*ख़ुशी जिसने खोजी, वो धन लेके लौटा,*
*हँसी जिसने खोजी, चमन लेके लौटा,*
*मगर प्यार को, खोजने जो चला वो,*
*न तन लेके लौटा, न मन लेके लौटा..*

गाण्या आधीचा एक शेर! जणू चित्रपटातला प्रसंग डोळ्यांपुढे साकारणारा! १९६४ साली 'चा चा चा' नामक सिनेमा अभिनेता असलेल्या चंद्रशेखर (भवदीप फिल्म्स्) यांनी निर्मिलेला. नायिका होती चक्क हेलन. (कोई मिला नही क्या?) वन-टू-चाचाचा या कुठल्याश्या इंग्लिश नृत्यप्रकारात प्रवीण असलेली नर्तकी हेलन आणि नायक चंद्रशेखर यांच्यातली ही प्रेमकहाणी. ओ.पी.रल्हन, बेला बोस, पोल्सन, इफ्तेखार, टुनटुन, अरुणा इराणी, मदनपुरी, ओमप्रकाश अशी फौज. ॲक्शन, ड्रामा, ख़ून्नस, खून-खराबा वगैरे प्रकार नसलेला एक स्वच्छ सिनेमा. कुठल्याश्या अपघातामुळे या नर्तकीवर आपत्ती येते. आपण हे असे हतभागी. नायकाचं आयुष्य आपल्यामुळे ढवळून निघेल या उदात्त भावनेने ती बिचारी त्याच्यापासून दूर होते, खस्ता खाते. तो बिचारा विरहात होरपळत राहतो. उदास तराणे छेडणारा नायक आणि प्राप्त परिस्थितीशी मुकाबला करण्याचा आटापिटा करणारी हतबल प्रेयसी.. सुरुवातीचा दोहा (!) आळवून होताच रफीचा आवाज अधिकच हळवा, छिन्न होत ऐकू येतोय..

*सुबहा न आयी, शाम न आयी,*
*जिस दिन तेरी याद न आयी, याद न आयी,*
*सुबहा न आयी, शाम न आयी..*

*कैसी लगन लगी ये तुझ से कैसी, लगन ये लगी है,*
*हँसी खो गयी, ख़ुशी खो गयी, आँसू तक अब रहन हो गये,*
*अर्थी तक निलाम हो गयी, अर्थी तक निलाम हो गयी,*
*दुनिया ने दुष्मनी निभायी, याद न आयी..*
*सुबहा न आयी, शाम न आयी..*

संगीतकार इक्बालजी मुळचे औरंगाबादचे. सोमवार, १२ मे १९३०चा जन्म. पिताजी आर्मीत. घरी कडक शिस्तीचं वातावरण असूनही ते संगीतात रमायचे. अब्बाजान आर्मीत रायफल हाताळण्यात माहीर तर इक्बालला छंद होता बासरीचा. संगीताचं वेड जोपासलं ते या बासरीनेच. आकाशवाणीच्या औरंगाबाद केंद्रात काम मिळालं.. पण थोड्याच दिवसात त्यांचं कुटुंब हैदराबादेत स्थायिक झालं. इथे हैदराबादेत कला अकादमीचं कार्य करता करता त्यांच्यातला संगीतकार मूळ धरू लागला. अनुभवानं हळुहळू

प्रगल्भ होऊ लागला. नोकरी मिळाली ती रेशनींग खात्यात. दिवसभर धान्यांच्या दाण्यांचा हिशेब करता करता संगीताकडे दुर्लक्ष होऊ लागलं. याच रेशनींग खात्यातल्या बदलीमुळे ते मुंबईत आले. आता मात्र त्यांना संगीतकार होण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं. 'पंचायत' (१९५७)ने प्रारंभ केला खरा, पण पुढच्याच 'बिंदिया'ने (१९६०) भुईसपाट होण्याचं कर्तृत्व दाखवलं. हताश झाले इक्बालजी! चंद्रशेखर हा त्यांचा हैदराबादेतला दोस्त. सी. रामचंद्र, शंकर-जयकिशन इत्यादी धुरंदर संगीतकारांची घोडदौड उघड्या डोळ्यांना दिसत असूनही चंद्रशेखरने आपला 'चा चा चा' (१९६४) हा चित्रपट मोठ्या विश्वासानं इक्बालजींकडे सोपवला. विरहात होरपळणाऱ्या नायकाच्या भावभावनांचा कल्लोळ अचूक व्यक्त केलेलं काव्य नीरजजींनी इक्बाल कुरेशींकडे खूप अपेक्षेने दिलं..

*तुम मिल जाते, तो हो जाती,*
*पूरी अपनी 'रामकहानी',*
*ख़ंडहर ताजमहल बन जाता,*
*गंगाजल आँख़ो का पानी,*
*साँसो ने हथकडी लगायी, याद न आयी,*
*सुबहा न आयी, शाम न आयी..*

गाण्याची चाल, ठेका आणि ट्रीटमेंट पाहून नीरजजी थक्कच झाले. रफीनेही समाधान व्यक्त केलं. गाण्याच्या ध्वनिमुद्रणात लक्ष्मीकांत, प्यारेलाल अशांसारखे त्याकाळचे दिग्गज वादक होते. अरेंजर सॅबेस्टीयन असल्यानेच की काय या गाण्यातून वातावरणनिर्मिती साधली गेलीय. इक्बालजींनी या गाण्याच्या निमित्ताने का होईना, रफीच्या 'सुपर-हिटस्'मध्ये आपलं मानाचं स्थान पटकावलं, भारतीय चित्रपट संगीतात एक रत्न जडवलं. चित्रपटातली इतर गाणीही खासच होती. 'एक चमेली के मंडवे तले..' (रफी-आशा, गीतकार : मखदुम मोईनुद्दीन), 'वो हम न थे, वो तुम न थे..' (रफी, गीतकार : नीरज), 'एक लली घर से चली..' (रफी, गीतकार : भरत व्यास)! एकेका सिनेमाचं आपलं असं नशीब असतंच असतं. 'चा चा चा' (१९६४) बॉक्स-ऑफिसवर धाड्कन आपटला. स्पर्धेत होते संगम, दोस्ती, लीडर, जहाँ-आरा, आयी मिलन की बेला, कोहरा, शहनाई, बेटी-बेटे, चित्रलेखा, आप की परछाईयाँ, गजल, कश्मीर की कली, वो कौन थी, जिद्दी, सुहागन.. अशा तगड्यांच्या स्पर्धेत इक्बाल कुरेशींचा काय टिकाव लागणार होता? बिनाका गीत माला या कार्यक्रमात या गाण्याची वर्णी लागली, हेही नसे थोडके. फिल्मफेअरची तर बातच न्यारी. फ्लॉप पिक्चरला तिथं विचारतंय कोण? फिल्मफेअरच्या पुरस्कारांपैकी पाच तर एकट्या 'दोस्ती'लाच मिळाले. 'चा चा चा' (१९६४) बॉक्स-ऑफिसवर किती चालला ? ठाऊक नाही. सगळे गेलाबाजार सिनेमे हे 'यू-ट्युबवर' हमखास सापडतात. पण दुर्दैवाने हा सिनेमा उपलब्ध नाही. पूर्ण फिल्म असं लिहिलेली एक बत्तीस मिनिटांची लिंक मात्र सापडली. (ती सोबत देत आहे.)

खानदानात संगीत नव्हतं इक्बालजींच्या, पण त्यांना इश्वरी देन होती उत्तम संगीताची. निगार सुल्ताना, चंद्रशेखर, जगदीप, रफीक अहमदजी अशांच्या प्रोत्साहनामुळे हा निगर्वी, सालस आणि गुणी संगीतकार रसिकांपुढे मोजक्या गाण्यांचा नजराणा घेऊन पेश झाला. पन्नास चित्रपटांची शिदोरी पण 'लव्ह इन सिमला' वगळता आनंदीआनंद. कारण! पदरी पडायचं तेच मुळी 'बी' ग्रेडचं. इंडस्ट्रीतले नामचीन लोक त्यांच्या गाण्यांची तहे दिलसे तारीफ़ करायचे. पण त्यांचा कुणी बड्या निर्मात्यांशी ताल्लुक़ घडवून आणला नाही. सगळ्या वादक-संगीत संयोजकांशी त्यांची जान-पहचान होती, चांगले घरोब्याचे म्हणावे असे दृढ संबंध होते, पण कधी कुणी त्यांची शिफारस केली नाही. लोक फक्त सुचवायचे पण त्यात पुढाकार घेणारं कुणीच नव्हतं. कामासाठी कुणाकडे याचना करावी किंवा कुणाचे उंबरठे झिजवणं हे इक्बालजींच्या रक्तात नव्हतं. शम्मी कपूरचा 'जानवर' मिळणार होता. 'लीडर' मिळायची शक्यता होती, पण काय चक्रे फिरायची कुणास ठाऊक, इच्छिलेलं इक्बालजींच्या वाट्याला यायचंच नाही. ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या सुपरहिट गाण्यांचे धनी ठरले. हातात कामं येत नाहीत म्हणून हळुहळू निष्प्रभ होत गेले. अपेक्षाभंगाने खचले. निराश झाले. घरी फावल्या वेळी एखादी धून सुचताच हातातल्या माचिसवर ठेका धरत गाताना किंवा कुठेतरी शून्यात पाहत चार्लीवर विचार करताना ते याक्षणी आठवताहेत.. असं तरन्नूम ही त्यांची कन्या सांगत होती. माझ्या डोळ्यांपुढे त्यांचं सव्वासहा फूट उंच व्यक्तिमत्त्व उभं राहिलं.. आमच्या स्टुडिओत रेकॉर्डिंगसाठी येणारे वादक इक्बालजींबद्दल विचारताच भरभरून बोलतात. त्यांचं रेकॉर्डिंग असलं की वादक नेहमीच चांगल्या मूडमध्ये असायचे.. कारण इक्बालजींचा मृदू स्वभाव आणि वागणं असायचं एखाद्या कुटुंबवत्सल पित्याप्रमाणे. बुजुर्ग वादक जे मोठमोठ्या संगीतकारांकडे वाजवायचे त्यांना इक्बालजींच्या चालीतलं वेगळेपण क्षणात जाणवायचं. ते त्यांना नेहमी सुचवायचे की इतक्या चांगल्या धुना बनवता तर जा आणि घ्या ना कुणाची शिफारस! त्यात काय एवढं! तुम्हाला एक ना एक दिवस मोठा बॅनर नक्कीच मिळेल. पण इक्बालजी नुसतं हसायचे. शायरीतून सांगायचे.. म्हणायचे..

*‘मुझको झुलसती धूप से, देता क्या वो निजात?*
*साया तो खुद था, मेरे बदन की पनाह में!*
*मेरे रोने पे जो हसता होगा*
*उसका ग़म मुझसे ज्यादा होगा,*
*इस तरहा हँस रहा हूँ मैं,*
*पी पी के अश्क-ए-ग़म,*
*यूँ दुसरा हँसे, तो कलेजा निकल पडे..’*

अशा शायरीतून जीवनाचं भाष्य अनुभवलेल्यांना कसली आलीय अपेक्षाभंगाची चिंता? हसतमुख रहात येणारा दिवस साजरा करत आयुष्याच्या कातरवेळेपर्यंत वाटचाल केली इक्बालजींनी. दोन महिने आजारी असल्याचं कळलं आणि अचानक एक संध्याकाळी प्राणज्योत मालवली. जगातले व्यवहार तसेच सुरु होते. कुणालाच खबर नव्हती त्यांच्या निधनाची. कारण?...त्यांचं नाव तितकंसं सुप्रसिध्द नाहीय. नावाभोवती वलय असण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही...

♥

दुर्लक्षित संगीतकारांचं गाणं असलं तरी ते आपल्या आवडत्या गाण्यांच्या यादीत आहे. म्हणून त्या गाण्याची ‘ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक’ यांची ‘यू-ट्युब’ लिंक देत आहे. सोबत याच सिनेमातलं ‘एक चमेली के मंडवे तले..’ आणि इतर सुपरहिटस् (व्हिडिओ) :

| | |
|---|---|
| १. सुबह ना आयी.. (ऑडिओ) | https://youtu.be/2lDZytVwHto |
| २. सुबह ना आयी.. (व्हिडिओ) | https://youtu.be/vWuCjeBUcz4 |
| ३. सुबह ना आयी.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/67uFciRoMng |
| ४. ‘चा चा चा’ (१९६४) (व्हिडिओ लिंक) | https://youtu.be/uf99lW5ksKw |
| ५. संगीतकार ‘इक्बाल कुरेशी’ हिटस् | https://youtu.be/81z-a7IxSHY |

♥

| | |
|---|---|
| १. एक चमेली के मंडवे तले (व्हिडिओ) | https://youtu.be/Dddz_VWPKnc |

याच चालीतील आणखी एका गाण्याची ‘यू-ट्युब’ लिंक.. अवश्य पहा.

| | |
|---|---|
| १. आज मौसम की मस्ती..(रफी-लता)(बनारसी-ठग १९६३) | https://youtu.be/Ra-wu1eYplg |
| २. आज मौसम की मस्ती..(रफी-लता)(बनारसी-ठग १९६३) | https://youtu.be/-OgXDJsyMLM |
| ३. आज मौसम की मस्ती.. (दोन्ही गाणी) | https://youtu.be/Yt7EzloXCQE |

♥

## २९ : सुबहा न आयी.. शाम न आयी..

चित्रपट : चा चा चा (१९६४)
निर्माता-दिग्दर्शक : चंद्रशेखर
गायक : महंमद रफी
गीतकार : नीरज
संगीतकार : इक्बाल कुरेशी

ख़ुशी जिसने खोजी, वो धन लेके लौटा,
हँसी जिसने खोजी, चमन लेके लौटा,
मगर प्यार को, खोजने जो चला वो,
न तन लेके लौटाऽऽ, न मनऽऽलेके लौटा..

सुबहा न आयी, शाम न आयी,
जिस दिन तेरी याद न आयी, याद न आयी,
सुबहा न आयी, शाम न आयीऽऽ

कैसी लगन लगी ये तुझ से कैसी, लगन ये लगी है,
हँसी खो गयी, ख़ुशी खो गयी, आँसू तक अब रहन हो गये,
अर्थी तक निलाम हो गयी, अर्थी तक निलाम हो गयी,
दुनिया ने दुष्मनी निभायी, याद न आयीऽऽ
सुबहा न आयी, शाम न आयीऽऽ

तुम मिल जाते, तो हो जाती,
पूरी अपनी 'रामकहानी',
ख़ंडहर ताजमहल बन जाता,
गंगाजल आँख़ो का पानी,
साँसो ने हथकडी लगायी, याद न आयीऽऽ
सुबहा न आयी, शाम न आयीऽऽ

जैसे भी हो, तुम आ जाओ - २,
आग लगी है, तन में और मन में - २,
एक तार की दूरी हैऽऽ -२
बस, दामन और कफ़न में,
हुई मौत से संग सगाई, याद न आयीऽऽ
आ जाओऽऽ, आ जाओऽऽ, आ जाओऽऽ,

♥

## 30 : Ganga Jamuna Dolyat Ubhya..

## ३० : गंगा जमुना डोळ्यात उभ्या का ?

'दादा' गेले!.. होय.. आपले पी. सावळाराम!.. जनकवि!! रविवार, दि. २८ डिसेंबर, १९९७ ची ठाण्यातली सकाळ उगवली तो याच मनहूस बातमीनं. दुसऱ्या दिवशी सोमवारी थरथरत्या हातानं वर्तमान पत्रे चाळत होतो आपण. बातमी धक्कादायक होती. एका हातात चहाचा पेला हिंदकळत होता, आणि त्याचे पेपरवर पडलेले शिंतोडे हिणवत होते आपणाला. 'कवी फक्त काव्य करतो पण त्याचा रसस्वाद घ्यायला मात्र पंडित लागतो' अशा आशयाचं एक सुभाषित आहे, होय ना! पण पी. सावळारामजींसारख्या मोजक्या कवींचं काव्य, त्याचा पिंड, आशय असा असतो की ते थेट सर्वसामान्य माणसाच्याच मनाला भिडणारं असतं. 'गेयतेवाचून गाणी म्हणजे पेयतेवाचून पाणी' अशी आपली बाजू हिरीरीने मांडणारे अनेक कवी डंका पिटत असतात. कवि यशवंत, गिरीश किंवा अगदी सोपानदेव चौधरी अशा बुजुर्गांनीही 'याचाच' उदो उदो करत आपला सांप्रदाय महाराष्ट्रात वर्चस्व निर्माण करायला हवा असा विडा उचलला होता, हे आपण जाणताच. काटशह दिला तो ग. दि. माडगुळकरांनी आणि त्याच नक्श-ए-कदमवर जात सहजसुंदर आविष्काराने अवघ्या जनसामान्यांच्या हृदयावर अधिराज्य करण्याचा मान मिळवला तो पी. सावळारामजींनी.. दादांनी!

अण्णा (गदिमा) आणि दादांचा स्नेह सुपरिचित आहे आपल्याला. आचार्य अत्रेंना या दोघांच्या प्रतिभेबद्दल विलक्षण कौतुक होतं. ते 'पी. सावळाराम'ना 'सावळ्या' आणि 'गदिमां'ना 'मावळ्या' म्हणायचे. गदिमांच्या आठवणींना उजाळा देताना दादांनी एक किस्सा सांगितलेला.. एकदा दादा पुण्याला गदिमांच्या घरी गेले होते. व्हरांड्यातच गदिमा खांबाला टांगलेल्या आरशात पाहत दाढी करत होते. दाढी करता करता अचानक ते थबकले. आरशात, पायऱ्या चढणाऱ्या पी. सावळारामजींचं प्रतिबिंब दिसत होतं. झर्रकन मागे वळून पाहिलं अण्णांनी.. म्हणाले..
'सावळ्याऽऽ अरे लेका तू कमाल केलीस बघ..'
'मी ?.. म्हणजे ?'
'अरे, तू मला चक्क स्वयंपाकघरातून व्हरांड्यात टाकलंस बघ..'
'काय ?..ते कसं बुवा ?'
'लेका, आत जाऊन बघ.. आत स्वयंपाकघरात माझी बायको, तुझी गाणी गुणगुणतेय..'
सावळारामजींनी आत डोकावलं. वहिनी तिथलं काम उरकता उरकता एकीकडे 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का.. जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..' गुणगुणत होत्या. एका दिग्गज प्रतिभासंपन्न कवीने दुसऱ्या कवीला किती उत्स्फूर्त दाद दिलीय पहा..

तसा या गाण्याचा जन्म पुण्यातलाच. रेल्वे स्टेशनवरचा. १९४८ साल असेल ते. अर्थात प्लॅटफॉर्मवर हीऽऽ गर्दी आणि गाडीत हीऽऽ रश, असा प्रकार नव्हता त्या काळी. रखरखीत दुपार होती ती. मे महिन्यातलीच. दादा मुंबईकडे जाणाऱ्या गाडीत बसले होते. गाडी सुटायला अवकाश असल्याने, गाडीच्या चौकोनी खिडकीतून जे काही नजरेस पडतंय ते डोळ्यात साठवत कसाबसा टाईमपास करताहेत दादा. समोरच एक लग्नाचं व्हराड! नातेवाईकांच्या गराड्यात एक नव-वधू! अंगावर भरपूर दागिने! शालू! नऊवारी लुगडं नेसलेली तिची आई ओक्साबोक्शी रडणाऱ्या लेकीचं सांत्वन करतेय. एकमेकांच्या मिठीत बध्द अशा त्या मायलेकींना रडताना पाहून पत्थरालाही पाझर फुटावा असा तो सीन. दादा पाहत होते. ती आई लेकीच्या पाठीवर प्रेमानं हात फिरवता फिरवता सांगत होती..
'रडू नकोस पोरी.. गंगा-जमुना आणू नकोस डोळ्यात.. जाऽऽ दिल्या घरी तू सुखी राहा!' गाडीनं पुणं सोडून मुंबईकडे प्रस्थान केलं खरं पण दादांच्या डोळ्यांपुढून तो सीन काही हलत नव्हता.. दादांनी काव्य लिहिलं.. 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का..जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..'

दादा आणि संगीतकार वसंत प्रभू यांची घनिष्ठ मैत्री होती. दोघं लिंबूवाला मार्केटच्या एका संकेतस्थळी नेहमीच भेटायचे. गप्पांचा फड रंगायचा. तबलजी मारुती कीर आणि इतर दोस्तांच्या गोतावळ्यात हा किस्सा त्यांनी मग सर्वांना ऐकवला. काव्यवाचनही झालं. लिंबांच्या धुंद सुवासाच्या सानिध्यात या गाण्यातल्या शब्दांवर बराच खल झाला. गाण्यात बाकी सगळं ठीक वाटतंय. 'डोळ्यात' हा शब्द गेय नाहीय. नयन, नेत्र, लोचन हे शब्द कसे काव्यानुकूल वाटतात की नाही ? 'डोळ्यात' हा शब्द थोडा रुक्ष वाटतो बुवा!.. पण दादांनी तोच शब्द कसा तिथे चपखलपणे बसतो हे विस्ताराने सांगितलं. उपस्थितांनी त्यांच्या त्या स्पष्टीकरणावर अनुमोदन देत त्यांचं कौतुक केलं. संगीतकार वसंत प्रभूंनी हार्मोनियम पुढे ओढून घेत त्या काव्याला मेहनतीनं चाल लावली. लतादीदींकडे गेले होते दादा. अवघ्या एकोणीस वर्षे वयाच्या होत्या दीदी तेव्हा. मराठीत मोजकंच गायलेल्या. वसंत प्रभूंनी

चाल ऐकवली. लतादीदींची गाण्याबद्दची त्यावेळची प्रतिक्रिया काय असेल त्यांनाच ठाऊक.. पण वसंत प्रभूंच्या सुरावटींवर त्या समाधानी होत्या. दादांच्या आशयघन काव्याला गेय आविष्कारातून सादर करताना दीदींनी जे भाव प्रकट केले आहेत त्याला तोड नाही. लग्न होऊन सासरी जाणाऱ्या लेकीला निरोप देणाऱ्या आईच्या मनातलं वादळ आपल्या आवाजातून नेमकं व्यक्त करणाऱ्या दीदी अवघ्या एकोणीस वर्षांच्या असतील हे जाणवतं 'त्या' सादरीकरणातून? आषाढात दाटलेल्या आभाळातून, अचानक धोSSधो रिता व्हावा अशा भावनांचा महापूर त्यांच्या आवाजात जाणवतो. आईच्या मनाची स्पंदनं जाणवताहेत. वात्सल्य, माया, ममता.. आपल्या मुलीच्या भवितव्याची चिंता तसेच आपल्याला आता तिचा वियोग जिवघेणा ठरणार आहे अशा सर्व भावनांचं एकत्रीकरण आढळतंय या गाण्यात. तुम्ही या गाण्याचं काव्य नुसतं वाचून पहा.. दादांना स्टेशनवर दिसलेलं ते दृष्य आपसूकच नजरेसमोर तरळतं..

*गंगा जमुना डोळ्यात उभ्या का?.. जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..*

*कडकडूनि तू मिठी मारता बाळे, बालपण आले आले, घुमवित घुंगुरवाळे,*
*आठवले सारे सारे, गहिवरले डोळे - २*
*कढ मायेचे तुला सांगती, जाss जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..*

*दारात उभी राहिली, खिल्लारी जोडी, बघ दीर धाकले बसले, खोळंबून गाडी,*
*पूस गं डोळे या पदराने, सावर ही साडी - २*
*रूप दर्पणी मला ठेऊनि जाss जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..*

*मोठ्याची तू सून पाटलीण मानाची, हसले तुझेss गं, हिरवेss बिल्वर नवीन चुडे,*
*बघू नकोस मागे मागे, लाडके बघ पुढे - २*
*नकोस विसरू परि आईला, जाss जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा..*

आई आणि सासरी जाणाऱ्या लाडक्या लेकीच्या भावसंबंधांचं उत्कट आणि प्रत्ययकारी दर्शन या गीतातून जाणवतं. आईच्या अंतःकरणाने गायलीय लतादीदी. अर्थात त्याचं बरंचसं श्रेय दादांना आणि संगीतकार वसंत प्रभूंना. या तिघांच्याही सृजनात्मकतेमुळे हे गाणं लाखों घरात पोहोचलं. शब्दांचं सामर्थ्य असतं ते असं.. या गाण्यानं इतिहास घडवला होता. आजपर्यंतच्या कित्येक पिढ्या या गाण्यांच्या सुरांच्या आधारावर सासरी गेल्या आहेत. हे गाणं पुनःपुन्हा ऐकवावं म्हणून त्या काळी आकाशवाणीवर पत्रांचा पाऊस पडायचा. शेवटी या पत्रांचा ढिगारा पाहून हतबल झालेल्या आकाशवाणी केंद्राला जाहीर निवेदन करावं लागलं की.. 'रसिकांच्या आग्रहास्तव आणि त्यांच्या विनंतीला मान देऊन, 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का..' हे गाणं रोज सकाळ आणि संध्याकाळच्या सभेत ऐकविण्यात येईल.. कृपया यापुढे पत्रं पाठवू नयेत..' आकाशवाणीवर अशी वेळ दुसऱ्या कोणत्या गाण्यानं आजतागायत आणलीय का?

पी. सावळाराम यांचं खरं नाव निवृत्तीनाथ रावजी पाटील. आषाढी एकादशी. शनिवार, दि. ४ जुलै १९१४ ही जन्मतारीख. सांगली जिल्ह्यातील तासगांव-निपाणी हे जन्मस्थळ. १९४८ साली 'राघू बोले, मैनेच्या कानात गं..' या दादांच्या गाण्याला संगीतकार वसंत प्रभूंनी स्वरबध्द करताच एका नवकवीची चाहूल लागली. कोलंबिया रेकॉर्ड कंपनीच्या तबकडीवर उमटलेल्या 'पी. सावळाराम' या अक्षरांनी या कवीची जगाला ओळख झाली. विधानसभेचे तत्कालीन सभापती वि. स. पागे हे दादांचे शाळकरी मित्र. हरिभाऊ आपट्यांच्या 'उषःकाल' कादंबरीतल्या 'सावळ्या' या व्यक्तिरेखेत त्यांना दादांचं प्रतिबिंब आढळलं म्हणून त्यांनी दादांना 'सावळ्या' म्हणून संबोधायला सुरुवात केली म्हणून सावळ्याचा सावळाराम झाला. तेव्हा आपल्या नावाआधी आडनावाचं आद्याक्षर लिहायची फॅशन होती. सी. रामचंद्र, व्ही. शांताराम तसे हे पी. सावळाराम! विधात्यानं दादांना आपल्याकडे बोलवून घेतलं खरं पण जोपर्यंत आपली मराठी संस्कृती जिवंत आहे तोपर्यंत 'पी. सावळाराम' या 'जनकवीं'च्या अक्षय गाण्यांचा दरवळ मराठी मनामनात बकुळीच्या फुलांसारखा सदैव दरवळत राहील..

♥

## ३० : गंगा जमुना डोळ्यात उभ्या का ?

गायिका : लता मंगेशकर
गीतकार : पी. सावळाराम
संगीत : वसंत प्रभू

गंगा जमुना डोळ्यात उभ्या का ? - २
जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..

कडकडूनि तू मिठी मारता बाळे,
बालपण आले आले, घुमवित घुंगुरवाळे,
आठवले सारे सारे, गहिवरले डोळे - २
कढ मायेचे तुला सांगती, जाऽऽ
जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..

दारात उभी राहिली, खिल्लारी जोडी,
बघ दीर धाकले बसले, खोळंबून गाडी,
पूस गं डोळे या पदराने, सावर ही साडी - २
रूप दर्पणी मला ठेऊनि जाऽऽ
जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा..

मोठ्याची तू सून पाटलीण मानाची,
हसले तुझेऽऽ गं, हिरवेऽऽ बिल्वरलवीन चुडे,
बघू नकोस मागे मागे, लाडके बघ पुढे - २
नकोस विसरू परि आईला, जाऽऽ
जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा..

♥

१. गंगा जमुना डोळयात.. (ऑडिओ) https://youtu.be/qgfk6OrWuOA

२. गंगा जमुना डोळयात.. (ऑडिओ) https://youtu.be/2ACO_7uaN_0

३. लतादीदी (भावगीते-मराठी अल्बम) https://youtu.be/q5-KO5fC4vk

४. लता मंगेशकर (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/RzfvE1Cj8Bg

५. लता मंगेशकर मराठी गाणी (व्हिडिओ) : https://youtu.be/9Md18LQ9XaY

६. लता मंगेशकर मराठी गाणी (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLGpLqaMxppFqTQug3QfM7cpZUf3eCMCY9

७. जनकवि पी. सावळाराम (८४ सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi942tN3FVEQqGpCP7TLnegod

♥

## 31 : Mere Pairo Me Ghungroo..

## ३१ : मेरे पैरों में घुंगरू बंधा दे..

‘काहीतरीच काय सांगताय तुम्ही? त्यांच्या छातीवर उभं राहून पैंजण बांधून घ्यायचे?.. उद्या नाचायलाही सांगाल तुम्ही त्यांच्याच छाताडावर..’
नायिका वैजयंतीमाला अक्षरशः आग ओकत होती.
‘मॅडम प्लीजऽऽ! प्रसंगच तसा आहे इथं. पुन्हा सांगतो.. या बागेतल्या लव्ह-सीनमध्ये नायक-नायिकेत छेडछाड होते, आणि अचानक तिच्या पायातला पैंजण खाली पडतो.. नंतर तो तिच्या हाती डायरेक्ट उचलून न देता स्वतः बांधायचे म्हणतो.. आता राजेंद्रकुमारजी जमिनीवर उताणे पडलेले असतील, तुम्हाला जवळ बोलवतील मग तुम्ही त्यांच्या छातीवर उभं राहून त्यांच्या हातानं पैंजण बांधून घ्यायचे.. ते तुमच्या सौंदर्याची तारीफ करतील आणि गाणं सुरु होईल.. हे.. हेच ते लव्हसाँग!..’ इति सह-दिग्दर्शक.
‘खड्ड्यात गेलं तुमचं ते लव्ह-साँग!..काहीतरीच काय? डोकं-बिकं फिरलंय की काय तुमचं? हा.. हा असला घागरा घालून मी त्यांच्या छातीवर उभी राहू?.. शीऽऽ! ’ मट्कन खुर्चीत बसल्या बाई.
‘जर मी हा प्रसंग करायला तयार झालोय तर तुम्हाला काय हरकत आहे?’
बिचारा राजेंद्रकुमार समजावण्याच्या खटपटीत.
‘तुम्हाला काय हो! तुम्हाला काय खटकणारेय.. हे सीन सांगणार आणि तुम्ही तो आवडीनं करणार (पाहणार) मी नाही बाई करणार.. हा असला सीन!’

शेवटी राजेंद्रकुमार आणि त्यांचे बंधू निर्माते नरेशजी या दोघांनी आग्रह करून त्यांना हवे तसे कॉस्च्युम्स घालायला दिले. शेवटी एकदाचं ते शूट उरकलं. आता गाण्याचा पोर्शन! डान्स-डायरेक्टरने मग पुढचं पाऊल म्हणून वैजयंतीमालाला राजेंद्रकुमारच्या छातीवर नृत्यही करायला लावलं. त्या काळात हिरॉइन्समध्ये झीरो फिगरचं इतकं खूळ नव्हतं. नायिका बऱ्यापैकी भरलेल्या अंगाच्या असायच्या. टकाटक! तुम्हीच विचार करा. सत्तर ते पाऊणशे किलो वजनाच्या बाईला छातीवर उभं करायचं. ते वजन पेलायचं. तिच्या पायात प्रेमानं पैंजण बांधायचे.. आणि कळस म्हणजे या सीनमध्ये रोमान्स आहे ना? मग चेहऱ्यावर निरातिशय आनंद, उत्साह आणायचा? हे प्रभूऽऽ! राजेंद्रकुमारने तो सीन कसा केला असेल, ते त्याचं त्यालाच माहीत. पण बारकाईनं पाहिलं तर त्याने ओढून-ताणून केलेला अभिनय, त्याची धडपड स्पष्टपणे जाणवते. वैजयंतीमाला मात्र तो सीन एन्जॉय करतेय असं वाटतं. रेल्वे-स्टेशनमधल्या वजन-काट्यावर उभं राहण्याइतक्या सहजतेनं राजेंद्रकुमारच्या छातीवर गोड चेहऱ्याची मादक वैजयंतीमाला! तिच्या चेहऱ्यावर प्रियकराच्या हळुवार स्पर्शाची अनुभूती आहेच वर राजेंद्रकुमार घुंगरांचा आवाज करत तिच्या पायावर बोटं फिरवतानाचा रोमान्स तिने चांगलाच दाखवलाय. आपल्या वजनानं त्याची हालत खराब झालीय असे मिश्किल भावही आहेत तिच्या डोळ्यात. गँवार (१९७०)चा हा सीन आणि गाणं होतं..‘हमसे तो अच्छी तेरी पायल गोरी..’ (रफी-लता)

पायल-पाजेब-पैंजण-घुंगरुवर बेतलेली अशी अनेक गाणी आपल्याला बसल्या बैठकीत आठवतील. फडावरच्या तमाशापासून ते थेट कोठीवरच्या मुजऱ्यापर्यंत. पण ‘ते’ आपल्या पायात घालून नाचायचं ही हीरोची अदाकारी मला तरी वाटतं की ‘संघर्ष’ (१९६८) पासून सुरु झाली असेल का? दिलीपकुमारची हिरॉइन वैजयंतीमालाच होती. वैजयंतीमाला आपल्या अदाकारीने आणि थिरकण्यावर अवघ्या रसिक प्रेक्षकांच्या गळ्यातली ताईत बनली होतीच. पण इथे दिलीपकुमार पायात चक्क चाळ बांधून नाचतोय की काय अशा अवस्थेत आपल्याला दिसला. ‘संघर्ष’ एच. एस. रावेलसाहेबांचा. ‘मेरे मेहबूब’च्या यशानंतर त्यांची पत्नी अंजनाच्याच कादंबरीवर बेतलेला आणखी एक सिनेमा. अठराव्या शतकातलं कथानक. नौशादजींनी ‘मेरे मेहबूब’ची राजेंद्रकुमार-साधना ही जोडी ठेऊया असं सहज सुचवलं होतं, पण राजेंद्रजींचं रावेलसाहेबांबरोबर व्यवहारात खटकल्यामुळे काही जमेना. रावेलजी राजकुमारकडे गेले, पण तिथं डाळ शिजली नाही. साधनाचं नाव नक्की होतं. पुढे फेमस स्टिडिओला ‘संघर्ष’चे सेटस् लागून मुहूर्त झाला. हीरो दिलीपकुमार आणि हिरॉइन साधना. साधनाचं कुणाशी बिनसलं की काय, तिने अचानक नकार कळवला. आता नजरा खिळल्या वैजयंतीमालावर. तिने होकार देताच शूटिंग सुरु झालं. सोबत होते बलराज साहनी, संजीवकुमार, जयंत, दुर्गाबाई खोटे इत्यादी. शूट सुरु होतं पण एके दिवशी बडेमियाँ आणि वैजयंतीमालामध्ये खटका उडाला. याचा परिणाम म्हणून की काय दोघांचे आमने-सामने असे सीन्स, प्रणयप्रसंग रसहीन वाटतात. निर्मात्याशीही त्यांचं खटकलं. एकत्र काम करावं लागत होतं पण सर्वांमध्ये होती एक तिरस्काराची भिंत. खुन्नस. संघर्ष! क्लायमॅक्सच्या चित्रणाच्या वेळी तर रावेलसाहेब चक्क कश्मीरला निघून गेले. सेट लागला होता लाखो रुपयांचा. त्यांनी नौशादजींना सांगून दिलीपकुमारला पटवायची विनंती केली.. म्हणाले की हवंतर मी सेटवर येत नाही. आता बडेमियाँ हट्टाला पेटले. नौशादजींनी त्याची समजूत घालून कसंबसं सेटवर आणलं. तो सेटवर येताच

रावेलजी निघून गेले. आता दिलीपकुमारने पवित्रा घेतला की 'डायरेक्टर येत नाही, सीन समजावून सांगत नाही तोपर्यंत शूटिंग करणार नाही.' मिशी नाही तर नाटक नाही. काय मगजमारी आहे यार! शेवटी दिग्दर्शक येताच शूट पार पडलं. चित्रपटाचं नाव 'संघर्ष' असल्यामुळेच की काय खटके, रुसवे-फुगवे आणि तिरस्काराच्या आतषबाजीत पिक्चर पूर्णत्वाकडे रडत-रखडत वाटचाल करत होता. नौशादजी 'संघर्ष'ची ही अनदेखी स्टोरी वैतागतच सांगत होते. एकतर या निर्मात्यांनी त्यांच्या संगीत-दिग्दर्शनात बरीच ढवळाढवळ केली होती. मानधनही रखडवलं होतं. आपण पिक्चर बघायला जातो. संपताच बाहेर येऊन तो चांगला होता किंवा छ्याऽऽ! बेकार होता असं सांगून हात झटकून मोकळे होतो. पण तो बनवताना काय काय नाटकं होत असतील, किती आणि कसल्या प्रसंगांना तोंड द्यावं लागत असेल ते जावे त्यांच्या वंशा म्हणजे कळेल. मला सुध्दा मानापमानचे अनेक एपिसोडस् 'रेकॉर्डिंग स्टुडिओ'तही पहायला मिळालेत.

चित्रपटात अठराव्या शतकातला जो काळ उभा केला होता आणि जो माहौल होता त्याला अनुरूप होऊ शकलं असतं ते केवळ बनारसी ढंगाचं लोकसंगीत. या सिनेमासाठी नौशादजींनी कजरी, ठुमरी, दादरा, चौरी वगैरे प्रकार हाताळायचं ठरवलं होतं. उत्सवी सिच्युएशनला फिट्ट बसेल असं बनारसी टाईप गीत करावं म्हणून शकील बदायुनींनी मुखडा दिला..

*मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले..*

गावातले लोक आनंदोत्सव साजरा करत आहेत. भांग पिऊन सगळेजण नाचताहेत, गाताहेत. नायकही त्यात सामील झालाय. हीरोची इमेज खराब होऊ नये म्हणून त्याला डायरेक्ट चाळ बांधून नाचायला न लावता तिथले लोक त्याला जबरदस्तीने भांग पाजतात आणि मग त्याला पायात चाळ बांधून नाचण्यासाठी भाग पाडतात अशी उत्सवी सिच्युएशन होती ती. नौशादजींनी त्याबरहुकुम गाणं करून घेतलं. ढोलक, टूटी (म्हणजे क्लॅरोनेट-शहनाई-ओबो तसेच बासरी असं एकत्रित वादन), व्हायोलिन्सचा ताफा अशा रंगतदार ऑर्केस्ट्रेशनने सजवलं. रफीने नौटंकी थाटात, भांग प्याल्याच्या आवेशात ते गायलं..

*दिल पाया अलबेला मैनेऽऽ, तबीयत मेरी रंगीली, हायेऽऽ*
*आज ख़ुशीसे मैने भैयाऽऽ, थोडीसी भंग पी लाऽऽ*

चला.. आता पायात चाळ बांधायला मोकळे..

*मेरे पैरों में हायेऽऽ, मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले..*

अस्सल बनारसी बाज आहे गाण्याचा. अमिताभ हा दिलीपकुमारची कॉपी करतो अशी आवई उठली होती हे तुम्हाला आठवतच असेल. 'डॉन' (१९७८) सिनेमातलं 'खाई के पान बनारसवाला..' आल्यावर तर या गोष्टीला खतपाणीच मिळालं. अमिताभचा हा आविष्कार 'मेरे पैरों में घुंगरू बंधा दे..' याच गाण्याची कॉपी, नवी आवृत्ती म्हटली गेली होती हे काय मी सांगायला हवंय?

तुम्हाला आठवत असेल. १९६१ साली दिलीपकुमार निर्मित, नितीन बोसचं दिग्दर्शन असलेला 'गंगा-जमना' नामक सिनेमा रिलीज झालेला. या हिट चित्रपटात योगायोगानं त्याची नायिका वैजयंतीमालाच होती, संगीत नौशादजींचंच होतं. अशाच प्रकारचा प्रसंग त्यात होता. अशाच स्टाईलचं गाणं त्यात होतं. पण तिथला दिलीप वेगळा भासला होता. स्वतः निर्माता असल्याने आपण नाचलो तर चीप होऊ की काय अशी भीती वाटली असावी. डान्स-डायरेक्टर हिरालालजींनी हरतऱ्हेने विनवूनही बडेमियाँ डान्स करायला तयार झाले नाहीत. 'छे.छे.. तसलं काही करणार नाही मी. तुम्ही हवं तर साधासा डान्स करून घ्या. नृत्ये हवीत तर वैजयंतीमाला आहेच की.. मला कशाला नाचवताय?..' शेवटी सगळ्यांनीच आग्रह केल्यामुळे बडेमियाँ नाचले आहेत अगदी फर्मास! गाणं होतं..'नैन लड जईएं तो मनवा मां कसक होई बे करी..' सात वर्षांनंतर दिलीपसाब पुन्हा एकदा तशाच प्रकारच्या गाण्यात नाचले. लाल चुनरीया ओढून, जणू पायात चाळ बांधून.

'संघर्ष' (१९६८)ची गाणी चांगली होती. 'जब दिल से दिल टकराता है..' (रफी), 'इष्क दीवाना हुस्न भी घायल..' (रफी), 'मेरे पास आओ नजर तो मिलाओ..' (लता), 'तस्वीर-ए-मुहब्बत थी जिसमें..' (आशा भोसले) आजही आठवतायत. मुख्य म्हणजे ती आँखे, आशीर्वाद, अनोखी रात, ब्रह्मचारी, दो कलियाँ, हसीना मान जाएगी, हमसाया, इज्जत, झुक गया आसमान, कन्यादान, किस्मत, मेरे हमदम मेरे दोस्त, मेरे हुजूर, नीलकमल, पडोसन, राजा और रंक, साथी, साधु और शैतान,

सरस्वतीचंद्र, शिकार अशा चित्रपटातील गाण्यांबरोबर गाजत होती हे विशेष. 'संघर्ष' (१९६८) अजिबात चालला नाही पण हे गाणं आजही आपल्या ओठावर आहे..

*एक नजर से दिल भरमाए, दूजे से ले जाए,*
*तीजी नजर तू, ऐसी मारे, जो देखें लुट जाए,*
*सारी दुनिया तुझ पे दीवानी,*
*मैं भी तो देखू तेरी जवानी - २*
*जरा मुखडे से घुँघटा हटा दे, तो फिर मेरी चाल देख ले,*
*मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले..*

♥

दिलीपकुमार आणि महंमद रफीचं गाणं. या सुपरहिट गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

| | |
|---|---|
| १. मेरे पैरों में घुंगरू... (ऑडिओ) | https://youtu.be/aZV3_RyjTRk |
| २. मेरे पैरों में घुंगरू... (व्हिडिओ) | https://youtu.be/wEHb94UVNHo |
| ३. मेरे पैरों में घुंगरू... (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/X0lN5EYHk7Y |
| ४. 'संघर्ष' (१९६८) : (संपूर्ण चित्रपट) | https://youtu.be/DyHSOpcpAmI |

♥

गाण्यात संदर्भ आलाय म्हणून त्या गाण्यांच्या सुद्धा 'यू-ट्युब' लिंक्स देत आहे..

| | |
|---|---|
| १. हम से तो अच्छी तेरी.. (गंवार, १९७०) | https://youtu.be/-yK6sb024D0 |
| २. नैन लड जई है तो.. (गंगा जमुना, १९६१) | https://youtu.be/ya5h0g39Uvl |

महान अभिनेता दिलीपकुमार यांच्या काही 'यू-ट्युब' लिंक्स.

| | |
|---|---|
| १. दिलीपकुमार (५० सुपरहिटस्) (ऑडिओ) | https://youtu.be/i37yd6y5TQU |
| २. दिलीपकुमार (५१ सुपरहिटस्) (ऑडिओ) | https://youtu.be/W7ZRUgsdkOA |

♥

## ३१ : मेरे पैरों में घुंगरू बंधा दे..

चित्रपट : संघर्ष (१९६७)
दिग्दर्शक : एच. एस. रवेल
गायक : महंमद रफी
गीतकार : शकील बदायुनी
संगीत : नौशाद

रफी
दिल पाया अलबेला मैनेss, तबीयत मेरी रंगीली, हायेss
आज खुशीसे मैने भैयाss, थोडीसी भंग पी लीss
मेरे पैरों में हायेss, मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले.
मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख लेss
पुरुष स्वर : जरा जमके भैयाss
मोहे लाली चुनर, मोहे लाली.. चुनरीया उढा दे तो फिर मेरी चाल देख ले,
मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले
स्त्री स्वर : क्या चाल है तोरी
रफी : जरा झूम ले गोरी

रफी : हाले डोले किसी की नथनी, झूमें किसी का झूमका,
हर पारी दिल थाम ले अपना, ऐसा लगाऊँ ठुमका,
स्त्री स्वर : कैसे भला?
ऐसे.. जब हो किसी की ब्याह सगाई,
मेरी जवानी ले अंगडाई - २
कोई मेरी भी शादी करा दे, तो फिर मेरी चाल देख ले,
मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले.

रफी : कोई घुँघटवाली मेरे, दिल पे चलाए छुरीयाँ,
कोई नैनोवाली छोडे, नैनों से फुलझडीयाँ,
रुप है लाखों, और इक दिल है,
आपे में रहना भी मुश्किल है - २
कोई अँखियों से दारू पिला दे, तो फिर मेरी चाल देख ले,
मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले.

रफी : एक नजर से दिल भरमाए, दूजे से ले जाए,
तीजी नजर तू, ऐसी मारे, जो देखें लुट जाए,
सारी दुनिया तुझ पे दीवानी,
मैं भी तो देखू तेरी जवानी - २
जरा मुखडे से घुँघटा हटा दे, तो फिर मेरी चाल देख ले,
मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले.

♥

# 32 : Lag Ja Gale..

# ३२ : लग जा गले..

*लग जा गले, के फिर ये, हँसी रात हो, न हो,*
*शायद फिर इस जनम में..मुलाकात हो..न हो! लग जा गलेऽऽ*

किती उत्कट चाल! राजा मेहदी अली खाँसाहेबांची ही शायरी, मनाला भिडणारी. 'वो कौन थी?' हा चित्रपट १९६४ सालचा म्हणता आम्ही खूपच लहान होतो. काही वर्षांनंतर टी.व्ही वरच्या छायागीतवर बरीच जुनी गाणी पहायला मिळू लागली. त्यात या 'वो कौन थी?'ची गाणीही येत असत. रेडिओवरून ती सतत ऐकल्यामुळे तर या चित्रपटाची गाणी मनावर गारुड करत होती. सगळीच गाणी झक्कास असल्याचं जाणवायचं.. पण का कोण जाणे.. सिनेमा काही दाखवला जात नव्हता. कारण? कारण तो होता 'केवल वयस्कों के लिए'! फक्त प्रौढांसाठी.. का? तर तो भयपट आहे. हॉरर! सस्पेन्स थ्रिलर! भटकती आत्मा.. भूत, प्रेत, पिशाच्च! आमची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. कसा असेल हा सिनेमा? खूप हॉरर असेल का? गिरगाव, खेतवाडीपासून थेट परळपर्यंतच्या सर्व गणेशोत्सवात बरेच सिनेमे रोडवर दाखवले जात.. पण कुणी 'वो कौन थी?' दाखवायची हिम्मत केली नव्हती. मी आमच्या गणेशोत्सव मंडळावर माझे मित्र कार्यरत असताना मुद्दाम या गोष्टीचा छडा लावण्याचा प्रयत्न केला होता.. परंतु हाती निराशाच आली. आश्चर्य म्हणजे या १६ एम.एम. चित्रपटांच्या प्रिन्टस्चं मुंबईभर वितरण करणाऱ्या साहेबांकडे 'गुमनाम'ची प्रिन्ट होती, नेमका त्यात 'वो कौन थी?' हा 'ब्लॅक ॲण्ड व्हाईट' चित्रपट मात्र नव्हता. कमाल आहे यार! एवढं आहे तरी काय या सिनेमात?.. आणि हा 'मनोजकुमार' असल्या भुताखेतांच्याच सिनेमात काम करतो की काय? जेव्हा बघावं तेव्हा तोंडावर हात! 'गुमनाम' सस्पेन्स थ्रिलर! 'वो कौन थी?' भुताखेतांचा! 'पूनम की रात' भुताचा!.. असल्या भयपटांचा हीरो मनोजकुमारच का असतो? कोई खास वजह?.. मग त्याचे ते 'नीलकमल', 'अनिता', 'पत्थर के सनम', 'हरियाली और रास्ता','शोर' वगैरे सिनेमे सुध्दा अशाच पठडीतले आहेत की काय? असा प्रश्न पडला होता आम्हा मुलांना. मग आमच्या लक्षात आलं.. येस! तो असे 'हॉरर' सिनेमे करायचा म्हणूनच पूर्ण हाताने आपला चेहरा झाकून घ्यायची त्याला सवय लागली असावी..

'वो कौन थी?' (१९६४)! ब्लॅक ॲण्ड व्हाईट! आम्हाला ही फिल्म कधी बघायला मिळाली तर १९८२-८३च्या दरम्यान. सुपर की स्वस्तिक सिनेमात! मॅटिनी!.. (बरं झालं.. हॉरर आहे म्हणता नाईट 'शो'? नको रे बाप्पा!) पृथ्वी पिक्चर्स निर्मित (ज्यांनी पुढे 'गुमनाम' (१९६५) सप्तरंगात बनवला तेच हे निर्माते) तर राज खोसलांचं दिग्दर्शन! मनोजकुमार, साधना, प्रवीण चौधरी, के.एन.सिंह, धुमाळ, रत्नमाला आणि हेलन.. गीतकार राजा मेहदी अली ख़ाँ. संगीतकार मदनमोहन. राज खोसलांच्या बऱ्याच चित्रपटात पहिला शॉट हा चालत्या कारवरचाच असतो.. इथेही आहे. मनोजकुमार ती चालवतोय (डॉ. आनंद)!..

दोन फर्लांग जाताच त्याला सामोरी येते ती 'श्वेतांबरा'! सुंदरी साधना! बाई की भूत? चौक गये? (च्यायला, ही भुतं पांढरेच कपडे का घालतात बुवा? त्याऽऽऽव!! वॉशिंग पावडर निरमा...) तो तिला लिफ्ट देतो. ती नेमकी स्मशानाच्या गेटवर उतरते. स्मशानाचं गेट आपोआप उघडतं. ती पाच पावलं आत चालते.. गायब! 'नैना बरसे, रिमझिम, रिमझिम..' असं गाणं घुमतं. भ..भ..भूतऽऽ! थिएटरात टेन्स! मनोजकुमार घरी पोहोचतो. आई (रत्नमालाबाई) 'आ गये बेटे?..' असं म्हणत त्याचं प्रेमानं स्वागत करते. आपण दचकतो! अरेऽऽ! दादा कोंडकेंच्या चित्रपटात हीच रत्नमालाबाई त्यांची 'आये' असते ना?.. तिथे ती नेहमीच प्रेमळ दाखवतात यात शंकाच नाही.. पण ती आपल्या लेकाचं 'कुठं उलथला होतास रे मुड्द्या?' असं स्वागत का बरं करते?.. असो! तर या डॉ. आनंदची मंगेतर असते हेलन. (काय चॉईस आहे!) तिच्याबरोबर हा डॉ. आनंद 'छोडकर तेरे प्यार का दामन..' (गायक महेंद्र कपूर, लता) असं मनाला आनंद देणारं युगलगीत गातो.. स्टोरी पुढे सरकते. त्या भटकत्या आत्म्याच्या रहस्यातच आपल्याला गुंतवून ठेवते..

'वो कौन थी?' हिट झालेला, पण सर्वांनाच तो तितकासा आवडला नव्हता म्हणतात. असेलही! सस्पेन्स चांगला आहे यात वाद नाही पण पब्लिकला बसल्या जागी घाबरवण्याचा विडा उचललेले राज खोसला सिनेमातला टेन्स ताण ताण ताणतायत असं वाटतं. गाणी मात्र छानच जमलीत. जिच्यावर हे गाणं चित्रित झालंय ती साधना आठवतेय. या गाण्यातली! हा रहस्यपट आहे आणि लतादीदींच्या 'गोल्डन-मेलडीज'च्या यादीत या गाण्याचा दर्जा पहिल्या पाचातला आहे एवढंच ठाऊक होतं त्या क्षणापर्यंत. काही गाण्यांचं नशीबच असं असतं की, ते गाणं कुठल्या नट-नटीवर पिक्चराईज झालंय, कोणत्या प्रसंगी ते येतं, कसं चित्रण झालंय वगैरे गोष्टी फिजूल असतात. त्यातलं काव्य आणि त्या गाण्याची चाल मनाला आरपार भिडणाऱ्या असतात. आपल्या आयुष्यात घडलेल्या

कोणत्यातरी निसटलेल्या क्षणांशी जुळणाऱ्या, एकरूप झालेल्या असतात. संगीतकाराची सर्जनशीलता एखाद्या गाण्याला आपल्या हृदयावर कायम कोरलं जाण्याइतकी श्रीमंती नक्कीच बहाल करू शकते. ज्या गळ्यातून ते अवतरतं तोही महत्त्वाची भूमिका बजावतो. त्या आवाजामुळेच ते थेट हृदयाच्या तळापर्यंत जाऊन भावनांना ढवळून काढतं. मदनमोहन कोहली 'स्टार म्युझिक डायरेक्टर' नव्हते. 'सुपर-फ्लॉप चित्रपटांचा सुपर-हिट म्युझिक डायरेक्टर' म्हणायचे लोक त्यांना. त्यांचे स्टार्स इतके वाईट की होते की त्यांना बॅनर्स मिळायचे ते 'बी' ग्रेडचे. केवळ ऐंशी चित्रपट केले त्यांनी. 'भाई भाई' हा सुपर-हिट, आणि 'अनपढ', 'वो कौन थी?', 'मेरा साया' हे हिट, बस्स! बाकी सगळेच्या सगळे थोडे-फार चाललेले किंवा सुपर-फ्लॉप! पण या एकजात ऐंशी चित्रपटातलं संगीत मात्र लाजवाब. जे आजही ताजातरीन वाटतं. 'तुम जो मिल गये हो..' असे काही सन्माननीय अपवाद वगळता त्यांच्या गाण्यामध्ये भरगच्च ऑर्केस्ट्रेशन तसं अभावानंच आढळायचं. कविता हातात पडली की त्याला साजेशी चाल अशी सलगपणे लावायचे मदनदादा. वाद्यांचा गोंगाट नाही की ऱ्हिदमचा बडेजाव. 'वो कौन थी?' मधली 'छोडकर तेरे प्यार का दामन..' (गायक महेंद्र कपूर, लता) हे युगलगीत, 'जो हमने दास्तां अपनी सुनायी..' तसेच 'नैना बरसे..' आणि 'लग जा गले..' ही लतादीदींची तिन्ही गाणी मस्तच जमून आलीत. आशाताईंचं 'शोख़ नजर की बिजलियाँ..' हे याच चित्रपटातलं बरं! या गाण्याची ट्रीटमेंट मदनमोहनजींनी इतकी वेगळ्या धाटणीची दिलीय की एचएमव्हीसारख्या मातब्बर कंपनीने आगा-पिछा न पाहता त्या गाण्याचा अंतर्भाव केव्हाच 'आशा सिंग्ज फॉर ओ.पी. नय्यर' या यादीत केला आहे. कळस म्हणजे ती सी.डी., एम्पीथ्री अनेक वर्षे (आजही) दिमाखात विकतायत ते. बऱ्याच जणांना ते ओ.पी नय्यरजींचंच वाटतं ते यामुळेच. ('मेरा साया' मधलं 'झुमका गीरा रे..' हे गाणं जसं प्रथमदर्शनी संगीतकार मदनमोहनजींचं वाटत नाही तसाच प्रकार हा!)

*हम को मिली है आज ये, घडियाँ नसीब से,*
*जी भर के देख लीजिए, हम को क़रीब से,*
*फिर आप के नसीब में, ये बात हो.. न होऽऽ*
*शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो! लग जा गलेऽऽ*

खास वेळ काढून तुम्ही 'लग जा गले..' हे गाणं जरा मनापासून ऐका. या गाण्यात 'ऱ्हिदम' असा जवळजवळ नाहीच. तबल्यांवर छपकी वाजवतात तसा ठेका पकडला आहे. बेस-गिटार आणि कॉर्ड्स्चं वादन गाण्याला फक्त आधारभूत म्हणून वापरलंय. यात संगीत-संयोजक सोनिकजींचं (संगीतकार सोनिक-ओमी फेम) योगदान लक्षात येतं. गाण्यात ठळकपणे जाणवतं काय तर नुसता व्हायोलिन-चेलोचा ग्रूप, चवीपुरते मेंडोलिन इत्यादींचे स्ट्रोक्स. दोन अंतऱ्यांच्या मधलं म्युझिक खुलवताना दोन-चार इतर वाद्यांची मौजूदगी कानाला जाणवते खरी, पण ती ओघानं आल्यागत कानाला सुखद वाटते. फ्रेम बिघडणार की काय, अशी शंकाच नको. बऱ्याच जुन्या गाण्यांमध्ये साथीचं सॉंग-व्हायोलिन, गायकाला फॉलो करताना बारीक आवाजात हमखास ऐकू येत असतं. त्याचा आवाज अस्पष्ट असतो खरा पण गाणी ऐकताना ते बऱ्याचदा खटकतं. 'वो कौन थी?'च्या एकाही गाण्यात साथीचं हे सॉंग-व्हायोलिन नाहीय. कोणता राग आहे हा? मदनमोहनजी शास्त्रीय संगीत शिकले होते की नाही कुणास ठाऊक! पण त्यांची त्यातली जानकारी मात्र तारीफ करण्याजोगी होती. लहानपणी लखनौला असताना बेग़म अख़्तर, बडे गुलाम अली ख़ाँसाहेब, उस्ताद अली अकबर ख़ाँ, उस्ताद अब्दुल वहीद ख़ाँ, रोशनआरा बेग़म अशा माहीर प्रभृतींचा सांगीतिक सहवासच त्यांच्यातल्या संगीतकाराला प्रेरणादायी ठरला असावा. 'हमसे आया न गया..' (बागेश्री), 'जिया ले गयो जी मोरा..'(यमन), 'मेरी बीना तुम बीन रोये..' (अहिर-भैरव), 'हाल-ए-दिल यूँ उन्हे..' (पहाडी), 'दो दिल टूटे..' (मिश्र मांड), 'बैरन निंद न आए..' (काफ़ी), 'मेरा साया साथ होगा..' (नंद), 'नैनों में बदरा छाए..' (भीमपलास) अशी शास्त्रीय रागावरील गाणी काय सांगतात?

मदनमोहनजींची कारकीर्द सुरू होण्याच्या वेळेचा एक प्रसिध्द किस्सा आहे. आमच्या लाला लजपतराय कॉलेजात माझ्या वर्गात शिकणाऱ्या 'समीर कोहली' या त्यांच्या धाकट्या मुलानं आणखी चवीनं सांगितलेला.. रायबहादूर चुनीलालजी या चित्रपट उद्योगातल्या बड्या शेठजींचा मदनमोहन हा मुलगा. व्यक्तिमत्त्व रुबाबदार असल्याने आणि हातात गडगंज संपत्ती असल्याने हा मुलगा पिक्चरमध्ये हीरो म्हणून सहज शिरकाव करू शकला असता. एखाद्या स्टुडिओ, शूटिंग-फ्लोअरचा मालक म्हणून ख़ुर्ची उबवत खोऱ्यानं पैसा कमावू शकला असता. तो चक्क सैन्यात भरती झाला. नंतर सैन्यातलं रुक्ष जीवन आणि त्या लढाईचा कंटाळा आला. रायफल हाताळण्यात पुढे इन्टरेस्ट वाटत नसल्याने दुसरं महायुध्द संपताच बंदुकीला कडक सॅल्यूट ठोकून आपले मदनमोहनजी मुंबईला आले. रायबहादूर चुनीलालजी निर्माणाधीन असलेल्या 'शहीद' या चित्रपटाच्या कामात मग्न होते. या चित्रपटाचे गीतकार होते राजा मेहदी अली ख़ाँ आणि कमर जलालाबादी. गुलाम हैदरजींचं संगीत. रमेश सहगलजींचं दिग्दर्शन. दिलीपकुमार, कामिनी कौशल, चंद्रमोहन, लीला चिटणीस आणि पोरगेलासा शशी कपूर!.. १९४६ साल म्हणजे लतादीदी नवखीच

होती तेव्हा. गायला आलेली. युगलगीत होतं. सोबत हा शेठचा छोकरा मदनमोहन गाणार म्हणता धास्तावलेली होती ती. फिल्मिस्तानच्या मालकाचा मुलगा म्हणजे वशिल्याचं तट्टू दिसतंय. गाण्याचं काही खरं नाही वगैरे विचार करत 'पिंजरे में बुलबुल बोले, मेरा छोटा सा मन डोले..' रेकॉर्ड झालं. बहिण-भावाचं गाणं ते. (या गाण्यानंतर या दोघांमध्ये बंधु-भगिनी प्रेमाचे ऋणानुबंध जुळले. लतादीदींबरोबरचं हे भावाचं नातं मदनमोहनजींनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत निभावलं हे विशेष!) गाण्याचा 'टेक' होताच दीदीने त्याची आणि त्याने दीदीची तारीफ केली. त्यानंतर तो जे बोलला ते ऐकून मात्र मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला दीदीने. 'मैं संगीतकार बनुंगा..' असं त्यानं छातीठोकपणे सांगताच हसून 'क्या बात है!..' एवढंच म्हणाल्या. दिवस उलटले. काय चक्रे फिरली, कुणास ठाऊक. त्याला 'आँखे' मिळाला. पदार्पणातच चमक दाखवत पुढे त्याने 'मदहोश' इत्यादी सिनेमे खिशात टाकले. टॅलेन्ट सिध्द होऊ लागलं, पण मदनमोहनचं नशीब मात्र फुटकंच म्हणायला हवं. वाटचालीत अडचणी बऱ्याच होत्या. त्यांनी संगीतबध्द केलेली गाणी लक्षात राहण्याजोगी बेमिसाल असायची, बिनाका गीतमालामध्ये गाणी गाजायची पण त्या कुबड्या पिक्चरला तारून नेण्यास असमर्थ ठरायच्या. फ्लॉप चित्रपटांचा सुपर-हिट संगीतकार ठरला तो. 'वो कौन थी?' या चित्रपटाचंच उदाहरण घ्या ना! १९६५ च्या फिल्मफेअर सोहळ्यात उत्कृष्ठ संगीतकाराच्या पुरस्कारासाठी 'वो कौन थी?' नॉमिनेट झालेला पण त्यांच्याकडे एकेकाळी व्हायोलिन घासणारे लक्ष्मी-प्यारे 'दोस्ती'साठी ती ट्रॉफी त्यांच्या तोंडावर रुबाबात घेऊन गेले. पेंदे हीरो, सामान्य नायिका, फडतूस कथानक आणि लो-बजेट निर्मितीमूल्ये असल्यावर एकटा मदनमोहन काय खाक करिष्मा करणार होता तिकिटबारीवर? शेवटी काय! अपयशाचं खापर फोडलं जाई ते या मदनमोहनवरच. पुढे राजकारणही कमालीचं वाढलं होतं. कधीकधी रेकॉर्डिंग थिएटरही मिळत नसे त्यांना. मिळालंच तर उत्तमोत्तम वादकांना खान-पान व्यवस्थेसह इतरत्र गुंतवून ठेवण्यात येई. शेवटी ढोर मेहनत करूनही हाती काय, तर केवळ निराशा आणि निराशाच. पडता काळ आलेला. खूप मनःस्ताप. मदनमोहनजींनी मदिरेचा प्याला आपलासा केला, तो बहुदा यामुळेच.

'लग जा गले..' हे काव्य लिहिताना राजा मेहदी अली खाँसाहेबांनी अक्षरशः 'कलेजा निकालके रख्खा है'. संगीतकार मदनमोहनजींनी ते स्वरबध्द करताना त्या काव्याला हळवेपणाचा टच देत मस्तच खुलवलं आहे. संपूर्ण चित्रपटात हा नायक तिच्याशी नफरतच करताना दाखवलाय, मग हे गाणं कोणत्या प्रसंगासाठी येत असेल बरं? असा विचार मनात येतो. कब आएगा, कब आएगा, अब आएगा.. अशी या गाण्याची आपण वाट पाहतो. पण हायSS! या गाण्याची चित्रपटात येणारी सिच्युएशन पाहून माझा तरी भ्रमनिरास झाला. तितकंसं प्रभावी नाही वाटलं ते. मिलनाची आस आहे, तडप आहे. साधनाच्या डोळ्यात अश्रूही आहेत. बोलण्यात आवेग आहे पण तो उगीचच आग्रही वाटतो. गळेपडू वाटतो. 'मौका आया है उसका फायदा उठा ले..' असा दर्प येतो तिच्या त्या वागण्यातून.. छ्याऽऽ!! क्या सोचा था, और क्या सामने पाया! किती छान गाणं आहे हे? बऱ्याच जणांनी हा सिनेमा पाहिलेलाच नाही. गाणं नुसतं ऐकलंय. बऱ्याचदा! छायागीतातही खूप वेळा त्याची पारायणं झालीत! त्यामुळेच ते आपल्या आवडीचंही आहे. 'छायागीत'मध्ये नुसतंच गाणं दाखवतात, म्हणून ते इम्प्रेसिव्ह वाटतंही. पण खरं सांगायचं तर हे गाणं नुसतंच ऐकताना वेगळ्याच फीलिंग्ज येतात. ते ऐकताच पायात मणामणाचं ओझं असल्यागत जागच्याजागी थिजतो आपण. क्षणात हळवे होतो. प्रेमी युगुलाची ती शेवटची भेट असावी असं प्रतीत होतं त्या काव्यातून. ते क्षण पुन्हा कधीच येणार नाहीत की काय? त्या क्षणानंतर त्यांची कधीच भेट होणार नाहीय की काय? असं वाटतं.. दुदैवाने ज्यांच्या जीवनात असला क्षण आलेला असतो त्यांच्या मनात तर आठवणींचा सैलाब (महापूर) उचंबळून येतो. रोमान्स, विरह, मिलनाची आस, आनंद, उत्सव, तृप्ती, प्रतीक्षा, समर्पण, साधना, आराधना या आपल्या मनाच्या अवस्था ज्यांच्या गाण्यातून गवसल्या तो संगीतकार मदनमोहन आठवतो आपल्याला. रात्रीच्या निरव शांततेत आपल्या रेडिओवर नेमकं हेच गाणं लागलं तर त्या गाण्यातून उत्कटपणे व्यक्त केलेल्या विरहाच्या ज्वाळा 'ती' अवस्था खरोखरच उपभोगणाऱ्याच्या मनाला किती यातना देऊ शकतात.. पहा.. मनाचा कोंडमारा करत मान तुकवून तडजोड स्वीकारलेलं मन बंड करून उठतं. नकळत पापण्यांच्या कडा ओलावतात.. निरवानिरव करताना उच्चारलेले ते शब्द मन घायाळ करण्यास पुरेसे ठरतात..

*पास आईये, के हम नहीं, आयेंगे बार बार,*
*बाहें गले में डाल के, हम रो ले तार तार,*
*आँखो से फिर, ये प्यार की, बरसात हो.. न हो,*
*शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो!*
*लग जा गले, के फिर ये, हँसी रात हो, न हो,*
*शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो! लग जा गलेऽऽ*

♥

## ३२ : लग जा गले..

चित्रपट : वो कौन थी? (१९६४)
निर्माता : पृथ्वी पिक्चर्स
दिग्दर्शक : राज खोसला
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : राजा मेहदी अली खाँ
संगीत : मदनमोहन

लग जा गले, के फिर ये, हँसी रात हो, न हो,
शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो! लग जा गलेss ।।धृ।।

हम को मिली है आज ये, घडियाँ नसीब से,
जी भर के देख लीजिए, हम को क़रीब से,
फिर आप के नसीब में, ये बात हो.. न होss
शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो! लग जा गलेss ।।१।।

पास आईये, के हम नहीं, आयेंगे बार बार,
बाहें गले में डाल के, हम रो ले तार तार,
आँखो से फिर, ये प्यार की, बरसात हो.. न हो,
शायद फिर इस जनम में..मुलाकात हो.. न हो!
लग जा गले, के फिर ये, हँसी रात हो, न हो,
शायद फिर इस जनम में.. मुलाकात हो.. न हो! लग जा गलेss ।। २ ।।

♥

या सर्वांगसुंदर गाण्याची 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. लग जा गले के फिर.. (ऑडिओ) https://youtu.be/br6C4U3Dyfo

२. लग जा गले के फिर.. (व्हिडिओ) https://youtu.be/TFr6G5zveS8

३. लग जा गले के फिर.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/91dB6HxsYWQ

४. लग जा गले के फिर.. (लतादीदी लाईव्ह) https://youtu.be/9v20pa_dDyM

५. 'वो कौन थी?' (१९६४) (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/vfcpd5PH22M

६. लतादीदी व मदनमोहन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/I8tVaKhVuBo

आता याच गाण्याची विविध श्रवणीय 'इन्स्ट्रूमेंटल्स'... प्रत्येक वाद्याच्या वादनातून वेगळा मूड जाणवतो, हे विशेष.

६. लग जा गले के फिर.. (पियानो) https://youtu.be/e_O7KA1_p2U

७. लग जा गले के फिर.. (सॅक्सोफोन) https://youtu.be/g8JBFS2vhjo

८. लग जा गले के फिर.. (व्हायोलिन) https://youtu.be/hiUPJGvzgE4

९. लग जा गले के फिर.. (सॉफ्ट इन्स्ट्रूमेंटल) https://youtu.be/gWsVoPe7ahw

## 33 : Bolo Subah Shaam..

## ३३. बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम

*‘दुनिया ने हमको दिया क्या? दुनिया से हमने लिया क्या?*
*हम सबकी परवाह करें क्यों? सबने हमारा किया क्या?*
*दम मारो दम, मीट जाए ग़म, बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..’*

देव आनंदने ‘हरे राम हरे कृष्ण’ या त्याच्या चित्रपटात हिप्पी-संस्कृतीवर सॉलिड ताशेरे ओढले होते. (डोक्याचा चमनगोटा, तरी हिप्पी! हे कसं काय बुवा?) घरातल्या गढूळ वातावरणामुळे स्वच्छंद अशा हिप्पी-संस्कृतीकडे आकर्षित झालेल्या एका तरुणीच्या जीवनाचं हृद्य चित्रण त्यात पहायला मिळालं. चरस, गांजा, अफूच्या व्यसनातली ही मंडळी. त्यात गुंतल्यावरच ब्रह्मानंदी टाळी लागते असा दृढ विश्वास! स्वच्छंदी आयुष्याचा असा सोपा फॉर्म्युला मांडणारा हिप्पी जत्था मुंबईत एकेकाळी जागोजाग दिसायचा. ‘मन होऽऽ रामरंगी रंगलेऽऽ’ म्हणत आपल्याकडच्या बऱ्याच टवाळ पोरांनीही त्यांच्या नक्श-ए-कदमवर जात स्वच्छंद जीवनाची मजा लुटायचा चंग बांधला होता. (अर्थात फॉरेनच्या गोऱ्या कातडीचं आकर्षण होतं त्यात).. असो! या ‘हरे राम हरे कृष्ण’ची स्टोरी तशी व्हेरी सिंपल. एकमेकांशी पटत नसलेल्या आईबापांची मुलं! प्रशांत (देव आनंद) आणि जसबीर (झीनत अमान)! घटस्फोटामुळे बिछडल्यानंतर ही पोरं दोन वेगवेगळ्या संस्कृतीत वाढतात. देव आनंदला प्रत्येक भाऊबीजेला बहिणीची लई लई आठवण येते. बहुदा एका राखी-पौर्णिमेला तिचं आपल्याजवळ नसणं  हे जिव्हारी लागताच तो नेमका काठमांडूलाच तिचा शोध घ्यायला येतो. भटक भटक भटकतो. फावल्या वेळात एक पोरगीही पटवतो. फलाण्या हिप्पींच्या कळपात एक ढापणी दिसते. ही आपली बहिणच असावी असा त्याला वास येतो. तो लाख विनवतो. ती ओळखच देत नाही. शांतीशी (मुमताज) प्रेमालाप करता करता उगीच मंदिरातल्या मूर्तीच्या चोरीचं बालंट ओढवून घेतो.. पिक्चरची स्टोरी ही अशीच सुरू राहते. आपण त्यात गुंतत जातो...व्वा!!

गीतकार आनंद बक्षी खरंतर लक्ष्मी-प्यारेंच्या कॅम्पमध्ये जास्त रममाण होताना दिसले पण इथले बक्षीजी जर हटकेच. आर्डीच्या बेमिसाल सुरावटींवर आशाताई ‘दम मारो दम, मीट जाए ग़म..’ जास्तच नशिलं करतात. गिटारचा झंकार मेंदूवर अधिराज्य गाजवतो. नशा उत्तरोत्तर चढतच जाते.. त्याचा कैफ कानामनावर दीर्घकाळ रेंगाळत राहतो. पंचमदांचे हे आविष्कार पुनःपुन्हा ऐकत राहावेसे वाटतात.

‘दम मारो दम..’ची आणि पर्यायानं ‘हरे राम हरे कृष्ण’ची स्टोरी असेल ती असेल. पण ही गाणी ऐकताना माझं मन सैरभैर होतं. अतिशय आवडीची ही गाणी पण माझ्याबाबतीत म्हणाल तर या सिनेमातल्या सगळ्याच गाण्यांनी मला एक दर्द दिलाय. पंचमदांच्या सुरावटींवर मी जिवापाड प्रेम करतो म्हणून तर ही जखम अधिकच खोलवर आहे. दिल दिया इसलिए दर्द लिया..! ती जखम कुठल्याच औषधानं भरणारी नाही. कधीच नाही. कशी? ते आता पाहुया.. (प्लीऽऽज ‘दम मारो दम..’चा याच्याशी काय संबंध असा प्रश्न नका विचारू! केवळ माझ्या भावना तुमच्याशी शेअर कराव्यात म्हणून हा खटाटोप आहे.. )

‘हरे राम हरे कृष्ण’ने १९७१ साल संपता संपता पडदा पाहिला. करेक्ट! (संदर्भ - या सिनेमाला सेन्सॉर प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख आहे ती गुरुवार, ९ डिसेंबर, १९७१) त्याच्या ‘नवकेतन इन्टरनॅशनल’ या बॅनरतर्फे त्याने स्वतःच दिग्दर्शित केलेला असा हा सोळा रिळांचा सिनेमा. देव आनंद स्वतःला केंद्रस्थानी ठेऊन कथानक गुंफतो म्हणतात ना! तसं ते इथंही आहे, पण भट्टी चांगलीच जमलीय. मुमताज, झीनत अमान, प्रेम चोप्रा, राजेंद्रनाथ, इफ्तिखार, ज्यु. मेहमूद, किशोर साहू, सुधीर ही दमदार म्हणावी अशी फौज. आर.डी. बर्मनदांनी संगीतात तर कमाल केलीय. ‘फूलों का तारों का..’ (लता, पंचमदा असं एक, तर किशोरचं आणखी एक सोलो), ‘दम मारो दम..’ (आशा), ‘हो रे घुँगरू का बोले..’ (लता), ‘देखो ओ दीवानो..’ (किशोर), ‘कांची रे कांची रे..’ (किशोर-लता), आणि सर्वात उत्तेजक असं ‘आऽऽय लव्ह ऑफ यूऽऽ..’ (उषा अय्यर आणि आशा भोसले) अशी सगळीच गाणी इतकी धमाकेदार झालीत की बस्स! सिनेमा देवसाहेबांचा खरा पण पंचमदांनी पेश केलेला गाण्यांचा फुलोरा देवसाहेबांच्या तोपावेतो असलेल्या प्रतिमेच्या एकदम उलट असा. गाण्यांच्या चाली, त्यातलं संगीत-संयोजन, ऑर्केस्ट्रेशन, पेशकश, ट्रीटमेंट सगळंच झकास! ‘दम मारो दम..’ आणि ‘आऽऽय लव्ह ऑफ यूऽऽ..’ तर टोटल वेस्टर्नाईज्ड. काही लोकांना गाणं ‘स्टिरिओ’ काय ‘मोनो’ काय कशाशीच घेणं-देणं नसतं, सोयरसुतक नसतं. परंतु चोखंदळ रसिक मात्र अशा गोष्टीत सजग असतात. कारण ‘स्टिरिओ’ या प्रकारातलं ध्वनिमुद्रण कानाला फार सुखद असतं. ते अधिक आनंददायी असतं. खरं सांगू? जेव्हा

कधी 'हरे राम हरे कृष्ण'ची ही गाणी मी ऐकतो ना, तेव्हा मनात एक विचार सहज डोकावून जातो.. ही सगळी गाणी रेकॉर्ड करताना 'स्टिरिओ' पध्दतीने केली असती तर?.. उसमें 'वो' बात थी.. 'मटेरियल' था यार! तसे चान्सेसही होते म्हणतात, मग का नसेल केलं?

पंचमदांचे १९७१ साली अकराहून अधिक चित्रपट प्रदर्शित झाले होते. आता पंचमदांनी त्या वर्षी ज्या सिनेमांची सुपर-हिट म्हणावीत अशी गाणी रेकॉर्ड केली असतील त्यांच्या नावांवर नुसती धावती नजर टाकूया. (संदर्भासाठी म्हणून कंसात त्या त्या सिनेमांना सेन्सॉर-प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख दिलीय, म्हणजे ढोबळ मानाने विचार करता त्यांचं रेकॉर्डिंग झालं असेल ते बहुदा दोन ते चारेक महिने आधी..) 'मेला' (४ मार्च, १९७१), 'लाखों मे एक' (२४ मार्च, १९७१), 'अधिकार' (२८ एप्रिल, १९७१), 'बुढ्ढा मिल गया' (२४ मे, १९७१), 'कारवाँ' (१५ जून, १९७१) आणि 'अमर प्रेम' (२७ नोव्हेंबर, १९७१)! सगळ्याच सिनेमातली गाणी झकास होती. पण 'कारवाँ'चा अपवाद वगळता (पिया तू अब तो आजा.. इत्यादी) इतर सिनेमातल्या गाण्यांमध्ये आपण म्हणतोय तसं 'स्टिरिओ'ला अनुरूप असं मटेरियल नव्हतं. 'कारवाँ'बाबतीत बोलायचं तर नासिर हुसैनजींच्या कॅम्पमध्ये त्यांच्या सिनेमाची गाणी 'स्टिरिओ' करण्यात त्यांना अजिबात इंटरेस्ट नव्हता असं आर्डीसाहेबांच्या संगीत-संयोजकांनी सांगितलं.. 'कारण नासिर हुसैनसाहेब आपल्या चित्रपटाचं पोस्ट-प्रॉडक्शन स्वतःच्या मालकीच्या 'एन्. एच्.' मध्येच उरकायचे. तिथे त्याकाळी जी अशी यंत्र-सामुग्री होती, ती इतकी अद्ययावत नव्हती म्हणे.. त्यांची इच्छाही नसावी. 'हरे राम हरे कृष्ण'च्या वेळी ते आमच्या मनात आलेलं.. पण काही कारणांमुळे नाही जमलं.. इतकंच!' ही गाणी आपल्या अत्यंत आवडीची असल्यामुळे तुमच्या-माझ्यासारख्यांच्या बाबतीत म्हणायचं तर या कल्पनेसरशी आपल्या मनात काहूर उठतं. पंचमदांनी स्वरबध्द केलेल्या 'हम किसी से कम नही', 'शोले', 'शान', 'जमाने को दिखाना है', 'कुदरत', 'गोलमाल' अशा कित्येक सिनेमातली गाणी आठवतायत ना? ती ऐकताना जो मयुरपंखी आनंद मिळतो, त्याला तोड नाही. म्हणूनच 'हरे राम हरे कृष्ण'च्या गाण्यांबद्दलची ही खंत मनाला खूप क्लेष देत राहते. या कल्पनेसरशी मग अनेक गोष्टी मनात पिंगा घालू लागतात. 'हरे राम हरे कृष्ण'च्या गाण्याशी संबंधित नसतील अशाही अनेक घटनांचा क्रम मनःपटलावर आपसूकच उमटून जातो. त्याचं रुपांतर मग त्रागयात होतं.. खरंच! ही सगळी गाणी 'स्टिरिओ' असती तर काय बहार आली असती नाही? 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली' या त्याच सालच्या सिनेमाची गाणी 'स्टिरिओ' होती (आता बोला!) म्हणून ही खंत.. म्हणूनच ही स्टोरी..

कौशिकसाहेबांनी 'हरे राम हरे कृष्ण'च्या गाण्यांचं ध्वनिमुद्रण केलं आहे. नेहमीच्याच कुशलतेनं. ध्वनिलेखन (ऑडिओग्राफी) आहे ते पांडुरंग बोलूरजींचं. मात्र चित्रपटातली गाणी, संवाद, इफेक्ट आणि पार्श्वसंगीतासह फायनल मास्टरसाठी री-रेकॉर्डिंग केलं आहे ते सन्माननीय ध्वनिमुद्रक मंगेश देसाईजींनी. त्याकाळी रेकॉर्डिंग स्टुडिओजमध्ये 'स्टिरिओ तंत्रज्ञान' वापरण्यास सुरुवात झाली नव्हती, कारण 'हरे राम हरे कृष्ण'ची ही सर्व गाणी आहेत ती 'मोनो' स्वरुपात. (तरी इम्पॅक्ट पहा. सोने पे सुहागा म्हणून ती 'स्टिरिओ' असती पंचमदांच्या फॅन्ससाठी ती पर्वणी ठरली असती.) मंगेश देसाईजींना गाणी व संवादांसह इतर गोष्टी जशा मिळाल्या तसं त्यांनी त्यांचं री-रेकॉर्डिंग केलं आहे. अर्थात जे आडात आहे ते पोहऱ्यात आलंय. पण व्ही. शांतारामजींच्या राजकमलकृत 'जल बिन मछली..'चा मामला थोडा अलग होता. या सिनेमातली सगळी गाणी चक्क 'स्टिरिओ' आहेत. (आपल्या भारतीय संगीत क्षेत्रातलं पहिलं-वहिलं 'स्टिरिओ' सादरीकरण!) 'जल बिन मछली..' या सिनेमाला सेन्सॉर-प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख आहे ती सोमवार, ११ जानेवारी, १९७१ची. (म्हणजे चक्क एक वर्षाआधी? कमाल आहे!) देव आनंदसाहेब आणि शांतारामबापू म्हणजे चित्रपट-निर्मितीतली तशी 'बाप' माणसं. दोघांच्या कामाची पध्दत, अभ्यासू वृत्ती, कलाकृतीच्या प्रत्येक अंगावर आस्ते कदम जात खोलवर विचार करत हवा तो रिझल्ट मिळवण्याचा आग्रह, निर्मितीचा एकंदर आवाका आणि नेमकेपणाचा हव्यास तर सर्वश्रुतच आहे. दोन्ही निर्मात्यांच्या कामाची तऱ्हा पाहता या दोन्ही सिनेमांच्या गाण्यांच्या प्रत्यक्ष ध्वनिमुद्रणाच्या तारखा तशा आसपासच्याच असाव्यात असं म्हणायला काहीच हरकत नाही. बरं! 'जल बिन मछली..'ची गाणी आधी रेकॉर्ड झाली असतील म्हणावं तर देवसाहेबांना नाही निदान पंचमदांना तरी हा 'स्टिरिओ'चा फंडा क्लिक व्हायला हवा होता की नाही? प्रवाहाविरुध्द पोहण्याची हिम्मत असणारे, 'मेलडी घराणं' म्हणून शेखी मिरवणाऱ्या संगीतकारांपेक्षा बेधडकपणे वेगळं गणित मांडत, आपली कारकीर्द रत्नमंडित करणारे संगीतकार, अशी ख्याती असलेले आपले पंचमदा. ज्या माणसानं १९६६साली 'आए दिन बहारके' (एल.पी), 'बहारें फिर भी आएगी' आणि 'सावन की घटा' (ओपी), 'अनुपमा' (हेमंतदा), 'देवर' (रोशन), 'दिल दिया दर्द लिया' (नौशाद), 'दिल ने फिर याद किया' (सोनिक-ओमी), तर 'ममता', 'फूल और पत्थर' आणि 'दो बदन' (रवी), 'लव्ह इन टोकियो', 'तिसरी कसम' (एस्.जे), 'मेरा साया (मदनमोहन) अशा त्याकाळच्या मातब्बरांच्या नाकावर टिच्चून 'तिसरी मंजील'सारखं वेगळी वाट चोखाळणारं बेमिसाल संगीत देत अलम दुनियेला अचंबित केलं होतं, अशाच धुरंधर संगीतकारांकडून असा नवनवोन्मेषशाली आविष्कार व्हायला हवा होता की नाही? पण.. ते नाही झालं. कधी असंही वाटतं.. कदाचित पंचमदांनी ही गोष्ट निर्माता-दिग्दर्शक आणि नायक असलेल्या देव साहेबांना किंवा इतर संबंधितांच्या निदर्शनास आणलीही

असावी, परंतु त्यांनी यांची डाळ शिजू दिली नसावी. कारण 'देव' जाणे! पंचमदांकडे मनोहारी सिंह, बासूदा, बबलूदा, मारूतीराव कीर असे जबरदस्त प्रतिभा असलेले संयोजक होते. इंडियन क्लासिकल, वेस्टर्न किंवा रॉक-म्युझिक वाजवू शकतील अशा वादकांची मोठी फौज होती.. देवसाहेब आपल्या चित्रपटाचं पोस्ट-प्रॉडक्शन स्वतःच्या मालकीच्या 'आनंद' किंवा 'केतनव'मध्येच उरकतात. तिथे त्याकाळी अशी अद्ययावत यंत्र-सामुग्री नव्हती.. इच्छाही नसावी. छ्या!! खरंतर आपणच कमनशिबी.

मंगेश देसाईसाहेब हे राजकमलचेच. रेकॉर्डिंगमधले 'डॉन'! अतिशय मेहनती आणि प्रयोगशील माणूस. त्याकाळी रेकॉर्डस् होत्या म्हणून 'रेकॉर्ड-प्लेअर्स'ची चलती होती. फिलिप्स कंपनीने नुकतेच 'स्टिरिओ' रेकॉर्ड-प्लेअर्स बाजारात आणले होते. बऱ्याच इंग्रजी ('कम सप्टेंबर' म्हणा की आणखी काही..) रेकॉर्डस्वर 'स्टिरिओ' असं ठळकपणे लिहिलेलं असायचं. (च्यामारी! ही काय भानगड म्हणायची?) अभ्यासाअंती कलासक्त मंगेश देसाईंना ही 'स्टिरिओ'ची आईडिया क्लिक झाली असावी. त्यांनी एक बुलंद स्वप्न पाहिलं असावं. त्यांना जणू याच एका वेडानं झपाटलं असावं. आपल्याला 'फ्रिडम' मिळते तिथेच माणूस मनःपूत काम करतो. झालं! आपलं हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या आता ते तयारीला लागले. त्यांचं होम प्रॉडक्शन असलेल्या राजकमलच्या आगामी 'जल बिन मछली..'ची गाणी त्यांनी 'स्टिरिओ' करायचं ठरवलं. स्वतःच्या स्टाईलने! 'राजकमल' मध्ये चित्रपटाच्या साऊन्ड रेकॉर्डिंग आणि मिक्सिंगसाठी अद्ययावत अशा 'वेस्ट्रेक्स रेकॉर्डिंग सिस्टिम' नामक मशिन्स उपलब्ध झाल्या होत्या. या यंत्रावर तर एका ऑडिओ फिल्मवर चार ट्रॅक्स मिळू लागले होते! मग काय विचारता! आईडिया कृतीत आणण्यात काहीच अडचण नव्हती. सपोर्टही मिळाला. त्यांनी संगीतकारांना गाण्यांचं ध्वनिमुद्रण करण्याआधी काही सूचना दिलेल्या. प्रत्येक वाद्याचं वादन अक्षरशः वेगवेगळ्या टेप्सवरच्या अलग-अलग ट्रॅक्सवर घेण्यास सुचवलं. लक्ष्मीकांत-प्यारेलालजींनी त्यांच्या सूचनेनुसार गाण्यांचं ध्वनिमुद्रण केलं. गाण्यांचं ध्वनिमुद्रण हवं तसं करण्याचं स्वातंत्र्य मिळालं, म्हणून त्यांनी आपल्याला हवं तसं रेकॉर्डिंग केलं. 'स्टिरिओ'चा मूळ गाभा आहे तो 'लेअर्स'चा. स्तर किंवा थर. प्रत्येक वाद्याचा आपापला असा एक आवाका असतो. 'बॅंड-विड्थ' असते. ध्वनिमुद्रणात लो-मिडियम-हाय अशा फ्रिक्वेन्सीजचा विचार करावाच लागतो. मंगेश देसाईसाहेब म्हणजे ध्वनिमुद्रणातले सर्व बारकावे, नीरक्षीरविवेक जाणणारे. त्यातल्या सगळ्या खाचाखोचा चक्क कोळून प्यायलेले. देसाईसाहेबांनी एक बेस-लाईन रेकॉर्ड केली आणि पुढे आधारभूत अशा एकेक कंपोझिट ट्रॅकच्या मदतीनं 'सिंक्रोनाईज' करत करत एकेक वाद्यमेळ रेकॉर्ड केला म्हणे! सेपरेट ट्रॅकवर! गायकांचं डबिंगही आपल्याला हवं तसं केलं. गाणी मनासारखी रेकॉर्ड झाली खरी पण एकेका गाण्याच्या ढीगभर टेप्स झाल्या! तो पसारा पाहून सगळेच गोंधळलेले. त्या ध्वनिमुद्रणाचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्याचं भाग्य लाभलेले अनेक वादक ही आठवण आजही चवीनं सांगतात. त्याकाळी कुणी त्यांना वेड्यातही काढलं असेल म्हणा. पण या माणसाचं कसब पहा. कौशल्य पहा. परिश्रमपूर्वक बनवलेलं हे 'स्टिरिओ' मिक्सिंग स्वर्गीय श्रवणानंद देणारं ठरलं होतं. त्यांनी गाण्यातला गायकाचा आवाज 'मोनो'च ठेवला पण गाण्यात वाजलेल्या प्रत्येक वाद्याचा 'लेअर' त्यांना जसा योग्य वाटला तसा 'लेफ्ट' किंवा 'राईट' अशी विभागणी करत 'मिक्स' केला. रिझल्ट काय तो तुमच्यासमोर आहे. मंगेश देसाईंनी स्वतः संशोधित केलेल्या आणि इथे प्रत्यक्षात वापरलेल्या या तंत्राचं कोणतंही पुस्तक उपलब्ध नाहीय. तो त्यांचा स्वतंत्र फंडा होता. स्वतःची कन्सेप्ट होती. त्याकाळातल्या पाश्चिमात्य 'स्टिरिओ'इतकी त्यात भले सफाई नसेल पण 'जल बिन मछली..'ची 'ऐसे तडपूँ के जैसे..', 'ओ मितवा..', 'कजरा लगा के..', 'तारों में सजके..' वगैरे गाणी ऐकताना तुम्हाला आपले हे मंगेश देसाईसाहेब आठवतीलच आठवतील.. 'जल बिन मछली..' तसंच 'हरे राम हरे कृष्ण' या १९७१ सालातलेच. त्यांच्याकडे 'हरे राम हरे कृष्ण'चं ध्वनिमुद्रण सोपवलं असतं तर प्रॉब्लेमच नव्हता. त्यांच्या हातात त्या टेप्स वेळीच पडल्या असत्या, ती गाणी 'स्टिरिओ' करा अशी विनंती केली असती तर कदाचित चित्र वेगळं असतं. हातातून निसटलेल्या आनंदाच्या क्षणाबद्दल कुणालाही खंत ही तर वाटणारच.. म्हणूनच हा ऊहापोह.. पंचमदांच्या एका फॅनचा आक्रोश!.. छ्या!! खरंतर आपणच कमनशिबी...

लक्षात घ्या ते साल होतं १९७१. म्हणजे आम्ही होतो केवळ अकरा वर्षे वयाचे. आता तुम्ही म्हणाल की हे कंपोझिट ट्रॅक्स, सिंक्रोनाईजेशन वगैरे मला कसे काय माहीत? अहो.. मी हे असलंच एक प्रकरण भोगलंय. निस्तरलंय. अशाच प्रकारचे सगळे सोपस्कार केलेत, करवून घेतलेत. मंगेश देसाईसाहेबांचं उदाहरण डोळ्यासमोर होतं म्हणून तर प्रेरणा मिळाली. त्यांना गुरुस्थानी मानून अभ्यास केला म्हणून ते सगळं निस्तरता आलं. या प्रसंगामुळेच तर त्याकाळी या मंगेश देसाईजींसारख्या अनेक दिग्गजांनी नव्या संकल्पनेने एकेक उत्तुंग अशी स्वरशिल्पे उभारण्यासाठी काय परिश्रम घेतले असतील ते मला कळलं.. हल्लीच! 'येस बॉस' (१९९७)च्या वेळी. (गाण्याच्या मेकिंगमध्ये बरेच धम्माल किस्से घडत असतात. या सगळ्या गडबडीत एक गंमतीदार किस्सा घडलेला. हा किस्सा, मी एक सामान्य माणूस, तुमच्या वतीनं धडपड करतोय अशा मानसिकतेने वाचा. असो! मी 'रेकॉर्डिंग-ऑफिसर' तसेच 'ऑडिओ-इन्चार्ज' म्हणून मी नुकतीच सूत्रे हाती घेतलेली. या 'येस बॉस'च्याचवेळी योगायोगानं 'हरे राम हरे कृष्ण'ची सगळी गाणी 'व्हर्शन्स' करून घेण्याचं काम माझ्यावर सोपविण्यात आलं होतं. आमचे 'अरेंजर' माझ्यासमोर त्या

गाण्यांची नोटेशन्स काढण्यात गुंतले होते. आर्डीसाहेबांच्या गाण्यांमधली थक्क करणारी एकेक सौदर्यस्थळं दृग्गोचर होत होती. इसलिए या 'दम मारो दम..'च्या आठवणीसरशी, 'येस बॉस'चा 'तो' किस्सा आठवणं स्वाभाविकच होतं. तो ताजा आहे, मला ती धम्माल 'आपबीती' तुमच्याबरोबर शेअर करायचीय म्हणून हा लेखप्रप्रंच.. एकीकडे पंचमदांच्या मदमस्त गाण्याची मजा घेता घेता चला, थोडासा वेगळा असा एका गाण्याच्या मेकिंगचा आस्वाद घेऊया..)

*'चाहे जिएंगे मरेंगे, हम ना किसीसे डरेंगे,*
*हमको ना रोके जमाना, जो चाहेंगे हम करेंगेऽऽ*
*दम मारो दम, मीट जाए ग़म,*
*बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..'*

'येस बॉस'ची 'मैं कोई ऐसा गीत गाऊँ..', 'चाँद तारे तोड लाऊँ..' अशी सगळीच गाणी आम्ही आग्रहपूर्वक 'स्टिरिओ' केली होती. कर्मधर्मसंयोगाने म्हणा किंवा आमच्या दुदैवाने, 'चूडी बजी है..' हे त्यातलं एकमेव गाणं तब्बल तीन वर्षांआधी (म्हणजे १९९३च्या सुमारास) मेहबूबला रेकॉर्ड झालेलं. नॉर्मल ऑडिओ फिल्मवर. सिंगल ट्रॅक! मोनो!! आवाज होता सोनू निगम-अलकाचा. आता 'येस बॉस'मध्ये या गाण्याची सिच्युएशन-साँग म्हणून वर्णी लागल्यामुळे ते महत्त्वाचं ठरलं होतं. सोनूचा आवाज शाहरुखला अजिबात मॅच होत नाहीय असा ॲक्टर-डायरेक्टरसकट सर्व टीमने सूर लावला. कांगावा केला. दिग्दर्शक अजीज मिर्जासाहेब अतिशय मृदू स्वभावाचे (आपल्या साने गुरुजींसारखे.) पण त्यांनीही नाराजी व्यक्त केली. इतर सगळी गाणी अभिजीतच्या आवाजात होती. एक गाणं कुमार शानूच्या वाट्याला आलेलं. परंतु या गाण्यात केवळ उदित नारायणचाच आवाज चपखलपणे बसेल असा त्यांचा आग्रह होता. हट्ट होता. मतप्रवाह होता. बरं आता त्यांनी इथेच थांबावं की नाही.. वाह् वाह् करत ते यूनिट परदेशात 'शूट'साठी जाताच, आगापिछा न पाहता त्यांनी इतर सीन्सबरोबर चांगलं लोकेशन मिळालं म्हणून सोनू-अलकाच्या आवाजातलं ते गाणं तिथल्यातिथे शूटही करून टाकलं. आम्हाला वाटलं.. चला झंझट मिटली! आम्ही निश्‍चिंत झालो. पण यूनिट परतताच त्यांनी वेगळाच सूर आळवायला सुरुवात केली. चक्क 'शूट' झालेल्या या गाण्यात सोनूच्या जागी उदितचाच आवाज हवा म्हणून आमच्या खनपटीला बसले ते.. आता झाली की पंचाईत! आता एवीतेवी नवीन करणारच असाल ते 'स्टिरिओ'च करा म्हणाले!.. हलवा है क्या? आमच्या हातात गायकांच्या आवाजा विरहित असा नुसता म्युझिक-ट्रॅक असता ना तर चिंताच नव्हती. पण त्याकाळी म्युझिक-ट्रॅक काढायला हवा असं कुणाच्या ध्यानी-मनीही नव्हतं. तसा ट्रॅक उपलब्ध असता ना तर त्यावर उदितच काय, कव्वाल अजीज नाजांचाही आवाज सहज डब करता आला असता. पण आता ते शक्य नव्हतं.. तसं सोनूच्या आवाजामुळे काही आभाळ कोसळणार नव्हतं. चांगलं गायलेला, पण तेव्हा बिचारा नवखा होता तो. लाखो रुपये खर्चून 'शूट' झालेल्या या जुन्या गाण्याशी 'सिंक्रोनाईज' करून पूर्णतः नवं गाणं करायचं तर महा खर्चीक काम. दोन-तीन लाखांचा चुराडा. तोही अक्कलखाती! (ज्याचं जळतं त्याले कळतं!) दिवस सरत होते. पिक्चर पूर्णत्वाला येत होतं. आता गाण्यांच्या ऑडिओ कॅसेटस्-सीडीज बाजारात टाकण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. 'येस बॉस'ची एकापेक्षा एक अशी सरस गाणी, परंतु ती रेकॉर्ड झालेली वेगवेगळ्या स्टुडिओत. वेगवेगळ्या प्रकारच्या रेकॉर्डरवर. कुणी डिजिटल तर कुणी ॲनालॉग. कुणाचं काय तर कुणाचं काय! कशाचा कशाला मेळ नाही. प्रत्येकाचं मिक्सिंग वेगळं. तऱ्हा निराळी. सगळी गाणी आमच्या स्टुडिओच्या एका छपराखाली ऑडिओ-मास्टरींगला येताच मी कसला हडबडलोय म्हणून सांगू! 'चूडी बजी है..' या मेहबूबला केलेल्या गाण्याची तर पूरती वाय्-झेड् झालेली. टेप्सची ती अवस्था पाहून मास्टरींग करणाऱ्याने तर झुरळ झटकतात तसं झटकून काखा वर केल्या. 'ऑडिओ-इन्चार्ज' मीच त्यामुळे मला ते निस्तरणं भाग होतं. हतबल झालो मी. चार-पाच टेप्स होत्या. पण त्यावर विगतवार माहिती लिहिलेली नव्हती. त्या तीन वर्षात निसर्गानं त्या टेप्सवर 'फंगस'चा चांगलाच थर दिलेला. ज्या टेपवरून 'शूट'साठी गाण्याचं छोटं स्पूल बनवलं होतं ती टेप ठिकठाक होती म्हणा पण ती वापरून चालणार नव्हतं. इतर टेप्स वाजवून पाहिल्या तो काय! पेकाटात लाथ मारल्यावर एखादं कुत्रं विव्हळतं ना, तसे चित्र-आवाज येऊ लागले. तौबा तौबाऽऽ! माझ्या तोंडचं पाणी पळालं तर बॉसच्या पायाखालची जमीन भुसभुशीत झाली. सगळ्या गाण्यांत या गाण्याचं अस्तित्व म्हणजे पंचपक्वानात कुणा दुष्टाने मिठाचा खडा टाकावा तद्वत खटकत होतं.. इकडे दिग्दर्शक आणि त्याच्या मंडळींचा तगादा सुरूच होता. समोर दिसले की त्यांचा उठल्या-बसल्या एकच सवाल.. 'भाईजान.. गानेका कुछ हुआ क्या?!!..' प्रकरण चांगलंच भोवणार म्हणता शेवटी व्हायचं तेच झालं. बाप दाखव नाहीतर श्राध्द कर, अशी परिस्थिती निर्माण झाली. शेवटी काय? तर बॉसनं 'फर्मान' सोडलं.. तो 'फतवा'ही कसा तर.. '..मालकांचं आज्ञापत्र सुटलं.. आपल्या स्वराज्यावर वारंवार चालून येणाऱ्या (या) गनिमांस गर्दिस मिळविल्याविणा आम्हास 'हेड-ऑफिस'ला तोंड दाखवू नका..' पिंजऱ्यात सापडलेल्या उंदरासारखी परिस्थिती झालेली माझी.. हातात तयार असलेल्या झबल्याच्या मापाचं पोरगं शोधणं एकवेळ जमेल प्रयत्नांती. पण व्हॉईस-रिप्लेसमेंट? तीही अशा अवस्थेतल्या टेप्स्‌वर? किती किचकट काम! दिमाग का दही! विचारचक्रे फिरू

लागली. अक्षरशः भजं झालं डोक्याचं. मी दोनेक दिवसांसाठी भूमिगत झालो. 'जल बिन मछली..'ची गाणी मिक्स करताना मंगेश देसाईजींनी त्याकाळी काय केलं असेल बरं.. असा एकलव्यागत अभ्यास सुरू केला. 'ऑडिओ-एडिटिंग'शी मी चांगलाच वाकिफ़ होतो. माझे फंडा क्लियर होते. पण सांगायचं कुणाला? 'स्टिरिओ'त असतात तशा लेअर्सचा उपयोग केला तर शक्य होईल असं वाटून गेलं. उपलब्ध असलेल्या सगळ्या 'स्टिरिओ' गाण्यांची पारायणं केली. भीक मागत फिरावं तसे अनेक कम्प्युटर-टेक्निशियन्सचे उंबरठे झिजवले. भानामती लागल्यागत भटकलो. 'राजकमल'लाही गेलो, पण मंगेश देसाईसाहेब त्यांच्या व्यस्त दिनचर्येमुळे भेटूच शकत नव्हते. ते सदानदका कामात आकंठ बुडालेले असायचे.. माझा संगीतकार जतिन-ललितजींशी चांगलाच दोस्ताना असल्याने त्यांच्याचकडे कैफियत मांडली. पूर्ण गाणं नव्यानं करण्यापेक्षा 'असं केलं तर, असं होईल का?..' असं नम्रपणे विचारलं. त्यांनी लागलीच होकार भरला. त्यांच्या टीममध्ये (एकेकाळी पंचमदांचे सहकारी असलेले) मनोहारी सिंह, बबलूदा असे माहीर संयोजक आहेत, त्यांना ही कल्पना पटली-आवडली. चॅलेन्ज स्वीकारलं. जिथे याच सिनेमातलं 'सुनिए तो, रुकिए तो..' रेकॉर्ड झालं होतं तोच सनी स्टुडिओ गाठला. ऑडिओ-टेप्स (फिल्मस)चे चार-पाच डबे पिझ्झा घेऊन जातात ना, तसे सांभाळत नेले. चार स्पॉट-बॉईजना हाताशी धरून त्या टेप्सवरचा 'फंगस' पुसायचं काम रोजंदारीवर दिलेलं मी. दुपट्यातल्या बाळाची शीऽऽशी नॅपकिनने हळुवारपणे पुसतात तश्या स्टाईलने बिचारे काम करत होते. टेप्स पुसत होते. त्यांच्या अंगावर ॲप्रन आणि तोंडाला होता मास्क! कारण त्या सफाईसाठी वापरल्या जाणाऱ्या केमिकलचा वास इतका उग्र होता की नाकातले केस जळून जातायत की काय असं वाटायचं. चक्करही येण्याचे चान्सेस होते. शिवाजी साटमच्या 'सी.आय.डी.'त फोरेन्सिक लॅबमध्ये असते ना तशा (नॉन-एसी पण) निवांत जागी ही मंडळी कार्यरत होती. (करे कौन भरे कौन!) एकदाची ती साफसफाई संपली. सुटलो एकदाचे! सगळ्याच टेपवर एकच एक ट्रॅक! तोही मोनो! रात्रपाळी करून ट्रॅक्स बाऊन्स करून घेतले. आता संगणकावर एडिट सुरू. आमच्या सूचनेनुसार रेकॉर्डिस्ट 'तपन'ने अलकाचा आवाज कट्-पेस्ट करत 'सेफ झोन'ला (म्हणजे वेगळ्या ट्रॅकला) टाकला. सोनूचा 'डब' असलेला आवाज सर्वसमावेशक अशा कंपोझिट ट्रॅकवर ठेऊन दिला. आता संगीतकारांनी सगळं कसब पणाला लावून याच सनी स्टुडिओत त्या कंपोझिट ट्रॅकच्या अनुषंगाने नव्या कोऱ्या टेप्सवर प्रत्यक्ष वादकांकडून ॲडिशनल ऱ्हिदम-म्युझिक वाजवून घेत ते रेकॉर्ड केलं. जणू ते संपूर्ण गाणं आमच्यासाठी पुनर्मुद्रित झालं. (कपडे शिवण्यात जितकं स्कील लागत नाही तितकं रफू करण्यात लागतं.. हे उमगलं.) मी हे सगळं 'अन्-मिक्स्ड् मटेरियल' आता 'हाय-एट'नावाच्या डिजिटल टेप्सवर बाऊन्स करून घेतलं. कारण त्या मशिन्स माझ्या स्टुडिओत होत्या. आशिया खंडातला एकमेवाद्वितीय असा 'ओटारी-कन्सेप्ट वन' नामक साऊन्ड-मिक्सर होता. शकीलसारखा सांगू ते मनःपूर्वक करणारा रेकॉर्डिस्ट होता.. हुश्श! अब मामला अपने हाथ में आया! उदित साहेबांना सांगावा धाडला. (मोबाइल नव्हते) साहेब तेव्हा टॉपला होते, त्यामुळे त्यांना अजिबात वेळ नव्हता. थांबलो दोन दिवस. पण हायऽऽ! उदित आणि सनी स्टुडिओच्या डेटस्चं गणित काही जमेना. नंतर उदितने चक्क नकार कळवला. गाणं आधी सोनूने गायलंय ना! मी दुसऱ्यांची गाणी 'डब' करत नसतो. माझं तत्त्व आहे ते. मी नाही जाऽऽ! (अरे यार.. यहाँ मेरी जान पे बन आयी है, तू 'तत्त्व' लेके बैठा है!?) टोलवाटोलवी सुरूच होती. हे गाणं अजूनही निर्माणाधिन आहे, रिलीज झालेलं नाही वगैरे थातूरमातूर सांगून आपल्या दोस्तीचा वास्ता देत त्याला पटवलं एकदाचं. मामला फिट्ट हो रहा है म्हणता शेवटी मी गीतांजली थिएटर त्या रात्रीसाठी बिनधास्त बुक करून टाकलं. इतकं सगळं निस्तरतोय तर तिथला रेकॉर्डिस्ट 'ये कैसा होएगा?..' अशा (लघु)शंकेत अडकला. आता याचा कपाळमोक्ष करावा का? असा दुष्ट विचार मनात आलेला. पण मी स्वतःला सावरलं. शांत राहिलो. समजावलं. जाता जाता 'धू म्हटल्यावर धूवायचं..' असा कडवट दम मात्र भरला. बॉसने 'उदित नही आया तो?!..' असा प्रश्न करताच (काय शिंचा त्रास आहे!.. पण चिडणार कसा?) शांतपणे म्हणालो.. 'कैसा नही आएगा? वो आएगा! जरूर आएगा! हर हाल में आएगा! हर कीमत पर आएगा!..' असं सांगून मी मोहिमेवर निघालो. रात्री नऊ वाजल्यापासूनच तिकडे थिएटरात संगीतकारद्वय, बॉस अशी फिल्डिंग लावलेली. ते तिकडे, मिळालेला ऑडिओ, 'शूट' केलेल्या गाण्याशी सिंक्रोनाईज करण्यात गुंतले होते, तर मी मागावर होतो उदितच्या. भेटला की उचलायचा अशी तयारी. त्या रात्रीच गाठला उदितला. रात्री बारानंतर थकून-भागून घरी आलेला बिचारा. मला दारात पाहून तो थबकलाच. मग काय! डिनरचा आस्वाद घेता-घेता साहेबांना बाबा-पुता करून, विनंती करून.. पण दावणीला बांधतात तसा थिएटरात आणला एकदाचा. त्याला पाहून सगळ्यांच्याच चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली. ओव्हरडबिंग करणं सोपं नसतं. एकीकडे आपला सूर सांभाळायचा, गाण्यात भाव ओतायचे आणि पडद्यावर दिसणाऱ्या व्यक्तीच्या ओठांच्या हालचालीप्रमाणे गायचं, हे सहजसोपं काम नाहीय. मामला संगीन होता. पण उदितने हे शिवधनुष्य लीलया पेललं. सोनू-अलकाने गायलेलं ते युगलगीत पण उदितसाठी शब्दशः व्दंव्दगीत! उदित आणि सोनूच्या आवाजाची जातकुळी अक्षरशः दोन टोकाची आहे. सोनू निगम हा तेव्हा नवखा गायक होता. त्याच्या वकुबानुसार त्याने उम्मीद से बढकर गायलेलं यात शंकाच नाही. त्याची ती काहीशी रफीच्या अंगानं जाणारी पेशकश. थोडीशी सौम्यच. तर उदितचा आवाज काहीसा आक्रमक. जबरदस्त थ्रो! इकडे शाहरुखने सोनूच्या आवाजानुसार उच्चारण केलेलं, अभिनय केलेला व तसलाच ॲटिट्यूड दिलेला. हीच तर खरी गोची होती.. पण उदित नाउमेद झाला नाही. आमचा विश्वास त्याने सार्थ ठरवला. तो अतिशय मेहनती, प्रयोगशील गायक असल्याने हमारी नैया पार

हुश्री. (उदित आज यशोशिखरावर विराजमान आहे तो असल्या गुणांमुळेच) तुम्हाला आश्चर्य वाटेल.. या गीतांजलीत मध्यरात्री दीड-पावणेदोन वाजता आमचे उदितजी, स्क्रीनवर दिसणाऱ्या जुहीला पाहताच आपली सगळी मरगळ झटकून तिच्याकडे चोरटे कटाक्ष टाकत शाहरुखच्या ओठांच्या हालचालीबरहुकुम गात होते. लीप-सिंक! आमच्या सूचनेनुसार तिथला रेकॉर्डिस्ट त्याचे मिळतील तितके 'टेक्स' एकेका नव्या 'ट्रॅक'वर रेकॉर्ड करत होता. सोनूच्या आवाजावर उदितच्या आवाजाचं मास्किंग होत होतं. (तुम्हाला उदित भेटला तर हे नक्की विचारा, कारण त्याच्या कारकीर्दीत असा प्रसंग केवळ एकदा आणि एकदाच घडलाय. गुन्हा करणारा कितीही हुशार असला तरी एखादा दुवा तो सोडून जातोच जातो, होय ना? हे गाणं सोनू गायला होता याची एक जागा आम्ही पुसूच शकलो नाही. कुठली? हे मात्र तुमचं तुम्हीच शोधा. मजा आएगा!) पहाटे दूधवाले-पेपरवाले येतात त्या वेळेपर्यंत उदितसाहेब गात होते. विनाउसंत! त्याच्यात उर्जा यावी म्हणून मस्ती-मजाक करत आम्ही त्याला जागता ठेवत होतो. 'तारीफ के पूल' बांधत होतो. तो गात होता. टेक्स-रीटेक्स होत होते, पण गड्यानं हार मानली नाही. दमछाक तर नाहीच नाही. मान गये उस्ताद! एकदाचा ओके 'टेक' मिळाला. संगीतकार जतिन-ललितने 'पॅक-अप' म्हटल्यावर केवढा आनंद झालाय म्हणून सांगू! (नवससायासाने अनेक वर्षांनंतर पुत्ररत्न झालेल्या बापापेक्षाही कैकपट!) शेवटी या टेप्स आमच्या स्टुडिओत फायनल मिक्सिंगला आणल्या. संस्कार-सोपस्कारांनंतर त्याचा काय रिझल्ट आलाय तो तुम्ही ऑडिओवर ऐका आणि सिनेमात तर नक्कीच पहा.. (या कारनाम्यामुळेच 'येस बॉस'च्या श्रेयनामावलीत माझं नाव आहे, बर्र का!)

हे इतकं दळण दळण्याचं कारण हेच की आज उपलब्ध असलेल्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे आम्ही आमचे कार्यभार मजेत उरकत असतो. ध्वनिमुद्रणासाठी आज आमच्या दिमतीला 'कम्प्युटर्स' असतात. टेप्स तर वापरल्याच जात नाहीत. डबिंगसाठी उत्तमोत्तम माईक्स असतात. ऑडिओ-मिक्सिंगसाठी अद्ययावत असे मिक्सर्स असतात. ज्यावर बेसुरकरांचे आवाज सुरीले करण्याचीही सोय असते. या संगणकांवर, उपलब्ध असलेल्या हार्डवेअर्स-सॉफ्टवेअर्सच्या मदतीनं आम्ही हवं ते, हवं तसं डब आणि एडिट करत असतो. त्याकाळातल्या मंगेश देसाईंसारख्या तंत्रज्ञांना एखादी गोष्ट करण्यासाठी किती ढोर मेहनत घ्यावी लागली असेल हा विचार मनात सहज चमकून जातो.. जावे त्यांच्या वंशा म्हणजेच समजतंय सगळं..

मी 'हरे राम हरे कृष्ण'ची गाणी 'व्हर्शन्स' करताना आग्रहपूर्वक 'स्टिरिओ' पध्दतीत रेकॉर्ड केली खरी पण गायकांच्या बाबतीत काय सांगावं? आमची झोळी फाटकीच राहिली की हो! किशोरकुमार, लतादीदी, आशाताई आणि उषा अय्यर यांचे आवाज आणणार कुठून? ते 'ट्रॅक्स' तस्सेच पडून आहेत. आजतागायत. असो! शेवटी 'हरे राम हरे कृष्ण'ची गाणी 'स्टिरिओ' स्वरूपात येणं, आपल्याला त्याचा आनंद लुटता येणं हे आपल्याच नशिबात नव्हतं, नाही का? देवसाहेबांच्या 'हरे राम हरे कृष्ण' या सिनेमातल्या पंचमदांनी अलंकृत केलेल्या या उपरोल्लेखित बेमिसाल सुरावटींबद्दलची ही जखम मात्र अशीच ओली राहणारेय.. कायमची! आज आपल्या हाती 'मॉरल ऑफ द स्टोरी' म्हणून उरलंय काय तर..

*दम मारो दम, मीट जाए गम,*
*बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..*

♥

## ३३ : बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम

चित्रपट : हरे राम हरे कृष्ण (१९७१)
गीतकार : आनंद बक्षी
संगीत : आर. डी. बर्मन
गायक : आशा भोसले

दम मारो दम, मीट जाए ग़म
बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..२

दुनिया ने हमको दिया क्या?
दुनिया से हमने लिया क्या?
हम सबकी परवाह करें क्यों?
सबने हमारा किया क्या?
दम मारो दम, मीट जाए ग़म
बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..२

चाहे जिएंगे मरेंगे,
हम ना किसीसे डरेंगे
हमको ना रोके जमाना
जो चाहेंगे हम करेंगेऽऽ
दम मारो दम, मीट जाए ग़म
बोलो सुबह शाम.. हरे कृष्ण हरे राम..२

♥

या चित्रपटातील सर्व गाणी आपल्या आवडीची आहेत म्हणून सर्व गाण्यांच्या ऑडिओजची 'यू-ट्युब' लिंक देत आहे. या गाण्याचा 'व्हिडिओ व कराओके ट्रॅक' देत आहे. पंचमदांशी संबंधित लिंक तुम्हाला खचितच आवडतील. संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब लिंक' मात्र उपलब्ध नाही.

| | |
|---|---|
| १. बोलो सुबह शाम हरे.. (व्हिडिओ) | https://youtu.be/xKU4q0JELTQ |
| २. बोलो सुबह शाम हरे.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/-8whyNAc88k |
| ३. 'हरे राम हरे कृष्ण' (१९७१) (चित्रपटातील गाणी) | https://youtu.be/GoS1kAKpPI4 |
| ४. पंचमदा व किशोरकुमार (१०० गाणी-ऑडिओ) | https://youtu.be/uA67M0Lihz0 |
| ५. पंचमदा व आशाताई (५० गाणी-ऑडिओ) | https://youtu.be/lAXwD4pRcSw |
| ६. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (वाद्यसंगीत- ताबून सूत्रधार) | https://youtu.be/lZkhYy4sYac |
| ७. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (ऑडिओ) | https://youtu.be/KfwsWOBd6IA |
| ८. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (व्हिडिओ) | https://youtu.be/5-iu86NhFfc |
| ९. देव आनंद (नवकेतन हिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/erIY5DoohNM |

♥

## 34 : Chal Akela Chal Akela..

## ३४ : चल अकेला चल अकेला..

त्यांचा ओढा खरंतर मेलडीकडे जास्त होता. हृदयाची तार छेडली जावी अशीच गाणी मिळायला हवीत असा कटाक्ष असायचा त्यांचा. पण नाही! आपण कितीही ठरवलं तरी आपल्याला हवी तशी परिस्थिती आपण नाही निर्माण करू शकत. वातावरण आपल्या मनाजोगतं पोषक नसतं. मनासारखं काम करायला मिळेल असं कथानकच वाट्याला नाही यायचं कधी. फक्त तीन-चार चित्रपटात मोठे हीरो मिळाले. नया दौर, सी.आय.डी., दो उस्ताद आणि कश्मीर की कली, बस्स! निर्माते त्याच्याकडे येताच ओ.पी. नय्यरजी आनंदायचे. कथानक ऐकून त्यातल्या इमोशनल सीन्ससाठी गाणी बेतायला स्वतःपुढे हार्मोनियम ओढायचे किंवा पियानोवर बोटं फिरवत एकेक दर्दभरी चाल ऐकवायचे. पण व्हायचं भलतंच. निर्माते थंडपणे आरपार, सी.आय.डी. कडे बोट दाखवत असत. तशाच किंवा त्याही पेक्षा सरस फडकत्या चाली हव्यात म्हणून तर तुझ्याकडे आलोत असं तोंडावर सांगत. पब्लिकनं बसल्या जागी ठेका धरत उडायला हवं! थिएटरात एक नशिला माहौल निर्माण व्हायला हवा. दगड्या हीरो, फारसं नाव नसलेली हिरॉईन, चालसे टाईप स्टोरी असूनही गाणी मात्र झकास व्हायला हवीत असं सांगायचे. फाटकी झोळी घेऊन आलेले हे निर्माते मग स्वतःला हव्या तशा चाली आणि मदहोश ठेका पदरात पाडून घेत 'मॅन ऑफ दी मॅच' अ‍ॅवॉर्ड मिळाल्याच्या आनंदात शीळ घालत निघून जात. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे हताशपणे पाहत राहण्याशिवाय काय करणार बिचारे! ओपी तडफडायचे. त्यांच्या जिवाची ही तगमग त्यांच्या काही गाण्यांमध्ये हमखास आढळायची. चान्स मिळताच बनवलेली एखादी मेलडी अशी जमायची की ते गाणं रसिकांच्या कानात अत्तराच्या फायाप्रमाणे जडून जायचं. 'संबंध' १९६९चा. थोडासा उतरणीचा काळ होता ओ.पी. नय्यरजींचा. पण दबदबा होता. दिग्दर्शक अजय विश्वासजींनी त्यांना कथानक ऐकवलं होतं. अचिन्त्यकुमार सेनगुप्तांची कादंबरी. प्रोथम प्रेम! बंगाली कथानक म्हणून देब मुखर्जी, अंजना, प्रदीपकुमार, अनिता दत्त असे कलावंत निवडले होते. गीतलेखन कवि प्रदीपजींचं होतं हा एकमेव दिलासा म्हणता येईल..

*चल अकेला, चल अकेला, चल अकेलाऽऽ*
*तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..*

कवि प्रदीपजींनी दिलेला मुखडा जबरदस्त होता. ओपी भारावले होते. सौम्य चालीत बेतता येईल असं गाणं खूप दिवसांनी हातात पडलं होतं. कवि प्रदीपजींच्या काव्यातच जादुई प्राणशक्ती होती, गेयता होती. त्यांच्या त्या कविता वाचनातून गाण्याचं चलन सहज लक्षात येत होतं. गजलच्या मिटरमधलं गाणं! अवघ्या पाच मिनिटात धून तय्यार! प्रदीपजींच्या गाण्यातले जीवनाचं सत्य सांगणारे आशय, मनातल्या कल्लोळाची सुरांच्या मार्फत शब्दांनी करून दिलेली साठवण, काही भोगलेल्या.. काही महसूस केलेल्या भावनांची कैफियत, मनावर विलेपन करण्याचा पक्का इरादा.. हे सगळं सगळं होतं या गाण्यात. प्रदीपजींनी दिलेल्या गाण्यात तुकबंदी कधीच आढळायची नाही. 'ट' ला 'ट' जोडून काफिया मिलानेकी चलाखी नसायची. या गाण्यातून कविराज प्रदीपजींनी उभारलेलं वातावरण उदास झालेल्या किंवा छिन्नविछिन्न आयुष्याचे तुकडे गोळा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जिवाला किती दिलासा देतात ते एकेक कडव्यातून नुसतं अनुभवायचं. काव्याचं हे हळवेपण, काळजाला भिडणारी चाल, मन हेलावून सोडणारी करामत हीच तर बलस्थानं होती 'संबंध' सिनेमातल्या या गाण्यात..

*हजारो मील लंबे रास्ते तुझको बुलाते,*
*यहाँ दुखडे सहनेके वास्ते तुझको बुलाते,*
*है कौनसा वो इन्सान यहाँपर जिसने दुःख ना झेलाऽऽ*
*चल अकेला, चल अकेला, चल अकेलाऽऽ, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..*

ओपी यांनी गाण्याला दिलेली ट्रीटमेंट सॅल्यूट करण्यासारखी आहे. त्यामुळेच काव्याला वेगळी उंची मिळाली आहे. मुकेश ओ.पी.नय्यरजींकडे खूपच कमी गायला. माझ्या माहितीप्रमाणे मिस कोकाकोला, संबंध आणि एक बार मुस्कुरा दो.. इतकाच. इथला मुकेश चक्क शंकर-जयकिशन किंवा कल्याणजी-आनंदजीकडे खुलतो तसा खुललाय. मनाच्या तळापासून गायलाय तो. गाण्याचे अंतरे पहा. केवळ दोन अंतरे. फाफटपसारा औषधालाही नाहीय. केवळ तीन-तीन ओळीत जीवनाचं भाष्य केलंय. दोन अंतऱ्यांमधले संगीताचे तुकडेही परिणामकारक. चाय-बागानमध्ये कोरिओग्राफी असलेल्या गाण्यात जसा आलाप देणारा कोरस असतो तसा (स्त्री) कोरस गायकाच्या प्रत्येक ओळीसरशी येत आपल्याला हुंदका देण्यासाठी जणू वेळ बहाल करतो. गाण्याचा प्रभाव मनावर जास्त प्रमाणात ठसावा म्हणून की काय इथे कोरसच्या आलापींचा चांगलाच उपयोग केला आहे. 'है कौनसा वो इन्सान

यहाँपर जिसने दुःख ना झेलाऽऽ..' अशी गाण्याची क्रॉस-लाईन येताच पुढची मुखड्याची एक ओळ कोरस गातो.. पुन्हा मुकेशचा आवाज 'तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..' असं म्हणत पूर्ण मुखडा गात सामोरा येतो. गाताना मुकेशजींना भरून आलं असेल का? शक्यता नाकारता येत नाही. कारण त्यांच्या इतर गाण्यांपेक्षा इथे ते जास्त हळवे झालेले आढळतात. ऐकताना आपल्यालाही खूपच भरून येतं. काव्याचं हे डायरेक्ट काळजाला भिडणं, हेलावून सोडणं किंवा डोळ्यांवाटे पाझरणं ही काव्यात्मकता प्रदीपजींची..! त्याला संगीताचे अलंकार चढवणाऱ्या ओ.पी.नय्यरजींची! आणि गाणाऱ्या मुकेशची.. आता दुसऱ्या कडव्यात मात्र उपदेशाचा डोस आहे. जणू जखमेवरची मलमपट्टी!

*तेरा कोई साथ ना दे तो, तू ख़ुद से प्रीत जोड लेऽऽ*
*बिछौना धरती को करके.. अरे आकाश ओढ लेऽऽ*
*यहाँ पूरा खेल अभी जीवनका, तूने कहाँ है खेला?*
*चल अकेला, चल अकेला, चल अकेलाऽऽ, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..*

कवि प्रदीपजी म्हणजे 'कितना बदल गया इन्सान..', 'पिंजरे के पंछी..', 'कभी धूप कभी छाँव..', 'कोई लाख करे चतुराई..', 'आओ बच्चों तुम्हें..', 'तेरे व्दार खडा भगवान..' तसेच 'ऐ मेरे वतन के लोगों..' लिहिणारे. प्रबोधन आणि मनोरंजन करणारी गाणी लिहिणारे. कवि प्रदीपजींचं काव्य म्हणजे अप्रतिम भावगर्भित काव्यरचना. आपण लिहिलेल्या काव्याला आपल्याच चालीत नटवून संगीतकारांना देणं त्यांना खूप आवडायचं. अर्थात त्यांची ही लुडबूड अनेक संगीतकारांना अडचणीची वाटायची. ओ.पी.नय्यरजी मात्र त्या काव्यावर फिदा झाले होते. कवि प्रदीपजींनी काव्यवाचन करताना नकळत चालही गुणगुणली होती. तीच चाल द्यायला हवी असा बिल्कुल आग्रह किंवा हट्ट नव्हता, पण या मोडक्यातोडक्या चालीतच गहिरा अर्थ सामावलेला आहे याचं भान ओपींना होतं. हेच भाव कायम ठेऊन गाणं आपल्या स्टाईलने अलंकृत करायचं ठरवलं त्यांनी.. त्याचा रिझल्ट काय, तो आज आपल्यासमोर आहे. ओपींच्या वाट्याला अवखळपणा, मस्ती, मादकपणा, रोमान्स असलेली गाणी चिक्कार आली. त्या तुलनेत मेलोडियस गाणी देण्याचे चान्सेस खूप कमी वेळा आले. पण जेव्हा-जेव्हा असा मौका मिळाला तेव्हा-तेव्हा त्यांनी हृदयाचा ठोका चुकवेल अशी गाणी पेश केली. अशा वेळी ते आपला सदासुहागन घोड्यांच्या टापांचा आवाज तसेच पंजाबी ठेका दूर सारायचे. त्याला ओपी टच असायचा पण मेलडीही असायचीच. 'अंधेरे में जो बैठे है..'(संबंध), 'रातभरका है महमां..' (सोने की चिडियाँ), 'दिल की आवाज भी सून..' (हमसाया), 'फिर मिलोगे कभी..' तसेच 'यहीं वो जगहा है..' (ये रात फिर ना आयेगी), 'आँचल में सजा लेना कलियाँ..' (फिर वोही दिल लाया हूँ), 'मेरी निंदो में तुम..' (नया अंदाज), 'चैन से हमको कभी..' (प्राण जाए पर वचन न जाए) अशा कित्येक गाण्यातून त्यांनी मेलडीची नस अचूक पकडली आहे. आशा, शमशाद, रफी, गीता दत्त, महेंद्र कपूर अशा भांडवलावर ते यशोशिखरावर राहिले. पदरात अनेकदा फडतूस चित्रपटच पडायचे. कधी ठोकळा हीरो, कधी चालसे टाईप डायरेक्टर, कन्फ्युज करणारी स्टोरी, कुठल्याही गोष्टीला वाह! वाह! करणारे निर्माते असायचे. पण ओपीजी आपलं काम मेहनतीने करायचे. त्यांनी केलेल्या प्रत्येक चित्रपटातलं एक तरी गाणं सुपरहिट व्हायचंच. त्यांनी मुकेश आणि किशोर अगदी चवीपुरतेच वापरला. पण त्यांना दिलेली गाणी निरखली तर ती त्या आवाजाला न्याय देणारी होती. आपलं रागदारी गाणं किशोरला गाणं जमणार नाही म्हणून पडद्यावर किशोर असुनही त्याला प्ले-बॅक दिला तो रफीचा. (मन मोरा बावरा..) 'चल अकेला..' हे फिलॉसॉफी सागणारं गाणं होतं. मुकेश त्यासाठी फिट्ट वाटला. गाणं नायकाच्या तोंडी नाहीय. बॅक-ग्राऊन्डला वाजतं ते. पण त्यातले भाव देब मुखर्जीने तंतोतंत व्यक्त केलेत यात शंकाच नाही. (निदान ते भारतभूषणपेक्षा बरंच सुसह्य वाटतं.) या गाण्याचा फॉरमॅट शंकर-जयकिशन टाईप वाटतो असा मतप्रवाह आहे. (आशाताईंनी गायलेलं वो कौन थी?(१९६४) मधलं 'शोख नजर की बिजलियाँ..' हे गाणं मुळात मदनमोहनने संगीतबध्द केलेलं आहे. पण ते केवळ ओपी थाटाचं वाटतं म्हणून एच.एम.व्ही.ने ते ओ.पी.नय्यर हिटस्च्या यादीत टाकलं आहे, तर आपली काय कथा?) गाणं नीट ऐका. त्याला ओपी टच आहेच आहे. आज अचानक उदासीचे क्षण आले किंवा कोणत्यातरी भग्न आठवणींनी आपण वेडेपिसे झालो की हे गाणं ऐकावंसं वाटतं. त्यातली थॉट आणि एकंदरीत पेशकश मनावर नक्कीच फुंकर घालते. कवि प्रदीप, मुकेश किंवा ओ.पी.नय्यर आज आपल्यात नाहीत पण त्यांनी दिलेल्या या गाण्यात जीवनाचं किती सत्य सामावलंय पहा..

*यहाँ पूरा खेल अभी जीवनका, तूने कहाँ है खेला?*
*चल अकेला, चक अकेला, चल अकेलाऽऽ, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..*

♥

## ३४ : चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss

चित्रपट : संबंध (१९६९)
निर्माता : राम मुखर्जी
दिग्दर्शक : अजय विश्वास
गायक : मुकेश
गीतकार : कवि प्रदीपजी
संगीतकार : ओ. पी. नय्यर

मुकेश :
चल अकेला, चक अकेला, चल अकेला..ss, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..
चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..

मुकेश :
हजारो मील लंबे रास्ते तुझको बुलाते, कोरस : आss
यहाँ दुखडे सहनेके वास्ते तुझको बुलाते, कोरस : आss
है कौनसा वो इन्सान यहाँपर जिसने दु:ख ना झेलाss
कोरस :
चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss
मुकेश :
तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला.. चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss
तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..

मुकेश :
तेरा कोई साथ ना दे तो, तू ख़ुद से प्रीत जोडलेSS, कोरस : आss
बिछौना धरती को करके.. अरे आकाश ओढलेSS, कोरस : आss
यहाँ पूरा खेल अभी जीवनका, तूने कहाँ है खेला ?
कोरस :
चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss
मुकेश :
तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..
चल अकेला, चल अकेला, चल अकेलाss. तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला..

♥

या चित्रपटातील सर्व सुपरहिट गाण्यांची 'ऑडिओ', संबंधित गाण्याचा 'व्हिडिओ आणि कराओके' तसेच, संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक :

१. 'संबंध' (१९६९).. (चित्रपटातील गाणी) https://youtu.be/6X1kkdk3MM4

२. चल अकेला चल अकेला.. (व्हिडिओ) https://youtu.be/1HsLqPcayh4

३. चल अकेला चल अकेला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/6FKCeDHUbuE

४. 'संबंध' (१९६९)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/41ZCdyZqifs

५. मुकेश (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/Ks0k3YQRu90

## ३५. चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा..

'कुणी स्टेनगनवाल्यांची सिक्युरिटी असलेले दाढीवाले व्हीआयपी आलेले, ते बहुतेक इथले नगरसेवक असावेत, तुमच्यासाठी कसलंसं कार्ड देऊन गेलेत..' मी कन्फ्युजलो. कोण असेल बुवा? (दाढीवाला आणि स्टेनगन म्हटलं की टेन्शनच येतं बघा.) निवडणुका जवळ येतायत म्हणता, आता प्रत्येकजण बातमीत राहू पाहतोय.. कौमी एकता, जनजागरण वगैरे केलं की मिडियावाले आयतं कव्हरेज देतात.. याचंच फलित म्हणूनच की आजकाल गावोगावी, खेडोपाडी बऱ्याच संमेलनाचे मांडव टाकले जातायत. पोत्यानं निमंत्रणं येतात. स्टुडिओत अर्जंट काम नसलं तर बऱ्याच ठिकाणी आवर्जून जातो तर कुठे पत्रकार म्हणून मजबुरीने हजेरी ही लावावीच लागते. टेबलाकडे जाऊन कधी एकदा खुर्चीत बूड टेकतोय आणि ते कार्ड पाहतोय, असं झालं.. यंदाची दिवाळी, त्यानंतर न्यू-इयर, बकरी-ईद, मागोमाग आलेला लव्ह-डे (उसको 'व्हॅलेंटाईन डे' बोलनेका नै!).. पण कवित्व संपलं नव्हतं. कुठल्याश्या कोकणी मुसलमान खासदारानं पुढाकार घेऊन 'मुशायरा' आयोजित केलेला.. आमच्या अन्वर राजा नावाच्या खास मित्रानं त्याचं आग्रहाचं निमंत्रण पाठवलं होतं. फोनही केला.. म्हणाला.. 'बरखुरदार.. हमारे मुशायरे में जरूर तशरीफ लाना.. अज़ीजभाई है, जानीभाई है.. इन्शाल्ला तबीयत खूष हो जाएगी.. 'आप की खातीर'की बात मालुम पडी की नही?'.. मी नाही म्हणताच तो बुचकळ्यात पडला.. नंतर त्याने जे सांगितलं ते ऐकून हम तो दंगही रह गये.. त्यांनी 'आप की खातीर' नावाचं संमेलन आयोजित करण्याचं ठरवलं होतं.. नाचो-गाओ-खाओ-पिओ स्टाईलचं! 'ओन्ली नॉन-व्हेज खाद्य-चळवळ!' महोत्सव! चक्क सलमान या इव्हेंटचा 'ब्रँड अँबेसेडर' असणार होता! अन्वर राजा कोकणी त्यामुळे आम्ही मराठी जसे लढवय्ये असतो तसेच खवय्येही आहोत हे त्याला ठाऊक होतं. कम-वन, कम-ऑल! खातीरदारी! मेहमान नवाजी! आपला 'कोकण महोत्सव' असतो तसं त्याचं हे 'आप की खातीर'!.. स्टुडिओत दुसऱ्या दिवशी अज़ीज नाजांचं रेकॉर्डिंग असणार होतं. रिलॅक्स! त्याच नशेत घरी गेलो.. रात्री झोपलो तर डोक्यात तेच विचार! हे संमेलन असेल तरी कसं या नुसत्या स्वप्नरंजनानं चिकन बिर्याणीचा मस्त वास नाकात शिरला आणि.. 'मुशायरा' बरोबरचं 'आप की खातीर' संमेलन डोळ्यांभोवती गरागरा फिरू लागलं...

फुकट पासेस मिळतायत म्हणून नाही पण कुतुहल म्हणून आम्ही सर्वांनी जायचं ठरवलं होतं. नागपाडा ते गांडू बगिचा-गोलपिठा-महंमद अली रोड-मनिष मार्केटपर्यंतच्या आपल्या इलाक्यात या लोकांनी मोठमोठी होर्डिंग्ज लावली होती. दिल्ली दरबार आयोजित, सुलेमान उस्मान मिठाईवाला पुरस्कृत अशा या भव्य खाद्य-संमेलनाला हमखास गर्दी होणार, यात शंका ती काय? च्यायला! कमाल आहे हं या लोकांची? आपले 'कोकण महोत्सव' सुपर-हिट होतायत म्हणता, या दाढीवाल्यांनी आपल्या कुर्त्यांच्या अस्तन्या वर केल्या असाव्यात. त्यांनी केलं, आपून भी करेंगे.. म्हणूनच या दाढीवाल्यांनी हे संमेलन आयोजित केलंय हे शेंबड्या पोरानंही सांगितलं असतं. 'मॅक्डॉनल्डस्'मध्ये लवकरच आपला 'वडा-पाव' येणार हे ऐकून होतो. यांनी त्याला तोडीस तोड म्हणून 'मॉन्जिनिज'ला पटवलं. सलमान या इव्हेंटचा ब्रँड अँबेसेडर आहे म्हणता मोठमोठे उद्योजक झक मारत एअर-इंडियाच्या महाराजासारखे अदबीनं हाजीर झाले यात नवल ते काय?

'मुशायरा'चा दिवस उजाडला. आम्ही सहा मित्र अन्जुमन इस्लामच्या ग्राऊंडवर अन्वर राजाच्या सूचनेप्रमाणे थोडा वेळ आधीच पोहोचलो. 'आप की खातीर' लिहिलेलं मोट्ठं, आकर्षक आणि कल्पकतेनं बनवलेलं प्रवेशव्दार! रोषणाई! (च्यायला, इथेही नितीन देसाई?) नेपथ्य विशाल होतं. देवनागरी लिपीत 'आप की खातीर' अशी मोट्ठाली अक्षरं. मॉन्जिनिज आणि थम्स-अपचे लोगो. मुख्य म्हणजे वर उजवीकडे आपला राष्ट्रध्वज आणि 'मेरा भारत महान' अशी अक्षरंही कोरली होती. बरं वाटलं! भय्यांच्या छटपूजा किंवा रामलीला प्रोग्राममध्ये राईच्या तेलाच्या वासानं हमखास डोकं उठतं. इथे आसमंतात उंची अत्तराचा घमघमाट होता! (आज ही हमने बदले है कपडे..आज ही हम नहाये हुए है.. इष्क में हम तुम्हें क्या बताए...) तिथला माहौल बघून थोडसं दडपण आलं. नागपाडा, मदनपुरा, महंमद अली रोडवरून एकटं चालत जाताना जसं निगेटिव्ह-टेन्शन येतं तसं क्षणभर वाटलं. पण सिक्युरिटी सॉलिड होती. चेकिंग झाली. त्यांनी आमच्या गळ्यात आय-कार्ड लटकवली. हलाल करायला नेताना बकऱ्यांच्या गळ्यात जशी नंबर लिहिलेली माळ घालतात ना तसलं भयंकर दृष्य डोळ्यासमोर तरळतंय तोच अन्वरने पुढे येत 'जय महाराष्ट्र' म्हणत अस्खलीत मराठीत आमचं स्वागत केलं. सर्वत्र सीसीटीव्ही. 'मुशायरा'साठी मोट्ठा स्टेज उभारलेला होता! आता आम्ही स्टेजकडे.. तयारी तर जय्यत होती. वेल-प्लॅन्ड! गायक कव्वाल अज़ीज नाजांचा पहिला टर्न होता. मी त्यांना आणि वादकांना भेटलो. आम्ही आलोत म्हणता सगळेच खूष झाले. अन्वर राजा गायक म्हणून नाव काढत होता पण अज़ीजभाईंसमोर तो म्हणजे अगदीच ज्युनियर.. त्याला आमची खातीरदारी करण्याच्या धमकी-स्टाईल सूचना दिल्या गेल्या.. आता आमची वरात खाओ-पिओकडे..

मोजकीच मराठी मंडळी दिसत होती. जास्त संख्येने होते ते पठाणीत. छोट्या मुली सलवार-कमीजमध्ये, तर तरुण मुली-बायका बुरख्यात! (रांगोळ्या बघायला मिळणार नाहीत म्हणून राजूचा चेहरा पडला..) मी अन्वरला खुशाली विचारतोय तोच राजू-संजू-नंदू गप्पा मारत मारत पुढे गेले. झालं! त्यांच्या कावऱ्याबावऱ्या नजरा पाहून पिवळया पठाणीतला एक आडदांड मल्ल झटक्यात त्यांना सामोरा आला.. 'अस्सलाम वालेकुम.. भाईजान.. छोटे का.. के बडे का?' बाप रे! नंदू जाम घाबरला. छोटा राजन-बडा राजन तसा छोटा अन्वर-बडा अन्वर असंही प्रकरण आहे का? त्यांनी अन्वरच्या दिशेने बोट दाखवलं.. अच्छा? कोकनी? तो आप उस तरफ जाईये.. इधर बडे का है! आम्ही ब्लॅंक! नंदू तोपावेतो आमच्याजवळ आला होता. अन्वर खळाळून हसला.. म्हणाला 'बकऱ्याचं म्हणजे छोटे का, बैलाचं.. वगैरेला बडे का म्हणतात! उजवीकडे 'छोटे का', डावीकडे 'बडे का'!' आम्ही हसत हसत उजव्या भागात शिरलो. आता गांगारलेला संजू पुटपुटला 'पोलिसांची फौज आहेच. पण ते कोण? मला वाटतं ते जे हिरव्या पठाणीतले ग्राउंडच्या भिंतीच्या आसपास रेंगाळतायत ना, ते पाहूणे नसावेत! त्यांची नजर सगळीकडे भिरभिरतेय.. त्यांच्या पाठीवर त्या कसलीशी बॅगही दिसतेय.. आता तर ते सारखे इकडेच बघतायत, छुपी सिक्युरिटी आहे की काय?..' अन्वरनं मानेनंच हो म्हटलं. आम्ही इकडे-तिकडे बघत मार्गस्थ झालो. आता अत्तराचा घमघमाट लुप्त झाला होता, नॉन-व्हेज व्यंजनांचा तुफान वास सुटलेला. जागोजाग मोठ्ठाल्या कढया, दोन माणसं मावतील एवढ्या मोठ्या डेगच्या मांडलेल्या. मिशा भादरलेले दाढीवाले मुघल सरदार हातात लांबलचक झारे, कालथे घेऊन आपापल्या 'पाक'कलेत मग्न होते. उपस्थित माणसं प्लेटमध्ये ते जे वाढतील ते घेऊन बकाणे भरून खात होते. (जो जे वांछिल तो ते लाहो, (खा) प्राणी जात!) एक तगडा इसम ब्रिटानिया ब्रेडची पाकिटं, कोंबडी निर्दयपणे सोलावी तद्वत फाडून पावांची चळत रचत होता. एक मियाँ सुऱ्यांनी सपासप वार करत नान कापत होता. पाहुण्यांमध्ये उत्साह दांडगा होता. कुणी चिकन-लॉलिपॉपचा फडशा पाडताहेत तर कुणी खिमा-पाव खाण्यात मग्न आहेत. ओळीनं स्टॉल्स होते. रंगावली प्रदर्शन दाखवावं तसा अन्वर उत्साहानं एक एक  स्टॉल दाखवत होता. 'हं.. आराम से.. ही वेगवेगळी सूप्स ! पाया-सूप, जबान-सूप, सीना..इत्यादी इत्यादी. ती मोठी भट्टी दिसतेय ना त्याला तंदूर म्हणतात. त्यात 'रान' शिजतेय.. रान म्हणजे बकऱ्याचा अख्खा पाय.. नुसरत फतेह अलींची ही आवडती डिश.. बरं का? पुढच्या काउंटरवर विरारचं स्पेशल भुर्जीग, लालबागच्या दत्त-बोर्डिंगची ही अस्सल मालवणी वडे-सागुती, हा बैदा-खिमा घोटाला, हे खिमा पल्टी, खिमा-वडे, मटण-बिर्याणी, कुर्मा, चिकन-तंदुरी, बारा हंडी, चाप, भेजा-फ्राय, सीग-कबाब, बोटी-कबाब, कलेजी-फ्राय, पोटा-फ्राय, दाल गोश्त, वजरी, खिचडा, हलिम.. तो 'स्वीट डिश' में फिर्नी (खीर), मालपुआ, फालुदा, कस्टर और न जाने कितनी तरहा की आईसक्रीम!.. अरे, ये तो सिर्फ झाँकी है, पर्दा खुलना अभी बाकी है!' बाप रे बाप किती ही नावं! (च्यायला, किती सफाईने बोलतोय! हा चिलियाच्या हॉटेलात 'वेटर' होता की काय? अशी नावं घेतोय की त्यातल्या कित्येक पदार्थांची नावंही आम्ही कधी ऐकली नव्हती.) इथे यायचं, हेवी खायचं म्हणून पोट रिकामं ठेवलं होतं त्यामुळे एकेक पदार्थाच्या मस्त वासानं जठराग्नी प्रदीप्त होत होता. या अग्नीनं आता पुढे ज्वालामुखीचं रूप घेऊ नये म्हणून आम्ही थांबायचं ठरवलं. पोटात कावळे ओरडत होतेच. आता तर त्यांना नातवंडंही होण्याची वेळ झाली असावी इतकी भूक लागलेली. (पूर्वी लढाईत शत्रूवर तुटून पडताना 'हर हर महादेव' अशी गर्जना करत असत, नेमके तेच शब्द आपल्याकडे पंगतीतल्या श्लोकाशेवटी का म्हटले जातात ते आज कळलं.) चला मित्रांनो.. मुघलांनी बनविलेल्या मोगलाई-डिशवर हल्लाबोल करा! परधानजी बघता काय.. कापा त्याचा. तुटून पडा... बस्स!! 'अन्वरभाई, सॉलिड भूक लागलीय..आपण आता खाऊया का?!' अन्वर चमकला.. 'अभी!?..गला 'गिला' नही करोगे?' अच्छा ! ही पण सोय आहे वाटतं इथं?.. 'काय करणार, व्हीआयपींसाठी करावं लागतं यार'.. आम्ही नकारघंटा वाजवली.. 'नही यार.. पियेंगे तो खानेका मजा किरकिरा होगा..' अन्वर खूष! 'तो आप मेरी बिरादरी के हुए.. बोलो, क्या क्या खाओगे? बाद में मैं आप को पान खिलाऊंगा.. अनारकली.. छपरी-पलंग.. मस्त-मलंग..' आम्ही स्टार्टर म्हणून प्लेट भरून नल्ली-न्याहारी खाल्ली. (बचपना गेला, जवानी गेली पण बकऱ्याच्या टांगेतला-नल्लीतला हा मेवा इतक्या जास्त प्रमाणात ना कधी पाहिला होता ना खाल्ला होता.) पुढची डिश खिम्याची. सोबत शिंपल्यांसारखे 'आऽऽ' वासलेले ताजे पाव आणि आत मस्क्याचा पिवळाधम्मक ऐवज. कांदा, लिंबू, तळलेल्या मिरच्या, दही कचुंबर! व्वा! मजा आया.. इतक्यात गेटकडे गडबड उडाली. समोरचे चौघे हातातल्या प्लेटस् टाकून पळाले. सगळे लोक गेटकडे धावतायत म्हणता आम्ही घाबरलो. काही लफडं-भानगड झाली की काय!.. आपल्याला कुणी नडला तर आपण जास्तीत जास्त काय करतो? त्याची कॉलर धरतो.. ठाऊक असलेल्या दोन-चार शिव्या हासडतो.. बघून घेईन म्हणतो.. पण हे दाढीवाले? फार तापट बुवा. ते डायरेक्ट हत्यारच काढतात हा आजवरचा अनुभव. दयामाया कुछ नही. आम्ही टेन्समध्ये आलेलो पाहून अन्वरभाई खळखळून हसला. 'अरे यार टेन्शन नही लेना.. कुणी स्टार आला असणार म्हणून गडबड उडालीय. ते चॅनलवाले आहेत. 'बाईटस्'साठी पळालेत. शाहरुख-आमिर-जॉन, या फिर अपना सलमान..आया होगा!' आम्ही हडबडलो. 'फिल्म-स्टार्स? इथे?..' हातातल्या लॉलिपॉपचा लचका तोडत अन्वर आनंदानं म्हणाला.. 'सल्लूभाई या इव्हेंटचा ब्रॅंड अँबेसेडर आहे यार! त्यात आम्ही कोकणी.. म्हणजे राष्ट्रप्रेमी. (मी गोरामोरा झालो. तो दाऊद कोकणीच ना? पण ही शंका इथं विचारणं अश्लाघ्य ठरेल म्हणून मी तळलेल्या मिरचीचा कच्कन लचका तोडला) आमच्या समाजातले सगळे येतातच. दोस्ती-यारी असल्याने आमच्या फंक्शनला इतरही गेस्ट येतात. प्रेमानं येतात.

नो पॉलिटिक्स! मंत्री-संत्री, नायक-खलनायक, फिल्मी हस्तीयाँ तर येतातच. आजच्या इव्हेंटसाठी तर पाक-अरब वगळता लंडन-फ्रान्स-टोकियो-न्यूयॉर्कवरुन परदेशी पाहुणेही आलेत. सगळे आमचे मेहमान! सगळे फिल्मस्टार्स येणार.. एवढंच नाही तर सचिन, सेहवाग, युवराज, जम्बो, भज्जीही येतील, बघाच तुम्ही! हा नुसताच खाद्यमेळावा नाही.. मामुली गेट-टुगेदर नाहीय. करोडोंचा इव्हेंट आहे यार! रात अभी बाकी है भिडू. आगे आगे देखो, होता है क्या! मुशायऱ्याचा स्टेज पाहिलात ना? आता अज़ीजभाईंची कव्वाली झाली रे झाली की अशोक हांडेचा 'हम हिन्दुस्थानी' हा प्रोग्राम होईल.. नंतर छोटे युसुफ आझाद आणि मुन्नी बेगमचा कव्वाली मुकाबला होईल. आहात कुठं? म्युझिक-डान्स-खाना-खजाना! चला! आता खात खातच सगळा नजारा बघायचा.' एवढं सांगून अन्वर थोडा नजरेआड होताच, मला बाजूला घेत दिन्या पचकला.. 'एवढा मोठा इव्हेंट म्हणजे केवढी कत्तल? बाप रे! बकरी-ईदपेक्षाही जास्त खूनखराबा झाला असणार, नाही का? हजारो बकरे, लाखो कोंबड्या कापल्या असतील! रक्ताची तर नदीच! अरे, मटन-शॉपमध्ये कोंबडीचं वजन करताना, जर तिने याचनेच्या नजरेनं माझ्याकडे नुसतं पाहिलं ना तरी आपल्या काळजाचं पाणी पाणी होतं यार. आणि इथे? चक्क कत्ल-ए-आम? या इव्हेंटला जवळजवळ पन्नासेक हजारांची तरी उपस्थिती असणार. मांस खाऊन टाकलेल्या हाडांचा जो खच पडेल ना, त्यात महाराष्ट्रातल्या सर्व अभयारण्यातल्या प्राण्यांची जंगी पार्टीच होईल पार्टी! छ्याऽऽ!! आता मला खाताना कसंसंच होतंय!' श्याम उसळला. 'ओऽऽ परधानजी!.. काय चाललंय काय? तुस्सी ग्रेट हो यार! तू मांसाहारी ना? मग गुमान एन्जॉय कर की! आपण कोंबड्या-बकऱ्यांची शोकसभा घ्यायला इथे आलेलो नाही. रेल्वेच्या टॉयलेटमध्ये नाइलाजाने जातात तसा तू इथे आला असशील तर टळ इथून. सोवळं-ओवळं आम्हाला शिकवू नकोस. मी बरेच पाखंडी पाहिलेयत. जानवं बॅगेत ठेऊन बारमध्ये घुसणारे, दिवसभर हरी-हरी म्हणायचं आणि रात्री देव्हाऱ्यातलं निरांजन उलटं करून दारूचा पेग मापणारे महाभाग जेव्हा आपल्या डोळ्यानं बघशील ना तेव्हा असली फिलॉसॉफी तू त्यांना सांग. आम्हाला नको. आम्ही सर्वसामान्य आहोत. कॉमन मॅन! कशाला आमच्या मूडचीऽऽ..!' काहीतरी गडबड आहे असं लक्षात येताच मघाचा तो आडदांड पुन्हा आला. 'क्या हुआ? कुछ टेन्शन है क्या ?' आम्ही विनम्रपणे म्हणालो. 'नही.. आम्ही स्टॉलवरचा हा नवा आयटम बघतोय.' 'देखो मत. खाओ!.. जी भर के खाओ. आप हमारे मेहमान है. सभी लहेजा एकसाथ, ऐसा मौका रोज थोडी ना आता है?!' 'खरंय बाबा.' म्हणत आम्ही तिथनं कल्टी घेतली. 'परधानजी.. त्याची बॉडी पाहिलीत? छत्रपती शिवरायांनी शाहिस्तेखानाची बोटं छाटली, तो राग जर त्याच्या मनात अजून खदखदत असेल ना तर तुझी खैर नाही. ही असली फिलॉसॉफी त्यानं ऐकली तर तुझी बोटंच काय, हातही कलम करील तो कसाई. होशियार! निगाह रखो !'

*हुए नाम-वर, बे-निशाँ.. कैसे..कैसे! जमीं ख़ा गयी.. नौजवाँ.. कैसे.. कैसे!*
*आज जवानीपर इतरानेवाले कल पछतायेगा, चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा..*

अज़ीजभाई गात होते. त्यांचा बुलंद आवाज आसमंतात घुमत होता.. आमची आवडती कव्वाली सादर होत होती. तंदुरीचे लचके तोडता-तोडता आम्ही कव्वालीचा मजा घेत होतो. पेपर-नॅपकिनमध्ये चिकनची अख्खी टांग आईस्क्रिमचा कोन पकडावा तशी नाचवत आम्ही एकेक गड सर करावा तसं एकेक दालन पालथं घालत होतो. आम्ही नॉन-व्हेज खातो पण म्लेंछ, मुघल, यवन, पठाण, पंजाबी, फिरंगी, इंग्रजांइतुके त्यात सराईत नाही याची खंत वाटली. शिजलेल्या मांसाचेही लचके बेगुमानपणे तोडण्यास निधडी छाती लागते. वेगळ्या दाढा लागतात (दाढीही लागते का?) हे मनोमन पटलं. अन्वरमुळे आम्हाला खास व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत होती. आम्ही गेटसमोरच्या स्टॉलजवळ असण्याचा एक फायदा झाला. कव्वाली कानावर पडत होती.. तर कोंबड्या-बकऱ्यांच्या मांसावर ताव मारता मारता बऱ्याच सेलेब्रिटिजना अगदी जवळून पाहता आलं. टीव्हीवर एकेक जण डाइट-योगा वगैरे बाता मारताना दिसतात, पण इथे मात्र सर्वचजण त्या गोष्टी बासनात गुंडाळून आले असावेत. सचिन जसा एकेका बॉलवर तुटून पडतो तसे हे लोक चैतन्याने सळसळत सामिष पदार्थांवर अक्षरशः तुटून पडत होते. कमालीचं विलोभनीय दृष्य..

*तू यहाँ मुसाफ़िर है, ये सराय फ़ानी है, चार रोज की मेहमाँ, तेरी जिंदगानी है।*
*ज़न, ज़मीन, ज़र, ज़ेवर, कुछ न साथ जाएगा, ख़ाली हाथ आया है, ख़ाली हाथ जाएगा। ..*
*आज समझलेऽऽ कल ये मौका, हाथ न तेरे आएगाऽऽ*
*ओ गफ़लत की निंद में सोनेवाले, धोख़ा ख़ाएगा, चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा..*

गर्दी वाढत होती.. आम्ही तंदुरीचा यथेच्छ समाचार घेत असताना जानीभाई आले.. त्यांच्याशी गप्पा मारतोय तोच ग्राऊंडच्या मध्यावर काही गडबड झाल्यासारखं दिसलं, अन्वर हरणाच्या चपळाईनं त्या दिशेने पळाला. आम्हीही गेलो. एका अफझल खानासारख्या तगड्या मियाँने एका फॉरेनरची गच्ची धरली होती. त्या मियाँचे इतर सहकारी तर मारामारीच्याच मूडमध्ये होते. राडा! झालेलं काय की त्या फॉरेनरने काहीतरी हवं होतं म्हणून त्याने स्टॉलवरच्या त्या टग्याला बोलावलं. 'आय वॉन्ट योगार्त..

योऽऽगार्त!' कुणाला काहीच कळलं नाही, म्हणून ते त्याची टर उडवू लागले.. 'आय वॉन्त.. योगार्त..यू नो काऊज मिल्क? स्लिपिंग इन द नाईट, मॉर्निंग बिकम्स टाईट!' 'अबे..तेरी माँ.. दही बोल ना बे! सामने तो रख्खा है दिखता नही क्या तेरेकू?.. साला दिमाग का दही कर डाला हरामजादेने.. गोरी चमडी का!'.. त्या मियाँने हात उगारला.. त्यांना भाषा समजत नसेल पण आपल्या अविर्भावावरून शिव्या दिल्याचं त्यांना लागलीच समजतं. आईवरनं शिवी दिल्याचं त्याच्या लक्षात आलं असावं.. तो चिडला. त्याने रास्कल.. सन ऑफ.. वगैरे बोलताच आमचे मियाँ पेटून उठले. दिल्या दोन ठेऊन!'. राडा! आम्ही मध्ये पडलो. फॉरेनर 'आय वॉन्त..योगार्त.. आय वॉन्त..योगार्त..' ओरडतच होता. वाचवायला गेलो तर मला एक ठोसा लागलाच..

मी खाडकन जागा झालो.. बायको गदागदा हलवून उठवत होती. 'काय 'योगार्त योगार्त' चाललंय? कामावर नाही का जायचं'... स्वप्नरंजन? मी स्वप्न बघत होतो? नाही! कालच्या आप की खातीरचा 'हँगओव्हर' अजुनही उतरला नव्हता तर! अरेच्चा! पण ते अज़ीजभाई कसे दिसले?.. आधी जयाप्रदासारख्या चिकन्या पोरींची स्वप्न पडायची.. आता रावणासारख्या तब्येतीच्या अज़ीजभाईंची? लाहौल वला कूव्वत!.. अरे हो! आज त्यांचंच रेकॉर्डिंग आहे की! झटपट तयारी करून मी कामावर हजर झालो. स्टुडिओत अज़ीजभाई आपल्या साजिंद्यांसह उपस्थित होते. मी त्यांच्याशी ओळखीचं हसलो.

'चढता सूरज धीरे धीरे..' आणि अजीजभाईंच्या इतर सुपर-हिट कव्वालींचं 'कव्हर-व्हर्शन्स' करण्यासाठी 'ट्रॅक्स' बनवणं सुरू होतं. त्यामुळे मी लेखासाठी हेच गाणं घ्यायचं ठरवलं. तशी खास मैफलींना-मुकाबल्यांना जाऊन कव्वाली ऐकण्याची हौस होतीच कुणाला? रेडिओवरून सादर होणाऱ्या अभंग, नाट्यसंगीत, कोळीगीतं, लोकगीतं, भावगीतांच्या व्यंजनांच्या बरोबरीनं चित्रपटसंगीताचा जो रतीब घातला जायचा त्यात 'वन्स इन अ ब्ल्यू मून' यायची एखादी कव्वाली. ताटात लोणच्याची फोड टपकन पडावी तशी. 'जीनत' चित्रपटातल्या 'आहे न भरी शिकवे न किए..' या नूरजहाँ, कल्याणी आणि जोहराबाई यांनी गायलेल्या केवळ तीन मिनिटांच्या कव्वालीने चित्रपटातल्या कव्वालीचा दौर सुरू झाला. नंतर 'हमें तो लूट लिया..' (अल हिलाल), 'तेरी महफ़िल में किस्मत..' (मुघल-ए-आझम), 'ना तो कारवाँ की तलाश..' (बरसात की रात) अशा कव्वाली मन रिझवू लागल्या. त्यातली मस्ती जोश आणि दिल में हल्कासा सुरूर फुंकण्याची ताकद काबिल-ए-तारीफ होती. 'चढता सूरज धीरे धीरे, ढलता है ढल जाएगा..' हा आविष्कार मात्र थोड्या वेगळ्या मिजाजचा. उपदेशाचे डोस पाजणारा. कैसर रत्नागिरवींचा कलाम, कव्वाल अजीज नाजांचा बुलंद आवाज.. सगळंच कसं झपाटून टाकणारं.. आपण हताश झाल्यावर कुणीतरी येऊन प्रेमाने पाठीवर हात फिरवत सांगतं की 'नशेमन पर नशेमन इस कदर तामीर करता जा के बिजली गिरते-गिरते आप ख़ुद बेजार हो जाए' पण 'चढता सूरज..' या गाण्यात अशी डायरेक्ट नसीहत नाहीय. श्रोत्याला समोर ठेऊन.. त्याला उद्देशून. इंग्रजीत 'यू-ॲटिट्यूड' म्हणतात तसं थेट संबोधन. काही दाखले देत-देत जीवनाचं वास्तव सांगितलंय. कधी काहीसं मार्मिक तर कधी नमकीन. मुखड्यात शायर खिजवण्याच्या मूडमध्ये वाटतो खरा, पण अंतऱ्यात तो आपल्याला चांगलेच फटके मारतो..

मौत ने ज़माने को, ये समा दिखा डाला, कैसे कैसे 'रूस्तम' को ख़ाक में मिला डाला।
याद रख 'सिकंदर' के हौसले तो आली थे, जब गया था दुनिया से, दोनो हाथ खाली थे।
अब न वो 'हलाकू' है, और न उसके साथी है, जंग-जू 'पौरस' है, ओर न उसके हाथी है।
कल जो तन के चलते थे, अपनी शान-शौकत पर, शम्मा तक नहीं जलती, आज उनकी तुरबत पर।
अदना-ओ-(या)-आला हो सबको लौट जाना है, मुफ़लिसों, तवांगर का, कब्र ही ठिकाना है।
जैसी करनीऽऽ, जैसी करनी वैसी भरनी, आज किया कल पायेगा।
सर को उठाकर चलनेवाला, इक दिन ठोकर खाएगाऽऽ चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा

'उर्दू' या अपसव्य लिपीबाबत आपण अनभिज्ञ आहोत ना? हरकत नाही. तसं इथलं 'उर्दू' पचनी पडण्यासारखं आहे. 'कव्वाली' म्हटलं की डोळ्यांसमोर एकच चित्र तरळतं. तिरछी टोपी घातलेला मस्त-कलंदर, अंगावर लाल किंवा हिरवा अशा गडद रंगातला चुडीदार आणि नक्षीकामाचं जाकीट घालून डाव्या कानावर हात ठेऊन उजवा हात उंचावत म्हणतात ती 'कव्वाली'! बाजुला ढोलक, सारंगी, बेन्जो वाजवणारे साजिंदे आणि टाळ्यांनी विशिष्ट ठेका देणारा कोरस. अर्थात हे चित्र आपल्यावर ठसवलं ते फिल्मवाल्यांनी. या सुप्रसिध्द गाण्याचे 'फ़नकार, कव्वाल अज़ीजभाई' माझ्या विशेष परिचयाचे. मी त्यांनाच या कव्वाली प्रकाराबद्दल विचारलं. त्यांनी बरीच माहिती सांगितली.. 'कव्वाली' भजन की सूरतमेंही थी पहले.. इबादत म्हणावी अशी. मूळ पर्शियन शब्द 'कौल'! संत कबीर आणि मीराबाईंच्या रचना किंवा भजनं असतात तेच रूप होतं या 'कौल'चं. ही कव्वाली आलीय ती दर्ग्यातूनच, म्हणूनच गानेवाले सरपर टोपी पहनते है.. नंगे सरसे कव्वाली गाणं पाप समजतात अजूनही. सात-आठशे वर्षांपूर्वी अरब देशातून खुष्कीच्या मार्गाने जगप्रवास करत 'ख़्वाजा मोईनुद्दीन चिश्ती' (ख़्वाजा गरीब नवाज) हे सूफी पंथाचे संत भारतात आले. अजमेर हे

त्यांचं स्थान. संत ज्ञानेश्वरांच्या काळातच या ‘ख़्वाजा गरीब नवाजजींनी’ जनजागृती आणि धर्मप्रसारार्थ कार्य केलं आहे. ते ‘कौल’ गात हिंडायचे. हातात मोठा डफ घेऊन सोबतच्या लवाजम्यासह ‘इस्लाम’चं खरं रूप जनसामान्यांना कळावं म्हणून त्यांचं हे कार्य तुमच्या संतांइतकंच कळकळीचं असायचं. ख़्वाजांनी मुस्लिम धर्माबद्दल साध्या-सोप्या भाषेत कलाम लिहिले होते. तुमच्या ओव्या असतात तसाच हा लेखन-प्रकार. ‘सूफ़ियाना कलाम’ म्हणतात अशा गायकीला. ख़्वाजांनी सुरू केलेला हा गायन-प्रकार रूढार्थाने लोकांना आवडू लागला. ख़्वाजांनीच ‘सूफी’ पंथाची स्थापना केली. त्यांच्या कार्याला खरा सन्मान मिळवून दिला तो अमीर ख़ुसरूने. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतात बऱ्याच मुस्लिम गायकांचं जसं योगदान आहे तसंच या अमीर ख़ुसरूंचंही. चतुरस्र कलावंत होता तो. हल्ली मृदुंग पहायलाही मिळत नाही पण त्याचं वादन करायचे अमीर ख़ुसरू. या अमीर ख़ुसरूंनीच मृदुंगाचे दोन भाग करून ‘तबला’ बनवला. देवी सरस्वतीच्या हातात दिसते त्या वीणेवर संशोधन करून ‘सतार’ बनवली. जेव्हा हे सूफी संत गायचे तेव्हा त्यांना साथ देणारे गायक त्या कवनातले अमुक आशयसंपन्न शब्द श्रोत्यांच्या मनावर ठसावे म्हणून पुनःपुन्हा आळवून म्हणायचे. एक भक्तिपूर्ण माहोल तयार व्हायचा. सब मिलकर ‘कौल’ बयाँ करते थे म्हणून त्याला ‘कव्वाली’ असं नाव पडलं. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील दिल्ली, आग्रा, मेरठ, पतियाळा, किराणा, जयपूर, ग्वाल्हेर अशा घराण्यांबरोबरच ‘कव्वाल-बच्चे’ हे घराणं निर्माण झालं. कव्वालीचा दौर हा सुरूच होता पण काळानुरूप जशी स्थित्यंतरं अपरिहार्य असतात तसे या ‘कव्वाली’ गायकीतही बदल होऊ लागले. काही अभिरूचीसंपन्न (?) लोकांनी ती जत्रेत आणि मेळ्यात आणली. त्याच नतद्रष्टांच्या या कृत्यामुळे ती चक्क कमर्शियल झाली. गायकांनी श्रोत्यांच्या पसंतीपुढे मान तुकवून ती त्यांच्या चवीनुसार सादर करायला सुरुवात केली. इथेच कुठेतरी ‘गज़ल’ प्रकार सुरू झाला. उप-शास्त्रीय असं लेबल लावलं गेलं. मूळ पर्शियन संकल्पनेतलं हे गायन आधी नज़्म नंतर गज़ल म्हणून ऐकायला मिळू लागलं. शास्त्रीय संगीतातली अनाकलनीय रागदारी त्यात नव्हती म्हणून लोकांना गज़ल आणि कव्वाली हे दोन्ही प्रकार आवडू लागले. तुमच्या प्रासादिक भजनाचं जसं पुढे डबल-बारीत रूपांतर झालं तशी ही कव्वाली ‘इष्क-ए-हकीकी’ या इबादतसारख्या प्रकाराकडून ‘इष्क-ए-मिजाजी’ या प्यार-मुहब्बतच्या प्रकाराकडे वळली. दक्षिण मुंबईतल्या डोंगरी-महंमद अली रोड भागात आज जास्त नांदते ती गुन्हेगारी, पण त्याकाळी तिथे संगीत नांदायचं. इस्माईल आजाद, अब्दुल रहेमान काँचवाला, शेख़ लाल मियाँ असे दिग्गज कव्वाली गायक होते. आपले लाडके गायक महंमद रफीही याच भागातले. जानी बाबू, शकिला बानू भोपाली, रशिदा खातून, अख़्तर आजाद, अब्दुल रब चाऊस अशांच्या कव्वालीचे जलसे पहायला मिळायचे. हिंदूही या ‘कव्वाली’ मुकाबल्याचे शौकिन होते. आपल्या प्रल्हाद शिंदेंना तर कव्वाल-गायक म्हणून सन्मान मिळायचा. (‘उड जाएगा इक दिन पंछी, रहेगा पिंजरा खाली.. ’ ही त्यांचीच सुपरहिट कव्वाली) पाण्या तुझा रंग कसा?.. कव्वालीचं रूप हे पाण्यासारखं आहे. ज्या रंगात बुडवाल त्यासारखं. चित्रपटांमुळे कव्वालीला प्रतिष्ठा मिळाली हे जितकं खरं, तितकंच खरं की ही कव्वाली शराब, छेडछाड, प्यार-मुहब्बत अशा विषयावरून आजच्या टप्प्यापर्यंत पोहोचली आहे. मेहमूदने तर या कव्वाली प्रकारात हिजडेही आणले. पूर्वीची तमीज, तहेजीब, इज्जत राहिली नाही..

‘चढता सूरज..’ मध्ये मात्र असं खटकण्यासारखं काहीच नाहीय. ती आपल्या आवडीची आहे ती यामुळेच. ‘जैसी करनी वैसी भरनी..’ हे शाश्वत सत्य सांगणारा हा ‘कलाम’ ऐकून आपण गायक अजीज नाजां आणि शायर कैसर रत्नागिरवींना मनोमन ‘सलाम’ करतो..

*मौत सब को आनी है, कौन इस से छूटा है, तू फ़ना नही होगा, ये ख़्याल झूठा है।*
*साँस टूटतेही सब, रिश्ते टूट जाएंगे, बाप-माँ-बहन-बिवी, बच्चे छूट जाएंगे।*
*तेरे जितने है भाई, वक्त का चलन देंगे, छिनकर तेरी दौलत, दो ही गज कफ़न देंगे।*
*जिनको अपना कहता है, कब ये तेरे साथी है, कब्र है तेरी मंज़ील, और ये बाराती है।*
*ला के कब्र में तुझको, मुर्तपाक डालेंगे, अपने हाथों से तेरे मुँहपे ख़ाक डालेंगे।*
*तेरी सारी उल्फत को, ख़ाक में मिला देंगे, तेरे चाहनेवाले, कल तुझे भुला देंगे।*
*इसलिए ये कहता हूँ, ख़ूब सोच ले दिल में, क्यूँ फसाए बैठा है, जान अपनी मुश्किल में।*
*कर गुनाहों से तौबा, आक़बत संभल जाए। दम का क्या भरोसा है, जाने कब निकल जाए।*
*मुट्ठी बाँध के आनेवालेऽऽ मुट्ठी बाँध के आनेवाले, हाथ पसारे जाएगा।*
*धन-दौलत-जागीर से तुने, क्या पाया, क्या पाएगा। चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा..*

♥

## ३५ : चढता सूरज धीरे धीरे, ढलता है ढल जाएगा..

गायक/संगीत : कव्वाल अजीज नाजां ॲण्ड पार्टी
कलाम : शायर कैसर रत्नागिरवी

हुए नाम-वर, बे-निशाँssकैसेssकैसे!
जमीं ख़ा गयीss नौजवाँ ssकैसेssकैसे!

आज जवानीपर इतरानेवाले कल पछतायेगा,
कोरस : आज जवानीपर इतरानेवाले कल पछतायेगा,
चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा..
कोरस : चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा -२
ढल जाएगा..ढल जाएगा, ढल जाएगा..ढल जाएगा.. ।। धृ ।।

तू यहाँ मुसाफ़िर है, ये सराय फ़ानी है, चार रोज की मेहमाँ, तेरी जिंदगानी है।
ज़न, ज़मीन, ज़र, ज़ेवर, कुछ न साथ जाएगा, ख़ाली हाथ आया है, ख़ाली हाथ जाएगा ।
जानकर भी अन्जाना, बन रहा कै दीवाने, अपनी उम्र-ए-फ़ानीपर तन रहा है दीवाने।
इस कदर तू ख़ोया है, इस जहाँ के मेले में, तू ख़ुदा को भूला है फ़स के इस झमेले में।
आजतक ये देखा है, पानेवाला खोता है, जिन्दगी को जो समझा, जिन्दगी पे रोता है।
मिटनेवाली दुनिया का ऐतबार करता है, क्या समझ के तू आख़ीर इससे प्यार करता है।
अपनी अपनी फिक्रों में, जो भी है वो उलझा हैss
कोरस : जो भी है वो उलझा है -२
जिन्दगी हक़िक़त में, क्या है कौन समझा हैss
कोरस : क्या है कौन समझा है -२
आज समझलेSS आज समझले, कल ये मौका, हाथ न तेरे आएगाSS
ओ गफ़लत की निंद में सोनेवाले, धोख़ा ख़ाएगा,
चढता सूरज धीरे धीरेSS
कोरस : ढलता है ढल जाएगा..
चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा
ढल जाएगा..ढल जाएगा, ढल जाएगा..ढल जाएगा.. ।। १ ।।

मौत ने ज़माने को, ये समा दिखा डाला, कैसे कैसे 'रूस्तम' को ख़ाक में मिला डाला।
याद रख 'सिकंदर' के हौसले तो आली थे, जब गया था दुनिया से, दोनो हाथ खाली थे।
अब न वो 'हलाकू' है, और न उसके साथी है, जंग-जू 'पौरस' है, ओर न उसके हाथी है।
कल जो तन के चलते थे, अपनी शान-शौकत पर, शम्मा तक नहीं जलती, आज उनकी तुरबत पर।
अदना-ओ-(या)-आला हो सबको लौट जाना है,
कोरस : सबको लौट जाना है -२
मुफ़लिसों, तवांगर का, कब्र ही ठिकाना है।
कोरस : कब्र ही ठिकाना है -२
जैसी करनीSS, जैसी करनी वैसी भरनी, आज किया कल पायेगा।
सर को उठाकर चलनेवाला, इक दिन ठोकर खाएगाSS
चढता सूरज धीरे धीरेSS
कोरस : ढलता है ढल जाएगा..

चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा
ढल जाएगा..ढल जाएगा, ढल जाएगा..ढल जाएगा..  ||२ ||

मौत सब को आनी है, कौन इस से छूटा है, तू फ़ना नही होगा, ये ख़याल झूठा है।
साँस टूटतेही सब, रिश्ते टूट जाएंगे, बाप-माँ-बहन-बिवी, बच्चे छूट जाएंगे।
तेरे जितने है भाई, वक्त का चलन देंगे, छिनकर तेरी दौलत, दो ही गज कफ़न देंगे।
जिनको अपना कहता है, कब ये तेरे साथी है, कब्र है तेरी मंज़ील, और ये बाराती है।
ला के कब्र में तुझको, मुर्तपाक डालेंगे, अपने हाथों से तेरे मुँहपे ख़ाक डालेंगे।
तेरी सारी उल्फत को, ख़ाक में मिला देंगे, तेरे चाहनेवाले, कल तुझे भुला देंगे।
इसलिए ये कहता हूँ, ख़ूब सोच ले दिल में, क्यूँ फसाए बैठा है, जान अपनी मुश्किल में।
कर गुनाहों से तौबा, आक़बत संभल जाए।
कोरस : आक़बत संभल जाए -२
दम का क्या भरोसा है, जाने कब निकल जाए।
कोरस : जाने कब निकल जाए -२
मुट्ठी बाँध के आनेवालेss मुट्ठी बाँध के आनेवाले, हाथ पसारे जाएगा।
धन-दौलत-जागीर से तुने, क्या पाया, क्या पाएगा।
चढता सूरज धीरे धीरेss
कोरस : ढलता है ढल जाएगा..
चढता सूरज धीरे धीरे ढलता है ढल जाएगा
ढल जाएगा..ढल जाएगा, ढल जाएगा..ढल जाएगा..  ||३ ||

♥

| | |
|---|---|
| १. चढता सूरज धीरे धीरे.. (मूळ कव्वाली) | https://youtu.be/Qs0_68k7_rk |
| २. चढता सूरज धीरे धीरे.. (व्हर्शन) | https://youtu.be/L05wsnjpkX0 |
| ३. चढता सूरज धीरे धीरे.. (व्हिडिओ) | https://youtu.be/KvC5gT5-keA |
| ४. चढता सूरज धीरे धीरे.. (कराओके - १) | https://youtu.be/x0QgWASIs8s |
| ५. चढता सूरज धीरे धीरे.. (कराओके - २) | https://youtu.be/_mHOTDOSdjI |

सुपरहिट (कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97DlH6sk-Xmi_NyWGUCcaww

सुपरहिट (फिल्मी कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLgbkVdghvEyxwapSfbG9w37RdWdhGC6bH

♥

## 36 : Kabhi Kabhie Mere Dil Me..

## ३६ : कभी-कभी मेरे दिल में..

*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है।*
*की ज़िंदगी तेरी जुल्फों की नर्म छाँव में गुजरने पाती,*
*तो शादाब, हो भी सकती थी।*
*ये रंज-ओ-ग़म की स्याही, जो दिल पे छाई है,*
*तेरी नजर की शुआओं में ख़ो भी सकती थी।*
*मगर ये हो न सका।*
*मगर ये हो न सका और अब ये आलम है।*
*की तू नही तेरा ग़म । तेरी जुस्तजुँ भी नही..*
*गुजर रही है, कुछ इस तरह ज़िंदगी जैसे,*
*इसे किसी के सहारे की आरजू भी नही।*
*न कोई राह, न मंजील, न रोशनी का सुराग,*
*भटक रही है अंधेरों में ज़िंदगी मेरी,*
*इन्ही अंधेरो में रह जाऊँगा कभी खो कर..*
*मै जानता हूँ, मेरी हमनफ़स.. मगर यूँ ही..*
*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है।..*

शनिवार, दिनांक २४ जुलै, १९८२ चा दिवस आठवतोय या क्षणी. बंगलोरच्या 'कुली'च्या सेटवर अमिताभ बच्चनला काहीतरी भयानक अपघात झाल्याची वार्ता कानात कुणीतरी तप्त शिसं ओतावं तशी थडकली. तो आपल्यापैकी कुणाचाच जवळचा नातेवाईक नव्हता. पडद्यावर मिळालेली भूमिका आत्मीयतेने रंगवणारा एक अभिनेता जायबंदी झालाय एवढीच मामुली गोष्ट, पण सारेच हवालदिल झालेले. आपल्याच घरातलं कुणीतरी आजारी पडून साऱ्या घरावर अवकळा यावी तसा उदास माहौल होता घरोघरी. पुनीत इस्सारचा ठोसा तो काय? ज्याला 'मिस्टर नटवरलाल'(१९७९) मध्ये वाघाशी यशस्वी झुंज देताना पाहिलं होतं त्या 'शेरदिल' नायकानं एका ठोशात जखमी व्हावं? लाहौल वला कूव्वत! म्हणतात ना, वेळ वाईट असली की उंटावर बसलेल्या माणसालाही खुजलीवाला कुत्रा चावू शकतो. वाघाला लोळवणारा, बिनधास्त काचा फोडून निसटणारा, एकाच वेळी दहा खलप्रवृत्तीच्या मुकाबला करत त्यांचा खातमा करणारा, सायकल पासून विमानापर्यंतची सर्व वाहने लीलया चालवणारा असा सर्वगुणसंपन्न हीरो आजारी पडलाय ही गोष्टच मनाला क्लेश देणारी. ब्रीज-कॅण्डीच्या आयसीयूत तो मृत्यूशी झुंज देतोय ही बातमीच सुन्न करणारी. पण.. तो वाचला.. सहीसलामत! मधला तो सुमारे सहा महिन्यांचा काळ जणू काळानंच गिळून टाकला असा नूर चेहऱ्यावर वागवत अमिताभ परतला होता.. आपल्यासाठी.. रुपेरी पडद्यावर पुन्हा वादळ आणण्यासाठी..

'कभी-कभी' या यश चोप्राजींच्या चित्रपटातल्या उपरोल्लिखित काव्यपंक्ती दस्तुरखुद्द अमिताभच्याच आवाजात पुनःपुन्हा ऐकताना त्याचा सुरुवातीचा काळ अगदी कालच घडल्यासारखा आठवू लागला. 'कभी-कभी' चित्रपटाला सेन्सॉर प्रमाणपत्र मिळाल्याची तारीख आहे ती मंगळवार, २७ जानेवारी, १९७६. १९७३च्या एप्रिलमध्ये लागलेल्या 'जंजीर'मुळे अमिताभचं नाव वलयांकित झालं होतं. त्याच आसपास आलेल्या 'गहरी चाल'कडे मात्र कुणी गंभीरपणे पाहिलं नाही. (ज्यात जितेंद्र-हेमा मालिनी मुख्य भूमिकेत, अमिताभ इथे होता चक्क निगेटिव्ह रोलमध्ये!) नंतर ओळीने आलेले 'अभिमान', 'नमक हराम' (सुपर-स्टार राजेश खन्ना के साथ.. जणू मुकाबलाच!), 'रोटी कपडा और मकान' (अमिताभ नावापुरता बरं!), १९७५च्या सुरुवातीलाच याच यशजींनी दिग्दर्शित केलेला 'दीवार' लागलेला. अमिताभ या सिनेमात मनाला खूप भावला. मार्चचा पंधरवडा संपतोय तोच 'जमीर' (दिग्द. रवी चोप्रा) तर एप्रिलमध्ये 'चुपके चुपके' (दिग्द. हृषिदा) प्रदर्शित झाला. नंतर थोड्याच दिवसांनी हृषिदांचाच 'मिली' लागला. या काळात काही लोकांनी किंवा पगारी समीक्षकांनी असा (बे)सूर लावलेला की अमिताभ आपले सगळेच सिनेमे एकटा तारून नेऊच शकत नाही म्हणे! त्याला सोबत कुणीतरी लागतंच लागतं. 'दीवार'मध्ये अमिताभसोबत होता तो शशी कपूर. 'जमीर'मध्ये शम्मी कपूर आणि विनोद खन्नाही होते. 'चुपके चुपके'त तर धर्मेंद्र होता साथीला. पण काहीही म्हणा, अमिताभ आमच्या मनावर हळूहळू गारुड करू लागलेला! १५ ऑगष्ट १९७५ ला 'शोले' रिलीज झाला. अमिताभ आता आमच्या गळ्यातला

ताईत बनला. अकरावी-बारावीत असतानाच्या या काळात सकाळी अकराला कॉलेज सुटताच काम काय? तर मराठा मंदिर ते रॉक्सी किंवा पुढपर्यंत जायचं तर मेट्रोपर्यंत जिथे-जिथे म्हणून अमिताभचे पिक्चर्स लागायचे ते पहायचा धडाका लावलेला. त्याच्या या सिनेमांचा 'हॅंगओव्हर' दिलो दिमागवर कायम असतानाच 'कभी-कभी' दाखल झाला.

*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है।. के जैसे तुझको बनाया गया है मेरे लिए..*
*तू अब से पहले, सितारों में बस रही थी कहीं, तुझे जमीं पे, बुलाया गया है मेरे लिए..*

'कभी-कभी'बद्दल सांगायचं तर यशजींच्या 'यशराज फिल्मस्' तर्फे प्रदर्शित झालेला तो एक भावविभोर असा महत्त्वाकांक्षी चित्रपट. वहिदा रहेमान, शशी कपूर, राखी, नीतू सिंह, ऋषी कपूर, उमा दत्त, सिमी, परिक्षित साहनी आणि आपला अमिताभ! गीतकार साहीरजींचा कलाम आणि संगीतकार खय्यामजी. संगीत संयोजन होतं जगजीत कौर आणि एनॉक्स डॅनियलसाहेबांचं. सगळीच गाणी सरस झालेली. 'मैं पल दो पल का शायर हूँ..', 'मैं हर इक पल का शायर हूँ..' ही दोन गाणी मुकेशजींनी गायलेली. 'कभी-कभी मेरे दिल में..' हे दो पहलूवालं गीत एकदा मुकेशजींचं सोलो तर नंतर लतादीदी आणि मुकेश असं ड्युएट म्हणून सामोरं आलं. अस्सल प्रेमगीत म्हणावं असं 'तेरे चेहरे से नजर नहीं हटती..' (किशोरकुमार-लतादीदी) तर 'प्यार कर लिया तो क्या..' हे किशोरकुमारचं सोलोही श्रवणीय होतं. अंगाईगीताची डूब असलेलं 'मेरे घर आयी एक नन्ही परी..' (लतादीदी) लोकांना आवडून गेलं तर ऋषी कपूर-नीतू सिंहवर चित्रित झालेलं 'तेरा फूलो जैसा रंग..' (किशोरकुमार-लतादीदी) जरा वेगळ्या पठडीतलं होतं.

'बॉम्बे टू गोवा'मध्ये किशोरकुमारच्या आवाजात उछलकूद करणारा अमिताभ 'जंजीर'मधून 'अँग्री यंग मॅन' म्हणून अवतरताच थोडंसं वेगळं इंप्रेशन झालेलं जनमानसात. आता हा असेच सीरियस रोल करणार की काय? बरं, त्याला गाणी दिली तर 'आवाज' कुणाचा द्यायचा हेही पक्कं ठरलं नव्हतं तोपर्यंत. किशोर? रफी? की मुकेश? अरे, आपलं सोडा! चक्क हृषिदांसारखे कसलेले दिग्दर्शक किंवा प्रथितयश संगीतकार सचिनदा कन्फ्यूजले होते, अमिताभला नेमका कोणता आवाज सूट होईल या विषयावर. १९७३ सालीच आलेल्या 'अभिमान'मध्ये अमिताभ एका नामचिन गायकाच्या भूमिकेत पेश केला होता. गायकाचा 'आवाज' हीच त्याची पहचान असते. मग त्यांचा हा सुप्रसिध्द असलेला 'गायक किरदार' एकाच 'आवाजातून' गाताना दिसायला हवा की नाही? त्याचा 'गाता गळा' म्हणजे त्याला एकाच गायकाचा 'प्ले-बॅक' दिला पाहिजे होता की नाही? पण त्याच्या तोंडची गाणी चक्क तीन वेगवेगळ्या आवाजातून (किशोर, रफी आणि मनहर उधास) सादर झालीत या सिनेमात.. आता बोला! जशी गाण्याची प्रकृती होती त्यानुसार संगीतकारांनी आपल्या चॉईसच्या गायकांना गाणी दिली. दिग्दर्शकांनी ती या नायकाच्या तोंडी घातली.. झंझट खतम! 'कभी-कभी'मध्ये मात्र अमिताभला 'प्ले-बॅक' आहे तो मुकेशचा. (परवाना, एक नजर, सौदागर, बन्सी बिरजू, रेश्मा और शेरा.. हटाओ यार!) साहीर लुधियानवीचं काव्य भावनांनी ओथंबलेलं गाणं होऊन सामोरं येतं..

*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है, के ये बदन, ये निगाहें, मेरी अमानत है -२*
*ये गेसुओं की घनी छाँव कै मेरी ख़ातीर, ये होंठ और ये बाहें, मेरी अमानत है -२*

अस्सल 'ग़ज़ल' आहे ती. मुखडा पहा, मिसरा पहा! साहीरच्या काव्यातली साहित्यिक मूल्ये असणारी 'थॉट' शब्दागणिक जाणवते. दो पहलूवालं गीत आहे हे. टॅण्डम-सॉंग म्हणतात अशा गाण्यांना. एक भाग 'रोमॅंटिक' मूडचा तर दुसरं त्याच चालीतलं असूनही मनावर विरहगीतासारखा आघात करणारं. राखी आणि अमिताभवर चित्रित झालेलं मुकेशचं सोलो त्या सिच्युएशनमुळे अत्यंत 'रोमॅंटिक' वाटतं. गायक मुकेशचा अनुनासिक स्वर खरा पण इथे तो हळुवार प्रेम करणाऱ्या नायकाच्या स्वभावाशी तो मिळताजुळता असाच वाटतो. अमिताभने आपल्या संयत अभिनयातून ते भाव जिवंतही केले आहेत. 'ग़ज़ल'चं रूप घेऊन येणारा मुख्य विषय इथे 'प्रेम व्यक्त करणं' इतका साधा-सोपा असूनही साहीरने त्यात शब्दरचनाच अशी केली आहे, की पुढे ते जेव्हा विरहगीत म्हणून सामोरं येतं तेव्हाही ते आपण आपलंसं करतो. नायिका जेव्हा ती गाणार तेव्हा त्यातलं काव्य बदलणार किंवा मग या काव्यातले 'पुल्लिंगी' शब्द आता 'स्त्रीलिंगी' होणार की काय असं वाटतं खरं पण चित्रपटातला तो प्रसंग असा आहे की ती नायिका ते गाणं जसं आहे तसं पेश करते. नायक शशीकपूर तिला ते तसंच म्हणायला भाग पाडतो. आपल्याला काहीच खटकत नाही. शब्द तेच आहेत. पण आनंदाच्या क्षणांच्या वेळी ज्या शब्दांनी प्रेमाच्या शिंतोड्यात चिंब भिजवलं तेच शब्द पुढच्या युगलगीताच्या वेळी मात्र विरहाचा एक धगधगता अंगार लेवून काळजाला झोंबतात. शायर साहीर लुधियानवीजींची ही कशिदाकारी जेवढी आपल्या मनाला भावणारी तद्वतच खय्यामजींचं संगीतही थक्क करणारं. परिपोषक, प्रसंगानुरूप! संगीतकार खय्यामजींनी या काव्याला सर्वसामान्य गीताचं रुपडं दिलेलंच नाही. सर्वसामान्य गाण्यांमध्ये अंतरा संपताना गाडी पुन्हा मुखड्यावर येते की नाही? इथे प्रकार थोडासा उरफाटा आहे. इथला अंतरा सुरू होतो तोच मुळी मुखड्याच्याच शब्दांनी.. दोन्ही गाण्यांचे साऊन्ड-ट्रॅक्स नीट

ऐका. जवळजवळ एकाच तालात एकाच चालीत असूनही, दोन्ही गाण्यांचे 'मूड' अगदी दोन टोकांचे. एक अभिजात 'गज़ल' वेगवेगळे भाव कसे समर्थपणे व्यक्त करू शकते याचं हे उत्तम उदाहरण. विरहगीत म्हणून येणाऱ्या या युगलगीतात फक्त पहिली आणि शेवटीची ओळ मुकेशने गायली आहे. अमिताभ गाण्याच्या शेवटच्या पंक्ती गात जेव्हा सामोरा येतो तेव्हा आपल्या मनात कल्लोळ दाटून येतो. प्रेयसीची आठवण, प्रेमभंगाचं दुःख, नैराश्य, विफलता! तरी शब्दाशब्दातून दरवळ दिसतोय तो शाश्वत प्रेमाचा. तो एकच ओळ म्हणतो.. पण त्या एका ओळीत आयुष्याचा डाव उधळला गेल्याची बोच अमिताभने त्याक्षणी आपल्या डोळ्यातून तंतोतंत व्यक्त केली आहे. मुकद्दर (नशीब) आणि हालात (प्राप्त परिस्थिती) यांच्याकडे फिर्याद मांडलीय. शिकायत केलीय. फक्त एकच ओळ.. 'मैं जानता हूँ, के तू गैर है मगर यूँही.. कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता हैSS'.. वाटतं..वाटतं.. उठावं तत्क्षणी! त्याच तिरमिरीत जीवाची बाजी लावून त्याची प्रेयसी जिथं असेल त्या ठिकाणाहून उचलून आणून त्याच्या स्वाधीन करावी.. हे सर्वसामान्य गाणं नाहीय. साहीरची ही पुख्ता शायरी असावी. स्वयंस्फूर्त काव्य! कारण अशा शायरला बंदिस्त मीटरवर शब्दांची गोधडी विणणं आवडत नसतं.

*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है, के जैसे बजती है शहनाईयाँ सी राहों में - २*
*सुहागरात है, घुँगट उठा रहा हूँ मैं – २, सिमट रही है, तू शरमा के अपनी बाहों में ss*

१९७६साठी जेव्हा १९७७ साली फिल्मफेअर ॲवॉर्डस्ची घोषणा झाली तेव्हा 'कभी-कभी' एकूण दहा पारितोषिकांसाठी नॉमिनेटेड होता. मौसम, छोटी सी बात, चितचोर, तपस्या, नागिन, मेहबूबा, धरम करम. बैराग, अर्जुन पंडित, बारूद, फकीरा, सबसे बडा रुपय्या, बालिका बधू, बुलेट, चलते चलते, चरस, दस नंबरी, हेरा फेरी, कालीचरण, लैला मजनूं असे एकेक सरस चित्रपट होते त्या वर्षातले. 'कभी-कभी'च्या याच गाण्यासाठी गायक मुकेश, शायर साहीर आणि संगीतकार खय्याम फिल्मफेअर पुरस्काराचे धनी ठरले. खय्यामजींच्या या सर्वांगसुंदर गज़लेच्या आविष्कारांमुळेच अमिताभ प्रेमिकांच्या मनामनात रुजला एवढं मात्र नक्की. केवळ बुटांवर कॅमेरा असतानाच टाळ्या घेणारा आणि नंतर आपल्या संवादफेकीवर दौलतजादा वसूल करणारा राजकुमार, खांदे वाकडे करत वाकडा उभा राहून शब्दा-शब्दावर जोर देत डायलॉगबाजी करणारा शत्रू लोकांनी काही काळ डोक्यावर घेतला होता. राजेश खन्नासारखा प्रेमाळू हीरो पडद्यावर अवतरताच जीतू, शम्मी, धरमिंदर, फिरोज खानला वाळीत टाकणारे रसिक प्रेक्षक नंतर खराखूरे भजनी लागले ते अमिताभच्याच. राजेश खन्नाला सुपर-स्टार म्हणायचे लोक. वादळासारखा पडदा व्यापलेला या राजेश खन्नाने. पण ती क्षणभर टिकणारी वावटळ ठरली अमिताभच्या झंझावातापुढे. सहा फूट दोन इंच उंचीच्या अमिताभने बघता बघता पूर्ण पडदाच व्यापून टाकला..

*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है, के जैसे तू मुझे चाहेंगी उम्रभर यूँ ही - २*
*उठेगी मेरी तरफ, प्यार की नजर यूँ ही, मैं जानता हूँ, के तू गैर है मगर यूँही - २*
*कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता हैss..*

♥

**श्रवणीय आणि संग्राह्य गाण्यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स :**

१. गीतकार साहिर लुधियानवी (१०० सुपरहिट्स)(ऑडिओ) https://youtu.be/JV74z_Uf9H4

२. साहीर लुधियानवी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/outkSx58IjQ

३. संगीतकार खय्याम (१०० सुपरहिट्स) (ऑडिओ) https://youtu.be/sN1EQEg4tSo

४. संगीतकार खय्याम (मेलडी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/PzsCL5x2tDY

५. साहीर लुधियानवी (सुपरहिटस् - प्ले-लिस्ट) https://www.youtube.com/playlist?list=PLF5418A667BE6DD41

♥

## ३६ :  कभी-कभी मेरे दिल में..

चित्रपट : कभी कभी (१९७६)
निर्माता : यशराज फिल्मस्
दिग्दर्शक : यश चोप्रा
गायक : मुकेश
शायर : साहीर लुधियानवी
संगीत : खय्याम

कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है।
के जैसे तुझको बनाया गया है मेरे लिए..
तू अब से पहले, सितारों में बस रही थी कहीं,
तुझे जमीं पे, बुलाया गया है मेरे लिए..  कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता हैऽऽ

कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है,
के ये बदन, ये निगाहें, मेरी अमानत है -२
ये गेसुओं की घनी छाँव कै मेरी ख़ातीर,
ये होंठ और ये बाहें, मेरी अमानत है -२

कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है,
के जैसे बजती है शहनाईयाँ सी राहों में - २
सुहागरात है, घुँगट उठा रहा हूँ मैं - २
सिमट रही है, तू शरमा के अपनी बाहों में - २

कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता है,
के जैसे तू मुझे चाहेंगी उम्रभर यूँ ही - २
उठेगी मेरी तरफ, प्यार की नजर यूँ ही,
मैं जानता हूँ, के तू गैर है मगर यूँही - २, कभी-कभी मेरे दिल में ख़याल आता हैऽऽ..

♥

या गाण्याशी संबंधित सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.  संपूर्ण चित्रपटाची 'यू-ट्युब' लिंक उपलब्ध नाही.

१. कभी कभी मेरे दिल में.. (व्हिडिओ १) https://youtu.be/pdXZJ6dsaW4
२. कभी कभी मेरे दिल में.. (व्हिडिओ २) https://youtu.be/EKMPf737pp0
३. कभी कभी मेरे दिल में.. (लता-ऑडिओ) https://youtu.be/o-j2hFfLOSE
४. कभी कभी मेरे दिल में.. (ऑडिओ) https://youtu.be/R1QwN9faDZw
५. कभी कभी मेरे दिल में.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/ffRq1Ve9XZ4
६. कभी कभी मेरे दिल में.. (अमिताभ) https://youtu.be/cr2CmVf-HUg
७. कभी कभी.. (सर्व गाणी) https://www.youtube.com/playlist?list=PLXCoHsJ9oLedmtKeWhhiZDlCSsyKEHgrC

♥

## ३७. नाविका रे वारा वाहे..

‘अशोक! अरेऽऽ अशोक!!.. कुठं उलथलाय कुणास ठाऊक! पाहिलंत? पायांना थारा असेल तर शपथ! नाकी नऊ आणलेत या पोरानं.. बिघडलाय तो! बघा.. त्याच्यासाठी एखादी नोकरी. उपकार होतील तुमचे.. अहो, काय तबले बडवतोय, बाजा वाजवतोय.. डोक्याला ताप झालाय माझ्या.. शिंच्या अब्रू वेशीवर टांगणारेय, वेशीवर..’ गोविंदराव जोरजोरात करवादत होते. अशोक हळूच दाराआडून ती गंमत पाहत होता. जो नातेवाईक भेटेल तो त्याला ग्लॅक्सोत चिकटवतो, गोदरेजमध्ये लावतो असं सांगायचा. अशोक ते हसण्यावारी नेत त्यांना कसंबसं टाळायचा. त्याला संगीतकार व्हायचं होतं. बाबुर्जींसारखं! होय! लहानपणापासून त्यानं तीच महत्त्वाकांक्षा उराशी बाळगली होती. संगीतकार बनायचं हेच त्याचं स्वप्न होतं. शेजारी पेईंग-गेस्ट म्हणून राहणारे साक्षात स्वरांचे लेणे आणि स्वातंत्र्य लढ्यातले दिग्गज प्रभृती सुधीर फडके हेच श्रध्दास्थान होतं त्याचं. बाबुर्जींच्या संगीत वटवृक्षाच्या पर्णसंभारानं अशोक झपाटला होता. कांदेवाडीतलं त्यांचं घर. आजूबाजूला बरीच बँडपथकं होती. बर्फाचा गोळा किंवा आईस्क्रीम खात अशोक त्याचं गाणं-बजावणं कुतुहलानं न्याहाळत बसायचा. तासनतास! बाबांच्या छडीचा प्रसाद मिळणार याची खात्री असूनही! त्याच्या वयाची पोरं रेतीत, मातीत किंवा गटारात-मैदानावर खेळत असायची पण अशोक मात्र रिकामे डबे घेऊन त्याची वाद्ये बनवून वाजवण्यात मश्गुल असायचा. थोडसं मोठं होताच चाळे काय? तर दिलीप गुप्ते नावाचा मित्र (जो नंतर सुप्रसिध्द क्रिकेटपटू म्हणून नाव कमावता झाला) सोबत घेऊन ताडदेवच्या फेमसमध्ये जाऊन शंकर-जयकिशनजी तसेच कल्याणजीभाईंचे ‘टेक’ ऐकण्यात धन्यता मानायचा. चारदा हाकलूनही वॉचमनच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करणारा हा छोकरा पुढे संगीतकार म्हणून नाव काढेल असं वाटलं असेल तिथल्या कुणाला? अशोक पत्की घडत होता. व्यवस्थित मॅट्रिक झालेला आपला हा पोरगा एखादी ‘परमनंट’ नोकरी करायची सोडून, बाजापेटी वाजवण्यासाठी फिल्म-लायनीत जातोय या बाबांच्या ओरडण्याकडे चक्क दुर्लक्ष करून!

ते दिवसच तसे होते. सोमवार दि. २५ ऑगस्ट, १९४१ रोजी जन्मलेला अशोक. त्या काळातलं भोवतालचं वातावरण तसंच तत्कालीन समज-अपसमजाचं अवडंबर इ. इ. गोष्टींमुळे त्याची कला अक्षरशः घुसमटत होती. संवादिनी वादक सन्मा. मनोहर चिमोटेर्जींकडे हार्मोनियम वाजवण्याचं शास्त्रशुध्द शिक्षण घ्यायला मिळालं हे त्याचं सुदैव. पं. जितेंद्र अभिषेकी हे आपल्या ‘मत्स्यगंधा’ नाटकाच्या संगीत-संयोजनात गुंतले असताना त्यांना कुणीतरी अशोकचं नाव सुचवलं. अशोक पत्कींचा नाट्यसृष्टीतला प्रवेश हा असा झाला. कामं मिळू लागली. वरळीच्या बावन्न चाळीत राहणाऱ्या बाळ पार्टेनी त्यांची एकदा संगीतकार कल्याणजीभाईंशी ओळख करून दिली. कल्याणजींच्या वाद्यवृंदात वर्णी लागताच अशोकच्या अनुभवाच्या कक्षा विकसित झाल्या. लतादीदी, आशाताई, रफीसाहेब, किशोरदा, मन्नादा आणि सुमनताईंशी ओळखी झाल्या. अशोकर्जींचा मनमिळावू स्वभाव असल्यामुळे ऋणानुबंधही प्रस्थापित झाले. सुमनताईंचा स्वीय सचिव असलेल्या शरू बर्वेशी दोस्ती होताच सुमनताईंबरोबर दौऱ्यांवर जाण्याची संधी मिळाली. अशा संगीत दौऱ्यांवर असताना प्रत्येक ‘शो’नंतर सगळेच कलावंत हे थोडेसे रिलॅक्स असतात. फावल्या वेळात काल्पनिक काव्याला चाली लावण्याचा छंद जडला तो अशा दौऱ्यांमध्येच. अशोक जी. परांजपेंची एक-दोन कवनं होती पत्कींकडे. सहजच चाल लावलेली, त्यातल्या एक रचनेला.. या रचना रेकॉर्ड झाल्या तर? असं सहज वाटून गेलं.. कार्यक्रमानंतरच्या फुरसदीच्या क्षणी सुमनताईंना थोडीशी सवड आहे म्हणता अशोकने आपला मनसुबा सांगितला. एक-दोन गाणी केलीत असंही सांगितलं. अशोकचे स्टार्स त्याक्षणी कोणत्या स्थानी होते कुणास ठाऊक! सुमनताई म्हणाल्या.. ‘चाली केल्यात तर त्या मला नको.. एचएमव्हीतल्या कामेरकरांना ऐकवा..’ मूड ऑफ झाला अशोकचा. मुंबई गाठताच त्यांनी कामेरकरांची भेट घेतली. दोन-चार चाली ऐकवतो म्हणाले. त्यांचा काय प्रॉब्लेम होता देवाला माहीत. त्यांनीही नकारघंटा वाजवली. ‘सुमनताई गाणार आहेत म्हणता ना! मग ऐकवा की त्यांना! त्यांना बऱ्या वाटल्या तर अवश्य करू..’ अशोक पुन्हा सुमनताईंकडे. हे टेबल-टेनिस की लॉन-टेनिस? टोलवाटोलवीच्या या खेळात नाउमेद झाले अशोकजी. इतर कामं सुरूच होती. मध्ये वर्ष सरलं. कल्याणजीभाईंच्या रेकॉर्डिंग्स, सुमनताईंचे दौरे हा सिलसिला सुरूच होता. एक दिवस सुमनताईंनाच कसं आठवलं ते त्या भगवंतालाच माहीत. अचानक मागे केलेल्या ‘त्या’ चालींविषयी अशोकर्जींना त्यांनी स्वतःहून विचारलं. हजार हत्तींचं बळ यावं तसा अशोक सुखावला. बॅगेचा कोपरा न कोपरा धुंडाळत ते गाणं लिहिलेला कागद शोधून काढला. कागद जीर्ण झालेला. पिवळी पुटं चढलेली त्यावर. अशोकच्या चेहऱ्यावर मात्र आनंद ओसंडत होता. हार्मोनियम पुढे ओढून त्यावर सराईतपणे बोटं फिरवत अशोक पत्की त्याचं पहिलंवहिलं कम्पोझिशन गाऊन दाखवत होता..

*नाविका रे वारा वाहे रे.. डौलाने हाक जरा, आज नाव रेऽऽ*
*सांजवेळ झाली आता, पैल माझे गाव रे, नाविका रेऽऽ*
*नाविका रे वारा वाहे.. डौलानं हाक जरा, आज नाव रेऽऽनाविका रे ऽऽ*

इथे नाव आहे, नावाडी आहे पण कोळीगीत नाहीय हे! पं. हृदयनाथ मंगेशकरांनी ‘मी डोलकर दर्याचा राजा..’, ‘वादळ वारं सुटलं गं..’, ‘राजा सारंगा..’, ‘असा बेभान हा वारा..’ अशी जी कोळीगीतं केली आहेत त्या प्रभावळीतलं तर मुळीच नाहीय ते. नाखुदा गीत (बोटवाल्याचं गाणं) म्हणा हवं तर. गाण्यात प्रियकराच्या आगमनाची आतुरतेनं वाट पाहणारी प्रेयसी आहे. विरह आहे, रोमान्सचा हलकासा शिडकावाही आहे. तिचं मन उचंबळून येणं, त्याच्या आगमनाची हुरहुर, आतुरता इतक्या सगळ्या भावनांचा कल्लोळ शब्दांकित केलेलं ते काव्य सुमनताईंना पसंत न पडतं तर नवलच. वेळ न दवडता लागलीच फोन केला त्यांनी कामेरकरांना. अशोक पत्कींचं नशीब खरोखरच इतकं जोरावर होतं की सगळं झटपट जमून आलं. शरू बर्वेच्या घरी रिहर्सल्सना ऊत आला. पहिलंच गाणं म्हणून अशोक पत्की मनासारखा स्कोअर करण्यात गुंतले होते. गाण्याचा मूड उठावदार करण्यासाठी बासरी महत्त्वाची भूमिका बजावणार होती. मधल्या म्युझिकमध्ये सॅक्सोफोनही वाजवायचं ठरलं होतं. संगीत-संयोजनात कुठेही कसूर राहणार नाही अशा आत्मविश्वासानं अशोकने एचएमव्हीच्या स्टुडिओत मर्यादित बजेटमध्ये का होईना, पण मस्त गाणं रेकॉर्ड केलं. सुमनताई जीव ओतून गायल्या..

*आषाढाचे दिस गेले, श्रावणाचा मास सरे, भादवा आला,*
*माझा राऊ, मनामंदी, बोलुनि गेलाऽऽ*
*धाव घेई बघ माझे मन, नाही त्याला ठाव रेऽऽ*
*नाविका रे वारा वाहे.. डौलानं हाक जरा, आज नाव रे..नाविका रे ..*

१९७२साली ध्वनिमुद्रित झालेलं हे गाणं आजही तितकंच ताजातरीन वाटतं ते त्यात पकडलेल्या मूडमुळे. अशोक पत्की हे नाव नंतर ‘केतकीच्या बनी..’, ‘गा गीत तू सतारी..’, ‘वाट इथे स्वप्नातील संपली जणू..’, ‘पैलतीरी रानामाजी..’ इत्यादी गाण्यांमुळे सर्वतोमुखी झालं. सुमन कल्याणपूर या गुणी गायिकेच्या वाटचालीत अशोक पत्कींचंही योगदान आहे असं म्हणणं अतिशयोक्ती ठरू नये. अशोक पत्कींचं नाव आज नाट्यसृष्टीत खूप सन्मानानं घेतलं जात. नाटकाचं पार्श्वसंगीत करावं ते अशोक पत्कींनीच, असं अभिमानाने सांगितलं जातं. नाटकाचं संगीत आणि पार्श्वसंगीत करण्यात ते आजही नंबर-वन आहेत.

पं. जितेंद्र अभिषेकींच्या, पं. अजित कडकडे (येस! पंडित! आम्ही त्यांना सन्मानानं पंडित म्हणतो. अजितजींना स्वतःला पंडित म्हणवून घेणं आवडत नसलं तरी!) या शिष्योत्तमाचं नाव शास्त्रीय संगीत क्षेत्रात नावाजलेलं असलं तरी त्याच्या आवाजात अशोक पत्कींनी श्रवणीय, संग्राह्य अशी सुरेल भावगीतं करून घेतली आहेत. कविराज शांताराम नांदगांवकरांची ‘सजल नयन नीत धार बरसती..’, ‘नभ भरले..’ ही दोन भावगीतं तर किरण चित्रेंचं ‘उदासीन रात्र अशी..’, आणि ललिता बापट यांनी लिहिलेलं ‘मैफिलीचे गीत माझे..’ ही भावगीतं आजही तुम्हा रसिकांच्या आवडीची आहेत. ‘भक्तिवाचुनि मुक्तीची मज जडली रे व्याधी..’ हे पं. अजित कडकडेंनी गायलेलं कवि राम जाधवांचं भक्तिगीत अशोक पत्कींनी खूपच चांगल्या चालीत सादर केलं आहे. (पं. अजितजींशी आमचे बंधुभावाचे, जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळे मी ती सर्व भावगीतं, तसेच ‘भक्तिवाचुनि मुक्तीची..’ हे भक्तिगीत नव्याने रेकॉर्ड केलंय. मार्केटला त्याची सतत मागणी असते. पं. अजितजी दुसऱ्या कुणाची गाणी कधीच ‘व्हर्शन्स’ म्हणून गात नसतात. पण ‘श्री दत्तगुरूंवरची’ त्यांची अपार श्रध्दा आणि माझा हट्ट म्हणा, आपल्या लहानपणापासून कानामनात साठवलेली आर.एन. पराडकरजींची सगळीच सुप्रसिध्द अशी ‘श्री दत्तगुरू गीते’ त्यांच्या आवाजात, त्यांच्या स्टाईलने नव्यानं रेकॉर्ड करण्याचं भाग्य मला लाभलंय.)

‘सुयोग’सारख्या अनेक नामवंत नाट्यसंस्थांच्या नाटकांचं संगीत आणि पार्श्वसंगीत अशोक पत्कींचंच असतं. अशोक पत्कींनी ‘मोरूची मावशी’ आणि ‘ब्रह्मचारी’ या प्रशांत दामलेच्या नाटकातली गाणी नव्या चालीत पेश केली. ‘यमुनाजळी..’ वगैरे गाजलेली गाणी नव्या चालीत ऐकताना खूपच आनंद झाला. ‘टांग टिंग टिंगाक..’ या गाण्याने तर सगळे उच्चांक मोडले. आजही ते सुपर-हिट आहे, हे विशेष. त्यांच्याकडे ‘टीव्ही मालिकांचं’ शीर्षकगीत तसेच पार्श्वसंगीत करायला आजही लाईन लागते. ‘बीज अंकुरे अंकुरे..’ हे शीर्षक-गीत आठवतंय ना?

कल्याणजीभाई आणि पंचमदांच्या वाद्यवृंदात सन्माननीय हार्मोनियम वादक म्हणून कार्यरत असताना अचानक एके दिवशी त्यांना जाहिरात-क्षेत्र खुणवू लागलं. रेडिओवर जाहिराती यायच्या खऱ्या पण त्यात संगीत नसायचं. एखाद्या उत्पादनाची जाहिरात संगीतमय केली तर ती जाहिरात जास्त ‘कॅची’ होईल ही संकल्पना सर्वप्रथम मांडली असेल ती अशोक पत्कींनीच. नीला रवींद्र भिडे या गोड गळ्याच्या निवेदिकेला गायला लावून एक जिंगल रेकॉर्ड केली. साधा साबण तो काय? श्रोत्यांपैकी कित्येकांनी तो वापरलाही

नसेल पण त्या ‘डबल-बी’ साबणाची जिंगल आजही आम्हा प्रत्येकाच्या ओठावर आहे.. ‘ये ढेर से कपडे मैं कैसे धोऊँ..’ इतकं गाजलं की विचारता सोय नाही. (तो काळ असा होता की आम्हा मुलांना अभ्यासातल्या कविता चटकन पाठ होत नसत, पण रेडिओवरच्या जाहिराती, जिंगल्स आजही लक्षात आहेत. ‘ये ढेर से कपडे मैं कैसे धोऊं..’, ‘लंबा पैर, छोटा पैर - दुबला पैर, मोटा पैर..’, ‘रंग जमाता है कोकाकोला..’, ‘पापा पापा आए, हमारे लिए क्या लाए..’, ‘तंदरुस्ती की रक्षा करता है...’ वगैरे वगैरे..) अशोकजी आता या जाहिरात-विश्वातच रमले.. इतके की त्यांनी भावगीत क्षेत्राकडे पाठच फिरवली. रिटायर झाले की काय असं वाटावं इतपत. चौसष्ट कला आहेत असं म्हणतात, पासष्टावी कला कोणती? तर जाहिरात-क्षेत्र! आपल्याला ठाऊक आहे, जिंगल्स बनवणं हे खायचं काम नाही. शास्त्रीय संगीतात एखादा राग त्यातल्या सर्व नजाकतींसह सादर करायचा तर अर्ध्या-पाऊण तासांचाही अवधी उपलब्ध असतो. भावगीत-गजलसाठी सात ते दहा मिनिटे मिळू शकतात. पण जाहिरातींचं तसं नसतं. अवघ्या तीस सेकंदांचा कारभार. त्यातले संगीतकारांना मिळतात अवघे पंचवीस सेकंद! त्या उत्पादनाचं नाव, त्याची खासियत, उत्पादक, ब्रँड, पॅकिंग, किंमत हे सगळं पंचवीस-तीस सेकंदात सांगायचं तर कुशल संगीतकारच हवा. अशोकजींनी ती नस नेमकी पकडलीय. आज पासष्टाव्या कलेचा शहेनशाह म्हणतात त्यांना. ‘मिले सूर मेरा तुम्हारा..’ किती छान चालीत गुंफलं होतं हे रसिक कधी विसरू शकतील? वाईट इतकंच वाटतं की हा इतका प्रतिभासंपन्न संगीतकार असूनही त्याच्या खाती शंभरेक भावगीतं-भक्तिगीतं आणि पाच-दहा चित्रपटच असावेत? बाबुजींसारख्या व्यासमुनींच्या सानिध्यात राहून त्या वटवृक्षाच्या छायेत फक्त एवढीच शिदोरी हासिल केली असेल तर नाराज आहोत आम्ही तुमच्यावर.. आम्हाला आणखी भावगीतं-भक्तिगीतं हवीयत तुमच्या कडून.. नाविकानं पाऊस असो, वारा असो की तुफान असो, नाव ही हाकलीच पाहिजे.. अब भी वक्त है मेरे दोस्त.. अशोक जी. परांजपेंच्याच शब्दात सांगायचं तर..

*नवा साज ल्यायिलेली, गौरीवाणी सजलेली, चांदवा ल्याला,*
*माझा जीव, उरामंदी, खुलुनि आलाऽऽ*
*नाचते रे बघ माझे तन, संग त्याच्या धाव रेऽऽ*
*नाविका रे वारा वाहेऽऽ डौलानं हाक जरा, आज नाव रेऽऽनाविका रे ऽऽ*

♥

सुमनताईंच्या या सर्वांगसुंदर गाण्याची ‘ऑडिओ आणि कराओके’ची ‘यू-ट्युब’ लिंक . सोबत शंभर गाणी.

| | |
|---|---|
| १. नाविका रे वारा वाहे.. (ऑडिओ १) | https://youtu.be/2gvPExKhtfM |
| २. नाविका रे वारा वाहे.. (ऑडिओ २) | https://youtu.be/LoZIXu_0RPk |
| ३. नाविका रे वारा वाहे.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/ApAnR5T2d28 |
| ४. सुमन कल्याणपूर (१०० सुपरहिटस्) | https://youtu.be/K77t706fcnE |
| ५. संगीतकार अशोक पत्की (ग्रेट भेट) | https://youtu.be/KrkhvOA1EIk |
| ६. संगीतकार अशोक पत्की (टी.व्ही. मालिका) | https://youtu.be/m_4izgQ9mXU |

♥

## ३७ : नाविका रे वारा वाहे..

गायिका : सुमन कल्याणपूर
रचना : अशोक जी. परांजपे
संगीत : अशोक पत्की

नाविका रे वारा वाहे रेऽऽ डौलाने हाक जरा, आज नाव रेऽऽ - २
सांजवेळ झाली आता, पैल माझे गाव रे, नाविका रेऽऽ
नाविका रे वारा वाहे रेऽऽ डौलाने हाक जरा, आज नाव रेऽऽ ।। धृ ।।

आषाढाचे दिस गेले, श्रावणाचा मास सरे, भादवा आला,
माझा राऊ, मनामंदी, बोलुनि गेलाऽऽ
आषाढाचे दिस गेले, श्रावणाचा मास सरे, भादवा आला,
माझा राऊ, मनामंदी, बोलुनि गेलाऽऽ
धाव घेई बघ माझे मन, नाही त्याला ठाव रेऽऽ
नाविका रे वारा वाहेऽऽ डौलानं हाक जरा, आज नाव रेऽऽ नाविका रे ऽऽ ।। १ ।।

नवा साज ल्यायिलेली, गौरीवाणी सजलेली, चांदवा ल्याला,
माझा जीव, उरामंदी, खुलुनि आलाऽऽ
नवा साज ल्यायिलेली, गौरीवाणी सजलेली, चांदवा ल्याला,
माझा जीव, उरामंदी, खुलुनि आलाऽऽ
नाचते रे बघ, माझे तन, संग त्याच्या धाव रेऽऽ
नाविका रे वारा वाहेऽऽ डौलानं हाक जरा, आज नाव रेऽऽ नाविका रे ऽऽ ।। २ ।।

♥

## 38 : Chingari Koi Bhadke..

## ३८ : चिंगारी कोई भडके..!!

'मग काय? मज्जा असेल नाही उद्या?..' हातावर तीळगुळ ठेवत गोड बोलातचं सोडून घारूअण्णांचा खवचट प्रश्न!
'ती कशी काय बुवा? माझे पाच हजार एकरकमी चुकते करणार आहात की काय?..उद्याच? काहीही विचारताना, खोचकपणेच का विचारता हो?' मकर संक्रांती झाली तरी रथसप्तमीपर्यंत हे तीळगुळाचं कवित्व काही संपणार नव्हतं..
'नाही म्हटलं.. उद्या फिल्मफेअरचं फंक्शन आहे.. निमंत्रण आलंच असेल.. मग काय, रात्री रेड-लेबल, ऑफिसर्स, टीचर्स..'
मी खाली वाकलो आणि पायाजवळ पडलेला एक भक्कम दगड उचलला.
'दगड? दगड कशाला?..' घारूअण्णा फेंदारलेच..
'लाडू कसा फोडायचा याचं टेन्शन दिसलं ना म्हणून.. हा घ्या दगड!.. मला हल्ली निमंत्रण येत नाहीत आणि मी जात नाही.. समजलं?..'
अण्णा छाती फुगवत सांगू लागले.. 'मला यायचं.. त्र्याहत्तरपर्यंत! अगदी न चुकता! आता तुम्ही टीव्हीवर बघता पण ते फंक्शन प्रत्यक्ष अनुभवण्यात चिक्कार मज्जा यायची लेको.. अरे काय ती उत्कंठा? आकाशातले तारे धरतीवर आलेयत की काय असा माहौल.. एकेक स्टारची झकास एन्ट्री..व्वा! झगमगत्या कपड्यातल्या हिरॉइन्स पहायला परेड बघायला गर्दी करतात ना तशी गर्दी करायचे लोक.. मेट्रो थिएटराबाहेर..'
'कुठे राहिलेयत ते दिवस? आता ॲवॉर्डच इतकी झालीयत की विचारता सोय नाही. फंक्शन्सना जाण्यापेक्षा चॅनल्सवर बघायची मजा घेतो आम्ही..'
अण्णा आता मूडमध्ये आले.. 'एकेक सोहळा अगदी काल घडल्यागत आठवतोय बघ.. त्रावणकोर सिस्टर्सचं तिल्लाना, एकदा एस्.डी.चा नंतर एकदा हेमंतदांचा, नंतर कधीतरी एस्.जे.चा ऑर्केस्ट्रा आठवतोय.. दिलीपकुमारची ॲवॉर्डसची हॅट्-ट्रिक, आधी वैजयंतीमालाचा रुसवा-फुगवा मग पुढच्याच वर्षी तिचं स्टेजवर गाणंही आठवतंय बघ. निकोप स्पर्धा असायची. एकेक ॲवॉर्डचा पुकारा होताच जल्लोष व्हायचा पब्लिकमध्ये..' मी पिल्लू सोडतो.. 'काय हो अण्णा? राजकारण व्हायचं का त्याकाळी?..' अण्णा लगेच सावरून बसत म्हणाले.. 'व्हायचं ना! मला वाटतं.. तसं एकंदर सुरळीत चाललेलं त्र्याहत्तरपर्यंत! नक्की आठवायचं तर एप्रिलची एकवीस तारीख होती १९७३ची. आमच्या 'ही'चा वाढदिवस, म्हणून लक्षात आहे तो दिवस. शुक्रवार होता तो. रिटझ् हॉटेल असावं बहुदा. मी धावत-पळत गेलेलो फंक्शनला. अमिताभ-जयाच्या एन्ट्रीला सॉलिड टाळ्या पडलेल्या. एकेक ॲवॉर्डचा पुकारा होत होता..पण लोकांचा जल्लोष हळुहळू मावळत चालला होता. तब्बल सात ट्रॉफिज एकाच सो-सो चित्रपटाला आणि उरलेल्या बाकीच्या चांगल्या चित्रपटांना किरकोळ कॅटॅगरीत, वाटाण्याच्या अक्षता असा प्रकार डोळ्यांदेखत घडला आमच्या..'
मी पुन्हा ठिणगी पेटवली.. 'कुणाचे लेख वाचून म्हणताय की काय?..'
अण्णा चिडले.. 'नॉनसेन्स! मनोजकुमारच्या 'बेईमान'ला सर्वांगसुंदर चित्रपट म्हणशील तू?.. आणि तेही बेस्ट फिल्म, बेस्ट डायरेक्टर, ॲक्टर, सपोर्टिंग ॲक्टर, गीतकार, संगीत, गायक अशा इतक्या सगळ्या कॅटॅगरीत? अरे लोक काय च... आहेत?! पब्लिकच्या डोक्यात लख्ख वीज, केव्हा चमकली ठाऊकेय?.. जेव्हा प्राणसाहेबांनी सपोर्टिंग ॲक्टरची ट्रॉफी बिनधास्त नाकारली आणि निषेध व्यक्त केला तेव्हा. पब्लिक पागल नाहीय! कुंदनलाल सैगल ते बाबा सहगलपर्यंतच्या सगळ्या गायकांची गाणी कोळून प्यालेत ते. चांगलं काय, वाईट काय लग्गेच समजतंय. आठव! आर्डीचे 'अमर प्रेम', 'अपना देश', 'मेरे जीवनसाथी', 'बॉम्बे टू गोवा', 'हरे राम हरे कृष्ण', 'जवानी दीवानी'.. याच सालातले. 'अनुराग', 'दुष्मन', 'पाकिजा', 'दास्तान', 'एक बार मुस्कुरा दो', 'राजा-रानी', 'समाधी', 'मिलाप', 'सीता और गीता', 'बावर्ची', 'परिचय', 'लाल पत्थर', 'शोर' मध्ये गाणी नव्हती की काय चवीनं ऐकण्यासारखी?..'
'बेईमानलाच कौल मिळाला नसेल कशावरुन? आफ्टर-ऑल इटस् पब्लिक चॉईस!'
'मुळीच नाही! ज्युरी आणि पब्लिक असा फिफ्टी-फिफ्टी मामला असतो ना? मी फिल्म-फेअर संस्थेला अनफेअर म्हणून दोष देत नाहीय, सिस्टीम गडबड आहे. कुठेतरी लालच, बेईमानी होती- असावी एवढं मात्र नक्की! आता 'अमर प्रेम'चं गाणं घे..

*चिंगारी कोई भडके, तो सावन उसे बुझाये। सावन जो अगन लगाए, उसे कौन बुझाये..।*

'मुखड्यातच बाजी मारणारा किशोर, गीतकार आनंद बक्षी, संगीतकार आर्डीला विसरेल हे पब्लिक? हे गाणं गायक आणि गीतकार या दोन्ही ॲवॉर्डस्साठी नॉमिनेटेड होतं. अशा सरस गाण्यावर अन्याय होऊन ॲवॉर्ड मात्र कमअस्सल गाण्याला? व्वा!.. मुकेशला पुरस्कार मिळाला याचं दु:ख नाहीय, पण ते असायला हवं होतं त्याच्या 'कयी सदियोंसे, कयी जन्मों से तेरे प्यार को तरसे

मेरा मन.. आ जाओऽऽ' (मिलाप) यासाठी. लोकप्रियतेचीच फुटपट्टी लावलीत तर, किशोरची 'ओ मेरे दिल के चैन' (मेरे जीवन साथी) किंवा 'तू औरोंकी क्यूँ हो गयी' (एक बार मुस्कुरा दो) काय वाईट गाणी होती? गुलजारकृत 'मुसाफीर हूँ यारो..'(परिचय) सुध्दा होतं यादीत.. अगदीच नाही तर 'देखा ना हाय रे सोचा ना..' (बॉम्बे टू गोवा) चाललं असतं की..' अण्णा बोलत राहिले, मी मात्र आता गाण्यात रमलो होतो.

*हम से मत पुछो कैसे, मंदिर टुटा सपनों का, लोगोंकी बात नही है, ये किस्सा है अपनोंका,*
*कोई दुष्मन ठेस लगाये, तो मीत जिया बहलाये, मनमीत जो घाव लगाये, उसे कौन मिटाये..*

'बोटवाल्याचं गाणं जणू.. माँझी किंवा नाख़ुदा.. बंगालच्या नदीकिनारी बसल्यावर समोरून संथपणे मार्गक्रमण करणाऱ्या बोटींकडे पाहून सुचल्यागत.. ज्या आर्डीनं 'हरे राम हरे कृष्ण'चं म्युझिक केलं, त्यांच्याचकडून असं हळुवार संगीतशिल्प उभारलं गेलंय ही बाब निश्चितच अधोरेखित करण्यासारखी. वाद्यांचा गोंगाट नाही की आक्रमक म्युझिक पीसेस. गिटार नुसतीच छेडलीय पण त्यातून चक्क वातावरणनिर्मिती होतेय. भानू गुप्ता (भानूदा) यांनी ती वाजवलीय. (मध्यंतरी 'व्हाटस्-ॲपवर' एक व्हिडिओ वायरल झाला होता. कुठल्याश्या ऑर्केस्ट्राच्या सादरीकरणातील निवेदक, संगीताचं अगाध ज्ञान असल्यागत बेधडकपणे म्हणतोय की.. पंचमदांच्या या गाण्याच्या सीटिंग्जमध्ये गिटार वाजवताना एक चुकीची 'नोट' वाजली वगैरे.. पंचमदांची संपूर्ण टीम ही प्रतिभासंपन्न आहे. ते चूक करतील?) पंचमदांनीच दिलेल्या संकल्पनेनुसार हातातलं वल्हं पाण्यावर मारताक्षणी, त्याभोवती जशी गोलाकार वर्तुळं निर्माण होत-होत भोवताली पसरतात तसा आभास गिटारच्या पिसेसमधून आला पाहिजे असं आवर्जून सांगितलेलं. दादांना जे अपेक्षित होतं ते इथे दृग्गोचर होतंय.. एकीकडे संगीताविष्कार वातावरण नशिलं करतोय.. तर बासरीचे हळवे स्वर त्यात वेगळीच अनुभूती देतायत, पडद्यावरच्या प्रत्येक फ्रेममध्ये जिवंतपणा आणताहेत. 'पुष्पाऽऽ आय हेट टीअर्स..' म्हणणारा बाबुमोशायछाप राजेश खन्ना.. शर्मिला टागोरचा सहजसुंदर अभिनय.. छ्याऽऽ! अरसिक लेकाचे!.. या असल्या गाण्यासमोर दिलीपकुमारची भ्रष्ट नक्कल म्हणून वाळीत टाकलेला मनोजकुमार जिंकावा?' अण्णांची आगपाखड सुरूच होती.. 'कथानकाच्या प्रकृतीला अनुरुप, नेमक्या जागी एका इमोशनल वेळेलाच येणारं हे गाणंच सरस होतं हे आजही छातीठोकपणे सांगेल कुणीही.. जीवनाचं भाष्य होतं रे त्यात. आपल्या, तुझ्या-माझ्या, कुणाच्याही जिंदगीतलं.. तीन कडवी. शब्दसामर्थ्य इतकं सरस की आजही ते ताजातरीन वाटतं..'

*माना तुफाँ के आगे, नहीं चलता जोर किसीका, मौजों का दोष नही है, ये दोष है और किसी का*
*मंझधार में नैया डोले, तो माँझी पार लगाये, माँझी जो नाव डुबोये, उसे कौन बचाये..*

'राजकारणामुळे म्हण किंवा वशिल्यामुळे बऱ्याच गाण्यांचे बळी गेलेले पाहिलेयत मी.. खरं सांगतो..या सोहळ्यानंतर ॲवॉर्ड नाईटला जायचंच सोडलंय मी. 'उद्या मज्जा असेल नाही?..' हा तुला विचारलेला प्रश्न पार्टीचा नव्हता.. मज्जा म्हणजे धक्कातंत्र! 'त्या' ॲवॉर्डस्‌चं! कुणाला काय मिळणार असे आडाखे बांधून गेलास तर धोबीपछाड... हल्ली ती ॲवॉर्डस् ऑस्करच्या पध्दतीप्रमाणे देतात म्हणे.. लोकाभिमूख झाल्याने बरंच झालंय.. काय रे ? पण.. हल्ली राजकारण होतं का रे?..'

♥

तुमच्यासाठी काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

१. किशोरकुमार-पंचमदा (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/uA67M0Lihz0

२. गीतकार आनंद बक्षी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/OkBMp70xdXc

३. आर. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/iyP0zN-Ce2U

४. **'अमर प्रेम'** (१९७१) चित्रपटाच्या उपलब्ध 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLE969EA6B46902034

♥

## ३८ : चिंगारी कोई भडके..!!

चित्रपट : अमर प्रेम (१९७१)
गायक : किशोरकुमार
गीतकार : आनंद बक्षी
संगीत : आर. डी. बर्मन

चिंगारी कोई भडके, तो सावन उसे बुझाये।
सावन जो अगन लगाए, उसे कौन बुझाये।
ओऽऽउसे कौन बुझायेऽऽ।
पतझड जो बाग उजाडे, वो बाग बहार खिलाये।
जो बाग बहार में उजडे, उसे कौन खिलाये।
ओऽऽउसे कौन खिलायेऽऽ।

हम से मत पुछो कैसे, मंदिर टुटा सपनों का -२
लोगोंकी बात नही है, ये किस्सा है अपनोंका।
कोई दुष्मन ठेस लगाये, तो मीत जिया बहलाये,
मनमीत जो घाव लगाये, उसे कौन मिटाये..

ना जाने क्या हो जाता, जाने हम क्या कर जाते - २
पीते है तो जिंदा है ऽऽ, न पीते तो मर जाते।
दुनिया जो प्यासा रख्खे, तो मदिरा प्यास बुझाये
मदिरा जो प्यास लगाये, उसे कौन बुझाये..
ओऽऽउसे कौन बुझायेऽऽ।

माना तुफाँ के आगे, नहीं चलता जोर किसीका - २
मौजों का दोष नही है, ये दोष है और किसी का।
मंझधार में नैया डोले, तो माँझी पार लगाये
माँझी जो नाव डुबोये, उसे कौन बचाये..
ओऽऽउसे कौन बचायेऽऽ।
चिंगारी ऽऽ हूं ऽऽ चिंगारी ऽऽ हूं ऽऽ..

♥

| | |
|---|---|
| १. चिंगारी कोई भडके.. (ऑडिओ- व्हिडिओ) | https://youtu.be/ARtIHBg2ve0 |
| २. चिंगारी कोई भडके.. (व्हिडिओ) | https://youtu.be/dDepa9OMAE4 |
| ३. चिंगारी कोई भडके.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/qFpUd7fMV3s |
| ४. चिंगारी कोई भडके.. (वाद्यसंगीत) | https://youtu.be/jz0pBgLk9T0 |
| ५. चिंगारी कोई भडके.. (किशोरकुमार) | https://youtu.be/AksD5sGO01c |
| ६. आनंद बक्षी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/CvKNwM7qM2w |

♥

## 39 : To 'Rajhans' Ek..

## ३९ : तो 'राजहंस' एक..

'कौन चाहिए?' सकाळीच कोण पिडायला आलंय? कपाळावर आठ्यांचं जाळं.
'जी..म.. मला कोरगावकरसाहेबांना भेटायचंय..'
'कुठले कोरगावकर?'
'ते.. ते.. ते संगीत देतात ते कोरगावकर! दत्तोपंत कोरगावकर.'
'हं! मीच तो! बोल, काय काम होतं?'
'थोडं काम होतं तुमच्याकडे.. आत येऊ का?'
'अच्छा!' वाट मोकळी होताच तो मुलगा आत शिरला. समोरच्या जाड सतरंजीवर बसला. घामेजलेलं अंग. उन्हानं रापलेला चेहरा. चेहऱ्यावरचा घाम टिपत तो बोलू लागला.. 'मी श्रीनिवास.. श्रीनिवास खळे. बडोद्याहून आलोय!'
'बडोद्याहून? इथे मुंबईत कुठे राहतोस? घर.. आई-वडिल..'
'पळून आलोय मी घरातून. मला संगीतात काहीतरी करायचंय.. संगीतकार व्हायचंय. बाबांचा विरोध होता म्हणून आणि रेल्वे स्टेशनात लाल-हिरवे बावटे हलवत नोकरी करावी लागणार होती म्हणून पळून आलोय, सविस्तर चिठ्ठी लिहून आलोय मी..'
कोरगावकरजी 'आऽऽ' वासून पाहातच राहिले..
'कमाल आहे हं तुझी! म्हणे संगीतात काहीतरी करायचंय! व्वा!'
'पंत, मी बडोद्याच्या भारतीय संगीत विद्यालयात शास्त्रीय-संगीत शिकलोय आणि मी चाल लावलेलं एक गाणं तिथल्या आकाशवाणीवर सादर झालंय..'
'काय?' पंत किंचाळलेच. हे पाणी काही वेगळंच आहे याची क्षणात जाणीव झाली. मग पंतांनी त्यांची आस्थेनं विचारपूस करत आपबीती जाणून घेतली. त्याच दिवशी दुपारी खळ्यांना बोलावून घेऊन राजा बढे आणि आकाशवाणीतल्या दिनकररावांची ओळख करून दिली. त्यांना काही चाली ऐकवताच त्या बुजुर्गांपुढे त्याचे गुण आपोआपच सिध्द झाले.

१९५२च्या सुमारास पोतनीसांनी 'लक्ष्मीपूजन' नावाच्या चित्रपटाची जुळवाजुळव सुरू केली होती. दिग्दर्शक राम गबाले्नी संगीतकार म्हणून श्रीनिवास खळेंचं नाव सुचवलं होतं. कथा-पटकथा आणि संवाद-गीतं अशी हुकुमाची सर्वच पानं हातात असलेल्या गदिमांनी (कविवर्य ग. दि. माडगूळकर) पुण्यातल्या पहिल्याच बैठकीत खळ्यांच्या नावावर फुली मारली. खळेंचा चेहरा खाड्कन उतरला. पोतनीस आणि गबाले गर्भगळीत झाले खरे पण, गदिमांपुढे त्यांना हात टेकणं क्रमप्राप्त होतं. खळ्यांचं मनोधैर्य खच्ची झालं. गदिमांनी सुधीर फडकेंचं नाव सुचवत आग्रही भूमिका घेतली की, यांच्याकडेच संगीताचं काम द्या तरच पडद्यावरच्या श्रेयनामावलीला व्हेटेज येईल. पोतनीस काहीच बोलले नाहीत मात्र ते आपल्या निर्णयावर ठाम होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गबाले दोनेक दिवसांनंतर गदिमांप्रमाणेच 'सुधीर फडके' या नावाविषयी पोतनीसांकडे हट्ट धरू लागले. नंतर 'सुध्या' (बाबुजी) या टीममध्ये नसेल तर गाणी देणार नाही अशाही कोंडीत पकडलं गदिमांनी. पवित्रा थक्क करणारा होता. शेवटी पोतनीस, गबाले असा लवाजमा मुंबईत डेरेदाखल झाला तेव्हा पोतनीसांनी पुढाकार घेऊन राम गबालेंना खळयांच्या चाली ऐकवल्या. फारच प्रभावित झाले ते. म्हणाले.. 'काहीही असो. आता या चित्रपटाचा संगीतकार तूच राहशील. माडगुळकरांचं काय ते बघतो मी..' राम गबालेंनी माडगुळकरांना काय सांगितलं, कसं पटवलं कुणास ठाऊक.. पण मोजून सातव्या दिवशी ते खळ्यांकडे चार गाण्यांचे कागद घेऊन उगवले. खळ्यांचा आनंद गगनात मावेना. पोतनिसांकडे पोहोचेपर्यंत धीर कुठला? बेस्ट बसच्या प्रवासातच त्यांना दोन गाण्यांचे मुखडे सुचले. बसच्या तिकिटावरच त्यांनी नोटेशन लिहिलं. पोतनीसांकडे जाऊन त्यांनी ही गोड बातमी सांगितली. आता परत घरी पोहोचताच त्या गाण्यांवर तुटून पडायचं होतं. श्रावण संपताच चिकन-मटणावर लोक ज्याप्रकारे तुटून पडतात तसा हा भुकेला वाघ मिळालेल्या सावजावर झेप घेता झाला. गबाले तिसऱ्या दिवशी येणार होते.. चाली ऐकायला! गबालेंनी ती गाणी ऐकताचक्षणी पाणावलेल्या डोळ्यांनी खळ्यांचं तोंड भरून कौतुक केलं. गदिमा आठवड्याभराने मुंबईला आले. गबाले उत्साहानं म्हणाले.. 'मस्तच चाली केल्यात यानं.. तुम्हाला ऐकवू का?..' गदिमा खोचकपणे म्हणाले.. 'सुध्याच्या घरी जा. येतो आम्ही संध्याकाळी!..' का बरं हे असं करत असावेत? आडमार्गानं विकेट घ्यायचा तर प्लॅन नसेल ना? खळे मात्र शांत होते. त्यांना ठाऊक होतं. मोराच्या पिसाऱ्यासारखी प्रतिभा लाभलेल्या सुधीरभाऊंपुढे आपण एक सामान्य कुरूप-वेडं पिल्लू आहोत. तुरा आणि पंख नसलेलं. दुपारी पोतनीसांबरोबर खळे बाबुजींकडे गेले. काही चाली ऐकवल्या. 'उत्तम! काही तरी वेगळं आहे हे!' बाबुजींनी खळ्यांची पाठ थोपटली. इतक्यात गदिमा आणि राम गबाले आले. बैठक जमली. गदिमांच्या चारही गाण्यांना खळ्यांनी दिलेल्या परिपोषक चाली ऐकून,

बसल्या जागेवरून उठत गदिमांनी उत्स्फूर्तपणे मिठीच मारली खळ्यांना. गाणी चांगली वाटत नसतील तर दहादा नवीन लिहून देतो म्हणाले. खळ्यांना खूपच आनंद झाला. डोळ्यांच्या कडा ओलावल्या. नशिबाचा खेळ पहा. कुठल्याश्या अडचणींमुळे हा चित्रपट झालाच नाही. पुढे ते स्क्रीप्ट विकलं गेलं. राजा बारगीर यांच्या दिग्दर्शनात 'सुखाचे सोबती' नावानं तो झळकला. संगीत होतं वसंत पवारांचं. (या लेखासोबत संबंधित गाण्याची लिंक दिली आहे. अवश्य पहा.) गदिमा, बाबुजी, राम गबाले हळहळत होते खळ्यांनी दिलेल्या अप्रतिम चालींसाठी. खळ्यांनी संगीतबध्द केलेलं त्या चार गाण्यातलं एक गाणं होतं...

*एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख*
*होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ- २*

आशादीदींच्या आवाजात ते गाणं ईपी रेकॉर्डवर सादर झालं तोपर्यंतचा प्रत्येक क्षण खळेसाहेबांना अगदी कालच घडल्याप्रमाणे आठवतो. या गाण्याची आठवण त्यांनी काहीसं हळवं होतच सांगितली होती. तत्कालीन मोठमोठ्या संगीतकारांच्या प्रभावळीसमोर खळे असेच होते? कुरूप वेड्या पिलासारखे?

*कोणी न त्यास घेई, खेळावयास संगे -२*
*सर्वांहुनि निराळे, ते वेगळे तरंगे,*
*दाऊनी बोट त्याला -२, म्हणती हसून लोकऽऽ*
*आहे कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ*

संगीतकार श्रीनिवास खळे हे नाव गाजू लागलं ते १९६० सालानंतरच. त्यांचा 'श्रावणात घननिळा बरसला..', 'शुक्रतारा मंदवारा..', 'लाजून हासणे..', 'या चिमण्यांनो परत फिरा..', 'अभंग तुक्याचे' ते आजपर्यंतचा प्रवास सर्वश्रुतच आहे. आयुष्याच्या वाटचालीत खळेसाहेबांच्या वाट्याला कित्येक दुःख आलीत. दुसऱ्यासारखा कमकुवत मनाचा त्या आघातांनी केव्हाच नेस्तनाबूत झाला असता.. परंतु ते कधीच नाउमेद झाले नाहीत. खळेसाहेब स्वतः कधीच सांगत नाहीत पण बऱ्याचदा राजकारणही झालं असावं म्हणतात. खळेसाहेबांनी ते सगळे वार ठामपणे परतवून लावले. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे ती त्यांची सुविद्य पत्नी. माणूस स्वतः प्रामाणिक आणि ठाम असला ना की कितीही मोठ-मोठ्या संकटांची धार आपोआपच बोथट होत असते असं ते सांगतात. गाण्याच्या पुढच्या कडव्यात अशाच प्रकारची टोचणी कविराज गदिमांनी कशी समर्थपणे व्यक्त केलीय पहा..

*पिल्लास दुःख भारी, भोळे रडे स्वतःशी,*
*भावंडं ना विचारी, (सांगेल ते कुणाशी - २)*
*जे ते तयास टोची, दावी उगाच धाक,*
*होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एक..*

खळेसाहेब अतिशय प्रतिभासंपन्न संगीतकार आहेत. त्यांच्या चाली गायला अतिशय अवघड असतात असं सन्माननीय गायकप्रभृती आवर्जून सांगताना मी स्वतः ऐकलंय. अरूण दातेजी, सुरेश वाडकर, लतादीदी, आशाताई, कविता कृष्णमूर्ती ते आजपर्यंतचे अनेक गायक त्यांना गुरूसमान मानतात यातच सर्वकाही आलं. त्यांचा शिष्य आणि आजच्या पिढीच्या गळ्यातला ताईत असणारा माझा परममित्र शंकर महादेवन तर त्यांची तोंड फाटेपर्यंत स्तुती करत असतो. स्वरांच्या चांदण्यांची बरसात करणारा हा आनंदयात्री आजही संगीत देण्यात मग्न आहे. रसिकांनी भरभरून दिलेल्या प्रेमाच्या कोंदणात जडविला गेला आहे हा कोहिनूर हिरा. त्यामुळे आजार, आघात असले वार त्यांच्यापर्यंत पोहोचणे केवळ अशक्य. त्यांच्या उमेदवारीच्या काळात 'कुरूप वेडं पिल्लू' असं समजण्याची कुणी गुस्ताखी केलीच असेल तर त्यांना गदिमांच्याच शब्दात सांगावंसं वाटतं..

*एके दिनी परंतु, पिल्लास त्या कळाले -२, भय वेड पार त्याचे, वाऱ्यासवे पळाले.*
*पाण्यात पाहताना -२, चोरूनिया क्षणैक, त्याचेच त्या कळाले, तो 'राजहंस' एक*
*एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख, होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एक - २*

♥

## ३९ : तो ‘राजहंस’ एक..

गायिका : आशा भोसले
गीतकार : ग. दि. माडगूळकर
संगीत : श्रीनिवास खळे

एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख
होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ- २

कोणी न त्यास घेई, खेळावयास संगे -२
सर्वांहुनि निराळे, ते वेगळे तरंगे,
दाऊनी बोट त्याला -२, म्हणती हसून लोकऽऽ
आहे कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ

पिल्लास दु:ख भारी, भोळे रडे स्वत:शी,
भावंडं ना विचारी, (सांगेल ते कुणाशी - २)
जे ते तयास टोची, दावी उगाच धाक,
होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ

एके दिनी परंतु, पिल्लास त्या कळाले -२
भय वेड पार त्याचे, वाऱ्यासवे पळाले.
पाण्यात पाहताना -२, चोरूनिया क्षणैक
त्याचेच त्या कळाले, तो ‘राजहंस’ एक
एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख
होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एकऽऽ- २

♥

या सर्वांगसुंदर गाण्याची व इतर उपलब्ध ‘ऑडिओ आणि कराओके’ची ‘यू-ट्युब’ लिंक :

१. एका तळ्यात होती.. (भावगीत) (ॲनिमेशन) : https://youtu.be/Zfsw0B4fRAA

२. एका तळ्यात होती.. (भावगीत) (कराओके) : https://youtu.be/n8ah5hdxauE

३. एका तळ्यात होती.. (सुखाचे सोबती-व्हिडिओ १): https://youtu.be/zMmvH_BvgLs

४. एका तळ्यात होती.. (सुखाचे सोबती-व्हिडिओ २): https://youtu.be/UFvDYxyiKCY

५. श्रीनिवास खळे यांची १०० सुप्रसिद्ध गाणी : https://youtu.be/ylCJF3z418c

६. आशा भोसले (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ): https://youtu.be/tAxfLcrtOP0

♥

## 40 : Mere Jeevan Saathi..

## ४० : मेरे जीवनसाथी..

व्यवस्थित हिंदू रितीरिवाजाप्रमाणे त्यांचं लग्न झालंय. नववधू पहिल्यांदाच सासरी आलीय. हीरो पलंगावर नुसता पहुडलाय. 'सुहाग-रात'ची स्वप्ने रंगवत? वधू खोलीत प्रवेशते. तिची धडकन वाढलीय. प्रथम नजर पडते ती समोरच्या देव्हाऱ्यावर. निरांजन मंद मंद प्रकाश देतंय. कृष्णाची गोजिरी मूर्ती सुहास्य वदनानं तिच्या सुखी संसाराचे रंग दाखवत स्वागत करतेय. पूजेचं सामानही तिथे मौजूद आहे. आता ही बया 'मैं तो आरती उतारू रे..' टाईप गाणं म्हणत नाचणार की काय? नाही! ती शांतपणे आपला गोल गोल चेहरा आणखी गोल करत गोड हसते. देव्हाऱ्याकडे जाते. कुंकवाचा करंडा उघडून सिंदूर घेते आणि आपली माँग भरता भरता परमेश्वराची आळवणी करत.. 'भगवान, मेरी लाज रखना..' पुढच्या फ्रेममध्ये 'कट्-टू' ती आपल्या पतीजवळ जाताना दिसतेय. हलक्या पावलांनी. तो तसाच शांत पहुडलाय. ती बांगड्यांचा किणकिणाट करते. तो डोळे किलकिले करत क्षणभर तिच्याकडे बघत चटकन हात पकडतो.. अरेऽऽवाजवा रे वाजवा! पण गाणं कुठलं बरं? चला करूया शब्दांची कसरत.. (ता.क. : पुणेरी स्टाईल : कृपया या सीनबद्दल गैरसमज करून घेऊ नये. ही 'सिच्युएशन' एका जुन्या चित्रपटातील आहे. राखी का स्वयंवराशी याचा काडीमात्रही संबंध नाही, वाटल्यास तो निव्वळ योगायोग समजावा)

*मस्ती नजर में कल के खुमारकी,*
*मुखडे पे लाली है, पिया तेरे प्यार की..*
*खुशबू से तेरी, तन को बसा के,*
*लहराऊँ डाली सी, तेरे गुलजार की..*

कट्-कट्!! नही जम्या यार! कुछ गडबड है.. अंऽऽ असं केलं तर?

*सजधज के मैं सवेरे सवेरे, महकी महकी, करती हूँ फेरे,*
*लगती हूँ कैसी, तू भी तो देखे, खोल दे अँखियाँ साजन मेरे,*
*तेरे हाथों से, ये घुँघटा उठाऊँगी, तेरे अंगना, मैं सारी उमरीया बिताऊँगी...*

'आशियाना' बंगल्याच्या गेटजवळ पांढरी लुंगी गुंडाळलेले मद्रासी आत शिरायच्या प्रयत्नात असल्याचं पाहून बहादूरच्या मनात तेव्हाच पाल चुकचुकली होती. खरंतर धास्तावला होता तो. उंची बेताची असूनही कंपाऊन्ड-वॉलवरून जवळजवळ हाय जंप मारून त्याने तडक जीना गाठला होता. वर स्टडीत बसलेल्या आपल्या मालकांना.. नौशादजींना त्याने बळेबळेच गॅलरीकडे ओढत आणलं होतं. बहुतेक ही वरदाभायची माणसं असावीत.. भानगड असणार! पिचपिचे डोळे मोठे करत बहादूर दुसऱ्या नोकरांना सांगत होता. नौशादजींनी मात्र त्या आगंतुकांना पाहताक्षणी ओळखलं. मद्रासच्या व्हीनस पिक्चर्सचे एस्. कृष्णमूर्ती आणि दिग्दर्शक श्रीधर (फडके नव्हेत.. 'दिल एक मंदिर' फेम) एका नव्या चित्रपटाच्या संगीताबद्दल वाटाघाटी करायला आलेले. राजेंद्रकुमार, संजीवकुमार, वैजयंतीमाला आणि सिमी गरेवाल वगैरेना घेऊन त्यांनी 'साथी'(१९६८)चा मुहूर्त केला होता. मी इकडे, तुम्ही मद्रासमध्ये कसं काय जमायचं बुवा? आम्ही तुम्हाला एकेक 'सिच्युएशन' व्यवस्थित लिहून पाठवू.. तुम्ही तुमच्या स्टाईलने गाणी करा.. नौशादजींनी त्यांच्या प्रस्तावाला होकार देताच, त्या लुंगीवाल्या गँगमधल्या एकाने 'भाई' लोक सुपारी देतात तशी पेशगीची चळत टी-पॉयवर ठेवली. करारनामा आणलाच होता. सही करताना जणू धमकीवजा सूचना दिली.. 'हम लोगकू मॉरडन टचवाला मुजीक चाहीए..' आणि त्यांनी तिथून काढता पाय घेतला.

पुढच्याच आठवड्यात एक टपाल आलं. सोबत होता मोठा निबंध आणि नायिका वैजयंतीमालावर चित्रित करण्यासाठी या अमुक प्रसंगानुरूप गाणं करून पाठवा असा आदेश मिळाला. लगोलग शायर मजरूह सुल्तानपुरीना सांगावा धाडून सीटिंग्ज केल्या. लतादीदींना घेऊन गाणं रेकॉर्ड केलं. बासरी, सितार, तबला-ढोलक असे साज लेवून भैरवीची छाप असणारं ते गाणं मस्तच जमून आलेलं. नौशादजींनी समाधानानं त्याचे मास्टर-स्पूल्स मद्रासला धाडले. पण काय बिनसलं कोण जाणे? अचानक ट्रंक-कॉल आला की नौशादजींनी ताबडतोब मद्रासला पोहोचावं. नौशादजी मद्रासला इच्छित स्थळी पोहोचले मात्र, जाताचक्षणी त्यांना लुंगीवाल्यांनी घेरलं. काय बोलत होते त्यांचं त्यांनाच माहीत. हिन्दी इल्ले! एस्. कृष्णमूर्तींनी सगळ्यांना शांत केलं..'नौशादजी.. गाना तो अच्चा बनाया जीऽऽ लेकीन हमको लगताय, तोऽऽडा मॉरडन टच होता तो मजा आता ता!' श्रीधरजींनीही बोल जमूरेप्रमाणे

त्यांचीच री ओढली.. 'हाँ सरजी, इस गानेको थोडा वेस्टर्न स्टाईलसे सजाव! नल्लाईरकूम!!'.. नौशादजींनी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला. मेदूवड्याप्रमाणे बहुदा यांच्यापैकी प्रत्येकाच्या मेंदूला अक्कलशून्य भोक असावं अशा कल्पनेत ते रंगले.. 'ठीक है!.. मी दुसरं गाणं करून पाठवतो. त्याचं काव्य, चाल आणि ऑर्केस्ट्रेशन सगळंच वेगळं असेल. बस्स?'
'नाराज तो नही है ना नौशादसाब?'
'नाराज क्या होनेका जी? तुम्हाला हवं ना, तसंच करतो मी!..'
'मत तर कळू द्या तुमचं!..'
'सिच्युएशन कशीय? हीरो-हिरॉईनचं लग्न हिंदू पध्दतीप्रमाणे झालं आहे. दुल्हन पहिल्यांदाच सासरी आली आहे..ब्ला..ब्ला.. ब्ला.. तिने केलेल्या बांगड्यांच्या किणकिणाटाने तो जागा होतो आणि प्रेमाने तिच्याकडे बघत चटकन तिचा हात पकडतो..'
'हाँ! सिच्युएशन तो बिल्कुल ठीक है! गाना गडबड है जी!..'
'क्या गडबड है? इथे मॉडर्न गाणं हवं असेल तर बदला प्रसंग.. लग्न होऊदे सिव्हिल कोर्टात. साडीऐवजी येऊदे ती स्कर्ट-टॉप, उंच सँडलमध्ये! नवऱ्यालाही मॉडर्न सुटात दाखवा म्हणावं!..'
'याचा गाण्याशी काय संबंध?'
'संबंध?' शांत स्वभावाच्या नौशादजींचा आवाजही आता किंचित वरच्या पट्टीत सरकतोय.. 'नक्कीच आहे संबंध! तिने भांगात सिंदूर भरताच मी बासरीची सुरावट टाकायची की सॅक्सोफोन, गिटारचे स्ट्रोक्स वाजवत ड्रमसेट बडवायचा? हे रुचेल पब्लिकला? मी गाणं केलंय ते विचारपूर्वक.. एवढं असूनही मी दिग्दर्शकाच्या सूचनेला मान देऊन दुसरं गाणं पाठवतो.. ओके? टेन्शन नही लेनेका....'

एस्. कृष्णमूर्ती आणि दिग्दर्शक श्रीधर खुश झाले. मुंबईला येताच नौशादजींनी पहिलं काम काय केलं असेल तर.. आपल्या संगीत संयोजक आणि वाद्यवृंद नियोजकांना सांगावा धाडताना आपल्या टीममध्ये केरसी लॉर्ड सुद्धा हवेत असं आवर्जून सांगितलं. निर्माता/दिग्दर्शकांना नेमकं काय हवंय ते व्यवस्थित समजावून सांगितलं. मेहनतपूर्वक धून बनवली. मजरूहजींकडून त्यावर गाणं लिहून घेतलं. सीटिंग्ज झाल्या. लतादीदींच्या आवाजात ते गाणं रेकॉर्ड होताना मात्र नौशादजींची वादकांची संपूर्ण टीम अवाक् झाली होती. गाणं तद्दन हिन्दीतलं. तर पेशकश चक्क वेस्टर्न. तसलं ऑर्केस्ट्रेशन नौशादजींच्या संगीतात पहिल्यांदाच रेकॉर्ड होत होतं. गिटार, बेस-गिटार, ॲकॉर्डियन, सॅक्सोफोन, ड्रमसेट, तुंबा! नेहमी रागदारी गाण्यांनी रसिकमनाला रिझवणाऱ्या नौशादजींचं हे गाणं वेस्टर्न ऑर्केस्ट्रेशनने मस्तच सजलं होतं. संगीत संयोजनातली कशिदाकारी अनुभवायची असेल तर हे गाणं कृपया एकदा ऐकून पहाच. लतादीदींचा आवाज, मजरूहजींचे शब्द आणि नौशादजींच्या सुरावटींवर तुम्ही नक्कीच फिदा व्हाल.

नौशादजींनी या गाण्याचे 'मास्टर-स्पूल्स' मद्रासला धाडले. चारेक दिवसात नौशादजींनी पुन्हा मद्रासला यावं असा निरोप आला. आता मात्र नौशादजी वैतागले. काय शिंची कटकट आहे! या लोकांना अक्कलशून्य म्हणावं की 'नॉन-टेक्निकल?' शांत स्वभावाचे नौशादजी हातातली सगळी कामं बाजूला सारून मद्रासला पोहोचले. तिकडे जातात तर वेगळीच मगजमारी. आता त्या लोकांनी 'दोन्ही गाणी चांगली आहेत. पहिला जादा अच्छा लगता है, लेकीन कन्फ्युजन है सरजी!' असा सूर लावला. या सगळ्या प्रकाराने नौशादजी खरंतर कंटाळलेच.. पण इलाज नव्हता. आपला इगो कुरवाळण्याची किंवा आपलं ते खरं करायची त्यांना सवय नसल्याने ते शांत होते. आपलं म्हणणं पटावं, पटवावं, खुंटी हलवून पक्की करावी म्हणून नौशादमियाँनी तिथल्या काही (व्यवस्थित!) हिन्दी कळणाऱ्या गृहिणींना बोलावून दोन्ही गाणी ऐकवूया असं सुचवलं. संक्रांतीच्या हळदीकुंकवाला जमाव्या तशा कैक बायका आल्या. त्यांना चित्रपटातली त्या गाण्याची सिच्युएशन सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली. दोन्ही गाणी ऐकवली. नौशादजींच्या मताला सर्वांनीच दुजोरा दिला.. मग हे पहिलं गाणं याच प्रसंगाला वापरलं. दुसरंही गाणं छानच झालं होतं. दिग्दर्शकाने शक्कल लढवून ते सिमी गरेवालवर वेगळ्या सिच्युएशन्ससाठी चित्रित केलं..

'साथी' हा चित्रपट १९६८ सालचा. रसिकांनी त्या आधी १९६६ साली पंचमदांनी संगीतबध्द केलेल्या शम्मी कपूर-आशा पारेख अभिनीत 'तिसरी मंजील' (दिग्दर्शक : विजय आनंद) या सिनेमातल्या गाण्यांतून पाश्चिमात्य ढंगाच्या संगीताचं आकंठपान केलेलं. अर्थात त्या गाण्यांचा बाज वेगळा होता. संगीत संयोजनातली ट्रीटमेंट वेगळी होती. त्यामुळेच ती पेशकश नवी वाटलेली.. पण अशा पाश्चिमात्य प्रकारातलं संगीत नौशादजींकडून पेश व्हावं ('गोमू माहेरला जाते हो नाखवा..' हे गाणं पं. जितेंद्र अभिषेकींनी गायलंय म्हणा किंवा 'चल गो चंपा..' हे कोळीगीत पं. अजित कडकडेंनी गायलंय हे ऐकून आश्चर्य वाटावं इतकंच) हे आश्चर्यच नाही का? 'साथी'ची सगळीच गाणी पश्चिमी साज लेवून आलेली. नौशादजींनी या सिनेमाच्या पार्श्वसंगीतातही मॉडर्न ऑर्केस्ट्रा वापरलेला. 'मेरा प्यार भी तू है..' (मुकेश-सुमन कल्याणपूर) हे एका शास्त्रोक्त रागावर बेतलेलं होतं, 'जो चला गया उसे भूल जा..' (मुकेश आणि महेंद्र कपूर) चक्क मिश्र भिमपलासी रागावरचं. 'हुस्न-ए-जाना इधर आ..' (मुकेश) ही तर भैरवी. 'ये कौन

आया रौशन हो गयी..' (लतादीदी) हे गाणंही अशाच मुशीतलं होतं. पण त्यांचं संगीत-संयोजन होतं पाश्चिमात्य ढंगाचं. आपल्या केरसी लॉर्ड या प्रतिभासंपन्न वादक, संयोजकाने आपलं कसब पणाला लावलं होतं. भारतीय रागदारी गाण्यांना पाश्चिमात्य वाद्यमेळाने अलंकृत करण्याचा नौशादजींचा हा प्रयास खचितच वाखाणण्यासारखा, नाही का?

आता आपण आपल्या आठवणीतल्या या गाण्यांकडे वळूया.. या गाण्यांच्या बाबतीत बोलायचं, तर दोन्ही गाणी आपल्या अत्यंत आवडीची आहेत. आठवणींच्या कुपीत आपण ती बंदिस्त करून ठेवलीत. लताबाईंनी त्यात नेहमीप्रमाणे जान ओतलीय. नौशादजींनी 'इस्ट ॲण्ड वेस्ट' मस्तच सांभाळलंय. 'साथी'(१९६८)च्या या गाण्याची सिच्युएशन तर तुम्हाला एव्हाना कळलीय, होय ना! यासाठी घडाभर तेल ओत ओत ओतून झालंय पण कुठली बरं ही गाणी..? पैजेवर सांगतो! गाणी आठवताच अंगावर फुलोरा फुललाच म्हणून समजा.. पहिलं गाणं होतं..

*मैं तो प्यार से तेरे पिया माँग सजाऊँगी,*
*तेरे अंगना में सारी उमरीया बिताऊँगी..*

आणि त्याच सिच्युएशनसाठी केलेलं दुसरं गाणं होतं, जे तुम्हाला अधिकच आवडतं!

*मेरे जीवनसाथी, कली थी मैं तो प्यासी,*
*तुने देखा हुआ खिलके बहार..*
*मेरे जीवनसाथी...*

♥

आपल्या आवडीची गाणी ऐकण्यात एक वेगळाच आनंद असतो. या घ्या त्या चित्रपटातील गाण्यांच्या उपलब्ध 'ऑडिओ, व्हिडिओ आणि कराओके ट्रॅक' तसेच, संपूर्ण चित्रपटाची, गाण्यांची 'यू-ट्युब' लिंक :

| | | |
|---|---|---|
| १. मेरे जीवनसाथी.. | (ऑडिओ) | https://youtu.be/qLcXrP6rXUQ |
| २. मेरे जीवनसाथी.. | (व्हिडिओ) | https://youtu.be/P1FscJwjKyY |
| ३. मेरे जीवनसाथी.. | (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/sWUOpPY96YU |
| ४. 'साथी' (१९६८) : | (संपूर्ण चित्रपट) | https://youtu.be/TroEr0-hplE |
| ५. 'साथी' (१९६८) : | (सर्व गाणी) | https://youtu.be/DK64x1BBGyU |
| ६. मैं तो प्यार से तेरे.. | (व्हिडिओ) | https://youtu.be/rkyAcMP0dmg |
| ७. नौशाद-लतादीदी (५० सुपरहिट्स)(ऑडिओ) | | https://youtu.be/wrxo4IyQmDY |
| ८. नौशाद (१०० सुपरहिट्स)(ऑडिओ) | | https://youtu.be/A9YSJ6uWptg |

♥

## ४० : मेरे जीवनसाथी..

चित्रपट : साथी (१९६८)
निर्माता : एस्. कृष्णमूर्ती
दिग्दर्शक : श्रीधर
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : मजरूह सुल्तानपुरी
संगीतकार : नौशाद

मेरे जीवनसाथी, कली थी मैं तो प्यासी,
तुने देखा हुअी खिलके बहार.. मेरे जीवनसाथी...

मस्ती नजर में, कल के खुमारकी,
मुखडे पे लाली है, पिया तेरे प्यार की,
खुशबू से तेरी, तन को बसा के,
लहराऊँ डाली सी, तेरे गुलजार की..
मेरे जीवनसाथी, कली थी मैं तो प्यासी..

कहाँ का उजाला, अभी वोही रात है,
गोरी गोरी बाहों में, जैसे तेरा हाथ है,
बजती है चूडी, तेरे धडकन से,
कानों में अब तक, वोही तेरी बात है
मेरे जीवनसाथी, कली थी मैं तो प्यासी..

तुझको मैं सजना, बिंदिया का प्यार दूँ,
चुनरी के रंग से, घर को सँवार दूँ,
जुल्फों का गजरा, नैनों का काजल,
तेरे नजराने है, तुझपे ही वार दूँ,
मेरे जीवनसाथी, कली थी मैं तो प्यासी..

♥

तुमच्या संग्रही असायलाच हव्यात अशा काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

| | |
|---|---|
| १. लतादीदी व सलील चौधरी (८० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/oQuWK_DWnLs |
| २. लतादीदी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/BQliGOFZSf4 |
| ३. लतादीदी व शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/bD_Hk3wcoCo |
| ४. लतादीदी व मदनमोहन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/I8tVaKhVuBo |
| ५. लता मंगेशकर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | https://youtu.be/dF71gtz15Xo |
| ६. फिल्मफेअर सन्मान प्राप्त १०० हिटस् | https://youtu.be/fsPmp_u1nwc |

♥

## 41 : Swapnatalya Kalyanno..

## ४१ : स्वप्नातल्या कळ्यांनो..

*रेखाकृती सुखाच्या, चित्ती चितारलेल्या,*
*साशंक कल्पनांनी, सहजी विरून गेल्या,*
*कधि सोशिला उन्हाळा, कधि लाभला विसावा,*
*स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा,*
*गोडी अपूर्णतेची, लावील वेड जीवा,*
*स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..*

'बेस्ट' उपक्रमाच्या कुलाबा डेपोतल्या 'टंकलेखन' विभागात टाईपरायटर बडवता बडवता सुचलेल्या या ओळी. ते गदिमा नव्हते, बा. भ. बोरकर नव्हते किंवा सुरेश भट, पाडगांवकरही नव्हते. होता एक सीधासाधा टायपिस्ट-म.पां.भावे. गीतकार म्हणून भाव्यांचं नाव एखाद्या ग्रामोफोन रेकॉर्डवर कोरलं गेलं असेल असं आमच्यापैकी कुणाला स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं. बेस्ट उपक्रमात प्रशांत दामले, मी आणि माझ्यासोबत चारेक जणांनी 'ॲप्रेंटिस क्लर्क' म्हणून नोकरी पत्करलेली. आमचा बेस्ट व्यवस्थापनाचा टंकलेखन विभाग. भावेसाहेब हे आमचे पर्यवेक्षक (सुपरवाईजर). वेलची खाल्ली तर सर्दी होईल आणि लवंग खाल्ली तर गरम पडेल अशी तोळामासा तब्येत. अतिशय साधी राहणी. शांत स्वभाव. आम्ही सगळे मस्तीखोर-व्दाड! भावेसाहेब सानेगुरुजींसारख्या मृदू स्वभावाचे. घरुन आणलेल्या डब्यातून आणलेली पोळीभाजी खाऊन झाली की आम्ही डिपार्टमेंटच्या कोपऱ्यात गप्पा मारायचो किंवा प्रशांतच्या गाण्याला टेबलावर ठेका देत टाईमपास करायचो. बायका-पोरी एकीकडे कुचाळक्या करण्यात मग्न असायच्या. भावे मात्र आपल्या टाईपिंग-मशीनवरच डोकं टेकून शांतपणे कसलासा विचार करत बसलेले दिसायचे. आमच्या दुसऱ्या सुपरवाईजर बाईंनी जेव्हा हे गृहस्थ 'स्वप्नातल्या कळ्यांनो..' या गाण्याचे गीतकार आहेत असं आम्हाला सांगितलं, तेव्हा बेशुध्द होणंच काय ते शिल्लक होतं. प्रशांत नंतर नेहमी त्यांना त्यांच्या गाण्यांबद्दल छेडायचा. पण कधी ते आपल्या कोषातून बाहेर आले असतील तर शपथ. तब्येतीनं रट्टे द्यायला सुरुवात करताच हातावर तुळशीपत्र ठेवावं तसं 'स्वप्नातल्या कळ्यांनो..' नावाचं एकेक पुस्तक आमच्या हातात देऊन, राजीनामा खरडून त्यांनी बेस्टला गुडबाय केलं. स्वप्नातल्या कळ्या आमच्यासमोर उमलल्याच नाहीत. ठाण्याच्या नौपाड्यात म.पां.भावेंच्या घरात त्या कधी आणि कशा उमलत असतील कुणास ठाऊक..

*नैराश्य कृष्णमेघी, आशा कधी बुडावी,*
*विरहात चिंब भिजुनी, प्रीती फुलोनी यावी,*
*काट्याविना न हाती, केव्हा गुलाब यावा,*
*स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..*

मला आश्चर्य वाटतं ते या ओळींचं. पहिल्या अंतऱ्यातली चाल इथे थबकलीय. वेगळी वाट चोखाळलीय. पहिल्या ओळीचा अर्थ समजून घ्यावा म्हणावं तर भळाभळा वाहणाऱ्या जखमा थोपविण्याचा आटोकाट प्रयत्न दिसतो पण पुढची ओळ आशावादी आहे.. निवांतपणे या गाण्याची पारायणं करत अभ्यास करावा तर प्रत्येक वेळी या शब्दांमधुन एकेक नवा अर्थ आपल्या भेटीला येतो. अस्वस्थ करतो. आशाताईंनी जीव ओतलाय गाण्यात. संगीतकार व्दय अनिल-अरूण (अनिल मोहिले आणि अरूण पौडवाल) यांनी या काव्याला भावविभोर चाल दिली असली तरी ठसठशीत अस्तित्व जाणवतं ते गायिकेचं. आशाताईंचं! 'स्वप्नातल्या' या एकाच शब्दावर तिनं प्रत्येकवेळी वेगवेगळ्या स्टाईलने घेतलेली लाजवाब हरकत अनुभवायला सच्च्या रसिकांचेच कान हवेत. किमयागार आहे ती. भक्तिगीत, भावगीत, ठुमरी, नाट्यसंगीत, गजल, लावणी, अभंग, मुजरा, प्रेमगीत असो की कॅब्रे कोणताही प्रकार घ्या. या स्वराने कधी नन्नाचा पाढा वाचलेला नाही. 'स्वप्नातल्या कळ्यांनो..' हे तसं साधं-सोपं गाणं, पण अनिलजींनी चाल गुणगुणून दाखविल्यानंतर ते आपल्या वादकांसोबत कार्यमग्न होताच इकडे आशाताई भावेंशी त्या गाण्यातल्या गर्भीत अर्थासंबंधी चर्चा करीत बसल्या. भावनांचा लपंडाव असलेल्या या काव्यात आणि 'गोडी अपूर्णतेची' या शब्दात एक शल्य लपलेलं दिसतं. पुढच्याच 'लावील वेड जीवा' या शब्दात जखमा लपविण्याची धडपड आहे याचं भान ठेऊन आशानं आपल्यापरीनं मुखड्यातच बाजी मारली आहे. गाणं काळजाला हात घालतं ते यामुळेच.

संगीतकार अनिल-अरुण या दोघांमध्ये जबरदस्त टॅलेंट आहे. जीवनाकडे सतत नव्या ताजेपणाने बघण्याचा त्यांच्या दृष्टीमुळेच की काय ते सतत प्रयोगशील राहिले. त्यांच्या अष्टपैलू सांगीतिक गुणांबद्दल काय सांगावं? जे जे काव्य हातात पडलं ते ते त्यांनी आपल्या कलाकुसरीने रत्नमंडित करून रसिकांसमोर सादर केलं. मग ते भावगीत असो की चित्रपटसंगीत. स्वरसम्राज्ञी लतादीदींचे सर्वात विश्वासू आणि आवडते स्वरसंयोजक असतील तर ते अनिल-अरुण. पण खरं सांगू? त्यांचा सही उपयोग जणू कुणी करूनच घेतला नाही. संगीत-संयोजनात तर ते बाप आहेत. भप्पी लाहिरीची जी काही गाणी तुमच्या आवडीची आहेत त्याचं संपूर्ण श्रेय द्यायला हवं ते याच जोडगोळीला असं आम्ही म्युझिक-इंडस्ट्रीतले लोक छातीठोकपणे सांगू. कारण त्या काळात हिन्दी चित्रपटसंगीतात एक नवा प्रवाह आणला गेला होता. मेलडी संपलेली. पब्लिकमध्ये 'ऱ्हिदम-ओरिएन्टेड' गाण्यांची आवड निर्माण झालेली. संगीतकार भप्पी लाहिरींना नावं ठेवायचा अधिकार नाही आपल्याला पण जुने-जाणते आणि गुणी वादक विषण्णपणे सांगतात की.. मोठ-मोठ्या नामवंत दुकानांसमोरच्या फुटपाथवर एखाद्यानं टपरी टाकून 'रास्तेका माल सस्ते में' विकावं तसं दुकान थाटलेलं भप्पीने. स्वतःचा माहोल निर्माण केलेला. पंचमदांनाही चॅलेन्ज निर्माण केलेलं त्यांनी. भप्पी लाहिरी 'लंबी रेस का घोडा' नसेल ठरला पण त्याने संगीतातल्या प्रवाहाला मारुन मुटकून वेगळ्या वळणावर आणून सोडलं, हे कबूल करावंच लागेल. त्याची काही गाणी तर चिक्कार गाजली. भप्पीने आपलं एक वलय निर्माण केलं. त्याचे कित्येक फॅन्सही आहेत, त्यांचा तो 'आयडॉल' आहे. संगीत-संयोजन, तसंच वाद्यवृंद संरचना हाच भप्पीच्या त्या काळातल्या गाण्यांचा आत्मा होता आणि याचं श्रेय जातं ते संगीतकार अनिल-अरुण या जोडगोळीला. अनिल-अरुणजींना पुढे अनेक मराठी गाणी करताना पाहिलं-ऐकलं. 'रजनीगंधा जीवनी या..', 'रूपेरी वाळूत माडांच्या बनात..', 'ससा तो कसा..', ते सचिन-महेश कोठारेंच्या एकेक दे धम्माल चित्रपटांपर्यंत ते आपली कारकीर्द फुलवताना दिसले, पण 'स्वप्नातल्या कळ्यांनो..' या गाण्यात त्यांनी केलेला आविष्कार पुढे औषधालाही सापडला नाही, असे त्यांचे अनेक चाहते दुःखाने सांगत असतात. केवळ काही व्हायोलिन्स, सतार, दोन तबलजी वापरुन त्यांनी हे गाणं ज्या प्रकारे सजवलंय ती सर्जकता पुढे गेली कुठे कुणास ठाऊक? गायिका म्हणून आशाताईंची केलेली निवड किती सार्थ होती याचा प्रत्यय आत्ता याक्षणी हे गाणं पुनःपुन्हा ऐकताना येतोय. एकेक नवा अर्थ दृग्गोचर होताच काळजाच्या ठिकऱ्या होत आहेत.

वाईट वाटतंय ते हे गाणं रेकॉर्ड झालं 'त्या' काळाचं. त्या काळात ईपी रेकॉर्डस्‌ना अतिशय मागणी असल्याने एच.एम.व्ही.ने गाणी ईपीवर सादर करण्याचा धडाका लावला होता. त्या स्वस्तही पडायच्या. एच.एम.व्ही.ने कित्येक चांगली गाणी या ईपीच्या वेडापायी संकलनाची कात्री चालवून निर्दयपणे कापली. ती ईपीवर सादर झाली खरी पण काही गाण्यांवर खरंच अन्याय झाला. धोती को फाडके रुमाल कर दिया. कुठे एखादं कडवंच उडवलंय, तर कुठे काय! गाणं अर्धवट आहे असं लक्षात येताच आपण स्वतःशीच शोक व्यक्त करायचा, दॅटस् इट! दुर्दैवाची आणि दुःखाची गोष्ट म्हणजे आजच्या घडीला त्यांच्याकडे काही कार्यक्रमांच्या-अल्बम्सच्या केवळ याच मास्टर्स उपलब्ध आहेत. जुन्या खराब झाल्या, गहाळ झाल्या किंवा सापडत नाहीत म्हणे. सध्या त्याच मास्टर्सवरून बनविलेल्या ध्वनिफिती, सीडीज, एमपीथ्रीज बाजारात उपलब्ध आहेत. आपल्या माथी मारल्या जात आहेत. वेळेचं बंधन असण्याच्या या तांत्रिक अडचणीमुळे रेकॉर्ड करताना पुढे ते काळजी घेऊ लागले. आता ध्वनिमुद्रण करायचं म्हटलं की साडेतीन मिनिटांचं बंधन असायचं. तशी जणू धमकीवजा सूचना संगीतकारांना दिली जायची. गाणं तेवढ्यातच उरकावं लागे. मोठं झालंच तर काटछाट करून ते त्या वेळेत बसवावं लागे. म.पां. भावेंची ही कविता खरंतर तीन कडव्यांची आहे. वेळेच्या या तथाकथित बंधनामुळे एक छानसं कडवं ध्वनिमुद्रिकेत समाविष्ट करता आलेलं नाही. भावेंनी जीव ओतून लिहिलेलं हे कडवं आपल्या हातून कायमचं निसटलंय -

*सिध्दीस कार्य जाता, येते सुखास जडता,*
*जडतेत चेतनेला, उरतो न कोणि त्राता,*
*अतृप्त भावनांनी, जीवात जीव यावा,*
*स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..*

आशाताईंनी हे कडवं कसं गायलं असतं? बरीच जुनी गाणी व्हर्शन्सच्या रूपात आपल्या कानावर आदळत असतात पण कुणीही हे निसटलेलं कडवं गाण्याची हिंमत केलेली नाही. करूही नये. आशाताईंनी गाण्यातल्या विविध अंगाच्या सर्वच आघाड्या पादाक्रांत केलेल्या आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येईल का? सगळी गाणी व्हर्शन्स करा पण प्लीज आशाताईंची गाणी करायचं धाडस करू नका. ते जमणार नाही याची खात्री आहे पण ती गाणी दुसऱ्या कुणाच्या आवाजात ऐकण्याची कल्पनाच करवत नाही हो!

♥

## ४१ : स्वप्नातल्या कळ्यांनो..

गायिका : आशा भोसले
कवि : म. पां. भावे
संगीत : अनिल-अरूण

स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा,
गोडी अपूर्णतेची, लावील वेड जीवा,
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..

रेखाकृती सुखाच्या, चित्ती चितारलेल्या,
साशंक कल्पनांनी, सहजी विरून गेल्या,
कधि सोशिला उन्हाळा, कधि लाभला विसावा,
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा,

नैराश्य कृष्णमेघी, आशा कधी बुडावी,
विरहात चिंब भिजुनी, प्रीती फुलोनी यावी,
काट्याविना न हाती, केव्हा गुलाब यावा,
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..

सिध्दीस कार्य जाता, येते सुखास जडता,
जडतेत चेतनेला, उरतो न कोणि त्राता,
अतृप्त भावनांनी, जीवात जीव यावा,
स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केव्हा..
(हे कडवे ध्वनिमुद्रिकेत समाविष्ट करता आलेलं नाही.)

♥

आशाताईंच्या या सर्वांगसुंदर गाण्याची 'ऑडिओ'ची 'यू-ट्युब' लिंक. सोबत काही गाणी.

| | | |
|---|---|---|
| १. स्वप्नातल्या कळ्यांनो.. | (ऑडिओ) | https://youtu.be/BwGB3CwJX8o |
| २. स्वप्नातल्या कळ्यांनो.. (ऑडिओ) | | https://youtu.be/6sTpFj-EkAM |
| ३. आशाताई यांची १०० मराठी गाणी | | https://youtu.be/tAxfLcrtOP0 |
| ४. आशा भोसले (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) | | https://youtu.be/J5CFFXgRwX0 |

♥

## ४२ : आधा है चंद्रमा रात आधी..

प्रिन्सेस स्ट्रीटच्या गझदर हाऊसमधून एक काळी मोटार भरधाव निघाली होती. गाडीत होते दोघेच. ड्रायव्हर आणि मागच्या सीटवर रेलून बसलेला एक बारा वर्षे वयाचा चुणचुणीत छोकरा. गाडी चक्क महंमदअली रोडच्या दिशेने निघाली होती. १९४६साल! देशाचं स्वातंत्र्य हातातोंडाशी आलेल्या त्या दिवसात, या इलाक्यात कसला विचित्र तणाव असायचा ते तो अनुभवलेल्यांनाच ठाऊक. गल्लीबोळातून सफाईदार वळणे घेत थोड्याच वेळात ती मोटार भेंडीबाजारातल्या 'किताब मंजील'च्या दारापाशी थांबली. तो मुलगा त्या मोटारीतून उडी मारूनच उतरला. उत्तुंग शिल्पकृतीपुढे उभं राहून भक्तिभावपूर्ण नजरेनं ती न्याहाळावी तसं त्या इमारतीचं दर्शन घेतलं. त्या अवधीत ड्रायव्हरने गाडीची दारं, काचा व्यवस्थित बंद करून घेतल्या आणि मुलाचा हात धरून दुसरा मजला गाठला. दाराच्या पाटीवर उर्दूत काहीतरी लिहिलेलं पाहता पाहता त्याने पत्ता लिहिलेला कागद तसाच खिशात कोंबला. दोघांच्याही चेहऱ्यावर उत्कंठा होती. दारावर दस्तक देताना हातही थरथरत होता. शेरवानी घातलेल्या एकानं दार उघडलं. ड्रायव्हरने 'अस्सलाम वालेकुम' असा सलाम ठोकला. त्याने 'वालेकुम अस्सलाम' असं प्रत्युत्तर देत दोघांना आत घेतलं. दोघंही आत येऊन बाजुच्या खाट कम दिवाणावर बसले. पाण्याचा ग्लास रिकामा करता करता ड्रायव्हर मुलानं पढवल्याप्रमाणे पोपटपंची करू लागला. '..जनाब.. इस लडकेके भाई को आपसे संगीत सीखना है..' त्यांचं अस्खलीत उर्दूत संभाषण सुरुच होतं, पण तो मुलगा त्या शेरवानीतल्या इसमाला एकटक न्याहाळत होता. फ़नकार महंमद रफी - त्या मुलाचं आराध्य दैवत साक्षात समोर होतं. भक्त पुंडलिकाने अहर्निश दर्शन दिलेल्या पांडुरंगाकडे पहावं तितक्या तन्मयतेनं तो रफीसाहेबांना आपादमस्तक न्याहाळत होता, डोळ्यात साठवत होता. त्याची कावरीबावरी नजर, चलबिचल, चुळबुळ, डोळ्यातले क्षणोक्षणी बदलत जाणारे भाव त्याच रूममध्ये मौजूद असलेले हमीदभाई पहातच होते. ते चटकन म्हणाले..'बेटा, इन्शा-अल्ला अगले इतवार को तुम तुम्हारे भाई और अब्बाजान को लेकर तशरीफ़ लाना..' बस्स! संपली मुलाकात. अनिच्छेनंच दीर्घ श्वास घेत तो मुलगा तिथून उठला. मणामणाचं ओझं वाहावं तसा रूमबाहेर पडला, पण नंतर मात्र काहीतरी गवसल्याचा साक्षात्कार होताच हरणाच्या चपळाईने धाडधाड जिने उतरत खाली आला. त्याचं नाव होतं महेंद्र कपूर. रफीला भेटण्यासाठी त्याने जिवाचं रान केलं होतं. पुढच्या रविवारी जेव्हा तो आपले पिताजी आणि थोरल्या ब्रिजमोहनसोबत रफीसाहेबांकडे आला तेव्हा तसाच खुळावल्यासारखा रफीसाहेबांना न्याहाळू लागला. हमीदभाईंनी काय ते ओळखलं. चारेक वाक्यांची देवाण घेवाण झाली असेल.. हमीदभाईंनी 'गाना ये बडे को नही, इस छोटे साहब को सीखना है.. है ना?' असा बॉम्ब टाकताच छोट्या महेंद्रचं ताकासाठी लपवलेलं भांडं उघडकीस आलं. उपस्थितांपैकी सगळे खूप हसले. रफीने मग महेंद्रला गाणं म्हणून दाखवायला सांगितलं. त्याचं गाणं ऐकल्यावर तिथल्यातिथेच त्याला आपला शागीर्द बनवण्याचं आश्वासन दिलं. बी. एम. व्यासजींकडे जा आणि क्लासिकल शिक असा सल्लाही दिला. महंमद रफींकडे शिकता शिकता महेंद्र पं. मनोहरजी पोतदार (ग्वाल्हेर घराणं), उस्ताद नियाज अहमद खाँ (किराणा), उस्ताद अब्दुल रहमान खाँ (पतियाळा), पं. जगन्नाथबुवा पुरोहित (आग्रा) यांच्याकडे तब्बल चार-चार वर्षे संगीताचे धडे घेत राहिले.

ऐसपैस डबल-रूम होती त्यांची गझदर हाऊसमध्ये. किचनमध्ये पहाटे चार वाजता छोटा महेंद्र रियाजाला बसायचा. स्वरांच्या नेमक्या जागा शोधण्याचा खटाटोप, आलापी- ताना घेण्याची कसरत याचा त्रास शेजारच्या तडकू पारश्याला होऊ लागला. कोर्टात याचिका दाखल करणे वगैरे प्रकार तेव्हा अस्तित्वात नसल्याने पारशी नुसतीच चिडचिड करायचा एवढंच. भांडणं होण्याची परिस्थिती निर्माण होताच त्याच्या वडिलांनी मागची बाल्कनी लाकडी फळ्यांनी बंद करून छोटीशी 'साऊंड-प्रूफ' रूम तयार केली. रोजच्या रियाजामुळे छोट्या महेंद्रचा आवाज हळुहळू परिपक्व होत होता. क्लासिकल शिकण्यामुळे त्या आवाजाला पैलू पडत होते. मैफिलीतलं गाणं वेगळं, रेकॉर्डिंगचं वेगळं. फिल्म-म्युझिक तर त्याहूनही वेगळं. युगलगीत गाताना सहगायकाशी जमवून घेत कसं गायचं याचा फंडाही वेगळाच असतो. रफीसाहेबांनी त्याला अशा विविधतेतले नीरक्षीरविवेक आपुलकीने शिकवले. त्याची भीड चेपावी म्हणून बऱ्याचदा ते रेकॉर्डिंग्सना, कार्यक्रमांना त्याला सोबतही नेत असत. अशातून त्याच्या ओळखी होतील. गायकीच्या कक्षा रुंदावतील हा फायदा होताच. 'आपल्याला आज जे काही यश मिळालंय त्या यशात रफीसाहेबांचं बरंच योगदान आहे. त्यांची शिकवण, प्रेमळ वागणं आणि प्रोत्साहन यामुळेच मी घडलो.. ' असं पापाजी आजही सांगत असतात. तर..१९५२साली 'मदमस्त'मध्ये व्ही. बलसारा नावाच्या संगीतकाराने जेव्हा महेंद्रला पहिला ब्रेक दिला, तेव्हा त्याच्या इतक्या श्रमाचं साफल्य झाल्याचं समाधान मिळालं. १९५७ मध्ये 'मेट्रो-ट्रॉफी' ही ऑल इंडिया टॅलेंट कॉन्टेस्ट झाली. नौशादजी, वसंत देसाईजी, सी रामचंद्रजी, मदनमोहनजी आणि तलत महमूदसाहेब हे पाच दिग्गज परिक्षक होते. महेंद्रजींनी रफीसाहेबांनी शिकवलेली 'इलाही कोई तमन्ना नही जमाने में..' ही गजल पेश केली, आणि पहिलं पारितोषिक पटकावलं. आरती मुकर्जीचा दुसरा क्रमांक आला. या

स्पर्धेत जिंकलेल्यांना मोठ्या बॅनरचे निर्माते आपल्या चित्रपटात पार्श्वगायनाची संधी देणार होते. एका मराठमोळ्या संगीतकाराने त्याच्यातला स्पार्क केव्हाच हेरला होता. काही दिवसातच महेंद्रला निरोप आला. स्टुडिओत पोहोचण्याचा! युगलगीत रेकॉर्ड व्हायचं होतं. त्या संगीतकाराकडे फिमेल व्हाईससाठी बहुतेकदा लतादीदीच असतात त्यामुळे महेंद्रला सॉलिड टेन्शन आलेलं. चेहऱ्यावर-मनावर विलक्षण दडपण वागवत तो एकदाचा स्टुडिओत पोहोचला. म्युझिक आणि ऱ्हिदम सेक्शन आपापली वाद्ये ट्यून करण्यात गुंतली होती. सर्व वाद्यांचा आवाज एकमेकात मिसळल्यामुळे एक विचित्र कोलाहल ऐकू येत होता. चहावाला घरचं कार्य असल्यागत सगळ्यांना चहा पाजत होता. महेंद्रसाठी हे वातावरण तसं नवखं नव्हतं पण मुख्य गायक म्हणून आज त्याच्या डोक्यावर मुंडावळ्या बांधण्यात आल्यामुळे तो खूपच धास्तावलेला. तो अंग चोरून एका खुर्चीत विसावला. संगीतकार सी. रामचंद्रजी आले. आल्या-आल्या नवख्या महेंद्रच्या पाठीवर थोपटत त्याला चिअर-अप केलं. पुढचा एक तास ते सहाय्यकांबरोबर गाण्याचं चलन, ठेका इत्यादी गोष्टींवर खल करत होते. इकडे महेंद्रची नजर सारखी दरवाजाकडे जात होती. दीदी आता येतील, मग येतील.. काय बोलावं? त्या कशा वागतील? आपल्याला सांभाळून घेतील ना? की.. ही नुसतीच ट्रायल तर नसेल?.. मन चिंती ते वैरी न चिंती!.. तिकडे साँग-व्हायोलिनच्या साथीनं रिहर्सल्स सुरू होताच अण्णा (सी. रामचंद्रजी) लगेच महेंद्रकडे आले. दोन शब्द बोलले आणि गाण्याचा कागद त्याच्या हाती दिला. हार्मोनियम पुढे ओढत महेंद्रला अगदी आपलेपणाने प्रोत्साहन देत देत एकेक ओळ शिकवली. त्याला गाणं पक्कं समजलंय हे लक्षात येताच ते निश्चिंत झाले. आणखी एकदा चहापान होतंय तोच दीदी आल्याची खबर मिळाली.. महेंद्रच्या पायातून मेंदूकडे एक थंड शिरशिरी गेली. क्षणभर धास्तावलेच महेंद्रजी.. इकडे 'टेक'चा पुकारा झाला. सुळावर चढवायला कैदी नेतात तसं कुणीतरी महेंद्रला सिंगर्स-कॅबीनकडे नेलं. हातापायात मुंग्या आलेल्या. समोर दीदींना पाहताच तो जागच्याजागी थबकला. समोर चक्क आशादीदी उभ्या. लतादीदी नाहीत? हुश्श! टेन्शन थोडंफार कमी झालं. आपल्याबरोबर आशादीदी गाणार? व्वा! दिलखुलास स्वभावाच्या आशाताईंनी महेंद्रला धाकट्या भावागत सांभाळत दोन रिहर्सल्स दिल्या. आता 'टेक'चा पुकारा. सायलेन्स! रनिंग! टेक! वन-टू-थ्री-फोर.. शिस्तबध्द कवायत असावी त्याप्रमाणे चाळीसेक 'बो' व्हायोलिन्सवर थिरकले. अण्णांच्या संगीतात न्हालेलं 'नवरंग' (१९५९)चं ते युगलगीत आशाताईंच्या साथीनं गात होते.. महेंद्र कपूर!

*आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी, मुलाकात आधी...आधा है चंद्रमा..*

शांतारामबापूंच्या 'नवरंग'साठी संध्या आणि महिपालवर चित्रित होणारं हे युगलगीत तिथे आकार घेत होतं. या गाण्याच्या आठवणींसरशी आपल्या बचपनची याद ताजा झालेले पापाजी (महेंद्र कपूर) रोमांचित झाले. लतादीदी आणि अण्णांमध्ये तथाकथित गैरसमज निर्माण झाल्याने 'नवरंग'मधल्या गाण्यांमध्ये आशाताई आहेत. आपल्या आशाताईंच्या गायकीचं आणखी एक ठळक वैशिष्ट्य आहे, जे तुम्हालाही माहीत आहे. त्या उत्तम नक्कल करतात. आपण गातोय ते गाणं कुठल्या नायिकेवर चित्रित होणार आहे हे त्या आधीच विचारून घेतात आणि त्या हिरॉईनची बोलण्यातली ढब सरळसरळ वापरत तिच्यासाठी गाणं गातात. 'साक्षात बाबुजींचीही सहीसही नक्कल करत मी गायचे म्हणून ती गाणी, त्यांना हवी तश्शीच रेकॉर्ड व्हायची..' हे दस्तुरखुद्द आशाताईंनी अनेकदा सांगितल्याचं आठवतेय ना? नवरंगचं हे गाणं आशाताई नेहमीपेक्षा जरा हळुवारपणे गायल्यात असं मी म्हणताच एक बुजुर्ग वादक काय म्हणाले होते ठाऊक आहे?.. 'बरखुरदार, त्या सॉफ्टली वगैरे गायल्या नाहीत.. चक्क लताबाईंच्या टोनल क्वालीटीत गायल्या आहेत त्या!.. नक्कल केलीय दीदींची.. अगदी प्रेमाने. जरा नीट ऐकून तर बघ?..' मी आक्रमक होऊन त्यांचा मुद्दा खोडून काढला.. 'आशाताईनी नक्कल वगैरे काही केलेली नाहीय. गाण्यात जसे भाव गरजेचे होते तशा त्या गायल्या आहेत.. आपण त्यांच्या इतर गाण्यांशी हे गाणं ताडून पाहतो म्हणून तुम्हाला त्या इथे वेगळ्या वाटताहेत, समजलं?'

*पिया आधी है प्यार की भाषा, आधी रहेने दो, मनकी अभिलाषा- २*
*आधे छलके नयन, आधे ढलते नयन, आधी पलकों में भी है, बरसात आधीSS*
*आधा है चंद्रमा रात आधी..*

व्ही. शांतारामजींच्या 'राजकमल कला मंदिर'ची पेशकश 'नवरंग'! गदिमांचं कथानक. संध्या, महिपाल, केशवराव दाते, बाबुराब पेंढारकर, मराठीतला स्टार चंद्रकांत, आगा अशी स्टारकास्ट. पिक्चर सुरू होतं 'राजकमल'च्या त्या सुप्रसिध्द टायटलने. व्ही. शांतारामजी सामोरे येतात 'दो आँखे बारह हाथ'च्या वेळी घडलेल्या अपघाती घटनेमुळे डोळ्यांना इजा झाल्यानंतर बरे झाल्याची गोड बातमी देतात.. आपल्या आयुष्यात पुन्हा एकदा नवं इंद्रधनुष्य आलं आहे.. म्हणून 'नवरंगांची' ही उधळण तुम्हा रसिकांसाठी.. आणि पडद्यावरचं चित्रण पुढच्याच क्षणी रंगीत होताना दिसतं.. व्वा! शांतारामजी व्वा!

*आस कब तक रहेगी अधुरी, प्यास होगी नही क्या ये पूरी - २*

*प्यासा प्यासा पवन, प्यासा प्यासा गगन, प्यासे तारों की भी है बारात आधी,*
*आधा है चंद्रमा रात आधी..*

नाव काढलं पोरानं. महेंद्रजींचे पिताजी मनोमन सुखावले. ‘नवरंग’च्या गाण्यांनी धुमाकुळ घातला होता. सगळीच गाणी गाजली. तू छुपी है कहाँ.., श्यामल श्यामल बरन.., अरे जा रे हट नटखट.. आजही आपल्या आवडीची आहेत. रेकॉर्ड हातात येताच ती तशीच पोटाशी धरून महेंद्रजी आधी रफीसाहेबांना आणि मग त्यांच्या सांगण्यावरून संगीतकार ओ. पी. नय्यरजींना भेटायला गेले होते. पण हाऽऽय! ओपी त्यादिवशी भेटलेच नाहीत. राजा मेहंदी अली खाँ भेटले. तोंड भरून कौतुक केलं त्यांनी. कुठूनतरी कळलं की केवलभाई कश्यप ओपींच्या पीआरओचं काम पाहतात. तडक कुलाब्यातल्या चिरागदिन टेलर्ससमोरच्या इमारतीतली त्यांची रूम गाठली. गावकीची खोली असावी तशी अस्ताव्यस्त होती ती. धर्मेंद्र आणि मनोजकुमार आपल्या स्ट्रगलच्या दिवसात इथेच रहायचे. केवलजींमुळे त्या सगळ्यांशी दोस्ताना झाला. रफीसाहेब त्यांना नेहमी प्रोत्साहन देत असत. पापाजींचं (महेंद्र कपूरजींना इंडस्ट्रीतले सर्वजण याच नावाने संबोधतात.) नाव गाजत राहिलं. मनोजकुमारशी इतकं सख्य झालं की पुढे त्यांच्या प्रत्येक चित्रपटात झुकतं माप असायचं ते पापाजींनाच. ‘चाँद छुपा और तारे..’ (सोहनी महिवाल-१९५९) पासून सुरु झालेला सिलसिला ‘तेरे प्यार का आसरा..’ (लतादीदींबरोबर-धुल का फूल-१९५९) वगैरे गाण्यांनंतर बहरतच राहिला. ‘आज की मुलाकात बस इतनी..’ (लतादीदींबरोबर-भरोसा-१९६३) नंतर त्यांनी कधी मागे वळून पाहिलंच नाही, ते आजतागायत. ‘रह न जाए तेरी मेरी बात आधी..’ म्हणत आपल्या गायकीची सफर आरंभ करणाऱ्या या गायकाची बात कधीच ‘आधी’ राहिली नाही.. हे विशेष.

*सूर आधा ही श्याम ने साधा, रहा राधा का प्यार भी आधा - २*
*नैन आधे खिले, होठ आधे हिले, रही मन में मिलन की वो बात आधी,*
*आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी,*
*मुलाकात आधी... आधा है चंद्रमा..*

♥

या गाण्याशी तसेच चित्रपटाशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व ‘ऑडिओ’, ‘व्हिडिओ आणि कराओके’ यांच्या ‘यू-ट्युब’ लिंक्स.

| | |
|---|---|
| १. आधा है चंद्रमा.. (ऑडिओ) | https://youtu.be/zxukLSnWs68 |
| २. आधा है चंद्रमा.. (व्हिडिओ) | https://youtu.be/aasw1WDNhgY |
| ३. आधा है चंद्रमा..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/L3qlwoZ_BLE |
| ४. नवरंग (१९५९) (चित्रपटातील गाणी) | https://youtu.be/HbbWoLOoNM0 |
| ५. चित्रपट : नवरंग (१९५९) | https://youtu.be/aWQQx5V1LK4 |
| ६. महेंद्र कपूर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/-_eVjUb4dUI |
| ७. महेंद्रकपूर (सुपरहिटस्-ऑडिओ) | https://youtu.be/PALOIKSXOME |

८. महेंद्र कपूर (मराठी हिटस्- प्ले-लिस्ट) :
https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97NF0ZlryzS2X9e1xrteluc
९. महेंद्र कपूर - (कराओके ट्रॅक्स १) :
https://www.youtube.com/playlist?list=PLy8fICEIsXJv22OdZoP7lR1QepFPTBExJ
१०. महेंद्र कपूर – (कराओके ट्रॅक्स २) :
https://www.youtube.com/playlist?list=PL8XAFwYHVKblC30ShbBY6SA7PsXwPTKJQ

♥

## ४२ : आधा है चंद्रमा रात आधी..

चित्रपट : नवरंग (१९५९)
गीतकार : भरत व्यास
संगीत : सी. रामचंद्र
गायक : आशा भोसले - महेंद्र कपूर

महेंद्र कपूर :
आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी,
मुलाकात आधी... - २ आधा है चंद्रमाss

आशा भोसले :
पिया आधी है प्यार की भाषा, आधी रहेने दो, मनकी अभिलाषा - २
आधे छलके नयन, आधे ढलते नयन, आधी पलकों में भी है, बरसात आधीss
आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी,
मुलाकात आधी... आधा है चंद्रमाss

महेंद्र कपूर :
आस कब तक रहेगी अधुरी, प्यास होगी नही क्या ये पूरी - २
प्यासा प्यासा पवन, प्यासा प्यासा गगन, प्यासे तारों की भी है बारात आधीss
आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी,
मुलाकात आधी... आधा है चंद्रमाss

आशा भोसले :
सूर आधा ही श्याम ने साधा, रहा राधा का प्यार भी आधा - २
नैन आधे खिले, होठ आधे हिले, रही मन में मिलन की वे बात आधीss
आधा है चंद्रमा रात आधी, रह न जाए तेरी मेरी बात आधी,
मुलाकात आधी... आधा है चंद्रमाss

♥

काही सुपरहिट गाण्यांच्या प्ले-लिस्ट ('यू-ट्युब' लिंक्स). गाणी पहा, ऐका आणि डाऊनलोड करा :

०१. महेंद्र कपूर - युगलगीते (प्ले-लिस्ट) :
https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95BsZ1K-B1r5y3I_8aEgKpB

०२. सी. रामचंद्र व लता मंगेशकर (दुर्मीळ गाणी) (ऑडिओ) :
https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97q9v9epzuwjZORU_O8iSsU

०३. सी. रामचंद्र (भुलाए न बने) :
https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97WHTSn9W_6ajFR6J8SVW9N

♥

## 43 : Pal Do Pal Ka Saath..

## ४३ : पल दो पल का साथ हमारा..

नुसतं नेपथ्य झकास आहे म्हणून तुमची एखाद्या नाटकाला जायची तयारी आहे? मुळीच नाही! व्यस्त दैनंदिन कामातून सवड काढून, असल्या महागाईत पदरमोड करून फुरसतीच्या क्षणी दोन घटका करमणूक व्हावी, विरंगुळा मिळावा म्हणून आपण नाटकाच्या थिएटरकडे वळत असतो. नेपथ्याला टाळी देण्यासाठी नाही. त्या रंगमंचावर घडणारं नाट्य अनुभवण्यासाठी आपण आसुसलेले असतो. कथानक हवं असतं. अभिनयाची जुगलबंदी, आतषबाजी-नाट्य-रहस्य-थरार-विनोद-संगीत इ.इ. मात्र त्यातली एखादी गोष्टही रुचली नाही. पचनी पडली नाही तर पाठ फिरवतो आपण त्या कलकृतीकडे. मग ती दोन हजारांच्या निर्मितीमूल्याची असो वा लाखो रुपयांच्या. तांत्रिकदृष्ट्या सरस असलेली अशी कित्येक नाटकं आणि सिनेमे आपण तिकिटबारीवर आपटलेले पाहिलेत. कितीही गाजावाजा करा, जाहिराती करा. मोठे स्टार्स घ्या, धो धो पैसा ओता. प्रेक्षकांना अपेक्षित असणाऱ्या गोष्टींचा अभाव असेल तर ते लागलीच पाठ फिरवतात. फक्त अमुक गोष्ट भव्य-दिव्य स्वरूपात सादर करण्याच्या हव्यासापोटी, भट्टी जमलीच नाही फिल्मची असं कित्येकदा झालंय की नाही?.. 'क्या शूटिंग किया है बाप!..' असं सांगणारा प्रेक्षक पुढचंच वाक्य.. 'लेकीन बाकी चीजों में दम नही यार!..' असं सांगतो तेव्हा आठवतो तो बी. आर. चोप्रांचा 'दी बर्निंग ट्रेन'! १९८० सालचा! ७०एमएम. स्टिरिओफोनिक साऊन्ड! काय त्या जाहिराती? १९७५ची 'शोले'ची नशा आणि कैफ मनावर ताजा असतानाच त्यानंतर रुपेरी पडद्यावर चमत्कार घडवणारा चोप्रांचा एक महत्त्वाकांक्षी सिनेमा येतोय अशी बातमी आलेली.. 'दी बर्निंग ट्रेन'! रवी चोप्रांचं कथानक आणि दिग्दर्शन! धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, विनोद मेहरा, हेमा, परवीन, नीतू सिंह अशी तगडी फौज आहे म्हणता प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोचलेली. ७०एमएम असल्याने तो बहुदा मिनर्व्हालाच येणार असं बऱ्याचदा कानावर पडायचं. पण तिथे तर 'शोले' अजून मॅटिनीला मुक्काम ठोकून होता.. मग कसं काय बुवा? शेवटी मराठा मंदिरला ही चोप्रांची 'ट्रेन' येणारेय अशी गरम हवा होती. शूटिंगचे किस्से, चित्रपटाची प्रगती अशा बातम्यांनी रकाने भरभरून लिहायची वृत्तपत्रे आणि समीक्षक.. (नशीब! तेव्हा आजच्यासारखी चॅनल्स नव्हती! नाहीतर रोज-रोज तोच तो 'आजचा सवाल' घेऊन भारुड रंगलं असतं.) ज्यादिवशी मराठा मंदिरला थिएटरला 'दी बर्निंग ट्रेन'ची पोस्टर्स झळकली त्यादिवसापासून रोज सकाळ-संध्याकाळ तिथे पोस्टर्स बघायलाही तुफान गर्दी व्हायला लागली...

खूप नाव होतं चोप्राजींचं. बलदेव राज चोप्रा (बी.आर.चोप्रा) या नावाला भरपूर वजन होतं आणि आजही आहे. लाहोर विद्यापीठातून इंग्लिश लिटरेचर घेऊन एम.ए. केलेले बलदेव चोप्रा सिनेपत्रकारिता करायचे. १९५१चा 'अफसाना' हा त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिला प्रयत्न. १९५७च्या 'नया दौर'ने ते चर्चेत आले. दिलीपकुमार-वैजयंतीमाला अभिनीत 'नया दौर'मध्ये आधी मधुबाला असणार होती आणि तसा करारनामाही झालेला म्हणे! आऊटडोअरच्या शूटिंगवरून काही वाद झाला होता. चोप्राजींनी तिला कोर्टात खेचलं. प्रकरण बरंच गाजलेलं. पुढे चोप्राजींचा हा 'नया दौर' सुपरहिट झाला खरा, पण प्रत्यक्षात घडलेल्या अशा कोर्ट-रुम ड्रामाची आठवण ताजी राहावी म्हणूनच की काय ते पुढच्या बऱ्याच चित्रपटांमध्ये कोर्टाचा सीन ठेवायचेच. (आठवा.. 'कानून', 'वक्त', 'दास्तान', 'इन्साफ का तराजू') १९५९ साली धाकट्या यश चोप्राला दिग्दर्शक म्हणून ब्रेक दिला. 'धुल का फूल' यशस्वी ठरला. 'वक्त', 'आदमी और इन्सान','गुमराह','हमराज' अशा कित्येक चित्रपटांनी बी.आर. चोप्रांच्या बॅनरला यश चाखायची संधी दिली. १९७० साली धाकट्या यशने स्वतःचं बॅनर काढायचा मनसुबा व्यक्त करताच बलदेवजी ढासळले. एकत्र कुटुंबाचं, एकाच बॅनरचं स्वप्न धुळीला मिळालं. यशने वेगळी चूल मांडताच एकाकी पडलेल्या बलदेवजींचे 'दास्तान' (१९७२) आणि 'कर्म' (१९७७) का कुणास ठाऊक अयशस्वी ठरले. एकीकडे यश चोप्रांचा 'दीवार' (१९७५) गाजत असतानाच बलदेवजींनी 'दी बर्निंग ट्रेन'च्या स्क्रीप्टवर काम सुरू केलं होतं. ७०एमएम.. स्टिरिओफोनिक साऊन्ड! 'शोले' सारखीच भव्य कलाकृती निर्माण करायची म्हणून बलदेवजी झपाटलेले होते. मल्टि-स्टारकास्ट फॉम्युला दिला तर तो हमखास चालणार असा त्यांचा होरा होता. करायचं ते दणक्यात! एका इंग्रजी फिल्मच्या धर्तीवर बेतलेलं कथानक. धावत्या ट्रेनमधलं थरारनाट्य! लाखो रुपये खर्च करण्याची तजवीज केलेली. एकेका शॉटसाठी इथले तसेच 'ट्वेन्टीएथ सेंच्युरी फॉक्स'चे तंत्रज्ञ काम करत होते. संगीताची सूत्रे त्यांनी आर.डी. बर्मनजींकडे सोपविली होती पण गीतलेखन मात्र आमचे साहीरजी करतील अशी विनंतीवजा सूचना केली होती पंचमदांना. शायर साहीर लुधियानवीजी म्हणजे चोप्राजींच्या खास मर्जीतले. चोप्रा कॅम्पशी त्यांचा जणू ऋणानुबंधच. कव्वालीचा दौर होता त्याकाळी. 'चढता सूरज धीरे धीरे..', 'झूम बराबर झूम शराबी..', 'देख तमाशा लकडीका..', 'बडा लुत्फ था जब कुँवारे थे हम तुम..', 'कैसे बेशर्म आशिक है ये आज के..' अशा कव्वालींचा. अजीज नाजां, जानीबाबू, युसुफ आजाद, रशिदा खातून असे अनेक कव्वाल गाजत होते. त्यांच्यातला आपापसातला मुकाबला हे तर मनोरंजनाचं साधन. 'शोले'साठी पंचमदांनी मस्त कव्वाली रेकॉर्ड केली

होती. ‘चाँदसा कोई चेहरा न पहलू में हो..’ (किशोर, बलबीर, आनंद बक्षी इ.) पण ती चित्रपटातून काढून टाकण्यात आलेली. (‘शोले’(१९७५) या चित्रपटाच्या संगीताचे हक्क ‘पॉलिडॉर’ (आता युनिव्हर्सल)कडे आहेत. त्यांनी ‘शोले’च्या गाणी व संवादांची ‘एल.पी. रेकॉर्ड’ काढलेली. त्या काळात तडाखेबंद विक्री झालेली त्याची. आज पंचमदांना श्रध्दांजली म्हणून प्रसिध्द केलेल्या ‘एम्पीथ्री’मध्ये हे गाणं त्यांनी आपल्यासाठी सुदैवाने उपलब्ध केलंय. अवश्य ऐकणेबल!) ‘दी बर्निंग ट्रेन’ मध्ये अशी एखादी सुपर-फास्ट कव्वाली असावी असं ठरलं. मनासारखी कव्वाली करायला मिळणार म्हणून पंचमदा खूष. साहीरजींनी मुखडा तर चांगलाच जमवून आणलेला..

*पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है,*
*इस मंजील पर मिलनेवाले, उस मंजीलपर खो जाने है,*
*पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने हैऽऽ*

गाण्यात एक गंमत आहे. गाणं युगलगीत आहे. कव्वालीचा बाज! रफी आणि आशाताई.. पण मुकाबला नाहीय तो. हार-जीतका मामलाच नाही. जीवनातल्या शाश्वत गोष्टी विषद करून सांगण्याचा प्रयास आहे संपूर्ण गाण्यात. ते ‘राग केदार’वर बेतलंय. (मनोहारी दादा वगैरे प्रभृतींबरोबर झालेल्या गप्पांमधून समजलं की या रागाच्या सुरावटींवर आधारित सहसा कव्वाली प्रकार कंपोज केला जात नाही. उदाहरणदाखल त्यांनी या रागात ‘आप की आँखों मे कुछ..’, ‘आप यूं ही अगर हम से..’, ‘बोले तो बांसुरी कहीं..’, ‘हम को मन की शक्ती देना..’, ‘उठाए जा उन के सितम..’ अशी गाणी असल्याचं सांगितलं.) गाण्याचं एकंदर स्वरूप अस्सल कव्वालीसारखं असलं तरी त्याला आर्डी टच आहेच आहे. गाण्याची मध्येच लय बदलते, ठेकाही बेमालुमपणे बदलतो पण त्या संगीत-संयोजनातच इतकं चैतन्य, चापल्य आहे की आपण गुंग होऊन जातो. मध्येच ट्रेनचे साऊन्ड-इफेक्टस्‌ही येतात पण ते गाण्याच्या प्रवाहाला अजिबात बाधा आणत नाहीत, हे विशेष. गाण्याचं ध्वनिमुद्रण परफेक्ट स्टिरिओफोनिक आहे, त्यामुळे ते जरा जास्तच अंगावर येतं. सिनेमात हे गाणं मुख्यतः जितेंद्र, आशा सचदेव आणि नीतू सिंहवर पिक्चराईज झालेलं आहे. साहीर आणि पंचमदा ही जोडी पहिल्यांदाच आली आपणासमोर. पंचमदांच्या गाण्याचा अभ्यास करताना आपण नेहमीच पाहिलंय की त्यांची वेगळ्या आणि जरा हटके अशा गीतकाराशी जोडी जमताच मस्त गाण्यांची निर्मिती झालीय. गुलजार, मजरूह आणि आता चक्क साहीर! साहीर म्हणजे ताठ कण्याचे, आपला इगो कुरवाळणारे मनस्वी शायर असा लौकिक असताना इथे त्यांचा आर्डीशी चांगलाच दोस्ताना होतो म्हणता नवल वाटतं क्षणभर. सचिनदांबरोबर १९५१ साली ‘नौजवान’मध्ये गीतलेखन (ठंडी हवायें..) करणारे साहीरजी नंतर भेटत राहिले ते त्यांच्या प्रत्येक बेमिसाल गाण्यांतून. ‘जाये तो जाये कहाँ..’, ‘तदबीर से बिगडी..’, ‘परबतों के पेडोंपर..’, ‘जीवन के सफर में..’, ‘दु:खी मन मेरे..’, ‘ना तो कारवाँ की तलाश है..’, ‘हम इंतजार करेंगे..’, ‘जो वादा किया वो..’, ‘मन रे तू काहे न धीर..’ अशा अनेक गाण्यांतून. चोप्रांच्या ‘धुल का फूल’ला संगीतकार होते एन. दत्ता. तर ‘वक्त’, ‘आदमी और इन्सान’, ‘गुमराह’, ‘हमराज’, ‘धुंद’ला संगीतकार होते रवीजी. पण गीतं होती ती साहीरजींचीच. ते संगीतकार भले बदलायचे पण गीतकार एकच! साहीर लुधियानवीजी! शंकर-जयकिशनना त्यांनी ‘आपल्या चित्रपटांना संगीत द्याल का?’ अशी नम्र विचारणा केली होती. पण जेव्हा त्यांनी आपल्याशी दीर्घकाळ ट्यूनिंग असलेल्या शैलेंद्र आणि हसरत जयपुरींना सोडण्यास नकार दिला, तेव्हा चोप्रांनी त्यांच्याच नावावर चोकडी मारली. ‘नया दौर’मध्ये ओपी नय्यरजींबरोबर साहीर आणले त्यांनी. आर.डी. बर्मनजींनी शायर म्हणून साहीर असतील ही अट बिनशर्त मान्य केली. आपल्या वडिलांबरोबर काम केलेल्या साहीर अंकलचं काव्य मिळणं हा आपलाच सन्मान आहे असं त्यांचं मत होतं. आपली प्रतिभा पणाला लावून त्यांच्या काव्याला सुरेख चालीत गुंफलं. आज आपल्यासमोर आहे तो एक बेमिसाल गाण्यांचा गुलदस्ता.

*नज़रों के शोख़ नज़राने, होठों के गर्म पैमाने,*
*है आज अपनी महफ़िल में, कल क्या हो कोई क्या जानेऽऽ*
*ये पल ख़ुशी की ज़न्नत है, इस पल में जी ले दीवाने,*
*आज की ख़ुशियाँ, एक हकिकत, कल की ख़ुशियाँ अफ़साने है,*
*पल दो पल का, साथ हमारा, पल दो पल के याराने हैऽऽ*

खूप अपेक्षा घेऊन थिएटरात गेलेल्या प्रेक्षकांना ‘दी बर्निंग ट्रेन’ (१९८०) आवडलीच नाही. अपेक्षाभंग झाला होता. लोकांना बेस्टची बस, लोकल ट्रेन ही जेवढी जिव्हाळ्याची तेवढीच कमी खर्चात जन्मगावी किंवा फिरायला नेणारी एस.टी., आणि आगगाडी महत्त्वाची! पण इथे पहिल्याच ‘शो’ला बाहेर पडणारं पब्लिक पिक्चरची तारीफ करण्याच्या मूडमध्येच नव्हतं. ‘तेरी ये जमीं..’, ‘पहली नजर में..’, ‘मेरी नजर है तुझ पे.., ‘पल दो पल का साथ हमारा..’ ही सर्वच गाणी श्रवणीय होती. प्रमुख

कलावंतांची कामगिरी तर उल्लेखनीय होती. शूट तर झक्कास होतं. स्पेशल-इफेक्टस् अंगावर येतील असे चांगलेच जमलेले. स्टोरी-बोर्ड बरा म्हणण्याइतपत पण.. गणित कुठेतरी चुकलं होतं. पब्लिकचं एकच म्हणणं होतं... 'बात कुछ गडबड है यार! ट्रेन दाखवलीय ती जवळजवळ तासाभरानंतर. ही भारतातली पहिली सर्वात 'फास्ट' ट्रेन आहे ना? पण ती कुठल्या इंधनावर चालते तेच स्पष्ट केलेलं नाही. इलेक्ट्रीकवर चालते म्हणावं तर, वरचं वायरींग कुठाय? सुपरफास्ट ट्रेनवर इतकं सहजगत्या चढून बागेत धावतात तसं कसं धावता येईल? त्या तथाकथित इंजिनीयरने सुपरफास्ट असं एकच इंजिन बनवलेलं ना? मग त्याच्याच बाजूला धावणारं तितकंच फास्ट असलेलं दुसरं इंजिन आणलं तरी कुठून?' याची उत्तरं चोप्राजींपाशीच नव्हती, तर आपण काय खाक सांगणार? आपण फक्त साहीरच्या काव्यात आणि पंचमदांच्या सुरावटीत रमायचं.. म्हणायचं की..

*हर ख़ुशी कुछ देर की मेहमान है, पुरा कर ले दिल में जो अरमान है,*
*ज़िंदगी इक तेज-रौ-तुफ़ान है, इसका जो पिछा, करे नादान है*
*गुमशुदा ख़ुशियों पे क्यूँ हैरान है, वक्त लौटे इसका कब इन्कान है*
*झूमऽऽ जब तक झूमऽऽ झूम जब तक, धडकने में जान है,*
*झूमना ही ज़िंदगी की शान है,*
*अव्वला फिर हर कोई अन्जान है, ज़िंदगी बस राह की पहचान है*
*दोस्तों अपना तो ये ईमान है, जो भी जितना साथ दे, अहसान है*
*उम्र का रिश्ता जोडनेवालेऽऽ अपनी नजर में दीवाने है,*
*पल दो पल का, साथ हमारा, पल दो पल के याराने है..*

♥

या चित्रपटाशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.

| | | |
|---|---|---|
| १. पल दो पल का साथ हमारा.. | (ऑडिओ १) | https://youtu.be/bYmfFtHbLPs |
| २. पल दो पल का साथ हमारा.. | (ऑडिओ २) | https://youtu.be/1l_LGh-iMPI |
| ३. पल दो पल का साथ हमारा.. | (व्हिडिओ) | https://youtu.be/z2WUSvHbQ2c |
| ४. पल दो पल का साथ हमारा.. | (कराओके ट्रॅक १) | https://youtu.be/Ft8Op2QI-bk |
| ५. पल दो पल का साथ हमारा.. | (कराओके ट्रॅक २) | https://youtu.be/1Bwxe5E_imQ |
| ६. चित्रपट : दी बर्निंग ट्रेन (१९८०) | | https://youtu.be/PPC482DzYM0 |

♥

## ४३ : पल दो पल का साथ हमारा..

चित्रपट : 'दी बर्निंग ट्रेन' (१९८०)
निर्मिती : बी.आर. फिल्मस्
लेखक/दिग्दर्शक : रवी चोप्रा
गायक : महंमद रफी, आशा भोसले
गीतकार : साहीर लुधियानवी
संगीत : आर.डी. बर्मन

रफी : पल दो पल का साथ हमाराss
पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है - २
इस मंज़ील पर मिलनेवाले,
कोरस : इस मंज़ील पर मिलनेवालेss
रफी : इस मंज़ील पर मिलनेवाले, उस मंज़ीलपर खो जाने है,
पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने हैss
आशा : आss धs निs धs प मs आss
पल दो पल का साथ हमारा,
पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है,
इस मंज़ील पर मिलनेवालेss
कोरस : मिलनेवाले आहेss मिलने वालेss
आशा : इस मंज़ील पर हायss मिलनेवाले, उस मंज़ीलपर खो जाने है,
रफी - आशा : पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है,
रफी : दो पल, पल दो, पल का, साथ हमारा हमाराss
आशा : हमारा हमारा, दो पल, पल दो पल का, साथ हमारा हमारा
कोरस : पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है ।। धृ ।।

रफी : आss नज़रोंके शोख़ नज़राने, होठों के गर्म पैमाने - २
है आज अपनी महफ़िल में, कल क्या हो कोई क्या जानेss
आशा : नजरोंके शोख़ नजराने, होठों के गर्म पैमाने,
है आज अपनी महफ़िल में, कल क्या हो कोई क्या जाने,
ये पल ख़ुशी की ज़न्नत है, इस पल में जी ले दीवाने हायेss
रफी : ये पल ख़ुशी की ज़न्नत है, इस पल में जी ले दीवाने हाये
आशा : आss आज की ख़ुशियाँ, एक हकिकत, कल की ख़ुशियाँ अफ़साने है,
रफी - आशा : पल दो पल का, साथ हमारा, पल दो पल के याराने है,
रफी : दो पल, पल दो, पल का, साथ हमारा हमारा,
आशा : हमारा हमारा, दो पल, पल दो पल का, साथ हमारा हमारा
कोरस : पल दो पल का साथ हमारा, पल दो पल के याराने है ।। १ ।।

आशा : आss हर ख़ुशी कुछ देर की मेहमान है, पूरा कर ले दिल में जो अरमान है,
स्त्री कोरस : अरमान है, अरमान हैss
आशा : पूरा कर ले दिल में जो अरमान हैss
रफी : आss ज़िंदगी इक तेज-रौ-तुफ़ान है, इसका जो पिछा, करे नादान है
कोरस : हर ख़ुशीS, हर ख़ुशीS, हर ख़ुशीss
आशा : हर ख़ुशी कुछ देर की मेहमान है, पूरा कर ले दिल में जो अरमान है,

रफी :  ज़िंदगी इक तेज-रौ-तुफ़ान है, इसका जो पिछा, करे नादान है
आशा :  गुमशुदा ख़ुशियों पे, आहे गुमशुदाss
स्त्री कोरस : गुमशुदा ख़ुशियों पेss
आशा :  हायेs गुमशुदा ख़ुशियों पे क्यूँ हैरान है, वक्त लौटे इसका कब इन्कान है
स्त्री कोरस : इन्कान हैss
आशा :  झूमss जब तक झूमss झूम, जब तक झूम..
कोरस : झूम झूमss, झूम झूमss
आशा :  झूमss जब तक, धडकने में जान है, झूमना ही ज़िंदगी की शान है,
झूमss जब तक, झूमss
रफी :  झूमss जब तक झूमss झूम जब तक, धडकने में जान है,
झूमना ही ज़िंदगी की शान है,
अव्वला फिर हर कोई अन्जान है, ज़िंदगी बस राह की पहचान है
झूमss जब तक झूमss, झूमss जब तक झूमss
कोरस : झूम झूमss, झूम झूमss, झूम झूमss, झूम झूमss
झूमss जब तक, धडकने में जान है, झूमना ही जिंदगी की शान है,
अव्वला फिर हर कोई अन्जान है, ज़िंदगी बस राह की पहचान है
रफी :  दोस्तों अपना तो ये ईमान है, जो भी जितना साथ दे, अहसान है - २
ओsss उम्र का रिश्ता जोडनेवालेss
रफी - आशा : उम्र का रिश्ता जोडनेवाले, अपनी नजर में दीवाने है,
पल दो पल का, साथ हमारा, पल दो पल के याराने है - २    ।। २ ।।

♥

तुमच्या संग्रही असायलाच हव्यात अशा काही ‘यू-ट्युब’ लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

१. गीतकार साहिर लुधियानवी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/JV74z_Uf9H4

२. आर. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/iyP0zN-Ce2U

३. आशाताई व आर.डी.बर्मन (५० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/IAXwD4pRcSw

४. आशाताई व आर.डी.बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/65BuNb1VANE

५. लतादीदी व आर.डी.बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/zXJwGmCGD94

♥

## 44 : Aaj Re..Pardesi..

## ४४ : आजा रेऽऽ परदेसी..

'अब भी वक्त नही गया बिमलदा, सोच लो! मेरी मानो तो ये फिल्म का म्युझिक किसी और को नही! नौशाद को दो!.. क्या स्टाईल है.. व्वा! रतन, अनमोल घडी, शहाजहाँ, दर्द, मेला, दुलारी, अन्दाज, दिल्लगी, बाबुल, आन, बैजू बावरा, उडन खटोला!.. बडे मियाँ.. चूप क्यूँ हो यार? बोलो ना! समझाओ इनको!..' दिलीपकुमार शांतपणे उभा होता. बोलत होता तो वितरक. बिमलदा जाणून होते. हा वितरक आपल्या पदरचं बोलत नाहीय. याला कुणीतरी फूस लावलीय.. ती कुणी लावली असेल त्याचाही त्यांना अंदाज होता.. ते नुसते हसत होते, मनातल्या मनात. ओठही विलग न करता. त्यांना विश्वास होता. 'मधुमती' या त्यांच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला न्याय देऊ शकले असते ते केवळ सलीलदा. त्यांच्या चित्रपटात निसर्ग होता. पर्वतराजीत निसर्गाच्याच सहजतेनं उमलणारं, फुलणारं प्रेम होतं. प्रणयाविष्कार होता. आशा-निराशा, विरह-मिलन यांचा लपंडाव होता. नाही! नौशाद, सचिनदा, शंकर-जयकिशन ग्रेट आहेत यात वाद नाही. पण आपल्या या फिल्मसाठी हवे ते सलीलदा. फक्त सलीलदाच.

बिमलदांचा 'मधुमती' (१९५८)! दिलीपकुमार, वैजयंतीमाला असे नायक-नायिका ठरताच का कोण जाणे, चित्रपटाच्या सर्वच आघाड्यांवर अमुकच असायला हवा असले सल्ले, टीका-टिप्पणी ऐकायला मिळू लागली बिमलदांना. वैतागले होते ते, पण तो वैताग गिळावा लागला. कथेत असलेला निसर्ग, तिथं घडणारं नाट्य, कथा उलगडत जावी तसतसे त्या अनुषंगाने येणारे प्रसंग-गाणी याचा कच्चा मसुदा बनला. बिमलदांनी अभ्यासपूर्वक आपल्या मनाच्या कॅनव्हासवर तो चितारला. एकेका जागी येणाऱ्या गाण्यांच्या सिच्युएशनला संगीतकार कोण असं थबकताच.. सलील चौधरी हे एकच नाव योग्य वाटत होतं. 'दो बिघा जमीन' या त्यांच्या चित्रपटाच्या पटकथा, संवाद आणि संगीत या आघाड्या सांभाळणाऱ्या सलीलदांनी फुरसतीच्या क्षणी आपल्या अनेक धुना ऐकविल्या होत्या.

प्रसंग छोटासाच. बऱ्याच चित्रपटात घडताना दिसतो तस्साच. झुंजुमुंजु झालंय. पाखरांना याची चाहूल लागताच त्यांनी भरारी मारलीय आपापल्या कार्यक्षेत्राकडे. वातावरणात धुकं आहे, पण सूर्याची किरणं आपले हातपाय पसरू लागलेत याची पुसटशी कल्पना येताच धुक्याने टराटरा फाटून जात पोबारा केला आहे. डोंगरमाथा दिसतोय आणि ती खोल दरी.. पलीकडून पुकारा करावा तशी हाळी देत ती नायिका गाणं गातेय..गाण्याचा विषय पहा!...गाण्यातून ती आपल्या प्रियकराला साद घालतेय असं म्हणावं, की ते धरतीचं गाणं म्हणावं?.. गीतकारानं शब्दांचा खेळ करत आपल्याला कसं झुलंवलंय पहा...

*आजा रेऽऽ परदेसी.. मैं तो कब से खडी इसपार, ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..*

सलीलदा आसामचे. चहाच्या मळ्यांनी वेढलेल्या निसर्गरम्य गावात जन्मलेले. मळ्यात कार्यमग्न शेतमजुरांच्या तोंडचं पहाडी लोकसंगीत ऐकायला मिळायचं, तर घरात बीथोवन, मोझार्ट, शूबर्ट अशा दिग्गजांच्या संगीताचा खजिना होता. दिवाणखान्यात ऐसपैस पसरलेला पियानो हेच त्याचं खेळणं. दिवसभर पियानोशी खेळत रात्री जेवणं उरकताच मळ्यावरच्या मजुरांच्या वस्तीवर फेरफटका हा ठरलेलाच. कामगार देशी दारूच्या बेहोशीत हातात हात गुंफून फेर धरून नाचताना दिसायचे. त्यांच्या तोंडची गाणी आणि नाचातून दृग्गोचर व्हायचं लोकसंगीत. झिंग आणणारा लयबध्द ठेका. शिस्तबध्द पदन्यास! सलीलदा याच बाळकडूवर पोसले जात होते. कलकत्त्याच्या काकांकडे काही दिवस राहून पुन्हा गावाकडे परतताच तिथलं वातावरण पाहून गोंधळूनच गेले ते. मजुरांचं शोषण व त्यानंतरचा भीषण दुष्काळ अनुभवायला मिळताच सलीलदांनी किसान आंदोलनात स्वतःला झोकून दिलं. यातल्या कलासक्त कम्युनिष्टांनी 'इप्टा' नावाची संस्था स्थापन केली होती. आता या इप्टाचे सक्रीय कार्यकर्ते झाले सलीलदा. गीतकार शैलेंद्र इथेच भेटले. 'बरसात'नंतर आर.के.कॅम्पशी जास्त जवळीक साधली तरी शैलेंद्रने सलीलदा या आपल्या दोस्ताशी कधीच प्रतारणा केली नाही. सलीलदांनी दिलेल्या थॉटवर तो जीव ओतून लिहायचा.
आर.के.कॅम्पच्या प्रकृतीचं नाही पण दिल को छू लेनेवाली कोई फडकती चीज बनलीच तर तो सलीलदांना अवश्य दाखवायचा. 'मधुमती'चंच उदाहरण घ्या ना! 'सुहाना सफर और ये मौसम हँसी..' (मुकेश), 'घडी घडी मोरा दिल धडके..' (लता), 'दिल तडप तडप के कह रहा है..' (मुकेश-लता), 'दय्या रे दय्या रे चढ गयो पापी बिछुवा..' (लता), 'जुल्मी संग आँख लडी रे..' (लता), 'टूटे हुए ख्वाबोंने..' (महंमद रफी) अशी सर्वांगसुंदर गाणी आपल्या चित्रपटात नाहीत म्हणून राज कपूर पस्तावला नसेल? गीतकार शैलेंद्रचं काव्य आणि सलीलदांचं संगीत हा दुग्धशर्करा योग या गाण्यातून रसिकांना अनुभवायला मिळाला..

*मैं दिये की ऐसी बाती, जल न सकी जो बुझ भी न पाती, आ मिल मेरे, जीवनसाथी ओऽऽ*
*आजा रेऽऽ मैं तो कब से खडी इसपार, ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..*

'मधुमती' या कलाकृतीत संगीतकार म्हणून सलीलदा आणि दिग्दर्शक म्हणून बिमलदांचं बरंच योगदान आहे. प्रत्येक गाण्याची जागा, प्रसंग नेमके पकडले आहेत. गाणी कुठेतरी टाकायची आहेत म्हणून ठिगळं जोडलेली नाहीत. राज कपूर जसं कथानकाच्या ओघानं नेमक्या जागी गाणी पेरायचा तसंच साधल्यासारखं वाटतं इथे. बिमलदांचा परिसस्पर्श हमखास जाणवतो. संगीतात सलीलदा कुठे कमी पडले होते का? चांगलं संगीत कसं असावं अशी कुणाची काही वेगळी व्याख्या असेल तर त्या व्याख्येतही सामावणार नाही इतकं सरस संगीत होतं 'मधुमती'चं. आपलं काम अभिनयाचं. मेहनताना मिळतोय तो केवळ अभिनयासाठीच मग चित्रपटाच्या नायकाने अभिनय सोडून इतर आघाडीवर का म्हणून लुडबूड करावी? पण असं घडतं. आजही घडतं. मी स्वतः ते अनुभवलंय. आमच्या बॉसच्या चेहऱ्यावरची परेशानी मी पाहिलीय. वितरकाला पुढे करून 'अमुकच संगीतकार घ्या' अशी गळ घालणारे नायकही मी पाहिलेत. दिलीपकुमार म्हणजे महानायकाची कवच कुंडले धारण केलेला मेगास्टार, पण त्यानं आपलंच घोडं पुढे दामटण्याआधी बिमलदांनी वेळीच लगाम घातला म्हणून 'मधुमती'सारखी संगीतमय कलाकृती सलीलदांच्या हातून घडली, हे मात्र नक्की. असं म्हणतात की दिलीपकुमार या आधी एकदा सलीलदांकडून डिवचले गेले होते. त्याचाच खुन्नस होता म्हणे. झालेलं काय की, १९५७ मध्ये दिग्दर्शक म्हणून पदार्पण करणाऱ्या हृषिकेश मुकर्जीचा 'मुसाफिर' हा पहिलाच चित्रपट. सलीलदांचं संगीत होतं. दिलीपकुमार, उषा किरण, सुचित्रा सेन, किशोरकुमार, दुर्गा खोटे इ. कलावंत असलेल्या या चित्रपटात 'लागी नाही छुटे राम, चाहे जिया जाय' हे गाणं रेकॉर्ड व्हायचं होतं तेव्हा दिलीपकुमार हट्टाला पेटले होते, लतादीदीबरोबर ते 'ड्युएट' म्हणून गायला. किशोरकुमार स्वतः गायक असल्याने त्याच्यावर चित्रित होणारं 'मुन्ना बडा प्यारा अम्मी का दुलारा..' गायलं होतं. दिलीपसाहेबांचा गाण्याचा हा हट्ट सलीलदांनी सहजासहजी पुरवू दिला नव्हता म्हणतात. हे गाणं सलीलदांनी लतादीदींचं सोलो आणि नंतर मजबूरन दिलीपसाहेबांबरोबरही 'ड्युएट' असं रेकॉर्ड केलं. यातलं खरं खोटं काही असो पण दिलीपसाहेब नाराज झाले. 'मधुमती'चं एकेक गाणं रेकॉर्ड होत होतं. रेकॉर्डिंग आणि चित्रिकरणाच्या वेळी ती ऐकून बडे मियाँ आश्चर्यचकित होत होते. हळुहळू राग निवळत गेला. 'मधुमती' लागला. सुपर-हिट झाला. गाण्यांनी काय रेकॉर्ड केलाय ते तुम्ही जाणताच. (एक आठवण सांगायची तर, हृषिकेश मुखर्जी यांच्या 'गुड्डी' (१९७१) या चित्रपटात हे गाणं अभिनेत्री जया भादुरीच्या तोंडी पहायला मिळतं.) आत्ता याक्षणी आठवतेय ती शनिवार दि. २५ एप्रिल, १९५९च्या रात्रीची मसालेदार कहाणी. फिल्मफेअरची रात्र! 'मधुमती' बेस्ट फिल्म, दिग्दर्शक, नायक, नायिका, संगीत, सहनायक, कथानक अशा बऱ्याच पारितोषिकांसाठी नॉमिनेटेड होता. बिमलदा सुखावले होते. दिलीपकुमारचे 'यहुदी' आणि 'मधुमती' असे दोन चित्रपट शर्यतीत होते म्हणून दिलीपसाहेब निर्विकार चेहऱ्याने प्रेक्षकात बसले होते. आदल्याच वर्षी दिलीपला बेस्ट ॲक्टर म्हणून 'नया दौर'साठी गौरवलं गेलं होतं. 'मदर-इंडिया'ची पाच ॲवॉर्डस् घेऊन जाणाऱ्या मेहबूब खानचं कौतुक करत कुणीतरी खिजवलेलं म्हणे बडे मियाँना. यावर्षी 'मधुमती'ला काय मिळणार कोण जाणे पण आपल्याकडे दोन बेस्ट ऑप्शन्स असल्याने आपला गौरव होणारच अशा खुशीत गाजरं खात होते ते. यावर्षी प्रेक्षकात बसलेल्या बिमलदांकडे पाहत ते अशाच विचारात गढले असावेत. गीतकार शैलेंद्र त्याच्याच 'यहुदी'ची ट्रॉफी घेऊन गेले. आता काय होणार याची उत्सुकता प्रेक्षकातल्या सर्वांच्याच चेहऱ्यावर होती. अचानक घडावं तसं ते घडलं. 'मधुमती'वर ट्रॉफींची बरसातच सुरू झाली. उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शक, नायिका, संगीत, सहनायक, छायांकन, संकलन, कला-दिग्दर्शन, संवाद.. नऊ ट्रॉफीज मिळाल्या. प्रत्येक बक्षिसे घेऊन येणाऱ्या आपल्या कलावंताचं कौतुक करता करता बिमलदा दिलीपकडे पहायचे. ते हसून दाद द्यायचे. शेवटी उत्कृष्ट नायकाच्या पारितोषिकासाठी नावाचा पुकारा झाला..ॲन्ड द विनर इजऽऽ.. देव आनंद! देव साहेबांना 'काला पानी'साठी मिळालेल्या त्या ट्रॉफीबद्दल प्रत्येकजण उत्स्फूर्त दाद देत होता. दिलीपही! पण त्याच्या मनातलं वादळ तो काही लपवू शकला नाही.. जवळच्या रांगांमधल्या प्रेक्षकांना ते सहज लक्षात येत होतं.. शेवटी नियतीचा खेळ कुणाला समजलाय? काहीही म्हणा स्पोर्टसमन स्पिरीट असावंच लागतं यार!

*मैं नदिया फिर भी मैं प्यासी, भेद ये गहरा बात जरासी, बीन तेरे हर साँस न जाती ओऽऽ*
*आजा रेऽऽ मैं तो कब से खडी इसपार,*
*ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..*

♥

## ४४ : आजा रेऽऽ परदेसी..

चित्रपट : मधुमती (१९५८)
निर्माता/दिग्दर्शक : बिमल रॉय
गायिका : लता मंगेशकर
गीतकार : शैलेंद्र
संगीत :सलील चौधरी

मैं तो कब से खडी इसपार, ये अखियाँ, थक गयी पंथ निहार!
आजा रेऽऽ परदेसी..

मैं दिये की ऐसी बाती, जल न सकी जो बुझ भी न पाती - २
आ मिल मेरे जीवनसाथी ओऽऽ
आजा रेऽऽ मैं तो कब से खडी इसपार,
ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..

तुम संग जनम जनम के फेरे, भूल गये क्यों साजन मेरे,
तडपत हूँ मैं सांज सवेरे ओऽऽ
आजा रेऽऽ मैं तो कब से खडी इसपार,
ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..

मैं नदिया फिर भी मैं प्यासी, भेद ये गहरा बात जरासी,
बीन तेरे हर साँस न जाती ओऽऽ
आजा रेऽऽ मैं तो कब से खडी इसपार,
ये अखियाँ, थक गयी पंथ निहार! आजा रेऽऽ परदेसी..

♥

या गाण्याशी तसेच चित्रपटाशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.

| | |
|---|---|
| ०१. आजा रे..परदेसी..(ऑडिओ) | https://youtu.be/s0ZiLUoTLH8 |
| ०२. आजा रे..परदेसी.. (व्हिडिओ) | https://youtu.be/Mm21SSgUHe8 |
| ०३. आजा रे..परदेसी.. (कराओके ट्रॅक) | https://youtu.be/oAaNxUz1xtQ |
| ०४. आजा रे..परदेसी.. (चित्रपट :गुड्डी) | https://youtu.be/Iq0uItK7VpY |
| ०५. आजा रे..परदेसी.. (लतादीदी लाईव्ह) | https://youtu.be/gLO-MTxnqYg |
| ०६. मधुमती (१९५८) (ऑडिओ ज्युकबॉक्स) | https://youtu.be/JHXH7hR7508 |
| ०७. सुहाना सफर और ये.. (सप्तरंगात) | https://youtu.be/vTnAvikqB_8 |
| ०८. चित्रपट : मधुमती (१९५८) | https://youtu.be/WJBnBi2JLog |
| ०९. संगीतकार सलील चौधरी (५० सुपरहिटस्) | https://youtu.be/2aXVLT8vCc0 |
| १०. संगीतकार सलील चौधरी (सुपरहिटस्) | https://youtu.be/gSBO-VSTKrk |
| ११. लतादीदी व सलील चौधरी (८० सुपरहिटस्)(ऑडिओ) | https://youtu.be/oQuWK_DWnLs |

♥

## 45 : Tere Chehre Me Wo..

## ४५ : तेरे चेहरे में वो जादू है..

'भागने का नाम है जवानी, थम गयी तो ठहरा पानी!..' गवताची काडी दाताखाली चावत कुत्सित हसत हेमा डॅनीला खिजवत होती. डॅनीचे पिचपिचे डोळे अंगार ओकतात, आणि तो तिच्याशी झोंबाझोंबीच करायला लागतो. एका पोरीशी त्याला हातापाई करताना पाहून, नुकताच घोड्यावरून आलेला रणवीर नावाचा शूरवीर (फिरोज खान) टाळ्या वाजवून दाद देतो.. 'हा उपऱ्या कोण?..' (मुंबईहून चाळीतली खोली विकून वसईत ऐसपैस फ्लॅटमध्ये रहायल्या आलेल्यांकडे जसे इथले स्थायिक गावकरी बघतात तशा) जळजळीत नजरेनं बघत डॅनी चाकूच काढतो.. हेमा हस्तक्षेप करत संभाव्य लफडं टाळते. डॅनी धुसफुसत तर हेमा मागे-मागे वळून बघत कबिल्याकडे परतते. रेशमाशी रणवीरची ही पहिली मुलाकात! गावरान रेशमा त्याला जाम आवडते पण डॅनीच्या हातातली हत्यारं बघून तो बहुदा लाळघोटेपणा करत नाही. चुपचाप मदनपुरीशी ओळख करून मस्का मारून कबिल्यात दाखल होतो. डॅनी प्रत्येक वेळी त्याच्यावर गुरगुरतो, वस्सकन ओरडतो आणि हाकलून काढतो.. पण फिरोज खान मात्र चिवटपणे पटवतो-रेशमाला! एकीकडे एडक्यांची झुंज, घोडेस्वारांचा कुठलासा विकृत खेळ, कबिल्याचे रस्म-ओ-रिवाज दाखवत, त्यांच्यातलं प्रेम फुलताना दाखवलंय. फिरोज मध्येच मुंबईत येतो.. स्टोरी भरकटतेय की काय? स्टोरी में ट्विस्ट?.. नही यार! तो परत येतो.. कबिल्याच्या परिसरात पाऊल ठेवताक्षणी तो बेंबीच्या देठापासून नुस्ता कोकलत राहतो.. रेशमा..रेऽऽशमा.. (कुठे उलथलीय ही?) रेऽऽशमा.. फिरोजच्या त्या आवाजानं खरंतर आपले कान किटतात तोच संगीत सुरू होतं.. आणि किशोरकुमार आपल्या गोड आवाजात गाऊ लागतो.

*तेरे चेहरे में वो जादू है, बिन डोर ख़िंचा जाता हूँ,*
*जाना होता है और कहीं, तेरी ओर चला आता हूँ,*
*तेरी ओर चला आता हूँ.. तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ*

'धर्मात्मा' (१९७५)! इंडस्ट्रीतल्या खानावळीत शिजलेली एक लज्जतदार खिचडी. चित्रपट इतिहासातल्या खानावळीत तसे एम. डब्ल्यू. खान ते आजपर्यंतच्या शाहरुख, सैफ अली, आमीर, सलमान.. बरेच खान आपण पाहिलेत. काही पचवलेत तर काही आज आपल्या जिवाभावाचे झालेत. जे वरच्या वर्तुळातले अमुक खान, तमुक खान.. यातलाच हा एक खान-फिरोज खान! 'रिपोर्टर राजू' (१९६२)ने आपली कलाकीर्द सुरू केलेला फिरोज खान काल-परवाच्या 'वेलकम' (२००८)पर्यंत आपल्या चांगल्याच परिचयाचा. तो नुसताच अॅक्टर नाही, डायरेक्टर आणि यशस्वी प्रोड्यूसर सुध्दा आहे. चित्रपट बनविण्यात माहीर. 'फिरोज' या शब्दाचा डिक्शनरीतला अर्थच मुळी मुबारक, कामयाब, सफल.. तो सुपर-स्टार होता असं म्हणण्याचं धाडस कुणी करू शकत नाही पण तो लोकांना आवडायचा. तो बनवायचा ते सगळेच सिनेमे मसालेदार असायचे. पब्लिकला आपल्या खुर्चीत पाय गच्च आवळून कसं बसवता येईल याची नस त्याला बऱ्याचदा सापडलेली. 'बसंत पिक्चर्स' कृत होमी वाडिया निर्मित-दिग्दर्शित 'चार दरवेश' (१९६४) या चित्रपटात काम करताना त्याला बरंच काही शिकायला मिळालं. मुख्य म्हणजे या 'फॅन्टॅसी स्टोरीत' तो सतत कॅमेऱ्यासमोर आहे. या पिक्चरचा निर्मात्याला किती फायदा झाला कोणाला माहीत पण या वाडियासाहेबांच्या टीममधल्या जर्मन तंत्रज्ञांचं कौशल्य मात्र फिरोजला जवळून पहायला मिळालं. तो दिसायचा हॅन्डसम, त्यामुळे त्याने कसदार अभिनय करायलाच हवा अशी जणू अटकळ नसायचीच. त्यामुळे हे साहेब रिहर्सलऐवजी शूटिंग-फ्लोअरवर उंडारताना दिसायचे. पोरीबाळीमध्ये जाम इन्टरेस्ट असायचा पण ते कामानंतर. कामात असताना हळूच कॅमेऱ्याचं प्लेसिंग बघ, अँगल्स काय लावलेत ते अभ्यास, विविध लेन्सचे उपयोग काय असं करता करता त्याच्यात अनाहूतपणे स्पार्क निर्माण होत गेला. डायरेक्टर बनायची खाज ही हर एक नटात असतेच असते. इत्तफाकसे फिरोजमध्ये ती जास्त प्रमाणात होती. 'बहुरानी', 'सफर', 'आदमी और इन्सान', 'उपासना', 'आरजू', 'मेला', 'एक सपेरा एक लुटेरा' इत्यादी चित्रपटातून दहा-एक वर्षे रखडल्यानंतर त्याला बरंच शिकायला मिळालं. 'आदमी और इन्सान' (१९६९) नंतर त्याचा हौसला वाढला होता. या चित्रपटात यश चोप्राची दिग्दर्शनातली सफाई पाहून त्यालाही आपण दिग्दर्शक व्हावं असं वाटू लागलं. ढवळ्याशेजारी पवळ्या बांधला.. च्या चालीवर फिरोजला डायरेक्टर बनण्याचा वाण नाही पण गुण लागला. 'धर्मात्मा'सारखा मसालेदार चित्रपट देऊन त्याने हेच सिध्द केलंय. त्याचं पहिलं पिक्चर 'अपराध' (१९७२) त्याने चक्क जर्मनीत जाऊन शूट केलं. परकीय चलनाचे प्रचंड वांधे असूनही नुसतं आऊट-डोअरचं बजेट पन्नास हजार डॉलर्सवर गेलं होतं. मुमताज पे दिल आ गया था म्हणायचे लोक. त्यातली 'हमारे सीवा तुम्हारे और कितने दीवाने है..', 'तुम मिले प्यार से..' ही दोन्ही गाणी गाजलेली. 'धर्मात्मा' या सिनेमाच्या शूटसाठी मात्र तो अफगाणीस्तानात गेला होता. जाहिद शाह नावाच्या

बादशहाच्या कारकिर्दीत. नेमकं त्याच वेळी अफगाणीस्तान राजकीय बंडानं पेटलं होतं. संपूर्ण देश एका विलक्षण तणावाखाली होता. सरेआम कत्ल, बंडाचा उद्रेक! बादशहाच्या सहकार्यामुळेच फिरोजचं तारू गोते न खाता किनाऱ्याला लागलं. आऊट-डोअरच्या वेळी जबरदस्त तणावाखाली शूटिंग चाले. हेमा, रणजीत, फरीदा, इम्तियाज, सुधीर, मदनपुरी अशा मुख्य कलाकारांबरोबरच शंभरेक ज्युनियर कलावंतांचा ताफा फिरोजसाठी जान की बाजी लगाकर कामात मसरूफ होता. अफगाणातल्या त्या रखरखीत वाळवंटात रखडत होता. 'धर्मात्मा'च्या कथेत तसं काही नावीन्य नव्हतं. हुरळून जाऊन डोक्यावर घेऊन नाचावं असं काही लाजवाब नव्हतं. पण प्रेझेन्टेशन झकास होतं.. धर्मदास (प्रेमनाथ) नावाचा शेठ. मटका, स्मगलिंग आणि जेवढे काही ज्ञात-अज्ञात काळे धंदे आहेत ते सगळं-सगळं करून भागलेला पण नावलौकिक मात्र 'धर्मात्मा'! रणवीर हा त्याचा मुलगा काही कामानिमित्त अफगाणीस्तानात कडमडायला गेलेला असतो. शहरात वळसेदार तब्येतीची रेखा मौजूद असुनही तो गावरान अशा बाळसेदार रेशमावर लट्टू होतो.

*तेरी हीरे जैसी आँखे, आँखों में है लाखों बाते, बातों में रसकी बरसाते, मुझमें प्यारकी प्यास जगाएऽऽ*
*तू जो एक नजर डाले, जी उठे मरनेवाले, लब तेरे अमृत के प्याले, दिल में जिनेकी आस बढाए,*
*चल पडते है तेरे साथ कदम, मैं रोक नही पाता हूँऽऽ, मैं रोक नही पाता हूँ, तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ*

असं म्हणत तिच्याभोवती गोंडा घोळतो. स्टोरी पुढे सरकते. कबिल्याचा सरदारही हेमा-फिरोज संबंधांना हिरवा कंदील दाखवत लग्नाला होकार भरतो. इकडे पांढऱ्या कॉलरने 'धर्मात्मा' बनून राज करणाऱ्या धर्मदासचं एक दिवस बॅडलक खराब होतं. तो कवडीमोल असतानाचे त्याचे हमसफर जीवन आणि सत्येन कप्पू अचानक धर्मदासच्या कोठीत टपकतात. कुठला तरी ॲक्शन-प्लॅन सागतात पण त्यांची डाळ शिजत नाही. आता ते रणजीत-सुधीरला अफगाणीस्तानात पाठवून फिरोजला उडवण्याची सुपारी देतात. अंधेरीहून दादरला जावं इतक्या झटपट ते अफगाणात येतात. थेट हेमा-फिरोजच्या प्रेमालाप करण्याच्या जागी! जीपमध्ये टाईम-बॉम्ब! आता या रणवीरची कवटी कधी फुटतेय आणि आपण मोकळे कधी होतोय याचं टेन्शन दोघांच्या चेहऱ्यावर. हेमा मस्तीत धावत येऊन ड्रायव्हरच्या जागी बसते. निर्वाणीचं काहीसं बोलते. गावरान असूनही सराईतासारखी किल्लीशी चाळा करता करता गाडी स्टार्ट करते. बिनधास्त! आणि...धूमऽऽ! धाड! धडामऽऽ!! खल्लास! रेशमा खल्लास! ऑन-द-स्पॉट! झालं? फिरोज आता रेखासाठी मोकळा...

१९७५ साल तसं बऱ्याच चित्रपटांसाठी लक्षात राहिलं होतं. 'धर्मात्मा' मे महिन्यात लागलेला. मसालेदार असल्याने बऱ्यापैकी चालत होता. पण पुढे ऑगस्टमध्ये 'शोले'ची गर्म हवा होती. 'अलबेला' मराठा मंदिरला रीपिट रनला धुमाकुळ घालत होता. 'जय संतोषी माँ' हा धार्मिक सिनेमा तर रेकॉर्डब्रेक धंदा करत होता., तर स्पर्धेत होते.. 'आँधी', 'अमानुष', 'दीवार', 'सन्यासी', 'मिली', 'खुशबू', 'ज्युली', 'मजबूर', 'दो झूठ', 'रफू चक्कर', 'चोरी मेरा काम', 'कैद', 'दुल्हन', 'खेल खेल में' आणि 'फरार'! हव्या त्या सिनेमाचं तिकिटं न मिळालेलं पब्लिक 'धर्मात्मा'कडे हमखास वळायचं. बलात्कार, खून, बॉम्बस्फोट, फाईटस्, ॲक्शन, इमोशन असा मसाला खच्चून भरलेला 'धर्मात्मा' बऱ्यापैकी चालला तो यामुळेच. फिरोजचं एक मात्र बरंय. त्याला संगीताचा कान आहे. त्याचं हे सिलेक्शन लाजवाब असतं. पब्लिकची नाडी पकडणारं. कल्याणजी-आनंदजींशी त्याचं सॉलिड ट्यूनिंग. त्यांचा सहायक असलेला बाबला हा प्रयोगशील संगीत-संयोजक तर त्याचा खास मित्र. बुजुर्ग गीतकार इंदिवरजींशी त्याचा दोस्ताना. मग काय विचारता? 'धर्मात्मा'चं प्रत्येक गाणं हे खासच जमून आलंय. 'मेरी गलियों से लोगों की...'(लतादीदी-महेंद्र कपूर), 'क्या खूब लगती हो...'(मुकेश-कंचन), 'तुमने किसीसे कभी प्यार किया है...'(मुकेश-कंचन), 'तेरे चेहरे में वो...'(किशोरकुमार), 'गुलशन गुलशन महका है...' (महेंद्र कपूर) अशी सर्वच गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचं पार्श्वसंगीत. 'ऱ्हिदम-किंग' म्हणून तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिराजींनी गौरविला गेलेला 'बाबला' इथे कल्याणजी-आनंदजींच्या वाद्यवृंदात संगीत-संयोजकाची भूमिका पार पाडताना दिसतो. त्याने आपल्यातील कलेचा इथे चांगलाच वापर केलेला आढळतो. चित्रपटाचं 'शीर्षक-संगीत', 'थीम-म्युझिक', 'पठाणी-नृत्यसंगीत', 'कॅब्रे-म्युझिक' तसेच पार्श्वसंगीतातल्या उल्लेखनीय 'थीम्स' तेव्हा प्रसिध्द केलेल्या एल.पी रेकॉर्डस्वर उपलब्ध होत्या. गायिका म्हणून त्याची सुविद्य पत्नी कंचन या सिनेमामुळे चर्चेत आली. या इंडस्ट्रीत पहिला 'की-बोर्ड' म्हणावा ज्याला 'क्ले-व्हायोलिन' म्हणून संबोधायचे ते आणलं या कल्याणजी-आनंदजींनीच. (आठवा हेमंतकुमारजींच्या संगीतातला 'नागीन' (१९५५)! कल्याणजीभाईंचा मुलगा, आमचा परम मित्र आणि संगीतकार विजू शाहने तो आजही तो उत्तम स्थितीत ठेवला आहे. त्याचा तो आपल्या संगीतात-पार्श्वसंगीतात उपयोग करत असताना मी पाहिलंय) 'डिस्को' सर्वप्रथम भारतीय चित्रपटसंगीतात आणला तो या कल्याणजी-आनंदजींनीच असं बुजुर्ग संगीत-संयोजक, वादक अभिमानानं सांगतात. (बिद्दूच्या साथीनं केलेला फिरोज खान कृत 'कुर्बानी' आठवतो ना?) त्याकाळी नवरात्रीतला गरबा ही केवळ गुजराती समाजाची मक्तेदारी असायची. हा गरबा समस्त जनतेनं 'डिस्को-दांडिया'च्या

स्वरूपात कसा खेळायचा हे आमच्या पिढीला शिकवलं असेल तर ते या 'बाबला'नेच. आज दांडियाचं जे स्वरूप तुम्ही पाहत आहात त्याचा जनक आहे तो माझा हा गिरगावातला जिवलग मित्र 'बाबला'! असो! 'तेरे चेहरे में वो जादू है...' हे गाणं किशोरकुमारला दिलंय पण त्यानं ते उछलकूद स्टाइलने न गाता नायक फिरोजच्या इमेजप्रमाणे रोमान्सच्या मूडमध्ये गायलंय. खरं सांगू! ते आधीचं 'रेशमा.. रेऽऽशमा..' असं ओरडणंही संगीतकारांनी किशोरच्याच आवाजात डब करायला हवं होतं. निदान ते खूप सुरेल वाटलं असतं. ('दे दे प्यार देऽऽ..' या गाण्यात 'मीना.. अरे मीनाऽऽ.. आ गया तेरा दीवाना..' अशी ती साद सुरेल वाटते ना तसं!) फिरोज खान इथे अक्षरशः रेकतोय असं वाटतं. गाणं आपल्या खूप खूप आवडीचं आहे, पण गाण्याच्या सुरुवातीचे फिरोजसाहेबांच्या हे रेकण्याचे बत्तीस सेकंद कधी संपतायत असं होतं... फिरोज खान म्हणजे कुणी अभिनय-सम्राट वगैरे नाही तो म्हणजे चिकना चिकना दिसणारा ठोकळाच, पण किशोरकुमारच्या आवाजामुळे तो आणि त्याच्या तोंडचं हे गाणं आपलंच होऊन जातं. गाणं गाजलं. बिनाका गीत मालामध्येही ते वर्षभर ऐकू येत होतं. पण या गाण्याची लोकप्रियता त्या गाण्याला फिल्मफेअर पुरस्कार मिळवून देऊ शकली नाही. त्या वर्षीच्या फिल्मफेअर सोहळ्यामध्ये 'शोले'ला संकलनाचं वगळता एकही महत्त्वाचं अॅवॉर्ड मिळालं नाही तिथे 'धर्मात्मा'ची काय कथा? 'अमानुष'चं 'दिल ऐसा किसी ने मेरा तोडा...' गीतकार इंदिवर आणि गायक किशोरकुमारला अॅवॉर्ड देऊन गेलं. 'ज्युली'साठी संगीतकार राजेश रोशनना गौरविण्यात आलं. 'तेरे चेहरे में वो जादू है...' पारितोषिकपात्र ठरलं नसेल पण किशोरची रोमॅन्टीक गाण्यांची यादी काढायची झाली की हे गाणं खूप वरच्या क्रमांकावर असतं हेच या गाण्याचं यश. क्रेडिट अर्थातच फिरोज, इंदिवरजी, कल्याणजी-आनंदजी, बाबला आणि त्याचे वादक.. तसेच आपला लाडका किशोरकुमार! गाणं आजही आपल्या मनात अढळ स्थान मिळवून आहे..

*जब से तुझको देखा है, देख के ख़ुदा को माना है, मान के दिल ये कहता है, मेरी ख़ुशियों का तू है ख़ज़ानाऽऽ*

फिरोजचा चित्रपट म्हटला की का कोण जाणे, त्यातली 'स्त्री' पात्रं पाहताना मनात उगाचच काही विचार येत राहतात. दिग्दर्शक म्हणून फिरोजच्या सिनेमातली 'स्त्री' आणि इतर दिग्दर्शकांच्या नजरेतून 'स्त्री' कशी असते याची तुलना कराविशी वाटते. चित्रपट हे बहुतांशी प्रेमकथा, सूडकथा वगैरे वगैरे चिक्कार विषयावर बनवले जातात. पण त्यातली नायिका म्हणा किंवा स्त्री पात्र म्हणा.. त्यांचं सिनेमातलं स्थान अतिशय महत्त्वाचं असतंच असतं. स्टोरी कशीही असो पण 'बाई नाचलीच पायजेल..'! (आपल्या दाढीच्या ब्लेड किंवा साबणाच्या जाहिरातीत बाई लागतेच तर सिनेमा म्हटल्यावर ती पाहिजेच पाहिजे!) आपण पाहतो की गुरुदत्त.. यश चोप्रा अशा कित्येकांच्या चित्रपटातली 'स्त्री' खूपच रिस्पेक्टने पेश केलेली आढळते. देव आनंदही. त्याच्या नवकेतन बॅनरच्या सुरुवातीच्या पिक्चरमधल्या नायिका असो की सहनायिका, त्याची पेशकश तशी सोबरच वाटायची. पण 'जॉनी मेरा नाम' (१९७०)पासून त्याचाही संयम सुटला असं म्हणायला हरकत नाही. (हुस्न के लाखो रंग..) मात्र राज कपूरच्या सगळ्याच सिनेमातली 'स्त्री' ही अतिशय वेगळी भासते. थोडीशी बोल्ड, बिनधास्त. आक्रमक!.. 'मेरा नाम जोकर' १९७०मधली ती सिमी गरेवाल! ओ गॉड!.. पण पब्लिक म्हनलं.. लई ग्वाड! फिरोज खानची तर गोष्टच वेगळी. त्याच्या प्रत्येक सिनेमातली 'स्त्री' हा अभ्यासाचा विषय होऊ शकतो. ती बेधडक-बिनधास्त तर असतेच पण मोकळी-ढाकळीही असते. कधी तर ती 'भोग्य' वस्तूच असल्यासारखी वाटते असं अनेक समीक्षकांचं म्हणणं आहे. 'धर्मात्मा'च्या सुरुवातीलाच बलात्कार आहे. फॅमिलीबरोबर हा पिक्चर बघताना थोडी कुचंबणा व्हायची खरी. पण काहीही म्हणा राव.. इथे हेमाला पेश करताना मात्र तो आब राखून असल्याचं जाणवतं. ('कमीने कुत्तेऽऽ मैं तेरा खून पी जाऊँगा..' असं कुणी दरडावलं होतं की काय!) मर्यादा पाळली असावी का?.. ('सपनों का सौदागर'-१९६८ या आपल्या पहिल्या-वहिल्या सिनेमाच्या वेळी तिने चक्क राजकपूरला कंट्रोल केलेलं म्हणता फिरोज म्हणजे किस झाडकी पत्ती..) 'तेरे चेहरे में वो जादू है...' या गाण्यात फिरोजस्टाईल छेडछाड आहे पण त्याला डाव साधता आलेला नाही... ऑफरमध्ये सगळंच मिळत नसतं यार!

*दे दे प्यार की मंजूरी, कर दे कमी मेरी पूरी, तुझसे थोडी भी दूरी, मुझको करती है दीवानाऽऽ*
*पाना तुझको मुश्किल ही सही, पाने को मचल जाता हूँऽऽ पाने को मचल जाता हूँ,*
*तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ बिन डोर खिंचा जाता हूँ, जाना होता है और कहीं, तेरी ओर चला आता हूँ,*
*तेरी ओर चला आता हूँ.. तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ*

♥

## ४५ : तेरे चेहरे में वो जादू है..

चित्रपट : धर्मात्मा (१९७५)
दिग्दर्शक : फिरोज खान
गायक : किशोरकुमार
गीतकार : इंदिवर
संगीत : कल्याणजी-आनंदजी

तेरे चेहरे में वो जादू है, बिन डोर ख़िंचा जाता हूँ,
जाना होता है और कहीं, तेरी ओर चला आता हूँ,
तेरी ओर चला आता हूँ.. तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ

तेरी हीरे जैसी आँखे, आँखों में है लाखों बाते,
बातों में रसकी बरसाते, मुझमें प्यारकी प्यास जगाएऽऽ
तू जो एक नजर डाले, जी उठे मरनेवाले,
लब तेरे अमृत के प्याले, दिल में जिनेकी आस बढाए,
चल पडते है तेरे साथ कदम, मैं रोक नही पाता हूँऽऽ
मैं रोक नही पाता हूँ, तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ

जब से तुझको देखा है, देख के ख़ुदा को माना है,
मान के दिल ये कहता है, मेरी ख़ुशियों का तू है ख़जानाSS
दे दे प्यार की मंजूरी, कर दे कमी मेरी पूरी,
तुझसे थोडी भी दूरी, मुझको करती है दीवानाऽऽ
पाना तुझको मुश्किल ही सही,
पाने को मचल जाता हूँऽऽ पाने को मचल जाता हूँ,
तेरे चेहरे में वो जादू हैऽऽबिन डोर खिंचा जाता हूँ,
जाना होता है और कहीं, तेरी ओर चला आता हूँ,
तेरी ओर चला आता हूँ.. तेरे चेहरे में वो जादू हैऽऽ

♥

या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.

| | |
|---|---|
| १. तेरे चेहरे में वो.. (ऑडिओ) | https://youtu.be/1Ca6tTs60I4 |
| २. तेरे चेहरे में वो.. (व्हिडिओ) | https://youtu.be/p1LFu6sq1ZE |
| ३. तेरे चेहरे में वो..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/mPczdr_ECsc |
| ४. चित्रपट : धर्मात्मा (१९७५) | https://youtu.be/qr-tIj5A5So |
| ५. फिरोजखान (सुपरहिटस्) | https://youtu.be/HRe_hf7CS5g |
| ६. किशोरकुमार (लाईव्ह सादरीकरण) | https://youtu.be/9c0NjQ3tX7I |
| ७. किशोरकुमार (दूरदर्शन -लाईव्ह) | https://youtu.be/FvqvlYR_YIQ |

♥

## 46 : Malyachya Malyamandi..

## ४६ : माळ्याच्या मळ्यामंदी कोण..

अगदी मोजकेच श्रोते होते त्या प्रेक्षागारात. मंचावर तो तरुण तन्मयतेनं गात होता. गजलेची चाल, त्यातला अभिप्रेत असलेला भावार्थ समजून तो नेमका व्यक्त करत होता. त्याला प्रसन्न चेहऱ्याने गाताना पाहून समोरच्या रांगेत बसलेले बुजुर्ग बासरीवादक मधू गाडगीळ भारावूनच गेले. गाणं संपलं. उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ती उत्स्फूर्त दाद सुहास्य वदनानं स्वीकारत त्याने रसिकांना कुर्निसात केला. गाडगीळांना राहवेना. ते तत्परतेने उठून त्याच्याकडे गेले. हस्तांदोलन करत त्याचं अभिनंदन केलं. आपला परिचय देत ते म्हणाले.. ‘छान गातोस! तुझं नाव आणि पत्ता दे.. रामला देईन म्हणतो..’ आता हे राम कोण? सी. रामचंद्र की आणखी कोणी? त्याच्या चेहऱ्यावरचं आश्चर्य पाहून गाडगीळ हसले.. ‘राम म्हणजे रामभाऊ! संगीतकार राम कदम! त्यांना तुझ्याबद्दल सांगेन म्हणतो..’ ‘अच्छा! आभारी आहे हं!..’ त्यानं चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणत कार्ड देऊन त्यांची बोळवण केली. त्याला माहीत होतं. अशा मैफिलीत आणि कार्यक्रमात कौतुक करणारे बरेच येतात. शाबासकी देतात. गोड-गोड बोलतात. आश्वासनं देतात. काहीजण उज्ज्वल भवितव्याविषयी शुभेच्छा देतात. दोन दिवसांनी ते विसरूनही जातात. अंगवळणी पडलं होतं ते. पंधरवडा गेला असेल मध्ये. अचानक एक दिवस एक पत्र आलं. कुणाकडून आलं असेल या उत्सुकतेनं वरचा मायना, मधला मजकूर न वाचता सरळ खालची स्वाक्षरी पाहिली. वळणदार अक्षरात ‘राम कदम’ हे शब्द दिसताच तीनताड उडाला तो बसल्याजागी. त्याचा विश्वासच बसेना. पुनःपुन्हा वाचले ते शब्द. ‘रामSS कदम’! थरथरत्या हातांनी मग त्यानं पत्र वाचायला घेतलं. श्री. जयवंत कुलकर्णी, स.न.वि.वि. माझे स्नेही श्री... पुढचा सगळा मजकूर त्याच्या नसानसात चैतन्य जागविण्यास पुरेसा होता. तो हरखून गेला. त्याच्यातल्या कलावंताला सोन्याचं कोंदण मिळणार होतं. लवकरच..

गोरेगावचा पत्ता शोधत त्यानं गायकवाडांचं घर गाठलं होतं. हे सुप्रसिध्द निर्माते दत्तारामजी गायकवाडांचं घर. (थांब लक्ष्मी कुंकु लावते फेम) रामभाऊ तिथेच होते. सोबत सीटिंग मेंबर्सचा गोतावळा. बिचकतच आत शिरला तो. रामभाऊंना नमस्कार करून त्यानं स्वतःची ओळख करून दिली. क्षणात नूर पालटावा तसा रामभाऊंचा चेहरा खुलला. अगदी आपलेपणाने स्वतःच्या जवळ बसवत जुजबी विचारपूस केली. दत्ताजींशी ओळख करून देत म्हणाले.. ‘हा जयवंत! जयवंत कुलकर्णी! चांगलं गातो बरं का!’ ‘ट्रायलला बोलावलात वाटतं!’ दत्तारामजींनी काहीतरी विचारायचं म्हणून विचारलं. ‘ट्रायलला? छ्याss!! ट्रायल कसली करतोय? रेकॉर्डिंगसाठी बोलावलंय त्याला. आपल्या चित्रपटात त्याला चान्स द्यायचं म्हणतोय..’

मित्रावरचा विश्वास पहा. आपल्या जिगरी दोस्तानं पाठवलंय म्हणता हे नाणं खणखणीतच असणार याचा सार्थ अभिमान त्यांच्या चेहऱ्यावर विलसत होता. ‘गाओ उस्ताद गाओ’! म्हणत फर्माईश झाली. जयवंत गायला. तीच गजल. त्याच नजाकतीत. आता दाद द्यायची पाळी होती दत्तारामजींची. आपल्या ‘वैभव’ या चित्रपटातलं.. ‘नाकात वाकडा नथीचा आकडा..’ हे गाणं हाच गाणार हे तिथल्या तिथे नक्की केलं. आपल्या चालीबरहुकुम त्याच बैठकीत गाऊनही घेतलं जयवंतकडून. सगळे खूष होते. लवकरच रेकॉर्डिंग करण्याचं निश्चित झालं. आठवडा सरला असेल. अचानक रामभाऊंकडून सांगावा आला.. पुण्याला जायचंय! रिहर्सल्ससाठी! कमाल आहे. निवड तर झालेली. जे गायलो ती रिहर्सल नव्हती की काय? पुन्हा पुण्याला? कशासाठी? शंकेची पाल चुकचुकली मनात. प्रवासात रामभाऊ इतर गप्पांबरोबर पार्श्वगायनासाठी उपयुक्त असे सल्ले, सूचना देत होते खरे पण आपले जयवंतराव मनातून धास्तावलेले. नवी पेठ, पुणे इथल्या मुक्कामी पोहोचेपर्यंत मनात एकच शंका. आपल्याला बोलावलंय ते रिहर्सल्सला. कुणासाठी तरी डमी आवाज म्हणून बोलावलं नसेल ना?! प्रत्यक्ष रेकॉर्डिंगला कुणीतरी नामवंत गायक घ्यायचं ठरलं असणार.. रिहर्सल्स सुरू झाल्या. प्रभात कंपनीचे टॉपचे म्हणावे असे वादक होते तिथं. गाणं नीट आकाराला येत होतं. जयवंत मनापासून गात होते. रामभाऊंचं समाधान होताच वादकांसह तो सर्व लवाजमा मुंबई मुक्कामी डेरेदाखल झाला. ध्वनिमुद्रणाची तारीख ठरली. जयवंतराव स्टुडिओत पोहोचले खरे पण त्यांची नजर शोधत होती ‘त्या’ नामचिन गायकाला. गाण्यासाठी रिहर्सल केली मी, जी तोड मेहनत केली मी, आणि ते साहेब आता आयतं येऊन गाणं गाणार! व्वा! आपलं नशीबच फुटकं.. ‘मेहनत करे मुर्गा.. अंडा खाए फकीर’ ही म्हण उगीचच मनावर आघात करत होती. रामभाऊंच्या थोड्याच वेळात लक्षात आलं ते. त्यांनी प्रेमभरानं थोपटलं त्यांच्या पाठीवर.. ‘कुणाला शोधतोयस? मी तुला पुण्याला रिहर्सल्सना नेलं म्हणून धास्तावलेलास ना! मुद्दाम केलेलं मी ते. तुझ्याच भल्यासाठी! तुला पार्श्वगायनातल्या सगळ्या खाचाखोचा समजाव्या, गाणं नीट तयार व्हावं आणि तुझा आत्मविश्वास वाढवणं गरजेचं होतं. अरे, माझ्या वाद्यवृंदात प्रभात कंपनीचे हे टॉपचे वादक असतात. माईकवर कुणीही उभा राहिला तरी प्रत्येक टेक-रिटेक्सनंतर भल्याभल्यांना घाम फुटलेला पाहतो आम्ही. तू तर नवखा. मुख्य म्हणजे या गाण्यात तुझ्यासोबत

सुप्रसिध्द गायिका उषा (मंगेशकर) असणार आहेत! तुला इथे डायरेक्ट माईकवर घेतला असता तर गडबडून गेला असतास, बुजला असतास तू.. गाणं रेकॉर्ड होताना जर असा वेळकाढूपणा झाला तर खूपच मनःस्ताप होतो. स्टुडिओचं भाडं वाढतं ते वेगळंच! तू त्यांच्यात रूळावास, त्यांना परिचित व्हावास म्हणून तुला पुण्याला नेलेलं... आता बघ कसा झक्कास गाशील ते!... बिनधास्त, बेधडक!'

जयवंतरावांना आपण पार्श्वगायक होऊ असं अजिबात वाटलं नव्हतं. त्यांचं मन तबल्यात जास्त रमायचं. व्यास संगीत विद्यालयात तबला शिकायचे ते. आईमुळे भक्तिमार्गाची ओढ लागलेली. पोवाड्यांचीही. आईला पोवाडे पाठ असल्याने ती त्यांना साभिनय म्हणायला लावायची. खरं तर आपण शाहीर व्हावं असं वाटायचं जयवंतरावांना. सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंती, शाळांचे गॅदरिंग इतकंच मर्यादित क्षेत्र होतं. शाळेच्या एका कार्यक्रमात गाताना पु.ल.देशपांडेसाहेबांनी ऐकलं, कौतुक केलं.. 'छान गातोस.. तुझ्या आवाजाला 'झार' आहे बरं! गाण्याचा अभ्यास कर, रियाज कर.. नाव काढशील तू!' जयवंतरावांच्या सुदैवाने त्यांना संगीतकार वसंत देसाईजींचा सहवास लाभला. नंतर लक्ष्मणराव देवासकरांकडे संगीताचं शिक्षणही मिळू लागलं. छोटे-मोठे कार्यक्रम करता-करता माणसा-माणसांचं निरिक्षण करायची सवय जडली आणि त्याचाच परिणाम म्हणून की काय आपल्या आवाजात अभिनय, भावनेचा आविष्कार दाखवण्याचं कसबही गवसलं. जयवंतराव संगीतकार राम कदमांच्या हातात पडताच त्यांच्यातल्या गायकीच्या कक्षा रूंदावल्या.

'सोंगाड्या' (१९७१) या दादा कोंडकेंच्या चित्रपटात तुझा 'प्ले-बॅक' असणार आहे ही गोड बातमी जेव्हा रामभाऊंनी सांगितली तेव्हा जयवंतरावांचा आनंद गगनात मावेना. राज कपूरसाठी जसा मुकेश, शम्मी कपूर-दिलीपकुमारसाठी जसा रफी, तसा आपल्या दादांसाठी त्यांच्या पहिल्या सिनेमापासूनच तुझाच आवाज असणार आहे असं आश्वासक सांगितलं. खूष झाले जयवंतराव. रामभाऊंनी दादांशी ओळख करून दिली. गाण्यासाठी सीटिंग्ज होऊ लागल्या. दादांनी काही गाणी स्वतः लिहिलेली होती, तर काही वसंत सबनीसांची होती. दादा स्वतः चाल कशी असायला हवी याचा आराखडा देत. प्रसंगही रंगवून सांगत. रामभाऊ गाण्यात कलाकुसर करण्यात गुंग व्हायचे. जयवंतराव गाणं बनताना त्याचे सगळे टप्पे प्रत्यक्ष पहायचे. 'विच्छा माझी पुरी करा' या सुपर-फास्ट वगनाट्यातले दादा आणि सिनेमा बनवणारे दादा याचा चांगलाच अभ्यास करायला मिळाला जयवंतरावांना. त्यांची बोलण्याची ढब, कोट्या करण्याची सवय जयवंतराव निरखून पहायचे. स्टडी करायचे. 'सोंगाड्या' हा दादांचा चित्रपट! सबकुछ दादा! चित्रपटाचा ढाँचा जणू भगवानदादांच्या 'अलबेला'सारखाच. सिनेमातला तो प्रसंग आठवतो? रात्री तमाशा पाहून आलेला नायक सकाळी नांगर घेऊन शेतात येताच तिथलं उभं बुजगावणं त्याला नर्तकीसारखंच वाटतं. त्याच्या दिलाची धडकन असलेल्या उषासारखं वाटतं. वाऱ्याच्या झोताबरोबर बुजगावण्याचं 'ते' फिरणं उषाने घेतलेल्या गिरकीसारखं वाटतं. तो वेडावतो. त्याला त्याच्या मनातली 'ती' आठवते. आपल्या जवळच ती उभी आहे असं भासतं. तो त्या बुजगावण्याच्या जवळ येतो. जणू आपल्या प्रेयसीच्याच कानात कुजबुजावं तसं पुटपुटतो...

*'तो' : माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..*
*'ती' : राखन करते मी रावजी.. रावजी, हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी...*

'सोंगाड्या' या दादांनी निर्मिलेल्या पहिल्याच चित्रपटाला लोकांनी डोक्यावर घेतलं. गाणी तुफान चालली. दादांनी लिहिलेली आणि जयवंतरावांसोबत उषाताई असलेली युगलगीतं होती.. 'माळ्याच्या मळ्यामंदी..' आणि 'काय गं सखू..'! वसंत सबनीसांची तीन गाणी होती.. 'राया मला पावसात नेऊ नका..' (पुष्पा पागधरे), 'गेला सोडुनि मजसी कान्हा..' (सुमनताई कल्याणपूर), 'राया चला घोड्यावरती बसू..' (उषाताई व कोरस)! तर जगदीश खेबुडकरांचं 'बीबं घ्या बीबं..' (कृष्णा कल्ले कोरससह)! गाणी सगळीकडे वाजत होती. चित्रपटही गाजला. सुपर-हिट झाला. दादा कोंडके सुपर-स्टार झाले आणि त्यांचा 'आवाज' असलेल्या जयवंत कुलकर्णींचं नाव इंडस्ट्रीत अदबीनं घेतलं जाऊ लागलं. त्यांना आता इतरही गाणी गाण्याची संधी मिळत गेली. 'ही चाल तुरुतुरु..', 'मनाच्या धुंदीत लहरीत..', 'निळे गगन निळी धरा..', 'मी तर आहे मस्त कलंदर..', 'सावध हरिणी सावध गं..', 'लावा भांड्याला कल्हई..', 'आई तुझं लेकरू..', 'ही दुनिया हाय एक जत्रा..' अशी अनेक गाणी गायला मिळाली. 'सोंगाड्या' (१९७१) नंतर दादांचेच 'एकटा जीव सदाशिव' (१९७२), 'आंधळा मारतोय डोळा' (१९७३), 'पांडू हवालदार' (१९७५) मिळाले होते. सगळीच गाणी सुपर-डुपर हिट! १९७१ ते १९७५ हा काळ जयवंतरावांसाठी तर खूपच सुखद होता. बादशाहत होती त्यांची. 'तुमचं आमच जमलं' (१९७६)च्या वेळी नक्की काय घडलं कुणास ठाऊक. दादांच्या या चित्रपटात जयवंतरावांना रिप्लेस केलं ते महेंद्र कपूरजींनी. संगीत होतं राम-लक्ष्मणजींचं. यातली महेंद्र कपूरजींनी गायलेली 'अंजनीच्या सूता..', 'माझं माझं म्हणीत होता..', 'चंदनाच्या पाटावर..', 'जरा थांब गं पोरी..' ही गाणी लोकांना फारच आवडली. त्यातली 'आल्या आल्या जाऊ नका..',

‘झाल्या तिन्ही सांजा..’ ही उषाताईंची सोलोजही लोकप्रिय झाली. दादांनी आता चित्रपटातला आपला आवाज म्हणून महेंद्र कपूरजींच्या नावावर शिक्कामोर्तब केलं. जयवंतराव ‘आऊट’! पुढे दादांनी खूप पिक्चर्स बनवले पण त्यात गायक जयवंतराव नव्हते. मी याबद्दल जयवंतरावांना कित्येकदा खोदून-खोदून विचारलं, पण त्यांनी कारण सांगण्यास नकार दिला. दादा कोंडके साहेबांनी त्यांना आपल्या टीममधून बाहेर का बसवलं याचं उत्तर त्यांच्याकडे नव्हतं. म्हणाले की ‘हा दादांचा प्रॉब्लेम नव्हता. ते माझ्याशी चांगले वागायचे. पण गाण्यासाठी बोलवायचं बंद केलं होतं..’ एवढंच माफक बोलले. संगीतकारांनी राजकारण केलं म्हणावं तर आपले प्रभाकर जोग, राम-लक्ष्मण तसल्या फंदात कधीच पडले नाहीत हे सर्वश्रुतच आहे. महेंद्र कपूरजींनाही त्यांच्या मुलाखतीत हाच प्रश्न विचारलेला मी. ‘अबोल झालीस का साजणी..’, ‘हे चिंचेचे झाड दिसे मज..’, ‘मधू इथे अन् चंद्र तिथे..’, ‘स्वप्नात पाहिले जे ते रूप..’, ‘सूर तेच छेडिता..’, ‘सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला..’, ‘रात्रीस खेळ चाले..’ असली एकापेक्षा एक सरस गाणी गाता गाता एकदम दादांच्या सिनेमाकडे कसे काय वळलात बुवा? ‘उन्होने बुलाया, मैं चला गया..’ एवढं सिंपल उत्तर दिलं त्यांनी. अगदी प्रांजळपणे! महेंद्र कपूरजी (पापाजी) सरळसोट स्वभावाचे, अतिशय सालस आणि प्रेमळही. म्हणजे हा प्रॉब्लेम पापाजींचा नव्हता, दादांचा नव्हता, संगीतकारांचाही नव्हता मग कुणाच्या धमकीवजा सूचनेने जयवंतरावांना सक्तीच्या विश्रांतीवर धाडलं गेलं असेल? नक्की कोण? कोणतं घराणं? त्यांची प्रगती कुणाच्या डोळ्यात खुपत होती का? कोण असेल या मागे? विजय कोंडकेजी माझे खास परिचयाचे पण त्यांनीही काही सांगण्यास नकार दिला. अमुक जणांना विचारलं तर या प्रश्नाचं उत्तर मिळेलही पण ते व्यक्त करायचं धाडस जयवंतरावांकडे नव्हतं तर आपण काय कपाळ बडवणार? खैर! नियतीनेच आपल्याशी पाठशिवणीचा खेळ खेळला, असं ते म्हणत. ते निराशेच्या गर्तेत गेले. उदास असायचे पण कुणाबद्दल कटू शब्द बोलायचे नाहीत. त्यांचं मन गाण्यात रमावं म्हणून त्यांच्या गाण्यांच्या जेव्हा-जेव्हा व्हर्शनस् केल्या तेव्हा त्यांना आम्ही सन्मानानं बोलवायचो. पण आपण एकेकाळी शहेनशाह होतो असा माज त्यांच्या वागण्यात कधीच आढळला नाही. रामभाऊंमुळे मी घडलो, दादांमुळे माझं नाव झालं या गोष्टी ते शेवटच्या श्वासापर्यंत सांगत असायचे. पण.. आम्हा रसिकांना मात्र खंत वाटते की त्यांचीच नेमकी पिछेहाट का व्हावी? आपल्या मराठी माणसाच्या कर्तृत्वाला ‘वेग’ यायला हवा म्हणून तो उतारावरच ढकलला गेला पाहिजे का?.. तोही मराठमोळ्या हातांनी?..

‘माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी?’ नक्की कोण? सांगा पाहू? आम्ही नाही..जा ऽऽ! मी सांगणार नाही.. हा गृहपाठ तुमचा तुम्ही करायचाय.

♥

या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व ‘ऑडिओ’, ‘व्हिडिओ आणि कराओके’ यांच्या ‘यू-ट्युब’ लिंक्स.

१. माळ्याच्या मळ्यामध्ये कोण.. (ऑडिओ) https://youtu.be/9LZEpcgSdWc

२. माळ्याच्या मळ्यामध्ये कोण.. (व्हिडिओ) https://youtu.be/qbN4JU-ZV1o

३. माळ्याच्या मळ्यामध्ये कोण..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/8TS-qxOl4XU

४. दादा कोंडके (सुपरहिटस्) https://youtu.be/1ZyKxhCGizg

५. उषा मंगेशकर (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/373Yb49G0l4

६. उषा मंगेशकर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/VD0kM1kKPZQ

७. जयवंत कुलकर्णी (सुपरहिटस् - प्ले-लिस्ट)

https://www.youtube.com/playlist?list=PLYeGk45nneuvxTtjIMbw1eSFDxZdIR9JT

♥

## ४६ : माळ्याच्या मळ्यामंदी कोण..

चित्रपट : सोंगाड्या (१९७१)
निर्माता/दिग्दर्शक : दादा कोंडके
गायक : जयवंत कुलकर्णी, उषा मंगेशकर
गीतकार : दादा कोंडके
संगीत : राम कदम

'तो' : माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..
'ती' : राखन करते मी रावजी..

'तो' : माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..
'ती' : राखन करते मी रावजी..
'तो' : एऽऽ माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..
'ती' : राखन करते मी रावजीऽऽ
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी ।।धृ।।

'ती' : औंदाचं गं वरीस बाई मी, सोळावं गाठलं गं..
चोळी दाटली अंगाला बाई, कापड का फाटलं गं..
काळीज माझं धडधड करी, उडते पापणी वरचेवरी
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी - २
'तो' : नार गोमटी, तू देखणी, ठुसका बांधा ठसला मनी - २
फुलराणी, जीव माझा साजणी गं जडला तुझ्यावरी - २
'ती' : रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी - २
'तो' : माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..
'ती' : वांगी तोडते मी रावजी..
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी - २ ।।१।।

'ती' : गोऱ्या गालावरी गं माझ्या, लाली लागली दिसू गं,
आंघोळीला बसले, माझं मलाच येई हसू गंऽऽ
पदर राहिना खांद्यावरी, पिसाट वारं भरलं उरी,
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी - २
'तो' : ए.. शुक्राची गं तू चांदणी, लाजू नको गं नाही कुणी- २
मंजुळा, जीव तुझ्यावर खुळा गं झाला खरोखरी - २
'तो' : माळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी..
'ती' : वांगी तोडते मी रावजी..
रावजी हात नका लाऊजी, पाहिल कुणीतरी.. ।।२।।

♥

## 47 : Ae Mere Dil Kahi Aur Chal..

## ४७ : ऐ मेरे दिल कहीं और चल...

'बदतमीज! क्या समझते हो अपने आपको? तीन महिने तुला सतत निरोप धाडतोय.. तू स्वतःला सैगलचा बाप समजतोस की काय? आपल्याच मस्तीत? हाँ!.. बैठ यहाँपर.. हे घे गाणं!' एरवी शांत वाटणाऱ्या अनिल विश्वासजींचा रुद्रावतार पाहून हातपायच गळाले होते तलतचे. खरं तर त्याला सगळेच निरोप मिळालेले, पण तोच जाम टरकून होता अनिलजींना. ते अतिशय मोठे संगीतकार आहेत ही आदरयुक्त भीती. टाळाटाळ करीत होता. चार निरोपांनंतर मात्र तो अनिलजींच्या घरी पोहोचला होता. तेव्हा वांद्र्याला जब्बार हुसेनकडे तलत रहायचा. नितीन बोसचा सहायक असलेल्या या जब्बार हुसेननेच निरोप आणलेले. अनिलजींच्या दादरच्या घरी पाऊल ठेवताच क्षणी अशा फायरींगला सुरुवात झाली होती. तलत मान खाली घालून ते बोल निमूटपणे झेलत होता. वादक मंडळींच्या गराड्यात बसलेल्या अनिलजींनी त्याची बिनपाण्याने केली..
'गुस्ताखी माफ अनिलजी.. मुझे लगा.. आप पसंत नही करेंगे मेरी आवाजको.. आप बुजुर्ग..'
'अबतक इतने गाने गा चुके हो, फिर भी डरते हो? अब आवाज की पहचान कैसी? जिन्होंने नही पहचाना वो बेवकूफ! बैठ आराम से! मजरूहजी का ये कलाम देख!'

'आरजू' (१९४९) या दिलीपकुमार, कामिनी कौशल, प्रेम धवन, शशिकला आणि गोप अभिनीत चित्रपटासाठी अनिलदांनी गाणं दिलं.. खास तलतसाठी. 'ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल..' तालिमी सुरू झाल्या.. दोनच दिवसांनी स्टुडिओत बोलावलं. पुन्हा रिहर्सल्स! चार-पाच 'टेक' होऊनही गाणं नीट जमेना. दिलीपकुमारही हजर होता तिथे. तलत जाम टरकलेला. अनिलदांनी मोठ्या मनानं समजून घेतलं. पंधरा दिवसांच्या गॅपनंतर पुन्हा बोलावून घेतलं. पहिलाच 'टेक' ओके झाला. आरजूचं हे गाणं लोकप्रिय झालं. चित्रपटसृष्टीला तलत महमूद हा एक मृदू ऋजुता लाभलेला गायक मिळाला.

दिलीपकुमारच्या आधीच्या चित्रपटातून तलत हाच त्याचा गाता गळा म्हणून जनसामान्यात एक प्रतिमा निर्माण झाली. बऱ्याच सिनेमात तो तसाच मनाला भावला होता. गंमत आठवते एका गाण्याची. 'मदहोश' (१९५१) हे त्या चित्रपटाचं नाव. नायिका मीनाकुमारी होती बहुतेक. 'मेरी याद में तुम ना आँसू बहाना..' हे गाणं दिलीपकुमारवर चित्रित झालंय असं चॅलेंज लावलेलं एकानं. चॅलेंज फुसकं होतं. नुसतं गाणं ऐकून हीरो कोण असणार वगैरे आडाखे बांधणं फिजूल होतं. गाण्याचं सादरीकरण मदनमोहनजींचं होतं. गाण्यातले पहलू पाहता ते दिलीपकुमारवरच पिक्चराईज झालं असावं असं निदान प्रथमदर्शनी तरी वाटत होतं. मध्ये बरेच दिवस गेले. आमचा एक मित्र, एक दिवस बातमी घेऊन आलेला की ते गाणं मनहर देसाई नामक कुणा ठोकळ्या नटावर चित्रित झालंय. आता बोला! 'अंधे जहान के अंधे रास्ते..' (पतिता -१९५३) चक्क विनोदवीर आगावर आणि गजल शैलीतलं 'ये हवा ये रात ये चाँदनी..' (संगदिल-१९५२) असलं खुबसूरत गाणं अळुचं फतफतं म्हणावं अशा शम्मी नामक नटीला उद्देशून असावं यासारखा दैवदुर्विलास तो कोणता? पण तलतचा आवाज एवढी एकच गोष्ट मनाला समाधान देणारी होती. तलत महमूद संगीतकार मदनमोहन आणि सी. रामचंद्रजींकडे जेवढं गायला त्या तुलनेत शंकर-जयकिशनजींकडे तो खूप कमी गाताना दिसला. दिलीपकुमारचा 'दाग' (१९५२) तुम्हाला आठवतच असेल. १९५४ साली पहिल्या-वहिल्या फिल्मफेअर ॲवॉर्ड नाईटमध्ये दिलीपकुमार बेस्ट ॲक्टर म्हणून गौरवला गेला होता, तो याच 'दाग'साठी. 'प्रीत ये कैसी बोल रे दुनिया..' आणि 'काहे को देर लगाई रे..' ही लतादीदींची गाणी सरस होती. पण आता याक्षणी तलत महमूद आणि लतादीदीने स्वतंत्रपणे गायलेलं टॅन्डम-साँग आठवतंय. हे गाणं आठवायचं अशासाठी की आज साठ वर्षे सरली तरीही ते आपणा सर्वांना सुपरिचित आहे..

*ऐ मेरे दिल कहीं और चल.. ग़म की दुनिया से दिल भर गया..*
*ढुंढ ले अब कोई घर नया.. ऐ मेरे दिल कहीं और चल..*

शैलेंद्रचे बोल त्याला शंकर-जयकिशनजींची सुरावट! तलतजींचा आवाज इथे बराचसा खुललेला. गाण्याचं संगीत-संयोजन तत्कालीन गाण्यांपेक्षा थोडंसं मॉडर्न. खुलावट असलेलं ऑर्केस्ट्रेशन. पण तलतचा कंपनयुक्त आवाज त्यात इतका चपखलपणे बसलेला की गाणं आपल्याला खूपच समाधान देतं. आपल्या गायकीची सुरुवात करणारे जवळजवळ सर्वच गायक कुंदनलाल सैगलच्या स्टाईलने गायचे. तलतही त्याला अपवाद नव्हते. महंमद रफी आणि किशोरकुमारने लगेचच ती कोंडी फोडली. पण तलतचा आवाज कंपनयुक्तच राहिला. तो कंपनयुक्त आहे, त्रासदायक आहे अशी बोचरी टीका लोक करायला लागले. तलतना अपराधी असल्यागत वाटायचं. नर्व्हस व्हायचे आयत्या वेळी. गाण्याचं रेकॉर्डिंग होताना हे दडपण लगेचच जाणवायचं असे बुजुर्ग

वादक/संगीतकार सांगतात. देव आनंद 'आराम' (१९५१)चा नायक होता. एका पार्टीमध्ये तलत महमूद गातो असा चित्रपटात एक सीन होता. अनिलदांचं संगीत होतं. तलत गायला उभे राहिले. चक्क पाच रीटेक झाले. संगीतकार अनिलदांचं समाधान होईना. बिचारे तलत आवाजातल्या कंपनामुळे खूपच डिवचले गेल्याने कंपनं टाळून गायचा प्रयत्न करत होते. पण वेगळ्या स्टाईलने सरळसोट गाणं जमतच नव्हतं. 'ये क्या हुआ है तुम्हें? भावना ओतून गा.. कविता वाचतो तसं नकोय मेरे लाल.. चल.. वन-टू..' पुन्हा तसंच! जाम चिडले अनिलदा. साधी-सोपी चाल होती. ताना-हरकती नसतानाही हे महाशय सरळसोट गाण्याच्या प्रयत्नात अक्षरशः चाचपडत होते. एकीकडे स्टुडिओचं भाडं वाढत होतंच वर वादकही कंटाळलेले. 'ये क्या कर रहे हो? ये गाना तुमको गाना है या नही? क्यूँ ऐसा करते हो?..' अनिलदा रागाने थरथरत होते. मारायलाच धावले.. 'मैं.. मैं..लोग कहते है के मेरी आवाज..' त्याचं वाक्य मध्येच तोडत म्हणाले.. 'भाड में गये वो लोग.. तुम्हारी आवाज थरथराती है यहीं ना? तोच आवाज हवाय इथं. सरळसोट गाणारे चिक्कार आहेत. आवाजात ते कंपन आहे म्हणून तू 'तलत' आहेस. सरळ गायलास तर प्रत्येक गल्लीत अनेक 'गलत' मिळतील आपल्याला. तुझ्या आवाजात, तुझ्या स्टाईलनेच गा.. समझे!' या कारदार स्टुडिओच्या भिंती पडून आपण गाडलो गेलो तर उत्तम, असा विचार करत तलत पुन्हा माईकवर. गाणं रेकॉर्ड झालं. अगदी व्यवस्थित. 'शुक्रिया शुक्रिया, ऐ प्यार तेरा शुक्रिया..' तलत महमूदजींनी अनिलदांचं म्हणणं प्रमाण मानून आपल्या मूळ स्टाईलने गायला सुरुवात केली. वर्षाभरातच 'ऐ मेरे दिल कहीं और चल.. ग़म की दुनिया से दिल भर गया..' हे गाणं रेकॉर्ड झालं आहे. शंकर-जयकिशनजींनी संगीतबध्द केलेल्या दाग (१९५२) या दिलीपकुमार, निम्मी, उषा किरण, ललिता पवार अभिनीत चित्रपटासाठी. तलत इथे अगदी मनःपूर्वक गायले आहेत. आपला ॲसेट असलेल्या कंपनासह. दिलीपकुमारच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेलसं.. गाण्याचं कडवं नुसतं वाचतानाही चित्रपटातली सिच्युएशन नेमकी काय असेल याचं चित्र बंद डोळ्यांसमोरही आपसुकच साकारतं..

*चार आँसू कोई रो दिया, फेर के मुँह कोई चल दिया,*
*रुक रहा था किसी का जहाँ, देखती रह गयी ये जमीं*
*चूप रहा बेरहम आसमाँ, ऐ मेरे दिल कहीं और चल..*

दोन कडव्यांचं गाणं पण दिल खोल के गायलेत तलत महमूद.. खरं सांगू? तुमच्यासारखाच मीही तलत महमूदजींचा एक चाहता आहे. त्यांची सगळीच गाणी मला किंवा माझ्या पिढीला ठाऊक नाहीयत. संग्रहात नसतील पण जी माहीत आहेत, जी सतत कानावर पडली, आवडली तितक्या गाण्यांमधून तलत महमूद आम्हाला भावले. त्या मोजक्याच गाण्यांवर आपण दिलोजानसे प्रेम केलंय. महंमद रफीसारखी रेंज नाही त्यांच्या आवाजात. मुकेशसारखं अनुनासिक नाही गात की हेमंतदांसारखा रसगुल्ल्याचा गोडवा. किशोरसारखा हरहुन्नरीपणा तर औषधालाही नाही सापडणार. फक्त एक कंपन. आपल्या प्रेयसीच्या पहिल्या स्पर्शासारखं. रसरशीत-उबदार-जिवाभावाचं. त्यांचं गाणं ही सामान्य माणसाची सहजप्रवृत्ती वाटावी इतकं सोपं. आवाजाला मर्यादा आहेत हे कबूल! पण शहद की मिठास आणि दिल का दर्द याचं अजब रसायन होतं तलतच्या आवाजात. प्रेयसीकडे आपलं प्रेम पहिल्यांदा व्यक्त करताना जी अनुभूती मिळते तीच प्रचिती तुम्हाला तलतचं प्रत्येक गाणं ऐकताना येते. आपल्या मुलायम रेशमी आवाजाची मोहिनी रसिकांवर घालणारा सैगलजींनंतरचा हा दुसरा जादुगार. पराकोटीच्या मधाळ आवाजाचा शहेनशाह. सनबीम ॲपार्टमेंटमधल्या सहाव्या माळ्यावरच्या तलतजींच्या घरात मी बसलोय. मखमली आवाजाची एक गजल आपल्याशी साक्षात गप्पा मारतेय ही कल्पनाच ऊबदार वाटते की नाही? तलतजी बोलत राहतात. मध्येच त्यांच्या मदतीला असतो त्यांचा संगीतकार मुलगा खालीद महमूद. त्यांची ही मुलाकात मग आयुष्याचा एक यादगार हिस्सा बनून जाते.

१९६० पर्यंतच्या दशकात शम्मी कपूरने रफीच्या आवाजात 'याऽऽहू' अशी आरोळी ठोकून नवा ट्रेंड आणेपर्यंत तलत चांगलेच बहरले होते. गजल आणि युगलगीतं आपल्या मखमली आवाजाने सजवत होते. दबदबा होता त्यांचा त्याकाळी. सहज गुणगुणता येतील अशी त्यांची कित्येक गाणी रसिकांचं भावविश्व फुलवत राहिली. व्यक्तिमत्त्व रुबाबदार असल्याने त्यांना अभिनय करण्याचीही संधी मिळालेली. डाकबाबू, वारीस, रफ्तार, दिवाली की रात, एक गाँव की कहानी, लाला रुख़, मालिक, सोने की चिडियाँ.. असे तेरा चित्रपट! दिलीपकुमार ते शशी कपूरपर्यंतच्या अनेक नायकांसाठी उसना आवाज दिला. दिलीपकुमार (दाग), देव आनंद (पतिता), अशोककुमार (एक साल), राज कपूर (आशियाना), प्रदीपकुमार (सुबह का तारा), शम्मी कपूर (लैला मजनू), भारत भूषण (मिर्झा ग़ालिब, जहाँ आरा), करण दिवाण (तीन बत्ती चार रास्ता), सुनील दत्त (सुजाता), शेखर (दो राहा), चेतन आनंद (किनारे किनारे), गुरुदत्त (बाज), नासिर खान (नाजनीन), व्ही. शांताराम (परछाई), प्रेमनाथ (बुझदिल), महिपाल (रंगीला राजा), मनोजकुमार (रेशमी रुमाल), शशी कपूर (प्रेमपत्र) अशा चित्रपटातून गायलेली गाणी हा आपल्या सर्वांसाठी एक अनमोल ठेवा आहे. त्यांच्या खात्यावर काही मराठी गाणीही आहेत. अरुण दाते यांना मराठीतले तलत महमूद म्हणतात खरे पण

त्यांच्या नावावर एकही मराठी सिनेमा नाहीय. तलतजी मात्र ‘मोलकरीण’ या चित्रपटात वसंत देसाईजींच्या संगीत-दिग्दर्शनात आशाताईंबरोबर एक मस्तच युगलगीत गायले आहेत, जे आजही ऐकत राहावसं वाटतं. ‘हसले आधि कुणी, तू का मी?..’ गाण्याचे बोल चक्क इंग्रजीत लिहून घेऊनही त्यांनी आशाताईंच्या साथीनं या गाण्यात जान ओतली आहे. ‘पुत्र व्हावा ऐसा’ या चित्रपटातल्या ‘यश हे अमृत झाले’ (गीत : पी.सावळाराम, संगीत : वसंत प्रभू) या गाण्याला शासनाचा १९६१साली सुरु झालेला पहिला पुरस्कार मिळाला होता. तलतजींची ‘घे झाकून मुख हे चंद्रमुखी..’, ‘जेव्हा तुला मी पाहिले..’, ‘ना खंत ना खेद..’ ही मराठी गाणीही अनेक रसिकांच्या स्मरणात आहेत. तलतजींना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. मध्यंतरी त्यांना नौशाद पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही ‘पद्मभूषण’ देऊन त्यांचा गौरव केला आहे. १९८५ साली संगीतकार चित्रगुप्त यांनी ‘वली-ए-आझम’साठी तलतना पाचारण केलं होतं.. हेच गाणं त्यांचं अखेरचं चित्रपटगीत ठरलं. ‘मेरी शरीक-ए-सफर तेरा ख़ुदा हाफिज..’ असं म्हणत जणू फिल्मइंडस्ट्रीचा निरोपच घेतला. आजच्या संगीताच्या एकंदर वाटचालीकडे ते तटस्थपणे पाहत असायचे. चित्रपटसृष्टीतल्या आकाशात कलेकलेनं वर चढत जाणारा हा चाँद आता ढळला होता… १९६४च्या ‘जहाँ-आरा’पर्यंत रुपेरी पडद्यावर आपल्या वेगळ्या आवाजाची जादुगरी करणारा हा स्वर हळुहळू अस्ताला गेला. राजकारण वगैरे काही नाही. मखमली आवाजासाठी गाणीच बनणं बंद झालं, तर तलतजी तरी काय करणार? चित्रपटसंगीताच्या कन्सेप्टच बदलून गेल्या होत्या. तलतजींनी जणू पळ काढला. घरी आराम करणं पसंत केलं. रफीनं ‘याऽऽहू’ अशी आरोळी मारताच तलतना पळ काढण्यास उद्युक्त केलं, तसंच किशोरने आराधनाद्वारे ‘रूप तेरा मस्ताना..’ म्हणत रफीला विश्रांतीवर धाडलं. शेवटी नियतीचा खेळ तो. पण तलतजी समाधानी होते. अक्षरशः मोरपंखी आयुष्य जगायला मिळालं होतं. गायकांमध्ये ते एकमेव असे की जे स्वतःहून निवृत्त झाले. वयोमानानं या जगाचाही निरोप घेतला. आपल्या मखमली, कंपनयुक्त, मुलायम आणि हृदयस्पर्शी गाण्यांची मनात टवटवीत आठवण देऊन.. आपल्या गाण्यातून समर्पक असं सांगत की…

*चल जहाँ ग़म के मारे न हो, झूठी आशा के तारे न हो,*
*इन बहारोंसे क्या  फायदा, जिसमें दिल की कली जल गयी,*
*ज़ख़्म फिर से हरा हो गया, ऐ मेरे दिल कहीं और चल..*

♥

या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व ‘ऑडिओ’, ‘व्हिडिओ आणि कराओके’ यांच्या ‘यू-ट्युब’ लिंक्स.

| | |
|---|---|
| ०१. ऐ मेरे दिल कहीं और.. (व्हिडिओ-१) | https://youtu.be/1B9sm1HHAIQ |
| ०२. ऐ मेरे दिल कहीं और.. (व्हिडिओ-२) | https://youtu.be/b7yfJcZc2VU |
| ०३. ऐ मेरे दिल कहीं और.. (संपूर्ण) | https://youtu.be/tc-wIfdIOwY |
| ०४. ऐ मेरे दिल कहीं और.. (लतादीदी) | https://youtu.be/RezieKUl6ls |
| ०५. ऐ मेरे दिल कहीं और.. (लाईव्ह) | https://youtu.be/z4BPYQTHgrQ |
| ०६. ऐ मेरे दिल कहीं और..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/RyI7sDdkctk |
| ०७. चित्रपट : दाग  (१९५२) | https://youtu.be/6KsHgQQ7gc8 |
| ०८. तलत महमूद – सुपरहिटस् (५० गाणी) | https://youtu.be/vWVaB9qXLhc |
| ०९. तलत महमूद (किंग ऑफ गजल्स) | https://youtu.be/CkLstaeVet8 |

०३. तलत महमूद (मराठी सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95MqZJWDLC8pRgOqgbhsfya

♥

## ४७ : ऐ मेरे दिल कहीं और चल...

चित्रपट : दाग (१९५२)
गायक : तलत महमूद
गीतकार : शैलेंद्र
संगीतकार : शंकर-जयकिशन

ऐ मेरे दिल कहीं और चल.. ग़म की दुनिया से दिल भर गया..
ढुंढ ले अब कोई घर नया.. ऐ मेरे दिल कहीं और चल..
ग़म की दुनिया से दिल भर गया, ढुंढ ले अब कोई घर नया..
ऐ मेरे दिल कहीं और चल..

चल जहाँ ग़म के मारे न हो, झूठी आशा के तारे न हो - २
झूठी आशा के तारे न हो..
इन बहारोंसे क्या फायदा, जिसमें दिल की कली जल गयी,
जख़्म फिर से हरा हो गया,
ऐ मेरे दिल कहीं और चल..

चार आँसू कोई रो दिया, फेर के मुँह कोई चल दिया - २
फेर के मुँह कोई चल दिया..
रुक रहा था किसी का जहाँ, देखती रह गयी ये जमीं
चूप रहा बेरहम आसमाँ,
ऐ मेरे दिल कहीं और चल..
ग़म की दुनिया से दिल भर गया, ढुंढ ले अब कोई घर नया..
ऐ मेरे दिल कहीं और चल..

♥

१. 'भाभी (१९५७)' चित्रपटातील 'चल उड जा रे पंछी..' हे गाणं तलत महमूदच्या मखमली आवाजात सुद्धा एच.एम.व्ही.नेच रेकॉर्ड केलं होतं. परंतु 'तलत महमूद' त्यांच्या कोणत्याच अल्बममध्ये सापडलं नाही. सुदैवाने ते 'यू-ट्युब'वर मात्र उपलब्ध आहे.

https://youtu.be/MwWaXZB8-4k

२. 'सुशिला (१९६३)' चित्रपटातील महंमद रफी व तलत महमूद यांच्या सुरेल आवाजातील 'ग़म की अंधेरी रात में..' हे गाणं अवश्य ऐका.

https://youtu.be/G7HEGnogL8Q

https://youtu.be/GYqbgYPbz9U

३. तलत महमूद हा आपला लाडका गायक. या घ्या त्यांच्या सुपरहिट गाण्यांच्या काही 'यू-ट्युब' लिंक्स..

१. तलत महमूद (सुपरहिटस्-१)(ऑडिओ) https://youtu.be/oygbljt-i-k

२. तलत महमूद (सुपरहिटस्-२)(ऑडिओ) https://youtu.be/QL9alA089fs

♥

## 48 : Phool Gendava Na Maro..

## ४८ : फूल गेंदवा न मारो..

'गायकनट' (म्हंजे अर्थात आपल्याच सिनेमात आपल्या आवाजात एखादं गाणं असावं अशी इच्छा मनी बाळगणारे नट..) आपल्याला अतिशय आवडतात, होय की नाही? ते हट्टी खरे पण निरुपद्रवी प्राणी बिचारे! आमचा लाडका बच्चा (तो मला अंकल म्हणतो म्हणून) गीतकार नितीन रायकवारकृत 'गुलाम'चं 'ए!..क्या बोलती तू?..' हे 'मिस्टर परफेक्ट' आमीर खानचं आणि 'आपून बोला..' हे 'बादशाह' शाहरूख खानचं गाणं माझ्या व्यवस्थापनात माझ्यासमोर रेकॉर्ड झालं ना तेव्हापासून असले 'गायकनट' मलाही अतिशय आवडू लागले. मज्जा आली होती यार! सिनेमात एकाच वेळी दहा जणांना लोळवणारे हे वस्ताद माईकवर गाणं म्हणायला म्हणून उभे राहिले की कसली करमणूक होते म्हणून सांगू! ह्या अभिनेता आमीरची व शाहरूखची अशीच धांदल, धम्माल बघायला मिळाली अवघ्या हातभर अंतरावरुन. या अनुभवावरून मला तरी असं वाटायला लागलं होतं की एखादं 'आयटम-साँग' का होईना पण एक गाणं तरी त्या शिणुमाच्या नायकांना गायला द्यावंच द्यावं. 'गाणं' नको निदान 'बोलगाणं' तरी! (बोलगाणं म्हणजे 'रॅप'! का कोण जाणे, गुजराती लोक 'हॉल' न म्हणता 'होल' म्हणतात ना तसं 'रॅप'चा बेधडकपणे 'रेप' असा उच्चार करतात! 'काले सुंदराबाईनी होल मां बाबा सहगल रेप करवानो छे!' करू दे बापडे!) तर हे 'बोलगाणं' त्याचं त्यानेच गावं, कारण एकच की त्या फलाण्या आवाजाची नेमकी जातकुळी समजते. पोटात जे असतं ते हमखास ओठावर येतं. आपण या नटांसारखे चिकणे-चुपडे, हँडसम दिसत नसलो तर काय झालं! या नायकांमध्ये आणि आपल्यामध्ये एक समान धागा आहे.. आपलंच घ्या ना! आपल्याला गायची फार इच्छा असते, खुमखुमी असते की नाही? पण ती इच्छा आपण मनातल्या मनात दाबून ठेवतो. सहलीला गेल्यावर म्हणा किंवा बाथरूममध्ये का होईना आपण गाणं गायची हौस भागवतोच भागवतो. ह्या सिनेमा नटांना असली खुमखुमी येत नसेल? केवढा प्रॉब्लेमही होत असेल त्या लोकांना? दुसऱ्याच्या आवाजावर कितीदा ओठ हलवायचे? कधी चान्स मिळाला की तेही मग आपली ही खुमखुमी पूर्ण करतातच. 'बे-त्रण लाख ओछा आपो.. पण गाणं द्या बुवा!' असं सांगत असतात काही ॲक्टर्स.. हाच तर या नायकांमध्ये आणि आपल्यामध्ये एक समान धागा आहे.. त्यांना व आपल्याला रागदारी कशाशी खातात ते ठाऊक नसलं तरी हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील दिल्ली, आग्रा, मेरठ, पतियाळा, किराणा, जयपूर, ग्वाल्हेर अशा घराण्यांची नावं ऐकून तरी ठाऊक असतात. आणि हो! त्यांचं स्वतःचं असं स्वतंत्र संगीत-घराणं आहे. गुरूकुल पध्दतीप्रमाणे शिक्षण-बिक्षण नसूनही हा समस्त मान्यवर शिष्यवृंद (अर्थात आपले हे गुरु-बंधू) फिल्म इंडस्ट्रीसकट अखंड हिन्दुस्थानात विखुरलेत. आवाज लावण्याची स्वतःची अशी शैली त्यांनी जी तोड मेहनत करून हासिल केलीय. विकसित केलीय. 'गंधार' लावला रे लावला की संसदेत मित्रपक्षाने ताडकन उठून अनुमोदन द्यावे तसे 'ऋषभ' आणि 'मध्यम' आपसूकच ऐकू येतात. त्यांच्या गाण्यात शक्यतो आलापी-ताना नसतात पण जर घेतल्या की त्यात मंडलिक संस्थानिकांप्रमाणे हटकून सर्वच्या सर्व पांढऱ्या पट्ट्या 'हार्मनी' देतायत की काय असा भास होतो. 'एकेक ओवी अनुभवावी.. ' तसा हा अनुभव मी घेतलाय! गायक(!) म्हणून रसिकांचा वरदहस्त, पाठबळ लाभलेले वस्ताद हसन जहांगीर (हवा हवा..), वस्ताद अताऊल्ला खाँसाहेब (अच्छा सिला दिया..) आणि आपले अनेक 'नेक' अभिनेते यांनी या घराण्याची ध्वजा कशी आसेतुहिमाचल फडकवलीय आठवतंय ना? त्यांची ती गाणी व ते किती सुपर-हिट झालेले हे काय म्या पामरानं सांगायचं? उज्ज्वल इतिहास आहे या संगीत-घराण्याला. जर्रासं मागे वळून पाहिलं तर एकेक टप्पे दृष्टीपथात येतात.. फार कशाला! महंमद रफीबरोबर, किशोरकुमार बरोबर आणि मन्नादांबरोबर गायला मिळताच त्या अनुभवावर आपल्या भाईजानने.. म्हणजे मेहमूदने चान्स मिळताच 'तोडी नाख तबला ने फोडी नाख पेटी..' तसेच 'ना बिवी ना बच्चा..' किती पोटतिडकीनं गायलं होतं! व्वा रे मेरे शेर!

जेव्हा आमीर खान 'गुलाम' या सिनेमासाठी 'ए!.. क्या बोलती तू?..' (संगीतकार : जतिन-ललित) तसंच नंतर काही दिवसांनी शाहरूख खान आमच्या 'जोश' या सिनेमासाठी (संगीत : अनू मलिक) 'आपून बोला..' हे गाणं गाण्यासाठी माईकवर उभा राहिला होता त्याक्षणी मला प्रकर्षानं कोणाची आठवण होत होती माहीत आहे? विनोदवीर आगाची! येस! आगाची! (कसं ते पुढे पाहुया..) शिणुमाच्या पडद्यावर सैगल, अशोककुमार, तलत महमूद इत्यादी सन्माननीय अपवाद वगळता पुढे 'गायकनट' बनूच दिला नाही हो निर्माता लोकांनी! मुक-चित्रपटांचं गणित असं होतं की नायक हट्टा-कट्टा असेल, चिकणं-चुपडं रूप असेल की झालं! परंतु बोलपटांच्या आगमनासरशी बरेच वांधे होऊ लागले. पार्श्वगायनाचा फंडा कधी लक्षात आला असेल बरं? बोलपटांच्या सुरुवातीच्या दिवसात चांगली अभिनयक्षमता आणि चांगले 'गायकनट' म्हणावे असे नट हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच होते. तिथे कुठेतरी 'मोनोपॉली' निर्माण होतेय. आपल्या विविध कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यात किंवा त्या आविष्कृत करायला निर्बंध येतायत हे बऱ्याच जणांना खटकत होतं. नितीन बोस (जन्म २६ एप्रिल, १८९७, मृत्यू १४ एप्रिल, १९८६) नावाच्या एक हरहुन्नरी बंगाली

दिग्दर्शकांला बऱ्याच अभ्यासाअंती ही पार्श्वगायनाच्या आईडियेची कल्पना क्लिक झाली. 'न्यू थिएटर्स'च्या 'देवदास'(१९२८) पासून छायाकार (सिनेमॅटोग्राफर) म्हणून कारकीर्द आरंभ करणाऱ्या या अवलियाने १९३५ च्या 'भाग्य चक्र' या बंगाली सिनेमात सर्वप्रथम पार्श्वगायन करवलं. (त्याच साली 'धूप छाँव' हे त्याचंच हिन्दी रूप पहायला मिळालं.) पार्श्वगायक म्हणून होते के.सी.डे, पारूल घोष आणि सुप्रभा सरकार! आपली ही कल्पना त्यांनी संगीतकार रायचंद बोरालजींकडे मांडली. 'न्यू थिएटर्स'मध्ये ध्वनिमुद्रक म्हणून कार्यरत असणाऱ्या मुकुल बोस या आपल्या सख्ख्या भावाकरवी ती प्रत्यक्षात आणली. नायक-नायिकांना गाता येत नसेल तर त्यांच्या तोंडी कोणत्याही गायकाचा 'प्ले-बॅक' देता येऊ शकतो हे कळताच, मग काय विचारता! 'गायकनट' ही संज्ञाच पुढे अडगळीत टाकली ह्या संगीतकार लोकांनी. किती हलचल, खळबळ उडाली असेल नाही? आपल्या सुदैवाने हिन्दुस्थानी चित्रपट-संगीत क्षितिजावर नंतर अनेक गायकरूपी तारे उगवले. ह्या स्वरकिन्नरांनी आपली कारकीर्द रत्नमंडित केली (याबद्दल आपलं ऑब्जेक्शन नाहीय. तत्कालिन नट मंडळींचं असेल तर मला माहीत नाही.. आपण कश्शाला ऑब्जेक्शन घ्यायचं बरं! किती सुरीले होते ते गायक. स्टुडिओत आजकाल अशा एकेक टग्यांशी आमचा पाला पडतो की पूछो मत! संगीतात सुरेल गायन व पक्का सूर यासाठी 'फोर-फॉर्टी' अशी संज्ञा आहे. चारशेचाळीस?! होय! स्साला, आज इंडस्ट्रीत 'फोर- ट्वेन्टी' लोकांचे दिवस आलेयत, दुर्दैवाने त्यांचीच चलती आहे.. चारसो-बीस लेकाचे!) तसं पहायला गेलं तर जॉनी वॉकर, मेहमूद, जगदीप वगैरे कलाकारांचे आवाज काही वाईट नव्हते असे ते स्वतः सेटवरच्या आपल्या चमच्यांना खाजगीत सांगायचे म्हणे. पण त्यांच्या तोंडची गाणी निर्मात्यांनी व हट्टी संगीतकारांनी रफी, किशोर आणि मन्नादांकडून गाऊन घेतली, असा त्यांचा मतप्रवाह होता म्हणतात. 'पडद्यावर तुम्ही फक्त ओठ हलवायचे..' असा सज्जड दम भरला होता. साक्षात किशोरकुमारला शास्त्रीय बेस असलेली म्हणा किंवा ती गाणी त्याला गायला कठीण जातील हे ठरवून त्याच्यावर चित्रित होणाऱ्या दोन गाण्यात चक्क महंमद रफीचा प्ले-बॅक घ्यावा लागला होता, हे आठवतंय ना! 'मन मोरा बावरा..' (संगीत : ओ. पी. नय्यर - रागिनी - १९५८) तर 'अजब है दास्तां तेरी ये जिंदगी..' (संगीत : शंकर-जयकिशन - शरारत १९५९) या दोन गाण्यात पडद्यावर किशोर तर त्याला प्ले-बॅक आहे तो रफीचा. ('पायलवाली देखना..' (एक राज), 'आप की आँखों में कुछ महके हुए से राग..' (घर) ही गाणी काय साधीसुधी होती? ती किशोरकुमार गायलाच की नाही? असो!).. आमीर खान तसंच काही दिवसांनंतर शाहरूख खानला समोर गाताना पाहून मनापासून वाटू लागलं की च्यायला प्रत्येक सिनेमा-नटाने गायलाच हवं.. आपल्याच आवाजात! 'वन्स इन अ ब्ल्यू मून..'! मजा आता है यार! सारे सारे गाऊया.. चला जग जिंकूया!

आगाविषयी बोलायचं तर हा किती गुणी नट!.. याच आगावर चित्रित झालेलं ते 'दिन है सुहाना आज पहिली तारीख है..' (गायक - किशोरकुमार) कित्ती कित्ती आवडतं म्हणून सांगू? महिन्याच्या एक तारखेला पगार कधीच मिळत नव्हता पण हे गाणं नाही ऐकलं तर आजही फार चुकल्या-चुकल्यासारखं वाटतं बघा! तो स्वतः हे गाणं गाऊ शकला असता का? त्याने कोशिश नक्की केली असावी. तथापि निर्माता किंवा संगीतकाराने (सुधीर फडकेजी) झापलं असेल असं वाटतंय.. कारण तेव्हा 'व्हाईस डबिंग' वेगळं करता येणं शक्यच नव्हतं. रेकॉर्डिंगचा एकसाथ असा मामला असायचा. (दिल से काम लिया था हमने!.. आमीर आणि शाहरूखचे आवाज डब करताना किती तास खर्ची पडले असतील तुम्हाला कल्पना आहे? बोलगाणी होती ती.. तरीही त्यांना त्या गाण्यातला ताळमेळ समजायला.. हवा तो सूर पकडायला.. नंतर ते गायला इतके तास गेलेत की विचारता सोय नाही! न थकता तासनतास गायचे बिचारे हे 'स्टार्स'. दिवसपाळी, रात्रपाळी, अविरत! 'मला जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा..' अशी वेळ आमच्यावर आलीच नव्हती कारण आमचेही 'स्टार्स' काही वाईट नव्हते! 'दबा के' ओव्हर-टाईम मिळायचा आम्हा सगळ्यांना! (मंडळ आपलं आभारी आहे!) नशीब! त्या सिनेमात या 'स्टार्स'चं एकेकच गाणं होतं. चित्रपटातली सर्वच्या सर्व गाणी द्यायची या निर्मात्यांची, त्या कलाकारांशी 'कमिटमेंट' असती ना तर काय झालं असतं माहीत आहे? निर्मात्यांचं अर्थकारण पार खिळखिळं झालं असतं. ओव्हर-टाईमच्या पैशात आमचा सगळा रेकॉर्डिंग स्टाफ आणि मॅनेजर म्हणून मी.. आज आमच्या सगळ्यांच्या दारात 'इंडिका', 'इंडिगो' किंवा झालंच तर एखादी नवी कोरी 'बाईक' दिसली असती.. कदाचित निर्मात्यांना गावी शेतीवाडीही करावी लागली असती.. 'इंडिगो'- स्पॉईल युव्हरसेल्फ!)

'दूज का चाँद' (१९६४)चे दिग्दर्शक मात्र हुश्शार! आपले नितीन बोससाहेब! त्यांनी या बाबतीत दिमाग से काम लिया. सिनेमात पार्श्वगायन सगळ्यात आधी 'इंट्रोड्यूस' करणारा बाप माणूस तो! कशी आईडिया केली पहा.. या 'दूज का चाँद' मध्ये आपल्या याच आगाला पटवायची असते पोरगी. आपल्या सर्वसामान्य आयुष्यात गाणं म्हणून पोरगी पटवणं कदापि शक्य नसलं तरी सिनेमात पोरगी पटवायची असेल तर गाणं आलंच पायजेल असा दंडक आहे राव! 'आपून को गाने का शौक है..' वगैरे बढाया त्याने आधीच मारलेल्या असतात. बागेत त्याच्याबरोबर निमुटपणे झाडांभोवती पळायचं की नाही? पण ती जीवनकला त्याला 'एखादी चीज तरी ऐकव रे..' अशी गळ घालते. आगाच्या गळ्यात जणू मटणातली हड्डी अडकते. तो घाबरतो. पुढच्या संभाव्य

अडचणींनी तो फाफलतो. एका क्षणी असंही वाटलं.. चल होऊन जाऊ दे! लावूया आवाज!.. (अशा 'गायकनट' बनू इच्छिणाऱ्या घराण्याचा एक रूल आहे.. मोकळ्या बागेत, म्हणजे सार्वजनिक ठिकाणी खुल्लमखुल्ला आवाज लावणं त्यांना प्रशस्त वाटत नाही. लोकांची मानसिकता, आरोग्य अशाचा विचार ते नेहमीच करतात.. आणि बहुदा म्हणूनच ते प्ले-बॅक घेतात.) पण आगाचं तसं नाहीय. आगा आईडिया करतो. बापाने पदरमोड करून मेहनतीने जमवलेलं रेकॉर्डस्‌चं कलेक्शन फडताळात असतं. काढतो त्यातली एक रेकॉर्ड. घासलेट वगैरे तत्सम द्रवपदार्थ लावून ती स्वच्छ करतो.. चावीवाला 'ग्रामोफोन' घेतो, पोल्सनला मस्का मारतो, डिस्कस करतो. नायक भारतभूषणही मदत करायचं अभिवचन देतो. मग काय! आगा मैफिली गाजवणाऱ्या गवय्याच्या रुबाबात त्या थाटाचा लिबास करून 'तानपूरा' या आयुधासह त्या पोरीसमोर, तिला 'लाईव्ह-कॉन्सर्ट' वाटेल असं गायचं ठरवतो. स्वतःच्या 'गनिमी' घराण्याची इज्जत राखायची हा एकच किडा आता त्याच्या डोक्यात वळवळताना दिसतोय. बस्स ठरलं तर! नदीकाठचा मस्त माहोल. सादरीकरणासाठी व्यवस्थित जागा.. गाणं नाहीतरी तोंडपाठ आहेच. झाडाआड चार हात अंतरावर ग्रामोफोन ठेवायचा, मैफिलीला बसतात तशी मांड ठोकायची, रेकॉर्डमधून मन्नादांचा आवाज आला की त्याबरहुकुम ओठ हलवायचे. याऽऽहूं! क्या दिमाग पाया है यार!

*फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट, दुँगी मैं दुहाई, काहे चतुर बनत, छिछोरी करत हरजाई,*
*फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोटऽऽ*

किती विलोभनीय दृष्य! आगा आपली 'कला' दाखवतोय तर 'जीवनकला' ठुमका लावतेय.. अरेच्चा! हे काय? अडकली की पीन! जुन्या तुळतुळीत रेकॉर्डच्या ट्रॅकवर पीन एकाच जागी अडकून जिलेबीसारखी गोल गोल गोते खाते. आता काय करायचं? क्षणात घाम फुटतो आगाला. आता पिवळी होणार इतक्यात आगाची दोस्त कंपनी एकनाथ सोलकरच्या चपळाईनं सूर मारून पीन पुन्हा जागेवर आणून त्याला बाल-बाल वाचवतात. रेकॉर्डची पीन (कार्टरेज) अडकण्याचे क्षण वारंवार येणार हे लक्षात येताच ते जवळपास बसतात. काही-बाही खातात.. अंपायर किंवा विकेट-किपरपेक्षाही अलर्ट राहून.. चाणाक्ष नजर ठेऊन.

*दहका हुआ ये अंगारा, जो गेंदवा कहलाए है, अजी, तनपर जहाँ गिरे पापी, वहीं दाग पड जाए है,*
*अंग अंग मोरा बीर करे, और कर के कहे, फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोटऽऽ*

पुन्हा अडकली पीन. पण आता डोळ्यात तेल घालून दोस्त तिथे मौजूद आहेत म्हणता आगा त्या अडकण्याला सफाईदार आलापीची डूब देत मोकळेपणाने गातो. आगाच्या या गाण्याचा, सादरीकरणाचा प्रभाव पहा. साक्षात नागराज त्या सुरेल आविष्कारानं मंत्रमुग्ध होऊन ग्रामोफोनच्या दिशेनं वाटचाल करतात. त्यांचं अहर्निश दर्शन होताच सगळ्यांची भंबेरी उडते. आगासाहेब आपली जागा सोडतात. उभे राहतात. आगा-पिछा न पाहता एकीकडे जीवनकलाला तर दुसरीकडे नागराजाला 'रुक जाओ, रुक जाओ,रुक जाओ.. ना सताओ मोहे जुल्मी बलम, ओ बलम ऽऽ' असे उभ्या उभ्या विनंतीचे पण खडे बोल सुनावतात. भांडं फुटतं पण नैया पार होते.. व्हॉट ॲन आईडिया सरजीऽऽ! हे मात्र दिग्दर्शकीय कौशल्य बरं!

'दूज का चाँद' (१९६४) हा फिल्मिस्तान बॅनरचा चित्रपट. अशोककुमार, बी. सरोजादेवी, भारत भूषण, चंद्रशेखर, जीवनकला, पोल्सन आणि रत्ना इत्यादी कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये होते. रोशनदांचं संगीत होतं. 'चाँद तकता है इधर..' (रफी-सुमनताई), 'महेफिल से उठ..' (रफी), 'पडे बरखा फुआर करे..' (लतादीदी), तर 'सजन सलौना माँग लो..' (लतादीदी-आशाताई), 'सून ऐ महजबीं..' (रफी), 'झाँकती है कजा मेरी आँखो से..'(सुमनताई व त्यांची धाकटी बहिण श्यामा चित्तार), 'लो अपना जहाँ दुनियावालों..' (आशा सिंग मस्ताना) आणि 'फूल गेंदवा न मारो ऽऽ न मारो..' (मन्नादा) अशी साहीरजींच्या लेखणीतून अवतरलेली गाणी होती. सिनेमाचा स्टोरीबोर्ड सो-सो होता पण आगाने वठवलेलं विनोदी पात्र दिग्दर्शक नितीन बोसजींनी व्यवस्थित डेव्हलप केलं होतं. ठोकळ्या भारत भूषणसाठी 'महेफिल से उठ जानेवालो तूम लोगोंपर क्या इल्जाम..' (गायक-रफी) अशा निहायतही खुबसूरत गाण्याची योजना तर केलेली पण या दगड्याची अभिनयक्षमता लक्षात असल्याने, त्याचा दुष्परिणाम म्हणून पब्लिकनं मैफिलीतून (म्हणजे थिएटरातून) खरोखरच उठून जाऊ नये म्हणून आगाच्या तोंडी एखादं विनोदनिर्मिती करेल असं गाणं टाकायचं ठरवलं असावं. संगीतकार रोशनदांबरोबर सीटिंग्ज झाल्या. आगाला गाण्याची इच्छा झाली असेल कदाचित पण असल्या नटांबद्दल पूर्व वैमनस्य असल्यामुळे म्हणा किंवा बजेटचं टेन्शन असल्यामुळेच त्यांनी आगाला त्याचं गाणं त्यालाच गायची परवानगी दिली नसावी. एरवी पडद्यावर त्याच्या विनोदाने हस हस हसवणारा आगा घरी जाऊन रड रड रडला असेल का? (ठाऊक नाही.) त्याच्या पार्श्व-आवाजासाठी मन्नादांना पाचारण करण्यात आलं. राज कपूरकृत 'बूट पॉलिश'मध्ये शंकर-जयकिशनजींनी राजच्याच सांगण्यावरून 'जॉन'काका (डेव्हिड) या किरिस्ताव पात्राच्या तोंडी टाकलेली 'लपक झपक तू आ रे बदरवा..' अशी

शास्त्रीय चीज भाव खाऊन गेलेली मग इथेही तसंच करूया की! इथे तर मस्त सिच्युएशन निर्माण करण्याचा चान्स होता. स्वतःच्या बढाया मारून फसगत करून घेणाऱ्या आगाच्या तोंडी एक अशीच शास्त्रीय चीजच टाकायचं ठरवलं. आगाच्या घराण्याच्या (म्हणजेच 'गायकनट' बनू इच्छिणाऱ्याच्या) कोणताही राग कोणत्याही वेळी आळवण्याच्या परंपरेशी रोशनदा वाकिफ़ होते. भर दुपारच्या या सीनमध्ये आगाच्या तोंडी त्यांनी चक्क 'भैरवी' रागाची बिनधास्त निवड केली (समस्त श्रोत्यांनाही ते खटकलं नाही, हे विशेष!) डायरेक्ट अंतःकरणाला भिडणाऱ्या कोमल स्वरांवरच्याच कसरती करणारा हा राग सर्जनशील संगीतकार रोशनदांनी विनोदी अंगांनी फुलवला. रोशनदा, साहीरजी, मन्नादा आणि नितीन बोस यांच्या या गाण्यावर बऱ्याच बैठका झाल्या. पीन अडकण्याची ती धाँसू आईडिया होती नितीनदांची. सरगम गातानाची कसरत मन्नादांनी स्वकर्तृत्वावर तारून नेली. दोन सतारी, दोनच तबले आणि हार्मनीसाठी साँग-व्हायोलिन या एवढ्याच मोजक्या वाद्यमेळाच्या साथीनं गाणं आकाराला आणलं.. 'बॉम्बे-लॅबमधलं ते रेकॉर्डिंग मला आजही आठवतंय..' असं मन्नादा त्यांच्या मुलाखतीत म्हणाले..

*रुक जाओ, रुक जाओ,रुक जाओ, ना सताओ मोहे ज़ुल्मी बलम, ओ बलम -२*
*मान जाओ बिनती अबला की.. देखो देखो अब दुँगी दुहाई, काहे चतुर बनत, छिछोरी करत हरजाई,*
*फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट..*

सचिनदांनी 'मशाल' (१९५०) या चित्रपटात कवि प्रदीपजींचं 'उपर गगन विशाल..' हे गाणं रेकॉर्ड करताच मन्नादांचं नाव झालं. समकालीन पार्श्वगायक म्हणून नावारूपाला आलेले तलत महमूद, रफी, किशोरकुमार, मुकेश या प्रभावळीत मन्ना डेसाहेबांचा आवाज वेगळाच होता. अस्सल शास्त्रीय संगीताची डूब असलेला. रियाजी! मन्नादांनी गायलेली शास्त्रीय संगीतावर आधारित अशी काही 'सोलो' गाणी तर इतकी लाजवाब आहेत की नवख्या गायकांनी ती चक्क अभ्यासाला घ्यावीत. (खास टीप : मन्नादांनी आपल्या अशोक पत्कींच्या संगीत संयोजनात यातली मोजकी गाणी पुन्हा नव्याने स्वतःचीच व्हर्शन्स म्हणून एच.एम.व्हीसाठी रेकॉर्ड केली आहेत. ती सहज उपलब्धही आहेत. अवश्य ऐका) याच स्वरातून 'आजा सनम..', 'ये रात भीगी भीगी..', 'जहाँ मैं जाती हूँ..' , 'तुम गगन के चंद्रमा..', 'नैन मिले चैन कहाँ..', 'मेरे दिल में है इक बात..' 'दिल की गिराह खोल दो..' अशा लतादीदीबरोबरच्या अनेक युगलगीतांनी खूपच आनंद दिला. हा स्वर बहरतच होता. कधी मस्त युगल गीतं, कधी शास्त्रीय बैठक असलेली सोलोज! कधी झटापट असलेली 'प्यार की आग में तनबदन..', 'एक चतुरनार..', 'मैं तेरे प्यार में क्या क्या न बना..', 'जोडी हम्मारी..' अशी विनोदी गाणीही वाट्याला आली पण मन्नादांनी त्याचं सोनंच केलं. 'फूल गेंदवा..' याच प्रणालीतलं. तिकिटबारीवर आणि ॲवॉर्ड फंक्शनमध्ये मात्र हा 'दूज का चाँद', अमावसका ठरला. 'दोस्ती', 'संगम', 'वह कौन थी?', 'लीडर', 'आई मिलन की बेला', 'जहाँ आरा', 'कोहरा', 'शहनाई', 'जिद्दी' अशा अनेक संगीतमय चित्रपटांच्या स्पर्धेत चारी मुंड्या चीत झाला. मन्नादांचं हे गाणं मात्र अक्षय्य ठरलं. बकुळीच्या फुलासारखं.

मला 'गायकनट' बनू इच्छिणाऱ्या नटांच्या या तथाकथित घराण्याच्या तरक्कीबद्दल अजिबात फिकीर नाहीय, कारण अनेक धुरंदरांनी ही ध्वजा खांदेपालट करत करत पुढे न्यायचा निर्धार केलाय. बऱ्याच विचारांती असं लक्षात आलं की 'गायकनट' वगैरे सब झूठ है! बकवास है! परंतु ते आपल्याला टाळता येणार नाहीय हा दैवदुर्विलास आहे. लोकांनाही आता त्याची चटक लागलीय. खरं सांगू! सठीसामाशी गंमत म्हणून सिनेमाच्या नायकाला किंवा नायिकेला एखादं गाणं द्यायला हरकत नाही पण ती सक्ती, आग्रह आणि हट्ट व्हायला नकोय. वेळीच थांबवायला हवंय ते. आगाच्या त्या गाण्यात जसा साप आला होता तसा हा विषारी सर्प आहे. वेळीच तो ठेचायला हवाय. 'म्हातारी मेल्याचं दुःख नाही पण काळ सोकावतो..' म्हणतात ना तस्सं! अर्थात या घराण्यामुळे आपल्या दर्जेदार गायकांना काही फरक पडत नाहीय, पुढे पडणारही नाही.

गायक प्रभृती महंमद रफी, मुकेश, तलत महमूद, हेमंतकुमार, किशोरकुमार या स्वरकिन्नरांच्या प्रभावळीतही मन्नादांचा स्वर बहरत होता ना? इतरांचे स्वर आपण अत्तराच्या फायाप्रमाणे सतत स्वतःसोबत वागवले, पण त्या गदारोळात मन्नादांचा सुरेल स्वर पुढे कसा काय पध्दतशीरपणे झाकोळून गेला असेल बरं? नक्की काय झालं असेल? राजकारण? मन्नादांसारखा गायक पुढे सक्तीच्या विश्रांतीवर धाडला गेला, हेच सत्य.. आणि हे शल्य आपल्या मनात कायम राहणारेय. जुहूला आमच्या ऑफिसजवळच त्यांचं घर होतं. 'लाईव्ह शोज', 'इव्हेंट्स्', 'रेकॉर्डिंग' अशा अनेक कामांनिमित्त बऱ्याचदा भेटलेलो मी त्यांना. विश्रांतीच्या या काळातही ते तसे तृप्तच असायचे. आनंदी.. एनर्जेटिक! गतकाळातल्या आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलत असायचे.. तरी उगाचच वाटत राहतं. मनातल्या मनात का होईना पण नियतीला उद्देशून त्याचं मन असंच काही म्हणालं असेल का?..

*..फूल गेंदवा न मारो ऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट..*

या गाण्याशी तसेच, मन्ना डे साहेबांशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व ‘ऑडिओ’, ‘व्हिडिओ आणि कराओके’ यांच्या ‘यू-ट्युब’ लिंक्स.

| | |
|---|---|
| १. फूल गेंदवा न मारो.. (ऑडिओ) | https://youtu.be/Wk_Lyoy8OLA |
| २. फूल गेंदवा न मारो.. (व्हिडिओ) | https://youtu.be/jX_8TpSCyBY |
| ३. चित्रपट : दूज का चाँद (१९६४) | https://youtu.be/1iq3aZA9N30 |
| ४. मन्ना डे (सुपरहिटस्-लाईव्ह) | https://youtu.be/mOAwDE_TXIQ |
| ५. मन्ना डे (क्लासिकल हिटस्) | https://youtu.be/iH4ZmnIDg4w |
| ६. मन्ना डे (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) | https://youtu.be/fUjS-uZq0Bg |
| ७. मन्ना डे (मराठी सुपरहिटस् - १) | https://youtu.be/x8StbAt-YgI |
| ८. मन्ना डे (मराठी सुपरहिटस् - २) | https://youtu.be/OFEQCn2DyxQ |

♥

## ४८ : फूल गेंदवा न मारो..

चित्रपट : दूज का चाँद (१९६४)
निर्माता : फिल्मिस्तान
दिग्दर्शक : नितीन बोस
गायक : मन्ना डे
गीतकार : साहीर लुधियानवी
संगीत : रोशन

फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट
दुँगी मैं दुहाई, काहे चतुर बनत, छिछोरी करत हरजाई,
फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट

दहका हुआ ये अंगारा, जो गेंदवा कहलाए है,
अजी, तनपर जहाँ गिरे पापी, वहीं दाग पड जाए है,
अंग अंग मोरा पीर करे, और कर के कहे,
फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट

रुक जाओ, रुक जाओ,रुक जाओ,
ना सताओ मोहे जुल्मी बलम,
मान जाओ बिनती अबला की..
देखो देखो अब दुँगी दुहाई,
काहे चतुर बनत, छिछोरी करत हरजाई,
फूल गेंदवा न मारोऽऽ न मारो, लगत करेजवा में चोट..

♥

## 49 : Mere Mehboob Tujhe..

## ४९ : मेरे मेहबूब तुझे..

*मेरे मेहबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम, फिर मुझे नरगिसी आँखो का सहारा दे दे,*
*मेरा ख़ोया हुआ, रंगीन नज़ारा दे दे, मेरे मेहबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..*

लखनवी संस्कृतीची पेशकश हिन्दी चित्रपटात नेमकी कधी सुरू झाली कुणास ठाऊक. पण माझ्यामते तरी गुरुदत्तचा 'चौदहवी का चाँद' हा या दौरमधला बहुतेक पहिला सिनेमा असावा. 'मेरे मेहबूब' हे स्वप्न होतं एच. एस. रावेलसाहेबांचं. पटकथा लेखक होते विनोदकुमार. राजेंद्रकुमार आणि रावेलसाहेबांच्या संघटीत परिश्रमातून ही कलाकृती आकाराला येणार होती. राजेंद्रकुमारच या चित्रपटाच्या संगीताचा प्रस्ताव घेऊन नौशादजींकडे आलेले. रतन, बैजू बावरा, अंदाज, कोहिनूर, गंगा जमुना अशा अनेक चित्रपटातील सर्वोत्तम संगीताचे सर्जक त्यांच्या 'मेरे मेहबूब'साठी (१९६३) गवसताच रावेलसाहेबांनी नायिका म्हणून साधना, सहनायिका अमितासह अशोककुमार, प्राण आणि विनोदवीर जॉनी वॉकर अशी दमदार स्टारकास्ट घेऊन आपल्या पत्नीच्या या कथेला सोन्याचं कोंदण मिळवून दिलं. मुहूर्त म्हणून सिनेमाचं 'थीम-साँग' रेकॉर्ड करायचं ठरलं. पटकथेवर चर्चा करतानाच रावेलजींनी शकील बदायुनीजींचा कलाम मंजूर केला होता.

रावेलसाहेबांनी आपल्या गुरुजींना विचारून व्यवस्थित आणि सर्वांना सोयीचा असा मुहूर्त काढला. ठरलेल्या दिवशी ते आपल्या आप्त-स्वकीय-मित्रपरिवारासह अगदी उत्साहात स्टुडिओत वेळेआधीच हजर झाले. फायनान्सर्स, प्रेसवालेही आवर्जून उपस्थित होते. नौशादजी त्यांचा उत्साह पाहून खुश झाले. रावेलजींनी सपत्नीक पूजाअर्चा केली. श्रीफळ वाढवून सर्वांना आनंदाने मिठाई दिली. आता इंतजार होता तो रेकॉर्डिंगचा. एकेक वादक येत होता. इतक्यात रफीसाहेबही आले. सर्वांनी त्यांचं मनःपूर्वक स्वागत केलं. आता शकील आणि नौशादजी रफीसाहेबांबरोबर गाण्याची चाल समजावण्यात गुंतले. मात्र घड्याळाचा काटा जसजसा पुढे सरकत होता तसा रावेलजींच्या काळजाचा ठोका चुकत होता. म्युझिक-हॉलमध्ये सगळे वादक आले आहेत का हे पहायला ते चार-पाचदा गेले. दहा वाजून गेले तरी म्युझिक-हॉलमध्ये फक्त पाचेक म्युझिशियन्स वाद्ये ट्यून करताहेत हे पाहून रावेलजी चक्रावलेच. सगळ्या वादकांना मॅसेज गेले नसतील का? की दुसरं कुठलं मोठं रेकॉर्डिंग मिळालं म्हणून इथे आपल्याला त्यांनी ठेंगा तर दाखवला नसेल? मुहूर्ताचं गाणं आहे याची जराही सीरीयसनेस नसावी? कमाल आहे! पहिलंच गाणं म्हणून त्यांनी एवढा इंतजाम करूनही ऐनवेळी असं तोंडघशी पाडायचं? सॉलिड वैतागले रावेलजी.. त्याच तिरीमिरीत आत मॉनिटर-रूममध्ये जाऊन त्यांनी नौशादजींना विचारलं.. 'आज रेकॉर्डिंग आहे की नाही?' नौशादजींनी प्रतिप्रश्न केला.. 'कुणी सांगितलं.. नाहीय म्हणून?' रावेलजी.. 'मग म्युझिशियन्स कुठायत?' आता नौशादजी.. 'हे काय.. आलेत की सगळे!' रावेलजी आश्चर्यात.. 'हे..हे इतकेच? चार-पाच? कमाल करता हं तुम्ही! अहो, मुहूर्ताचं गाणं आहे.. आणि मुख्य म्हणजे हे आपल्या फिल्मचं थीम-साँग आहे.. थीम-साँग!.. बजेट होतं ना?' नौशादजी शांत आवाजात म्हणाले.. 'थीम-साँग आहे, भरपूर बजेट आहे म्हणून शंभर बाजावाले बोलवायचे की काय?.. मला जेवढ्या वादकांची गरज आहे तेवढ्यांनाच बोलावलंय..' रावेलजी हताश होऊन धाडकन खुर्चीत बसले. राजेंद्रकुमारने त्यांना समजावलं. त्याचा नौशादजींच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता. नौशादजी त्यांना समजावत म्हणाले.. 'रावेलजी, या गाण्यात संगीत फक्त 'लेहरा'इतकंच असेल.. तोंडी लावण्यापुरतंच! तेही दोन अंतऱ्यामध्ये मोजून पाचेक सेकंदांचं... जी जान आहे ती या पाच अंतऱ्यांमध्ये आहे.. तुम्ही काळजी करू नका.. मी काय केलंय ते पहाच तुम्ही..' एवढा मोठा संगीतकार छातीठोकपणे सांगतोय म्हणता रावेलजी निश्चिंत झाले. पुढच्या तासाभरातच नौशादजींनी आपलं म्हणणं खरं केलं. रफीच्या आवाजात शकीलजींचं काव्य नौशादजींच्या संगीतात जेव्हा साऊंड-टेपवर रेकॉर्ड झालं तेव्हा रावेलजींनी आनंदातिरेकाने धावतच म्युझिक-हॉल गाठला. झाल्याप्रकाराबद्दल माफी मागत नौशादजींना मिठीच मारली. गाणं वरवर साधं वाटत असलं तरी इम्पॅक्ट जबरदस्त होता. दोन तबले आणि संतूरच्या पीसेसने संपूर्ण गाणं सजवलं होतं. कॅमेरा हीरोवरच खिळलेला असताना हे कडवं येतं...

*भूल सकती नही आँखे वो सुहाना मंजर, जब तेरा हुस्न मेरे इष्क से टकराया था,*
*और फिर राह में बिखरे थे हजारों नग़में, मैं वो नग़में तेरी आवाज को दे आया था,*
*साज़-ए-दिलको, उन्हीं गीतों का सहारा दे दे, मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,*
*मेरे मेहबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..*

नायक-नायिकेची पहिली मुलाकात फ्लॅश-बॅकने येते. एकमेकांशी टक्कर. पुस्तकं खाली पडून विखुरणं, ती उचलून देताना नजरा एकमेकांत गुंतल्याने होणारा चोरटा स्पर्श.. सगळं-सगळं पब्लिकला आपलंसं वाटलं. चित्रपट मुस्लिम समाजातल्या

वातावरणाचा असूनही लोकांना मनापासून भावला. पूर्वाश्रमीच्या नवाबांची स्वतःची प्रतिष्ठा, घरानेकी इज्जत, इगो कुरवाळण्यासाठी चाललेली धडपड इथे प्रभावीपणे मांडण्यात आली होती. 'मोठ्या घराचा पोकळ वासा..' या उक्तीप्रमाणे या नवाबी प्रवृत्तीवर इथे बोट ठेवलं गेलंय.. शालजोडीतून हाणलंय. प्रौढ निम्मी तवायफ असते, पण अशोककुमारची रखेल असं लेबल ती भाळी वागवत असते. आपल्या जिंदगीच्या या नागव्या सत्यामुळे धाकट्या भावाचं करिअर अडचणीत येऊ नये म्हणून ती त्याची शहरात रवानगी करते. कॉलेजात ज्या साधनाशी हृदयाच्या तळापासून तो प्रेम करत असतो, ती असते नेमकी अशोककुमारची बहीण. अशोककुमार खानदानी नवाब. आपला न्यायाधिश हा हुद्दा आणि समाज या गोष्टी दुय्यम समजून त्याने निम्मीला मागणी घातलेली असते. पण निम्मीने त्याला समाजात उजळ माथ्यानं, सन्मानानं जगता यावं म्हणून नकार दिलेला असतो. दिग्दर्शक रावेलजींनी मानवी भावभावनांचे कंगोरे यशस्वीपणे साकारलेत. राजेंद्रकुमारचा पहिल्या भेटीतच साधनावर जीव जडतो.. लव्ह ॲट फर्स्ट साईट! शकीलने गाण्यातून ही भावना कशी तंतोतंत व्यक्त केली आहे पहा..

*सामने आ के जरा पर्दा उठा दे रुख़ से, इक यहीं मेरा इलाजे, ग़म-ए-तन्हाई है,*
*तेरी फुर्कत ने परेशान किया है मुझको, अब तो मिल जा, के मेरी जान पे बन आई है,*
*दिलको भूली हुई यादों का सहारा दे दे, मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,*
*मेरे मेहबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..*

नायक-नायिका एकमेकांच्या प्रेमपाशात गुरफटत असतानाच अमिता या तिच्या मैत्रिणीच्या एकतर्फी प्रेमाची झालरही आहे या कथानकामध्ये. (आठवा 'मेरे मेहबूब में क्या नहीं..क्या नहीं..' हे गीत).. अशोककुमारची लिलावात निघालेली हवेली खरेदी करायला हवी म्हणून त्या रकमेसाठी अमिताची आई एक अट घालते.. अमिताशी सोयरीक कर.. वगैरे वगैरे.. अमिता आपल्या एकतर्फी प्रेमात काय आणि कशी कुर्बानी देते हा या चित्रपटाचा क्लायमॅक्स वेगळीच उंची गाठतो. 'मेरे मेहबूब' सुपरहिट झाला. गाणी तर सगळीच गाजली. 'ऐ हुस्न जरा जाग..', 'जानेमन इक नजर देख ले..', 'अल्ला बचाए नौजवानों से..', 'मेरे मेहबूब में क्या नहीं..', 'तेरे प्यार में दिलदार..', 'याद में तेरी जाग जाग के हम..', 'तुमसे इजहार-ए-हाल कर बैठे..', अशी एकाहून एक सरस गाणी. निर्माते रावेलजी या शीर्षकगीताच्या एवढ्या प्रेमात पडले की नवे अंतरे लिहून घेत लतादीदींकडून ते गाऊन घेतलं. चित्रपटात खास जागा निर्माण करून ते घुसवले. राजेंद्रकुमारला दिलीपकुमारची भ्रष्ट नक्कल म्हणून हिणवलं जायचं. 'गुंज उठी शहनाई'पेक्षा इथे तो अधिक चांगला अभिनय करतोय, भूमिका जगतोय असं वाटून जातं. त्याला 'ज्युबिली-स्टार' ही उपाधी बहुदा याच सिनेमानंतर मिळाली असेल का? राज कपूरचा 'संगम' हा सिनेमा 'मेरे मेहबूब'नंतर एक वर्षाने झळकला. 'दोस्त दोस्त ना रहा..' हे राज कपूरचं पियानोवरचं गाणं सुरू असताना राजेंद्रकुमारने आपल्या चेहऱ्यावर भावनांचा कल्लोळ असाच प्रभावीपणे पेश केलेला. 'जो उस गीतकारपर गुजरी उसने अपने गीत में कह दिया. मगर... मगर मेरे दोस्त, कुछ लोग ऐसे भी होते हैं.. जिनपे गुजरती है, मगर वो चूप रहते है..' या छोट्याश्या सीनमध्ये राजेंद्रकुमारने राज कपूरला कच्चा खाल्लाय. (हे माझं मत बरं का!) शायरचा कलाम, संगीतकाराची प्रतिभा, जीव ओतून गाणारा गायक आणि चेहऱ्यावर ते भाव तंतोतंत व्यक्त करणारा नायक, एखाद्या गाण्याला बावनकशी सोन्यासारखं कसं तळपवू शकतो याचं हे एक उत्तम उदाहरण..

*ढूंढता हूँ तुझे हर राह में हर महफ़िल में, थक गये है, मेरे मजबूर तमन्ना के कदम,*
*आज का दिन मेरी उम्मीद का है आख़री दिन, कल न जाने, मै कहाँ, और कहाँ तू हो सनम,*
*दो घडी अपनी निगाहों का सहारा दे दे, मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,*
*मेरे मेहबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..*

♥

## ४९ : मेरे मेहबूब तुझे..

चित्रपट : मेरे मेहबूब (१९६३)
दिग्दर्शक : एच. एस. रावेल
गायक : महंमद रफी
गीतकार : शकील बदायुनी
संगीत : नौशाद

मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम
फिर मुझे नरगिसी आँखो का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

भूल सकती नही आँखे वो सुहाना मंजर,
जब तेरा हुस्न मेरे इष्क से टकराया था,
और फिर राह में बिख़रे थे हजारों नग़में,
मैं वो नग़में तेरी आवाज को दे आया था,
साज़-ए-दिल को उन्हीं गीतों का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

याद है मुझको मेरी उम्र की पहली वो घडी,
तेरी आँखो से कोई जाम पिया था मैने,
मेरी रग-रग में कोई बर्कसी लहरायी थी,
जब तेरे मरमरी हाथों को छुआ था मैने,
आ मुझे फिर उन्हीं हाथों का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

मैने इक बार तेरी एक झलक देखी है,
मेरी हसरत है के मैं फिर तेरा दीदार करूं,
तेरे साये को समझकर मैं हँसी ताजमहल,
चाँदनी रात में, नजरों से तुझे प्यार करूं,
अपनी महकी हुई, जुल्फों का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

ढूंढता हूँ तुझे हर राह में हर महफिल में,
थक गये है, मेरे मजबूर तमन्ना के कदम,
आज का दिन मेरी उम्मीद का है आख़री दिन,
कल न जाने, मै कहाँ, और कहाँ तू हो सनम,
दो घडी अपनी निगाहों का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

सामने आ के जरा पर्दा उठा दे रूख से,
इक यहीं मेरा इलाजे, गम-ए-तन्हाई है,
तेरी फुर्कत ने परेशान किया है मुझको,
अब तो मिल जा, के मेरी जान पे बन आई है,
दिलको भूली हुआी यादों का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..
फिर मुझे नरगिसी आँखो का सहारा दे दे,
मेरा ख़ोया हुआ, रंगीन नजारा दे दे,
मेरे महबूब तुझे मेरी मुहब्बत की कसम..

(पहिल्या, तिसऱ्या आणि पाचव्या अंतऱ्याची चाल सारखी आहे.
दुसऱ्या आणि चौथ्या अंतऱ्यातील चाल वेगळी आहे.)

♥

या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.

| | |
|---|---|
| १. मेरे मेहबूब तुझे.. (ऑडिओ) | https://youtu.be/uatCyNzgL3o |
| २. मेरे मेहबूब तुझे.. (व्हिडिओ-१) | https://youtu.be/o-WzgHmelsA |
| ३. मेरे मेहबूब तुझे.. (व्हिडिओ-२) | https://youtu.be/xzPGBnKt8z0 |
| ४. मेरे मेहबूब तुझे..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/cEG0_DSKg68 |
| ५. चित्रपट : मेरे मेहबूब (१९६३) | https://youtu.be/lLT4RcMa2fo |

आता.. महंमद रफींशी संबंधित काही 'यू-ट्युब' लिंक्सचा बोनस.

| | |
|---|---|
| १. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-१ | https://youtu.be/q1kwUGvQY5Q |
| २. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-२ | https://youtu.be/OZa9XJ1bJtY |
| ३. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-३ | https://youtu.be/_qC-3-6pd1c |
| ४. महंमद रफी (लाईव्ह सादरीकरण-१) | https://youtu.be/DVDGo9hvEnM |
| ५. महंमद रफी (लाईव्ह सादरीकरण-२) | https://youtu.be/TE6e3eAtLSM |
| ६. महंमद रफी (दूरदर्शन-लाईव्ह) | https://youtu.be/VHsJxphnAF8 |
| ७. महंमद रफी (स्टुडिओतील एक आठवण) | https://youtu.be/mCyU2cNXjCs |
| ८. महंमद रफी, शंकर-जयकिशन नाईट | https://youtu.be/I7nAbmQ_Crg |

♥

## 50 : Mehbooba Mehbooba Bana Lo..

## ५० : मेहबूबा मेहबूबा बना लो मुझे दुल्हा..

सायकल मी वयाच्या सातव्या वर्षी शिकलो, ते ही लपून छपून. घराजवळच ती भाड्यानं मिळायची. चार आणे तास. तीन मित्र मिळून बजेट होताच तासाभरासाठी आणायचो. मैदानात एकमेकाला राऊंड देत मनमुराद फिरवायचो.. बस्स! सायकलशी आमची एवढीच जान-पहचान होती. कसरत तर दूर, आम्ही तर फास्ट चालवायलाही घाबरायचो. उन्हाळ्याच्या किंवा हिवाळ्याच्या सुट्टीत आमच्या चाळीजवळच्या मैदानात एक छोटी कनात उभी राहिली की समजायचं, आता सायकलवाला येणार! मध्ये उभारलेल्या छोट्या कनातीभोवती तीन किंवा चार दिवस तो अविरत गिरक्या मारणार. नॉन-स्टॉप! जोकरच्या नकला, सायकलवरच्या कसरती बघायला मिळणार! आश्चर्य आणि कुतुहल! आता तीन-चार दिवस मस्त टाईमपास! कमाल वाटायची. कसं जमत असेल बुवा? त्याचं जेवण-खाणं-आंघोळ-इतर आन्हिकं?.. सगळं सगळं सायकलवरच? तीन किंवा चार दिवस, शंभर तास सतत सायकल चालवण्याचा विक्रम?! हा सायकलवाला बहुदा सहकुटुंब यायचा. लाऊड-स्पीकर, लाईटिंग, सजावट! त्याच्या सोबत एखाद-दुसरा बुटका विनोदवीर किंवा सायकलवरच्या कसरती करणारा कलाकार असायचा. गरीब असायची ती मंडळी. ते कोणाची परवानगी घ्यायचे, कुणाच्या सपोर्टने यायचे, त्यांना कोण सुपारी द्यायचा, त्यांची व्यवस्था कोण बघायचा, एवढा जिवावरचा गेम खेळून त्याला नेमकं काय मिळायचं यातलं मला काही म्हणून काही ठाऊक नाहीय. कुणाला विचारावं तर ते त्यांना आत्ता आठवत नाहीय. पण आम्हा मुलांना हा प्रकार पहायला मजा वाटायची. धमाल यायची. एखाद्या भल्या पहाटे पूजा-अर्चना करून हा सायकलस्वार शक्यतो गुरूवारी-शुक्रवारी या तथाकथित विक्रमाला सुरूवात करे. मग तो संपूर्ण दिवस याच कौतुकात जाई. एकीकडे विक्रम करण्याची जबाबदारी शिरावर घेतलेला बंदा आपली सायकल निमुटपणे वर्तुळाकार फिरवत राही. बाजुला त्याचे साथी-कलाकार त्या विक्रमवीराला डिस्टर्ब, लुडबूड  होणार नाही याची काळजी घेत आपली कला सादर करीत. त्यांच्या नकला आणि कसरती पाहून लोक दौलतजादा करत असत. खास आयटमवर तर एक-दोन-पाच रूपयांच्या नोटांची खैरात होत असे. खूप गर्दी व्हायची हे पहायला. आम्हा पोरा-टोरांची जरा जास्तच. घरातली कामं आटोपली की आमच्या आया-बहिणी चाळीच्या गॅलरीतून पहायच्या. चालत्या सायकलवर ते चक्क कसरती आणि नृत्य करत. संध्याकाळी चार ते रात्री दहा वाजेपर्यंतचा वेळ कसा मजेत जायचा. रात्री दहानंतर गर्दी पांगायची. विक्रमवीर सायकल फिरवत रहायचा. रात्रीचं भोजन म्हणून त्याला मोसंबी वा तत्सम ज्यूसचा कोटा दिला जाई. त्याच्या कुटुंबातला एकेकजण आळीपाळीनं त्याच्यासाठी जागे. उघड्या मैदानावर झोपणाऱ्यांपैकी काहीजण त्याला साथ द्यायच्या निमित्ताने पत्ते कुटत बसायचे. रात्री दोन-तीन वाजता जाग आलीच तर आम्ही हटकून मैदानात नजर टाकायचो. एखादाच बल्ब सुरू असायचा आणि त्या उजेडात तो विक्रमवीर सायकल फिरवतच असायचा. थोडी स्लो-रमतगमत! दोन दिवस सरताच रविवार! हा दिवस शेवटचा. जणू कळसाध्याय. क्लायमॅक्स! या दिवशी सायकलवरच्या कसरती करणारा कलाकार, नकलाकार, बुटका विनोदवीर सगळेच अफलातून परफॉर्मन्स द्यायचे. एनर्जेटिक! माईंड-ब्लोईंग! माईकवर एकेक आयटम सांगितला की टाळ्या! शिट्ट्या! रात्री कुठल्याश्या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत त्या विक्रमवीराचा सत्कार केला जायचा. स्थानिक मंडळी त्यावेळीच बहुदा त्याला बक्षिसाच्या रूपात आर्थिक मदत देत असावेत. 'हमें काले हैं तो क्या हुआ..', 'हमको तुम पे प्यार आया..', 'फिरकीवाली तू कल फिर आना..', 'मेरे पैरों में घुंगरू बंधा दे, तो फिर मेरी चाल देख ले..', 'बडे मियाँ दीवाने..', 'दुनिया पागल है..', 'दुष्मन है जमाना ठेंगे से..', 'मस्त बहारो का मैं आशिक..', 'ये दिल न होता बेचारा..', ' मेहबूबा मेहबूबा बना लो मुझे दुल्हा..' अशी कैक गाणी सर्वप्रथम ऐकली ती याच दिवसात. ती जास्त सुपर-हिट केली असतील तर या सायकलवाल्यांनीच, असं माझं मत आहे. आम्ही अवघे आठेक वर्षांचे पण या गाण्यांनी आमच्यावर सॉलिड गारूड केलेलं. 'भोली सूरत..' या गाण्यात नुसते अंगविक्षेप होते, पण या गाण्यात थिरकणं होतं. 'मेहबूबा मेहबूबा बना लो मुझे दुल्हा..' हे गाणं इथेच पहिल्यांदा ऐकलेलं.. इतर गाण्यांच्या ठेक्यावर सायकल उडवत, कसरत करत नाचायचे. पण 'हमें काले हैं तो क्या हुआ..', आणि 'महेबुबा महेबुबा बना..'चं प्रकरण जरा वेगळं असायचं. अंगात साधीशी बनियान आणि खाली लुंगी गुंडाळलेला त्यांच्यातलाच एखादा कलाकार दे-धम्माल नाचायचा. मेहमूदसारखा मेक-अप.. हिटलरकट मिशी. दोन्ही गाण्यांवरचा नाच जवळपास सारखाच. तस्संच ते लुंगी उडवत नर्तन.. गाण्यातली भाषा कुठली होती कुणास ठाऊक पण त्या गाण्यांच्या चालीतून आणि संगीतातून जी उर्जा जाणवत होती ती सिंपली ग्रेट!

*अरे जुनियाऽऽ अरे किधर है रे तूऽऽ, मेरे दिल की रानी, मेरे नवासों की नानीऽऽ आ गया हूँ मैंईऽऽ*
*अरे देख ले मैं आ गया परमिशन लेकोऽऽ*
*मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला - २*

*चारमिनार छोडा, बेचको टांगा-घोडा, आया मैई दौडा दौडा,*
*खा भी लो राहम थोडा, मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला – २*

'हमें काले हैं तो क्या हुआ..' हे 'गुमनाम' (१९६५) मध्ये असल्याचा सुगावा लागलेला. तो प्रौढांसाठी आहे म्हणता निराश झालेलो आम्ही. ' मेहबूबा मेहबूबा बना लो मुझे दुल्हा..' हे आत्ताच लागलेल्या 'साधू और शेतान' (१९६८) मध्ये आहे असं वर्गात कुणीतरी बोललं. 'हमें काले हैं..'पेक्षा यात मटेरियल आहे आणि 'रेकॉर्ड-डान्स'साठी, स्पर्धेसाठी ते बसवायला चांगलं आहे असं आमच्यापेक्षा वयानं मोठ्या असलेल्या शेजारच्या दादानं सांगितलेलं. सायकलवाल्याकडच्या अंकलने दोन दिवस त्या गाण्यावर ठुमका लावलेला असल्याने आम्हाला डान्सचं बेसिक ट्रेनिंग तर मिळालं होतं. सफाई यायला, चित्रपटातलं मूळ गाणं बघणं गरजेचं होतं. तेव्हा 'टीव्ही' नव्हतेच त्यामुळे थिएटरला जाऊन तो पिक्चर बघणं क्रमप्राप्त होतं. एकदा, दोनदा किंवा मिळाल्यास आणखी जास्त वेळा.. बाबांच्या वयाच्या माणसांचा ओढा होता तो त्याकाळात लागलेल्या 'आँखें', 'नीलकमल', 'हसिना मान जाएगी', 'कन्यादान', 'मेरे हमदम मेरे दोस्त', 'मेरे हुजूर', 'सरस्वतीचंद्र', 'शिकार' याकडे. बच्चेकंपनीसकट जायचं तर 'पडोसन', 'राजा और रंक', 'दो कलियाँ', 'झुक गया आसमान', 'ब्रह्मचारी' होतेच की!.. इतका वाईड चॉईस होता तर 'साधू और शेतान'ला जायचं? मेहमूदच्या? तेही कुठे?.. तर 'मिनर्व्हा'ला? हा सिनेमा 'मिनर्व्हा' थिएटरला लागलेला. अगदी जुन्या 'मिनर्व्हा'ला. खटमलछाप 'मिनर्व्हा'ला! उठसूट सिनेमा बघायला जायचं अशी फॅशन नव्हती तेव्हा.. एखादा पाहिला तर बऱ्याच दिवसात दुसरा बघायचे चान्सेस लगेच यायचे नाहीत. 'पडोसन' आणि 'झुक गया आसमान' बघून झाले होते. 'रेकॉर्ड-डान्स'साठी हा सिनेमा बघायला लागणार हे कारण पुढे करून आम्ही मुलांनी हट्टच धरला. आईला मस्का मारला. काम झालं. दोन-तीन फॅमिली मिळून 'साधू और शेतान' बघायला गेलो एकदाचे 'मिनर्व्हा'ला. काय भकास वातावरण होतं तिथलं. सगळीकडे फळकुटांचे ढीग. जणू आवराआवरच चाललेली. एकदा का या सिनेमाने गाशा गुंडाळला की ते नूतनीकरणासाठी बंद होणार होतं, असं कळलं. अनिश्चित काळासाठी! ते चक्क पाडण्यात येणार होतं. (या चित्रपटानंतर 'मिनर्व्हा' थिएटर पाडण्यात आलं. नवी इमारत उभारण्यात आली. 'मिनर्व्हा'- प्राईड ऑफ महाराष्ट्र! नूतनीकरणानंतर एफ.सी.मेहरा (ईगल फिल्मस) या मिनर्व्हाच्या मालकांनी त्यांचा पहिला सिनेमा लावला तो 'लाल पत्थर' (१९७१)! पुढे 'शोले' लागला, गाजला तो इथेच. अतिशय महत्त्वाचं थिएटर असा नावलौकिक होता कित्येक वर्षे. (आता ते पुन्हा पाडण्यात आलंय. पत्रे लावलेत. तिथे काय होणारेय कुणास ठाऊक. पण सध्यातरी तिथे 'मिनर्व्हा'ची पुसटशी खूणही नाहीय.) 'साधू और शेतान' चांगला चालत असावा, कारण बरीच मंडळी होती थिएटरात. मला पक्कं आठवतंय.. आमच्यासोबतची मोठी माणसं एवढी खूष नव्हती इथे येण्यावर. फडतूस थिएटर असा समज होता त्यांच्या लेखी. आम्हा मुलांना दाखवायचा म्हणून आलेले ते. केवळ 'त्या' गाण्यासाठी! बाहेर असह्य उकाडा तर आत कोंडवाडा. तीन तासात घुसमटून जाऊ की काय अशा विवंचनेत आम्ही सीटवर बसलो. सर्टिफिकेट दाखवलं.. नंतर कार्टून स्टाईलच्या चित्रांसंगे टायटल्स दाखवल्या जाऊ लागल्या.. चार-पाच नावं वगळता सगळीच मद्रासी नावं.. खेळ सुरू झाला. सिनेमाची सुरुवातच झाली ती एका भजनानं. 'नंदलाल गोपाल दया कर के..' (गायिका आशा, उषा) बरं वाटलं. मेहमूद हीरो. कुणी मद्रासी नटी त्याची नायिका, (ही भारती बरं का!) विनोदवीर आणि गायक किशोरकुमारही होता. मेहमूद होता टॅक्सीवाला. ती नटी होती टीचर. टॅक्सीवाल्यांची असोसिएशन एक कार्यक्रम करायचं ठरवते. मेहमूद एक तिकिट तिच्या गळ्यात मारतो. तिकिटाचे पैसे घ्यायला म्हणून तिच्या घरी जातो. किशोरकुमार तिचा भाऊ. त्याची एन्ट्रीच मुळी सॉलिड आहे,. तो एक 'शास्त्रीय चीज' आळवताना दाखवलाय (पियाबीन काली नागिन रात..) तो गायक आहे, कलावंत आहे म्हणून महेमूद आता त्याला आपल्या कार्यक्रमात हिस्सा घ्यायला गळ घालतो. (चित्रपटात तो केवळ मध्ये-मध्ये हजेरी लावण्यापुरताच होता म्हणायचं. त्याला एकही गाणं नव्हतं हे विशेष.) किशोरकुमारला पटवताच आता महमूद त्या नटीलाही कार्यक्रमात भाग घ्यायला सांगतो.. सिनेमातलं नाटक सुरू होतं.. 'तांगेवालेका सपना' हैदराबादी स्टाईल! 'मेरेको चाय नको, कॉफी हुना..' अशा स्टाईलची भाषा.. हा चारमिनारका 'राम' नावाचा तांगेवाला मरतो. त्याचे प्राण न्यायला यमदूत येतो. त्याला स्वर्गात नेतो. स्वर्ग दाखवला जातो.. अरेच्चा! हा तर हूबहू 'झुक गया आसमान'सारखा वाटावा असा सीन. स्वर्गात जायचीही डिट्टो पोज! अमुक माणूस मरणं.. यमदूताच्या नजरचुकीमुळे तो दुसराच असणं. तिथे फक्त चित्रगुप्त तर इथे साक्षात यमराजाशी सामना. यमराज झालेत किशोरकुमार. महेमूद यमदूताला म्हणालेला असतो.. ये तो वो आसमानवाली फिल्म जैसाच है.. (म्हणजे कॉपी कबूल केलीय!) यमराजापुढे कैफियत मांडताना तो पुन्हा म्हणतो.. 'मैं मेरे गाँव में एक फिल्म देखा था उसमें भी ऐसीच मिस्टेक थी.. ' इतकं लहान असूनही आमच्या लक्षात आलं की (नाराज) मेहमूदने 'झुक गया आसमान'ची इथे खिल्ली उडवलीय. (विडंबनाच्या पाकात घोळलेला इरसाल अर्क सादर केलाय. डिलाइटफुल कॉमेडी केलीय.) इथे मृत मेहमूदसोबत नारद आहे जीवन! (तोच.. ज्याने शेकडो सिनेमातून हाच किरदार निभावलाय.) बोनस म्हणून देवलोक.. लक्ष्मी-नारायण, शंकर-पार्वती आहेत (तेच.. ज्यांनी धार्मिक-पौराणिक सिनेमातून त्याच भूमिका केल्या आहेत) व्वा!

बहोत खूब! यमराज त्याला सोमरस पाजतात. दुसऱ्याच्या शरीरात जाईन पण मला सुंदरी 'जुनिया'ला भेटवा.. तथास्तु! आता स्वर्गात महेमूद हे गाणं गायला लागतो. (डिट्टो तस्संच! 'गुमनाम'च्या गाण्यात दिसलेल्या तशा प्रकारच्याच एका सेटवर.)

*धत् तेरे गेसूँ, उफ् तेरी अँख्या, हाय तेरी बातां.. पी जाऊँ घोलको..*
*उफ् तेरी मस्ती, उफ् तेरा जलवा, मरगा मरगा मैई, बिका बिना मोलको, बिका बिना मोलको..*
*अब के जो मुँह हो मोडा, अब के जो दिलको तोडा, अम्मा की खसम खाको, खा लुँगा जहर थोडा.. मेहबूबा..*

सबकुछ मेहमूद अशी ती स्टोरी पुढे सरकत होती. आणि.. मोजून पस्तीसाव्या मिनिटाला आम्हाला हवं ते गाणं लागलं होतं. का कोण जाणे, मेहमूदच्या या गाण्यानंतर बरंचसं पब्लिक उठून गेलं. पिक्चरच्या स्टोरीत दम नाही की काय? का गेले हे लोक? मी आजुबाजुला पाहिलं. ज्यांना पुढचा सिनेमा पहायचा होता ते मुकाट बसले होते. पैसा वस्सूल करायला! सिनेमात तसा दम होता. एक टॅक्सीवाला. एक साधुराम (ओमप्रकाश) नावाचा संतप्रवृतीचा बँक-कॅशियर.. तो फसवला जातो. प्राण पूर्ण सिनेमात आहे पण जिवंत अवस्थेत त्याला इथे मोजकेच संवाद आहेत, बाकी पिक्चर संपेपर्यंत त्याची लाशच दिसते! टॅक्सीतली! रहस्य असं नाही.. निव्वळ टाईमपास! मेहमूदचं ते झकास नर्तन, रफीसाहेबांचं गाणं मनात साठवून, ओठावर गुणगुणत आम्ही घरी परतलो. पुढे शेजारच्या सुरेशदादानं, जो आमचा कोरिओग्राफर होता त्याने हा सिनेमा चारदा दाखवला. स्वखर्चानं! पासष्ट पैशांच्या तिकिटात. गाणं पक्कं मनावर ठसावं म्हणून! सिनेमा दोनदा पाहिला. पण तिसऱ्यांदा मात्र हे गाणं संपताच मात्र आम्ही घरची वाट धरली. सिनेमाची स्टोरी माहीत असल्याने चावून चावून रवंथ करण्यात इन्टरेस्ट नव्हता..

१९८२-८३च्या दरम्यान १६एमएमवरच्या सिनेमाचं फॅड संपलं. 'व्हीसीआर'ने त्याची जागा घेतली. हा धंदा चांगलाच फोफावला होता. 'व्हीसीआर'चा जमाना येताच चाळीतल्या वीस खोल्यांतून वर्गणी काढून टीव्ही-व्हीसीआर एका रात्रीसाठी भाड्याने आणला जायचा. कुणाकडे पूजा वगैरे असली तरी करमणुक म्हणून तो आणला जायचा. संपूर्ण रात्र जागून तीन-चार सिनेमे बघायचे लोक. या ज्वराने आम्हालाही पछाडलेलं. मजा यायची. झुक गया आसमान, साधू और शैतान.. एकामागोमाग एक बघितले. पुनर्भेटीचा आनंद मिळाला. 'झुक गया आसमान' (१९६८) हा आर.डी. बन्सल प्रॉडक्शन्सचा. लेख टंडन दिग्दर्शक होते. ओंकारसाहेब नामक हस्तीची कथा आणि पटकथा होती. व्दारका दिवेचांचं छायांकन आणि बाबुभाई उदेशींचे ट्रीक-सीन्स असलेला हा म्युझिकल-हिट! (हा सिनेमा 'हिअर कम्स मिस्टर जॉर्डन' (१९४१) या हॉलिवूडपटाचा रीमेक होता.) शंकर-जयकिशनजींचं संगीत असलेला 'झुक गया आसमान' कुणालाही आवडेल असाच होता. कथानकात पहिल्या पाऊण तासातच हीरोचा खेळ खल्लास! स्वर्गात चित्रगुप्ताच्या खातेवहीत डी.के.साहेब (पुन्हा राजेंद्रकुमार-हमशकल) या बॅड-मॅनचा मृत्यू लिहिलेला असतो पण यमदूताच्या नजरचुकीमुळे संजयकुमारचे (राजेंद्रकुमार) प्राण हरण करून आणले जातात. ही चुकीची मिस्टेक निस्तरायला शेवटी संजयकुमार या गुड-बॉयच्या आत्म्याला डी.के.साहेब या बॅड-बॉयच्या शरीरात मजबुरीने प्रवेश करावा लागतो.. शरीर मिथ्या आहे.. सत्य तो आत्मा है वगैरे वगैरे.. एकामागोमाग येणाऱ्या सर्वांगसुंदर गाण्यांच्या नशेत कथानक चांगलंच खुलतं..

'साधू और शैतान' हा सिनेमा ए. भीमसिंग आणि एन.सी.सिप्पींचा. उसीलाई सोमनाथन या कुणा दक्षिण भारतीय लेखकाचं कथानक. ए. भीमसिंगचीच पटकथा आणि दिग्दर्शन. 'टॅक्सीतली लाश' या एकाच गोष्टीला केंद्रस्थानी ठेऊन कथानक फिरतं. प्रेताचा विषय असूनही कॉमेडी करतं. मेहमूदचे बहारीचे दिवस होते. तो ज्या सिनेमाला हात लावायचा त्याचं सोनं होत होतं. साईड-रोल असूनही त्याच्यावर जी जी गाणी चित्रित झाली होती ती ती गाजत होती. तो खूप मोठा स्टार झालेला जणू. 'साधू और शैतान' म्हणजे सबकुछ महेमूद! त्याचं तीन वर्षांपूवीचं 'गुमनाम'मधलं 'हमें काले हैं तो क्या हुआ..' चांगलंच गाजलेलं. आपल्या या सिनेमात असंच एखादं हैदराबादी स्टाईलचं धम्माल गाणं करून टाकूया असं मेहमूदने सुचवलं. सर्वांनाच ती कल्पना अतिशय आवडली.. गीतकार शैलेंद्रजींनी 'तंदाना' हा ज्ञात असलेला एकच तकिया-कलाम वापरून सरस गाणं लिहिलं असेल पण आता नवं करतोच आहोत तर त्यात जरा आणखी मजा येऊ देत. गाण्यातले अंतरे तगडे होऊदेत.. गाणं जरा जास्त सरस, अधिक नमकीन करा असा आदेश दिला जणू गीतकार राजेंद्रकृष्णजींना. युनिटमध्ये हैदराबादी लोक आहेत. घ्या फायदा त्यांचा. लक्ष्मीकांत-प्यारेलालजींनी धुनांचा कीस पाडला. गीतकार राजेंद्रकृष्णजींनी काव्य तर मस्तच जमवून आणलेलं. गाण्यात हैदराबादी टच हवा म्हणून युनिटमधल्याच एका माणसाने (नाव माहीत नाही) काव्यावर हैदराबादी संस्कार केले म्हणतात. गाणं तर तयार झालं होतं पण मात्र एक प्रॉब्लेम होता. नायक असलेला मेहमूद इथे टॅक्सीवाल्याच्या भूमिकेत आहे. तो सतत पांढऱ्या शुभ्र युनिफॉर्ममध्ये वावरताना दाखवलाय. त्याची ही भूमिका विनोदी असली तरी क्लीन म्हणावी अशीच. त्याच्यावर हैदराबादी स्टाईलचं गाणं? हे कसं

काय जमणार बुवा! डबल-रोल टाकायचा का? पण त्याने ठिगळ लावल्यासारखं वाटेल.. 'ड्रीम-सिक्वेन्स' केला तर? येस! पण नेहमी स्वच्छ पांढऱ्या युनिफॉर्ममध्ये असणारा माणूस स्वप्ने पाहणार ती राजा महाराजांची, श्रीमंत होण्याची.. तो 'हमें काले हैं..' सारख्या मळकट कपड्यातली कळकट स्वप्नं कशाला बघेल? सिनेमात एक कार्यक्रम होताना दाखवूया, असं ठरलं. स्टेजवर! इतक्यात परीक्षेचा पेपर फुटतो तसा 'झुक गया आसमान'मधल्या सीनचा फंडा माहीत झाला. 'झुक गया आसमान' त्या वर्षाच्या सुरुवातीलाच लागलेला. या कथानकातली स्वर्ग-लोकीची फॅन्टॅसी या लोकांना भूल पाडून गेली की काय, ख़ुदा जाने! पण ती कन्सेप्ट या लोकांनी अक्षरशः ढापली. या सीनची खिल्ली उडवून कुणाला ख़ुन्नस काढायचा होता, काही प्रॉब्लेम होता हे त्यांचं त्यांना माहीत. आगे-पिछे काहीतरी हवं म्हणून त्या सीनसाठी छोटंसं कथानक लिहिलं. कल्पना उचलली असली तरी पेशकश वेगळी वाटावी, तो सीन थोडा विनोदीही व्हायला हवा म्हणून त्या प्रसंगाला थोडं पॉलिश केलं. घासून-पुसून लख्खं केलं. पदरचे संवाद घातले. पाहुणा कलाकार म्हणून किशोरकुमार हाताशी होताच, त्याला यमराजाची वस्त्रे चढवली. 'ड्रीम-सिक्वेन्स' शेवटी फायनल झाला. ज्या मिनू कात्रकजींच्या स्टुडिओत 'हमें काले हैं..' रेकॉर्ड झालेलं, नेमकं तिथेच 'महेबूबा, महेबूबा..' ध्वनिमुद्रित झालं. शूट होईल तेव्हा मेहमूदच्या सादरीकरणाबद्दल चिंता नव्हती. पण ज्या आवाजातून ते गायलं जाणार आहे ते महत्त्वाचं होतं. गाण्यात उर्जा होती. आक्रमक पवित्रा हवा होता. तमाम प्रेक्षकांना गाण्यातले उच्चार थोडे विचित्र वाटणार होते.. पण वाटेना का! हैदराबादी बिर्याणी जशी त्यांनी आपलीशी केली तसं हे हैदराबादी टच् असलेलं गाणं आवडण्यात काहीच अडचण नव्हती. गाण्यात दम होता. ते गाजण्याचे सेंट-परसेंट चान्सेस होते. रफीसाहेबांनी ते शिवधनुष्य पेललं. डोंगरीला शेजारी-पाजारी हैदराबादी वस्ती असल्याने त्यांचं ते हेल काढून बोलणं रफींना माहीत होतं. त्या भाषेत ते त्या लोकांशी बोलायचेही. मेहमूदची ती तर जणू बोलीभाषाच. लक्ष्मीकांत (कुडाळकर) आणि प्यारेभाई (शर्मा) त्यामुळे रिलॅक्स झाले. रफी मस्तच गायले. असा परफॉर्मन्स दिलाय की मान गये उस्ताद! मेहमूदने त्याच्या वाट्याचं संवादात्मक चांगलंच म्हटलं. गीतकार राजेंद्रकृष्णजींनी गाण्यात आणलेली 'थॉट' बघा. रफीसाहेबांनी जसे उच्चार केलेत ते ऐकून अजीब वाटतात खरे पण या गाण्यात तीच तर गंमत आहे, शब्दांचा अर्थ समजला की कशी मजा येते पहा.. पाय आपोआप ठेका धरू लागतात.. हैदराबादी चवीचं हे हिन्दी गाणं आपल्या नकळत आपलंच होऊन जातं..

*ना तुमें आतै, न हमको बुलातै, अजी जी को जलातै, थपक लुँगा देखना..*
*ऐसा क्यूँ करतै, जुल्म क्यूँ ढाँतै, क्या नखरा दिखातै, थपक लुँगा देखना, थपक लुँगा देखना..*
*काय के ये लटका, काय के ये झटका, काय के ये मटका, कर ल्योव दिल चौडा..*
*मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला..*

♥

**या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व 'ऑडिओ', 'व्हिडिओ आणि कराओके' यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स.**

| | |
|---|---|
| १. मेहबूबा मेहबूबा, बनालो.. (ऑडिओ) | https://youtu.be/mwyevT_vgTI |
| २. मेहबूबा मेहबूबा, बनालो.. (व्हिडिओ) | https://youtu.be/mwyevT_vgTI |
| ३. मेहबूबा मेहबूबा, बनालो..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/Q7wpHUGmAB0 |
| ४. चित्रपट : **साधू और शैतान** (१९६३) | https://youtu.be/fa_kUOPq8JU |
| ५. मेहमूद (सुपरहिटस्) | https://youtu.be/wZbH_8PN9ac |
| ६. मेहबूबा मेहबूबा, बना लो.. (ज्युनियर मेहमूद) | https://youtu.be/UGfD21oVErk |

♥

## ५० : मेहबूबा मेहबूबा बना लो मुझे दुल्हा..

चित्रपट : साधू और शैतान (१९६८)
निर्माता : ए. भीमसिंग आणि एन.सी.सिप्पी
दिग्दर्शक : ए. भीमसिंग
गायक : महंमद रफी आणि मेहमूद
गीतकार : राजेंद्रकृष्ण
संगीत : लक्ष्मीकांत-प्यारेलाल

मेहमूद : अरे जुनियाss अरे किधर है रे तूss, मेरे दिल की रानी,
मेरे नवासों की नानीss आ गया हूँ मैईss
अरे देख ले मैं आ गया परमिशन लेकोss
रफी : मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला - २
चारमिनार छोडा, बेचको टांगा-घोडा, आया मैई दौडा दौडा,
खा भी लो राहम थोडा,
मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला - २

रफी : धत् तेरे गेसूँ, उफ् तेरी अँख्या, हाय तेरी बातां पी जाऊँ घोलकोss
उफ् तेरी मस्ती, उफ् तेरा जलवा, मरगा मरगा मैई,
बिका बिना मोलको, बिका बिना मोलकोss
अब के जो मुँह हो मोडा, अब के जो दिलको तोडा
अम्मा की खसम खाको, खा लुँगा जहर थोडाss
मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला - २

मेहमूद : आहाहाss क्या थिरक रही तूमें! जो उपर कौनसा डान्समास्टर आ गया,
जिस्से सिख लिया तूमेंss दाता क्या दिखा रही! नजदिक आ जी!
नखरे कर रहींss थपक लुँगा..

रफी : ना तुमें आतै, न हमको बुलातै, अजी जी को जलातै, थपक लुँगा देखनाss
ऐसा क्यूँ करतै, जुल्म क्यूँ ढाँतै, क्या नखरा दिखातै,
थपक लुँगा देखना, थपक लुँगा देखनाss
काय के ये लटका, काय के ये झटका,
काय के ये मटका, कर ल्योव दिल चौडाss
मेहबूबा मेहबूबा, बना ल्यो म्युजे दुल्हा, जला द्यो मेरा चूला - २

मेहमूद : चूला जला दो जीss अजी घासलेट डालको फूँक डालो ना
निच्चेसे माचिस की कांडी लाऊँ क्या? अपने हाथासे खाना बना दो,
मुझें खिलाना.. अरे मेरी रानी.. अरे च्युनियाss, कहाँ जा रही तुमें
वापस आss पलट, पलट, पलट, पलट, पलट, पलट...
(हे गाणं हैदराबादी हिन्दी स्टाईलचं आहे. गाण्यात जसे उच्चार आहेत तसेच ते लिहिले आहेत.)

♥

## 51 : Shatada Prem Karave..

## ५१ : शतदा प्रेम करावे!

'जरा आत येता का?'
'अगं थांब! काय चीज बांधलीय पठ्ठ्यानं! जरा ऐकूनच येतो..'
आई तिथेच चुळबुळ करत उभी. मैफल रंगात आलेली. विलक्षण स्वरमय वातावरणात रामूभय्या आकंठ बुडालेले, तर उपस्थित दहा-बाराजण मंत्रमुग्ध होऊन त्या कलाकाराला सच्चेपणाने दाद देण्यात गुंतलेले.. अशा माहौलमध्ये डिस्टर्ब? रामूभय्यांनी चटकन आत यावं म्हणून आई दबक्या आवाजात धीर करून पुन्हा म्हणाली..
'अरू.. नापास झालाय!!'
रामूभय्या मांडीवर ताल देत निर्विकारपणे पुटपुटले.. 'मग काय!.. होईल पुढच्या वर्षी पास!!'
'अहो, रडतोय तो आत..'
काय शिंची कटकट आहे अशा अविर्भावात बाबा उठले. आत आले. अरू बिचारा मान खाली घालून आसवं ढाळतोय. तो नापास झाल्याची मनहूस खबर घेऊन आलेला त्याचा मित्र कोपऱ्यात अंग चोरून उभा होता.
'इंजिनीयरिंगचा अभ्यास सोडून देणारेय मी. गाणंदेखील! गाण्यामुळे शिक्षण आणि शिक्षणामुळे गाणं दोन्ही जमत नाहीय, हवं तसं! नोकरी करायचं ठरवलंय मी!'
'अरू! अरे वेडा का तू?.. रडतोस कशाला? खरं तर मी रडायला हवं.. पण मी तर आनंदात आहे. परवा ज्या दोन गजला गायलास ना! फार छान म्हटल्यास. इतक्या, की त्यापुढे तुझं हे नापास होणं, दुःखाचं वाटत नाहीय मला. किती मुलं आहेत रे तुझ्या वर्गात? वीस मुलं! होय ना? समज! एकोणीस पास झालीत आणि तू नापास झालायस! पण..पण तुझ्यासारखं गाणं म्हणू शकतील असे कितीजण आहेत?'
'कुणीच नाही.. सगळेच हुशार आणि अभ्यासू आहेत..'
'होय ना? हिन्दुस्थानात इंजिनीयर्स, डॉक्टर्स किती आणि लता, किशोरी आणि कुमार गंधर्व किती? उद्या तू चांगलं गाऊ लागलास की नाव होईल तुझं.. इंजिनीयरला त्याची कंपनी किंवा त्या व्यवसायातले लोक वगळता एरवी कोण विचारतो? एकोणीस एकीकडे असतील आणि तू एकीकडे - नामवंत गायक म्हणून. पुढच्या वर्षी पास होशीलच तू, त्यामुळे गाणं किंवा शिक्षण सोडण्याचा विचारसुध्दा करू नकोस..समजलं?..'
अरूच्या (म्हणजे आपले अरूणजी दाते) डोळ्यातलं पाणी थांबलं होतं. बाबा जवळ घेऊन पाठीवर थोपटत सांत्वन करत होते.. नापास झाल्याची खबर घेऊन आलेला त्यांचा मित्र जागच्या-जागी थिजला होता. बाबांनी सदऱ्याच्या खिशातून पैसे काढले..
'जरा इकडे ये.. हं.. जा, मिठाई घेऊन ये आणि सर्वांना वाट. आमचा अरू सुंदर गजला गायला लागला आहे त्याबद्दल मिठाई हवीच, नाही का?' अरूणजी मनोमन सुखावले. आई-बाबांना मन लावून गाणं शिकेन आणि अभ्यासही मनापासून करेन असं वचन दिलं. इंजिनीयर तर ते झालेच. गायक म्हणूनही संगीताच्या आकाशात शुक्रताऱ्याप्रमाणे तळपू लागले.

मायूस झालेल्या आपल्या मुलाला आणखी नामोहरम करत वेताच्या छडीनं फोडून काढणारे 'बाप' आणि अरूण दातेंच्या वडिलांनी त्याचा कलेतला हौसला बुलंद करण्यासाठी दिलेला 'डोस' यात किती अर्थ सामावलेला आहे पहा. शायर इक्बालने म्हटल्याप्रमाणे.. 'ख़ुदी को कर बुलंद इतना, के हर तहरीर से पहले, ख़ुदा बंदे से ख़ुद पुछे- बता तेरी रजा क्या है!' ('ख़ुदी' म्हणजे अहंकार ना!, ख़ुद ही असं का नाही म्हणत! बरं.. तकदीर नव्हे, खरं तर तहरीर! तकदीर म्हणजे नशीब, भाग्य आणि तहरीर म्हणजे लेख.. ललाटलेख अशा अर्थी! पक्षी, शायर निदां फाजली.) अरूण दातेजींच्या मते कविश्रेष्ठ मंगेश पाडगांवकरांनी लिहिलेलं 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे..' हे गाणं अशाच काहीशा तत्त्वज्ञानावर बेतलंय खरं. रडत, रखडत आयुष्याचं गाठोडं खांद्यावर घेऊन दमछाक करण्याइतकं बकवास आयुष्य जगण्यापेक्षा मिळालेल्या गोष्टीत समाधान शोधण्यातच हशील आहे, नाही का? पाडगांवकरजींची कित्येक प्रेमगीतं, विरहगीतं अरूणजी गायलेत, पण आयुष्यावर मार्मिकपणे भाष्य करणारं हे गाणं, आपल्या प्रत्येकाच्या आयुष्याला किती समर्पकपणे फिट्ट बसतं आणि आपल्यात कसं स्फुल्लिंग जागृत करतं.. पहा..

*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..*
*चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती -२*

*हिरवे हिरवे प्राण तशी ही, रुजून आली पाती,*
*फुले लाजरी, बघून कुणाचे-२,  हळवे ओठ स्मरावेऽऽ*
*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..*

कुदरत के बेमिसाल करिष्मेपर पाडगांवकरांचं मन फिदा झालेलं दिसतंय, नाही? यशवंत देवसाहेबांची पहिल्या कडव्यातली चाल आता दुसऱ्या अंतऱ्यात कशी मस्त अंगडाई घेतेय पहा. काव्यातील आशयसंपन्न शब्दांना परिपोषक अशी वातावरणनिर्मिती, संगीत संयोजनातून किती उत्कटपणे व्यक्त होऊ शकते ते पहा. व्हायोलिनचा ताफा, बासरीचे सूर आणि मस्त ठेक्यावर सतारीचा थिरकता साज!

*रंगांचा उघडुनिया पंखा, सांज कुणी ही केली - २*
*काळोखाच्या दारावरती - २, नक्षत्रांच्या वेली,*
*सहा ऋतुंचे, सहा सोहळेऽऽ - २, येथे भान हरावे*
*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..*

अरूणजींचं भावगीत-गायन म्हणजे साक्षात पर्वणी असते आपणां रसिकांसाठी. पण टीकाकार का गप्प बसतात? कुठल्याही गोष्टीला नावं ठेवायची हा वसा घेतलेली मंडळी म्हणायची - 'दातेसाहेब सगळीच भावगीत गातात. भक्तिगीतं किंवा भजनं का नाही?' वास्तविक भजनं गाण्याच्या विरोधात कधीच नव्हते अरूणजी. पण वाट्याला भावगीतंच येत गेली आणि मुख्य म्हणजे ती सगळीच लोकप्रिय झाली. संपूर्ण कलाकीर्दीत (कवि शांताराम नांदगांवकर, संगीत : अनिल मोहिले यांचं 'श्रीरंग सावळा तू मी गौरकाय राधा..' हे कृष्णा कल्लेबरोबर गायलेलं युगलगीत, भजन नाहीय पण ते वगळता) तर एकमेव भजन केलं त्यांनी! (अविरत ओठी यावे नाम, श्रीराम जय राम, जय जय राम.. - लिंक दिल्या आहेत.) पण.. ते करण्याआधी टीकाकारांच्या अस्त्रांनी घायाळ अशा अरूणजींना, पुलंनी काय सांगितलं होतं ठाऊकेय? 'अरे, हे टीकाकार म्हणजे बोहारणींची पोरं असतात. घरातल्या फाटक्या कपड्यांऐवजी अगदी आदल्या दिवशी घेतलेला भरजरी बनारसी शालू टाका त्यांच्या पुढ्यात! दुसरं काहीतरी चांगलं-धडकं, नवीन दाखवा म्हणतील लेकाचे!' आयुष्यात टीकाकार, किंवा अनवधानाने चुकलेल्या आपल्या छोट्याश्या गोष्टीलाही अधोरेखीत करून, त्याचाच बाऊ करणारे चिक्कार असतात अवतीभवती. (तुम्हाला ठाऊकच आहे. भारतानं क्रिकेटचा सामना जी-तोड मेहनत करून मोठ्या फरकानं जिंकला की हे महाभाग म्हणतात.. 'छ्याऽऽ!!, मजा नही आया! गेम, वन-साईडेड हो गया यार!', दुर्दैवानं तो सामना हरला की हेच लोक म्हणतात. 'शायद फिक्सिंग होयेगा! सालोंने नाक कटवा दी. सचिनला रिटायर हो म्हणावं!') या कवितेत पाडगांवकरांनी कसलेही दाखले दिलेले नाहीत. कुणावर आसूड ओढलेले नाहीत. या काव्यातून आपला-आपण अर्थ शोधला तर कविवर्यांनी जीवनातल्या विविध पैलूवर फॅन्टॅसीचा आधार घेत मार्मिकपणे टोले हाणलेत असं नाही वाटत?

*बाळाच्या चिमण्या ओठातून -२, हाक बोबडी येते..*
*बाळाच्या चिमण्या ओठातून, हाक बोबडी येते..*
*वेलीवरती प्रेम प्रियेचे, जन्म फुलांनी घेते,*
*नदीच्या काठी सजणासाठी -२, गाणे गात झुरावे..*
*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..*

इंदौरसंस्थानी होळकर सरकार होतं. अरूणजींचे पिताजी रामूभय्या दाते हा रसिकाग्रणी इंदौरच्या सुरांच्या दुनियेतला सरताज होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे राजवाड्यावर निमंत्रित असलेले सन्माननीय गायक-गायिका-वादक-नर्तक आधी रामूभय्यांच्या उंबरठ्याला स्पर्श करून त्यांचा आशीर्वाद घ्यायचे. त्यांचं इथे आगत-स्वागत होई. ते आवडीनं तिथं मैफल करायचे. चिमुकल्या श्रोत्याच्या भूमिकेतला अरू त्यामुळेच गायनकलेकडे आकर्षित झाला. तो या गायनक्षेत्राकडे वळला काय, यशाची एकेक पायरी चढत शुक्रताऱ्याचं उत्तुंग स्थान मिळवता झाला काय! वाटेवर मऊ गालिचाच नव्हता प्रत्येक वेळी. काटेही वेचावे लागले.. पण दमछाक होऊ दिली नाही.. कारण पिताजींचं प्रेमळ प्रोत्साहन!.. ख़ुदी को कर बुलंद इतना.. असा हौसला. पाडगांवकरांनी शेवटच्या कडव्यात असंच काहीतरी गहिरं सांगितलंय..

*या ओठांनी चुंबुन घेईन हजारदा ही माती -२*
*अनंत मरणे झेलून घ्यावी -२, इथल्या जगण्यासाठी,*
*इथल्या पिंपळपानावरती - २, अवघे विश्व तरावे..*

*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..*

अरूणजी म्हणाले.. ‘ एक चिनी लोककथा आठवतेय या क्षणी.. एक गाव. तिथले दोन गरीब मित्र. परिस्थिती हलाखीची.. अनवाणी, उपाशी फिरताना रस्त्यात दोन रूपये सापडतात. हळूच ते उचलून घेत तो म्हणतो.. ‘बघ, दोन रूपये सापडलेयत..भरपेट जेवून घेऊया..’ दुसरा लगेच म्हणाला..‘थांब! दोन्ही रूपयांचं जेवण नको आणूस. एक रूपयात जेवढं येईल तेवढं अन्न आण.. आणि एक रूपयाची फुलं..’

‘फुलं?.. ती रे कशाला?’

‘अन्न आपल्याला जगवेल!.. आणि कशासाठी जगायचं ते ती फुलं सांगतील!’

♥

सन्मा. अरूण दातेसाहेबांच्या गाण्याशी संबंधित उपलब्ध झालेल्या सर्व ‘ऑडिओ’, ‘व्हिडिओ आणि कराओके’ यांच्या ‘यू-ट्युब’ लिंक्स.

| | |
|---|---|
| १. शतदा प्रेम करावे.. (ऑडिओ-१) | https://youtu.be/ky0osqfJPDE |
| २. शतदा प्रेम करावे.. (ऑडिओ-२) | https://youtu.be/j4Qhx36ku7A |
| ३. शतदा प्रेम करावे..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/2FA0kj3KYkw |
| ४. अरूण दातेसाहेब (सुपरहिटस्) | https://youtu.be/S3Vee6DjK-8 |
| ५. आकाशगंगा (व्हीनसचा अल्बम) | https://youtu.be/uB8jKp6lxkg |
| ६. अरूण दातेसाहेब (रेडिओ क्लासिक शो) | https://youtu.be/kQwAZBKPlM4 |
| ७. अरूण दातेसाहेब (भावगीते) | https://youtu.be/NsC9_Gwakm8 |
| ८. कविराज मंगेश पाडगांवकर (शतदा प्रेम करावे-कविता) | https://youtu.be/Ewxv8PwbYSQ |
| ९. श्रीराम जय राम.. (अरूण दाते-भक्तिगीत) | https://youtu.be/Ms8lSRO_NdU |
| १०. श्रीरंग सावळा तू.. (ऑडिओ) | https://youtu.be/Q5OpYTAtawI |

♥

## ५१ : शतदा प्रेम करावे

गायक : अरूण दाते
गीतकार : मंगेश पाडगांवकर
संगीत : यशवंत देव

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..
शतदा प्रेम करावे-२
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..

चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती -२
हिरवे हिरवे प्राण तशी ही, रुजून आली पाती,
फुले लाजरी, बघून कुणाचे-२, हळवे ओठ स्मरावेss
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..

रंगांचा उघडुनिया पंखा, सांज कुणी ही केली - २
काळोखाच्या दारावरती - २, नक्षत्रांच्या वेली,
सहा ॠतुंचे, सहा सोहळेSS - २, येथे भान हरावे
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..

बाळाच्या चिमण्या ओठातून -२, हाक बोबडी येतेss
बाळाच्या चिमण्या ओठातून, हाक बोबडी येतेss
वेलीवरती प्रेम प्रियेचे, जन्म फुलांनी घेते,
नदीच्या काठी सजणासाठी -२, गाणे गात झुरावेss
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..

या ओठांनी चुंबुन घेईन हजारदा ही माती -२
अनंत मरणे झेलून घ्यावी -२, इथल्या जगण्यासाठी,
इथल्या पिंपळपानावरती - २, अवघे विश्व तरावेss
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..
शतदा प्रेम करावे-२
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे..
शतदा प्रेम करावे- ३

♥

## 52 : Karaoke Club



# आपला स्वत:चा कराओके क्लब

आवडीचं गाणं म्हणता आपण ते गुणगुणतोच. हौसेला मोल नसतं. हल्ली 'ॲमेझॉन' सारख्या साईटस्‌वर तसेच 'इलेक्टॉनिक्स' दुकानांमध्ये 'कराओके ब्ल्यू-टुथ माईक्स' अगदी अत्यल्प किंमतीत सर्रास मिळू लागलेत. जे आपल्या मोबाईलच्या 'ब्ल्यू-टुथ'शी कनेक्ट होतात. भले ते टिकाऊ नसतीलही, परंतु ते आपला गाण्याचा छंद नक्कीच जोपासतात. ही गोष्ट लक्षात घेऊन उपलब्ध झालेल्या सर्व 'यू-ट्युब' लिंक्स देत आहे..





('व्हिडिओ कराओके ट्रॅक्सची' प्ले-लिस्ट पहा, आपले आवडते गाणे निवडा आणि सदर 'कराओके माईक' आपल्या मोबाईलच्या 'ब्ल्यू-टुथ'शी कनेक्ट करून मनसोक्त गा.)

०१. हिंदी चित्रपट गीते - व्हिडिओ कराओके ट्रॅक्स (सुमारे १९९४ गाणी):
https://www.youtube.com/playlist?list=PL213D03AC396296D6

०२. हिंदी चित्रपटगीते - व्हिडिओ कराओके ट्रॅक्स (४१६ गाणी):
https://www.youtube.com/playlist?list=PLqmyrg-fPmgAnf_NFreMuoWWL7D1bVHse

०३. किशोरकुमार - कराओके ट्रॅक्स :
https://www.youtube.com/playlist?list=PL0KuC4SCB5tRMDUVXfIW0kWzEYJb8xRnv

०४. महंमद रफी - कराओके ट्रॅक्स :
https://www.youtube.com/playlist?list=PLp5QdUI4R30fda0N8es6an7o3P0Oq3TRh

०५. मुकेश - कराओके ट्रॅक्स :
https://www.youtube.com/playlist?list=PLLslizi6EXQ3fy3nHjrAOnUGWBxxN9xbH

०६. महेंद्र  कपूर - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLy8flCElsXJv22OdZoP7lR1QepFPTBExJ

०७. महेंद्र  कपूर - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PL8XAFwYHVKblC30ShbBY6SA7PsXwPTKJQ

०८. डॉ. येसुदास - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PL7uPRgOb1WTYJ5EbZv89uDxx4e8DJdwTl

०९. डॉ. एस. पी. बालसुब्रमण्यम - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PL7uPRgOb1WTZ1eOG7jMnrnYYrCjZp_li9

१०. हेमंतकुमार - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLsoWIWU4pYsOpMwRySF4KxPucxA86lBgB

११. लता मंगेशकर - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLkJQbWdVOPR4W6thFj3um04ZWqSm4G1Mb

१२. आशा भोसले - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLqmyrg-fPmgBHrl27F_CeD_w5zqQS0WTp

१३. मन्ना डे - कराओके ट्रॅक्स - १:

https://www.youtube.com/playlist?list=PL0sNyVv-JDuO6-VXEr5sMoMtnot5izeBz

१४. मन्ना डे - कराओके ट्रॅक्स - २:

https://www.youtube.com/playlist?list=PLR-KlU3SZ4amCRl0vtu-WTheWDFopqmru

१५. तलत महमूद - कराओके ट्रॅक्स - १:   (२० गाणी)

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94NaPZmppepvbA-4UYvwfJG&jct=bsWnUM1yMOCdF9_R5JP3kD7hPmHfjA

१६. तलत महमूद - कराओके ट्रॅक्स - २:   (६ गाणी)

https://www.youtube.com/playlist?list=PLITckkY1Lwo4RZ-TW5nLtNbD5jJcoEOQP

१७. तलत महमूद - कराओके ट्रॅक्स - ३ : (३९ गाणी) :

https://www.youtube.com/playlist?list=PLn2DL1IKCqK63sdiocgiU2cfW6_3-CmTZ

१८. किशोरकुमार - युगलगीते कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLkJQbWdVOPR47Q7Me5ENeJAoMEfcROnNg

१९. महंमद रफी - युगलगीते कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLkJQbWdVOPR7B3dGowFnPffimDH9m5Qe-

२०. मुकेश - युगलगीते कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLASPUkYD49aVqBUyO9efYSanQeL-Mttfa

२१. सुरेश  वाडकर - कराओके ट्रॅक्स (सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi9437c2aW6jdibkorkWPUebU

२२. उदित नारायण - कराओके ट्रॅक्स (सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95Sev44qNPHuvt_PZN0wq-I

२३. कुमार सानू - कराओके ट्रॅक्स  (सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94GmNqunTng-9NWmwf8_yNa

२४. अभिजीत - कराओके ट्रॅक्स (सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94vNKxMre7Oxl4zXwGs5Ts8

२५. शैलेंद्र सिंह - कराओके ट्रॅक्स (सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96xHlQUyo1e_tSAVgY_ttKY

२६. पंकज उधास- कराओके ट्रॅक्स (सुपरहिटगीत-गजल) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94m-Ke3qzOGolY4WTkAxx2F

२७. हिंदी गजल (२३३ सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLtpgyWr2TLC8f6couq3iLlHQQK-GzvK5g

२८. हिंदी सुपरहिट युगलगीते - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLBFh5gNhkxYlPqh2qMtdvWA3TOud_SDV_

२९. आर.डी.बर्मन - कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLPxqSWGNPR1g5JpmHaqAmBl2LQbRqNZDY

३०. हिंदी सुपरहिट सोलोज - कराओके ट्रॅक्स १:

https://www.youtube.com/playlist?list=PLqlCbO6JQG-sR5sjTVDyb-0qdJJpU-c3h

३१. हिंदी सुपरहिट सोलोज - कराओके ट्रॅक्स २:

https://www.youtube.com/playlist?list=PLOUjvRtfHUB0C67edvPnqXdZDmBKpPhqw

३२. मराठी - कराओके ट्रॅक्स -१:

https://www.youtube.com/playlist?list=PL_cmn6eLm0WpOgBtlQAU99pX-sBowAdBI

३३. मराठी - कराओके ट्रॅक्स -२ः

https://www.youtube.com/playlist?list=PLB0s71kFUaXRNHkLel2r1qHOSdFCA4AKa

३४. मराठी - कराओके ट्रॅक्स -३ः

https://www.youtube.com/playlist?list=PL_cmn6eLm0WqGTHKThwBFshJhYUGoWIFd

३५. मराठी - कराओके ट्रॅक्स -४ः

https://www.youtube.com/playlist?list=PL02hYHZOT3sQTMYF9QjfX65Ius62ue4f-https

३६. मराठी - कराओके ट्रॅक्स -५ः

https://www.youtube.com/playlist?list=PLB0s71kFUaXRNHkLel2r1qHOSdFCA4AKa

३७. राज कपूर - सुपरहिटस् - व्हिडिओ कराओके ट्रॅक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLAwZmt75SBoaqoRo6PhG3x-u9glUZUoKD

आपल्या स्वतःच्या अॅंड्रॉईड - स्मार्टफोनवर गाण्याचा 'कराओके ट्रॅक्स' बनविण्याबद्दलच्या काही मार्गदर्शनपर 'यू-ट्युब' लिंक्स सापडल्या.

०१. कराओके ट्रॅक्स बनवा (मार्गदर्शन - ०१) : https://youtu.be/2ND0GNJCObo

०२. कराओके ट्रॅक्स बनवा (मार्गदर्शन - ०२) : https://youtu.be/IMgb9odbhcU

०३. कराओके ट्रॅक्स बनवा (मार्गदर्शन - ०३) : https://youtu.be/dkv8462khqY

♥

# सारे सारे गाऊया

आपल्या अत्यंत आवडीचं गाणं असल्याने ते स्वतःच्या आवाजात गाण्याची इच्छा होणं स्वाभाविक आहे.
इतके सारे 'कराओके ट्रॅक्स' पाहून, ताला-सुरात गाणं किती आवश्यक आहे, हे लक्षात आलंच असेल; नाही का?
तर मित्रांनो, चांगलं ताला-सुरात गाणं गाण्यासाठी 'रियाज' हा हवाच. सूर पक्का करणं सुलभ व्हावे म्हणून
यासोबत आपल्यासाठी सर्वच्या सर्व 'बारा सूरांच्या' तानपूरा वादनाच्या 'यू-ट्युब' लिंक देतोय.
('सा, रे, ग, म, प, ध, नी' हे सात तीव्र तर 'रे, ग, म, ध, नी' हे पाच कोमल.. असे बारा सूर)
एकदा का ताल समजून घेत सूरात गायला शिकलात की काम फत्ते. (मोबाईलवर आपण तानपूरा
वादनाचे 'ॲप' डाऊनलोड करू शकता.) यासोबत आपणास आणखीही काही
'यू-ट्युब' लिंक्स दिल्या आहेत, त्या नक्कीच मार्गदर्शक ठरतील.
तर चला.. सारे सारे गाऊया..




## संगीत सिद्धांत
(Theory of Music)

| | |
|---|---|
| १. संगीत आस्वाद (तानपूरा)- लेख : | https://www.maayboli.com/node/50909 |
| २. रियाजाचे महत्त्व : | http://m.lokmat.com/editorial/importance-riyaz/ |
| ३. रियाजाचे फायदे : | https://youtu.be/cduY07Rd00g |
| ४. सकाळी रियाज का ?: | https://youtu.be/w9UuSvmY5SI |
| ५. मोबाईलच्या मदतीने रियाज कसा कराल : | https://youtu.be/younpYpLzlk |
| ६. कराओके ट्रॅक्सवर गाण्याच्या टीप्स : | https://youtu.be/HcGeQE3VZOw |
| ७. पियानोचं स्वरूप जाणून घ्या : | https://goo.gl/images/vAWQMS |
| ८. हार्मोनियमबद्दल टीप्स : | https://youtu.be/zhzRT1MxYp4 |
| ९. हार्मोनियमवर आपला स्केल जाणून घ्या : | https://youtu.be/jD8FiQ1H6WY |

आपण आपल्या मोबाईलवर तानपूरा वादनाचे 'ॲप' डाऊनलोड करू शकता.

| | |
|---|---|
| १. तानपूरा वादनाचे 'ॲप' - १ : | https://play.google.com/store/apps/details?id=nr.co.yourtanpura |
| २. तानपूरा वादनाचे 'ॲप' - २ : | https://play.google.com/store/apps/details?id=com.swarsystems.is |
| ३. 'ॲप' कसे डाऊनलोड कराल ? : | https://youtu.be/HMcXkkHvJho |

सर्व सुरांचे तानपुरे (प्रत्येकी सुमारे १५ मिनिटांचे) : (कृपया डाऊनलोड करून ठेवा.) :

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. सूर : सफेद १ | (C ) | https://youtu.be/z6y2IST7Ibk |
| ०२. सूर : काळी १ | (C#) | https://youtu.be/U8MtLItCHSw |
| ०३. सूर : सफेद २ | (D ) | https://youtu.be/xbW94-sHLF0 |
| ०४. सूर : काळी २ | (D#) | https://youtu.be/IXGUEOeZmyQ |
| ०५. सूर : सफेद ३ | (E ) | https://youtu.be/HaV6sOsABMk |
| ०६. सूर : सफेद ४ | (F ) | https://youtu.be/UMzpL9UaPRE |
| ०७. सूर : काळी ३ | (F#) | https://youtu.be/4SnRCz0KX3Q |
| ०८. सूर : सफेद ५ | (G ) | https://youtu.be/fCtMNkIEQKM |
| ०९. सूर : काळी ४ | (G#) | https://youtu.be/X2QVrOBGjHw |
| १०. सूर : सफेद ६ | (A ) | https://youtu.be/5ddMfvsmTkQ |
| ११. सूर : काळी ५ | (A#) | https://youtu.be/wUN8Dh8nzKQ |
| १२. सूर : सफेद ७ | (B ) | https://youtu.be/BmF9UoIUDs4 |

सुप्रसिद्ध संगीतकार पद्मश्री शंकर महादेवन यांची ‘ऑन-लाईन म्युझिक अकादमी’:
पद्मश्री शंकर महादेवन यांचे मार्गदर्शन (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi940FF5GGLkDPVnsdUmSnN1u

♥

हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातील सुमारे बाराशे ‘शास्त्रीय राग’ आणि सुमारे सहाशे रागांच्या ‘ऑडिओ क्लिप्स’ उपलब्ध करून देणारी ‘ओशियन ऑफ रागाज’ ही वेबसाईट म्हणजे संगीतप्रेमींसाठी तसेच अभ्यासकांसाठी एक पर्वणीच ठरली आहे.

हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीत (Ocean of Ragas) http://www.oceanofragas.com

आभार : ‘सुधीर विश्वनाथ गद्रे’ (पुणे)

♥




## संदर्भ सूची

### या 'ई-बुक'मधील लेखमालेशी संबंधित 'यू-ट्युब' लिंक्स.

**०१ : वाह !.. ताज !**

१. एक शहनशाह ने बनवाके.. (व्हिडिओ) : https://youtu.be/1GRrNnEy1WE

२. मेरी महबूब ! कहीं और.. (व्हिडिओ) : https://youtu.be/Hts4cb2zzso

३. एक शहनशाह ने बनवाके.. (ऑडिओ) : https://youtu.be/7pdoScP2FrU

४. मेरी महबूब ! कहीं और..(ऑडिओ) : https://youtu.be/e9pc2b2FbCQ

५. एक शहनशाह ने बनवाके.. (कराओके) : https://youtu.be/Vesp3_lULdY

६. संपूर्ण चित्रपट : लीडर (१९६४) https://youtu.be/cAUHnULslnw

७. संगीतकार नौशाद व गीतकार शकील बदायुनी https://youtu.be/ZGXY_Jzrsso

८. गीतकार शकील बदायुनी (सुपरहिट गाणी) (प्ले-लिस्ट- व्हिडिओज) :

https://www.youtube.com/playlist?list=PLlYKbqcYVljiMYVf8vQaWx68-OTHnLwS_

♥

## ०२ : संधिकाली या अशा..

१. संधिकाली या अशा.. (मूळ ऑडिओ - एच.एम.व्ही.) https://www.youtube.com/watch?v=MYDNTW4BCyU

२. संधिकाली या अशा.. (व्हर्शन - टी.सीरिज) https://www.youtube.com/watch?v=-FEXjivniCs

३. संधिकाली या अशा.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=76gpE0SFhOs

४. अरूण दातेसाहेब (सुपरहिटस्) https://youtu.be/S3Vee6DjK-8

५. आकाशगंगा (व्हीनसचा अल्बम) https://youtu.be/uB8jKp6Ixkg

६. अरूण दातेसाहेब (रेडिओ क्लासिक शो) https://youtu.be/kQwAZBKPlM4

७. अरूण दातेसाहेब (भावगीते) https://youtu.be/NsC9_Gwakm8

♥

## ०३ : जीना इसी का नाम है..

१. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (मूळ गाणे) https://www.youtube.com/watch?v=LN2yMXEXQcE

२. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=69pPYkGiEAQ

३. किसी की मुस्कुराहटों पे हो निसार.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=V6VcxhqFxrl

४. संपूर्ण चित्रपट : अनाडी (१९५९) https://www.youtube.com/watch?v=HujdhyUcfrw

५. मुकेश (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/Ks0k3YQRu90

६. गीतकार शैलेंद्र (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/LVZIHLAd9h0

७. मुकेश व शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/fhpH_dnnTjs

८. शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/nit17BZINHo

९. शंकर-जयकिशन (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/ZIfujSgsmBo

१०. आठवणीतली गाणी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/qsRt3JPhsPk

११. राजकपूर व नर्गिस (टॉप २०) https://youtu.be/bmE-2iKo2qc

♥

## ०४ : मेरे देश की धरती..

१. मेरे देश की धरती.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=jwlyMhykshM

२. मेरे देश की धरती.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=DyrJrCx1HcU

३. मेरे देश की धरती.. (कराओके) https://www.youtube.com/watch?v=m7R8Xsg5MlI

४. संपूर्ण चित्रपटः उपकार (१९६७) https://www.youtube.com/watch?v=7bCjMk38IA

५. महेंद्र कपूर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/-_eVjUb4dUI

६. कल्याणजी-आनंदजी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/BATjXGCXYHs

♥

## ०५ : आज फिर जीने की..

१. आज फिर जीने की.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=Q2xXclJyfoc

२. आज फिर जीने की.. (व्हिडिओ) https://youtu.be/_cWPiclr5eo

३. आज फिर जीने की.. (कराओके) https://www.youtube.com/watch?v=JVnlaxPhxcU

४. संपूर्ण चित्रपटः गाईड (१९६५) https://youtu.be/kfA9jjljJu0

५. लतादीदी व एस. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्) https://youtu.be/vIlmp7tY4BM

६. गीतकार शैलेंद्र (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/LVZIHLAd9h0

७. एस. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/q21zbX-NHy0

८. एस. डी. बर्मन (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/Uw7NXIzYCn0

♥

## ०६ : यारी है ईमान मेरा..

१. यारी है ईमान मेरा.. (ऑडिओ) https://youtu.be/b2ACRzcKXWQ

२. यारी है ईमान मेरा.. (व्हिडिओ) https://youtu.be/7KlcWTV3MME

३. यारी है ईमान मेरा.. (कराओके) https://youtu.be/uF2B0rPwJzM

४. संपूर्ण चित्रपटः जंजीर (१९७२) https://youtu.be/ETGDA2f4roo

♥

## ०७ : तरुण आहे रात्र अजुनि..

१. तरुण आहे रात्र अजुनि.. (ऑडिओ) https://youtu.be/1a4wGMOAqn0

२. तरुण आहे रात्र अजुनि.. (नक्षत्रांचे देणे) https://youtu.be/7YaMnvWnYBI

३. तरुण आहे रात्र अजुनि.. (लाईव्ह व्हिडिओ) https://youtu.be/c3umoZhf2Mw

४. तरूण आहे रात्र अजुनि.. (सन्मा. आरती अंकलीकर) https://youtu.be/y1j3nP1E6cc

५. तरूण आहे रात्र अजुनि.. (शंकर महादेवन) https://youtu.be/49r4SbuEoUw

६. तरूण आहे रात्र अजुनि.. (कराओके) https://youtu.be/2aPrDkewFXs

७. कविराज सुरेश भट (प्ले-लिस्ट) http://www.youtube.com/watch?v=1Oczz2Mpz2M&list=RDQMDxiYraZ6fKI

८. रंग मैफिलीचा (सुरेश भट-सुरेश वाडकर) https://youtu.be/VsEyBLNauBc

९. पहाटे पहाटे मला.. (सुरेश भट-सी. रामचंद्र) https://youtu.be/MuIyUx_QhY0

♥

## ०८ : जीना यहाँ मरना यहाँ..

१. जीना यहाँ, मरना यहाँ.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=5XOi1GzOgfc

२. जीना यहाँ, मरना यहाँ.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=9PdueQlstQw

३. जीना यहाँ, मरना यहाँ.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=pql1qD50A3o

४. चित्रपट : मेरा नाम जोकर (१९७०) - (संपूर्ण) https://youtu.be/9BDOzVIltY

५. चित्रपट : मेरा नाम जोकर (१९७०) - (संकलीत) https://youtu.be/mYDtcft4Um8

६. राज कपूर हिटस्.. (ऑडिओ ज्युकबॉक्स) https://www.youtube.com/watch?v=XHMd2nAlhjo

♥

## ०९ : दिल ने फिर याद किया..

१. दिल ने फिर याद किया.. (उपलब्ध ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=a9jHJLt4p70

२. दिल ने फिर याद किया.. (चित्रपटातील संपूर्ण गाणे) https://www.youtube.com/watch?v=2YohEL8ZkFg

३. दिल ने फिर याद किया (कराओके) https://www.youtube.com/watch?v=pTMeqWCiLaE

४. दिल ने फिर याद किया (सर्व गाण्यांचे व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=zggOhE8b8KQ

५. संपूर्ण चित्रपट : दिल ने फिर याद किया (१९६६) https://www.youtube.com/watch?v=x-JfbgvpNAU

६. संगीतकार सोनिक-ओमी (१२० सुपरहिटस्)

https://www.youtube.com/playlist?list=PLNQiZGbUnWvRwieCk6xpQsED0tYyPnyWY

७. आज के फनकार - १ (श्रद्धांजली-ओमीजी) https://youtu.be/qCyYBXyWL2M

८. आज के फनकार - २ (श्रद्धांजली-ओमीजी) https://youtu.be/kvm2wr6e5ug

♥

## १० : दिल का सूना साज..

१. दिल का सूना साज.. (चित्रपटातील गाणे) https://www.youtube.com/watch?v=v62_-JTtVlU

२. दिल का सूना साज.. (कराओके) https://www.youtube.com/watch?v=PWs6MitP-gU

३. संपूर्ण चित्रपट : एक नारी दो रूप (१९७३) https://www.youtube.com/watch?v=JlITqlriQHw

४. महंमद रफी यांची एक मुलाखत https://youtu.be/CC7qnwOe1qw

५. महंमद रफी – (आवाज एक अंदाज अनेक) https://youtu.be/9FtdW5Zs4oc

संगीतकार गणेश यांची आणखी काही श्रवणीय गाणी :

१. चाँद क्या है, रूप का दर्पन.. (धमकी-१९७३) https://youtu.be/JnNbf-njjig

२. दिल का नजराना ले.. (चालाक-१९७३) https://youtu.be/4w2uy7_NIZs

३. हम तेरे बीन जी ना.. (ठाकूर जर्नेल सिंग-१९६८) https://youtu.be/EZrLXyEAg7A

४. एक नन्ही मुन्नी.. (एक नन्ही मुन्नी लडकी थी' (१९७०) https://youtu.be/Ancst3eTx04

५. जिनकी तस्वीर निगाहों.. (हुस्न और इष्क-१९६६) https://youtu.be/UmOx99wR2zQ

६. दिल ने प्यार किया है इस.. (शरारत-१९७२) https://youtu.be/ezWAHkxQEAY

७. कल रात सपनें में आए.. (शरारत-१९७२) https://youtu.be/1UeJI1elEGs

♥

## ११ : हमें काले हैं तो क्या..

१. हमें काले हैं तो क्या हुआ.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=lLgrhR9rjyM

२. हमें काले हैं तो क्या हुआ..(ब्रह्मचारी)(व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=wBABkzlbcT4

३. हमें काले हैं तो क्या हुआ.. (कराओके) https://www.youtube.com/watch?v=NHeqqlyubng

४. संपूर्ण चित्रपट : गुमनाम (१९६५) https://www.youtube.com/watch?v=G5sTlDelaKs

५. 'हमें काले है तो..' (इंग्रजी काव्य-ऑडिओ) https://youtu.be/0NAbnClam7U

♥

## १२ : ये दुनिया ये महफ़िल..

१. ये दुनिया ये महफिल.. (उपलब्ध ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=q5i-qZIUR_Y

२. ये दुनिया ये महफिल.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=7_JAMBmnY54

३. ये दुनिया ये महफिल.. (चित्रपटातील गाणे) https://www.youtube.com/watch?v=6L8OPIWVyrM

४. संपूर्ण चित्रपट : हीर-रांझा (१९७०) https://www.youtube.com/watch?v=97wp7w1k6-Q

♥

## १३ : तू गंगा की मौज मैं..

१. तू गंगा की मौज मैं.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=V8Fhn61CuL0

२. तू गंगा की मौज मैं.. (कराओके ट्रॅक) https://www.youtube.com/watch?v=1F8o3P_vvyY

३. तू गंगा की मौज मैं.. (चित्रपटातील गाणे) https://www.youtube.com/watch?v=TpRVP9qmpmE

४. संपूर्ण चित्रपट : बैजू बावरा (१९५२) https://www.youtube.com/watch?v=CF35-vCIKfY

♥

## १४ : राज़ को राज़ रहने..

१. राज की बात कह दूं तो.. (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=a4DINZe7Gdo

२. राज की बात कह दूं तो.. (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=UHplkRhwzgk

३. संपूर्ण चित्रपट : धर्मा (१९७३) https://www.youtube.com/watch?v=7JxpxZywhrg

♥

सुपरहिट (कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

१. झूम बराबर झूम शराबी..
२. छोड दे पिना छोड शराबी..
३. कैसे बेशर्म आशिक है ये..
४. बडा लुत्फ था जब..
५. देख तमाशा लकडी का..
६. उड जाएगा इक दिन पंछी..
७. हमें तो लूट लिया मिल के..
८. ये माना मेरी जाँ मुहोब्बत..
९. माटी के पुतले तुझे..
१०. वो इक भोली सी लडकी..
११. दमा दम मस्त कलंदर..

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97DIH6sk-Xmi_NyWGUCcaww

सुपरहिट (फिल्मी कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLgbkVdghvEyxwapSfbG9w37RdWdhGC6bH

♥

## १५ : बाबुजी धीरे चलना..

१. बाबुजी धीरे चलना... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=Wn5T5scOa_w

२. बाबुजी धीरे चलना... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=rIX_UGuINK8

३. बाबुजी धीरे चलना... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=4DQIE_Xqgk8

४. 'आरपार' सिनेमातील गाणी (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=iBSvoj-aLNo&t=30s

५. संपूर्ण चित्रपट : 'आरपार' (१९५४) https://www.youtube.com/watch?v=EWdldzwfjC4

६. ओ. पी. नय्यर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/42xMVE3ApDM

७. ओ.पी.नय्यर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/naI3YxwScwc

गीता दत्त यांनी काही मराठी गाणीही गायलीत. कौतुक म्हणून त्या सर्व गाण्यांच्या 'ऑडिओ'च्या 'यू-ट्युब' लिंक देतोय.

१. गणपती बाप्पा मोरया.. (ऑडिओ) https://youtu.be/lkM8_1hQDxo

२. जा सांग लक्ष्मणा सांग.. (ऑडिओ) https://youtu.be/bUWAKoz6Ly0

३. मुक्या मनाचे बोल.. (ऑडिओ) https://youtu.be/1n5Kesno_ys

४. जय मार्तण्ड जय मल्हार.. (ऑडिओ) https://youtu.be/kCxVrife8i0

♥

## १६ : डम डम डिगा डिगा..

१. डम डम डिगा डिगा... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=I2Oi7inSVoc

२. डम डम डिगा डिगा... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=pZsmUHNwsas

३. डम डम डिगा डिगा... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=VAPn2RZXfRE

४. संपूर्ण चित्रपट : 'छलिया' (१९६०) https://www.youtube.com/watch?v=mMND0b9UMLM

५. 'छलिया' चित्रपटातील गाणी (व्हिडिओ) : https://youtu.be/z7dILkTutl0

६. साठच्या दशकातील (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) : https://youtu.be/R0OvMThBD64

७. साठच्या दशकातील प्रणयगीते (ऑडिओ) : https://youtu.be/6rhF0JoBwh8

८. राजकपूर (१०० सुपरहिटस् ऑडिओ) : https://youtu.be/V5UsKBBXMn4

९. मुकेश (विक- एण्ड क्लासिक रेडिओ शो) (ऑडिओ) https://youtu.be/NbPmQyWsWyU

१०. कल्याणजी-आनंदजी (५१ सुपरहिटस्)(व्हिडिओ) https://youtu.be/b3BehOefIms

११. मुकेश व कल्याणजी-आनंदजी (व्हिडिओ प्ले-लिस्ट)

https://www.youtube.com/playlist?list=PLBfuJwnweBgv6a7Se2_xEUOdSW88eLcQD

♥

## १७ : भातुकलीच्या खेळामधली...

१. भातुकलीच्या खेळामधली... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=GG0rfmCrMDk

२. भातुकलीच्या खेळामधली... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=RjG-Us8IRJA

३. भातुकलीच्या खेळामधली... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=lhvOjqT46h8

४. 'विक-एण्ड क्लासिक रेडिओ शो' (कार्यक्रम) https://www.youtube.com/watch?v=kQwAZBKPIM4

♥

## १८ : जानेवालों जरा..

१. जानेवालों जरा, मुडके देखो मुझे... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=H8vnR89ml_Y

२. जानेवालों जरा, मुडके देखो मुझे... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=tjB61sfhojo

३. जानेवालों जरा, मुडके देखो मुझे... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=34NQ6P8Qsps

४. 'दोस्ती' (चित्रपटातील गाणी) https://www.youtube.com/watch?v=BI4VJ3ZJ4jY

५. संपूर्ण चित्रपट : 'दोस्ती' (१९६४) https://www.youtube.com/watch?v=FUcnEx-jjOs

६. महंमद रफी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/MFnLpuYz_T0

७. लतादीदी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/BQIiGOFZSf4

८. लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/WssoEe5XvMQ

९. गीतकार मजरूह सुल्तानपुरी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/HXd4floYyjY

♥

## १९ : लेके पहला पहला प्यार..

१. ओ लेके पहला पहला प्यार... (व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=6jSE-Zilkfc

२. ओ लेके पहला पहला प्यार... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=X1B3dW7gCt8

३. ओ लेके पहला पहला प्यार... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=Lj0rDRU_C9g

४. संपूर्ण चित्रपट : 'सी.आई.डी' (१९५६) https://www.youtube.com/watch?v=enkstu6n-E8

शमशाद बेगम (१९१९-२०१३)! एक वैशिष्ट्यपूर्ण आवाज लाभलेली गायिका. त्यांच्या सुपरहिट गाण्यांच्या काही 'यू-ट्युब' लिंक्स.

१. शमशाद बेगम (५० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/WPkITciei-c

२. शमशाद बेगम (१० सुपरहिटस्) (व्हिडिओ) https://youtu.be/243j36qFDyo

३. शमशाद बेगम-रफी (युगल गीते) (ऑडिओ) https://youtu.be/61hTEtITAXU

४. मेरी निंदों में तुम.. (किशोरकुमारसह) https://youtu.be/aNgOqEhP-8g

५. मिलतेही आँखे दिल.. (तलत महमूदसह) https://youtu.be/89Mz6gUFvcg

६. भीगा भीगा प्यार का.. (महंमद रफीसह) https://youtu.be/QuoX9FhJMX0

७. मैं भंवरा तू है फूल.. (मुकेशसह) https://youtu.be/g6rkE_Y31-g

♥

## २० : मैं जिंदगी का साथ..

१. मैं जिंदगी का साथ... (ऑडिओ) https://www.youtube.com/watch?v=8xLGdl9_jak

२. मैं जिंदगी का साथ... (मूळ व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=Vmo2LTC3iC0

३. मैं जिंदगी का साथ... (नवा व्हिडिओ) https://www.youtube.com/watch?v=QCGh8s3mShQ

४. मैं जिंदगी का साथ... (कराओके) https://www.youtube.com/watch?v=3GKOsPwRD-8

५. 'हम दोनो' (१९६१) (संपूर्ण चित्रपट) https://www.youtube.com/watch?v=ruLdKqijp8Q

६. संगीतकार जयदेव (सुपरहिटस् - ०१) https://youtu.be/c3fuT8dOuUo

७. संगीतकार जयदेव (सुपरहिटस् - ०२) https://youtu.be/9GEZZrK-V2Y

♥

## २१ : प्यार किया तो डरना क्या..

१. प्यार किया तो डरना क्या.. (ऑडिओ) https://youtu.be/yBuz0eWC598

२. प्यार किया तो डरना क्या.. (व्हिडिओ) https://youtu.be/6Au_J6jHKE0

३. प्यार किया तो डरना क्या.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/biSsnR6I3gk

४. 'मुघल-ए-आझम' (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/rq8MktR_Ctc

♥

## २२ : विकत घेतला श्याम..

०१. विकत घेतला श्याम.. (ऑडिओ) https://youtu.be/jeKYYTQ8L28

०२. विकत घेतला श्याम.. (व्हिडिओ) https://youtu.be/cI7_7ntHgu8

०३. विकत घेतला श्याम.. (कराओके ट्रॅक - १) https://youtu.be/jeKYYTQ8L28

०४. विकत घेतला श्याम.. (कराओके ट्रॅक - २) https://youtu.be/OOSmGrPNV1I

०५. 'जगाच्या पाठीवर' (१९६०) (चित्रपट गीते) https://youtu.be/xxT0PaeKAfk

०६. आशा भोसले (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/tAxfLcrtOP0

०७. आशा भोसले (मराठी)(विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/J5CFFXgRwX0

०८. सुधीर फडके (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/3KOwiWDLZos

०९. सुधीर फडके (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/uYAz-safsbI

१०. मराठी (क्लासिक सुपरहिटस् - १) : https://youtu.be/-ceyEAuKIbg

११. मराठी (क्लासिक सुपरहिटस् - २) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLD_7Loqe1ChfgjJtotq7kwEDnh1nimzpx

१२. सुधीर फडके (टॉप मराठी साँगस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLQ-s1vIRDL691QoXYX22tetvtPY7KYdDI

♥

## २३ : अपने पे भरोसा है तो..

१. अपने पे भरोसा है तो.. (ऑडिओ) https://youtu.be/6kuSZQI6sIk

२. अपने पे भरोसा है तो.. (व्हिडिओ) https://youtu.be/J6cfWroNcNY

३. अपने पे भरोसा है तो.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/rbjEYNOdPzg

४. 'बाजी' (१९५१)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/x-kBoQjEDik

५. गीता दत्त (५० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/KsMrpO0YuxY

♥

## २४ : खाई के पान बनारसवाला..

१. खाई के पान बनारसवाला.. (ऑडिओ) https://youtu.be/Dp731wPQiNk

२. खाई के पान बनारसवाला.. (अमिताभ) https://youtu.be/I08ex7M5WTw

३. खाई के पान बनारसवाला.. (शाहरुख) https://youtu.be/4F4peofF5kc

४. खाई के पान बनारसवाला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/Wk0KbUWMkhA

५. 'डॉन' (१९७८)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/_9rOTAT6RAM

६. 'डॉन' (२००६)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/_UXT8e7tMI8

७. 'डॉन' (१९७८) (क्लायमॅक्स सीन) (व्हिडिओ) : https://youtu.be/TNIDiIb0c58

## २५ : मी ओळखून आहे..

१. मी ओळखून आहे.. (ऑडिओ) : https://youtu.be/qPagzGnhwgk

२. मी ओळखून आहे.. (कराओके): https://youtu.be/c2cUnblPIWk

३. श्रीनिवास खळे यांची १०० सुप्रसिद्ध गाणी : https://youtu.be/ylCJF3z418c

४. पं. हृदयनाथ मंगेशकर यांची काही सुप्रसिद्ध गाणी :

https://www.youtube.com/playlist?list=PLu7XRhdK0XiGwtDNM3iPmQJNhlyengH2T

♥

## २६ : ओ दूर के मुसाफिर..

१. ओ दूर के मुसाफिर... (ऑडिओ) https://youtu.be/Jfjgx9RbJrI

२. ओ दूर के मुसाफिर... (व्हिडिओ) https://youtu.be/pD7HziV7204

३. ओ दूर के मुसाफिर... (कराओके ट्रॅक) https://youtu.be/KRRSOOR0HUo

४. ‘उडन खटोला’ (१९५५)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/lm9rYcmzRAI

महंमद रफी यांची गाणी म्हणता तो रसिकांचा अगदी जिव्हाळ्याचा विषय. देत आहे काही ‘यू-ट्युब’ लिंक्स :

१. महंमद रफी (माझी मराठी गाणी)(ऑडिओ) https://youtu.be/3uPAspK_7T8

२. महंमद रफी (१०० सुपरहिटस्-१)(ऑडिओ) https://youtu.be/v9GqSMg1tj0

३. महंमद रफी (१०० सुपरहिटस्-२)(ऑडिओ) https://youtu.be/4zpd7CHihiE

४. महंमद रफी (टॉप २०)(व्हिडिओ) https://youtu.be/C-ZsXUUwrQs

५. महंमद रफी (युगलगीते)(व्हिडिओ) https://youtu.be/il1rEuXZIS8

६. महंमद रफी (सुपरहिटस्) https://youtu.be/UBydW3L-yl8

♥

## २७ : इक घर बनाऊँगा..

१. इक घर बनाऊंगा... (ऑडिओ) https://youtu.be/-Kjsei9VKrk

२. इक घर बनाऊंगा... (व्हिडिओ) https://youtu.be/BYj7bgtnNM4

३. इक घर बनाऊंगा... (कराओके ट्रॅक) https://youtu.be/_VxBTp_fnvw

४. ‘तेरे घर के सामने’ (१९६३)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/8jGq3DyDeho

एव्हरग्रीन देवआनंद यांच्याशी संबंधित अनमोल खजिना. काही ‘यू-ट्युब’ लिंक्स :

१. देव आनंद (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/tnNwKCU8Uj0

२. देव आनंद (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/6aTTtDgoDUo

३. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - १) https://youtu.be/fO3lO4AUU5A

४. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - २) https://youtu.be/wj_n8AvesWE

५. देव आनंद (टॉप १०)(व्हिडिओ - ३) https://youtu.be/gdOerc0SF9s

६. देव आनंद व किशोर (गंमतीदार गाणे) https://youtu.be/luZ_ks7ZRLY

♥

२८: ऐरणीच्या देवा तुला..

१. ऐरणीच्या देवा तुला.. (ऑडिओ) https://youtu.be/vHZnbf6CeYE

२. ऐरणीच्या देवा तुला.. (ऑडिओ - एच.एम.व्ही ) https://youtu.be/F1Pne2TjGCk

३. ऐरणीच्या देवा तुला.. (व्हिडिओ) https://youtu.be/8aTGUrolfBE

४. ऐरणीच्या देवा तुला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/5F2OY_78Ki4

५. ‘साधी माणसं ’ (१९६५) (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/zVmS4VehXYI

लतादीदी (अर्थात संगीतकार ‘आनंदघन’) यांचा आविष्कार असलेल्या काही ‘यू-ट्युब’ लिंक्स :

१. लता मंगेशकर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/dF71gtz15Xo

२. लता मंगेशकर (१०० मराठी सुपरहिटस्) https://youtu.be/RzfvE1Cj8Bg

३. ‘आनंदघन’ (लता मंगेशकर) (ऑडिओ)

https://www.youtube.com/playlist?list=PLzszD5D0XpM-AeLZxptPwNlY-GdPdutis

♥

२९ : सुबहा न आयी, शाम..

१. सुबह ना आयी.. (ऑडिओ) https://youtu.be/2lDZytVwHto

२. सुबह ना आयी.. (व्हिडिओ) https://youtu.be/vWuCjeBUcz4

३. सुबह ना आयी.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/67uFciRoMng

४. ‘चा चा चा’ (१९६४) (व्हिडिओ लिंक) https://youtu.be/uf99lW5ksKw

५. संगीतकार ‘इक्बाल कुरेशी’ हिटस् https://youtu.be/81z-a7IxSHY

६. एक चमेली के मंडवे तले (व्हिडिओ) 'चा चा चा' (१९६४) https://youtu.be/Dddz_VWPKnc

याच चालीतील आणखी एका गाण्याची 'यू-ट्युब' लिंक.. अवश्य पहा.

७. आज मौसम की मस्ती..(रफी-लता)(बनारसी-ठग १९६३) https://youtu.be/Ra-wu1eYplg

८. आज मौसम की मस्ती..(रफी-लता)(बनारसी-ठग १९६३) https://youtu.be/-OgXDJsyMLM

९. आज मौसम की मस्ती.. (दोन्ही गाणी) https://youtu.be/Yt7EzloXCQE

♥

३० : गंगा जमुना डोळ्यात..

१. गंगा जमुना डोळयात.. (ऑडिओ) https://youtu.be/qgfk6OrWuOA

२. गंगा जमुना डोळयात.. (ऑडिओ) https://youtu.be/2ACO_7uaN_0

३. लतादीदी (भावगीते-मराठी अल्बम) https://youtu.be/q5-KO5fC4vk

४. लता मंगेशकर (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/RzfvE1Cj8Bg

५. लता मंगेशकर मराठी गाणी (व्हिडिओ) : https://youtu.be/9Md18LQ9XaY

६. लता मंगेशकर मराठी गाणी (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLGpLqaMxppFqTQug3QfM7cpZUf3eCMCY9

७. जनकवि पी. सावळाराम (८४ सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi942tN3FVEQqGpCP7TLnegod

♥

३१ : मेरे पैरों में घुँगरू..

१. मेरे पैरों में घुंगरू... (ऑडिओ) https://youtu.be/aZV3_RyjTRk

२. मेरे पैरों में घुंगरू... (व्हिडिओ) https://youtu.be/wEHb94UVNHo

३. मेरे पैरों में घुंगरू... (कराओके ट्रॅक) https://youtu.be/X0IN5EYHk7Y

४. 'संघर्ष' (१९६८) : (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/DyHSOpcpAmI

गाण्यात संदर्भ आलाय म्हणून त्या गाण्यांच्या सुद्धा 'यू-ट्युब' लिंक्स देत आहे..

१. हम से तो अच्छी तेरी.. (गंवार, १९७०) https://youtu.be/-yK6sb024D0

२. नैन लड जई है तो.. (गंगा जमुना, १९६१) https://youtu.be/ya5h0g39UvI

३. दिलीपकुमार (५० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/i37yd6y5TQU

४. दिलीपकुमार (५१ सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/W7ZRUgsdkOA

♥

<u>३२ : लग जा गले के..</u>

१. लग जा गले के फिर.. (ऑडिओ) https://youtu.be/br6C4U3Dyfo

२. लग जा गले के फिर.. (व्हिडिओ) https://youtu.be/TFr6G5zveS8

३. लग जा गले के फिर.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/91dB6HxsYWQ

४. लग जा गले के फिर.. (लतादीदी लाईव्ह) https://youtu.be/9v20pa_dDyM

५. 'वो कौन थी ?' (१९६४) (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/vfcpd5PH22M

६. लतादीदी व मदनमोहन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/I8tVaKhVuBo

आता याच गाण्याची विविध श्रवणीय 'इन्स्ट्रूमेंटल्स'... प्रत्येक वाद्याच्या वादनातून वेगळा मूड जाणवतो, हे विशेष.

६. लग जा गले के फिर.. (पियानो) https://youtu.be/e_O7KA1_p2U

७. लग जा गले के फिर.. (सॅक्सोफोन) https://youtu.be/g8JBFS2vhjo

८. लग जा गले के फिर.. (व्हायोलिन) https://youtu.be/hiUPJGvzgE4

९. लग जा गले के फिर.. (सॉफ्ट इन्स्ट्रूमेंटल) https://youtu.be/gWsVoPe7ahw

♥

<u>३३ : हरे राम हरे कृष्ण..</u>

१. बोलो सुबह शाम हरे.. (व्हिडिओ) https://youtu.be/xKU4q0JELTQ

२. बोलो सुबह शाम हरे.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/-8whyNAc88k

३. 'हरे राम हरे कृष्ण' (१९७१) (चित्रपटातील गाणी) https://youtu.be/GoS1kAKpPI4

४. पंचमदा व किशोरकुमार (१०० गाणी-ऑडिओ) https://youtu.be/uA67M0Lihz0

५. पंचमदा व आशाताई (५० गाणी-ऑडिओ) https://youtu.be/IAXwD4pRcSw

६. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (वाद्यसंगीत- ताबून सूत्रधार) https://youtu.be/IZkhYy4sYac

७. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (ऑडिओ) https://youtu.be/KfwsWOBd6IA

८. पंचमदांची सुप्रसिद्ध गाणी (व्हिडिओ) https://youtu.be/5-iu86NhFfc

९. देव आनंद (नवकेतन हिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/erlY5DoohNM

१०. युगलगीते (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/e5ff83TbWR4

♥

३४ : चल अकेला चल अकेला..

१. चल अकेला चल अकेला.. (व्हिडिओ) https://youtu.be/1HsLqPcayh4

२. चल अकेला चल अकेला.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/6FKCeDHUbuE

३. 'संबंध' (१९६९).. (चित्रपटातील गाणी) https://youtu.be/6X1kkdk3MM4

४. 'संबंध' (१९६९)(संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/41ZCdyZqifs

५. मुकेश (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/Ks0k3YQRu90

♥

३५ : चढता सूरज धीरे धीरे..

१. चढता सूरज धीरे धीरे.. (मूळ कव्वाली) https://youtu.be/Qs0_68k7_rk

२. चढता सूरज धीरे धीरे.. (व्हर्शन) https://youtu.be/L05wsnjpkX0

३. चढता सूरज धीरे धीरे.. (व्हिडिओ) https://youtu.be/KvC5gT5-keA

४. चढता सूरज धीरे धीरे.. (कराओके - १) https://youtu.be/x0QgWASIs8s

५. चढता सूरज धीरे धीरे.. (कराओके - २) https://youtu.be/_mHOTDOSdjI

सुपरहिट (कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97DlH6sk-Xmi_NyWGUCcaww

सुपरहिट (फिल्मी कव्वाली) प्ले-लिस्ट 'यू-ट्युब' लिंक्स :

https://www.youtube.com/playlist?list=PLgbkVdghvEyxwapSfbG9w37RdWdhGC6bH

♥

३६ : कभी कभी मेरे दिल में..

१. कभी कभी मेरे दिल में.. (व्हिडिओ १) https://youtu.be/pdXZJ6dsaW4

२. कभी कभी मेरे दिल में.. (व्हिडिओ २) https://youtu.be/EKMPf737pp0

३. कभी कभी मेरे दिल में.. (लता-ऑडिओ) https://youtu.be/o-j2hFfLOSE

४. कभी कभी मेरे दिल में.. (ऑडिओ) https://youtu.be/R1QwN9faDZw

५. कभी कभी मेरे दिल में.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/ffRq1Ve9XZ4

६. कभी कभी मेरे दिल में.. (अमिताभ) https://youtu.be/cr2CmVf-HUg

७. कभी कभी.. (सर्व गाणी) https://www.youtube.com/playlist?list=PLXCoHsJ9oLedmtKeWhhiZDlCSsyKEHgrC

श्रवणीय आणि संग्राह्य गाण्यांच्या 'यू-ट्युब' लिंक्स :

१. गीतकार साहिर लुधियानवी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/JV74z_Uf9H4

२. साहीर लुधियानवी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/outkSx58IjQ

३. संगीतकार खय्याम (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/sN1EQEg4tSo

४. संगीतकार खय्याम (मेलडी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/PzsCL5x2tDY

५. साहीर लुधियानवी (सुपरहिटस् - प्ले-लिस्ट) https://www.youtube.com/playlist?list=PLF5418A667BE6DD41

♥

३७ : नाविका रे वारा वाहे..

१. नाविका रे वारा वाहे.. (ऑडिओ १) https://youtu.be/2gvPExKhtfM

२. नाविका रे वारा वाहे.. (ऑडिओ २) https://youtu.be/LoZIXu_0RPk

३. नाविका रे वारा वाहे.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/ApAnR5T2d28

४. सुमन कल्याणपूर (१०० सुपरहिटस्) https://youtu.be/K77t706fcnE

५. संगीतकार अशोक पत्की (ग्रेट भेट) https://youtu.be/KrkhvOA1EIk

६. संगीतकार अशोक पत्की (टी.व्ही. मालिका) https://youtu.be/m_4izgQ9mXU

♥

३८ : चिंगारी कोई भडके..

१. चिंगारी कोई भडके.. (ऑडिओ- व्हिडिओ) https://youtu.be/ARtIHBg2ve0

२. चिंगारी कोई भडके.. (व्हिडिओ) https://youtu.be/dDepa9OMAE4

३. चिंगारी कोई भडके.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/qFpUd7fMV3s

४. चिंगारी कोई भडके.. (वाद्यसंगीत) https://youtu.be/jz0pBgLk9T0

५. चिंगारी कोई भडके.. (किशोरकुमार) https://youtu.be/AksD5sGO01c

६. 'अमर प्रेम' (१९७१) चित्रपटाच्या 'यू-ट्युब' लिंक्स : https://www.youtube.com/playlist?list=PLE969EA6B46902034

८. गीतकार आनंद बक्षी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/OkBMp70xdXc

९. आनंद बक्षी (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/CvKNwM7qM2w

९. आर. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/iyP0zN-Ce2U

♥

३९ : तो ‘राजहंस’ एक..

१. एका तळ्यात होती.. (भावगीत) (ॲनिमेशन) : https://youtu.be/Zfsw0B4fRAA

२. एका तळ्यात होती.. (भावगीत) (कराओके) : https://youtu.be/n8ah5hdxauE

३. एका तळ्यात होती.. (सुखाचे सोबती-व्हिडिओ १): https://youtu.be/zMmvH_BvgLs

४. एका तळ्यात होती.. (सुखाचे सोबती-व्हिडिओ २): https://youtu.be/UFvDYxyiKCY

५. श्रीनिवास खळे यांची १०० सुप्रसिद्ध गाणी : https://youtu.be/ylCJF3z418c

६. आशा भोसले (१०० मराठी हिट्स) (ऑडिओ): https://youtu.be/tAxfLcrtOP0

♥

४० : मेरे जीवन साथी..

०१. मेरे जीवनसाथी.. (ऑडिओ) https://youtu.be/qLcXrP6rXUQ

०२. मेरे जीवनसाथी.. (व्हिडिओ) https://youtu.be/P1FscJwjKyY

०३. मेरे जीवनसाथी.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/sWUOpPY96YU

०४. ‘साथी’ (१९६८) : (संपूर्ण चित्रपट) https://youtu.be/TroEr0-hplE

०५. ‘साथी’ (१९६८) : (सर्व गाणी) https://youtu.be/DK64x1BBGyU

०६. मैं तो प्यार से तेरे.. (व्हिडिओ) https://youtu.be/rkyAcMP0dmg

०७. नौशाद (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/A9YSJ6uWptg

०८. लतादीदी व नौशाद (५० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/wrxo4lyQmDY

०९. लतादीदी व सलील चौधरी (८० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/oQuWK_DWnLs

१०. लतादीदी व लक्ष्मीकांत-प्यारेलाल (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/BQliGOFZSf4

११. लतादीदी व शंकर-जयकिशन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/bD_Hk3wcoCo

१२. लतादीदी व मदनमोहन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/I8tVaKhVuBo

१३. लतादीदी व पंचमदा (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/zXJwGmCGD94

१४. लतादीदी व हेमंतकुमार (४० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/ao--ravywJc

१५. लतादीदी व मुकेश (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/PT2UaSJAgCM

१६. लता मंगेशकर (५१ अभिनेत्रींसाठी पार्श्वगायन) https://youtu.be/FSWLxF2RJzQ

१७. लता मंगेशकर (५१ निवडक सुपरहिटस्) https://youtu.be/5lXREyojnBA

♥

४१ : स्वप्नातल्या कळ्यांनो..

१. स्वप्नातल्या कळ्यांनो.. (ऑडिओ) https://youtu.be/BwGB3CwJX8o

२. स्वप्नातल्या कळ्यांनो.. (ऑडिओ) https://youtu.be/6sTpFj-EkAM

३. आशाताई यांची १०० मराठी गाणी https://youtu.be/tAxfLcrtOP0

४. आशा भोसले (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/J5CFFXgRwX0

♥

४२ : आधा है चंद्रमा..

१. आधा है चंद्रमा.. (ऑडिओ) https://youtu.be/zxukLSnWs68

२. आधा है चंद्रमा.. (व्हिडिओ) https://youtu.be/aasw1WDNhgY

३. आधा है चंद्रमा..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/L3qlwoZ_BLE

४. नवरंग (१९५९) (चित्रपटातील गाणी) https://youtu.be/HbbWoLOoNM0

५. चित्रपट : नवरंग (१९५९) https://youtu.be/aWQQx5V1LK4

६. महेंद्र कपूर (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/-_eVjUb4dUI

७. महेंद्र कपूर (सुपरहिटस्-ऑडिओ) https://youtu.be/PALOIKSXOME

८. महेंद्र कपूर (मराठी हिटस्-प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97NF0ZlryzS2X9e1xrteluc

९. महेंद्र कपूर - (कराओके ट्रॅक्स १) :

https://www.youtube.com/playlist?list=PLy8fICElsXJv22OdZoP7lR1QepFPTBExJ

१०. महेंद्र कपूर – (कराओके ट्रॅक्स २) :

https://www.youtube.com/playlist?list=PL8XAFwYHVKblC30ShbBY6SA7PsXwPTKJQ

११. महेंद्र कपूर - युगलगीते (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95BsZ1K-B1r5y3l_8aEgKpB

१२. सी. रामचंद्र व लता मंगेशकर (दुर्मीळ गाणी) (ऑडिओ) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97q9v9epzuwjZORU_O8iSsU

१३. सी. रामचंद्र (भुलाए न बने) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97WHTSn9W_6ajFR6J8SVW9N

♥

४३ : पल दो पल का साथ हमारा..

१. पल दो पल का साथ हमारा.. (ऑडिओ १) https://youtu.be/bYmfFtHbLPs

२. पल दो पल का साथ हमारा.. (ऑडिओ २) https://youtu.be/1l_LGh-iMPI

३. पल दो पल का साथ हमारा.. (व्हिडिओ) https://youtu.be/z2WUSvHbQ2c

४. पल दो पल का साथ हमारा.. (कराओके ट्रॅक १) https://youtu.be/Ft8Op2Ql-bk

५. पल दो पल का साथ हमारा.. (कराओके ट्रॅक २) https://youtu.be/1Bwxe5E_imQ

६. चित्रपट : दी बर्निंग ट्रेन (१९८०) https://youtu.be/PPC482DzYM0

तुमच्या संग्रही असायलाच हव्यात अशा काही 'यू-ट्युब' लिंक्स.. ऐका, पहा आणि डाऊनलोड करा.

१. गीतकार साहिर लुधियानवी (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/JV74z_Uf9H4

२. आर. डी. बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/iyP0zN-Ce2U

३. आशाताई व आर.डी.बर्मन (५० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/IAXwD4pRcSw

४. आशाताई व आर.डी.बर्मन (१०० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/65BuNb1VANE

♥

४४ : आजा रे मैं तो कब..

०१. आजा रे..परदेसी..(ऑडिओ) https://youtu.be/s0ZiLUoTLH8

०२. आजा रे..परदेसी.. (व्हिडिओ) https://youtu.be/Mm21SSgUHe8

०३. आजा रे..परदेसी.. (कराओके ट्रॅक) https://youtu.be/oAaNxUz1xtQ

०४. आजा रे..परदेसी.. (चित्रपट :गुड्डी) https://youtu.be/lq0ultK7VpY

०५. आजा रे..परदेसी.. (लतादीदी लाईव्ह) https://youtu.be/gLO-MTxnqYg

०६. मधुमती (१९५८) (ऑडिओ ज्युकबॉक्स) https://youtu.be/JHXH7hR7508

०७. सुहाना सफर और ये.. (सप्तरंगात) https://youtu.be/vTnAvikqB_8

०८. चित्रपट : मधुमती (१९५८) https://youtu.be/WJBnBi2JLog

०९. संगीतकार सलील चौधरी (५० सुपरहिटस्) https://youtu.be/2aXVLT8vCc0

१०. संगीतकार सलील चौधरी (सुपरहिटस्) https://youtu.be/gSBO-VSTKrk

११. लतादीदी व सलील चौधरी (८० सुपरहिटस्)(ऑडिओ) https://youtu.be/oQuWK_DWnLs

♥

४५ : तेरे चेहरे में वो जादू..

१. तेरे चेहरे में वो.. (ऑडिओ) https://youtu.be/1Ca6tTs60I4

२. तेरे चेहरे में वो.. (व्हिडिओ) https://youtu.be/p1LFu6sq1ZE

३. तेरे चेहरे में वो..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/mPczdr_ECsc

४. चित्रपट : धर्मात्मा (१९७५) https://youtu.be/qr-tlj5A5So

५. फिरोजखान (सुपरहिटस्) https://youtu.be/HRe_hf7CS5g

६. किशोरकुमार (लाईव्ह सादरीकरण) https://youtu.be/9c0NjQ3tX7I

७. किशोरकुमार (दूरदर्शन -लाईव्ह) https://youtu.be/FvqvlYR_YIQ

८. फिल्मफेअर सन्मान प्राप्त १०० हिटस् https://youtu.be/fsPmp_u1nwc

♥

४६ : माळव्याच्या मळ्यामंदी..

१. माळव्याच्या मळ्यामध्ये कोण.. (ऑडिओ) https://youtu.be/9LZEpcgSdWc

२. माळव्याच्या मळ्यामध्ये कोण.. (व्हिडिओ) https://youtu.be/qbN4JU-ZV1o

३. माळव्याच्या मळ्यामध्ये कोण..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/8TS-qxOI4XU

४. दादा कोंडके (सुपरहिटस्) https://youtu.be/1ZyKxhCGizg

५. उषा मंगेशकर (१०० मराठी हिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/373Yb49G0I4

६. उषा मंगेशकर (विक-एन्ड क्लासिक रेडिओ शो) https://youtu.be/VD0kM1kKPZQ

७. जयवंत कुलकर्णी (सुपरहिटस् -प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PLYeGk45nneuvxTtjIMbw1eSFDxZdIR9JT

♥

४७ : ऐ मेरे दिल कहीं और..

०१. ऐ मेरे दिल कहीं और.. (व्हिडिओ-१) https://youtu.be/1B9sm1HHAIQ

०२. ऐ मेरे दिल कहीं और.. (व्हिडिओ-२) https://youtu.be/b7yfJcZc2VU

०३. ऐ मेरे दिल कहीं और.. (संपूर्ण) https://youtu.be/tc-wIfdIOwY

०४. ऐ मेरे दिल कहीं और.. (लतादीदी) https://youtu.be/RezieKUI6Is

०५. ऐ मेरे दिल कहीं और.. (लाईव्ह) https://youtu.be/z4BPYQTHqrQ

०६. ऐ मेरे दिल कहीं और..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/RyI7sDdkctk

०७. संपूर्ण चित्रपट : दाग (१९५२) https://youtu.be/6KsHgQQ7gc8

०८. तलत महमूद – सुपरहिटस् (५० गाणी) https://youtu.be/vWVaB9qXLhc

०९. तलत महमूद (किंग ऑफ गजल्स) https://youtu.be/CkLstaeVet8

०३. तलत महमूद (मराठी सुपरहिटस्) (प्ले-लिस्ट) :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95MqZJWDLC8pRgOqgbhsfya

१. 'भाभी (१९५७)' चित्रपटातील 'चल उड जा रे पंछी..' हे गाणं तलत महमूदच्या मखमली आवाजात सुद्धा एच.एम.व्ही.नेच रेकॉर्ड केलं होतं. परंतु 'तलत महमूद' त्यांच्या कोणत्याच अल्बममध्ये सापडलं नाही. सुदैवाने ते 'यू-ट्युब'वर मात्र उपलब्ध आहे.

https://youtu.be/MwWaXZB8-4k

२. 'सुशिला (१९६३)' चित्रपटातील महंमद रफी व तलत महमूद यांच्या सुरेल आवाजातील 'ग़म की अंधेरी रात में..' हे गाणं अवश्य ऐका.

https://youtu.be/G7HEGnogL8Q

https://youtu.be/GYqbgYPbz9U

३. तलत महमूद हा आपला लाडका गायक. या घ्या त्यांच्या सुपरहिट गाण्यांच्या काही 'यू-ट्युब' लिंक्स..

१. तलत महमूद (सुपरहिटस्-१)(ऑडिओ) https://youtu.be/oygbljt-i-k

२. तलत महमूद (सुपरहिटस्-२)(ऑडिओ) https://youtu.be/QL9alA089fs

♥

४८ : फूल गेंदवा न मारो..

१. फूल गेंदवा न मारो.. (ऑडिओ) https://youtu.be/Wk_Lyoy8OLA

२. फूल गेंदवा न मारो.. (व्हिडिओ) https://youtu.be/jX_8TpSCyBY

३. चित्रपट : दूज का चाँद (१९६४) https://youtu.be/1iq3aZA9N30

४. मन्ना डे (सुपरहिटस्-लाईव्ह) https://youtu.be/mOAwDE_TXIQ

५. मन्ना डे (क्लासिकल हिटस्) https://youtu.be/iH4ZmnIDg4w

६. मन्ना डे (१०० सुपरहिटस्) (ऑडिओ) https://youtu.be/fUjS-uZq0Bg

७. मन्ना डे (मराठी सुपरहिटस् - १) https://youtu.be/x8StbAt-YgI

८. मन्ना डे (मराठी सुपरहिटस् - २) https://youtu.be/OFEQCn2DyxQ

♥

४९ : मेरे मेहबूब तुझे..

१. मेरे मेहबूब तुझे.. (ऑडिओ) https://youtu.be/uatCyNzgL3o

२. मेरे मेहबूब तुझे.. (व्हिडिओ-१) https://youtu.be/o-WzgHmelsA

३. मेरे मेहबूब तुझे.. (व्हिडिओ-२) https://youtu.be/xzPGBnKt8z0

४. मेरे मेहबूब तुझे..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/cEG0_DSKg68

५. चित्रपट : मेरे मेहबूब (१९६३) https://youtu.be/lLT4RcMa2fo

आता.. महंमद रफींशी संबंधित काही 'यू-ट्युब' लिंक्सचा बोनस.

१. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-१ https://youtu.be/q1kwUGvQY5Q

२. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-२ https://youtu.be/OZa9XJ1bJtY

३. महंमद रफी यांचे इंग्रजी भाषेतील गाणे-३ https://youtu.be/_qC-3-6pd1c

४. महंमद रफी (लाईव्ह सादरीकरण-१) https://youtu.be/DVDGo9hvEnM

५. महंमद रफी (लाईव्ह सादरीकरण-२) https://youtu.be/TE6e3eAtLSM

६. महंमद रफी (दूरदर्शन-लाईव्ह) https://youtu.be/VHsJxphnAF8

७. महंमद रफी (स्टुडिओतील एक आठवण) https://youtu.be/mCyU2cNXjCs

८. महंमद रफी, शंकर-जयकिशन नाईट https://youtu.be/I7nAbmQ_Crg

♥

५० : महेबूबा महेबूबा बना लो..

१. मेहबूबा मेहबूबा, बना लो.. (ऑडिओ) https://youtu.be/mwyevT_vgTI

२. मेहबूबा मेहबूबा, बना लो.. (व्हिडिओ) https://youtu.be/mwyevT_vgTI

३. मेहबूबा मेहबूबा, बना लो..(कराओके ट्रॅक) https://youtu.be/Q7wpHUGmAB0

४. चित्रपट : साधू और शैतान (१९६३) https://youtu.be/fa_kUOPq8JU

५. मेहमूद (सुपरहिटस्) https://youtu.be/wZbH_8PN9ac

६. मेहबूबा मेहबूबा, बना लो.. (ज्युनियर मेहमूद) https://youtu.be/UGfD21oVErk

♥

## ५१ : शतदा प्रेम करावे..

| | |
|---|---|
| १. शतदा प्रेम करावे.. (ऑडिओ-१) | https://youtu.be/ky0osqfJPDE |
| २. शतदा प्रेम करावे.. (ऑडिओ-२) | https://youtu.be/j4Qhx36ku7A |
| ३. शतदा प्रेम करावे..(कराओके ट्रॅक) | https://youtu.be/2FA0kj3KYkw |
| ४. अरूण दातेसाहेब (सुपरहिटस्) | https://youtu.be/S3Vee6DjK-8 |
| ५. आकाशगंगा (व्हीनसचा अल्बम) | https://youtu.be/uB8jKp6Ixkg |
| ६. अरूण दातेसाहेब (रेडिओ क्लासिक शो) | https://youtu.be/kQwAZBKPlM4 |
| ७. अरूण दातेसाहेब (भावगीते) | https://youtu.be/NsC9_Gwakm8 |
| ८. कविराज मंगेश पाडगांवकर (शतदा प्रेम करावे-कविता) | https://youtu.be/Ewxv8PwbYSQ |
| ९. श्रीराम जय राम.. (अरूण दाते-भक्तिगीत) | https://youtu.be/Ms8lSRO_NdU |
| १०. श्रीरंग सावळा तू.. (ऑडिओ) | https://youtu.be/Q5OpYTAtawI |

♥